TIGHT BINDING

TEXT PROBLEM

'इतिहाससंग्रहां'त प्रसिद्ध झालेलीं

महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें.

[कारकीर्द—अहल्याबाई होळकर.]

भाग १ ला.

दत्तात्रय बळवंत पारसनीस

संपादक, 'इतिहाससंग्रह'

सातारा.

इ. स. १९१०.

किंमत २ [illegible]

UNIVERSAL
LIBRARY

OU_192020

UNIVERSAL
LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 923.2 Accession No. M 2211

Author P 2-2-M

Title પારસનગરી; ૧-૧

This book should be returned on or before the date last marked below



इंदूरचे पहिले तुकोजीराव होळकर.

'इतिहाससंग्रहां'त प्रसिद्ध झालेलीं

महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें.

[कारकीर्द—अहल्याबाई होळकर.]


भाग १ ला.



दत्तात्रय बळवंत पारसनीस

संपादक, 'इतिहाससंग्रह'

सातारा.



मुंबई येथें,

'निर्णयसागर' छापखान्यांत तुकाराम जावजी

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला.

नं. २३ कोलभाट लेन.

इ. स. १९१०.

किंमत [illegible]

(Registered according to Act XXV of 1867.)
All rights reserved by the publisher

BOMBAY:
Printed by B. R. Ghânekar at the Nirnaya-Sagar Press,
23, Kolbhat Lane, for the publisher.

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें.

(कारकीर्द–अहल्याबाई होळकर.)

भाग १ ला.

उपोद्घात.



इंदूर येथील होळकरांच्या घराण्यांतील इतिहासप्रसिद्ध सद्गुणी व राज्यकर्ती स्त्री राणी अहल्याबाई हिचे नांव अखिल भरतखंडामध्यें दुमदुमत आहे. ह्या लोकोत्तर स्त्रीचे साधार व सविस्तर असें चरित्र आजपर्यंत प्रसिद्ध झालेलें नाहीं. परंतु सांप्रत महाराष्ट्राच्या इतिहासाचीं जी नवीन साधने सुदैवानें उपलब्ध होत आहेत, त्यांवरून ह्या स्त्रीचे सुरस व मनोरम चरित्र जगापुढे लवकरच येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. अहल्याबाईच्या चरित्राचे सत्य स्वरूप किती अपूर्व, हृद्यंगम व उज्ज्वल आहे व त्यात किती इतिहासरस भरलेला आहे, ह्याचें निराळें वर्णन करण्याचें हें स्थल नाहीं. ह्या संबंधाने **'विविधज्ञानविस्तार'** मासिक पुस्तकाच्या ३८ व्या वर्षाच्या ५ व्या अंकामध्यें **"अहल्याबाईच्या चरित्राचें सत्य स्वरूप व त्यांतील कांहीं मनोरंजक मासले"** ह्या निबंधामध्यें बरीच चर्चा केलेली आहे. त्यावरून जिज्ञासु वाचकांस त्याची अल्पशी तरी कल्पना करितां येईल. तथापि ह्या चरित्रास साधनीभूत होणारा जो पत्रव्यवहार आह्मांस राजकार्यधुरंधर सुप्रसिद्ध महाराष्ट्रमुत्सद्दी नाना फडणवीस ह्याच्या मेणवली येथील दप्तरामध्यें उपलब्ध झाला आहे, त्यावरून अहल्याबाईच्या चरित्राचें सत्य स्वरूप व त्याचें खरे अंतरंग स्पष्ट रीतीनें नेत्रांसमोर आल्यावांचून राहणार नाहीं. हा पत्रव्यवहार पत्रशः संपूर्ण मिळालेला नाहीं; तथापि तो जितका उपलब्ध झाला आहे, तितकाही चरित्राच्या मर्यादित अवकाशामध्यें समाविष्ट होण्यासारखा नसून, फार विस्तृत व तत्कालीन बहुविध राजकारणांनीं युक्त असा आहे. त्याचे स्वतंत्र दोन भाग करून ते मराठ्यांच्या इतिहाससाधनांत अंतर्भूत करावेत ह्या हेतूनें, तो क्रमशः **'इतिहाससंग्रह'द्वारा** प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे.

२. अहल्याबाईच्या महेश्वर येथील दरबारीं, पेशव्यांच्या तर्फेनें, नाना फडणविसांनीं दोन वकील ठेविले होते. त्यांचीं नांवे अनुक्रमें विठ्ठल शामराज व

केसो भिकाजी अशीं होतीं. त्यांनीं महेश्वर येथून बाईच्या दिनचर्येचीं व राजकारणांचीं इत्थंभूत बातमीपत्रें पुण्यास पाठविण्याचा क्रम ठेविला होता. हे वकील अनुक्रमें इ. स. १७७९ पासून इ. स. १७८३, व इ. स. १७८४ पासून इ. स. १७९४ पर्यंत महेश्वर दरबारीं होते. ह्या दोन वकिलांच्या बातमीपत्रांमध्यें अहल्याबाईची दिनचर्या, तिचा दरबार, तिचे मुत्सद्दी, तिचीं पेशव्यांशीं व इतर मराठे सरदारांशीं झालेलीं राजकारणें, वगैरे गोष्टी, उत्तम प्रकारें नमूद आहेतच; परंतु त्या वेळच्या मराठ्यांच्या एकंदर राजकारणांचाही त्यांत चांगल्या रीतीनें निर्देश असून, मराठ्यांच्या इतिहासावर त्यांचा सर्व बाजूंनीं उत्तम प्रकाश पडण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें तत्कालीन भाषा, चालीरीति, वगैरे गोष्टींचेही त्यावरून चांगलें दिग्दर्शन होण्यासारखे आहे. ह्याकरितां ही पत्रें इ. स. १७८० पासून इ. स. १७८३ पर्यंत एक खंड, व इ. स. १७८४ पासून इ. स. १७९४ पर्यंत एक खंड, अशी खंडशः प्रसिद्ध करण्यांत येतील.

३. पहिल्या खंडांत विठ्ठल शामराज ह्यांची बातमीपत्रे येतील. हा विठ्ठल शामराज मराठ्यांच्या इतिहासात फारसा कोठे प्रसिद्ध नाही. त्याचे उपनांव व राहण्याचें ठिकाण समजत नाही, तथापि हा मनुष्य फार जिज्ञासु, चिकित्सक, बहुश्रुत व मार्मिक दिसतो. हा हरिपत फडके ह्याच्या वशिल्यानें उदयास येऊन मराठ्यांच्या लष्करांत प्रथमतः बातम्या पाठविण्याचे कामावर लहानशा कारकुनी पेशानें नौकर असावा असें दिसतें. त्याची बुद्धिमत्ता व शोधकता पाहून, नाना फडणविसानीं त्याची योजना महेश्वरदरबारामध्ये इ. स. १७७९ मध्ये केली. ता. २७ मे इ. स. १७७९ रोजी, त्याने पिपरखेडनजीक नसरतपूर खोजाचें ह्या गांवाहून जे पत्र लिहिले आहे, त्यावरून तो नुकताच नाना फडणविसांस सासवड मुक्कामी भेटून, त्यांच्या आज्ञेने श्रीमंत राघोबादादा पेशवे ह्यांच्या लष्करांत हरी बाबाजी ह्याच्या गोटात आला होता असे दिसते. हें पत्र येणेंप्रमाणेः—

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र २१ रबिलावलपर्यंत पिपरखेड नजीक नसरतपूर खोजाचें येथे वर्तमान यथास्थित असे विशेष. सासवडचे मुक्कामींहून स्वामीची आज्ञा घेऊन स्वार झालो, ते छ १८ मिन्हूस नातेगांव वाकळ्याचे मुक्कामीं श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे सैन्यांत राजश्री हरी बाबाजी याच्या गोटांत दाखल झालों. हरिपंतांची भेट घेतली. सरकारचे व राजश्री पाटिलबावांचें पत्रें दिलीं व मशारनिल्हेकडेस गांव आहे त्याविषयीं स्वामींनी यांस पत्रे दिलीं होतीं तींही दिलीं. पाहून बहुत संतोष झाले. 'मीं विनंति केली होती, त्याप्रमाणेच श्रीमंतांनीं कृपा करून गांव आह्मांकडे बहाल ठेवला' असे ह्मणाले. वरकड कित्येक

वचनोक्ती हैदरनाईक वगैरे यांजकडील वर्तमान आज्ञापिलें, तें सविस्तर मशारनिल्हेस सेवकानें विदित केलें. सांप्रत येथें यांची चौकशी फार आहे. नेहमीं एक कारकून रात्रंदिवस श्रीमंतांच्या डेऱ्यांत यांनीं बसविला आहे. कोण येणार कोण जाणार तिनका इतल्ला यांस आहे. श्रीमंताची मर्जी रक्षून, त्यांचे खर्चवेचाची सरबराई करून, अतरगत फार बारकाव्याने चौकशी यथास्थित करितात. प्रस्तुत श्रीमतांस आज तीन चार दिवस सावकाश नाहीं. पडसें वगैरे व ज्वराचा उपद्रव झाला आहे. दोन चार दिवस स्नान करीत नाहींत. यास्तव तीन मुक्काम नातेगांव वाकळ्यावर आंबराईत झाले. त्या मुक्कामावर पाण्याचा तोटा फारच झाला. परंतु श्रीमतांस बेआराम ह्मणून मुक्काम झाले. पाण्याकरितांच काल चंद्र २० मिनहूस प्रातःकालीं कूच करून कामारबारीचा घांट उतरून दीड प्रहर दिवसां या मुक्कामी दाखल झाले. या मुक्कामी झाडे सावलीस कांहीं नाहींत. परंतु पाणी ओढा वाहत आहे. येथें कांही मुक्काम होतील असे बोलतात. सबब की, श्रीमतांस कांही आरामही झाला पाहिजे, व मागाहून दादासाहेबांचा कांहीं पेठणीहून खजानाही येणार, त्याचीही मार्गप्रतीक्षा आहे. आरोग्य झाले ह्मणजे दरमजल चलावें, ऐवजामाठी बारीचे तोंडी कांही शेंपन्नास स्वार ठेवावे, अशीही बोलवा आहे. मुलकी वर्तमान, जे वाटेने जातात ते आसपास चिठ्या पाठवून जमीदारांस बोलावून आणून घांस लकडी व शाकभाजी वगैरे सरंजाम मागवून श्रीमतांकडे पावितात. कमाविसदारांनी आपलाले तालुक्यांचा सरजाम मार्गावर आणून पोंहचवावा हा पथ सरकारचा आहे. त्याप्रमाणेच तालुकदारांजवळून आणवितात. ताकीदार जागांजागां पाठवून रखवाल्याही करितात. ताकीद फार निक्षून आहे. जें दृष्टीस पडले व कानी ऐकिले ते रुबरू आणून, त्याची यथास्थित चौकशी करून शिक्षा करितात. सांप्रत येथें फौजेचा भरणा दादासाहेबांची खासगत कमकसर दोनशे स्वार, पागा व एकांडे मिळून व पायदळ गाडदी वगैरे हजार बाराशें, व तोफा, याशिवाय शिद्याची चार पांच हजार फौज व होळकराकडील दोनशें स्वार ऐसे आहेत. पांचा हजारांचे भरतीस शिद्याकडील आणीकही फौज येणार. सांप्रत या प्रकारचें वर्तमान आहे. श्रीमतांस जो पदार्थ पाहिजे तो हरिपंतांकडेस त्यांनी सांगून पाठवावें. यांनीं त्यांचे मर्जीप्रमाणें सरबराई करून द्यावी असे आहे. या लष्करबाजारांत धारणः—ज्वारी बाजरी नऊ साडे नऊ पायली, गहूं नऊ दहा पायली, हरभरे आठ नऊ पायली, डाळ तुरीची अकरा शेर, तांदूळ कंपेश आठ नऊ दहा शेर, गूळ आठ शेर, मीठ चार पायली, तूप अडीच शेर, खुर्दा शिवराई चार टक्के, आलमगिरी तीन टक्के, पक्का दोन टक्के, याप्रमाणें आज आहे. मीं श्रीमंतांचे दरबारास जावे कीं तिकडे आसपास

फिरावें म्हटलें, त्यास हरिपंत म्हणाले जे तुम्हीं गेल्यानें सारे तिन्ही दरबारचे तुमचे ओळखी. श्रीमंतांच्या चित्तांत कीं जवळले लोक विपर्यास घालतील, त्यांची बेमर्जी होईल, ठीक पडणार नाहीं. तुम्ही आम्हांजवळीच असून आम्हांस पुसत जावें. देखाल ऐकाल तें श्रीमंतांस लिहित जा. याप्रमाणें यांनीं सांगितलें. असा येथें आहें. जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन. उष्णकाळ फार आहे. सावलीस कांहीं नाहीं. बेसरंजामी, धन्यास सर्व विदित आहे. स्वामी कृपाळू समर्थ हे विज्ञप्ति."

ह्या पत्रावरून विठ्ठल शामराज हा, पुणें दरबाराच्या माहितीचा असून, दादासाहेबांच्या लष्करांत बातमी आणण्यासाठींच, नाना फडणविसांकडून रवाना झाला होता असें दिसतें. ह्या वेळी त्याची कायमची नेमणूक झाल्याचें दिसत नाहीं. परंतु राजकारणप्रसंगानें त्यास लवकरच नाना फडणविसांनीं महेश्वर येथें अहल्याबाईच्या दरबारी वकिलीस पाठविले असावें असें उघड होतें. तेथें तो पावसाळा लागण्यापूर्वीच पोहोंचला. त्यानें महेश्वर येथून पाठविलेलें ता. १० जून इ. स. १७७९ चें पत्र उपलब्ध झालें आहे, त्यावरून तो नर्मदातटाकीं महेश्वरक्षेत्रीं ह्याच सुमारास पोहोंचला असावा हे सिद्ध होतें.

विठ्ठल शामराज ह्याचीं इ. स. १७७९ सालचीं महेश्वर येथून पाठविलेलीं अवघीं दोनच पत्रे उपलब्ध झालीं आहेत. ह्या सालचीं बाकीचीं पत्रें गहाळ झालीं कीं काय तें समजत नाहीं! इ. स. १७८० पासून इ. स. १७८४ पर्यंतचीं पत्रे बहुतेक शाबूत आहेत. बहुतेक म्हणण्याचें कारण त्यांतील पत्रेंही मधून मधून गहाळ झालेलीं आहेत!! तीं बहुधा कसरीच्या भक्षस्थानीं पडलीं असावींत, असें सांपडलेल्या कागदांच्या शोचनीय स्थितीवरून मानण्यास हरकत नाहीं! सद्भाग्य एवढेंच कीं, इतका तरी हा मूल्यवान् पत्रव्यवहार आज महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पुनरुज्जीवनार्थ उपलब्ध झाला!! हा पत्रव्यवहार किती महत्त्वाचा आहे व त्यांतील प्रत्येक पत्र देखील किती वाचनीय व मनोरंजक आहे हें जाणण्याचें काम वाचकांकडे आहे.

विठ्ठल शामराज ह्याची माहिती व ह्या पहिल्या भागाची प्रस्तावना हा सर्व छापल्यानंतर प्रसिद्ध करण्यांत येईल. तोपर्यंत कोणी इतिहासप्रिय व रसिक गृहस्थांनीं ह्या विषयासंबंधानें अधिक माहिती अथवा कागदपत्र मिळवून देण्याचें श्रेय घेतलें, तर त्यांची आमच्यावर फार मेहेरबानी होईल. ह्या पत्रव्यवहाराच्या प्रसिद्धीनें आणखी ऐतिहासिक कागदपत्रांचा अधिक सुगावा लागेल व ते जगापुढें येतील तर आमच्या श्रमांचें पुष्कळ अंशीं सार्थक झालें असें मानण्यांत येईल.

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें.

भाग १ ला.

इ. स. १७७९.

[इ. स. १७७९ सालचीं बातमीपत्रे अवघी दोनच उपलब्ध झालीं आहेत. त्यांमध्यें मुख्यत्वेकरून मराठे व इंग्रज ह्यांच्या मधील पहिल्या लढाईच्या सुमाराचे रघुनाथराव दादा पेशवे ह्यांच्या हालचालीचे वर्तमान आहे.]

पै ॥ चद्र ५ **लेखांक १.** ता. १० जून इ. स १७७९.

जमादिलाखर समानीन. **श्रीगजानन** मि. ज्येष्ठ व॥ ११ शके १७०१.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २४ जा॥वल परियंत मुक्काम महेश्वर येथें स्वामीच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील वर्तमानें पेशजीं विनतिपत्री लिहून छ २२ मिनहूस रवाना केलीं, तें सेवेसी पावली असतील. सांप्रत श्रीमंत दादासाहेबांचें वर्तमानः-मुंबईस जाऊन मोर्चे दिले आहेत ह्मणून बाजारी वर्तमान ऐकिलें, व इंग्रजांकडे नारो तुकदेव गेले होते, तेही इग्रजांनी धिक्कारून माघारी पाठविलें जे, 'आह्मांस तुमचा भरंवसा येत नाहीं. तळेगांवावर आमची खराबी करून तुह्मी शिंदे होळकरांसी मिळून त्याजकडेस निघून गेलां. असे बेइमान. तुमच्या वचनेंत दृढतरता नाहीं. इतके दिवसही तुमचे शब्दीं लागून कर्जदार जालों. पेशजीं तुह्मांस रुपया दिला आहे, तो अद्याप वसूल झाला नाही. पुढे तुह्मांस खांद्यावर घेऊन आपले पदरानशीं खराब व्हावें, आपल्याशीं वैर करावें, [तर] आमचेही चार जागे लहान थोर त्याच्या इजनांत आहेत. त्यानीही फराशाचे साधन केलें आहे. लढाई भिडाईंत खराबी झाली तर आमची होईल. तुह्मांजवळ तर ना फौज ना खर्चास! तुह्मांस पदरचे खर्चास देऊन, शेवटीं समयास त्यांसीं सास्त बांधून निघून जावें. आह्मीं खराब व्हावें हें आह्मांस अनुकूळ पडत नाहीं. तुह्मी कोणतेही गोष्टीस साबूत नाहींत. तळेगांवावर जख बसतां आह्मांवर बसली. तुह्मी साबूत निघून गेलेत, तें ईर्षा आह्मांस येऊन प्राप्त झाली आहे. असो. आमचे काबूस येईल ते समयीं आह्मी पाहून घेऊं. परंतु तुमची सोबत आह्मांस नको!' असे जाबसाल होऊन

नारो तुकदेव माघारी आले. आतां राजाराम गोविंद. सौभाग्यवती मातुश्री बाईचीं पत्रें इमानपुरस्कर घेऊन, अमृतरायांस घेऊन इंग्रजांकडे जाणार. तोंवर श्रीमंत मुंबईस आहेत. हें इतकें वर्तमान इंदुरच्या साहुकाराचा गुमास्ता नानकजीनाम बुराणपुरास गेला, तेथून औरंगाबादेस जाणार, त्यानें हें वर्तमान सांगितलें. सत्य मिथ्या देव जाणे. इकडील फौजांचे वर्तमान पाटीलबावाकडील देवजी गौळी आपले लोकांनशीं जमून बुरानपुराचे रोखे जाऊन, तापीचे पाण्यानें सुलतानपूर नंदुरबारेवरून सोनगडचे रोखें जावे असा निश्चय केला. मातुश्री अहिल्याबाईवर खर्चाची वरात पाटीलबावांनीं पचवीस हजारांची पाठविली. तो ऐवज बाईनीं उज्जनीस हुंड्या दिल्या आहेत. ऐवज आला ह्मणजे फौजेस वांटून जावें तों येसोबा बक्षी शिंद्याकडील हरी बावाजी सांगाते होते, ते धुलकोटावरून उज्जनीस गेलों होतों—तेथें त्याचें कुटुंब आहे ह्मणून गेले होते मागे हरी बावाजींचें असें जालें. ते आतां महेश्वरास आले. त्यांनीं देवजी गौळी यांजकडे जाऊन उभयतांनीं मसलत केली जे, सोनगडाकडेस गेले तर नीट फिरंग्याच्या तोंडावरच जाणें लागतें. झुंज फौजेनें सुद्धां परिणाम लागणार नाहीं. यास्तव इकडून झाबव्याच्या घाटें, भिलाड्यांतून नीट पायगडच्या रोखें जावें; तालुकाही शिंद्याचाच आहे; तेथें जावून पायगडाजवळ छावणी करावी. ह्मणजे दादासाहेब आपल्या तालुक्यांत धामधूमही करणार नाहींत. त्याजवर दबावही पडेल. अशी मसलत उभयतांनीं करून, देवजी गौळी फौजसुद्धां बुराणपुरचा रोंख सोडून अलीकडे आले. त्यास होळकर आपल्या तालुक्यांत कही काबाड करूं देत नाहींत; यास्तव सरकार तालुक्याचे पांच सात गांव येथें कोठें आहेत तेथं कही काबाड करून आहेत. उज्जनीचा ऐवज आला ह्मणजे तयारी करून जावें असें आहे. होळकराकडीलही लोकांचीही तयारी बाई करितात. राजश्री रंगराव महादेवराव व खंडेराव त्रिंबक यांचेंही काल दर्शन झालें. येथें बाईनीं बोलाविलें. सरकारचीं पत्रेंही त्यांस दाखविलीं. कितीक प्रकारें त्यांनीं सरकारकार्याचीं भाषणें केलीं. पाहतां त्यांचा कांहीं सरकारकामाविशीं अनमान दिसून आला नाहीं. स्वामिकार्यास सादरच आहेत. परंतु कांहीं तरी एक मुक्त सर असावा; त्याजदेखत कामकाज कोणाचें कसें होतें, हें त्याच्या निदर्शनास यावें; असें त्यांचें मानस. परंतु शिंदे होळकरांच्या फौजा तयार होऊन चालल्या ह्मणजे हेही तयार होऊन चालतील. सांप्रत वोढेकराचे खराबीचा प्रकार व सांप्रत सरंजाम जप्त झाला आहे, व गुदस्तां पैवस्तां यांनीं सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाईची चाकरी कोणत्या रीतीनें केली, हें परभारा मातुश्री

अहिल्याबाईनींच सविस्तर सांगितलें. खंडेराव त्रिंबक इतकेंच बोलले जे, श्रीमंत धनी आहेत, जे आबरू त्यांनी दिली आहे, ते जतन करायाचें त्यांचेच हातीं आहे. सर्वजण समर्थ आहेत. इतकें मात्र बोलले. येथील प्रकार असा झाला आहे. दोन्हीं तिन्हीं पथकें श्रीमंतांच्या पिच्छयास होतीं. त्यांत चाकऱ्या सर्वत्रांच्याच झाल्या. परंतु दादासाहेब निघून गेले आणि हीं पथकें माघारीं आलीं हें सर्वांस कळलें. परंतु आपला आपला उत्कर्ष असा शब्द आला नाहीं. जें होणें तें धन्याचे पुण्येंकडून होईल असें बोलतात; परभारें सेवकांच्या ऐकिण्यांतही वोढेकराची चाकरी सर्वांपेक्षां अधिक झाली; परंतु सर्वांची एकदिलता असावी, ह्मणजे कामें होतात. सांप्रत हे लोक बाहेर निघून तिकडे दादासाहेबांच्या पिच्छयास जायास कांहीं दिवस लागतील असें दिसतें. दुसरी बोलवा आहे कीं, श्रीमंत दादासाहेबांस प्रस्तुत खायास नाहीं. इग्रजाची दादासाहेबाची चित्तशुद्धता होई, तोंवर माळवे प्रांतीं व गुजराथ प्रांती धामधूम करून, चार पैसे मेळवावे असें करतीलसें दिसतें. बोलवाही अशीच आहे. बाजारी वर्तमान की, दादासाहेबानी हैदरनाईकास लिहून पाठविलें जे, आपण असा उत्कर्ष करून निघून गेलों. तुह्मीं जमीयत पोख्त करून, कृष्णातीरपर्यंत ठाणीं बसवीत तिकडून येणें. तुह्मीं बरोबरीने त्यांस पायबंद देणें, व भोंसल्याकडेस हीं पत्रें गेलीं जे, मुधोजी भोंसल्याचा मधला पुत्र चिमणाराजा त्यास पांच सात हजार फौजेनशीं पाठवून देणें ह्मणून पत्रें दादासाबाचीं गेलीं. हे बाजारी वर्तमान ऐकिलें. आपल्याकडील वर्तमान ऐकिलें जे, उभयतां सरदार कूच करून गंगेपरियंत आले. इकडे दरमजल येणार. वोढेकरावशीं धन्याची कृपादृष्टी असावी. धन्याची मर्जी, ह्या फौजा बाहेर निघाल्यावर याजबरोबर मीं जावें. परतु वर्तमान बातमीचीं पत्रें कोणाबरोबर पाठवूं? होळकर तेथून निघाले असले तर त्याची डांकही उठत येईल. मजजवळ तर माणूस एक नाहीं. इकडेच जासूद अगर काशीद नवे ठेवायाची आज्ञा झाली तर तसें करीन. तोंवर तों स्वामीनी डाकेची अगर जासूद व काशीद इकडे पाठवावयाची तरतूद केलीच असेल. लवकर व्हावी. जासूद सेवकाजवळ येत, तोंवर महेश्वरीं राहूं कीं फौजेबरोबर जाऊं? यासही निघायास आणखी आठ चार दिवस लागतील. तोंवर काय ते आज्ञाही येईल. देखले ऐकिले वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक २.

पै॥ चंद्र ७ रमजान **श्रीगजानन.** ता. ७ सप्टेंबर इ. स. १७७९.

समानीन भाद्रपद मास. मि० श्रावण व॥ १२ शके १७०१.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता० चंद्र २५ साबानपर्यंत मुक्काम महेश्वर येथे वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान व श्रीमंत दादासाहेबांकडील वर्तमान कळलें, तें चंद्र १७ मिनहूस आपले कासीदजोडीबरोबर लिहून, सरकाराची कासीदजोडीबरोबर रवाना सेवेसीं केलीं आहेत; व त्यावर कळलें वर्तमान ते चंद्र २१ मिनहूस डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमानः— राजश्री बापुजी होळकर इंदुरीं दाखल झाले. श्रीमत राजश्री दादासाहेबांकडून केसोपंत नामें सरदार त्याजबरोबर हजार फौज देऊन इकडे रवाना केले. त्यास मशारनिल्हे फौज घेऊन नवापुरघायट्यास आले. नवापुरा लुटला. तेथें ठाणें ठेऊन पुढें दहिवलीस आले. तीही लुटली. तेथेंही ठाणें ठेवून पुढे भांबर परगण्याची दातर दिसेवाली ह्मणून गांव आहे, तेथे दोन तीन घर कोंकणस्थाचीं होतीं. त्यास त्या गावी केसोपत जाऊन, ते गृहस्थ धरून, त्याचीं घरें लुटून, त्या गृहस्थास कैद करून, काही दड मागतात. तेथून केसोपंतानी पाचशें स्वार गुलजारखानाकडेस पाठविले. कोंडाईबारीस दोन पलटणें ठेऊन घांट बंद केला. मागाहून आणीक दोन हजार फोज व चार पलटणें घेऊन राजाराम गोविंद ये प्रांती येणार. इकडून गुलजारखानही त्यास सामील होणार. या प्रकारचें वर्तमान ऐकिले. ते काल चद्र २४ मिनहूस पत्रे लिहून, कासीदजोडी राजश्री विसाजी बापुजी, सरकारची फौज घेऊन आले आहेत, त्यांजकडेही रवाना केले. परंतु ते कोठे आहेत हे वर्तमान काही कळत नाहीं. त्यानीं एक वेळ मजकडे पत्र पाठविले होते. त्यावर वर्तमान काही कळत नाहीं. कासिदास कोठें भेटतील ते भेटोत. त्या कासीदजोडीबरोबर सरकारचींही पत्रें आहेत. मग कासीद सेवेसीं येवोत अगर विसाजीपंत आपले जोडीबरोबर पाठवोत. इकडे गडबड होयास करिता. आपले कोणी इकडे नाहीं. गुलजारखानही दादासाहेबाकडेस जाईलसे दिसतें. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाकडेस तीन कासीदजोड्या पाठविल्या आहेत, त्यांपैकी एक सत्रावीस पाठविली, एक काल पाठविली. कासिदास रोज़मुरा लवकर पाहिजे तरी इकडे बिदा होय तर बरें आहे. धन्याची मर्जी. हे विज्ञप्ति."

इ. स. १७८०.

[इ. स. १७८० ह्या सालचीं सुमारे तीस पत्रे उपलब्ध झालीं आहेत. त्यांमध्यें पेशवे व इग्रज ह्यांच्या मधील युद्धसबधीं राजकारणे, राघोबादादा पेशव्याच्या हालचाली, महादजी शिद्याचो राजकारणे, व अहल्याबाई व तुकोजी होळकर ह्यांच्या दरबारचीं कारस्थाने ह्या सबंधाच्या बातम्या आहेत. ही सर्व पत्रे फार महत्त्वाची आहेत.]

लेखांक ३. ता. २५ फेब्रुवारी इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि. माघ व॥ ६ शके १७०१.

श्रीमंत राजश्री नानासाहेबः—

"नवीन वर्तमानः—राजश्री तुकोजी होळकर यांनीं अहल्याबाईस चंद्र ९ सफरचें पत्र लिहिलें होतें, तें कोंडाईबारी उतरून तें मुक्कामचें होतें. त्यांत मजकूर जेः–सरंजामी लोक व पेंढारी ऐसे रवाना करून इकडे पाठवावें. त्यावरून बाईनीं पेंढारी सात आठ हजार जागा जागां सरंजामी लोक आहेत ते ऐसे तयार केले आहेत. आठ दहा हजाराचा भरणा एक दों दिवसांनीं तिकडे रवाना करणार. राजश्री पाटीलबावाही बारी उतरून पार जाहले. उभयतां सरदार एकत्र होऊन सोनगडाजवळ गेले. दरमजल पुढं जाणार. सोनगडाअलीकडे सहा कोसांवर मुक्कामीं होते, ते मुक्कामाचीं पत्रें पाटीलबावांचीं बाईस आलीं होती. बहुत समाधानपूर्वक पत्रें होतीं. लिहिलें होतें जे, आह्मी आतांच वडिलांचें दर्शन घेऊन मग पुढें स्वारीस जावें. परंतु फत्तेसिंग गायकवाड व अमृतराव एकत्र होऊन दरमजल अहमदाबादेकडे गेले; यास्तव श्रीमंतांचीं पत्रें वरचेवर तिकडे जायाचे निकडीचीं आलीं; यास्तव इकडे येणें प्राप्त. महिना दों महिन्यांत इकडील मसलतीचा फड अगर जाबसाल काय ठरेल तें पाहून लवकरीच दर्शनास येतों. याप्रमाणें पाटीलबावाची पत्रें बाईस आलीं होतीं. बाई बोलत होती जे, फत्तेसिंग गायकवाड श्रीमंत दादासाहेबांकडे सामील जाहला; फिरून उलटेल. यास्तव दादासाहेबांनीं गायकवाडाचे कबिले आणून सुरतेंत ठेविले; ह्मणून वर्तमान ऐकितों, असें बाई बोलत होती. बाजारी वर्तमान आहे की, अहमदाबादेचे जमीदार व शिबंदी–जे लोक तमाम आधीं दादासाहेबांकडे मिळाले होते, चार लक्ष रुपये शिबंदी चढली होती–ते इंग्रजांनीं आपल्याकडे आले केलें, आणि अहमदाबाद सर केली, असें वर्तमान बाजारी आहे. गुजराथ प्रांताचीं ठाणीं सरकारचीं तमाम अपरातफर झालीं ह्मणून बाजारी वर्तमान आहे. सरकारचे रविसंक्रमणाचे तिळगुळ इकडे आले नाहींत; यास्तव बाईनीं दोन तीन वेळां स्मरण केलें जे, यदां सरकारचे तिळगुळ आह्मांस कां आले नाहींत ?

तस्मात् आमचें विस्मरण पडलें ! मीं उत्तर केलें जे या फौजेच्या रवानगीमुळें दोन दिवस अधिक लागले आहेत, परंतु स्मरणपूर्वक येतील. त्यास चंद्र १५ रोजीं कासीदजोडीबरोबर सरकारचे व आपले व तात्याकडील तीलशर्करा पत्रेंसहित आलीं, तीं बाईस दिलीं. बहुत संतोष पावली. फार स्तव केला. हरकूबाईच्या पांचा गांवांची जप्ती उठवावी येविषयीं दोन तीन वेळां बाईनीं सांगितलें. आतांही बोलली जे हरकूबाईकडे अपराध कांहीं नाहीं, आणि कैलासवासी श्रीमंत रावसाहेबांनीं ह्मातारपणास बक्षीस दिले आहेत ते सोडावे. असें श्रीमंतांस फार फार लिहा ह्मणून सेवेसीं लिहिलें आहे. वोढेकरांचें वर्तमान ऐकिल्यांत आलें जे, ते अद्याप धारेसच आहेत. परंतु श्रीमंत दादासाहेबांकडीलही कारकून त्यांजकडे येत जात असतात ह्मणून ऐकिलें. वर्तमान असें आहे. दुसरें भोंसले येतां येतां परतून गेले. तें वर्तमान ऐकिलें की, पाटीलबावांचीं पत्रे त्यांजकडे राहोरीचे मुक्कामींहून गेलीं. त्यांचींही पत्रें उत्तरें पाटीलबावांस आलीं, आणि ते माघारे गेले, असेंही वर्तमान ऐकिले. सत्य मिथ्या देव जाणे. दादासाहेबांकडील केसोपंत दातार सरदाराकडे येऊन गेला ह्मणून दरबारीं येथें वर्तमान ऐकिलें. देखलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. गुलजारखानाचा मजकूर हरकूबाईच्या नांवाचा बोभाट मात्र केला, परंतु तुकोजी होळकराचे भाऊ संताजी होळकर शेंदव्यांत आहेत, ते लासुरांत जाऊन गुलजारखानास भेटून आले. त्यास, एक घोडा व चौकडा व शालजोडी ऐसी संताजी होळकराम बहुमान दिला; व मल्हारगड [?] होळकराकडे आहे, तेथें राहण्याची परवानगी घेतली; व तेथें रस्त पोहोंचवणें व तेथून डोंगरांत काढून देणें हें कृत्य त्याचें होय. तुकोजीबावाचींही त्यास अंतस्थ पत्रें आलीं जे, गुलजारखानास तसदी आपलेकडून न देणें राखून असूं देणें. त्या पत्रांच्याही शोधांत आहेत. हस्तगत जाहलीं तर सेवेसीं येतील असें आहे. बाईकडे अपराध कांहीं नाहीं. हे विज्ञप्ति."

लेखांक ४. ता. २८ मार्च इ. स. १७८०.
पुरवणी. मि. फाल्गुन वा॥ ८ शके १७०१.

"विज्ञापना मातुश्री अहल्याबाई यांजकडील कारकून लाखेरी वगैरे दिल्लीचे आसपास यांचे खासगी एक दोन महाल आहेत, त्या चौकशीस कारकून गेला होता; तो ग्वालेरीकडून त्या मार्गें येथें छ २१ रविलावलीं आला. तिकडील वर्तमान बाईजवळ सांगत होता. मीही जवळीच होतों. त्यास ग्वालेरप्रांतीं सरकाराच्या फौजा सरंजामी आहेत, त्यांचें वर्तमान राजश्री खंडेराव हरी व आंबोजी इंगळे शिंद्याकडील पथकें दोघांमिळून जमीयत, खंडेराव हरीजवळ

तद्देशी रांगडी फौज दोनतीनशें व पेंढारी बाजारबुणगे सारे मिळून हजारांचा भरणा. आंबोजी इंगळ्याजवळ दोन अडीचशें लोक देशचे, शिवाय पेंढारी बाजार बुणगे हजारबाराशें, व पवार चार पांचशें, देशची फौज व शेंदोनशें तद्देशी याप्रमाणें ते; व बळवंतराव घोंडदेव याजवळ चार पांचशें फौज देशची चांगली, शेंदोनशें तद्देशी याप्रमाणें; व राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे पुत्राजवळ सरंजाम हजार बाराशें फौज देशची चांगली व शेदोंनशें तद्देशी; याप्रमाणें सरंजामी सरदारांजवळ जमीयत आहे. जोंपर्यंत गोहजवाल्या राण्यानें निकड केली नव्हती तोंवर या फौजांनीं जागांजागां गोहजवाल्याचे प्रांतांत धामधूम केली. प्रस्तुत राणाजीजवळ चार हजार फौज व चार पलटणें व तीस तोफा व पांच सहा हजार पायदळ या सरंजामानशीं बाहेर निघून ग्वालेरीच्या रोखें दरमजल चालले. ते समयीं सरकारचे सरंजामी सरदारांनीं कांहीं त्याजवर घालमेल करावी अशी मसलत सारे मिळून रात्रीं करावी. प्रातःकाळीं खंडेराव हरी व आंबोजी इंगळे यांनीं मोडून पुढें निघायाची मसलत करावी. खंडेराव हरींनीं शें दोनशें नांगे गोसांवी ठेविले होते. ते राजश्री पाटीलबावांचे पत्र आलें जे, अधिक शिबंदी वाढवूं नका. त्यावरून खंडेराव हरींनीं गोसावी दूर केले. प्रस्तुत खंडेराव हरी व अंबोजी इंगळे या उभयतांत चित्त शुद्ध नाही. शिवाजी विठ्ठल यांचे पुत्र व पवार व बळवंतराव घोंडदेव यांनी हरएक मसलत शत्रुपराभवाची फिरून करावी; त्यांत विपर्यास उभयतांनीं घालून पुढे निघायाची सल्ला ठरवावी. पांच कोसांचें कूच ठरविलें तर यानीं दहा कोसांचें करवावें. साराश, ग्वालेरचा किल्ला आपले हस्तगत लवकर करून पाटीलबावांस लिहून पाठवावें, हाही अन्वय त्यांच्या चित्तांत. असें वर्तमान त्या ब्राह्मणानें सांगितले. सांप्रत गोहजवाल्यानें फार जोर धरला आहे. गोहज प्रांतीची यांनीं जें जें स्थळें घेतलीं होतीं, तितकी प्रस्तुत त्याच्या जोरेकरून सुटत चाललीं आहेत. गोहजवाल्यानें कलकत्त्याहून एक कंपू बोलाविला होता, तोही करेरीजवळ येऊन पोहचला. त्यांतीलच हे चारी पलटणें राणाजवळ पुढें येऊन पोहोंचलीं. राहिले तेही मागून येतात. याप्रमाणें त्या कारकुनानें वर्तमान सांगितलें. आठ दहा दिवस त्या लष्करांत होता. वाटेची सुबत्ता पाहून निघून आला. राजश्री शिवाजी विठ्ठल ये प्रांती देवदर्शनानिमित्य आले होते. येथे आले. दाखल झाल्याचें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. सांप्रत त्यांच्या कुटुंबास येथें येतांच ज्वर उत्पन्न झाला, यास्तव औषधि उपाय बाईनीं करविला. ज्वरांत मधुरा निघाला. औषधि उपाय करितात. प्रस्तुत कांहीं उतार आहे. सात आठ रोजांनीं मशारनिल्हे माघारा जातील."

लेखांक ५.

ता.७ एप्रिल इ. स. १७८०.
मि. चैत्र शु॥ ३ शके १७०२.

"छ २७ रविलावलचें वर्तमानः—राजश्री शिवाजी विठ्ठल तृतीय प्रहरीं अहिल्याबाईच्या दर्शनास गेले होते. पुराणसमयीं चाळीस पन्नास लोकही बसले होते. मीही होतों. शिंद्याकडील शिवाजी नारायण दरबारास आले. पुराण झालीयावर विप्रभिक्षुक मंडळी उठून गेले. दहावीस गृहस्थमंडळी मात्र बसले होते. ते समयीं शिवाजी नारायण शिंद्यांकडील यांणीं वर्तमान सांगितलें जे, काल छ २६ रोजीं, श्रीमंत राजश्री नानांनीं दोन कासीदजोड्या पुण्याहून पत्रें देऊन राजश्री पाटीलबावांकडे रवाना केले, ते काल कासीदजोड्या येथ आले. सरकारचे पत्राचे अन्वयें वर्तमान सांगत होते जे, श्रीमंतानी फार प्रकारें पाटीलबावांस लिहिलें आहे जे, इंग्रजाची मसलत भिजली आहे; दारमदाराचीं बोलणीं लागलीं आहेत. ह्मणून ऐकतों. त्यास कलकत्त्याहून कंपू इंग्रजांनी आणविला आहे. तो येतो तोंपर्यंत मात्र तुह्मांसीं बोलणें बोलतील. ते सामील झालीयावर तीव्रता करतील. तर त्यांसीं बोलणें युक्त नाही. जोंवर तो कंपू येऊन पोंहचला नाहीं, तोंवर जलदी करून इंग्रजाचें पारपत्य होय तर बरें आहे. सरंजाम जो पाहिजे तो, व खर्चास जें पाहिजे तें, येथून वरचेवर रवाना करितों. परंतु इंग्रजांचे पारपत्यच होय असें करावें, अशीं बहुत ममतापुरस्कर पत्रें लिहिलीं होतीं तीं पत्रें आज प्रातःकाळींच पाटीलबावांकडे रवाना केलीं. श्रीमत पाटीलबावांसीं निर्मत्सर आहेत, आणि तेही तसेच आहेत, असें बहुत प्रकारें वर्तमान सांगितलें. बाईनीं ऐकून स्वस्थमानस झाली. राजश्री शिवाजी विठ्ठल समजले. बाई प्रदोषकालीं स्नानास गेली. तदोत्तर शिवाजीपंत शिंद्याकडील कारकुनाशीं दोन तीन घटका बोलले. गोविंद कृष्ण अजमेरवाले व आणीकही दहा पांच गृहस्थ होते. मीही होतों. त्यास शिवाजीपंतानीं भाषणें केलीं जे, "श्रीमंत थोर समर्थ. ते लिहिल्याप्रमाणें साहित्य पोंहचावतील, परंतु लोक ते नाहींत व लोकांस देहनगी मनोधारणें तशीं नाहीत. कैलासवासी श्रीमंत आपासाहेब वसईस लागले, ते समयीं श्रीमंत त्या लोकांसीं काय बोलले? 'जे किल्ला सर करतां, ज्याचें घोडें पडेल तें देऊं, व शिपाई पडला त्याची बाळपर्वेसी चालवूं. वांचून येईल त्यास सर्फराज करूं'; असें त्यांनीं लोकांचीं मनोधारणे केलीं. तेव्हां लोकांनीं झडा घातल्या, किल्ला सर केला. बोलल्याप्रमाणें तसेंच लोकांचें चालविलें. त्याप्रमाणेंच कैलासवासी श्रीमंत नानासाहेब भाऊसाहेबांनी चालवलें; ह्मणूनच त्यांणीं पृथ्वी सर केली व महामहा मुखंड पराभवातें पाविले, व खासा स्वारी बाहेर निघतां कधीं

राहिले होते कीं काय? तशा सरदारांपुढेंच लोकही कामें कार्जे करीत होते, आणि ते सरदारही लोकांस सर्फगज करात होते. कैलासवासी श्रीमंत रावसाहेबांनींही लोकांची चहा बरीच केली, त्यामुळें सरकारही ताजें राहिलें. लोकही आबाद होते. सांप्रत सात आठ रुपयांचे महिनदार लोक; त्यांस रोजमुरा धड पावेना. त्या लोकांच्या व ते फौजेच्या भरंवशावर उभयता सरदार इंग्रज सर करणार!! त्यांतही पडलें घोडें कोणाचे देऊं नये! अधिक खर्च करूं नये! अशा मसलतीवर लोक काय ह्मणून झडा घालतील? कसा इंग्रज सर होईल? गोष्ट दुरापास्त आहे. परंतु ये मसलतीस सहाय एक श्रीमंत राजश्री रावसाहेबांचा पुण्यप्रताप. अवतारी पुरुष. त्यांच्या कृपाविक्षणे मात्र सिद्धीस पावेल. वरकड व्याघ्रादिक श्वापदें बळ व युक्तिप्रयुक्तीनें मारतील. परंतु आस्वलाचें मारणें फार कठीण आहे! सुरत धरून मारलें तरच मरेल. नाहीं तर आस्वलाचे चपेटींत कोणी सांपडला तर गुदगुल्या करूनच आस्वल त्यास मारील. तद्वत् हे इंग्रजांची लढाई आहे. पाहतां यांचें मारणें कठीण! हरिपंततात्यांनीं एक दोन पलटणें बसवूनच दिल्हीं. फौज कसे कसे लोक त्यासमागमें होते आणि ते मसलतीचें स्वतां धनीपण त्यांचे अंगीं होतें ह्मणून थोडींबहुत कामेंकार्जे झाली. प्रस्तुतचे मसलतीसही उभयतां सरदार मातबर, हमेश कामे केलेले, हे इंग्रजांची मसलत त्यास काय अगाध आहे?" याप्रमाणें भाषणें झालीं. संवत्सरप्रतिपदा झालीयावर शिवाजीपंत बाईचा निरोप घेऊन लवकरीच माघारे जाणार. त्यांच्या कुटुंबासही अमळसें स्वस्थ वाटत आहे. त्यांचे पुत्र गणपतराव त्यांनींही यांस पत्रे पाठविलीं आहेत. पत्रें तों मीं पाहिलीं नाहींत. परंतु गोहजवाला जाट दरमजल चालून आला अशी कांहीं फार गडबड तिकडे आहे. यास्तव हे लवकरीच तिकडे जाणार. इंग्रजांचा उत्कर्ष पलीकडे हिंदुस्थानांतही फार झाला आहे ह्मणून साहुकारी खबर आहे. सुजायदौलाचा दों करोडींचा मुलूख व रोहिल्यांचा दों करोडींचा मुलूख एकून चौ करोडींचा मुलूख त्यांनीं हस्तगत केला. अंतरवेद आदिकरून इंग्रजांची प्रबळता हिंदुस्थानांत फार झाली आहे. हिंदुस्थानचे राजेराजवाडे सरकारचे फौजेची मार्गप्रतीक्षा फार करितात. असे तिकडून कितीक येतात ते बोलतात. आज्ञेप्रमाणें खेंचीवाल्यास पत्र येथून लिहिलें आहे. त्याजकडून कोणी मातबर मनुष्य येईल तो सरकारांत पाठवून देईन. गुलजारखानाचा मजकूरः—भिल्लांनीं आपल्या जीवमयास्तव त्यास हटीवरून काढून दिलें. त्याच्याही प्रयत्नास मनुष्यें लावलीं आहेत. हरकूबाईनींही जागांजागां चोरबातम्या त्यास हस्तगत करावयास बसविल्या आहेत. आज छ २८ रविलावलीं खेतसी साहुकाराचे येथें अंतर्वेदींतून लिहिलें

आलें जे, कलकत्त्याहून इग्रजांनीं चार कंपू आणिक तयार करून इकडे रवाना केले. दरमजल तेथून चालले. त्यास इंग्रजांची तेथून आज्ञा आहे जे, तुह्मीं यासी न मिळतां परभारें दक्षणेस जाणें ह्मणून साहुकारी वर्तमान. लखनौच्या जवळजवळ ते कंपू आले आहेत ह्मणून वर्तमान आहे. शिवाजी विठ्ठल छ ३० रोजीं गुरुवारीं मागिल सहा घटका रात्रीं कूच करून कोसावर रामकुंडावर मुक्काम केला. अहिल्याबाईही दोंप्रहरां तेथेंच गेली. तेथेंच भोजनेंही झालीं. शिवाजी विठ्ठल यांस बाईनीं वस्त्रे देऊन बिदा केलें. चार घटका दिवस राहतां बाई फिरून महेश्वरास आली. त्यांनीं तेथेंच मुक्काम करून छ १ रविलाखरीं दरकूच अष्टयास गेले. चवदा दिवस येथें होते. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. चिंतो विठ्ठल व सदाशिव रामचंद्र यांच्या हातें काहीं दादासाहेबांकडे बोलणें लागलें आहे ह्मणून वर्तमान आहे. हे विज्ञप्ति."

लेखांक ६. ता. ८ एप्रिल इ. स. १७८०.

पै॥ छ १६ रविलाखर. **श्रीगजानन.** मि. चैत्र शु॥ ४ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २ रविलाखरपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व श्रीमंत राजेश्री दादासाहेबांकडील वर्तमानें पेशजीं विनंतिपत्रीं लिहून सेवेसीं काशीदजोडीबरोबर पाठविलीं आहेत. प्रस्तुतचें वृत्तः—श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत. सरकारचे उभयतां सरदारफौजा सुद्धां पायगडाजवळ चौकोसांच्या अंत्र्यानें आहेत व इंग्रज यांजपासून चौ पांचा कोसांच्या अंत्र्यानें आहेत. राजश्री विसाजी आपाजी व पाराजीपंत व भगीरथराव शिंदे हे इंग्रजाभंवताले नित्य एका दिवसाआड फिरतात. गोळागोळी यांची त्यांची होतच आहे. परंतु तेही गोल फोडून यांजवर येत नाहींत. हेही तुटून त्यांजवर पडत नाहींत. राजश्री फत्तेसिंग गाईकवाड पांच हजार फौजेनशी इंग्रजाचे अघाडीस आहेत. त्याजमागें इंग्रज, मध्यें अमृतराव, त्यामागें इंग्रज, याप्रमाणें गट करून आहेत. इंग्रजांच्या लष्करांत पांच पायल्यांची धारण आहे. उभयतां सरदारांच्या फौजेंत माळवेप्रांतांतून रसद चालू झाली. आठा शेरांची धारण झाली आहे. पहिले फार महर्गता होती. उज्जनीहूनही दाणा वगैरे सरंजाम पाटीलबावांकडे चालला आहे. कांहीं नक्त ऐवजही गेला ह्मणून साहुकाऱ्यांत बोली आहे. राजश्री तुकोजी होळकर यांचीं पत्रें अहल्याबाईस आलीं होतीं जे, खर्चाची निकड

फौजेत फार आहे; तर कांहीं खर्चास पाठवून द्यावें....(फाटलें आहे) जे सारा मुलकी ऐवज त्यांणीं ओढून नेला..... (फाटलें आहे) जागां त्यांणीं आपल्या बंदोबस्त्या करून गेले आहेत, आतां माझे हातीं काय आहे ? कोठून खर्चास पाठवावें, असें बाई बोलतात. होळकराकडील बापोजी होळकराबरोबर फौज जे होती, त्यांस कांहीं तुकोजी होळकरांनीं खर्चास दिल्हें नाहीं. लोक फार श्रमी झाले. यास्तव आपले लोकांसुद्धां बापोजी होळकर तयार होऊन इंग्रजांवर चालला. हें वर्तमान तुकोजीबावांस कळलें. मग हे आपण खांसा धांवून जाऊन, बापोजी होळकरास फौजसुद्धां समजावून आणिलें. कांहीं खाया-खर्चास देऊन आपल्याजवळ ठेवलें. राजश्री गोविंदराव गाइकवाड लोनवाड्याहून निघून उभयतां सरदारांस येऊन भेटले. हेही उभयतां कोसभर सामोरे जाऊन यांस घेऊन आले. गोविदरायाबरोबर जमीयत शंभर स्वार व दोनशें कामेटवाले व शेंदोनशें पायदळ इतक्या सरंजामानशीं उभयतांस येऊन भेटले. राजश्री शिवाजी विठ्ठल येथें आले आहेत. त्यांच्या कुटुंबास सावकाश नाहीं. मधुरा निघाला आहे. औषधउपाय करितात. आठ चार दिवस लागतील. ह्मणून यासमागमें चारशें लोक चांगले होते. त्यांपैकीं शंभर स्वार येथें ठेऊन बाकी तीनशें लोक माघारी यांणीं आपल्या चिरंजीवाकडेस रवाना केले, देशचे लोक घोडे माणूस फार चांगले होते. तिकडे गोहजवाल्याची दाटी ऐकून टाकोटाक फौज रवाना केली आठां चौं दिवसांनीं हेही येथून लवकरीच माघारा जाणार. यांच्याही पुत्रांचीं यांस पत्रें आलीं होतीं जे, गोहजवाल्याजवळ जमीयत भारी झाली आहे; तो निघून दरमजल इकडे येतो. आह्मीं कांहीं उलटून त्यासीं झटपट करावी, तर मंडळी एकदील नाहींत. दरमजल पुढे निघून जावें हाच यांचा ओढा. आपणच आपले फौजेनसी. (अपूर्ण.)"

लेखांक ७. ता. २० मे इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि. वैशाख व॥ २ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणांवर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र १५ जमादिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील व उभयतां सरदारांकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहिलें आहे. सांप्रत जें वर्तमानः– श्रीमंत दादासाहेब सुरतेस आहेत, व अमृतराव व इंग्रज व फत्तेसिंग गाइकवाड हे जमावसुद्धां पायागडाजवळून पश्चिमेस चार कोस

आहेत, व उभयतां सरदार पायागडाजवळून दोन तीन कोसांवर पूर्वेस आहेत. पूर्वी एक दोन वेळां लढाई झाली ती झाली. प्रस्तुत उभयतांचीं सैन्यें आपलाले जागांच आहेत. उभयतां सरदारांच्या सैन्यांत चारा व पाणी यांची तसदी फार आहे. यास्तव अलीकडे पलीकडे सोय पाहून आहेत. पाटीलबावांनीं उज्जनीहून कांहीं तोफा सरंजाम सुद्धां घेऊन गेले आहेत. बाणांकरितां बऱ्हाणपुरास जासूद पाठविले आहेत. येथून अहल्याबाईनींही कांहीं बाण व दारुगोळी व सुतरनाला तुकोजीबावाकडे पाठविले आहेत. चंद्र २३ रविलाखरीं लष्करांतून येथें पत्रें आलीं. त्यांत मजकूर कीं, महादाजीपंत गोकटे व त्रिंबक भालेराव व चिंतो विठ्ठल ऐसे कांहीं फितुरांत होते. फितुराचीं पत्रें पाटीलबावांनीं धरलीं. त्यावरून महादाजी गोकटे व मालेराव उभयतांस, उज्जनीस पाठविलें. तेथून नवलाईच्या किल्ल्यावर पाठविले व चिंतो विठ्ठल तेथें लष्करांत [फाटलें आहे.] आहेत. उज्जनीस चिंतोपंताच्या घरावर जप्ती पाठविली आहे, व सदाशिव रामचंद्र आपल्या मुलाचें लग्न करावयास उज्जनीस आले आहेत. इंग्रजांच्या लष्करांभवतें यांजकडील पेंढारी व उभयतांची फौज कोसीं दों कोसीं फिरतात. एक दोन वेळां त्यांची रस्त यांनीं मारून आणिली त्यांच्या लष्करांत पांचसहा शेरांची धारण आहे. येथें कोणी जती व ज्योतिषी यांनीं प्रश्न सांगितले आहेत कीं, ज्येष्ठमासपर्यंत इंग्रजांचा जय आहे. तदोत्तर सरकारचे फौजेचा जय आहे. असें कोणीं कोणीं जोशांनीं सांगितले आहे. श्रीमंत दादासाहेब सुरतेहून इंग्रजांच्या लष्करांत येणार होते परंतु सुरतवाले येऊं देईनात, अशी वदंता ऐकिली. गुलजारखानाचा मजकूरः—पहिलें त्यानें लमाण चार हजार मारून गेला आहेच. पांचजण लमाणांचे सरदार कैदेत घातले आहेत. त्याजकडे पंचवीस हजार रुपये मागत आहे. पांच हजार रुपये देवितों ह्मणून संताजी होळकरांनीं सेंदव्याहून जाबसाल लाविला होताः—परंतु गुलजारखान ऐकत नाहीं. प्रस्तुत गुलजारखानाजवळ दोनशें स्वार व पांचशे पायदळ जमा करून, भिल्लाची हटी सोडून, बिज यागडच्या डोंगरांत आला आहे, व पुढें कोणीकडे स्वारी करणार? तेथून बाईनींही जागां जागां आपले मामलेदारांस लिहिले आहे की, गुलजारखानाची बातमी राखून आह्मांस लिहून पाठवा. पागा दोन चार यानीं बोलाविल्या आहेत. पुढें पहावें कसें होईल. इंग्रजांची मसलत ऐकिल्यांत आली की, सांप्रत जेथें आहेत तेथून फिरून बडोद्याकडेस जाणार. अमदाबाद व सुरत या दोही स्थळांचीही वदंता आहे कीं, फिरून जावें. उष्णकाळ भारी, यास्तव दोन महिने ज्येष्ठ आषाढ हरकोठें तिही स्थळांकडून एके जागां असावें. तदोत्तर श्रावणमासीं स्वारीस

निघून खानदेशांत उतरावें. तोंवर गुजराथ प्रांताचा बंदोबस्त करून, जागां जागां गड किल्ले आदि करून, दोन तीन महिन्यांत बंदोबस्त करावा. पुढें स्वारीस निघावें. अशी सावकाऱ्यांत वदंता आहे. राजश्री पाटीलबावांनीं येथें कोणी गृहस्थास चंद्र २२ रविलाखरचें पत्र लिहिलें होतें, तें चंद्र छ १ जमादिलावलीं येथें पावलें. तें मींही पाहिलें त्यांत मजकूर पाटीलबावांनीं लिहिला होता जे, इंग्रजांनीं दोन चार वेळां चढून आह्मांवर आले होते, त्यांस बेर वजेनें हटवून माघारें घातलें. त्यावर एक वेळ छापा घेरून आले. तोही हुशारीनें पिटून माघारें घातलें. व दोन चार वेळां कही मारून आणली, व पेंढारी यांनीं, दोन चार वेळां रस्त त्यांची येत होती, तेही मारून आणिली. भंवताले फौजा पाठवून आटापाणी बंद केला. त्यांचे लष्करांत महागाई फार झाली, यास्तव आले वाटेनें एक मजल माघोर गेले. बडोद्यास जाणार. मग तेथें ठरतात किंवा पुढें भडोच अगर सुरतेजवळ जाऊन छावणी करणार, अशी त्यांच्या लष्करची बोलवा आहे. परंतु इंग्रजांच्या पिच्छास आपली फौज आहे. डांव घांव बनल्यास लुटून घेऊं. याप्रमाणें गृहस्थास लिहिलें होतें, व या गृहस्थांची तेथें गुप्तरूपें बातमी आहे. त्यांनीं यास एकांतीं पत्र लिहिलें होतें, तेंही एकीकडे पाहिल्यांत आलें. त्यांत मजकूर कीं, सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाईनीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांशीं भाषण केलें जे, 'या उभयतां सरदारांशीं डोईफोड केल्यानें येथें काय साध्य? इंग्रजांचा खर्च वाढतो. हे गोष्ट कार्याची नाहीं. यास्तव गुजराथ प्रांत जो आपले हातीं आला आहे, यास अमदाबाद व डभई व नडियाद, व पेटलाद वगैरे मातबर स्थळें आहेत त्यांचा बंदोबस्त करून, गुजराथ प्रांत उजाड करावा, आणि या पोक्त सरंजामानिशीं पुण्याकडेस चाल करावी. तिकडील भय तरी आपणास काय आहे? तेथें मातबर फौज ह्मटले तर हे दोघे सरदार होते. तिकडून बेजार होऊन पांच सहा वर्षां इकडे आले आहेत. त्यास हे उभयतां एकाएकी तिकडे जात नाहींत. याखेरीज तिकडे मातबर भरणेदार फौजेचा सरदार कोण? वरकड कर्ते पुरुष दोघे खांसा. त्यांनीं बळ बांधून उभे राहिले हें कळतच आहे. आपणांस तरी भ्रम उगाच काय आहे? उगेच दिवस गमावूं नयेत. खानदेशांतून नीट आपण चालून घ्यावें, आणि मुंबईवाल्यास लिहून पाठवून, कोंकणप्रांत हस्तगत करून, बोरघांटीं दोन चार पलटणें पाठवून, घांट बंद करावा. तिकडे मानाजी फांकडे यांस व येसाजी शिंद्यांस पत्रें लिहावीं. ते तिकडून, दाटी करितील. कोण कोणीकडेस जीव घालतील? तेथें ऐवज काय आहे?' दादासाहेब बोलले जे, 'गडकिल्ले धरतील.' त्यास बाई बोलली जे, 'तोतयानें गडकिल्ले घेतले. आपण तों धनी

आहेत. असेंही करितां एखादा गडकिल्ला घरून बसतील. सारा प्रांत व कोंकण हस्तगत झालीयावर तों गडकिल्ला हस्तगत करणें अशक्य काय आहे ?' याप्रमाणें उभयतांचीं भाषणें झालीं. सुरतवाले इंग्रजांस दादासाहेबांनीं बोलावून आणून ही मसलत त्यांस सांगितली. त्यांनींही मान्य करून, तेच समयीं मुंबईवाल्यास कोंकणच्या व बोरघांटच्या बंदोबस्ताविषयीं पत्रें लिहिलीं, व अमृतरायाच्या सैन्यांतही पत्रें लिहिलीं. त्यावरून इंग्रज माघारी फिरले ह्मणून कोणी गृहस्थांचें कुपिया लिहिलें असें आलें. परंतु यांत सत्य कोणतें असेल तें असो. दुसरें वर्तमान की, चंद्रराब पवारांचे गांव कांहीं खानदेशांत आहेत. त्यास सौभाग्यवती रखमाबाई होळकर सुलतानपुरीं आहेत. त्यांनीं फत्तेपूर चंद्रराव पवारांचें, त्यासी मोर्चे लावून कांहीं तोफा गिफा आणिल्या होत्या. तें वर्तमान ऐकून चंद्रराव पवार, श्रीमंत दादासाहेबांची आज्ञा घेऊन, खानदेश प्रांताच्या बंदोबस्तास येणार हें वर्तमान ऐकून अहल्याबाईनीं रखमाबाईस सांगून पाठवून तोफा माघारी फत्तेपुरास पाठविल्या. आणिक वर्तमानः—राजश्री चिंतो विठ्ठल व त्रिंबक भालेराव व आणिक एक गृहस्थ ऐसे फितुरांत होते. उभयतां सरदारांवर छापा यांनींच आणविला. हें वर्तमान त्यांचे अंगीं लावून चौघांसही पाटीलबावांनीं कैद करून, तिघेजण नवलाईच्या किल्ल्यावर छ २९ रविलाखरीं दोनशें स्वार समागमें देऊन पाठविले. उज्जनीस त्यांच्या घरी चौकी बसविली आहे. सदाशिव रामचंद्र आपल्या चिरंजिवाचें लग्न करायास उज्जनीस आले आहेत. गुलजारखानाचा मजकूरः—अद्याप भिल्लाचे हटीवरच आहे. प्रस्तुत त्यानें मजला व अहल्याबाईस पत्रें लिहिलीं होतीं जे, श्रीमंतांस विनंती करून आमची बापरोटी यथाविभागें श्रीमंतांनी कृपा करून विभाग करून द्यावें, आणि मजला चाकरी सांगावी. त्यास मी अहल्याबाईस बोललों कीं, आपण श्रीमंतांस लिहून गुलजारखानाचा हरएक बंदोबस्त करून, त्यास चाकरीस लावावें. खूळ तोडावें. त्यास बाई बोलली जे तुह्मी आधीं लिहून पाठवा. तेथील मर्जी कशी ती आणवा. मग इकडे गुलजारखानासही लिहूं व श्रीमंतांसही लिहूं. मीं उत्तर केलें जे, मी चाकर, तुह्मी सरदार. आमची भीड किती ? परंतु आज्ञा आली तर गुलजारखानास जसी आज्ञा येईल तसें लिहीन. धनी कृपा करितील तर गुलजारखानाचें खूळ तुटेल. शोध करितां, लोक तों लमाण गुलजारखानानें लुटला नाहीं. भिल्लांनीं लुटला असें आहे. स्वामींची मर्जी. परंतु हें खूळ तुटलें तर बरें आहे. अहल्याबाईच्या नातवाचें लग्न अक्षयत्रितियेचे दिवशीं झालें. शरीरसंबंध बाईचे भाऊ शिंदे, त्यांच्या लेंकाच्या लेकीची लेंक आहे. बाईस चोळीपातळ व

कणशाकडे चार सनगें व शिंद्याकडे चार सनगें असें सर्वत्रां मिळालें. त्याप्रमाणें
ींही अहेर केला. येथून अहल्याबाई वरचेवर तुकोजी होळकरांस पत्रें येथून
लेहितात जे, लढाईंत काम पडलें आहे; त्यास कामाकाजास कमी करूं नका.
रचेवर ताकीद लिहीत असतात. प्रस्तुत ऐकिल्यांत आलें आहे कीं,
ाटीलबावांकडील कारकून इंग्रजांकडे बोलावयास गेले होते व दादासाहेबांकडेही
कांहीं बोलाचालीचें सूत्र लागलें होतें, तें तुकोजीबावांस कळलें. त्यावरून तुकोजी
होळकर व नारो गणेश उभयतांनीं पाटीलबावांकडील ऐकिलें वर्तमान तें अहल्या-
ाईस व पुण्यास श्रीमंतांस पत्रें लिहिलीं होतीं. तें जासूद घेऊन येतांना पाटी-
बावांचे चौकीवर पत्रें धरलीं गेलीं. पाटीलबावांनीं वाचून पाहून, नारो गणेश यांस
ोलावून आणून रागें भरले. त्यामुळें उभयतांत चित्तशुद्धता नाहीं. असें वर्तमान
ऐकिलें. प्रस्तुत चैत्र वद्य १४ ची इंग्रजांची यांची लढाई झाली. त्या लढाईंत
ाटीलबावांचा सरंजाम मार्घेच होता. गांठ होळकराचेच फौजेशीं पडली. खांसा
तुकोजी होळकर फौजेंत होते. लढाई चांगली झाली. चार पलटणें त्यांचीं आलीं
होतीं. लढाई बरीच झाली. दहा बारा मनुष्ये होळकराकडील चांगलीं जाया झालीं.
शरीफखान पाग्या पंचवीस लोकांनिशीं सरमिसळ झाला. कांहीं लोक पडले,
कांहीं निघाले. शरीफखान एकलाच चारी पलटणें पार होऊन गेला. याप्रमाणें
लढाई झाली. सहा घटकांनीं पाटीलबावांकडील तोफा व सरंजाम आला. ही
लढाई झालीयाचीं पत्रें चंद्र १० जमादिलावलीं येथें आलीं. इंग्रजांच्या
पेच्छावर राजश्री विसाजीपंत सरकारचे व पाराजीपंत व भागीरथ शिंदे हे पांच
हजार फौजसुद्धां आहेत. उभयतां सरदार पायागडाजवळच आहेत. परंतु
इंग्रज बडोद्याहून पुढें चालले ह्मणजे उभयतां सरदार फौजसुद्धां त्यांचे मागें जा-
तील. एक लढाई उत्तम प्रकारें इंग्रजांशीं करावी, मग मागें छावणीस फिरावें
असें सरदारांचें मानस आहे. शिंद्याकडील वकिलांची जबानी, अहल्याबाईनीं
चंद्र ११ रोजीं रात्रीं वर्तमान सांगितलें जे, 'लढाई एक झाली. त्यांत पाटील-
बावांकडील फौज मागेंच होती. तुकोजी होळकरच पुढें फौजसुद्धां होते. लढाई
चांगली झाली. दहा पंधरा माणसें चांगलीच होळकराकडील पडलीं. लढाई
अखेर झाल्यावर पाटीलबावांकडील सरंजाम येऊन पोंहचला. आह्मांकडील लो-
कांचीं कामें यथास्थित होतात. परंतु उजेडास आणणार कोणी नाहीं. न हो-
ण्याचें उजेडास येतें. असो. दिवसच असे आहेत.' बाईनीं कांहीं खर्चाची
रजवीज करून तुकोजीबावांकडेस पाठविली. गुलजारखानाचा मजकूरही बाई
बोलली जे, गुलजारखान कोणास यश देयाचा माणूस नाहीं. तत्रापि त्यानें

तुह्मांस व आह्मांस पत्र लिहिलें आहे तर तुह्मी त्यास लिहा कीं, तूं येथें ये. मग येथून श्रीमंतांस लिहून तुझा बंदोबस्त होणें तो होईल; असें लिहा ह्मणून मजला सांगितलें. मीं उत्तर केलें जे, तुह्मी सरदार, मातबरी तुमची असे. तुमचें पत्र गेल्यानें हरएकविषयीं त्यास इतबार पटून तो येईल. श्रीमंत त्याजमागें आहेत. त्यापक्षीं माझें पत्र त्यास पथ्य कसें पडेल? तुह्मी असें पत्र लिहाल तर तुमच्या पत्रावर दाखला घालून मी उत्तर लिहीन. त्यास बाईनीं मान्य केलें आहे.

चंद्र १२ रोजचें वर्तमान सावकाऱ्यांतील कीं, इंग्रज बडोद्याहून पांच कोस पुढें गेले. सुरतेचा रोंख असें बोलले. बाईही रात्रीं सांगत होती जे, इंग्रज छावणीस सुरत अगर भडोजेस जाणार. फत्तेसिंग गायकवाडाचा मजकूर बाई सांगत होती जे, पाटीलबावांनीं गायकवाडाकडे सूत्र लाविलें होतें जे, तुह्मीं निघून येणें. त्यास त्यांनीं एकांतीं कोणी भल्या माणसा हातीं सांगून पाठविलें जे, पहिलें श्रीमंतांस व तुह्मांस जितकें लिहिणें तितकें लिहून चुकलों. परंतु कोणाकडूनही कांहीं न झालें आतां मी यांचे अटकेंत आहें. यांस कांहीं सुवारा कळला, तर तूर्तच मुलांमाणसांसुद्धां एखादे जागां अटकावून टाकतील. यास्तव तुह्मी आह्मांशीं कांहीं बोलूं नका. जसें होतां होईल तसें पाहतच आहों. तुह्मी आमचें नांव न घेणें. असें यांस सांगून पाठविलें. शिंद्यांकडील वकील आले. ते बोलत होते जे, पाटीलबावांनीं मसलत केली आहे कीं, बडोद्याहून इंग्रज पुढें गेले ह्मणजे एक लढाई मातबर करावी; आणि डाव सांपडला तर फत्तेसिंग गायकवाडासही घेऊन यावें. तदोत्तर पाटीलबावा छावणीस बऱ्हाणपुरच्या मैदानांत यावें ह्मणजे पुणेंजवळ, जाबसालास येण्याजाण्यास जवळ पडेल, यास्तव कोंडाईबारीजवळ, उभयतां मिळून कांहीं फौज ठेऊन आपण इकडे छावणीस यावें असें आहे ह्मणून बोलत होते. पहावें काय ठरेल तें.

राजश्री खंडेराव त्रिंबक चंद्र ८ मिनहूस मंडलेश्वरास आले. चंद्र १० रोजीं येथें बाईस भेटायास आले होते. चार घटकांपर्यंत बाईचें त्यांचें एकांतीं बोलणें झालें. संध्याकाळीं मंडलेश्वरास गेले. मजलाही दरबारांतच भेटले होते. ते बोलले जे पुण्यास जातों. पौर्णिमेपर्यंत येथें आहों. मागाहून दादो शंकर येणार आहेत. ते आले ह्मणजे जाऊं. चंद्र १३ रोजीं खंडेराव निरोपास येथें आले होते. त्यास बाईनीं ब्राह्मण बोलावून मुहूर्त छ १९ जमादिलावलचा करार केला आहे. त्या मुहूर्तें निघून पुण्यास येणार. यासमागमें पांच साडेपांचशें लोक, घोडें मनुष्य चांगलें आहे. लवकरच येऊन पोंहचतील.

हिंदुस्थानाकडील वर्तमानः—जयनगरवाल्याच्या मुलखांत पादशाहीची फौज नजीबखान घेऊन आला आहे. तीस हजार फौज आहे. दहा परगणे व पांच गड किल्ले जयनगरवाल्याचे घेतले मुलूख पुढें सर करीतच आहे. जयपूरवाल्या राजास देवी निघाल्या होत्या. शेवटलीच खबर उडाली होती. परंतु आतां आराम झाला आहे. राजाही अठरा वीस वर्षांचा आहे. हिंदुस्थानांतही गडबड फार आहे. शोकही उठले आहेत. खंडेराव त्रिंबक तिकडे येतच आहेत. राजश्री शिवाजी विठ्ठल यांजवळही सरंजाम चांगला आहे. मर्जीस आलें तर त्यांसही बोलावूं पाठवावें. अहिल्याबाई दोन चार वेळां बोलली जे, श्रीमंत फौजेची उपेक्षा करितात; परंतु गोष्ट कार्याची नाहीं. फौज चांगली पंचवीस तीस हजार जवळ असावी. हे चहूंकडून गडबड उडाली आहे. अशा समयीं आपण आपले फौजेविशीं बळकट असावें व कोंकणांत कांहीं इंग्रजांनीं गडबड केली आहे ह्मणून मजला पुसत होती. मीं उत्तर केलें जे, आह्मांकडे हें वर्तमान नाहीं. यांची कासीदजोडी पत्रें घेऊन सरकारांत आली आहे ती उत्तर देऊन इकडे यावी. याप्रमाणें वर्तमान सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञप्ती.

लेखांक ८. ता. ५ जून इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि. ज्येष्ठ शु॥ ३ शके १७०२.

सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र १ जमादिलाखरपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील व उभयतां सरदारांकडील व इंग्रजांकडील वर्तमान, येथें ऐकिल्याप्रमाणें पेशजीं विनंतीपत्रीं लिहून, सेवेसीं कासीदजोडीबरोबर पाठविलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत व इंग्रज प्रस्तुत रेवातीरीं भडोचजवळ रेवा दक्षिणतीरीं आहेत, व उभयतां सरदार वाघोडें ह्मणून डभईजवळ गांव आहे तेथें पाण्याचा ओढा आहे, त्या पाण्यावर आहेत. सरदारांच्या सैन्यांत धान्य तों स्वस्त आहे; परंतु चारापाण्याची विपत्य फार आहे. फत्तेसिंग गायकवाड इंग्रजाबरोबरच आहेत. चंद्र १७ जमादिलावलीं गोहदप्रांताकडून एक ब्राह्मण आला. त्यानें वर्तमान सांगितलें जे, खंडेराव हरी शिंद्याकडील आपले पथकानिशीं पुढें गोहजवाल्यापासून बारा कोसांवर जाऊन उतरले. गोहजवाल्यास बातमी कळली. त्यांनीं रातोरात जाऊन खंडेराव हरीवर ताव केला. त्यास विसा रावतांनिशीं खंडेराव हरी निघून गेले. वरकड गोहजवाला घेऊन गेला. ह्मणून त्या ब्राह्मणानें सांगितलें. बळवंतराव गोहजवाल्याकडे पाडाव गेले ह्मणून

वर्तमान, परंतु कोणते बळवंतराव हें न कळे. हें वर्तमान ओढेकराचे फौजेंत ऐकिलें होतें. सत्य मिथ्या देव जाणे. राजश्री गणपतराव शिवाजी हे पंधरा सोळाशें स्वारांनिशीं पलीकडेच आहेत. त्यांजवर गोहजवाला जाऊं शकत नाहीं. तें सामान चांगलें आहे. आंबोजी इंगळेही मागेंच आहेत. याप्रमाणें हें ऐकिलें वर्तमान. राजश्री खंडेराव त्रिंबक सेवेसीं आलेच आहेत. येथील वर्तमान होळकरांकडील सरंजामी सरदार बुळे व वाघ वगैरे पागा. त्यास बुळे व वाघ आपले पथकासुद्धां येथें मातुश्रीबाईजवळीच होते. त्यास गोविंदराव बुळे देवलोक झाले. स्त्रियांसहवर्तमान गेले. त्यांचे पोटीं पुत्र नाहीं. यास्तव त्या बुळ्यांच्या सरंजामावर राजश्री तुकोजी होळकर यांनीं जप्ती पाठविली आहे. त्या महालची रसद येथें बाईनीं घेऊन शिंद्यांच्या विसा लक्षांच्या भरण्यांत ऐवज दिला आहे. त्यांनीं तिकडून पाटीलबावांच्या संमतें जप्ती पाठविली आहे. यांनींही इकडून लोक तयार केले आहेत. पाटीलबावांच्या कारकुनाकडून पाटीलबावांसही पत्रें लिहविलीं आहेत. पहावें कसें होईल. चंद्र १७ जमादिलावलचे पाटीलबावांकडून व तुकोजीबावांकडून पत्रें बाईस आलीं. वाघोड्याहून कूच होऊन अलिकडे पाण्याचे सोईनें पायागडच्या रोखें ते मुक्कामींहून पत्रें रवाना केलीं. तीं चंद्र २७ मिनहूस दोंप्रहरां येथें दाखल झालीं, त्यांत तुकोजीबावांच्या पत्रांत तों खायाखर्चाची गिराणी, हाच मजकूर होता. पाटीलबावांनीं लिहिले होतें जे, इंग्रज रेवातीरीं बावापिराच्या घांटावर जमून आहेत. त्यांचें सैन्य खाडतुर पार उतरलें. सुरतेस जाणार. ते सडे अलीकडे आहेत. ते फार उतरून सुरतेकडे गेले ह्मणजे आह्मीही छावणीची तजवीज कोठें करावी हा विचार ठरवून सेवेसीं लिहून पाठवूं, व फत्तेसिंग गायकवाडांचा मजकूर लिहिला होता जे, कागदपत्रीं त्यांचा शिलशिला होता जे, सल्ह्यामामल्याचा विचार यासीं करून भेटीस येतों. ते अद्याप आले नाहींत. त्यांचा विचार केला पाहिजे. याप्रमाणें पत्रीं मजकूर होता. लष्करांत महागाई चौ सहा शेरांची धारण आहे. चारा नाहीं. झाडपाल्यावर घोडीं आहेत. चंद्र ३० जमादिलावलीं सुरतेचें दहा दिवसांचे व उभय सैन्यांचें आठी दिवसांचें वर्तमान आलें. त्यास सुरतेंत श्रीमंत दादासाहेब शरीरेंकडून फार श्रमांत आहेत. तिघां शिष्यांनीं धरून उभें करावें, तेव्हां सूर्यअर्घ्यें देऊन एक घटका उभे राहतात. तदोत्तर बसणें अथवा शयन. बारा घटका रात्रीं, तीन पैसेभार राळ्याचे तांदूळ व पैसाभार मूग ऐसे एकत्र खिचडी करून भक्षितात. आठी दहा दिवसां सौभाग्यवती आनंदीबाईचें दर्शन. एक अर्ध घटका येऊन जवळ बसली तर

त्यांसीं भाषण करीत नाहींत. बाजीरायास बाईकडे फारसें जाऊं देत नाहींत. वारंवार आपले मंडळीचें पुण्याचें स्मरण करित. खर्चाचीही गिराणी फार आहे. अडीचा महिन्यांनीं पंचवीस हजार रुपये खर्चास दिले. सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई ही शरीरेंकडून कृश झाली आहेत. दादासाहेबांची कनिष्ठ स्त्री देवी निघून गत झाली. सुरतेभोंवताले राजश्री गणेशपंत बेहरे यांनीं फार धूम केली आहे. सुरत व आमदाबाद व भडोच व डभई व बडोदें आणीक दोन मातबर गांव व सोनगड इतके स्थळीं मात्र दिवा लागतो. वरकड मुलूख बेचिराख झाला आहे. सुरतेंत धारण ज्वारी चवदा शेर, गहूं आठ शेर, तांदूळ सहा शेर, तूप दोन शेर, चणे तों मिळत नाहींत, याप्रमाणे सुरतेचें वर्तमान. सैन्याचें वर्तमानः–इंग्रज बावापिराच्या घांटावर जमावसुद्धां आहेत. दोन पलटणें पार उतरून खाडतुर उतरीत होते. इतक्यांत गणेशपंत बेहरे स्वारीसुद्धां येऊन पलटणावर पडले. खाडतुर उतरलें होतें तें लुटलें. पलटणें संभाळून रेवा उतरून या जमावांत मिळालीं. उभयतां सरदार सडे फौजसुद्धां बावापिराच्या घांटावर इंग्रजांस घेरून आहेत. कोणी बाहेर निघालें कीं यांनीं उचललें, याप्रमाणें घेरून आहेत. एक मातबर लढाई करावी असें उभयतां सरदारांच्या चित्तांत आहे. इंग्रजांच्या सैन्यांत तीन चार शेरांची धारण आहे. कोणीकडे हालूं पावत नाहीं. यांसी कांहीं जाबसालही लाविला होता जे, आह्मी सुरतेस छावणीस जातों. तुह्मी छावणीस जा. बादबरसात जाबसाल अगर लढाई जें होणें तें होईल. असे जाबसाल यांनीही ऐकून घेऊन, आपला डाव गाठून घेऊन उभे राहिले. आतां कांहीं जाबसाल नाहीं. उभयतां सरदारांच्या लष्करांत धान्य आठ शेर आहे. परंतु चारापाण्याचें फार संकट आहे. उभयतांचें बहीरबुणगें डभईच्या व बडोद्याच्या मध्ये वाघोड्यावर आहे. याप्रमाणें गुर्जर ब्राह्मण, येथील बाईचे येथील चाकर, तो सुरतेहून व लष्करांतून आला; त्यानें वर्तमान सांगितलें याप्रमाणें हें ऐकिलें वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. पहिले जमादिलाखरपर्यंत वर्तमान मागील ऐकिलें, तें सेवेसी श्रुत होय, हे विज्ञप्ति.

पै॥ छ १९ जाखर. **लेखांक ९.** ता. ११ जून इ. स. १७८०.

इहिदे समानीन मुकाम किकवी. **श्रीगजानन.** मि. ज्येष्ठ शु॥ ९ शके १७०२.

सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ७ जमादिलाखर परीयंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. उभयतां सरदारांच्या लष्करांतून पायागडाअलीकडे विसा कोसांवर

बोरीनजीक दाहा कोस दाहोद, ते मुक्कामींहून वानवळे साहुकाराचें पत्र, त्याच्या गुमास्त्यास येथें साडे ती दिवसां छ २ मिनहूस आलें. त्या पत्रांत वर्तमान कीं, इंग्रज सरंजामसुद्धां सुरतेस गेले. छावणी तेथें करणार. मग उभयतां सरदारांनीं विचार करून, राजश्री गोविंदराव गाइकवाड यांस सेनाखासखेलीचीं वस्त्रें व हत्ती देऊन, उभयतां मिळून दहा हजार फौज गोविंदरायाचे तैनातीस देऊन, पायागडाजवळ गोविंदराव गाइकवाडास ठेऊन, उभयतां सरदार फिरले. ते दाहोदास आले. पुढें उज्जनीस शिंदे लवकरीच दाखल होणार व होळकर इंदुरीं दाखल होणार. याप्रमाणें त्या पत्रीं वर्तमान होतें. त्याजवर दुसरे तिसरे दिवशीं वर्तमान साहुकाऱ्यांतही आलें जे, उभयतां सरदार दाहोदेस आले. उज्जन इंदुरास येणार. छ ५ मिनहूस शिंद्याकडील कारकुनाचें येथें वर्तमान आलें जे, उभयतां सरदार दाहोदाहून कूच करून झाब्यास आले. झाबे परगणा येथून चाळीस कोस आहे. तेथें मवास आहेत. त्यांजवळून कांहीं खंडणी घेऊन, दरमजल छावणीस येणार. गोविंदराव गाइकवाडास दोन लक्ष रुपये चिट्या चपाट्या करून दिल्या. चार हजार फौज त्याजवळ ठेऊन उभयतां छावणीस आले. गुजराथेंत जसें काम पडेल तसें उभयतां गोविंदराव गायकवाडाकडे फौजेचा भरणा करणार. याप्रमाणें वर्तमान आलें. हिंदुस्थानाकडील वर्तमानः—जैपूर प्रांतीं नजीबखान तीस हजार फौजसुद्धां आला आहे. दोन हिस्से जैपूर प्रांतचा मुलूख यांनीं सर केला. होळकराकडील महाल रामपुरा व टोंक तोडा व फूट जहागिरेचे गांव अहिल्याबाईचे आहेत. त्यांचीं लिहिलीं येथें बाईकडे आलीं कीं, कांहीं कुमकेस फौज पाठवितां तर परगणे वांचतात. नाहींतर नजीबखान येथें आह्मांस राहूं देत नाहीं. जैपुरवालाही कांहीं चळवळ करीत नाहीं. याप्रमाणें तिकडील वर्तमान. गोहजप्रांतचें वर्तमान आलें जे, पहिलें खंडेराव हरीवर गोहजवाल्यानें वरतावा केला. ते खंडेराव हरी विसा रावतांनशीं निघून गेले, ते गणपतराव शिवाजी व आंबोजी इंगळे वीस कोस मागें होते, त्यांस जाऊन मिळाले. गोहजवाला शिमथरास जाऊन, शिमथरवाला गुजर व गोहजवाला मिळून जमून होते. त्याजवर गणपतराव शिवाजी व खंडेराव हरी व आंबोजी इंगळे ऐसे यांजवर येत होते. सिमथराहून बारा कोसांवर आले. हे बातमी गोहजवाल्यास आली. गोहजवाल्यानें व गुजरानें रातोरात धांवणी करून ह्या त्रिवर्गांवर पहाटें पहाटें जाऊन पडले. ते तिघेही कांहीं सांभाळून कांहीं तसे निघून गेले. पलीकडे विसां कोसांवर जमले आहेत ह्मणून ऐकिलें. नजीबखान जैपूरवाल्याजवळ रणथंबूरचा

किल्ला मागतात. रणथंबुराजवळ पांच हजार फौज ठेऊन नजीबखान अलीकडे आला आहे. याप्रमाणें बाईकडील कमाविसदार ते प्रांतचे, त्यांनीं वर्तमान लिहिलें होतें. छ ५ मिनहूस येथें वर्तमान आलें जे उभयतां सरदार थांदले परगणे झाबें येथें आले. दो ती दिवसांत उज्जन इंदुरीं उभयतां दाखल होतील. याप्रमाणें वर्तमान आलें तें सेवेसीं श्रुत होय. दाखल झाल्याचें वर्तमान आलीयावर मागाहून लिहीन हे विज्ञप्ति."

लेखांक १०. ता. २१ जून इ. स. १७८०.

श्रीगजानन. मि. ज्येष्ठ व॥ ४ शके १७०२.

" सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. सेवकाचें वर्तमान तागाईत छ १७ जमादिलाखरपरियंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व उभयतां सरदारांकडील, इंग्रजांकडील व सुरतेचें येथें कळल्याप्रमाणें वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून श्रीमंतांकडेस विनंतीपत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमानः—इंग्रज सुरतेस छावणीस गेले. तदोत्तर उभयतां सरदारही दरमजल ये प्रांतीं इंदूर उज्जनीस छावणीस येतात. प्रस्तुत बदनावरावर मुक्काम आहेत. सबब की राजश्री गोविंदराव गाइकवाड यांस पायागडाजवळ इंग्रजांच्या शहावर पांच सात हजार फौजसुद्धां ठेवायाचा निश्चय. त्यास गोविंदरायास दाहोदचे मुक्कामींहून त्यांचे सरंजामानिशीं माघारा त्यांस रवाना केला आहे. उभयतां सरदार मिळून पांच सात हजार फौज; यांसी खर्चास दोघांनी दोन लक्ष रुपये तजवीज करून गायकवाडाकडेस पाठवावी. या ऐवजाच्या व फौजेचे योजनेकरितां तेथें मुक्काम झाले आहेत. फिरून माघारा लोक जायासाठीं तलबतनख्याचे राडे पडले आहेत. बापोजी होळकर रुसून शिंद्याकडे गेला होता, तो तुकोजीबावांनीं समजाऊन आणिला. पेशजीं त्या लोकांनीं तलब व उभयतां सरदारांच्या समागमीं फौजेचे देण्याचे जाबसाल पडले आहेत, व पाटीलबावांनीं पांचसात पागा व हजार पांचशें फौज ऐसें हिंदुस्थानांत जैनगर प्रांतीं कांहीं पाठवावें हेही योजना करितात. छावणीस आलियावर जागांजागां लोक तारवतार होतील; यास्तव तेथें राहून, योजना चहूंकडील करून, जिकडील तिकडे रवानग्या करून, निश्चितीनें छावणीस यावें, असें वर्तमान ऐकिल्यांत आलें. येथील वर्तमान पाहतां तुकोजी होळकर बाईस पत्र लिहीत नाहींत. बाईनीं कदाचित् मामलतसंबंधीं अगर कितीक बोभाट लोकांचे येतात, येविशीं पत्र लिहिलें, तर त्याचीं उत्तरें खसखसीत लिहिलीं आहेत, त्यावरून यास

वैषम्य जातें. यांणीं एखादें काम न करावें असें लिहिलें, तर अवश्यमेव त्यांनीं करावें, असा प्रकार येथील झाला आहे. राजश्री नारो गणेश यांसी बाईसी केवळच चित्त शुद्ध नाहीं यास्तव नारो गणेशांनीं खंडो बाबुराव यांस कांहीं भानगड सांगितली आहे. बाईची व आपली चित्तशुद्धता व्हावी असे जाबसाल खंडो बाबुराव कांहींसे करितात. बाई चित्तावर घेत नाहींत. असें वायुस्वरूपी वर्तमान ऐकिल्यांत आलें आहे. सत्य मिथ्या देव जाणे. हिंदुस्थानाकडील वर्तमानः–जैनगरवाल्यानें नजीबखान पातशाहाकडील फौजसुद्धां ये प्रांतीं आले आहेत. त्यांसीं मुलाजमत करून, जैनगरवाल्यांनीं त्यासीं एखलास करून, त्यांसीं बोलले आहेत कीं, मराठ्यानी कांहीं आमचा मुलूख दाबला आहे, तो आमचा आह्मी घेतों. त्यांनीं घ्या ह्मणून सांगितलें. त्यावरून जैनगरवाल्यांनीं आपली फौज पाठवून टोंक व रामपुरा व खासगी फुटगांव कांहीं आहेत, तेथें गडबड केली आहे. फुटकर खेडीं तों त्यांनीं घेतलीं. टोंक व रामपुरा भांडत आहेत. परतु प्रस्तुत हिंदुस्थानांत फौज आपली नाहीं. सांप्रत जलदीनें जाऊन पोंहचतही नाहीं. त्यापक्षीं तेही ठाणीं घेतीलसें दिसतें. तेथून बाईनी जैनगरवाल्यास पत्रें लिहिलीं आहेत. छ १२ मिनहूस रवाना केलीं. या पत्रांवर कांहीं स्थिरता झाली तर झाली, नाहींतर घेतील. राजश्री गोविंद कृष्ण यांस पाटीलबावांनीं उज्जनीस बोलाविलें आहे. यास्तव गोविंद कृष्ण, बाईचा निरोप घेऊन, छ १४ रोज रविवारीं, स्वार होऊन उज्जनीस जाणार. यास्तव गोविंद कृष्ण यांसीं बाईनीं चार घटका एकांत फार केला. येथें आवाया अंतर्बाह्य आहेत कीं, पाटीलबावांच्या सल्ल्यानें तुकोजी होळकर इंदुरास आल्यावर लोकांचे समजाविसीस कांहीं मागणार. आधीं तों सुलतानजी लांबहाते मातबर मनुष्य. उभयपक्षीं आप्त. त्यास बाईकडे पाठवून, विचाराच्या वाटेनें बाईस चार गोष्टी सामोपचारें सांगून, अर्थ साध्य होय तो अर्थ करावा. ज्यापक्षीं बाई ऐकेनातच, त्यापक्षीं जेणेंकरून बाईजवळील जडपेड आपले हातीं लागे, ते समयोचित प्रसंग करावे, अशा आवाया येथें कितीक प्रकारें ऐकिल्यांत येतात. ते अर्थ बाई गोविंद कृष्ण यांसीं एकांती बोलली जे "मजजवळ तों पैसा नाहीं. सारे दौलतेची आक्रमशक्त यांची यांणी आपली करून घेतली आहे. मागें माझे विद्यमानें दौलतीचा महाल-मुलकी कारभार मीं केला आहे. त्याचे हिशेबकितेब सर्व कारकुनाजवळ आहेत. दिवाणगिरीस मजजवळ नारो गणेश यांचे भाचे मुकुंदराव आहेत. आपला हिशेब पाहावा. यांचे दौलतीच्या जमेंतील एक कवडी मजकडे हिशेबीं लागली, तर एक कवडीच्या पांच कवड्या देईन. मीं आपलें पोटें अन्न भक्षितें,

तें देखील यांचें नाहीं. असें असतां, यांणीं आह्मांभवतें विपर्यासकर्मच आरंभिलें, तर दारुगोळा मजजवळही सिद्धच आहे. जिवाचाच संकल्प आहे कीं, रेवातीरीं आपले स्नानसंध्या देवदेव करून, आयुष्याचे दिवस सत्कालक्षेपेंकरून पूर्ण करावे, अशा अर्थी आह्मी आपले दिवस घालवितों. त्यास विपर्यास झाल्यास प्राणसंकल्पच आहे. याप्रमाणें आमचा निश्चय ! आपण ज्यास सर्फराज केलें, ते आपणासच प्रतिबद्ध झाल्यास उपाय हाच ! केवळ हात जोडून माझें घ्या नी मजला रक्षा, असें ह्मणणार नाहीं. वडिलांचे पुण्यें आणि ईश्वर यांतच जें घडवील तें घडो. याप्रमाणेंच पाटीलबावांसही सांगा." अशीं एकांती उभयतांचीं भाषणें झालीं. गोविंद कृष्णही बोलले जे, अमें कशास ते करतील ? पायरीस पाय लावणार नाहींत. तत्रापि पाटीलबावांसही मी युक्तीच्या वाटेनें सांगतों. बाई बोलली जे, पाटीलबावांकडील वकील शिवाजी नारायण येथें आहेत. मीं येथें ऐकिलें कीं, पाटीलबावांच्याच आश्रयानें हे कितीक विपरीत गोष्टी आह्मांसीं करणार. तीं भाषणें शिवाजी नारायणाचीं आमचीं झालीं. त्यांणीं आपले वकिली रीतीनें त्यांस लिहिलें असेल. त्यावरून महादजी शिंद्यांनी आह्मांस पांच सात पत्रे फार निखालसतेचीं पाठविलीं आहेत; व त्यासही लिहिलें आहे कीं, माझा किमपिही बाईशीं दुसरा अर्थ नाहीं. त्यांच्या घरांतच काय असेल तें त्यांणीं आपलें पाहून घ्यावें. आह्मांकडे दोष कांहीं नाहीं. असें लिहित गेले आहेत. परंतु समयास त्यांचा मिजाज कायम राहील न राहील असा भरंवसा नाहीं, असें बाई बोलली. गोविंद कृष्ण यांणींही फार खातरजमा केली." * * * * * * * * * * * [फाटलें आहे]. याप्रमाणें एकांतीं भाषणें झालीं. गोविंद कृष्ण यांचें मानस फार आहे कीं, शिंद्यांकडील हकनाहक पेंच. मी चाकर श्रीमंतांचा. या उभयतां सरदारांच्या तैनातीस मात्र कैलासवासी श्रीमंतांनी मजला दिलें. त्यावर श्रीमंतांची चाकरी करून यांचींही घरें भरलीं. परंतु हकनाहक महादजीबावांनीं रुष्टता धरली आहे. कसाही पाटीलबावांकडील पेंच वारून एकदां श्रीमंतांपाशीं जावें असें मानस आहे. परंतु तेथेंही कोणी आलीकडे ये ह्मणायास नाहीं; यास्तव हकनाहक मध्यें मी मारला जातों. असें बहुत प्रकारें त्यांनींही आपलें दुःख सांगितलें. उभयतां सरदार अद्याप बदनावराअलीकडे चमेलनदीवर आहेत. गोविंदराव गाइकवाडास विदा केलें. त्याजबरोबर पहिले दोन हजार स्वार तैनातीस होते, ते व आतां होळकराकडील व (फाटलें आहे) पथक व शिंद्याकडील हजार स्वार एकूण चार हजार व गाईकवाडास हजार स्वार सांगितले आहेत. एकूण पांच हजार स्वार व हजार पायदळ ऐसें देऊन,

एक हत्ती देऊन पायागडाजवळ राहायाचें सांगितलें. ते गेले, व राजश्री विसाजी आपाजी यांसही घारेजवळून बिदा केलें. परंतु कोणत्या घाटें उतरायास गेले हें नकळे. प्रस्तुत उभयतां सरदारांचा चमेल नदीवर आठ दहा दिवस पुढें मुक्कामच आहे. सबब कीं तमाम फौजेच्या देण्याचा आकार करून फौजा व पागा जागांजागां चारणीस बिदा करून छावणीस सडे उज्जन इंदुरास जाणार. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें, व शिंद्यांकडील वकिलांनींही सांगितलें व हरकुबाईचे येथेंही हेंच वर्तमान आलें. गोविंद कृष्ण यांणीं आपलें वर्तमान सांगितलें जे, श्रीमंतांनीं आह्मांस उदेपूर हा महाल वतनी चाकरी सांगितली होती. त्यास मीही एकनिष्ठेनें चाकरी करून, सरकारचा ऐवज पोंहचावीत गेलों. महाल आबाद राखला. अलीकडे शिंद्यांनीं तो महालही आह्मांकडून घेऊन आपले लगामीं लावला. त्या महालाची तसनस घरें लुटून घेऊन ते संस्थानिक खराब केले. आह्मांवर नाहकचे पेंच ठेवून लुटून घेतलें. अद्यापवरही आह्मांस कोण्या प्रकारें खराब करावें असेंच त्यांचें मानस आहे. असो. आह्मांस पुसता कोणी धणीही नाहीं. मीं उत्तर केलें जे, धन्याकडून काय होऊन यावें तें सांगा, श्रीमंतांस लिहून पाठवूं. तेथून काय उत्तर येईल तें तुह्मांस पावतें करूं. ते बोलले जे श्रीमंतांनीं पाटीलबावांस ल्याहावें कीं, गोविंद कृष्णाकडे कैलासवासी श्रीमंतांनीं उदेपूर हा महाल वतनी चाकरी सांगितली आहे. त्यास अलीकडे बहुत दिवस हिशेब समजला नाहीं. सरकारचा ऐवज कोणीकडे गेला आहे तें, व संस्थान खराब कां झालें, पुढें तेथील बंदोबस्त केला पाहिजे, यास्तव त्यास इकडे हुजूर पाठवून देणें, याप्रमाणें पाटीलबावांस ल्याहावें. आह्मांसही याच अन्वयें ल्याहावें व राणाजीसही ल्याहावें कीं, तुमच्या महालाची बंदोबस्ती सरकारांतून गोविंद कृष्ण यांस सांगितली होती, त्यास अलीकडे बहुत दिवस सरकारची पेशकस पावत नाहीं. गोविंद कृष्णाशीं तुह्मी रुजू आहां किंवा आणीक काय उपद्रव तुह्मांस लागले आहेत; सरकारचा ऐवज कोणीकडे गेला; तें सविस्तर लिहून पाठवावें. ह्मणून अशीं तिनीं पत्रें यावीं व गोविंद कृष्णास एकांतीं सरकाराचें पत्र समाधानीचें यावें ह्मणजे पाटीलबावाही पाठवितील. संस्थानसंबंधीं सरकारचा ऐवज कोणीकडे गेला आहे, हें मी सविस्तर समजावीन. याप्रमाणें त्यांनीं सांगितलें आहे. स्वामींचे मर्जीस येईल तें करावें. तत्रापि गोविंद कृष्ण यांस ममतापुरस्सर एकांतीं पत्र यावें ह्मणजे एकांतींच पावतें करूं. त्यामुळें इतकें होईल कीं, तेथील बारीक मोठें वर्तमान सविस्तर वरचेवर कळत जाईल. इतक्यावर मर्जी धन्यांची. गोविंदराव गाइकवाड यांचे रवानगी (विषयीं) तट

पडला आहे. कां कीं, लोक कोणी माघारां जात नाहींत. यास्तव लोकांचे समजाविशींचाही गुंता पडला आहे. आणीक पांच सात दिवस त्या मुक्कामावरच लागतील. याप्रमाणें इकडील वर्तमान. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ११. ता. १ जुलई इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि. ज्येष्ठ वा॥ १४ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २७ जमादिलाखलपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व उभयतां सरदारांकडील व श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहिलें आहे. सांप्रत उभयतां सरदार छ २१ रोजीं उज्जनीस शिंदे व इंदुरी होळकर दाखल झाल्याचें वर्तमान छ २३ रोजीं येथें आलें. होळकराकडील कारभारी उज्जनीस पाटीलबावाबरोबर गेले आहेत. एका दो दिवसां येतील. इंदुरीं दाखल झाल्याचें अगर मध्यंतरीं राजश्री तुकोजी होळकर यांणीं येथें बाईस पत्र लिहिलें नाहीं. इतके उपरांतिक पत्र घेऊन सुलतानजी लांबहाते ते त्यांच्या शिष्टाईस येणार असें वर्तमान येथें ऐकतों. उभयतां सरदारांजवळ सरकारचे हुजरे आहेत. ते पुण्याकडे लवकर चला ह्मणून ह्मणतच आहेत. हुजऱ्यास तों ह्मणतात जे, चालतों परंतु दो महिन्यांनंतर भाद्रपदमासीं देशांत जावें असा उभयतांचा निश्चय झाला आहे ह्मणून ऐकल्यांत आलें. श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत. इंग्रज छावणी कांहीं सुरतेस व कांहीं भडोचेस गेले आहेत. दुसरें वर्तमान ऐकिलें जे, खडक्याबाऱ्याजवळ इंग्रजांचीं दोन पलटणें आलीं आहेत. ते कुकडमुंढ्यास जाणार. तें स्थळ हस्तगत करावें ह्मणजे खानदेशांत बसायास जागा झाली; ह्मणजे पुढें आणिक जागांजागां फैलाव करावा या अर्थीं येतात. त्या दोन पलटण्याबरोबर कांहीं फत्तेसिंग गाइकवाड यांची चार पांचशें फौज आहे असें ह्मणतात. इंग्रजांनीं फत्तेसिंगास दोन लक्ष रुपये खर्चास दिले व गुजराथचा अंमल सारा सरकारचा व गाइकवाडांचा. सारेच अंमल फत्तेसिंगाचे हवाला केला. फत्तेसिंगबावाचें आगतस्वागत इंग्रजांजवळ फार आहे. बादबरसाद इंग्रज दक्षणप्रांतीं जाणार व फत्तेसिंगबावांनीं गुजराथचा बंदोबस्त करावा याप्रमाणें साहुकाऱ्यांत बोलवा आहे. राजश्री गोविंदराव गाइकवाड माघारी गेले. दोन हजार फौज त्यासमागमें गेली. मागाहूनही कांहीं जाणार. गोविंदराव गाइकवाडांनीं पुढील मसलतीचा डौल केला आहे. तें वर्तमान बाबी पठाण व काठेवाडचे काठे सरदार व आणिकही

कोणी कोणी पाळेगार इतक्यांचीं हीं सूत्रें पहिलेच गोविंदरायाकडेस आहेतच. पायागडाजवळ दाखल झालीयावर आषाढ अखेरीस त्या सरदारांस फौजासुद्धां बोलावून घेऊन गुजराथचा बंदोबस्त करावा. उभयतां गाइकवाडांचे गुजराथप्रांतीं खटके होतील. हेंही वर्तमान साहुकाऱ्यांतीलच होय. गोविंदरायाची बहीण आपल्याकडील तळेगांवींहून निघून गोविंदराव गाइकवाडाकडे गेली. ते बाई येथें आली होती. ते हरकुबाईच्या वाड्यांत राहिली होती. अहल्याबाईनींही भोजनास वाड्यांत आणिली होती. तीही बोलत होती जे, गोविंदरायावर आतां श्रीमंतांची कृपा झाली. अतःपर फत्तेसिंग गाइकवाड गुजराथेंत अंमल करतील असें होणार नाहीं. गोविंदरायास ते प्रांतचे भुमे व काठे व बाबी सर्व गोविंदरायाच्या सूत्रांत आहेत असें बोलत होती. खानदेशांत लासूरचा बंदोबस्त चांगला असावा. गुलजारखानाचीं माणसें आसपास फिरतात. छ २० रोजीं पाटीलबावा उज्जनीस गेले. छ २१ रोजीं होळकर इंदुरास दाखल झाले. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १२.

ता. ४ जुलई इ. स. १७८०.

श्रीगजानन.

मि. आषाढ शु॥ २ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. त॥ छ १ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून, छ २४ जमादिलाखरीं विनतिपत्रें सेवेसी रवाना डाकेबरोबर केलीं आहेत. हे पावलींच असतील. अलिकडे बहुत दिवस आज्ञापत्रेंही कांहीं येत नाहींत. असो. स्वामी धनी आहेत. सांप्रत दादासाहेब सुरतेस आहेत. गुजराथप्रांतीं व सुरत अठ्ठाविशींत वगैरे ते प्रांतचा बंदोबस्त करितात. बहुतकरून इंग्रजांचीं ठाणीं जागांजागां बसवितात. गुदस्तांचे मसलतीचा पैका वसूल करणें इंग्रजांस फार अगत्य आहे. या अर्थीं इंग्रजांच्या मनोदयानुरूप मातबर स्थलीं त्यांचींच ठाणीं बसतात. बडोद्यावरही स्वारी करीत होते. परंतु गोविंदराव गाइकवाड काठेवाड प्रांतीं फत्तेसिंगाचे फौजेस आडवे गेले आहेत. त्यांनीं दादासाहेबांस पत्रें पाठविलीं कीं, बडोद्यावर जाणें दोन दिवस तहकूब करावें. ते आपले जेबांत आहे. मी आलियावर तेथील लोकांशीं सामदंड भेद करून, फत्तेसिंगही हस्तगत करूं. आणि फौज बडोद्यांतील लढाईमुळें विखळ होईल. पुढेंही आपणास फौज चांगली पाहिजे. यास्तव दोन्हीही कामें

करूं ह्मणून पत्रें आलीं. यास्तव तह मूळ झाले आहेत. फत्तेसिंग गाइकवाड याजकडीलही सूत्रें जाबसाल दादासाहेबांकडेस गेले आहेत. असें वर्तमान साहुकारी ऐकिलें, व भोंसल्याकडेही श्रीमंत दादासाहेबांनीं कारकून पाठविला, तो महेश्वरीं एक दिवस राहिला होता. तिकडेही कारकून गेला. आपण ह्मणतील कीं, राजश्री दिवाकर पुरुषोत्तम पुण्यास आले आहेत; तिकडे कांहीं सूत्र दादासाहेबांचें लागणार नाहीं. परंतु राजश्री मुधोजी भोंसले यांचें पूर्वीपासून सूत्र तिकडील आहेच. आतां तों इष्टं धर्मेण योजयेत् असें आहे. गुलजारखानाच्या पारपत्यास अहल्याबाईकडीलही फौज रेवा उतरत आहे. पांच सातशें फौज जमावून जाईल असें दिसतें. बापोजी होळकरही एका दो दिवसां येथें येणार. त्यांचेंही लोकांचा देण्याचा घोळ पडला आहे. फुटकर फुटकर लोक आसपासचे दादासाहेबांकडेस चाकर रहायास जातात. तिकडे लोक ठेवण्याची चडचड फार आहे. इकडील मातबरांचीं लक्षें दुरोख झालीं आहेत. एकनिष्ठ लक्ष कोणाचेंही राहतां दिसत नाहीं. सांप्रत लोकांच्या मर्ज्या एक प्रकारच्या दिसतात. प्रस्तुत दादासाहेबांकडील वर्तमान स्तिमितसें झालें आहे. कोणी कोणी येथें बोलतात जे, पुण्याकडून कांहीं सूत्र दादासाहेबांकडे लागलें असेल. आतां तहही झाला तर, रेवा दक्षिणतीरीं श्रीमंत व रेवा उत्तरतीरी श्रीमंत दादासाहेब, जाला तर असा तह होईल असें जनवदंता. काशीदजोड्या तीन पाठविल्या. त्या येथें छ० २९ जमादिलाखरीं पावल्या. हिंदुस्थानाकडील वर्तमानः—तर पातशाहा दिल्लीतच आहेत. सुजायतदौलाकडील नजीबखान तीस चाळीस हजार फौजेनिशीं जयनगर प्रांतीं येऊन, एक दोन किले जयनगरवाल्याचे घेतले. प्रस्तुत अलवरच्या किल्ल्यास वेढा घालून बसला आहे. दिल्लीवर शीख चाळीस हजार फौज सुद्धां चालून आले होते. त्यास पातशहाची फौज बाहेर निघून शिखांचा पराभव केला. जयनगरवाल्याचा प्राचीन दिवाण खुशालीराम बोहोरा होता, तो या नूतन राजानें कैद केला. नवा कारभारी केला आहे. त्यामुळें राज्याची हलकाई दिसून आली. यवनांचा जोर आहे. जागांजागां राज्यांत फितूर तिकडेही झाला आहे. जाटाच्या राज्याचा विध्वंस झाला आहे; तो आपणास विदितच आहे. वरकड इकडील वर्तमान देखलें ऐकलें सेवेसीं विनंतिपत्रीं पेशजीं व हलीं लिहिलेंच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. छ० १४ व छ० २२ व छ० २४ जमादिलाखरचीं पत्रें सेवेसी येथून पाठविलीं ती पावलीं किंवा नाहीं हे आज्ञा."

लेखांक १३. ता. १२ जुलई इ. स. १७८०.

पै॥ चंद्र २५ रजब इहिदे समानीन. **श्रीगजानन.** मि. आषाढ शु॥ ११शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र ९ रजबपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत. परंतु त्यांजकडील रामाजी बापू ह्मणून कारकून व आणीक एक कारकून ऐसे दोघेजण दोनशें स्वारांनिशीं सुरतेहून निघून, किल्ले मांडवगडानजीक बरड्या ह्मणून गांव लहानसें आहे, तेथील....मवास जोरावरसिंग तेथें दोनशां स्वारांनिशीं उभयतां कारकून आले. पांच सात दिवस तेथें राहून, जोरावरसिंगाच्या अनुमतें पहाडांतील मवासांसीं भेटून, काय त्यांचीं बोलणीं झालीं असतील हें न कळे. तदोत्तर रामाजी बापूजी शंभर स्वारांनिशीं जोरावरसिंगाजवळ राहून, दुसरा कारकून शंभर स्वारांनिशीं माघारा कांहीं पलटणें व फौज आणावयास गेला आहे. मांडवच्या पहाडांतील मवास फितुरांत मिळाले हें वर्तमान बाईस येथें बातमी आली. त्यावरून मातुश्री बाईनीं येथून चोरबातमीस माणसें पाठविलीं. बातमी आली कीं हें वर्तमान खरेंच. यास्तव राजश्री रंगराव ओढेकर यांस बाईनीं पत्र लिहिलें जे, दादासाहेबांकडील कारकून फौज घेऊन मांडवगडच्या मवाशांत येऊन फितूर करितात, हें बरें नाहीं. तुह्मी त्यांचें पारिपत्य करा. नाहींतर आह्मी येथून फौज पाठवूं. तुमच्या महालाची तसनस होईल. मग पवार व तुह्मी श्रमी व्हाल. त्यांचें पारिपत्य करून धरून देणें कीं त्यास उधळून देणें. याप्रमाणें चार पांच रोज झाले पत्र पाठविलें आहे, व चंद्र ३ मिनहून दुसरी बातमी आली जे, ते शंभर स्वार व कारकून अद्याप मवाशांतच आहेत. वर्तमान येतांच बाईनीं मज हातीं रंगराव यांस पत्र स्पष्ट लिहिविलें कीं, त्यांचें पारिपत्य करा; नाहींतर श्रीमंतांस लिहिलें जाईल. श्रीमंत तुह्मांवर रागें भरतील. असें मजकडूनही लिहविलें; व बाईनींही पत्र रंगरावास रागें भरून लिहून, दोन्हीं पत्रें धारेस रवाना केलीं. या वर्तमानाचीं पत्रें बाईनीं उभयतां सरदारांसही लिहिलीं आहेत. उभयतां सरदार व रंगराव त्यांचें पारिपत्य करितील. तिकडे कांहीं ढीलच झाली, तर बाईनींही पागा बोलविल्या आहेत. तेथून फौज पाठवावी असाही विचार बाईंचा आहे. परंतु उभयतां सरदार व रंगराव ह्यांच्या उत्तराची मार्गप्रतीक्षा करितात. सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई पैवस्ता या प्रांतीं होती. ते वेळेस आदिकरून जितके मवास व भिल्ल इकडे आहेत, तितक्यांशींही त्यांनीं सलुख करून आपलेसे करून ठेविले आहेत. ते आतां त्यांस अनकूळ होतात.

खानदेशांत, फत्तेपुरास चंद्रराव पवार दहा वीस स्वारांनिशीं आले होते. त्यांजवळ चौशां स्वारांचा जमाव झाला आहे. आणीखही लोक ठेवीतच आहेत. खडक्याव्याऱ्यावर पलटणें आलीं आहेत. ते व हे मिळून खानदेशांत कुकडमुंड्याचा परामर्ष करणार अशी वदंता आहे. तिकडील बंदोबस्त स्वामी करतीलच. उभयतां सरदार इंदूर उज्जनीस आहेत. लोकांच्या देण्याघेण्याच्या खटपटींत आहेत. राजश्री नारो गणेश उज्जनीस गेले होते, ते इंदुरास आले. मागाहून राजश्री बाळाराव व रायाजी पाटील हे उभयतां पाटीलबावांकडून इंदुरास येणार. तेथून नारो गणेश व हे उभयतां ऐसे मिळून येथें बाईकडेस येणार. येथील बोलणीं झाल्यावर, मग उभयतां सरदार मिळूनच बाईच्या भेटीस येणार, अशी वदंता आहे. राजश्री गोविंदराव गायकवाड बदनावराजवळ राजोळें ह्मणून गांव आहे, सात कोस, तेथें पांचशें स्वारांनिशीं आहेत. उभयतां सरदारांकडील लोक अद्याप कोणी त्यांजकडेस जात नाहींत. खंडो आवजी पाटीलबावांजवळ आहेत. उभयतां सरदारांनीं मिळून पंचवीस हजार रुपये मात्र गोविंदराव गायकवाडास खर्चास दिले आहेत. खंडो आवजी फौजेविषयीं व खर्चाविषयीं पाटीलबावांशीं नित्य बोलतच आहेत. सुरतेंतील वर्तमानः—आसपास प्रांत उजाड आहे. रस्त कोठून येत नाहीं. शहरांत महागाई फार आहे. सुरतेंत इंग्रज फक्त सावकारी करून आहेत. ते व अन्यत्र थोर थोर सावकार, हे बोलतात जे, श्रीमंत दादासाहेब येथें आले आहेत. हे सुरतशहरासच अरिष्टरूप आहेत. अतःपर दक्षिणी फौजा मातबर जमून येतील; ते सुरत शहरचें आधीं पारिपत्य करितील. एक गणेशपंत बेहरे आले, त्यांनीं आसपास प्रांत सारा उजाड केला. आतां तिकडील फौजा येतील, त्या मातबरच येतील. ते शहरासच लागतील; तेव्हां पुढें काय करावें? दक्षिण्यांशीं सलाह केल्यानेंच बरें आहे. असें सावकार लोक चिंताग्रस्त आहेत. सुरतेंत जमियत सात पलटणें व हजार फौज इतके आहेत. इग्रज शहरची मरामत करितात, व भडोचेस चार पलटणें आहेत. डबईस एक पलटण आहे. आमदाबादेस एक पलटण व हजार पंधराशें आरब, तेही इंग्रजांचेच होऊन आहेत. फत्तेसिंग गायकवाडाची पांचशें फौज व कोणी लेकयळा असे आमदाबादेस आहेत. बडोद्यांत एक पलटण आहे. याप्रमाणें हें इंदुरच्या व येथील सावकाऱ्यांतील हें वर्तमान. या पहाडांत दोन हजार भिल्ल जमले आहेत, व गुलजारखानाजवळ चारशें पायदळ व दोनशें स्वार इतका जमाव जाहला आहे. हिंदुस्थानांतील वर्तमान पेशजीं

पाराजीपंत व यशवंतराव वाबळे व शरीफखान, पागा ऐसे होळकराकडील व कांहीं शिंद्याकडील फौज, ऐसे जयपुरवाल्याच्या पारिपत्यास पाठवावें, अशी नेमणूक झाली आहे ह्मणून ऐकण्यांत आलें. उभयतां सरदारांकडील लोक नित्य इकडून शेंदोनशें जातात. ते बाईचे भेटीस येत असतात. तिकडील लढाईची बयान फार करितात. लोकांस देणगीही कमीच आहे. खराबही फार झाले आहेत. सबब उभयतांचें यशकीर्तीचें वर्णन बहुतच करितात. त्यांबरोबर सरदार येतात, तेही फार खराब येतात. राजश्री पांडुरंग शंकर पारनेरकरच होळकरांकडील कारकून मातबर आहेत. ते बाईजवळही असतात. तुकोजीबावांजवळही असतात. सांप्रत ते तेथें बाईजवळच चार महिने होते. त्यास तुकोजीबावा इंदुरास आल्यावर त्यांस बोलावूं पाठविलें. त्यास पांडुरंग शंकर बाईचा आज्ञा घेऊन, चंद्र १ रजबीं येथून स्वार होऊन, इंदुरास गेले. तेही गृहस्थ कारस्थानी. तोडजोडीचे जाबसाल उभयपक्षींही निक्षून करणार. राजश्री शिवाजी विठ्ठल यांस पाटीलबावांनीं बोलावूं पाठविलें होतें. त्यावरून ते अष्ट्याहून स्वार होऊन उज्जनीस आले ह्मणून वदंतेचें वर्तमान आहे. देशी इंग्रजांची गडबड बोरघांटाकडे, चांदवडबारीकडे व त्रिंबकाकडे अशी फार जाहली आहे, ह्मणून इकडे वर्तमान फार आहे. बाई बोलत होती जे, इंग्रजांनीं चहूंकडून प्रसार करायाचा मनसबा केला आहे. त्यास, या समयास श्रीमंतांनीं शिलेदारांचा व हुजरातीचा भरणा पुष्कळ करावा; आणि इंग्रज जागां जागां, कोठे दोन पलटणें, कोठें तीन पलटणें, असीं तोंडें काढलीं आहेत, अशांत जागां जागां फौजा पाठवून, ते जेथील तेथेंच..... ह्मणजे मागल्याला दहशत पडेल. पुढें कोणी येऊं पावणार नाहीं, नबाब व भोंसले सारे जमा होऊन इंग्रजांचें पारिपत्य करावें. इकडे वर्तमाने जागां जागां आलीं आहेत कीं, इंग्रज बोरघाट चढले व नाशिकाकडेही आले, व चांदवडबारीनेंही चढले, देशांत बहुतच गडबड झाली. श्रीमंतांस घेऊन नानासाहेब पुरंदरास गेले. राजश्री तात्या मात्र पुण्यांत फौजेंत आहेत. असें वर्तमान इकडे आलें. अद्यापिही इकडील भिल्लांस अभयपत्र आलें व गुलजारखानासही एक अभयपत्र आलें तर तमाम घांट हे बंद करतील, व हे हरकूबाईचेही तेवढे गांव सोडून दिले आणि ये बाईसही पत्र आलें जे घांटाचा बंदोबस्त करा; तर हरकूबाई आपल्या पागा, जागां जागां पाठवून, घाट बंद करतील. बंदोबस्त होईल. मर्जीस आलें तर असें केल्यानें बरें आहे. इतक्यावर धन्याची मर्जी. सेवकाची खर्चाची विपत्य फार आहे. कासीदजोड्या वरचेवर येत असाव्यात. सेवकास काय आज्ञा आहे हे विज्ञप्ति."

पै॥ छ १३ रमजान **लेखांक १४.** ता० ५ सप्टंबर इ. स. १७८०.
इहिदे समानीन बराबर डाक. **श्रीगजानन.** मि० भाद्रपद शु० ७ शके १७०२.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ५ रमजानपरियंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील व उभयतां सरदारांकडील व येथील व खानदेशप्रांतचें वर्तमान, येथें ऐकिल्याअन्वयें सेवेसी विनंतीपत्रीं लिहून, छ २ मिनहून डाकेबरोबर विनंतीपत्रें रवाना केलीं. ते सेवेसी प्रविष्ट झालीं असतील. प्रस्तुतचें वर्तमानः–राजश्री पांडुरंग शंकर इंदुरींहून येथें आले. पेशजी येथून गेले होते ह्मणून पहिले विनंतीपत्रीं लिहिलें होतें. त्यास आठ दहा दिवस झाले, येथें आले आहेत. मातुश्री अहिल्याबाईस तेथील कचें वर्तमान विदित केलें. येथून गेले तेव्हां तेथें तुकोजीबावांशीं तेथील वर्तमान निक्षूनच सांगितलें. त्यांसही पुर्तेपणे भासलें जे, बाई धनी आहेत. श्रीमंतांसही जों करून बाईची भीड पडेल, बाईचें अगत्य धरतील, तितकी आपली अगत्य नाहीं; असें समजोन तुकोजीबावांनीही आपलें तापत्रय बहुतच मशारनिल्हेंजवळ सांगितलें. दुसरे, राजश्री पाटीलबावांच्या हितोपदेशाचे व देशी श्रीमंतांचे इतराजीचें. यंदा गुजराथचे स्वारींत चाकरी आपण कशी केली, आणि सोबत्यांनीं अपवाद कसे आणिले, श्रीमंतांस आपली नालीश काय काय लिहून त्यांच्या चित्तांत विक्षेप घातले, तें सविस्तर वर्तमान, प्रहर दिवस राहतां दोन प्रहर रात्रपर्यंत, सविस्तर, तुकोजीबावांनीं पांडुरंग शंकर यांजवळ सांगितलें. नकार नामक पकार नामकाच्या ममतेंत आहेत. तेही विक्षेपाच्या गोष्टी बहुतच सांगतात. असें कितीक बारीक मोठें गृहकृत्य सांगितलें. त्यावर यांणींही बाईविशींचा हितोपदेश बहुत प्रकारें सांगितला. त्यांच्याही चित्तांत गोष्टी ठसल्या. तदोत्तर तुकोजीबावांनीं, आपलें अंतःकर्णपुरस्कर, बाईशीं आपला दुसरा अर्थ नाहीं या अन्वयें मशारनिल्हेजवळ हृद्गत सांगून, पांडुरंग शंकर यांस इकडे रवाना केलें. त्यांनीं येथें येऊन बाईस सविस्तर एकांती श्रवण केलें. बाईनीं ऐकून घेतलें. पुढें दो चौं दिवसां बाळाराव शिंद्यांकडील येथें येणार. इंदुरास आज दहा अकरा रोज झाले, आले आहेत. त्यांनींही इंदुरींहून काल कूच केलें. इकडे येणार. त्यासमागमें शिवाजी नारायण, पहिले पाटीलबावांकडून येथें होते ते, बाळारायांबरोबर आहेत. येथें आलीयावर काय जाबसाल उभयपक्षीं होतात तें पहावें.

सांप्रत खानदेशांतील वर्तमानः–केसोपंत दातार व एक पलटण ऐसे नंदुरबारेंत आहेत. एका पलटणापैकीं कांहीं सुलतानपुरीं चंदरराव पवाराजवळ गाडदी

होते व कांहीं खानदेशांत पांगले होते. त्यास बाईनीं येथून चिमाजी बुळे पाठविले होते. त्यांनीं आपल्या गांवास जाऊरास–जाऊन, लोकांची संचणी झाली नाहीं तोंपरीयंत, पलटणवाल्यांशीं खरें लटकें बोलून, गांवांत, जाऊन, चारशें लोकांचा भरणा करून आठां दिवसांनीं चारशें राउत चांगले व पांचशें पायदळ घेऊन, कूच करून, रातोरात सुलतानपुरास जाऊन वेढा घातला. सुलतानपुरावर हल्ला केला. बुरजावर निशाण चढलें. परंतु आंत चंदरराव पवाराजवळ दोन चारशें माणूस आहे; त्यांनींही आंतून दाटी केली. त्यास यांचा निशाणदार पडला. दोन तीन माणसें बुळ्याकडील कामास आलीं. चंदररायाचींही सत्रा माणसें ठार व दहावीस जखमी झालीं. किल्ल्यांतून गोळागोळी होत होती. यांणींही बाहेरून मोरचे लाविले आहेत. मकाजी गितेही दोशां स्वारांनशीं बुळ्यास सामील झाले. सुलतानजी लांबहात्याचेंही पथक, आज तीन रोज झाले, चारशें स्वार येथें महेश्वरास आले. तेही उदईक रेवापार झाले. उदईक कूच करून दरमजल सुलतानपुरास जाणार. मागाहून पाराजी दादाजी तेही येणार. सुलतानपुर घेतील. चंदरराव पवारही सुलतानपुरीहून निघायाच्या लागांत आहेत. नंदुरबारचें वर्तमानः–नंदुरबारेजवळ राजश्री गणेशपंत बेहरे दोन हजारां फौजेनशीं पांच चार कोसांवर दाखल झाले आहेत. हजार स्वारांनशीं नित्य येऊन, नंदुरबोरेजवळ बाग आहे तेथें उभे रहात असतात. केसोपंत दातार पलटणासुद्धां नंदुरबोरेंत आहेत. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १५. ता. ७ सप्टबर इ. सन १७८०.

श्रीगजानन. मि० भाद्रपद शु० ९ शके १७०२.

" सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र ७ रमजानपरीयंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहिलें आहेच. सांप्रतचें वर्तमानः– श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत व इंग्रजही जागांजागां छावणीस जेथें आहेत तेथेंच आहेत. खानदेशांत केसोपंत व भास्करपंत दोन पलटणें घेऊन आले आहेत, तितकींच आहेत. होळकराकडील फौज पांच सहाशें येथून मातुश्री अहिल्याबाईनीं कांहीं पाठविली, व सुलतानजी लांबहात्याकडील दोनशें स्वार इंदुरींहून आले, तेही रेवा उतरून गेले. सारे पांच सहाशें जमून सुलतानपुरास मोरचे लाविले आहेत. सुलतानपुरांत चंदरराव पवार मात्र आहे. वरकड दोन्ही पलटणें व दोघे कारकून नंदुरबारेस आहेत. नंदुरबोरेहून सुलतानपुरची कुमक

आतां होत नाहीं. राजश्री गणेशपंत बेहरे यांणीं बहीरबुणगें रनाळ्यांत टाकून, सडे नंदुरबोरेजवळ बागांत येऊन, शह देऊन राहिले होते. त्याजवर नंदुरबारेंत पलटणें आहेत त्यांनीं रतावा केला. दहा वीस घोडीं नेलीं व दोघे भले माणूस धरून नेले, व दहा पांच माणसें गणेशपंताकडील जाया झालीं. उघळून रनाळ्यास गेले. ह्मणून वर्तमान सेंदव्याहून संताजी होळकरांनीं बाईस पत्रीं वर्तमान लिहिलें होतें. बाईनीं तें पत्रच मजला दाखविलें. परंतु बाई ह्मणाली जे, घाटावरील वर्तमान हें आहे. घाटाखालून वर्तमान येईल. तें खरें. परंतु आवाइचेंही वर्तमान येथें जागांजागां आलें आहे. सत्यमिथ्या देव जाणे. गुलजारखानही नंदुरबोरेस जाऊन त्यास भेटला आहे ह्मणून वर्तमान आहे. पाटीलबावांकडील बाळाराव इंदुरींहून निघून इकडे येण्यास एक मजल प्रस्तान केलें आहे. परंतु पाऊसपाणी यामुळें अद्याप येथें आले नाहींत. येथें आलीयावर काय वर्तमान तें कळल्याप्रमाणें सेवेसी लिहीन. मातुश्रीबाईचा श्रावणमास झाला. ब्राह्मणांस दक्षणा देऊन बिदा केलें. आतां भाद्रपद शुद्ध ९ गुरुवारपासून भागवताच्या सप्ताहास प्रारंभ झाला आहे. पौर्णिमेपरीयंत सप्ताह होणार. वरकड वर्तमान यथास्थित असे. कचें पक्कें वर्तमान देखलें ऐकिलें, तें वरचेवर सेवेसीं विदित व्हावें, ह्मणून डाकेबरोबर विनंतीपत्र सेवेसी लिहिलें आहे. डाकवाल्यांनीं सरकारांत पावतें केले ह्मणजे बरें आहे. वर्तमानाकरितां धन्यांनीं येथें ठेवले आहे. कोणीकडूनही वर्तमान स्वामींस पोहंचावें ह्मणून लिहिलें आहे. बाळाराव येथें आलीयावर कासीदजोडी वर्तमान ऐकून (रवाना) करीन. सेवेसी श्रुत होय. सुरतेकडील वर्तमान साहुकाऱ्यांत येथें बोलतात जे, दसरा झालीयावर कोणी मातबर इंग्रज, पोख्त सरंजामानशीं खानदेशांत येणार. अमृतरावही त्याजबरोवर येणार. पाटीलबावाही ग्वालेर वगैरे हिंदुस्थानचा बंदोबस्त करावयास आपणच ग्वालेरीपावतर जावें ह्मणून वदंता आहे. यांत काय अर्थ असतील ते न कळेत. छ मजकूर संध्याकाळीं पत्र दरबारांत आलें कीं, बाळाराव चंद्र १० रोजीं येथें दाखल होणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १६. ता. १४ सप्टंबर इ. स. १७८०.

श्रीगजानन. मि. भाद्रपद शु० ९ शके १७०२.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १४ रमजानपर्यंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजी विनंतीपत्रीं लिहून, सेवेसी डाकेबरोबर दोन पत्रें

पाठविलीं आहेत. तीं पावलीं न पावलीं हें नकळे. सांप्रत इकडील वर्तमानः— राजश्री बाळाराव व शिवाजी नारायण पहिले येथें होते ते, छ ११ मिनहूस दोन-प्रहरां येथें दाखल झाले. वाड्यांत श्रीभागवताचा सप्ता झाला. पुराणांतच बाई बसली होती, मीही तेथेंच होतों. तेथें आधीं शिवाजी नारायण येऊन बाईस सांगितलें जे, बाळागयांचे भेटीचे मुहूर्त दोन प्रहरांत आहे, आज्ञा होईल तर येतील. बाईनें सांगितलें जे, येऊ द्या. त्यास शिवाजी नारायण जाऊन बाळारायांस घेऊन आले. बाळारायांनीं येऊन मुजरा केला. पांच मोहरा नजर ठेविल्या, व एक शालजोडी व चोळीपातळ पैठणी पुढें ठेविलें. लालाजी बल्लाळ ह्मणून पाटीलबावांकडील व चकोट्याचा मामलेदार शेणवाई आहे, मातबर मनुष्य. तेही बाळारायांबरोबर पाटीलबावानी पाठविले आहेत. त्यांनींही अनुक्रमेंच नजर केली. सहा घटका बसले. पुराण झालियावर दोन घटका बसले. आगतस्वागत विचारलें. तदोत्तर विडे दिले. महेश्वरचे पश्चिमेस अंबराईमध्यें उतरले आहेत. तेथें बिराडास गेले. बाईनीं एक थोर डेरा व दोन तीन राहुट्या पाठविल्या. मेजवानी दोशां लोकांची पाठविली. दोनशें स्वार त्यांजबरोबर आले आहेत. बाळारायांच्या शरीरास शूळाचा उपद्रव आहे, याज-करितां त्यांचें कुटुंब व सासू समागमेंच आहेत. सात दिवसपर्यंत भागवत-पारायण जालें. पौर्णिमेस समाप्त झालें. दानधर्म यथास्थित बाईनीं केला. पांच भागवताचीं पुस्तकें दान ब्राह्मणांस दिलीं. दोनदोनशें रुपये दक्षणा दरपुस्त-कावर, व पांच ब्राह्मणांस, पांच शालजोड्या पागोटीं, व पारायणें करणारांस दोनशें रुपये दक्षणा, वस्त्रें, याप्रमाणें देऊन, काल पौर्णिमेस समाप्त झालें. आतां बाळा-रायांशीं काय बोलणें तें बोलतील. लहान मोठा शोध करितां, ऐकिण्यांत आलें आहे कीं, हिंदुस्थानांत गडबड फार झाली आहे. यास्तव, उभयतां सरदारांतून एकांनीं हिंदुस्थानांत जावें, तिकडील बंदोबस्त करून उभयतांच्याही मुलकाचा अंमल बसवून, सुबेत्यानें (सुबत्तेनें) चालेसें करावें. एकांनीं हुजूर चाकरीस देशांत असावें. असा विचार पाटीलबावांनींच आपले जागा करून पुण्यास पत्रें लिहिलीं आहेत. तेथून जशी आज्ञा येईल, त्याप्रमाणें कर्तव्य तें करावें. असें वर्तमान ऐकिलें आहे. दोनचार दिवस झाले, बाईही मजशीं बोलत होती जे, शिंद्यानें आपले जागां विचार केला आहे जे, हिंदुस्थानांत रांगड्यांनीं गडबड केली आहे; ठाणीं उठविलीं आहेत; यास्तव आपली फौज हिंदुस्थानांत पाठवावी आणि आपणही हळू हळू तिकडेच जावें; आणि आमची फौजसुद्धां आह्मीं चाकरीस देशीं हुजूर असावें अशी यांनीं मसलत केली आहे. हे गोष्ट आह्मांस

अनुकूल पडणार नाहीं. असें झाल्यास आमची सोय नाहीं. बरें. श्रीमंत काय सलाह त्यांस लिहून पाठवितात, पाहावें. असें बोलत होती. बाळारावही पाटीलबावांशीं कांहीं खंडित बोलणीं बोलले. ते समयीं पाटीलबावांनीं बाळारायांस सांगितलें जे, महेश्वरापासून उज्जनीपर्यंत डांक बसवा. नित्यचें बोलणें जें होत जाईल, तें वरचेवर लिहून पाठवीत जावें. येथून सलाह मसलत जशी लिहून पाठवूं, त्याप्रमाणें तेथें बोलत जावें. याप्रमाणें पाटीलबावांनीं यांस सांगितलें आहे. येथून डांक बसविणार असें ऐकिलें वर्तमान सेवेशीं श्रुत होय. राजश्री तुकोजी बावांसही खंडित बोलून कांहीं आले आहेत ह्मणून ऐकिलें. काय....खानदेशांतील वर्तमान काल बाईस पत्रें तिकडे सरकारी गेलें होतें, त्यांनीं लिहिलीं होतीं जे, सुलतानपुराजवळ होळकराची फौज चार पांचशें जमा झाली आहे. सुलतानपुरास वेढा घातला आहे. गोळागोळी नित्य होतच आहे. आतां वाघांचे पथक पांचशें स्वार आले आहेत. सामान चांगलें आहे. तेही रेवा उतरले. उद्यां परवां त्यांचेंही कूच होऊन खानदेशांत जातील. सरंजामीं वाघ व बुळे व दोन तीन पागा असे तेथ गेले आहेत. आतां हे फौज गेल्यावर काय करतील पहावें. चंदरराव पवार सुलतानपुरांत शंभर स्वार व चारशें पायदळ इतक्यानशीं आहेत. नंदुरबारेस दोन पलटणें सुद्धां केसोपंत दातार व भास्करपंत असे आहेत. नंदुरबारेस सात दरबाजे आहेत, त्यांपैकी एक दरवाजा खुला ठेविला आहे, व वरकड दरवाजे बंद करून आपले मुस्तकिमींत आहेत. रात बिरात चौकी पहाऱ्यांचा बंदोबस्त करून आहेत. राजेश्री गणेशपंत बेहरे दोन हजार फौजेनिशीं बाहिरबुणगे रनाळ्यांत टाकून, सडे दीड हजार फौजेनिशीं तलाव्यास नंदुरबारेजवळ आले होते. त्यास दातार मजकुरांनीं त्यांजवर छापा पाठविला. तेही सावधच होते. उभयपक्षी गोळागोळी होऊन हे नंदुरबारेस आले व गणेशपंत रनाळ्यास गेले. तेथेंच आतां आहेत. आतां तलाव्यास येत नाहींत. ह्मणून येथें लिहिणें आलें होतें. खानदेशांत होळकराची फौजही उतरत चालली व गणेशपंतही आले आहेत. आणखीही फौज येईल. यास्तव केसोपंत दातारानें सुरतेस पत्रें पाठविलीं. तेथून तीन पलटणें कुमकेस रवाना झालीं. ह्मणून वर्तमान आलें आहे. गुलजारखानास व भिल्लांस अभयपत्रें सरकारचीं यावीं ह्मणून विनंती लिहिली होती. त्या गोष्टीस फार दिवस लागले. आतां दोन्हीही अभयपत्रें येथें आलीं. येथें गुलजारखानाचा शोध केला. तो इतके दिवस त्यानें वाट पाहिली. केसोपंत दातारानेंही कांहीं त्याचा बुद्धिभ्रंश केला. त्यामुळें गुलजारखान सुरतेस श्रीमंत दादासाहेबांकडे गेला आहे. भिल्लांचे, बाई ह्मणाली

जें पाहून पाहून सोईस येईल, तसें करूं. हरकूबाईच्याही पागा बाईनीं सुलतानपुराकडे पाठवितात. येथील लहानमोठा मजकूर दोनीं पत्रीं पेशजीं लिहिला होता. त्याचीं उत्तरें यावीं. तें मनन करून बाळारायांसीं त्या अन्वयें काय बोलणें तें बोलावें, अशी येथील उत्कंठा फार होती. मजलाही दहा पांच वेळां विचारलें होतें जे, त्या पत्रांचीं उत्तरें कांहीं आलीं कीं काय? तें अद्याप कांहीं आलीं नाहींत. सांप्रत उज्जनीकडील बोलण्याचाही प्रसंग पडला आहे. मजलाही पहिलेसारखे कांहीं विचारीत नाहींत. राजश्री यशवंतराव गंगाधर यांचे विद्यमानें कांहीं सरकारचीं पत्रें येथें आलीं असलीं तर न कळे.

जाबसालांत आल्यास बरीक मोठें वर्तमान चहूंकडील कळतें. लोकांस कोठवर पुसावें? तें खरें कशावरून? अलीकडे सरकारचीं पत्रेंही येत नाहींत. येथीलही आस्था आह्मांशीं समयानरूपच आहे. कागदींपत्रीं शिलसिला असल्यास हर कांहीं वर्तमान बोलण्यांत येतें, असें आहे. स्वामीही जें कर्तव्य तें विचारूनच करितात. सेवकाची खर्चाची फारच विपत्य आहे. त्रिंबकराव मोरेश्वर यांजवर चिठ्ठी पाठविल्यास सात आठ महिने झाले. दोनशें रुपये येथें लोकांचें देणें झालें. प्रवासाचा खर्च. स्वामी सर्वज्ञ. बारीक मोठीं पत्रें पेशजीं लिहिलीं आहेत. तें फाडून टाकणें ह्मणून पेशजी आज्ञा आली होती. त्याप्रमाणें एक पत्र होतें तें फाडून टाकिलें. आणी सेवेसींही लिहिलें होतें जे, आज्ञेप्रमाणें एकांतींचें पत्र फाडून टाकिलें. सांप्रत चिरंजीवानें लिहिलें जे, श्रीमंतांची आज्ञा अशी झाली आहे. त्यास पहिलेंच फाडून टाकिलें. श्रुत होय. हे डांकेचीं पत्रें सेवेसीं पावतात कीं नाहीं. डाकवाल्यास ताकीद झाली तर आलेलें वर्तमान वरचेवर लिहून, कितीक काशिदाबरोबर लिहिणें तें मुजरद जोडी रवाना करीत जाईन. तेथूनही वरचेवर जोडी येत असावी हे विज्ञप्ति."

लेखांक १७. ता. १७ सप्टबर इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि. भाद्रपद शु० १२ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र ११ रमजानपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील व श्रीमंत दादासाहेबाकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून, कासीदजोडीबरोबर व डांकेबरोबर सेवेसी पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वृत्तः–श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत. कलकत्त्याकडे इंग्रजांचीं पत्रें व श्रीमंतांचीं पत्रें गेलीं आहेत. येथून उत्तरें आल्यावर काय

पुढें मसलत होणें ती होईल. प्रस्तुत तर स्तिंवित मसलत पडली आहे. इंग्रज, खर्चावेंचासही मानसिकच, खासगी खर्चापुरतें देतात. खर्चाची तारंबळ फार आहे. हजार दीड हजार फौज श्रीमंतांजवळ आहे, व दोन हजार पायदळ. तेंही, कांहीं लोकांनिशीं राजाराम गोविंद आमदाबादेकडे गेले होते, ते वाटेनें, गायकवाडानें कांहीं त्यांचा परामर्ष केला--लुटलें गेलें. तेंही उरल्या सरंजामानिशीं सुरतेस आलें. सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई बडोद्यास जाणार आहेत. सबब की, गायकवाडांनीं आपले पक्षीं असावें. त्यांस गायकवाडांचा निश्चय श्रीमंतचरणारविंदीं पुरता खचित दिसून आल्यास, कांहीं खर्चास तरी मागावें. या अर्थीं बाई बडोद्यास जाणार ह्मणून वर्तमान बाजारी आहे. सत्य मिथ्या देव जाणे. प्रस्तुत छ १२ मिनहूस तीनशें आरब, कांहीं त्यांत गाडदी व रजपूत ऐसे मिळून, तीनशें आहेत. परंतु माणूस चांगले आहेत. ते महेश्वरास आले आहेत. समागमें एक बाळाजीपंत नामें कारकूनही आहे. त्यास शोध करितां, ते बोलतात की, आह्मी बडोद्याहून आलों. उमेदवार नोकरीचे आहों. ऐकल्यांत असें आलें आहे की, गायकवाडांजवळ कांहीं गाडदी लोक होते. त्यांनीं कांहीं दादासाहेबांकडे फितूर केला होता. यास्तव गायकवाडांनीं गाडदी सोरेच दूर केले, असें ऐकिलें होतें. तें पेशजी विनंतीपत्रीं लिहिलें होतें. त्यांपैकी हे असले तर न कळेत. दुसरें ऐकतों जे, दादासाहेबांकडे लोक होते त्यांस खर्चावेंचास पावत नाहीं, यास्तव त्यांनीं निरोप दिला. सबब हे उमेदवारीनें येथें आले आहेत. ते तों चाकरीचे उमेदवारच असें बोलतात. तिसरें वर्तमान, बारीकपणें शोधास बाळंभट राहोरकर लाविला आहे. त्याच्या शोधांत आलें आहे की, श्रीमंत दादासाहेबांकडील कारकून व हे आरब सुरतेहून येथें आले आहेत. होळकराकडून पहिलें दादासाहेबांस पंचवीस हजार रुपये देविले होते. त्यांपैकीं दहा हजार यांनी हरी बावाजीच्या मन्वंतरांत दिले आहेत. बाकीचे पंधरा हजार देणें. त्यास ते सरकारांतून यांस मना केले आहेत. त्या ऐवजासाठीं कारकून व गाडदी हे आले आहेत. येथील व या प्रांतांतील बळाबळ पहावें, व सरदार इकडील, फुटफटी जागां जागां कारकून व हुजरे इकडे आहेतच, तेही शोध करावा, शकटभेद करून एखादी मसलत बळवावी, याही अर्थांत आहेत, ह्मणूनही ऐकितों. हें ऐकलें वर्तमान अहल्याबाईस सांगितलें. त्यांनींही आपले कारकून त्या आरबांकडे पाठविले जे, तुह्मी येथें राहूं नका. आह्मी कोणास चाकरीस ठेवीत नाहीं. आह्मांस माणसें ठेवायाची प्रस्तुत दरकार नाहीं. तुह्मीं येथून निघून जाणें. त्यांनींही सांगितलें जे आह्मीं पांघरुणें धुऊं टाकलीं

आहेत, तीं आलीं म्हणजे जाऊं असें बोलले आहेत. बाळाजीपंत कारकून व आरबांचे सरदार, त्यांचें बोलणें हेंही आहे कीं, श्रीमंत दादासाहेबांचा व इंग्रजांचा इमान प्रमाण पटला. दक्षिणेवर मसलत बळवावी (यासाठीं) दादासाहेबांचा पक्ष इंग्रजांनीं निश्चयपूर्वक धरला. इंग्रजांनीं दादासाहेबांबरोबर सात पलटणें व दोन हजार स्वार व तोफखाना देऊन, शंभर गोरा हमराह करून, दादासाहेब भडोचेस आले. मराठी फौज असावी या अर्थी आह्मी पुढें आलों आहों. मागाहून हजार गाडदी व चार तोफा तेही येतात. प्रस्तुत इकडे पुण्याकडील कोणी (अपूर्ण).''

लेखांक १८. ता. २२ सप्टेंबर इ. स. १७८०.

श्रीगजानन. मि. भाद्रपद वद्य ९ शके १७०२.

''सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २२ रमजानपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वृत्तांतः–श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत. इंग्रज जागां जागां छावणीस आहेत. उभयतां सरदार आपलाले जागां आहेत. पाटीलबावांनीं बाळारावजीस इकडे मातुश्री बाईकडेस पाठविलें. ते इंदुराहून तुकोजीबावांचीही भेट घेऊन, त्यांशींही कांहीं बोलून इकडे आले. येथें छ ११ मिनहूस दोप्रहरां आले. वाड्यांत बाईचे भेटीस आले. पुराण होत होतें ते समयींच भेट झाली. त्यांनीं नजर केली. तें वर्तमान पेशजीं पत्रीं डांकेबरोबर विनंतीपत्रीं लिहून सेवेसीं पाठविलें आहे. बाळारायांबरोबर लालाजी बल्लाळ म्हणून मातबर मनुष्य, तेही पाटीलबावांनीं समागमें दिले आहेत. त्यास इतक्या दिवसांत, दोन वेळां बाईची व बाळारायांची चार चार घटका बैठक एकांतीं झाली. त्यास पाटीलबावांची आज्ञा की, बाळाराव व लालाजी बल्लाळ व शिवाजी नारायण असे त्रिवर्ग मिळून बाईशीं बोलावें. त्यास दोन वेळां एकांत झाला. ते बाळाराव व शिवाजी नारायण उभयतां आले. त्यांपैकीं बाळाराव एकलेच बाईशीं बोलूं लागले. बोलण्यांत बहुतकरून तुकोजीबावांच्या मतलबानुरूप बोलणें बोलूं लागले. बाईनींही उत्तरें समर्पकच केलीं. थोडासा बाईस संदेह वाटला जे, शिवाजी नारायण येथें दीड वरीस आह्मांजवळ आहेत; त्यांस कितीक जाबसालांची माहितगिरी. येथील माहितगिरीनें तेथें पाटीलबावांशीं बोलले असतील. ते अन्वय या बोलण्यांत कांहींच दिसून येत नाहींत. तेव्हां अलीकडील इंदूरचें बोलणें हें आहे. असो. हे पेंडीचीं गुरें आहेत. तुकोजीबावांनीं कांहीं लालुच दाख-

विली असेल, त्या अन्वयें बोलतात. शिवाजी नारायण यांस बाईनीं एकांतीं विचारलें. तेही ह्मणाले जे, तुकोजीबावा यांचा एकांत चार पांच दिवस झाला आहे. बरें, पुढें काय बोलतात तें मनन करून, पाटीलबावांस लिहिणें तें लिहून पाठवूं. असें शिवाजी नारायण बाईशीं बोलले. प्रस्तुत बाळाराय यांस शुळाचे व्यथेनें फार हैराण केलें आहे. पांच सात दिवस दरबारास आले नाहींत. याप्रमाणें वर्तमान हें बाहेर ऐकिलें. केवळ सत्य नव्हे. बाईस मीं एकांतीं विचारलें जे, बाळाराव आल्याचें वर्तमान अद्याप मीं श्रीमंतांस कांहींच लिहिलें नाहीं. काशिदजोडी रवाना करावयाची काय आज्ञा? त्यास बाईनीं उत्तर केलें जे, आतांच जोडी रवाना करूं नका. यांचें आमचं बोलणें काय होतें, तें मनन करून मी सांगेन; तेव्हां जोडी रवाना करा. असें बाईनीं मजला सांगितलें आहे. दुसरें बोलली जे, पहिलीं पत्रें तुमचीं श्रीमंतांस दोन चार गेलीं, त्यांचें उत्तर कांहीं अद्याप आलें नाहीं. तेव्हां मीं उत्तर केलें जे, दोन जोड्या तेथें आहेत. आठां चौं दिवसांतही उत्तरें येतील. बाई बोलली जे, लवकर कोणतें यावें, आणि सुस्तीनें कोणतें यावें, हा विचार धन्यास कारभार करणारास असावा. तेथूनच ते लवकर लिहीनात, तर तुह्मी काय कराल? गुलजारखानाचा मजकूर लिहिला कधीं, आणि उत्तरें आलीं कधीं? ते भिल्लांत राहणार, रानवट. त्यांनीं महिना दीड महिना वाट पाहिली. त्यास भरंवसा पुरेना; तो निघून दादासाहेबांकडे गेला. आतां त्यास पत्र आलें! आतां काय करावें? आह्मांकडे मात्र शब्द! तुह्मीं असें लिहिलें त्याजवरून सरकारनें पत्रें पाठविलीं ह्मणतील, परंतु कोणतेंही कार्य समयावर आहे? असो ते धनी. त्यास अशीं किती कामें? एवढें हें एकच नाहीं. कोणतेही वेळेस त्यांचें उत्तर अगर कागद जो येईल, तो सेल शब्दच मानावा. याप्रमाणें बोलली. पेशजीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ती उत्तरें अद्याप आलीं नाहींत. त्या उत्तरांच्या अन्वयें यांसीं बोलावें (लागतें). सरकारचीं उत्तरें कायममिजाजीचीं आलीं तर यांसीं ठांसूनच बोलावें. अशींच आलीं तर कळेल तसा समय गांठावा. पुढें पाहातच आहेत. असें येथील मानस. येथून पाठविल्या पत्रास एके जोडीस दीड महिना झाला. एक जोडीस सव्वा महिना झाला. अद्याप काय तें आज्ञापत्र आलें नाहीं. येथून डांक बसलियावर सहा पत्रें मीं लिहून पाठविलीं. डांकवाले काशीद नेईनात. जोरावारीनें सरकारचीं पत्रें डांकेच्या काशिदांजवळ दिलीं. त्या पत्रांचीं उत्तरें अद्याप आलीं नाहींत. त्यावरून वाटतें जे, डांकेचीं सेवकाचीं विनंतीपत्रें स्वामींस पावलीं नाहींत. येथें देखलें ऐकिलें कच्चें पक्कें, वर्तमान वरचेवर धन्यास कळत असावें ह्मणून लिहितों. न पावें तर माझा

उपाय काय? खानदेशांतील वर्तमानः–सुलतानपुरास होळकराकडील लोकांचे मोर्चे आहेत. वरचेवर येथून हे पथकें रवाना करीतच आहेत. बुळे व मकाजी गिते व महादजी होळकर व बारगळ हे चारशें लोक बाईनीं येथून रवाना केले. इंदुरींहून वाघाचें पथक चारशें व वाघमारे दोनशें असे येथें आले. तेही रेवा उतरून पार गेले. वाघ तों छ १७ रोजीं पलीकडून कूच करून गेले. वाघमारे छ २० रोजीं कूच करून गेले. चिमाजी बुळ्याचें पत्र सुलतानपुरीहून बाईस आलें होतें. छ १४ मिनहूचें पत्र छ १६ रोजीं दोन प्रहरां येथें आलें. त्यांत मजकूर होता जे, नंदुरबारेहून पांचशें स्वार, पांच पलटणांतील माणसें पायाचीं हत्यारबंद ३०० असे केसोपंत दातारानें सुलतानपुरचे मदतीस नंदुरबारेहून रवाना केलीं आहेत. तापी उतरून येणार. यास्तव चिमाजी बुळ्यानें लिहिलें होतें जे, आपण व मकाजी गिते व बारगळ ऐसे तीनशां लोकांनशीं तापी तीरास त्यांच्या उपरांत त्यांच्या तोंडावर गेलों. दोनशां लोकांनशीं महादजी होळकर सुलतानपूरच्या शहावर आहेत. आणीक फौज पाठवा ह्मणून पत्रें आलीं होतीं. छ १९ रोजी पत्र महादजी होळकराचें आलें जे, राजश्री गणेशपंत बेहरे रनाळ्याजवळ आहेत. त्यासही पत्रे पाठविलीं आहेत कीं, तुह्मी इकडे सुलतानपुरास येऊन आह्मांस सामील होणें; अगर नंदुरबारेहून इकडे त्यांचे लोक येतात, त्यांस मधें अटकाव तरी करणें. ह्मणून पत्रे लिहिलीं. परंतु ते रनाळें सोडून बाहेर निघत नाहींत. दुसरें वर्तमान त्यांनीं लिहिलें जे, केसोपंतानें सुरतेस पत्रें लिहून सहा पलटणें कुमकेस आणविलीं. त्यांपैकीं तीन पलटणें नवापुऱ्यास आलीं ह्मणून वर्तमान आहे. सत्य मिथ्य देव जाणे. मागून आणखीही तीन पलटणें गुलजारखान घेऊन येत आहे. विजयादशमीचे मुहूर्तें राजश्री अमृतराव पोरुत सामानानशीं खानदेशांत येणार. याप्रमाणें पत्रीं वर्तमान लिहिलें आहे. जागां जागां बाजारी वर्तमानही हेच आहे कीं, पलटणे कुमकेस नवापुरास आलीं. अशी गडबड इकडे आहे. रयतीपासून मनास येईल तसें लुटून पैका घेतात. खानदेशांत कांहीं रयतीस सुख नाहीं. असें वर्तमान वरचेवर येतें. राजश्री पांडुरंग शंकर इंदुरींहून येथें आल्यास दीड दोन महिने झाले आहेत. बाईनीं ठेवून घेतले आहेत, कीं बाळाराव येथें आल्यावर काय भाषण होईल, त्याप्रमाणें मशारनिल्हेची रवानगी इंदुराकडे करतील. एका दोन दिवसां बाईचें व बाळारायांचें भाषण काय होईल ते कळवून घेऊन, मागाहून काशिदजोडी रवाना करीन. सेवकाची खर्चाची फार तसदी आहे. कृपा करणार धनी समर्थ. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १९. ता० १० अक्टोबर इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि० आश्विन शु० १२ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ११ सवालपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं डांकेबरोबर आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. आज्ञा कीं, राजश्री बाळाराव तेथें आले आहेत; त्यांचें व मातुश्री अहिल्याबाईचें बोलणें काय निश्चय ठरेल, तो लिहून पाठविणें. त्यास प्रस्तुत ठरलें आहे कीं, राजश्री नारो गणेश व सुलतानजी लांवहाते उभयतांनीं यावें. बाळारावांचे विद्यमानें बाईच्या भेटी कराव्या. कितीक बोलणीं गृहकृत्यांचीं बाईचीं व त्या उभयतांचीं मशारनिल्हेच्या विद्यमानें व्हावीं. यांचें त्यांचें रहस्य झालें ह्मणजे तुकोजी होळकरांस बोलवावें, याप्रमाणें निश्चय ठरला आहे. याप्रमाणें निश्चय करून, कृष्णाजी आंबादास पाटीलबावांकडून आले होते ते, व कुशावा ह्मणून गृहस्थ, नारो गणेश यांजकडील, बाळारायांबरोबर आले होते ते, ऐसे उभयतांसी निश्चयाच्या बोलण्याचा मथितार्थ सविस्तर उभयतां कारकुनांस बाळारायांनीं सांगून, पाटीलबावांकडे उज्जनीस छ ९ मिनहूस रवाना केले. त्यांस सांगितलें जे, तुह्मी तीन दिवसांनीं उज्जनीस जाऊन, हे सविस्तर वर्तमान, पाटीलबावांस एकांती निवेदन करून पाटीलबावांचें पत्र इंदुरच्या उभयतांस घेऊन येऊन, त्यांस सारें समजावून व पाटीलबावांच्या बोलण्याचे व येथील बोलण्याचे अर्थ सविस्तर समजावून, नारो गणेश व सुलतानजी लांवहाते यांस लवकर येथें घेऊन येणें. असे सांगून उभयतां कारकून उज्जनीस पाठविले. याप्रमाणें येथील वर्तमान पेशजी काशीदजोडीबरोबर चंद्र ६ मिनहूस विनंतीपत्रें येथून रवाना केलीं आहेत. पावतील. अलीकडे खानदेशचें वर्तमान सुलतानपुराभंवतालीं हजार आठशें फौज होळकराची जमा झाली आहे. नित्य धेगा भवताला करितात. परंतु अद्याप सुलतानपूर जेर नाही. नंदुरबारेंत केसो कृष्ण आहेच. कांहीं कुमकही त्यांनीं सुलतानपुरांत पोंहोंचाविली. राजश्री गणेशपंत बेहरे रनाळ्यापलीकडे पांच कोस आहेत ह्मणून एक वर्तमान. दुसरें ऐकिले जे, सरकारची फौज कांहीं पुण्याहून रवाना झाली, ते गणेशपंतांकडे आली. गणेशपंतांसी व केसो कृष्ण यांसीं नंदुरबोरजवळ लढाई झाली. उभयतांही बरोबरीच राहिले. असें वर्तमान ऐकिलें. परंतु हें बाजारी वर्तमान. सत्य मिथ्या देव जाणे. श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत. गाडर ह्मणून इंग्रेज मुंबईस गेला आहे. तो आला असला तर विजयादशमीचे मुहूर्तें दादासाहेब बाहेर निघणार. कांहीं

पलटणेंही पुढें खानदेशांत व पायागडचे सुमारें व कोंडाईबारीकडे रवाना करणार. असें वर्तमान आहे. पायागडाकडून माळव्यांत पलटणें आलीं, तर उभयतां सरदारांचें देशीं येणें कळतच आहे. हिंदुस्थानांत पातशाहाकडून नजाबतखान पंचवीस तीस हजार फौजेनशीं, रणथंबोर किल्याजवळ खांसा वीस हजार फौजेनशीं, आहे. दहा हजार फौज जयपुरच्या मुलखांत आली आहे. त्यांनीं, उभयतां सरदारांचीं ठाणीं पांच सहा होतीं, तीं जयपुरवाल्यानें घेतलीं. जयपुरवाल्याचे बत्तीस परगणे तुर्कांनीं घेतले. जयपुरापासून बारा कोसांवर तुरकांचीं ठाणीं बसलीं आहेत, व जागीरदारांखालीं चवदा परगणे व गनीमांचे दोन एकूण अठ्ठेचाळीस गेले. बाकी खालसा चार राहिले आहेत. एकूण बावन परगण्यांचा झाडा जयपुरचा. जयपुरचा राजा जातीनें नाचतो. शिंपी कारभारी आहे. मारवाडचा राजा धार्मिक व बंदोबस्तही त्याचा चांगला आहे. वरकड वर्तमान यथास्थित असे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञप्ति."

लेखांक २०. ता० १५ आक्टोबर इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि० आश्विन वा॥ २ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ १६ सवालपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. काल छ १५ मिनहूस, मातुश्री अहिल्याबाईस विचारून मी राजश्री बाळाराव गोविंद यांचे भेटीस गेलों होतों. भेट झाली. त्यांनींही श्रीमंतांचें व आपले कुशलतेचें वर्तमान व फौजफांड्याचें वगैरे वर्तमान विचारिलें, तें सांगितलें. मीं त्यांस विचारिलें जे, आपणांस येथें दिपवाळी होईल कीं काय? त्यास मशारनिल्हे बोलले कीं, इतके दिवस लागणार नाहींत. आह्मी एक पत्रावर आणून ठेविली आहे. राजश्री पाटीलबावांकडे पत्रें देऊन कृष्णाजी आंबादास कारकून पाठविले आहेत. त्याचें तेथून उत्तर आलें ह्मणजे मातुश्रीपुढें येऊन, आह्मीं निरोप घेऊन जाऊं. मी बोललों कीं, आपण यश घेऊनच जातील. ते बोलले जे, यश घेऊन जायाचीच उमेद होती; परंतु येथील व इंदुराकडील उभय पक्षींही ओढक कारभार फार. यासी हार कोणीं यावें? जितकी पाटीलबावांची आज्ञा येईल तितका जाबसाल करावा. अधिकोत्तर खोल पाण्यांत शिरायाचा आमचा सांप्रदाय नाहीं. इतकें श्रीमंतांसही विदित आहे. असें बोलले. मी तेथून उठून दरबारास बाईकडे रात्रौ गेलों. सहा घटका रात्र झाली होती. तों उज्जनीहून बाळारायांस पाटीलबावांचें पत्र साता प्रहरांत आलें. तें त्यांनीं वाचून तें पत्रच

बाईकडे बाळारायांनीं पाठविलें. तें बाईनीं एकांतीं वाचून पाहून, मजलाही एकांतीं तेथें बोलावून, तें पत्र मजजवळ दिलें. मनांतच वाचून पहा ह्मणाली. मीं पत्र वाचिलें. त्यांत मजकूर होता जे, चिंतो विठ्ठल पळून गेले होते, ते उज्जनींतच एका ब्राह्मणाचे घरीं लपून राहिले होते. गांवांत शोध करितां छ १४ रोजीं सांपडले. आतां त्यांस अलंकारभूषणें घालून, त्यांस व आणीख तिघांस ऐसें पुण्यास लवकरीच रवाना करितों. तुह्मींही तेथील जाबसाल उरकून मातुश्रीचे मर्जीप्रमाणें उरकून लवकर येणें. ह्मणून त्या पत्रांत मजकूर होता. बाईही बोलली जे, एवढा मातबर माणूस, पळायाचे नवतें. आतां गोष्ट भारी पडेल. असें बाई बोलली. वरकड इंदुरच्या व यांच्या भानगडीचा मजकूर स्तिबित दिसतो. येथें बाईचें बोलणें तरटणीचें फार आहे. तेथें नारो गणेश आहेत. त्यांचीही ऐट फार आहे. पहावे, काय इत्यर्थ ठरेल तो. कळल्याप्रमाणें सेवेसीं लिहीन. बाईही हमेश मजशीं बोलतात जे, निश्चय ठरेल तेव्हां तुह्मांस सांगूं; त्याप्रमाणें तुह्मी लिहून पाठवा. इतका जाबसाल बोलत असतात. हरएक गोष्ट तायीं बसेल असा रंग दिसत नाहीं. दुरापास्त मसलत दिसती. वरकड वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहिलें आहे. सेवकाची खर्चाची विपत्ति फार आहे. लटकें लिहीत असेन तर स्वामींच्या पायांची शपथ. अडीचशें रुपये लोकांचें देणें ह्मालें आहे. पुढें खर्चास पाहिजे. धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक २१. ता० १८ आक्टोबर इ.स. १७८०.

पैवस्ती छ २९ सवाल. **श्रीगजानन.** मि० अश्विन वद्य ५ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन सांष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ सवालपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान पेशजी विनंतीपत्रीं काशीद जोडीबरोबर व डांकेबरोबर लिहिलें आहे. सेवेसीं पावलें असेल. प्रस्तुत येथील वर्तमानः—राजश्री पाटीलबावांकडून राजश्री बाळाराव येथें मध्यस्थीस आले आहेत. त्यास बाईशीं बाळाराव दोन तीन वेळां एकांतीं बोलेल. त्या बोलण्यांत तुकोजीबावांचे व नारो गणेश यांचे भक्तिपुरस्कर भाव बोलूं लागले. त्यावरून बाईस संशय पडला. त्यास बाईनीं एकांतीं पाटीलबावांस पत्र पाठविलें. त्या पत्रावरून पाटीलबावांनीं तेथून कृष्णाजी आंबाजी कारकून बाईकडेस पाठविला. ते येथें येऊन बाईशीं एकांती बोलले, व बाळारायांबरोबरही बाईकडे येऊन बहुमानी बोलणें बोलले. एकांतींही बोलून गेले. तें कुपिया बाळारायांसही कळलें.

हे वर्तमान इंदुरीही कोणे द्वारें कळले. हें वर्तमान पेशजीं एक दोन विनंतिपत्रीं लिहिलें आहे. त्यास, इंदुरीं उभयतांस संशय पडला कीं, बाईचें व पाटीलबावांचें अंतरंग एक आहे. त्यावरून बाईची व त्यांची चित्तशुद्धी होण्यांत उभयपक्षीं संशय आले. त्यावरून बाईचें व त्यांचें चित्त शुद्ध होऊन भेटी होतील, असा रंग दिसत नाहीं. इंदुरींहून तुकोजी होळकर व नारो गणेश यांनीं आपल्याकडील कारकून यमाजी मोरेश्वर पाटीलबावांकडेस पाठविले. त्यांबरोबर पत्रेंही बहुत ममतापुरस्कर लिहिलीं. तीं पत्रें मशारनिल्हेनीं एकांतीं पाटीलबावांस निवेदन केलीं, व मुखोक्तीं कितीक जाबसाल यांनीं सांगून पाठविले, त्याप्रमाणें ते कारकून बोलला. त्यावरून पाटीलबावांनी आपला कारकून बेलभंडार देऊन इंदुरास यांच्या कारकुनाबरोबर पाठविला. बहुत समाधान या उभयतांचें केलें. उभयपक्षीं बेलभंडार, आणशपथ झाली कीं, आह्मांवांचून तुह्मीं कोठें जाऊं नये. तुह्मांवांचून आह्मीं कोठें जाऊं नये. याप्रमाणें खचित झालें. पाटीलबावांकडील कारकून बोलला जे, पाटीलबावांनीं आणिक कांहीं बोलावयास सांगितलें आहे काय, की पुण्याहून श्रीमंतांनीं नारो शिवदेव पाठविले आहेत. हे नित्य ह्मणतात कीं, फौजेसुद्धां पुण्यास चला. त्यास आपण चार पांच वर्षें देशीं होतों. तेव्हां काय अधिकोत्तर त्यांनीं केलें? आतां आह्मीं जाऊन काय करावयाचें आहे? हिकडे हिंदुस्थान हातांचें गेलें. त्यास देशीं आपलें जायाचें कारण कांहीं नाहीं. परिछिन्न कारभाऱ्यांस सांगून पाठवावें की, हिंदुस्थानांत जायाची निकड फार आहे. यास्तव नर्मदेअलीकडे हिंदुस्थानचा बंदोबस्त आह्मी उभयतां करितों; आणि नर्मदेपलीकडे दक्षिणेचा बंदोबस्त तुह्मी करा. नाहीं तर इकडील बंदोबस्त तुह्मी करा, तिकडील दक्षणेचा बंदोबस्तही आह्मी करतों. श्रीमंत रावसाहेबांसही सांभाळितों. कोणतें पुरवेल तें करा. फौज पाठवा ह्मणाल तर किती फौज पाहिजे ते पाठवूं. फौजेस खर्चास तुह्मी द्या. याप्रमाणें नारो शिवदेवासीं आह्मी बोलून पुण्याकडे रवाना करितों. तुह्मीही त्यांसीं असेंच बोला. येविषयीं तुमचें मानस काय तें पक्केपणें लिहून पाठवा. इंदुरींहून उभयतांनीं इमानपुरस्कर सांगून पाठविलें जे, तुह्मी आह्मी पूर्वीपासून एकदील आहों. तुह्मीं जे मसलत केली, ते आह्मांस अवश्यक; आह्मीं केलें ते तुह्मांस अगत्य. नारो शिवदेवांसीं आह्मीही असेंच बोलूं. त्याप्रमाणें उभयतां सरदारांची बोलणीं झालीं. हे बातमी हरकूबाईकडे आली. त्यांनीं एकांतीं हें वर्तमान मजला सांगितलें. दुसरेंही वर्तमान हरकूबाईनेंच सांगितलें जे, दिल्लीहून पातशहाचीं पत्रें शिंदे होळकरांस व अहल्याबाईस ऐशीं पत्रें आलीं. त्यास अहिल्याबाईकडे काल छ १७ सवालीं पातशहाचें पत्र आलें. तें तृतीय प्रहरीं

बाई व हरकूबाई ह्या दोघी व तिसरा मुनशी ऐशीं एकांतीं बसून, पारशी पत्रें मुनशीनें उभयतां बायांस वाचून, अर्थ करून सांगितला. पातशाहानें बाईस लिहिलें होतें जे, 'कलकत्त्यास विलायतेहून नवा सुभा आला आहे. त्यास कदीम जो सुभेदार आहे, त्यासीं व नव्या सुभेदारासीं अद्याप ठीक नाहीं. उभयतांचींही पत्रें विलायतेस गेलीं आहेत. परंतु नव्या सुभ्यानें ग्वालेरीचे बंदोबस्तास चार पलटणें तयार केलीं आहेत, व आह्मांस सांगून पाठविलें आहे कीं, दिल्लीमध्यें आह्मी कोठी करतों; तेथें स्थळ द्या.' याप्रमाणें त्याचें पत्र आलें. 'ज्यापक्षीं दिल्लींत इंग्रजांची कोठी झाली, तेव्हां आमचा हुकूम काय राहिला ? जागां जागां बंदोबस्त करतील. तुह्मांसही बरें नाहीं. यास्तव तुमची व शिंद्यांची फौजसुद्धां सरदार इकडे पाठवा. आमचीही फौज आहे. राजेरजवाडे सारे एकत्र होऊन इंग्रेजांचें पारपत्य करूं.' याप्रमाणें पत्र दिल्लीहून आलें ह्मणोन दोन्ही वर्तमानें ते बाईनें सांगितलीं. ते सेवेसीं लिहिलीं असेत.

खानदेशांतील वर्तमानः—सुलतानपुरांतून चंदरराव पवार पळून गेला, तेव्हां पाऊणशें घोडे यांस सांपडले, व दोन तोफा सांपडल्या. एक तोफ त्यांनीं विहिरींत टाकिली. याप्रमाणें झालें. ते निघून गेल्यावर होळकराची फौज किल्ल्यांत गेली. ते समयीं शहर व किल्ल्यांतील रयत सारी यांच्या लोकांनीं लुटली. वस्त्राहरण केली. सुलतानपुरचा बंदोबस्त करून सारी होळकराची फौज राजश्री गणेशपंत बेहेरे यांजकडेस जाणार. याआधीं गणेशपंतांनीं तीन चार वेळां नंदुरबारेस जाऊन केसो कृष्ण दातार यांशीं लढाया चांगल्या केल्या. पुण्याहून कांहीं फौज आली, ते छ ७ मिनहूस गणेशपंतांस सामील झाले. मागाहूनही विसाजी आपाजी कांहीं फौज व तोफा व सरंजाम घेऊन गणेशपंताकडे येतात ह्मणून वर्तमान येथें आलें. गुलजारखानाचें वर्तमानः—श्रीमंत दादासाहेबांकडे गेलें होतें. श्रीमंतांनीं बहुमान करून, खानदेशच्या सनदा देऊन बिदा केले आहेत. इंग्रजांस दादासाहेबांनीं सांगितलें जे, गुलजारखानाबरोबर दोन पलटणें तुह्मीं आपलीं देणें. त्यास इंग्रजांनीं उत्तर केलें जे, गाडर मुंबईस गेला आहे; तो आल्याशिवाय देतां येत नाहींत. मग गुलजारखानानें आपणच दोन तीनशें फौज व पांच सातशें गाडदी ठेऊन, व दादासाहेबांजवळ दोन पलटणें होतीं तीं केसोपंताबरोबर आलीं आहेत. बाकी शेंदोनशें लोक तेथें होते, त्यांस खायास मिळेना; यास्तव गुलजारखानाबरोबर दिले आहेत. सुरतेपासून तीन कोसांवर अलीकडे गुलजारखान उतरला आहे. खानदेशांत येणार. चिंतो विठ्ठल यांजकडील वर्तमान पेशजीं लिहिलेंच आहे. नवीन वर्तमान आलें जे, त्यांची बायको व

लेक विष खाऊन मेलीं, व दोघे कारकुनांस मार दिला, ते मेले, व पाटीलबावांनीं आपले पांच सहा बारगीर यांचे चौकीस होते ते मारले, व एक कारकूनही मारिला. याप्रमाणें येथें वर्तमान आलें. चिंतो विठ्ठल यांचे पायीं बेड्या आहेत. अन्न खात नाहींत. याप्रमाणें वर्तमान येथें आलें. तें देखील ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. बाळारायही आज रात्रीं बाईकडे आले होते. काय बोलणें झालें, तें मागाहून शोध करून लिहून पाठवितों. हरकूबाई ही बहुत मायाममतेंत आहेत. कितीक बारीक मोठें वर्तमान ममतापुरस्सर कळवीत असतात. यांजवर कृपा करणार धनी समर्थ. सेवकाची खर्चाची फार विपत्ति आहे. वारंवार लिहितों ह्मणून स्वामी रागें भरतील. परंतु येथें नाइलाज ह्मणून सेवेसीं लिहितों. स्वामी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक २२. ता० २८ आक्टोबर इ. स. १७८०.
पै॥ छ ५ जिल्काद इहिदे समानीन **श्रीगजानन.** मि० कार्तिक शुद्ध १ शके १७०२.

सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २९ सवालपरीयंत मु॥ महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–येथील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून डांकेबरोबर छ १९ सवालीं सेवेसीं पाठविलें आहे. सांप्रत श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत. दहा हजार रुपये खर्चास इंग्रज देत असतात. तेवढे खर्च करून मात्र आहेत. वरकड सुरतेहून कोणीकडे स्वारीस निघावें, तर गाडर ह्मणून इंग्रज मुंबईस गेला आहे. तो आलीयावर स्वारीची तरतूद काय होणें तें होईल. असें वर्तमान आहे. कलकत्त्यास नवा सुभा आला आहे. जुन्या सुभ्याची त्याची नाचक्की झाली होती. परंतु विलायतेहून पातशाहाचीं पत्रें आलीं. नवा सुभाच कायम झाला. नव्या सुभ्याकडून दोन कंपू रवाना झाले. कलकत्त्याहून पांचां कोसांवर बाहेर उतरले आहेत. सुरतेकडे येणार असें बाजारी वर्तमान आहे.

खानदेशचें वर्तमान तर होळकरांची फौज सुलतानपुरचा बंदोबस्त करून राजश्री गणेशपंत बेहेरे यांजकडे गेले, परंतु छ २३ सवालीं राजश्री संताजी होळकर शेंदव्यांत आहेतः त्यांचें पत्र येथें बाईस आलें. त्यांत वर्तमान होतें जे, केसो कृष्ण दातार यांणीं नंदूरबारेंत एक पलटण ठेऊन, तेथील बंदोबस्त करून, एक पलटण समागमें घेऊन रनाळ्यास चालून गेला. तेथें गणेशपंतांशीं व यासीं लढाई मातबर झाली. गणेशपंताचा पुतण्या की भाचा कोण होता, त्यास तोफेचा गोळा

लागून ठार झाला. गणेशपंत रनाळें सोडून निघाले. यांणीं एक पुरा रनाळ्याचा जाळला. रनाळ्यांत केसो कृष्ण आहेत. आतां होळकरांची फौज पांच सातशें गणेशपंताकडे सामील होण्यास गेली. याप्रमाणें शेंदव्याहून पत्र आलें होतें. आणीकही त्यांणीं बातमीस पाठविले आहेत. काय वर्तमान येईल तें लिहून पाठवूं ह्मणून त्यांणीं लिहिलें आहे.

राजश्री बाळाराव गोविंद भाद्रपद शुद्ध द्वादशीस येथें आले होते, ते आश्विन वद्य द्वादशीस बाईचा निरोप घेऊन, त्रयोदशीस स्वार होऊन येथून गेले. ते कार्तिक शुद्ध द्वितीयेस मुहूर्तेंकडून उज्जनीस दाखल होणार, असे येथें मुहूर्त विचारून गेले. द्वादशीचे दिवशीं बाईनीं मेजवानीस भोजनास वाड्यांत बोलाविलें होतें. भोजनें करून, प्रहर दिवस मागील होता तेव्हांपासून मुत्सद्यासुद्धां बाई बसून, बाळारायासी एकांतीं बोलणी झालीं. तुकोजीबावाकडील कांहीं हिशेब यादीबुदी बाळारायास दाखवून, तेच हिशेबाचे कागद त्यांजबरोबर पाटीलबावांकडेस पाठविले. दोन घटका रात्रपरियंत बाळाराव वाड्यांत बोलत बसले होते. तदोत्तर बाईनीं बाळारायांस वस्त्रें व त्यांची मंडळी पांच सात जणांस वस्त्रें दिल्हीं. चौ घटका रात्रीं निरोप घेऊन गेले.

उभयतां सरदार आपलाले जागां आहेत. अद्याप फौजांची चडचड कांहीं येथें नाहीं. पैसा कोणास देत नाहींत, फौज जमा कोणाजवळ नाहीं. खानदेशांत दोन पलटणें मात्र केसो कृष्णांबरोबर आहेत. त्यांनीं रनाळ्यांतून गणेशपंतास उघडून दिल्हे. नंदुरबारेहून एकच पलटण रनाळ्यास गेलें होतें. प्रस्तुत गणेशपंत माळपुरावर आहेत. होळकराची फौज व गणेशपंत ऐसे एके जागीं झाले. बाजारी आवई आहे कीं, चंदरराव पवार यांणीं फिरून सुलतानपूर घेतलें. लिहिलें कोठें आलें नाहीं. इंग्रजांनीं मातबर सरंजाम केला आहे. गाडर सुरतेस आला ह्मणजे बाहेर निघावें अशी वदंता आहे. पाहावें. कोंकणांतील वगैरे देशचें वर्तमान नाना प्रकारें येथें बोलतात. बाईनींही दोन चार वेळां विचारलें जे, श्रीमंत कारभारी कांहीं फौज जमा करितात की नाहीं ? मी उत्तर केलें जे, फौज बनीबनाई आहे. नवी ठेवणें नलगे. देखिलें ऐकिलें वर्त्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकास खर्चास नाही. कर्ज तीनशें रुपये झालें. स्वामींनीं खर्चास पाठविलें, त्यास नऊ महिने झाले. धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक २३. ता० २८ आक्टोबर इ.स. १७८०.
श्रीगजानन. मि० कार्तिक शु० १ शके १७०२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब यांसः–विज्ञापना. राजश्री बाळाराव गोविंद यांसीं व मातुश्री अहिल्याबाईशीं बोलणीं झालीं. ते समयीं बाई व बाळाराव व आबाजी नाईक वानवळे, बाईकडील मंडळी राजश्री कृष्णाजी मुरार व मुकुंदराव दिवाण व वासुदेव चिमणाजी व जयराम रावजी व आबाजी रणसोड इतके बसले होते. बाईनीं फडणीसांस सांगितलें जे, चौ पांचां वर्षांचा हिशेब बाळारावांस दाखवा. सरदार दक्षणेस होते. चौ साला जमा नी खर्च जो जाला, तो दाखवा. ह्मणून बाईनीं सांगितलें. त्यास फडणीसांनीं बाळारावांस हिशेब दाखविला. समजावून दिल्हा. बाई बोलली जे, 'हा वेळपर्यंत आह्मीं हिशेब तुह्मांस नाहीं दाखविले. सुभेदारांचे वेळेस तुमचे हिशेब आह्मांकडे आले. कितीकदां आह्मीं पाहिले आहेत. परंतु सांप्रत तुकोजीबावा विजयध्वज दौलतकर्ते पैदा जाले, त्या योगेंकरून तरी हिशेबाचे महजब घरोघर देणें आह्मांस प्राप्त झालें ! बरें, भगवत्-इच्छेस उपाय नाहीं ! परंतु बाळाराव, तुह्मांस कळलें असूं द्या, अद्याप तुकोजीबावांनींही कोठें पराक्रम करून अधिकोत्तर मेळविलें नाहीं. सुभेदारांचेंच मेळविलें खातात, आणि महादजीबावांनींही अधिकोत्तर कांहीं मेळविलें नाहीं. राणोजी शिंद्याच्याच दौलतीवर उड्या मारितात. जयाजी शिंदे मेल्यावर, दत्ताजी शिंद्यानें कशी लढाई केली; तदोत्तरही कसे पराक्रम केले; तसे तुह्मीं अगर तुकोजीबावांनीं कोठें काय पराक्रम केले आहेत ? आणि सांप्रत धनी लहान, मुत्सद्यांचा कारभार; राज्यांत मातबर सरदार तुह्मीच दोघे. तेही समयानरूप समजूनच तुह्मांशीं वर्ततात. कैलासवासी श्रीमंत रावसाहेब होते, ते वेळेस त्यांचे दाबही तसेच होते. तुमच्या वर्तणुकीही तशाच होत्या. असो. इतकें बोलावयास कारण हेंच कीं, तुकोजीबावांचें इतके दिवस वांकडें पाऊल पडलें नाहीं. परंतु चार पांच वर्षे उभयतांच देशीं होते, तेथें उभयतांची मसलत जशी जाली असेल, तशीं यांचीं पावलें पडत जातात. असो. काय चिंता आहे ? तुमचें मानस असेल कीं, बाईस चहूंकडून उपद्रव जाल्यानें, सारेच बंदोबस्त आपण केल्यावर बाईनीं काय करावयाचें आहे ? परंतु तुह्मांसही कळलें असूं द्या, मी सुभेदाराची सून आहे. केवळ तुकोजीबावाच दौलतीचे धनी आणि मी कशांत कांहीं नाहीं, असें समजूं नका. तुकोजीबावा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत, त्यांणीं निमकहरामीचे फंद आह्मांसीं केल्यास, पुढे सुखरूप दौलत करूं ह्मणतील, तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील. आजकाल पाटीलबावांचा दम तुकोजीबावा फार

राखितात. आणि पाटीलबावांच्याही चित्तांत फार फंद असेल, तर उभयतांही फौजसुद्धां मजवर चालून यावें. सुभेदारांचे पुण्यप्रतापें येथेंही कोणी बांगड्या लेऊन बसलें नाहीं. श्रीमार्तंड समर्थ आहे. जें ईश्वर घडवील तें खरें!' इतकें बाई बोलल्यावर बाळारावांनींही फार नम्रतेचीं उत्तरें केलीं कीं, उभयतांसही वडील आपण आहेत. जितकीं आपण रागें भरून आज्ञापिलें, त्याचे लेशही पाटीलबावांच्या चित्तांत नाहींत. असें असतां कितीकांनीं कितीक गोष्टी विपर्यास आपणास समजाविले असतील. ते किमपि ध्यानांत न यावे. सुभेदारांचे जागां व राणोजी बावांचे जागां उभयतांसही आपण वडील आहेत. असें फार बाळाराव बाईशीं ममतायुक्त बोलले. बाई बाळारायाशीं बोलली जे, 'बहुत ममतापुरस्कर बोलतां. परंतु दोन्ही ज्ञानें तुह्मांस पाठ आहेत. वरते तोंडानें बोलत जावें, पायानें पाय तुडवीत जावें. हातपाय जोडून आदब करीत असावी, हे तालीम तुह्मांजवळून शिकणारांनी शिकून जावी. असो. तुकोजीबावांनीं इतकें जें केलें आहे, तें तुमच्या मुखांतरें पुण्यांतही श्रीमंतांजवळ बंदोबस्त केलाच असेल. येविशीं पुण्याहून धन्याचेंच पत्र आह्मांस आणा कीं, सुभेदाराचे तुह्मी कांहीं नव्हा. त्यांचे दौलतीचे वारिसदारी तुह्मांस पोंहचत नाहीं. सर्वविशीं मुगुटमणी तुकोजीबावा आहेत. तुह्मी उठून काशीयात्रेस जाणें. असें धन्याचें व कारभाऱ्याचें पत्र, शंभर स्वार, एक कारकून येऊन, त्यांनीं आह्मांस उठून जा ह्मटलें ह्मणजे आह्मी तुमचे आज्ञेचा उजूर करणार नाहीं. त्यांचीच आज्ञा आह्मांस शिरसा वंद्य आहे.' बाळाराव बोलले जे, श्रीमंत धनी, ते आमचे ओंजळीनें पाणी पितात कीं काय? बाई बोलली जे, तेही काय करतील? आजचा काळ असाच आहे. अशीं फार बोलणीं झालीं. मग बाळारावही बाईच्या संतोषानरूप बोलून बाईस संतोष करून निरोप घेतला. निरोपसमयीं बाईनीं वस्त्रें पैठणी तिवट व शालजोडी व जामेवार व किनखाप अशीं चार वस्त्रें बाळारायांस व आबाजी नाईकांसही याप्रमाणेंच व दहापांच गृहस्थांस पैठणी व दोन दोन वस्त्रें दिल्ही. बाळारायांस एक सोन्याचें कडें देऊन बिदा केलें. दुसरे दिवशीं वद्य त्रयोदशीचे दिवशीं बाळारायांच्या भेटीस मीही गेलों. त्यांसीं एकांतीं बोललों जे, तुह्मी येथें आल्याचें वर्तमान मीं श्रीमंतांस लिहून विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. प्रस्तुत मातुश्रीचा निरोप घेऊन आपण उज्जनीस जातात. आपण येथून काय करून जातात? मी श्रीमंतांस काय लिहूं? येविशीं जे आज्ञा करतील, त्याप्रमाणें सरकारांत लिहून पाठवीन. त्यास बाळाराव एकांतीं बसून चार गोष्टी बोलले आहेत; व तदोत्तर ते गेलीयावर दुसरे दिवशीं मातुश्री अहिल्याबाईशींही एकांतीं विनंती केली जे, श्रीमंतांनीं तेथें चिरंजिवाकडून

मजला पत्र लिहिविलें होतें, तें पत्रच आपणांस वाचून दाखविलें. त्यास आपण बोलली जे, बाळाराव आले आहेत. यांचें आमचें काय भाषण होतें हें मनन करून, श्रीमंतांस उत्तर काय ल्याहावें ते तुह्मांशीं बोलूं. अशी आज्ञा केली होती. त्यास बाळाराव निरोप घेऊन परवां गेले. आतां मजला श्रीमंतांस त्या पत्राचें उत्तर लिहिलें पाहिजे. तें काय लिहूं व बाळारायाचा व आपला बोलण्यांत काय इत्यर्थ ठरला हेंही आपणास विचारून श्रीमंतांस विनंतीपत्रें लिहिलीं पाहिजेत. येविशीं काय आज्ञा ? त्यास बाई बोलली जे, 'हे प्रतिपदा द्वितीया दिपवाळीची. हे दोन तीन दिवस पांच सात सहस्र ब्राह्मणभोजन, अन्नकूट होयाचें आहे. बोलण्याची गांठ पडणार नाहीं. त्रितीयेस तुह्मी आह्मी एकीकडे बसून दोन घटका बोलूं.' मीं उत्तर केले जे, मजला चार गोष्टी विचारून घेतल्या पाहिजेत. बाई बोलली जे, मजलाही चार गोष्टी तुह्मांसीं बोलल्या पाहिजेत. ते बोलून मग श्रीमंतांस पत्रें लिहिणें तें ल्याहा. याप्रमाणें आज भाषण जालें. बाईचें बोलणें काय होईल तें, व बाळारायाचें बोलणें जालें तें, मागाहून विनंतिपत्रीं लिहून, कासीदजोडीबरोबर सेवेसी रवाना करीन. जालें वर्तमान तें सेवेसीं वरचेवर श्रुत व्हावें. चितो विठ्ठल वगैरे चौघेजण पाटीलबावांनीं रवाना केले. काल रेवा उतरून पार जाले. पोंहचतील. हे विज्ञप्ति."

लेखांक २४. ता० ३० आक्टोबर इ. स. १७८०.

श्रीगजानन. मि० कार्तिक शु॥ ३ शके १७०२.

विज्ञापना काल कार्तिक शुद्ध द्वितीया रविवारीं संध्याकाळीं मातुश्री अहिल्याबाई एकांतीं बसली. मजलाही बोलाविलें. तिसरें कोणी नव्हतें. मजला ह्मणाली जे, बोला काय बोलतां तें. मीं उत्तर केलें जे, राजश्री पाटीलबावांकडून राजश्री बाळाराव गोविंद येथें आले. दीड महिना येथें होते. दहा पांच वेळां आपला एकांत झाला. ते वेळेस वरचेवर मी विनंति करीत गेलों जे, बाळाराव येथें आल्याचें वर्तमान श्रीमंतांस मी काय लिहूं ? तेव्हां आपण आज्ञा करीतच गेली जे, अद्याप त्यांचा आमचा जाबसाल कांहीं ठरला नाहीं. इत्यर्थ ठरेल तेव्हां तुह्मांस काय सांगणें तें सांगूं. त्याप्रमाणें तुह्मी श्रीमतांस लिहून पाठवा. त्यास बाळाराव आज्ञा घेऊन आपल्या यजमानाकडे गेले, ते काय इत्यर्थ ठरून गेले ? मी श्रीमंत यजमानांस काय लिहूं, हे आज्ञा करावी. त्यास बाई बोलली जे, बाळाराव बोलत गेले जे, 'तुकोजीबावा व नारो गणेश हे आपल्याशीं वैषम्यभावें

वर्तणूक करितात, त्यास (कांहीं) जालें तरी आपण धनी. घरांत फूट नसावी. त्यांणीं एकनिष्ठतेनें सरळपणें आपणांशीं वर्तावें. पुढें धन्याची चाकरी करावी. सरदारीचा बंदोबस्त व्हावा. त्यांणीं आपले जागां अनेक प्रकारचे विपर्यास चित्तांत आणून एक प्रकारची वर्तणूक आपल्याशीं करावी हें उत्तम नाहीं. यांत जनापवाद व सरदारीची खराबी होती. खावंदांस अनेक प्रकारचे भास भासतात. यास्तव पाटीलबावाचें मानस कीं, तुकोजीबावांनीं व नारो गणेश या उभयतांनीं आपले आज्ञेंत पूर्ववत्प्रमाणें चालून सेवाचाकरी करावी. येविशीं उभयपक्षीं सरळता अंतःकरणपूर्वक करून द्यावी. या अर्थी मजला सेवेशीं पाठविलें आहे.' बाई बोलली जे, फार उत्तम आहे. बाळाराव बोलले जे, आपली मर्जी काय असेल ती आज्ञा करावी. बाईनीं उत्तर केलें जे, त्यांणीं तमाम मुलखीं बंदोबस्त बाहेरून सारा केला. आपले मार्फतीनें महालोमहाल मामलेदार पाठविले. सारें आकर्षण केलें. हें करावयास कारण काय? आह्मीं जो इतके दिवस कारभार केला, यांत यांची नासधूस काय केली? ते कोणतें समविषम समजून मुलखी बंदोबस्त यांणीं केला, तें समजलें पाहिजे. आह्मीं जो कारभार केला, तें परभारा दिवाण-मुत्सद्दी लिहिणार सरकारचेच आहेत. त्यांसी त्यांनी समजून न घेतां उगाच दूरारोप ठेवला हें काय? दौलतीचे धनी हेच. आमचें कांहीं नाही? तत्रापि चारपांच वर्षें हे दक्षणेस गेले होते. यांस खर्चास वेंचास पाठविलें. जो यांचे महालचा पैसा आला, तो यांचा यांस पोंहचावला. असें असतां लटके दुराख वाढवायाचें कारण काय? हिशेब तयार आहेत. ते तुमचे मध्यस्ताचे विद्यमानें समजून घ्यावे. नाहकचा दोष ठेवून आपले जागां आढ्यता आणली, तर कोणी मनास आणणार नाहीं. काय काय करितात तें करिनात? धनी समर्थ आहेत. आतां तुह्मी आमचे भाऊ. तुह्मी आपण ह्मणून बोलावयास आलां आहां, तर यथास्थित प्रमाणें शोध करून, कोणीकडे शब्द हें मनन करून, कशी सरळता करतां तें करा. वाजवी रीतीनें आह्मांस मान्य आहे. याप्रमाणें बाळारायांशीं बोलून यांस बिदा केले, काय त्यांचा जाबसाल येईल तो पुढें पाहतच आहों. याप्रमाणें बाळारायांचे रवानगीचा मजकूर सांगितला. मीं विनंती केली जे, श्रीमंतांनीं चिरंजीवाकडून मजकूर लिहविला होता, त्याचें उत्तर काय लिहावें? बाई बोलली जे, नारो गणेश यांणीं, पुण्यास श्रीमंतांकडे राजश्री हरिपंत तात्यांच्या विद्यमानें कांहीं सूत्र लाविलें आहे. पाराजीपंतांचा भाऊ इकडूनच गेला आहे. त्यास, तात्यांनीं त्याची विनंती मान्य करून, श्रीमंतांशीं त्यांचे तर्फेचें बोलणें बोलतात. तुमचीं येथून पत्रें जातील, तीं हरिपंत तात्यांचे दृष्टीस पडतील. तेव्हां

तात्यांस त्यांचें अगत्य पडेल. श्रीमंतांस अनेक प्रकारें समजावितील. तेथें तुमचें लिहिणें आणि आमचें सांगणें काय ? मीं उत्तर केलें जे, श्रीमंत राजश्री नानासाहेब व राजश्री तात्या उभयतांचें मानसही आपल्याविशीं द्वैतार्थ नाहीं. हमेश मजला पत्रें ममतापुरस्कर येतात. तुह्मांविशीं दुसरा अर्थ उभयांच्या चित्तांत किमपि येणार नाहीं. त्यास बाई बोलली जे, मजला पुर्तेपणें ठाऊक आहे. तात्या नारो गणेशांकडील बोलणें बोलतात. नानांचा खमीर अद्याप बळकट आहे. त्यांसच पत्र ल्याहा. मीं उत्तर केलें जे, त्यांणीं आज्ञा केल्याप्रमाणें चिरंजीवानें लिहिलें होतें जे, कितीक बारीक मोठे जाबसाल पत्रीं लिहूं नयेत. श्रीमंतांची मर्जी कीं, मातुश्रीकडील कोणी तरी मातबर मनुष्य विश्वासूक यावा. त्यासी तोडमोडीचे जाबसाल करतां येतील. कागदींपत्रीं लिहितां नये. तर कोणी मातबर जायाविशीं काय आज्ञा ? तेव्हां बाई बोलली जे, आमचे कागदीं पत्रींही व एकांतीं बोलणारही पुण्यांत आहे, त्यांस आह्मीं लिहिलेलें आहे तें ते श्रीमंतांशीं तेथें बोलतात. परंतु आमचे बोलणार तों एकांतींच बोलत असतील. परंतु तुमच्या पत्रांचा फयेश न होय, एकांतीं श्रीमंतांजवळच पत्र जाय, तेंच वाचून उत्तर पाठवीत, असें करा. ह्मणून फार सांगितलें आहे.

दुसरेंही यांचें मानस कीं, आपले येथें बोलणार एकांतीं श्रीमंतांशीं बोलतात. त्याशी श्रीमंत ममतापुरस्कर बोलतात कीं कसे ? हाही अन्वय समजला पाहिजे. त्यास बाई बोलली की, आमचींही आजउद्यां पत्रें श्रीमंतांस जातील. तुमचींही पत्रें लवकर जाऊं द्या.

इंदुराकडील वर्तमान बाईनीं सांगितलें जे, त्यांणीं कोणी गृहस्थाबरोबर सांगून पाठविलें जे, आह्मांस आपलें पत्र आलें ह्मणजे आह्मी भेटीस येऊं. भेटीनंतर श्रीमंतांचे चाकरीस जाऊं. त्यास बाई बोलली जे, माझे भेटीस या, असें मी कशास त्यांस पत्र लिहूं ? पत्राचें कारण काय ? मीं आपला खिजमतगार पाठविला आहे. बाळारायाबरोबर त्यास हातीं सांगून पाठविलें आहे जे, तुह्मी आधीं स्वामिकार्यास जा, सरकारचाकरी करून या. मग आमची भेट घ्या. आह्मी तुमचीच आहें. तेव्हां घरही आपलें; काय पाहाणें तें पाहा. मुख्य गोष्ट आधीं स्वामिसेवा होय तें करा, असें सांगून पाठविलें. आणीकही बाई बोलत होती जे, त्याचें मानस आहे की, हजार पांचशें लोकांनशीं येथें भेटीस ह्मणून यावें. मीं साफ सांगून पाठविलें आहे जे, पंचवीस पन्नास परीयंत आले तर वाड्यांत येऊं देऊं. अधिकोत्तर आल्यास येऊं देणार नाहीं, असें सांगून पाठविलें आहे.

परंतु ते अचानक येतील असें दिसतें. काय चिंता आहे? असें बाई बोलली. प्रस्तुत ऐकिल्यांत आलें जे, राजश्री बाळाराव येथून गेलीयावर, इंदुरीं तुकोजी होळकर व नारो गणेश यांची भेट घेऊन पलीकडे गेले. तेथें ऐकिल्यांत आलें जे, इंदुरींहून उभयतांनीं प्रस्थान केलें. बाईचे भेटीस येणार.

खानदेशांतील वर्तमान तरः—राजश्री गणेशपंत बेहेरे व होळकरांची फौज एके जागां जाले. रनाळ्यांत केसो कृष्ण एक पलटणानशीं होते. ते यांजवर छापा घालायास छ २६ सवालीं गेले. गणेशपंत वगैरे तेही सावधच होते. त्यांनीं दोन टोळ्या केल्या. गणेशपंत पुढें होते. त्यांचे पाठीशीं पलटण लागलें. मागून होळकराचे फौजेनें पिछाडीवर घातलें. दहावीस माणसें त्यांचीं मारलीं. पांच सात फिरंगी धरले. बायका कांहीं धरल्या. ते सारीं थाळनेरच्या किल्ल्यांत पाठविले. आतां गणेशपंत व ह्यांची फौज सारे एके जागां रनाळ्याजवळ आहेत. काल छ २ मिनहूस इंदुरची बातमी आली जे, तुकोजी होळकर व नारो गणेश यांणीं इंदुरींहून कूच केलें. पांच सातशें स्वार समागमें आहेत. येथें येतात. बाईनीं मजला बोलावून एकांतीं सांगितलें जे, इंदुरींहून उभयतांनीं कूच करून इकडे येतात. परिछिन्न त्यांच्या चित्तांत बेइमानी आहे. नाना प्रकारचे घोळ घालून आह्मांस उपद्रव करावा, अशा विचारें येतात. यास्तव तुह्मी श्रीमंतांस लवकर लिहून पाठवा. आह्मांस तों सर्वविशीं आश्रय श्रीमंतांचा आहे. असें बाईनीं सांगितलें. बाईचें मानस कीं, लवकर श्रीमंतांस पत्रें पाठवून, श्रीमंतांचीं पत्रें तुकोजी होळकरांस व नारो गणेशांस दाबाचीं यावीं की, तुह्मी बाईशीं नौदिगर केल्यास परिछिन्न कामास येणार नाहीं. तुह्मीं हुजूर येणें. बाईशीं अमर्यादा न करीत, अशीं पत्रें सुतरस्वारांबरोबर लवकर येथें यावीं. असें बाईचें मानस फार आहे. यास्तव हीं पत्रें एकांतीं स्वामींनीं वाचून, ते क्षणींच त्या उभयतांस दाबाचीं पत्रें की, बाईशीं अमर्याद वर्तणूक न करीत अशीं, व बाईस समाधानीचें पत्र, अशीं येथें सेवकाजवळ सरकारच्या सुतरस्वाराबरोबर यावीं. सरकारचीं पत्रें लवकर यावीं. या अर्थीं येथें बाईचा जीव फार उतावळा जाला आहे. धन्याची मर्जी. मीही यांसी बोललों आहें जे हें वर्तमान ऐकिल्यावर श्रीमंत टाकोटाक पत्रें पाठवितील. येथें बाईचें मानस कीं, राजश्री हरिपंततात्यांशीं नारोपंतांनीं जाबसाल लावला आहे. ते आह्मांविशीं कांहीं श्रीमंतांच्या चित्तांत विपर्यास घालतील. यास्तव तात्यांस कळूं न द्यावें ह्मणतात. परंतु पाहतां, तात्यांचे ठायीं यांची ममता फार आणि तात्याही हमेश यांस कृपेचींच पत्रें लिहितात. परंतु अलीकडे यांस तात्यांविशीं कोणीं काय भासविलें आहे न कळे. असो. जसें स्वामींचे मर्जीस येईल तें करावें. उत्तर फार

सत्वर यावें. येथें गडबड अशी आहे. सेवकास खर्चाची विपत्ति फार आहे. नऊ महिने जाले, येथें लोकांचें देणें जालें आहे. खर्चासही नाहीं. स्वामी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक २५.

श्रीगजानन. ता. १ नोव्हेंबर इ. स.१७८०.

पैा छ १६ जिल्काद इहिदे समानीन. मि. कार्तिक शुद्ध ५ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. छ ३ जिल्कादपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मु॥ महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील राजश्री बाळाराव गोविंद येऊन गेलेः त्यांचें व बाईचें बोलणें मुत्सदियांचे रुबरू जालें तें, व श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेंतच आहेत तें, व खानदेशप्रांताचें सविस्तर वर्तमान पेशजीं डांकेबरोबर छ ३० सवालीं येथून पत्रें रवाना केलीं आहेत तीं, सेवेसीं पावलीं असतील. बाळाराव गोविंद येथून जातेसमयीं, मी भेटीस गेलों होतों. ते वेळेस त्यांस विचारलें जे आपण मातुश्रीचा निरोप घेऊन उज्जनीस यजमानाकडेस जातां, त्यास आपण काय करून गेले, हें श्रीमंतांस काय लिहूं? त्यास एकांतीं बसून सेवकासीं बोलले जेः—दीड महिनापरीयंत येथें होतों. दहा पांच वेळां मातुश्रीशीं आह्मीं एकांतीं भाषणें केलीं; परंतु बाईचे मर्जीचा थांग लागला नाहीं. दुसरें, आज जे भाषणें झालीं, तेंच बोलणें खचित असा रंग नाहीं. जाबसालांत धरसोड फार देखली आणि विश्वास हा कोणाचाही नाहीं. पदरीं मातबर मनुष्य मोडून गोष्ट सांगायायोग्य नाहीं. जें करणें तें आपण स्वतांच करावें, अशा तऱ्हा येथें आहेत. एक, कितीक गोष्टी तोडीमोडीस हरकूबाई बरीच आहे, आणि बाईही थोडें थोडें तिचें ऐकत आहे. सारांश तुकोजीबावांचें स्वरूपज्ञान बाईस कळून चुकलेंच आहे. सारी धरपकड नारो गणेश करितात. त्यांचा उपमर्द व्हावा आणि यांणीं त्यांणीं एकविचारें असून दौलतीचा बंदोबस्त करावा. त्यास, येविशीं पाटीलबावांचे विद्यमानें हा बंदोबस्त व्हावा. येविशींचें बाईचें आमचें भाषण कीं, नारो गणेश यांणीं सरळ आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. तुकोजीबावांनीं व त्यांनीं पूर्ववत्प्रमाणें आज्ञेंत असून, साहेबचाकरी यथास्थित करावी. धन्याचा बट्टा लावून घेऊं नये. याप्रमाणें सरळता तुमच्यानें होईल तर करा, असें बाई बोलली. बाळारायांनीं उत्तर केलें जे, याप्रमाणें पाटीलबावांच्या विद्यमानें तुमची त्याची सरळता करून देतों. पुढें महिना दोन महिने यथास्थित वर्तले, त्यापुढें त्यांणीं फंदफरीद केले, तर आह्मांकडे आपला शब्द नाहीं,

असें बाळाराव बोलले. त्यास बाई बोलली जे, असें जाल्यावर तुमची मध्यस्ती काय? तेव्हां यांतच तुमचें कावित्र दिसून येतें. तुह्मीच त्यास सांगाल कीं, आमचे मध्यस्तीनें दोन महिने सरळतेनें बाईचे आज्ञेप्रमाणें कारभार करा. पुढें तुमच्या चित्तास येईल तसें तुह्मी करा. अशी आमची समजावणूक व त्याजकडून यश असें घेण्यास तुह्मी आलां आहां. तर असें आह्मांस कपटी मध्यस्ती नलगे! तेव्हां बाळाराव बोलले जे, आह्मी आपल्या पायांशीं कपट करणार नाहीं. असें आपल्या चित्तांत आलें, तेव्हां आह्मी जे विनंति करितों ते सरळतेनें परवानगी द्या. कोणती? बाळाराव बोलला जे, आमचे विद्यमानें जे करारमदार होतील, त्याप्रमाणें त्यांनीं चालावें. जर मध्यें नारोपंतांनीं खलेल केली, आपला आज्ञाभंग केला, आणि आह्मांस बट्टा लावला, तर परिछिन्न आह्मी नारोपंताचें पारपत्य करूं. येविशीं आपण वाईट मानूं नये. बाईही बोलली कीं, बदफैली केल्यास पारपत्य करणें युक्तच आहे. असें बाई बोलली. हे परवानगी बाईची घेतली. याप्रमाणें बाळारायांनीं एकांतीं सांगितलें. हें सेवेसीं श्रुत होय. राजश्री विसाजी शामराज इंदुरीं आहेत. त्यांचीं पत्रें येथें बाईस हरकूबाईच्या विद्यमानें नित्य पत्रें येतात, की आपण चिंता न करावी; यांच्यानें आपलें कांहीं होत नाहीं. आपण आपले जागां सावध मात्र असावें. अशीं पत्रें येतात आहेत. हीं पत्रें सारीं एकांती अक्षरशः पाहून, यांचीं उत्तरें लवकर सुतरस्वारीबरोबर यावीं. कळावें, सेवेसीं श्रुत होय हे विनंति."

लेखांक २६. ता. ४ नव्हेंबर इ. स. १७८०.

श्रीगजानन. मि. कार्तिक शुद्ध ८ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग मनस्कार विज्ञापना तागाईत छ ६ जिल्कादपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून छ ३ मिनहूस कासीदजोडी रवाना केली आहे. सांप्रतचें वर्तमानः— राजश्री तुकोजी होळकर व नारो गणेश हे दोन तीन हजार फौजेनशीं इंदुराहून कूच करून, पुढें दोन कोस बिजलपुरास आले आहेत, ह्मणून वर्तमान आहे. छ ५ मिनहूस तेथून कूच करून, दरमजल महेश्वरास बाईचे भेटीस येणार. पेशजीं इंदुरींहून उभयतांचेही प्रेश, राजश्री पाडुरंग शंकर व लांबहात्याचा कारकून ऐसे दिपवाळीच्या हंगामांत आले होते जे, बाईची चिठी यावी ह्मणजे आह्मी भेटीस येतों. त्यास ते उभयतां येथें आलियावर बाईसीं कितीक प्रकारें बोध केला, जे, आपण पत्र उभयतांसही पाठवावें, कीं भेटीस येणें. त्यास येथें बाईनीं उभयतां कारकुनांस उत्तर

केलें जे, आपल्या घरास येयास त्यांस कागदपत्र कशास पाहिजे ? तथापि, आमचे भेटीस तुह्मी या, असें मी तरी कशास पत्र पाठवूं? त्यांनीं अमान्यच केलें, तर असो! मुख्य गोष्ट स्वामिकार्य आधीं. त्यांनीं पुण्यास श्रीमंतांकडेस जावें. स्वामिकार्य करून मग येथें यावें. आह्मी त्यांचेच आहों. धन्याचा संतोष राखून यावें हें उचित आहे. मग आह्मांसही भेटावें. घरही आपलें. काय सांभाळणें तें सांभाळावें. यांत उत्तम आहे, प्रस्तुतच त्यांचें मानस येथें येयाचें असल्यास चाळीस पन्नासानशीं त्यांनीं यावें, घर त्यांचें आहे. त्यांनीं ह्मटलें जे, हजार दोन हजारानशीं येऊं; तर परिछिन्न आह्मी गडावर घेणार नाहीं. नाहक उपाध होईल. यांत उत्तम नाहीं. असें त्या उभयतां कारकुनांशीं बोलून त्यांस छ ३ मिनहूस येथून बिदा केलें. प्रस्तुत वर्तमान ऐकिलें जे, तुकोजी होळकर व दिवाण ऐसे इंदुरींहून कूच करून बिजलपुरास आले. समागमें दोनतीन हजार फौज आहे, दाहाबारा तोफाही आहेत. याप्रमाणें येतात. बाईनींही मजला एकांतीं बोलावून सांगितलें जे तुकोजीबावा व दिवाण ऐसे जमीयतेनशीं येतात. त्यांच्या चित्तांत कांहीं कटकट आह्मासीं करावी, लोकांचे दंगेधरणीं येथें आह्मांजवळ आणून बसवावीं. अशा उपाधीवर येतात. तुह्मी श्रीमंतांस लिहून पाठवा. विस्तारपूर्वक पेशजीं पत्रीं कासीदजोडीबरोबर विनंतीपत्रें लिहिलीं आहेत. बाईनीं राजश्री पाटीलबावांसही एकांतीं पत्रें लिहिलीं आहेत. राजश्री विसाजी शामराव इंदुरींच आहेत. त्यांचे कागदपत्र हरकूबाईच्या विद्यमानें येतात कीं, मी पाटीलबावांस घेऊन तेथेंच येतों. पाटीलबावा तेथें आलीयावर कोणतीही एक मसलत जाबसालावरच पडेल. हरएक गोष्टीचा कजिया होऊं देणार नाहींच. परंतु यामध्येंही आपलें पत्र तुकोजीबावांस व नारो गणेश यांस यावें कीं, बाईची अमर्यादा न करितां, बाईस भेटून तुह्मीं हुजूर येणें. आह्मांस धनीपणाचें पत्र यावें व बाईसही समाधानाचें पत्र यावें. बाईनीही दोन तीन वेळां मजला याअन्वयें सांगितलें आहे कीं, मजला आश्रय सर्वोपरीं धन्याचा आहे. दुसरें, बाई बोलत होती जे, राजश्री हरिपततात्यांकडे नारोपंतांनीं व तुकोजीबावांनीं सूत्र लाविलें आहे. त्यास तात्या त्यांचें बोलणें श्रीमंतांसीं बोलतात. अद्याप श्रीमंतांचा खमीर बळकट आहे. अद्याप नाना फुटले नाहींत. यास्तव येथील वर्तमान सविस्तर वरचेवर श्रीमंतांस लिहून पाठवीत जातां, त्यांची ममता आह्मांविषयीं एक प्रकारची जालीशी दिसती. बरें तुह्मीं श्रीमंतांस लिहून पाठवीत जाणें. मींही बहुत प्रकारें मनोधारण केलें. येथील मानस कीं, वरचेवर पत्रेंही सरकारचीं येत असावीं. तुकोजीबावांस व नारो गणेश यांस, बाईची अमर्यादा न होय, येविषयीं येथें पत्रें यावीं. प्रस्तुत बाईस वाटतें कीं, आपलें कोणी

नाहीं. धन्याचा भरंवसा होता. तेंही ताल्या त्यांचें बोलणें ममतायुक्त बोलतात. तेव्हां आपलें कोणी नाहीं. अशी उदास फार आहे. बाह्यात्कारें बाईनीं किल्ल्याचाही बंदोबस्त करितात. शिबंदी आरब वगैरे सात आठशें माणूस ठेविलें आहे. पहिलें-ही चार पांचशें माणूस आहे. जागां जागां बुरजावर तोफा व जुंबरे व सुतरनाला चढवितात. जागां जागां नाकेबंदी करून बंदोबस्त करितात. विसाजी शामराज नित्य हरकूबाईस पत्रें लिहितात जे, तुह्मी कांहीं चिंता करूं नका. यांच्यांनीं कांहीं होत नाहीं. हरकूबाईनीं आपले पंचवीस स्वार तुकोजीबावांकडेस पाठविले होते कीं, मणिरामाकडे माझा लाखोंचा कज्जा आहे. हिशेब समजला पाहिजे. यास्तव मणि-रामास पाठवून देणें. त्या तुकोजी होळकरांनीं मणिरामास निरोप दिला कीं, तुह्मी जाऊन मावशीबाईचा गुंता आपला वारा. तुह्मी त्यांचे दिवाण. लाखोंचा त्यांचा कारभार केला आहे. तुह्मीं जाऊन त्यांचा फडशा करणें. याप्रमाणें सांगून मणि-रामास निरोप दिला. तोही दो ती दिवसां येथें येणार. धारेचें वर्तमान ऐकिल्यांत आलें जेः–लक्ष्मणराव ह्मणून परभू होता, तो खंडेराव पवाराशीं मिळून, त्याची दिवाणगिरी कबूल करून, कांहीं पाटीलबावांची पागा एक, समागमें घेऊन, धारेंत किल्ल्यांत जाऊन बसला. तें वर्तमान राजश्री रंगरावजीस कळलें. त्यांनीं आपले ज-मीयतसुद्धां रंगराव येऊन, त्यांचें पारिपत्य करून, लक्षुमणराव धरून बंदोबस्तींत ठेविले. तेथेंही खंडेराव पवार हमेश खूळ करायावरच आहेत. याप्रमाणें तेथील वर्तमान. खंडेराव पवार हुजूर गेल्याशिवाय धारेचें खूळ तुटणार नाहीं, असें वोढे-कराकडील कारकून येथें आले होते, त्यांचें भाषण. छ ५ मिनहूस इंदुरींहून बातमी आली तें वर्तमानः–तुकोजी होळकर व नारो गणेश शेंब्रूडच्या घांटापलीकडे ओ-ढ्यावर आहत. तीन चारशें फौज पागा वगैरे समागमें आहेत. लोकांच्या देण्याचा गवगवा आहे. याप्रमाणें येतात. पाटीलबावांचीही येथें येयाची आवई आहे. येथें बाईही आपले जागां किल्ल्याची मजबुती करून आहेत. पाहावें. येथें आलीयावर कसें होईल तें पाहावें. राजश्री फत्तेसिंह गायकवाड यांजकडील वकील राजश्री महिपत मल्हार ह्मणून गृहस्थ त्यांचीं पत्रें येऊन उज्जयनीस आले आहेत. येथें बाईकडेही येणार. मजला पत्र त्या गृहस्थांचें आलें होतें. ते येथें आलीयावर त्यांचें वर्तमान मनन करून सेवेसीं लिहीन. सुरतेहून चार पलटणें केसो कृष्ण यांच्या उपराळ्यास आलीं ह्मणून वदंता आहे. पुरतें वर्तमान आलीयावर लिहीन. हे विज्ञप्ति."

लेखांक २७. ता. ५ नोव्हेंबर इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि० कार्तिक शु० ९ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता-गाईत चंद्र ७ जिल्कादपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–श्रीमंत दादासाहेबांकडील वर्तमान. कोठें कोठें गृहस्थांचे कागदपत्र ज्या ज्याचे तिकडे कोणी आहेत पाठविलीं आहेत. गुमाऊ तें वर्तमान जे, श्रीमंत दादासाहेबांजवळ जमीयत सत्रा पलटणें इंग्रेजी सुरतेस जमा आहेत, व मुंबईवाल्याची कुमक, पांच पलटण व कलकत्त्याहून गोरा तुरकस्वार तीन हजार, व पांच पलटण व अकरा तोफा ऐसे सुरतेस आले. इतका जमाव जाला आहे. पोख्त सरंजाम करितात. पहिले गायकवाडाचे पत्रींही असेंच होतें. मराठी फौज दादासाहेबांजवळ तीन हजार आहे. याप्रमाणें सरंजाम. पुढें मसलतीचा रंग. बोली आहे कीं, प्रथम अमदाबाद सर करावी; तदोत्तर पुढें दक्षणेस जावें, अशी मसलत आहे. गाडराचेही कागदपत्र सुरतेस जात येत असतात. कोणी बोलत जे, आपला जीव रक्षण करायास कागदपत्र पाठवितात. पुण्यास वकील इंग्रजाचा गेला आहे. तेथून काय ठरून येईल तेव्हां सल्ला अगर बिघाड. याप्रमाणें कोणा कोणाचे कागदीं पत्रीं वर्तमान. बाजारी वर्तमान कीं, दादासाहेबांची तयारी जाली आहे परंतु कलकत्त्याहून कोणी खासा पांच पलटणानशीं येणार आहे. त्याची मार्गप्रतीक्षा करितात. हें एक–व दुसरेंही बाजारीच वर्तमान जे, दादासाहेब स्वारी तयार करून सुरतेहून बाहेर निघून, आधीं अमदाबाद घेऊन पुढें सोनगडास यावें. तेथें श्रीमंतांस ठेऊन, राजश्री बाजीराव मुख्य व सर्व कर्ते सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई व अमृतराव दिवाण ऐसे पुढें दक्षिणेस येऊन पुणें पाहावें. गुदस्तां दादासाहेब पुण्याजवळून आले, परंतु पुणें पाहिलें नाहीं. हे आरीयत मातुश्रीस फार आहे. असेंही बाजारी कितीक वर्तमान बोलतात. राजाराम गोविंद मवाशांतून निघून गेले ह्मणून येथें वर्तमान आहे. तथ्य वर्तमान दोचौ दिवसांत येईल. येथील वर्तमान, अहिल्याबाई होळकर यांस येथें बापोजी होळकर यांच्या फौजेच्या देण्याची निकड पडली आहे, व पाटीलबावांकडील वीस लक्षांची वरात घेऊन, शिवाजी नारायण व भगवंतराव ऐसे दोघे कारकून येथें आहेत. चार लक्षपर्यंत आज नव महिन्या जाला आहे. बाकीच्या ऐवजास आज उद्यां करितात. कोठें कोठें वराताही दिल्या आहेत. त्याही अद्याप वसूल जाल्या नाहींत. कारकून धरणींपारणीं करितात. अहिल्याबाईनीं कोणी परगण्याचा वगैरे कमाविसदार उभें करून कोणी परगण्याचा कमाविसदाराजवळून रसद घेऊन कमाविसदार पाठवितात. तेथें राजश्री तुकोजी-

बावाही त्याच परगण्याची रसद तेथें घेऊन कमाविसदार परगण्यावर पाठवितात. हेही आपले जागां अशी श्रमी आहेत. अद्याप कोणताही निकाल नाहीं. मजला बाई पुसत होती जे, इंग्रजांचा वकील पुण्यास गेला आहे ह्मणतात. श्रीमंतांचा व इंग्रेजांचा तह कसा झाला, व हैदरखानाचा सल्ला कीं बिघाड? नबाबाचें श्रीमंताचें कसें आहे? त्यास उत्तर केलें जे, नबाबाचा व श्रीमंतांचा ऐक्यभाव इमानपुरस्कर अकृत्रिमता उभय पक्षीं आहे, व हैदरखानाचा वकील श्रीमंतांकडे येऊन कांहीं द्रव्य देऊन, श्रीमंतांची कृपा संपादून खानमजकुरांनीं घेतली; व तुंगभद्रेअलीकडील मुलुख तमाम सोडून पलीकडे गेला, असें वर्तमान ऐकतों. व इंग्रेजांकडील वकील पुण्यास गेला आहे ह्मणून येथेंच ऐकिलें; आणि तेथेंही काय तह जाला, हाही कळला नाहीं. बाई बोलली जे, श्रीमंतांचें दैव समर्थ आणि कारभारीही चांगले सत्य, कोणाचा द्वेष करीत नाहींत. बरे आहेत. असें बोलली. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञप्ति."

लेखांक २८. ता० १७ नोव्हेबर इ. स. १७८०.
श्रीगजानन. मि० कार्तिक वद्य ६ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ जिल्कादपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीबरोबर सेवेसीं पत्रें पाठविलीं आहेत. डांकेबरोबरही हमेश पत्रें पाठवितच आहें. पावतात न पावतात हें डांकेचें वर्तमान कांहीं कळत नाहीं. प्रस्तुत इकडील वर्तमान तर, श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत. उभयतां सरदारांपैकीं पाटीलबावा तर उज्जनीसच आहेत, तुकोजी होळकर इंदुराअलीकडे चार कोस पिंपळें आहे, त्या ओढ्यावर उतरले आहेत. तीन चारशें पागा वगैरे समागमें आहेत. लोकांचा देण्याचाही दंगा फार आहे. लोकांस ह्मणतात जे, महेश्वरास जाऊन बाईजवळून कांहीं घेऊन तुह्मांस देऊं. लोक कोणी ऐकत नाहींत, असा गवगवा आहे. अलीकडे ऐकिलें जे, येथें कोणाजवळून कांहीं कर्जवाम घेऊन लोकांस कांहीं देतात. समजूत आली ह्मणजे कूच करून इकडे महेश्वरास येणार असें ऐकतों. दुसरें वर्तमान ऐकिल्यांत आलें जे, पाटीलबावांकडील कोणी गृहस्थ तेथें तुकोजी होळकराकडे आले आहेत. बोलणें बोलतात जे तुह्मी कूच करून कोठें जातां? देशीं जाऊन काय कराल? प्रस्तुत हिंदुस्थान प्रांतीं फौजा रवाना करणें आहेत, ह्या कराव्या. त्यांचे रवानगीस सहजच दोन महिने लागतील. तोंवर तिकडे इकडे काय होतें तें पाहून,

देशीं जाण्याचें पडलें तर तुह्मी व आह्मी मिळूनच जाऊं. प्रस्तुत जाऊन खर्चाखालीं यावें, यांत नफा काय? याप्रमाणें ते गृहस्थ बोलले. त्यावरून तुकोजीबावाही देशीं येयाविषयीं स्थिरच आहेत. किंबहुना, महेश्वरीं येऊन कांहीं घोळ घालतील असा रंग दिसतो. असें वर्तमान, ऐकिलें. दुसरें वर्तमान फत्तेसिंह, गायकवाड यांजकडील दोघे गृहस्थ मातबर महिपत मल्हार ह्मणून पालखीनशीन आहेत. त्यांनीं फत्तेसिंग गाइकवाड याजकडील पत्रें पाटीलबावांस व तुकोजीबावांस व मातुश्री अहल्याबाईस ऐशीयांस घेऊन आले आहेत. त्यास प्रस्तुत उज्जनीस पाटीलबावांकडे गेले आहेत. बाह्यात्कारें जाबसाल असा करितात की, आह्मी इंग्रजांच्या पेंचांत इतके दिवस होतों. आतांसे त्यांच्याच सलुखानें, आपलीं स्थळेंही मोकळीं केलीं. परंतु इंग्रजांचें पारपत्य यथास्थित झालें पाहिजे. यास्तव तुह्मीं व आह्मीं मिळून यांचें पारपत्य करावें अशा गोष्टी पाटीलबावांशीं बोलतात. या गोष्टींत सरकारचे वकील राजश्री नारो शिवदेव पाटीलबावांजवळ आहेत, त्यासही घेऊन पाटीलबावा गाइकवाडांच्या वकीलाशीं बोलतात, भवति न भवति करितात, असें आहे; परंतु कुपिया बातमी कोणी सांगणारांनीं सांगितली जे, अंतस्थ ते गृहस्थ गाइकवाडांच्या विद्यमानें श्रीमंत व जळचरें ह्यांजकडून आले आहेत. बाह्यात्कारें बोलणें जाहलियावर अंतस्थही पाटीलबावांचें व त्यांचें बोलणें होत असतें. असेंही कुपिया वर्तमान ऐकण्यांत आलें आहे. उज्जनीहून वकील सरकारांत लिहीतच असतील. ऐकिलें तें वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. सत्य मिथ्या देव जाणे. होळकरांच्या लष्करांतून कोणी गृहस्थ येथें आज काल आले आहेत. त्यांची जबानी वर्तमान कीं, तुकोजीबावा व नारो गणेश वद्य पंचमी षष्ठीस येथें येणार; असेंहि सांगतात. दुसरें बोलतात कीं, पाटीलबावांविषयीं तुकोजीबावांच्या चित्तांतही तिरस्कारच आहे. परंतु विप्राचा निश्चय पाटीलबावाशींच बळकट आहे. तें सूत्र एक आहे. खानदेशचें वर्तमान स्तिमितच आहे. एक लढाई जाली. यांणीं त्यास हटविलें ऐसें बोलतात. नवीन वर्तमानः-उज्जनीहून एक गृहस्थ आला, त्यांनीं वर्तमान सांगितलें जे, पाटीलबावांनीं आंबोजी इंगळे यांची रवानगी ग्वाल्हेर प्रांतीं करितात. सात आठ हजार फौज देऊन त्यांजकडील इंगळे व होळकरांकडील बापू होळकर यांजबरोबरही चार पांच हजार फौज, एकूण दहा बारा हजार फौजेनिशीं उभयतांकडील फौजांची रवानगी करणार, बापू होळकराची यांणीं समजुती करून आपल्याकडेस घेऊन आले. अवाईचें वर्तमान आहे कीं, तुकोजीबावा इंदुराहून बाहेर निघते समयीं मुहूर्त सुधे नव्हते, यास्तव त्रयोदशीस माघारे इंदुरास गेले. वद्य तृतीयेस मुहूर्त काढून, बाहेर निघून, षष्ठी सप्तमीस येथें येणार, अशी वदंता आहे. कुपिया वर्तमान आहे कीं, तुकोजीबावांचें लक्ष बाईजवळ फार आहे. परंतु कार-

भाऱ्याची व रखमाबाईची चित्तप्रशस्तता उज्जनीचे मसलतीवर फार आहे. त्यांचे आज्ञेंत वर्तावें, असेंही नानाप्रकारें बोलतात. येथें बाईजवळीलच कोणी कोणी बोलतात जे, यंदां गुजराथची मसलत फसली ह्मणून श्रीमंत खट्टे आहेत. सरदारांपैकीं एकाचा अटाहास फार, परंतु उपयोग कोणताही घडला नाहीं. यास्तव अलीकडल्यास बोलावून, त्यांची पाठ थापटून, मसलतीस उपयोगीं पडावें, या अर्थी एकांतपत्रें सरकारचीं, राजश्री तात्यांच्या विद्यमानें तकारनामकां आलीं होतीं. त्या अर्थी हे बाहेर निघून, महेश्वरचें नांव करून निघून पुण्यास यावें, असे योजनेनें बाहेर निघाले होते. परंतु तेंही वर्तमान पलीकडे कानभ्रष्ट जालें, या अर्थी त्यांनीं अटकाविलें, असेंही येथें कितीक बोलतात. अहल्याबाई आपले जागां स्तिमित आहेत. होतां होतां काय होईल तें पाहावें. असो. येथील मानस पाहतां, येथील लक्ष धन्याच्या पायांशीं खचित आहे. मजला वारंवार पुसतात की, पुण्याकडून कांहीं तुमची पत्रें येत नाहींत, तें कां? डांकेबरोबर छ १ मिनहूचें पत्र आलें, ते परभारा बाईजवळीच गेलें. त्यांनीं लाखोटा फोडून पाहिला. त्यांत मजकूर हाच होता जे, तुह्मीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान विदित जालें. यावरही बारीक मोठें वर्तमान लिहित जाणें. पत्र लहान होतें. चारपांच ओळी होत्या. त्यावरून हांसूं लागली जे, इतकें लांबचें पत्र एवढेंसें! कोऱ्या कागदाची चौकशी फार आहे, असें बोलली. मजकडेस पाठवून दिलें. तेथून काय पत्रांत मजकूर येतो तें पहावें. आपल्या विषयीं श्रीमंतांची मर्जी कशी काय लिहितात, हें लक्ष येथें फार आहे. छ १७ मिनहूस राजश्री सुलतानजी लांबहाते पन्नास स्वारांनिशीं येथें येऊन महेश्वरीवर उतरले. येतांच भेटीस येणार होते. बाईनीं सांगून पाठविलें जे, बोलावूं तेव्हां या. तदोत्तर संध्याकाळीं जासूद बोलावूं पाठविले. सुलतानजीबावा पालखींत बसून दहा माणसांनिशीं आले. बाईस कुरनिशा करून बसले. बाई व मावशीबाई उभयतांच होत्या. बाई फार रागें भरून बोलली. यांणीं बहुत नम्रतेनेंच उत्तरें केलीं. चार घटका बसले होते. हा बावा बोलला कीं, सकाळीं मजला विनंती करणें ती करीन. बहुतकरून जाबसालामध्यें मावशीबाईच फार आहे. पुढें जाबसाल काय होतील, ते सवेसीं लिहीन. सुलतानजीबावामागून बापूजी होळकर येतात. त्यांजमागून रखमाबाई होळकर. तेही दहा विसा स्वारांनिशीं येतात. तुकोजीबावांचेंही अंतस्थ बहुत नम्रतेच्या चिठ्या येतात. अशी घटवटना येथें आहे. दुसरेंही येथें बोलतात जे, तुकोजीबावा परभारें पुण्यास जाणार. काय होतें तें पहावें. खानदेशांतील वर्तमानः—केसो कृष्ण यानें पांच सात जागा घेतल्या. सरकारचे नंदुरबार परगणे येतांना घेतले. राजश्री गणेशपंत बेहरे व होळकरांची फौज सारे तीन चार हजार आहेत. परंतु मुलूख फार लुटितात. त्यांचें कांहीं होत

नाहीं. राजश्री तात्या मातबर फौजेनिशीं बऱ्हाणपुराजवळ येते, तर हे दोघेही सरदार लगी लागत. येथीलही मर्जी अशीच आहे. सेवेसीं श्रुत होय. खर्चास कांहीं नाहीं. खर्चायाची विपत्ति फार आहे. दहा महिने जाले, दोनशांची वरात पाठविली होती. तीनशें रुपये येथें कर्ज जालें आहे. स्वामी कृपाळू, समर्थ. तुकोजीबावाही एक दिवस इंदुरास जाऊन मुहूर्त टाळून रात्रीं निघून आले. तेथून कूच केलें. उदईक घाटीं उतरतील, असें वर्तमान येथें आलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक २९. ता. १८ नोव्हेंबर इ.स. १७८०. मि. कार्तिक वद्य ७ शके १७०२.

"चंद्र सोळा १६ मिनहूचें वर्तमानः—अहल्याबाईनीं गुलजारखानाच्या शोधास जागां जागां पत्रें पाठविलीं होतीं. त्यास रामपुरा व बिजागड येथून काल वर्तमान आलें जे, गुलजारखान पलीकडे पहाडांत गेला. घिंगडखान ह्मणून भिल्ल मातबर जमियतीनिशीं आहे. तेथें त्याजवळ गुलजारखान आहे. ही बातमी आल्यावर बाईनीं मजलाही बोलावून सांगितलें, अशा पहाडांत कसें करावें ह्मणाली. मींही विनंती केली जे, आपण इकडून त्याच्या शोधास फौज पाठवावी. मी तिकडून विसाजीपंतासही लिहितों. तिकडून त्यांचीही फौज येईल. इकडून आपलीही फौज जावी. त्यास बाईनीं मान्य केलें. पांच सातशें फौज पागा वगैरे शिलेदार व बापूजी होळकरच जाईन ह्मणतात. पहावें आज उद्यां फौजेची रवानगी होईल. तिकडून विसाजी आप्पाजी फौजसुद्धां व पाराजीपंत आपल्या जमीयतसुद्धां व भगीरथ शिंदे ऐसे तिकडून पहाडाच्या बरोबरीनें पिच्छास आहेतच. बाईंनींही आपल्याकडील पागा शरीफखान तीनशें लोकांनिशीं व यशवंतराव फणशाचें पथक तीनशें, असें रवाना केलें. चंद्र २० मिनहूस पागा (रेवा) पार जाली. फणशाचें पथक उदईक रेवापार होईल, व सेंदव्यासही संताजी होळकरांस बाईनीं लिहिलें आहे जे, पन्नास स्वार व दोनशें पायदळ पहाडचें हवें. माहितगार या फौजेबरोबर देऊन गुलजारखानाच्या शोधास रवाना करणें ह्मणून पत्रें लिहिलीं आहेत. सुलतानपूर नंदुरबारच्या नाक्यांसही बाईनीं पत्रें पाठविलीं आहेत की, गुलजारखान त्या वाटेनें सुरतेस चालला, तर अटकावून आह्मांस लिहून पाठवणें. गुलजारखान राजमहाल पहाडांत गेला. उकर्डा भिल्लांचा नाईक आहे, त्याजकडे गेला. माधवराव बांडे ज्या आळीस गेले होते तिकडे गेला. जमियत खानमजकुराजवळ फारशी नाहीं. पंचवीस स्वार व दोनशें पायदळ इतक्यांनिशीं आहे, ह्मणून खबर आज आली. सुरतेकडील वर्तमानः—आज ब्राह्मण तेलंग आला. त्यानें सांगितलें जे, श्रीमंत दादासाहेब फार जलदीनें बाहेर निघणार. मुहूर्ताची योजना करितात. वसईस इंग्रजांचीं पलटणें

गेलीं आहेत. त्यांचे पुस्तपन्हाईस आणखी दोन पलटणें व एक इंग्रज मातबर पालखीनिशीन ऐसे गेले. व मुंबईवाल्यास वरचेवर सुरतेहून ताकिदा जातात जे, वसईकडेस जो पाहिजे तो सरंजाम रवाना करणें. मराठ्या फौजा आल्या नाहींत तोंवर वसई सर करणें ह्मणून. येथें दरबारांत बोलत होते जे, वसई जेर आहे; आणि श्रीमंतांनीं हुजुरात व उभयतां सरदारांच्या फौजा ऐसी रवाना केली आहे. ते घांटमाथां फौजा जाऊन पोंहचल्या. लवकरिच फौजा वसईस जातील. बाई बोलली जे, ये समयीं सरकारची फौज व आंगरे व फरासीस एकत्र होऊन फरासीसास मुंबईस लावावें, आणि फौज व आंगरे यांनीं वसईची पुस्तपन्हाई करावी. ह्या तरतुदी श्रीमंतांनीं तेथें केल्याच असतील. असें बोलत होती. गुलजारखानाच्या पारिपत्यास बापूजी होळकरास पाठविणार होते, परंतु त्यांचे लोक ऐकेनात. लोकांनीं गवगवा केला कीं, आमची तलब भरून देणें. यास्तव ते राहिले. खेचीवाड्यांत वरूण ह्मणून सरकारचा महाल आहे. त्यास मदुसूदनगड दादासाहेबांच्या जप्त्या बसल्या त्या समयीं राजाराम गोविंदाकडे मदुसूदनगड श्रीमंतांनीं दिला होता. जप्त्या उठल्या ते समयी, राजाराम गोविंद, तो गड आठ हजारांवर खेचीचे राजाचे भाऊबंद होते त्यांजकडे देऊं लागला. ते समयीं खेचीच्या राजानें सावकाराजवळ आठ हजारांस गहाण ठेऊन रुपये राजारामपंतांस देविले. तो गड सावकाराकडेच आहे. त्यास होळकराचें कर्ज खेचीवाल्याकडे कांहीं होतें, त्याबद्दल तेथील राजाचा दिवाण, येथें कर्ज वारायास आला होता. त्यास ते जाते समयीं, बाईनीं मजला सांगितलें जे, सरकारचा मदुसूदनगड यांचे विद्यमानें सावकाराजवळ ठेविला आहे; तो जाबसाल यांजकडून करून घ्या; ह्मणून मजला सांगितलें. त्यावरून मीं त्यांजकडे माणसें पाठविलीं. त्यांनीं बाईस सांगितलें. बाईनींही सांगितलें जे, मदुसूदनगडचा जाबसाल यांसीं करून जाणें. त्यावरून त्यांनीं आपला वकील पाठविला. आह्मांसींही बोलावून नेलें. त्यांनीं सांगितलें जे, राजाराम गोविंद आमचे दायादांच्या बहाला करून आठ हजार रुपये त्यास मागत होते. ते देतही होते. आह्मांस कळल्यावर आह्मीं परभारां सावकाराजवळ आठ हजारांवर गहाण ठेऊन राजाराम गोविंदास रुपये दिले. गड तुमचा, आह्मीं असा राखिला आहे. सावकाराचा रुपाया देणें आहे. गड तुमचाच आहे. आह्मांस कांहीं अभिलाष गडाचा नाहीं. दुसरें ते बोलले जे, वरूण महाल सरकारांत आहे. त्याचा ऐवज वसूल काय होतो, आणि सरकारांत ऐवज काय जातो, हा शोध सरकारांत नाहीं. वसुलाप्रमाणें ऐवज सरकारांतही पोंहचत नाहीं असें आहे. या अर्थीं एकंदर ठराव करून, अमका ऐवज

सरकारांत द्यावा असा निश्चय करून तो महाल आमचे स्वाधीन केला, तर करा-राप्रमाणें ऐवज आह्मी क्षेपनिक्षेप पावता करूं. आह्मी आपले वकील तेथें पुण्यांत ठेऊं, व श्रीमंतांस भरंवसा न पटे, तर आपले भाई बेटे सरकारांत चाकरीस ठेऊं. दुसरें, सरकारच्या फौजा हिंदुस्थानांत आल्यास हजार दोन हजार फौजेनिशीं चाकरी करूं परंतु शेर पीठ पोटास द्यावें. राजेरजवाडे अगत्य लागल्यास फौज जमा करूं, असे इतबाराच्या गोष्टी फार बोलले. हें वर्तमान बाईसी सांगितलें. बाईही बोलली जे, खेची (कर) इमानी आहेत त्यांजवळून अंतर पडणार नाहीं, असें दिसतें. सरकारची मर्जी जसी असेल तसें करितील. तुह्मी याप्रमाणें लिहून तपशीलवार पाठवा. येविषयीं काय आज्ञा आली ह्मणजे त्यांच्या वकिलासीं सांगूं. दुसरें वर्तमान ऐकिलें जे, इंग्रजांनीं श्रीमंत दादासाहेबांस वसईचा किल्ला लिहून मागितला. त्यास दादासाहेब बोलले जे किल्ला आह्मांस देणें नाहीं. वरकड कित्येक प्रकार जे, तुह्मांशीं बोललों आहों, ते खचितच आहेत. त्यावरून इंग्रजांचे मर्जीस ठीक न पडलें. यास्तव सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई व अमृतराव यांनीं वसई लिहून दिली. दादासाहेबांच्या नांवचीं पत्रें शिक्क्यानिशीं करून दिलीं. तें वर्तमान दादासाहेबांला कळलें. फार रागें भरले. बाईशीं व श्रीमंतांशीं कडवीं भाषणें फार जालीं. अमृतराव वसईस इंग्रजांच्या कुमकेस जाणार. याप्रमाणें वर्तमान एका ब्राह्मणानें सांगितलें. सत्य मिथ्या देव जाणे. पाटीलबावांकडील शिवाजी नारायण येथें आहेत. ते चंद्र २० रोजीं संध्याकाळीं बाईशीं बोलले जे, पाटील-बावांनीं श्रीमंतांजवळ अट घातली आहे कीं, आसेरीचा किल्ला खालीं करून द्यावा अगर नगरचा किल्ला द्यावा. या दोन्हींतून एक स्थळ दिल्याशिवाय उभय-तांनींही तेथून कूच करूं नये. त्यास बाई बोलली जे, सध्यां दोन्हींतून कोणतें स्थळ देतील? त्यांनीं उत्तर केलें जे, सध्यां नगर देणार. नगरचे किल्लेदारांस शिवनेरचा किल्ला द्यावा असें नेमलें आहे. असें बाईनीं ऐकून घेऊन, दों घटका मजला बोलावून, एकांतीं हें वर्तमान सांगितलें. बाई बोलली जे, श्रीमंतांचें असें व्हावें, आणि यांनीं ह्या अढी घालाव्या! वसईस इंग्रजांचा शह पडला आहे. त्या स्थळास उपद्रव करितात, आणि यांस श्रीमंताच्या घरांत काय आहे तें आपण घेयाची हांव सुटली आहे, असा जमाना आला! बाई बोलली जे, श्रीमंतांनीं कांहीं न केलें. संग्रहींची फौज व हुजुरात तोडली. असो. भगवत्इच्छा! दैवाच्या गोष्टी आहेत. मीही पेशजीं सरकारच्या पत्रान्वें बोललों. त्याचें उत्तर बाईनीं केलें जे, राजश्री तात्या विनंति करतील. राजश्री बजाबाची स्त्री जेजुरी-जवळ वारली, हें कागदपत्रीं वर्तमान व सरकारनामकाचें हेंच वर्तमान बाजारी उठलेलें आहे. राजश्री खंडेराव त्रिंबक याजकडे विसाजी आप्पाजींनीं पत्रें लिहिलीं

होतीं. मींही पत्र लिहिलें होतें. त्याचें त्यांनीं उत्तर पाठविलें आहे. तेंच पत्र सेवेसीं पाठविलें आहे. दिल्लीकडील वर्तमान पादशाहाजवळ दिवाण नजीबकुलीखान होता. त्याचा चेला नजीबखान–जो हिंदुस्थानांत पंचवीस हजार फौज घेऊन फिरत होता–त्यास पादशाहाचें व दिवाणाचें एकचित्त होऊन, या नजीबखानास नाबूद करावें, हे मसलत त्यांनीं केली. तें वर्तमान नजीबखानास कळलें. त्यावरून नजीबखान तेथें जाऊन, दिवाण व आपण एकांतास गेले. तेथें नजीबकुलीखान दिवाणास नजीबखानानें मारून टाकलें. आतां नजीबखानच पातशाहाजवळ आहे. जयनगरच्या राजानेंही हिंदुस्थानांत धूम केली आहे. चहूंकडे गर्दी जाली आहे. हें वर्तमान बाईचें येथें आलें. तें सेवेसीं लिहिलें असे विज्ञप्ति."

लेखांक ३०. ता २० नोव्हेंबर इ. स. १७८०.
श्रीमंगलमूर्ति. मि० कार्तिक वद्य ९ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २२ जिल्कादपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील व श्रीमंत दादासाहेबांकडील वर्तमान पेशजी विनंतीपत्रीं लिहून, डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सांप्रत श्रीमंत दादासाहेब सुरतेसच आहेत. अद्याप सल्ला बिघाड हा कांहीं ऐकिल्यांत येत नाहीं. वर्तमान स्तिंबित आहे. इकडील वर्तमान तरः–राजश्री बापूजी होळकर यांच्या फौजेच्या देण्याचा राडा पडला आहे. अद्याप कांहीं निकाल होत नाहीं. अहिल्याबाई ह्मणतात जे, तुह्मी फौजेसुद्धां वाफगांवास जाणें. आह्मीं तुह्मांस कोठून काय द्यावें? तुकोजीबावांकडे जा. येथून दाहा कोस गेल्यावर एक रोजमुरा तुह्मांस देऊं. लोक ऐकत नाहींत. सारी तलब तुह्मांजवळूनच घेऊं ह्मणतात. शिंद्याकडील कारकून शिवाजी नारायण व भगवंतराव ऐसे येथें आहेत. तेही नित्य दंगे धरणीं करितात. येथें बाई कोणी महालास कमाविसदार योजून, रसद घेऊन शिंद्यांकडील कारकुनास द्यावी, वराता कराव्या, तों तुकोजीबावाची जप्ती त्याच महालावर येती; याप्रमाणें येथील वर्तमान आहे. पहावें कसें होईल. आपल्याकडील वर्तमानाची बाजारी अफवा जेः–श्रीमंत नानासाहेब पुण्याहून जांबगांवास राजश्री पाटीलबावांकडेस गेले आहेत. पाटीलबावांचे समजाविशीस गेले आहेत. होळकर श्रीमंतांशीं रुसून आहेत. त्यांचीही समजावीश पाटीलबावांचे विद्यमानें होणार. वसई प्रांतीं इंग्रेजांकडील एक कंपू व पांचशें तुरकस्वार सरंजामसुद्धां गेले आहेत. ते कांहीं वसईच्या खटपटीत आहेत. यास्तव श्रीमंत वसईकडे कांहीं फौज पाठविणार.

दुसरें वर्तमानः–हैदरनायकाचा सल्ला झाला. तीसा लक्षांवर कर्नाटकची मामलत चुकली. वीस लक्ष रुपये त्यांनीं नक्त पाठविले. दहा लक्ष अखेर सालीं देणार. तुंगभद्रेअलीकडे हैदरखानानें ठाणीं घेतलीं होतीं, तीं त्यानें सोडलीं. याप्रमाणें आपल्याकडील वर्तमान येथें बोलतात. येथें बाईचीं कार्तिकमासचीं दीपदानें व ब्राह्मणसंतर्पणें व श्रीतुळसीचीं लग्नें वगैरे धर्म चालतच आहे. अलीकडे छ १२ मिनहूस सुरतेकडील वर्तमान आलें जे, श्रीमंतांस सुरतेंत दादासाहेबांच्या शरिरास पाऱ्याचा उपद्रव जाला होता. अंगास जागां जागां फोड आले होते. त्यास इंग्रजांनीं औषधी उपाय करून उपद्रव दूर केला; परंतु हवालदिल आहेत. इंग्रेज जे मसलत करणें ते दादासाहेबांशीं करीत नाहींत. निराळींच खलबतें करितात. दादासाहेबांस दरमहा खर्चास चाळीस हजार रुपये देत असतात. दादासाहेबांजवळ जमीयत दीड दोन हजार फौज मऱ्हाटी, व चार पलटणें इतकीं आहेत. लोकांची खर्चाची गिराणी फार आहे. नाटकशाळांमुळें सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई ही बहुत रुष्ट आहेत. दादासाहेबांस ज्यानें जे मसलत सांगितली, तें बरेच ह्मणतात. सल्ला-मसलत तोडमोड कांहींच होत नाहीं. बाई व अमृतराव इतकी मात्र जे गडबडी करणें त्या करितात. इंग्रेजांसही दादासाहेबांचा प्रकार कळला. त्यावरून सलाह मसलत जें करणें तें इंग्रज आपल्या मंडळीनशींच करितात. प्रस्तुत सरकारचा व इंग्रजांचा बिघाड जाला, असें इकडेही ऐकिल्यांत आलें. इंग्रेजांनीं ममईचीं पलटणें कुमकेस आणविलीं होतीं, तीं माघारीं मुंबईस पाठविलीं. त्यासमागमें आणखीही सात पलटणें रवाना केलीं. त्यास दोन मसलती मुंबईवाल्यांस लिहून पाठविल्या आहेत जे, वसईस उपद्रव लावावा; वसईचे कुमकेस श्रीमंत फौज पाठवितील, ते फौज फिरून माघारे घाट चढूं देऊं नये; व तमाम घाट बंद करावे. इकडून सुरतेकडून इंग्रजांची चाल जाली ह्मणजे सहजच साऱ्या फौजा या तोंडावर येतील. पुण्याजवळ फौज राहाणें तर थोडी राहील. तेव्हां मुंबईवाल्यानें पुणेंप्रांतीं धूम करावी. असा दुरोख शह देयाची मसलत इंग्रजांची जाली आहे. याप्रमाणें धन्यास वर्तमान कळलेंच असेल. येथेंही सुरतेहून दोघे ब्राह्मण एका गृहस्थाकडे आले. त्यांनीं हें वर्तमान सांगितलें. केवळ अप्रमाण हें वर्तमान नाहींसें दिसल्यांत आलें. ऐकिलें वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. राजाराम गोविंद अद्याप मवाशांतच आहे. परंतु बाईचीं सुरतेहून वरचेवर पत्रें मशारनिल्हेस येतात. हेही लवकरीच जाणार. फत्तेसिंग गायकवाडाचें वर्तमान त्या ब्राह्मणानें सांगितलें जे, दादासाहेबांनीं गायकवाडास पत्रें पाठविलीं होतीं. जे वीस लक्ष रुपये खर्चास पाठवून देणें व बारा हजार फौजेनशीं चाकरीस लवकर येणें, अशीं पत्रें गायकवाडाकडे गेलीं आहेत. प्रस्तुत गायकवाडा-

कडेही लोकांचा दंगा आहे ह्मणून ऐकिलें. येथें बापोजी होळकराची तीन हजार फौज चांगली आहे. परंतु या लोकांचाही तलबेचा निर्गम अद्याप कांहीं झाला नाहीं. बाईच्या बोलण्यांत आहे कीं, या लोकांचे तलबेची सरंजामी कोठेंही महालीं करावी, तर तेथें तुकोजीबावांची जप्ती येती. मग आह्मीं तरी कोठून काय करावें? लोकांस तुकोजीबावांकडे जा ह्मणतां तेही जात नाहींत. अशी भानगड पडली आहे. राजश्री विसाजी आप्पाजी यांनीं अहिल्याबाईस व मजलाही पत्रें लिहिलीं होतीं. त्यांत मजकूर कीं, गुलजारखान बदफैली करून कोणीकडे पाहाडांत निघून गेला. पाहाडांत रामपुरानजीक बिज्यागडांत गेला आहे ह्मणून पत्रें तेथें आलीं होतीं. त्यास बाईनींही संताजी होळकरास सेंदव्यास रामगडाकडे बातमीस माणसें पाठविलीं. तिकडील बातमी आली ह्मणजे बाई ह्मणाली, कीं फौज पाठवूं असें सांगितलें. आणखीही बाई बोलली जे, इतकी फौज असतां गुलजारखान पळून गेला ह्मणतात, यास काय ह्मणावें? तत्रापि तो पळून गेल्यावर पांचां दिवसांनी कागद आह्मांकडे आला. तेथून आह्मी बंदोबस्त करितों. पळाल्या मनुष्यास तों झाडाचे राऊत दिसतात. तो पाहाडांतून निघून कोणीकडून कोणीकडे गेला असेल हें कोण जाणे. दुरारोप मात्र आह्मांवर की यांचा तालुका असतां, हे बंदोबस्त करितात, असें श्रीमंतांस वाटेल. पळून जाणारांस एक वाट आणि पहाणारास शंभर वाटा. तितक्यांत इकडे झाडी व पाहाड व मवासा जागां जागां. अशामध्यें कोणीकडे पाहावें? सरकारच्या अपशब्दाचें कारण तुह्मी आह्मांवर करितां, असें बाई बोलली. परंतु जागां जागां पत्रें व माणसें पाठविलीं आहेत. खंडेराव त्रिंबक व देवासेकर पवार यांजकडे विसाजीपंतांचीं पत्रें गेलीं. मींही लिहिलीं आहेत जे, सरकारची आज्ञा आहे जे, तुह्मीं उभयतां आपले फौजसुद्धां तयार होऊन, राजश्री विसाजी आप्पाजीजवळ जावें ह्मणून पत्रें गेलीं आहेत परंतु येतील असा भरंवसा दिसत नाहीं. दंगे धरण्याचा बोभाट लिहितील. सुरतेहून ब्राह्मण आला, त्यानें आणखीही वर्तमान सांगितलें जे, दक्षणेंतून कोणी सरदारानें श्रीमंत दादासाहेबांस पत्र लिहिलें होतें जे आह्मी थोडक्याच दिवसांत फौजसुद्धां तिकडे येतों. ते प्रांतीं आलीयावर आपले मनोदयानरूप जे मसलत होणें ती होईल. तेथून उत्तरें त्यास गेलीं जे, तुह्मी ते प्रांतींच असां. आह्मीच जमाव इंग्रेजसुद्धां दक्षिणेस येतों. तिकडे आलियावर जे मसलत करणें ते करूं. याप्रमाणें परस्परें पत्रें गेलीं ह्मणून तो ब्राह्मण सांगत होता की, हें वर्तमान खरें आहे. त्यानें सांगितल्याप्रमाणें सूचनार्थ सेवेसीं लिहिलें असे. सत्य मिथ्या देव जाणे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.'

लेखांक ३१. ता० २४ नोव्हेंबर इ. स.१७८०.

श्रीगजानन प्रसन्न. मि. कार्तिक वद्य १३ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तारीख छ २५ जिल्कादपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून काशिदजोडीबरोबर व डांकेबरोबर सेवेसीं रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान वेदमूर्ति राजश्री व्यंकटरमण शास्त्रीपासून सुरतेहून ब्राह्मण आला. त्यास सुरत सोडल्यास वीस दिवस जाले. पंधरा दिवसांनीं येथें आला. त्यानें वर्तमान सांगितलें जे, श्रीमंत राजश्री दादासाहेब मंडळीसुद्धां सुरतेसच आहेत. वरकड इंग्रज सारे लढवय्ये जितके होते, तितकेही मुंबईस गेले आहेत. जमाव करून वसईस कांहीं गेले आहेत. कांहीं जाणार. येथें वदंता आहे कीं, इंग्रजांचीं सत्रा जहाजें सुरतेहून वसईस गेलीं आहेत. आणीकही थोरलालीं जहाजें सुरतेस व मुंबईस तयार होत आहेत. तो ब्राह्मण एकांतीं सांगत होता जे, दादासाहेबांस इंग्रजांनीं उगीच आशेस लाविलें आहे. परंतु इंग्रजांचा मतलब हा आहे कीं, दादासाहेबांचा दाब दाखवून कोंकणपट्टीचे किले तमाम घ्यावे, या विचारांत आहेत. इंग्रज आपलें काम करितात. शास्त्रीबावाही येथें राहून राहून कंटाळले. दादासाहेब कांहीं देत नाहींत. त्यांसच खर्चाची आबळ आहे. यास्तव शास्त्री निरोप घेऊन इकडे येणार. इंग्रजांची इकडे देशांत येण्याची उमेद नाहीं. गुजराथचा मुलूख सुटला आहे, तोच फार आहे. मुख्य त्यांचा इरादा कीं, समुद्रकिनाऱ्यांचीं स्थळें हस्तगत करावीं. या अर्थीं मुंबईस सरंजामाचा भरणा करितात. इकडे आतां इंग्रजांची आवाई फारशी पहिलेसारखी नाहीं. अंतरवेदींत मात्र एक कंपू आला आहे म्हणतात. ग्वालेर प्रांतीं चार पलटणी आहेत. तिकडे सुज्यायेतदैल्याच्या मुलखांत थोडे थोडे आहेत. हिंदुस्थानांतही पातशहाचे फौजेशीं व जैनगरवाल्याशीं लढाई होतच आहे. बारा परगणे जैपूरवाल्याचे नजीबखानानें घेतले. आणखी घेतच आहेत. पातशहाचे फौजेजवळ इंग्रज नाहींत. इंग्रजांसारखीं काळीं तांबडीं पलटणें नजीबखानानें सजविलीं आहेत. तोफा मुबलक त्याजपाशीं आहेत. जैनगरवाल्यानें होळकराचीं ठाणीं जितकीं होतीं तितकीं उठविलीं. शिंद्याचीं करवर समेंदी वगैरे दोन तीन ठाणीं आहेत. यांची फौज तिकडे कोणी न गेली तर तेही उठवितील. शिंद्याकडील आंबाजी इंगळे दहा हजार फौजेनिशीं ग्वालेरप्रांतीं जाणार. खानदेशांत मात्र दोन पलटणें दादासाहेबांकडील केसो कृष्ण दातार आहेत. धूम करितात. सरकारचे राजश्री गणेशपंत बेहरे व होळकराकडील हजार बाराशें फौज ऐशीं त्याजभंवताले आहेत.

केसो कृष्ण यानें गुजरात व खानदेश प्रांताचे मिळून चार हजार लोक पायेशे व स्वार ठेविले आहेत. त्याजवळ सत्रा गोरे व सात तोफा व दोन पलटणें ऐसा सरंजाम आहे. जागां जागां खंडण्या घेतात. होळकराची व सरकाराची फौज त्यांजभंवताले फिरतात. दोन्ही फौजा मुलूख लुटतात. याप्रमाणें येथें खबरा येतात. गुलजारखान सुरतेस गेला आहे की, केसो कृष्ण यास आपले ताबे करून घ्यावे, आणि सुरतेहून दादासाहेबांजवळून आणीख दोन पलटणें घेऊन यावें, आणि खानदेशांत धूम करावी. त्यास दादासाहेबांनीं गुलजारखानास विचारलें जे, गुदस्तां तुह्मीं खानदेशांत दोन तीन परगणे लुटले, लाखोंची पैदास्त केली, त्यांपैकी तुह्मीं आह्मांस काय पाठविलें जे, आतां तुह्मांस सर्फराज केल्यानें पुढें काय उपयोग आहे? असें बोलले. गुलजारखान कोणी ह्मणते जे दादासाहेबांजवळीच आहे. कोणी ह्मणते कीं, तेथून निघून अलीकडे आला; इकडे येत आहे. अशी बाजारी वदंता आहे. तुकोजीबावाचा तोफखाना सेंब्रुडचा घाट उतरत आहे. पाराजीपंत घाटाखालीं आहेत. खासे वरच आहेत. शिंदेही लवकरच येणार अशी वदंता आहे. सुलतानजी लांबहाते बाईशीं एकांतीं बोलून छ २३ मिनहून प्रातःकाळीं सडे तुकोजीबावाकडे गेले. खटला त्यांचा तेथेंच आहे. तुकोजीबावा तोफखानेसुद्धां घाट उतरून वापस आले. इकडे बाईचे भेटीस येणार. हे विज्ञप्ति."

येथील महेश्वरचें वर्तमानः—सुलतानजी लांबहाते येथें आल्याचें वर्तमान पेशजीं डांकेबरोबर विनंतीपत्रीं पाठविलें आहे. प्रस्तुत बाईचीं व लांबहात्याचीं बोलणीं एकांतीं होतात. एकांतीं बोलण्यांत हरकुबाई मात्र असतात. लोकांतीं. ही दरबारी बोलणें बोलतात. हरकूबाई बोलत होती जे, बाईचा व त्यांचा सुधासा बोलण्याचा रंग पटता दिसत नाहीं. बाईस मीं विचारिलें. त्यास बाईनें सांगितलें जे, अद्याप त्यांचें आमचें बोलणें जालें नाहीं. काय ठरेल तें तुह्मांस सांगूं. सात आठ दिवस जाले, बाई मजशीं एकांती बोलली जें, आह्मी ऐकितों कीं, तुकोजीबावा व नारो गणेश यांनी विसाजी आप्पाजी आठवले यांच्या हातें राजश्री हरिपंततात्यांकडे सूत्र लाविलें आहे. तात्यांनीं श्रीमंतांस विनंति केली. श्रीमंतांनीं एक दोन वेळ ऐकिलें नाहीं. परंतु आतां ऐकितों की, श्रीमंतांनींही मनन करून, श्रीमंतांचीं व तात्यांचीं पत्रें त्याजकडे गेलीं. सिलसिला जाबसालचा त्यांचा त्यांचा लागला आहे. मीं उत्तर केलें जे, श्रीमंत आपल्याकडून चुकले नाहींत. आमच्या चिरंजीवाकडून मजला लिहिविलें होतें जे, कितीक बारीक मोठे जाबसाल कागदींपत्रीं ल्याह्याचे नव्हत. कोणी त्यांजकडील मातबर मनुष्य

येऊन ह्या तोडीमोडीचे जाबसाल केले पाहिजेत, तेव्हां एखादा जाबसाल करारांत येईल. असें लिहिविलें होतें. तें पत्रच बजिन्नस मीं तुह्मांस वाचून दाखविलें. त्यावर तुह्मी बोललां कीं आमचें येथें जाबसालास आहेत, बोलतात. मीं उत्तर केलें जे, असें बोलणें तुमचे लागू झालें असतें तर श्रीमंत असें लिहिवितेना. असो. राजकारणें आहेत! त्यावर स्नानास उठली. त्यावर तिसरे दिवशीं प्रातःकाळच्या दोन घटका रात्रीं बाईकडे मीच गेलों होतों. ते वेळेसही कांहीं बोलली जे, 'तुकोजीबावा इकडे येतात. बेइमानीच्या रोंखावर येतात. बरें, काय चिंता आहे? परंतु आह्मांस भरंवसा श्रीमंतांचा. कदाचित् श्रीमंतांनीं त्याचकडे डौल दिला, तर आमचा ईश्वर आहे.' असें बोलली. येथें बाईनींही किल्ल्याचा बंदोबस्त केला आहे. बुरजावर व सफेलीवर तोफा व रेंहकले व जंबुरे चढविले आहेत. दोन हजार पायेचीं माणसें, अरब व सिद्दी ठेविले आहेत. कमजाफा हजार आठशें स्वारही आहेत. या सरंजामानिशीं येथें बाई आहेत. सुलतानजी लांबहाते एक पालखी व पांच खिजमतगारांनिशीं आंत घेतले. याप्रमाणें बंदोबस्तीनें बाई आहेत. तुकोजीबावाकडील वर्तमान ऐकिल्यांत आलें जे, एकांतींचें, तुकोजीबावांचाही येथें येयाचा अनमानच आहे. सबब कीं, सरकारांत त्यांचा जाबसालाचा सिलसिला लागला आहे. यास्तव येथें बाईचा थाक पाहून परभाराच सेंब्रुडचा घाट उतरून पुण्याकडेच जावें. लांबहाते येथून गेलीयावर काय विचार करणें तो करतील. दुसरें कुपिया वर्तमान आहे कीं, तुकोजीबावांनीं इकडे बाईचे भेटीस येणें, तर पाटीलबावांच्या विद्यमानें यावें. एकले येऊं नये. पाटीलबावाही लवकरीच बाहेर निघणार. किंबहुना निघाले असतील. ते व ते मिळून येथें येणार. येथें घोळ घालावा. बाईचाही एकांतीं कागदींपत्रीं पाटीलबावांकडे सिलसिला आहे. उभयतां येथें आलीयावर जाबसालांत उज्जनीचें चक्र कोणीकडे फिरेल कीं पहावें. बाई एकांतीं मशीं बोलतां बोलली कीं, तुकोजीबावांनीं व नारो गणेशांनीं श्रीमंतांशीं नानाप्रकारें बोलणीं लाविलीं असतील. सरकारकिफायतीची लालुच व चाकरी करून दाखवायाचे मजकूर दर्शविले असतील. तर तेही मतलब येथून बिघडूं शकतील. तुकोजीबावा केवळच निष्कर्षावर प्रवर्तले, तर आपल्यासही दुसरे मांडीवर घेणें प्राप्त. केवळ त्यांची दिल्ही भाकर खाईन, ह्या गोष्टी होणार नाहींत. इतकें बोलून फिरून बोलली जे आतांच हा मजकूर किमपि श्रीमंतांस लिहायाचा नाहीं. ते काय करितात, श्रीमंतांची मर्जी कशी होती, तें पुरतेपणें पाहून, पुढें जो विचार करणें तो करूं. बाईची मर्जी अशी आहे कीं, श्रीमंतांची ममता कोणीकडे होती हें पाहून, मग काय करणें तें करावें. इतक्या जाबसालास

पुष्टीकरण वारंवार हरकुबाईचें कीं, श्रीमंतांचे पायाशीं अंतर करूं नये. या उभयतां बायांचेच एकांत फार होतात. आह्मांसही कितीक बारीक मोठें वर्तमान एकांतींचें हरकूबाईकडूनच फार कळतें. कांहीं बाईही तात्पर्य बोलतात. प्रस्तुत यांनीं कांहीं जाबसाल स्वामींजवळ यशवंतराव गंगाधर व त्रिंबक विनायक यांजकडून लाविला आहे, असें येथें संकलित संकलित बोलण्यांत येतें. सुलतानजी लांबहाते येथें बोलायास आले होते. ते कांही बाईशीं एकांतीं बोलून, सडेच, एक पालखी व दोन घोडीं इतक्यानशीं छ २३ मिनहून प्रातःकाळींच तुकोजीबावांकडेस गेले. आंतील बोलण्याचा मजकूर बाई बोलली जे, तुकोजीबावांनीं स्वामिकार्यें आधीं करून, मग आमच्या भेटीस यावें. तत्रापि तुमचा आग्रह आहे कीं, तुकोजीनें येथें येऊन पायावर डोई ठेवून जावें. तुह्मी जसें सडे आलां, तसें त्यांनींही सडे यावें. अधिकोत्तर आल्यास परिच्छिन्न येऊं देणार नाहीं. दारूगोळा सिद्ध आहे. लांबहातेही बोलून गेले जे, त्यास मी घेऊन येतों. आपलें त्याचे बनलें तर फारच उत्तम. न बनलें तर मी त्यास नेऊन, त्याच्या लष्करांत घालीन. बाई बोलली जे, आह्मी कोणासही लढून पडत नाहीं. आतांही तुमचा आग्रह ह्मणून या ह्मटलें; नाहीं तर त्यांनीं आपले स्वामिकार्यास जावें, हें उत्तम आहे. असे जाबसाल होउन लांबहाते गेले आहेत. दुसरें वर्तमानः—तेथून तुकोजीबावांच्या लष्करांतून कारकून यांचे ममेतचाच आला. त्यानें मजलाही एकांतीं वर्तमान सांगितलें जे, तुकोजीबावा व नारोपत यांनीं तमाम मऱ्हाटे (मराठे) व पागे जमा करून, इमान प्रमाण करावा कीं, लढाईत तुह्मीं इकडील तिकडे होऊं नये. त्यास सारे मराठे व पागे मिळून बोलले जे, 'अन्यत्रासीं व शिंद्यांशीं, एखादे वेळेस श्रीमंतांशीं, तुह्मीं लढाई केल्यास आह्मी तुमचे चाकर आहों. तुह्मांपुढें मरूं. परंतु अहिल्याबाईशीं तुह्मीं लढाई करूं ह्मणाल, तर आह्मी तुमचे चाकर नाहीं.' याप्रमाणें लोकांचा एका जाला. इतकें बोलले. त्यावरून उभयतांही शिथिल जाले. घाटाखालीं उतरले. बाईचे भेटीस यावें असें तुकोजीबावांच्या चित्तांत तर आहेच. नारोपंतांनीं यावें न यावें असें आहे. येथीलही मानस असेंच आहे कीं, त्यांनीं न यावें. याप्रमाणें दरबारांत बोलतात. जसें वर्तमान ऐकितों तसें सेवेशीं लिहिलें आहे. तो कारकून स गत होता जे, तुकोजीबावांचें व शिंद्याचें सूत्र तुटलें. सबब कीं, बाईकडील कागदींपत्रीं सिलसिला एकांत दुकांतीचा तिकडे लागला आहे. यास्तव शिंदे अद्याप उज्जनीसच आहेत. हें एकांतींच वाचून फाडून टाकावें. कितीक बारीक वर्तमान आतांच कांहीं लिहूं नका ह्मणाली आहेत. परंतु मी चाकर. देखलें ऐकिलें वर्तमान वरचेवर लिहिलें पाहिजे. यांचेही कोणी तेथें आहेत,

त्यांस कळल्यास यास येथें सूचना लिहितील. तेव्हां हें बारीक मोठें एकांतीं बोलणार नाहींत; कितीक वर्तमान कळूं देणार नाहींत. यास्तव विनंती लिहिली असे. सेवकाची खर्चाची फार विपत्ति आहे. वारंवार दर पत्रीं लिहितों. धनी रागें भरतील कीं, काय? येथें साडे तीनशें रुपये लोकांचें देणें जालें आहे. नित्य खर्च पाहिजे. देणेदारांचीही तडन. खर्चासही कांहीं कोठें मिळत नाहीं. सेवकाविषयीं तेथें कोण वारंवार स्मरण देतो? चिरंजिवाचीही अन्नाची सोय कांहीं जाली नाहीं. आह्मां गरिबांस स्वामींचे पाय वशिला आहे. वरकड आणीख काय विनंती लिहूं? सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ३२. ता. १ दिसेबर इ. स. १७८०.

पौा छ १३ जिल्हेज समानीन. **श्रीगजानन.** मि. मार्गशीर्ष शु. ५ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ४ जिल्हेजपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून कासीदजोडी छ २५ जिल्कादीं रवाना केली आहे. प्रस्तुतचें वर्तमानः—श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहेत. वरकड इंग्रज सारे मुंबईकडे वसईच्या उद्योगास गेले आहेत. इकडे पूर्वेकडून पांच सहा पलटणें, कांहीं तोफा, ऐसे कलकत्त्याहून रवाना जालीं. त्यांपैकीं चार पलटणें पुढें निघून आलीं, ते थेट ग्वालेरीस आलीं. तेथें गोहजवाल्याचा वेढा होता, तो उठवून निर्वेध ग्वालेर करून, पुढें शिप्री कोल्हारसास आलीं. तेथून चौ पलटणांत सरदार इग्रंज होते, त्यांणीं पाटीलबावांस पत्रें पाठविलीं होतीं, जे, पलटणें सुरतेस जातात; यांस उपद्रव न देतां जाऊं द्यावीं. नाहीं तर रयतीस उपद्रव करूं नये. ते पत्रें पाहून पाटीलबावांनी आंबाजी इंगळे त्यासमागमें दहा हजार फौज देऊन, चौ पलटणांच्या तोंडावर रवाना केले. मागून दोन पलटणें येत होतीं, ते दतियावाला राजा व आणीकही राजेरजवाडे मिळून ते दोन्ही पलटणें तुडविलीं ह्मणून येथें खबर आहे. त्यावर येथील वर्तमान तर सुलतानजी लांबहाते बाईशीं बोलून तुकोजीबावांकडे गेले होते. त्यांशीं बोलून छ २५ रोजीं संध्याकाळीं येथें आले. बाईनीं सांगून पाठविलें होतें जे, प्रथम तुह्मी स्वामिकार्यास जातां, ते जाऊन सरकारचाकरी करून येणें; अगर चित्तांत समाधानी असेल तर सडे भेटीस येणें. त्यास त्यांणीं मध्यस्ताबरोबर सांगून पाठविलें जे बाईचें वचन पुर्तेपणें घ्यावें जे, आपण कोणावर इतराजी करूं नये. असें वचन घेऊन या, मग आह्मी येऊं. त्यास लांबहाते येथें येऊन बाईशीं

बोलले. बाई ह्मणाली जे, 'आह्मांजवळ वचन कशाचें मागतां? आपल्या घरास येयास वचनें कशास पाहिजेत? आह्मीं कोणास वचन दिलें नाहीं. आतांही देत नाहीं. येणें तर यावें. चित्तांत विकल्प असल्यास येऊं नये.' असें साफ सांगितलें. तुकोजीबावांचें बोलणें जे, तुमच्या आमच्या भेटींत व बोलण्यांत पाटीलबावांचा संदर्भ कांहीं असूं नये. बाईचें उत्तर कीं, इतके दिवस तुह्मीं पाटीलबावांच्या आंगें उडत होतां. त्यांचे आज्ञेशिवाय कांहीं करूं नये असें तुमचें त्यांचें होतें. आतां पाटीलबावा कां नको? हे गोष्ट कार्याची नाहीं. तुमच्या आमच्या जाबसालास मधें अवश्यमेव पाटीलबावा असले पाहिजेत. असा बाईचा आग्रह आहे. हे गोष्ट त्यांस अनिष्ट! प्रस्तुत पाटीलबावांचें व तुकोजीबावांचें सूत्र तुटलें आहे. इतक्याही जाबसालांत तुकोजीबावा नांवाचे धनी मात्र आहेत. परंतु इतकेही जाबसाल नारो गणेश करितात. प्रस्तुत छ २८ जिल्कादीं रात्रीं, बाई व घरमंडळी व लांबहाते मिळून दोन प्रहर रात्रपरीयंत खिलबत जालें, आणि प्रातःकाळींच लांबहाते सडेच तुकोजीबावाकडे छ २९ जिल्कादीं गेले. यांजबरोबर सांगून पाठविलें जे, पूर्वीपासून आह्मी जो आपला कारभार करीत आलों तो करूं. तुह्मी जें चाकरीचें काम करीत आलां, तें तुह्मीं आपली साहेबचाकरी करीत जावी. आह्मी कोणावर कृपा व कोणाचें पारपत्य करणें तें करूं. त्यांत तुह्मीं रदबदली करूं नये. असें कबूल असल्यास भेटीस येणें. नाहींतर तुह्मी स्वामीचाकरीस जातां हें फार उत्तम आहे. जावें. याप्रमाणें लांबह्यात्याबरोबर सांगून पाठविलें आहे. पाहावें काय जाबसाल होतो. हें इतकें खिलबतीचें वर्तमान हरकुबाईच्या मुखें आह्मांस कळलें. तुकोजीबावाचे बायकोशीं व तुकोजीबावाशीं व नारो गणेशाशीं विरुद्ध फार आहे. रखमाबाई आपलें मूल घेऊन अहिल्याबाईकडे येण्याचे तजविजींत फार आहे. परंतु ते उभयतां येऊं देत नाहींत. चार पागा त्या बाईच्या तैनात केल्या आहेत. याप्रमाणें तेथील वर्तमान. तुकोजीबावाजवळ फौज चार पांच हजार आहे व तेरा तोफा व अडीच तीन हजार बाण इतका सरंजाम आहे. पेंढारेही सात आठ हजार काल आले. लूट जंगलांत फार होत आहे. सरकारचे कसरावद व कानापूर वगैरेचा शिवार चारितात. हरकुबाई बोलत होती जे, आमचे गांव वैजापूर परगण्याचे श्रीमंतांनीं मोंगलाचे भरतीस घातलें ह्मणून ऐकतों. बरें, कैलासवासी श्रीमंत रावसाहेबांनीं आमच्या ह्मातारपणास दिले होते, ते यांणीं आह्मांवर नाहकचा दूरारोप ठेऊन आमचे गांव घेतले. येवढ्यानें काय श्रीमंतांचे अधिक जालें? मीं उत्तर केलें जे श्रीमंत देणार नाहींत. हरकुबाईनीं अहिल्याबाईच्या कानावर घातलें. बाई बोलली जे त्या

धन्यांनीं गांव कृपा करून दिले होते, या धन्यांनीं घेतले. आपण क्षित कशास करावी? आणि त्यांणीं गांव घेतले. हें कोणाजवळ सांगायाचें आहे? त्यांच्या थोरपणास जें येईल तें करोत. थोरास कान असतात. ज्याणें जें वर्तमान सांगितलें, तें त्यास खरेंच वाटतें. असो. दिवसांचा फेर असाच आहे. याप्रमाणें बाई बोलली. दुसरें तुकोजीबावा व नारो गणेश देशीं जातात, आणि श्रीमंतांसही भरंसा आहे की, तुकोजीबावा आपले ममतेंत असले ह्मणजे एखादें महत्कार्य करतील. परंतु यांणीं पहिले दोन चार मसलती आपल्या आंगीं लावून घेऊन केल्या. त्या तुकोजीबावांनीं सिद्धीसच पाविल्या! कोणकोणत्याः–प्रथम धोडपेचे सालीं दादासाहेबांकडे डौल दिला ते दादासाहेबांचें तसें जालें, ते मसलत फसली. दुसरें, हिंदुस्थानांत गेल्यावर जाबतेखानाचा पक्ष केला, शेवटीं त्यास तळावरच बसविलें. देशीं राजश्री मोरोबादादाचा पक्ष केला, तो पाहेल्यांतच येत आहे; व रघुपतराव नारायणाचा पक्ष केला, ते किल्लेनशीन केले; व गोविंदराव गाईकवाडाचा पक्ष केला ते भीक मागत फिरतच आहेत. आणीकही दोघां चौघांचीं नांवें घेतलीं परंतु स्मरण नाहीं. प्रस्तुत ऐकिल्यांत येतें की, श्रीमंतांनीं विसाजी आपाजी सरदार यांच्या विद्यमानें श्रीमंतांकडे सूत्र लावून श्रीमंतांनींही विश्वास मानून पत्रें पाठविलीं आहेत. देशीं हे जातात परंतु श्रीकृपेंकरून यश घेवोत. विसाजी आपाजींनीं खानदेशांत येऊन गुलजारखानाचें पारपत्य यथास्थित पाराजीपंतांनीं व त्यांनीं केलें. पुढें गुजराथच्या मसलतीसही हरोळीस उभयतांच होते. ते यश घेऊन आतां हे मसलतीस प्रारंभ केला आहे. इकडून फौजेचे आघाडीस पाराजीपंतच आहेत. तिकडून श्रीमंतही विसाजीपंतांसच पुढें पाठवितील. याप्रमाणें दरबारांत बोलतात. बाईनीं हें ऐकून बोलली जे, आमचे बारा कारभारी मिळून, ये दौलतीस अपाय करितात, ते गोष्टीस आपला उपाय काय? आमचे वडिलांपासून आजपरीयंत श्रीमंतांच्या पायांशीं अवज्ञा घडली नाहीं. श्रीसर्वोत्तम पुढेंही आह्मांजवळून अन्यथा विचार त्यांच्या पायाशीं घडवणार नाहीं. याप्रमाणें बाई बोलली. आणीकही वर्तमान ऐकिल्यांत आलें आहे जे, प्रस्तुत बाईचा व पाटीलबावांचा कागदपत्रीं सिलसिला फार लागला आहे. तेव्हां मसलत एखादी सिद्ध होईलसी दिसती. बाईकडूनही कागदपत्र सरकरांत येतच आहेत. तो दाखला कांहीं मजकडे नाहीं. प्रस्तुत सरकारचीं पत्रेंही इकडे येत नाहींत. कागदींपत्रीं सिलसिला जाबसालाचा असतो. त्याणें बारीक मोठें वर्तमान तेही बोलतात. आपल्यासही वर्तमान कळतें. सिप्री कोल्हारसवाल्यांनीं कांहीं जमीयत मिळवून इंग्रजांचें पारपत्य केलें, ह्मणून वर्तमान येथें ऐकिण्यांत आलें. परंतु अद्याप तथ्य नाहीं. विशेष बाईचे व तुकोजी होळकर यांचे भेटीचें

बनलें नाहीं. काल छ ६ मिनहूस तुकोजी होळकर रेवातीरींहून कूच करून पुढें चार कोस बलकवाड्यास गेले. रोख सेंदव्याचा. सुलतानजी लांबहाते व कृष्णाजी तानदेव हे उभयतां येथें आहेतच. त्यांनीं कूच करून पुढें गेले. बाईचें अंतस्थ बोलणें ऐकिल्यांत आलें जे; यांचें कूच जालें हें ऐकून बोलली जे, काय चिंता आहे. हे दौलत पेशव्यांची आहे. त्यांणीं कृपा करून चाकरी घेतली तर चाकरी करून दाखवीन; नाहींतर हे इतकीही दौलत त्यांच्या घरांत घालीन. मग यांस नवे महाल देऊन श्रीमंतांनीं यांची उभारणी करून चाकर ठेवले तर ठेवोत. परंतु या सरंजामांतून एक कवडी देणार नाही. याप्रमाणें ऐकिलें. राजश्री विसाजी शामराज उज्जनीहून येथेंच आले आहेत. त्यांशीं मावशीबाईच्या विद्यमानें निराळेंच खलबत होत असतें. तुकोजीबावा व नारोपंत उभयतांची, व मणिराम मावशीबाईची पुंजी बळकावून बसले आहेत, ते तिसरे. हे तिघे मात्र एकदिल. वरकड कोणी त्यांचे नांव सुखी नाहीं. मावशीबाई बोलत होती जे, हें बरें जालें नाहीं. आतां एखादा वनवासी कोण उभा राहील? काल संध्याकाळ (फाटलें आहे) वर्तमान पुढें जें होईल तें सेवेसीं लिहीन. अलीकडे सरकारचीं आज्ञापत्रें येत नाहींत. हे नित्य पुसतात. सेवकास खर्चास कांहीं नाहीं. दर पत्रीं विनंति लिहितों. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ३३. ता. १७ डिसेंबर इ.स. १७८०.

श्रीगजानन. मि. मार्गशीर्ष शु. ११ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कर विज्ञापना तागाईत छ १० जिल्हेजपरीयंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून छ ४ मिनहूस डांकेबरोबर पत्रें रवाना केली आहेत. सांप्रतचें वर्तमानः—राजश्री तुकोजी होळकर व नारो गणेश हे उभयतां बलकवाडयाहून शुद्ध ६ स्थिरवारीं कुच करून सेंदव्याच्या रोखें गेले. ते दिवशींच येथून सुलतानजी लांबहात्यास बाईनीं वस्त्रें देऊन बिदा केलें. शिष्टाईस येथें आले होते. ते तुकोजी होळकर यांजकडे गेले. तुकोजीबावांनीं ये प्रांतीं जितके महालचे कमाविसदार बाईचे उठवून, आपले कमाविसदार बसविले होते, तितक्या महालांवर बाईनीं आपले कमाविसदार पाठवायास सिद्ध केले. एक दोघांस चंपाषष्ठीचे मुहूर्तें वस्त्रें दिलीं. तमाम महालोमहालीं बाई आपले कमाविसदार पाठवणार व कांहीं फौजही ठेवणार. राजश्री विसाजी शामराज पथकसुद्धां येथेंच आहेत. त्यांचे विद्यमानें राजश्री पाटीलबावांचीं

पत्रें बाईस व मावशीबाईस येत असतात. राजश्री माधवराव गंगाधर उज्जनीस पाटीलबावांजवळ होते, त्यांसही बाईनीं बोलाविलें आहे. पाटीलबावांनींही त्यांस वस्त्रें देऊन विदा केलें. उज्जनीहून निघाले. एका दों दिवसां येथें येणार. येथें बाई कोणतीही मसलत करणार, त्या मसलतीस संमत पाटीलबावांचें. विसाजी शामराज पाटीलबावांच्या इतल्यानें प्रस्तुत नेहमीं येथें आहेत. सांप्रत सल्लामसलतीस पोख्त तेच आहेत. इंग्रजांचा मजकूरः—तर सिप्री कुलारसेस होते, तेथें शिकस्त पाऊन दोन मजला माघारें जाऊन, गुजराथचा रोख धरून आहेत. पाटीलबावांनीं मावशीबाईस लिहिलें होतें जे, प्रस्तुतच माझें येणें तिकडे होत नाहीं. इकडे इंग्रजांचा तळ बसला आहे. मी तिकडे आलीयावर तमाम माळवा इंग्रजांच्या दहशतीनें ओस होईल व महालकरी कमाविसदारांसही धीर वाटणार नाहीं. तमाम उठतील, आणि इंग्रेज इकडे चाल करतील. यास्तव इंग्रेजांचा बंदोबस्त करून कांहीं दिवसां लवकरीच येईन. तोंवर विसाजी शामराज तेथें आहेत. तुह्मींही बाईस सांगाया अन्वयेंच बाईसही पत्र लिहिलें आहे. बाईचे पत्रीं लिहिलें होतें जे, तुकोजीबावा व नारो गणेश उभयतां आपली भेट न घेतां, कूच करून गेले. त्यांनीं इतकी अमर्यादा करून जायाचें नवतें. बरें. त्यांच्या विचारास जे मसलत आली ते त्यांनीं केली! फौजेशिवाय तों कोणतेंही काम होणार नाहीं. त्यास फौज ठेवणें प्राप्तच आहे. पुढें तुह्मी आह्मीही फौज ठेऊनच साहेबचाकरीस जाणें लागेल. तुह्मी जे फौज ठेवाल, ते तुह्मी आपल्या सरंजामावर ठेऊन घेऊन जाल. परंतु तुकोजीबावा फौज ठेवतील त्या फौजेच्या देण्याचें संकट श्रीमंतांस पडेल. कां कीं, तिकडील पत्रें कोणाचीं आलीं आहेत, आणि हे हांवभरी होऊन गेले आहेत! तेव्हां फौजेच्या त्यांच्या देण्याचें संकट श्रीमंतांच्या गळां पडेल. असो. त्यांनीं काय समजून त्यांस बोलाविलें आहे? या उभयतांनीं तुमची भेट न घेतां काय समजून गेले आहेत हें न कळे. ही मसलत श्रीमंत नानासाहेबांची नाहीं. विसाजी आपाजीचे बोलें राजश्री तात्यांनीं बुद्धीस श्रीमंतांच्या विपर्यास घालून हे मसलत उभी केली आहे हें पुढें वाईट दिसतें. बरें. तुह्मी आपले जागां सावध असा. इकडील इंग्रजांचा बदोबस्त करून मीही आपले भेटीस लवकरीच येतों. याप्रमाणें पाटीलबावांनीं विसाजीपंताचे विद्यमानें बाईस पत्र लिहिलें होतें, तें विसाजीपंतांनीं हरकुबाईस वाचून दाखविलें. त्या द्वारें एकांतीं वर्तमान कळलें. मावशीबाईही बोलली जे, श्रीमंतांनीं घरांत फूट अशी करूं नये. ज्या पक्षीं अहिल्याबाई, आह्मी, त्यांच्या पायाशीं निष्ठेनें एकविधा भक्तीनें बसलों आहों, त्यापक्षीं श्रीमंतांस हें विहित नाहीं. तुकोजीबावाचा व नारोपंताचा

काय मजकूर आहे ? तुकोजीबावांसही बाईनींच केलें आहे, आणि त्यांची अमर्याद वर्तणूक पाहून त्यांचे ठायीं प्रसन्नता नाहीं. ज्यास हातीं धरतील तो सवाई तुकोजी करून दाखवितील. त्यांनींही इतकी अमर्यादा करायाची नव्हती, आणि श्रीमंतांनींही भलत्याचेच मसलतीवर अशी घरांत फूट पाडूं नये. फक्त नारोपंत आपल्या बचावासाठीं दोहीकडीलही खराबी करीत आहे. परंतु श्रीमंतांनीं पेशआंदेशी करून समजावें, यांत चांगलें नाहीं. नारोपंत व आमचा मणिराम या उभयतांजवळही रुपये फार जाले आहेत. मणिरामासही मीं तीन बोलावणीं पाठविलीं. भेटीस न येतां परभारा गेला आहे. काय चिंता आहे ? पूर्वीं आह्मीं तुह्मांकडून श्रीमंतांस लिहिविलें होतें की, मणिरामाचे बजिन्नस मुद्दे सुमेरसिंगाबाबत आह्मीं धरले आहेत. हा एक सरकारचा लढा व माझे दहा लक्ष घेऊन बळकावून बसला आहे. त्याची चौथाई वाजवी सरकारांत घेऊन त्याजपासून आमचा ऐवज आह्मांस देवा. तें न घडलें. श्रीमंतांस त्यांची भीड पडली, आणि मीं कांहीं न करितां, विसाजीपंतांनीं आपली बलाय मजवर टाकली. ते श्रीमंतांनीं विचार न करितां, माझे रांडरोट्याचे गांव बेरे लवकर बंद केले ! तेही कैलासवासी धन्यांनींच आमच्या ह्मातारपणास दिले होते. येकूण श्रीमंतांस जें भिऊन वागेल त्याचा संभाळ धन्यांनीं असा करीत असावा ! जो घटाई करील त्याचें श्रीमंतांकडून कांहींच होऊं नये. असो. आह्मांस कोण आहे ? कोणतेंही जड भारी आह्मीं धन्यास सांगावें. आमचे त्राते ते. युगधर्मेंकडून ते क्रोधच करूं लागले, तर आमचा उपाय काय ? परंतु आतां जें श्रीमंत एकास जवळ, एकास दूर धरितात, हें बरें नव्हे. पुढें हें वाईट दिसतें.' याप्रमाणें हरकुबाईचें बोलणे. इतक्यांत विसाजी शामराजही तेथें मावशीबाईचे येथेंच आले. त्यांची माझी भेटही तेथेंच जाली. विसाजीपंत (फाटलें) याअन्वयें बोलले जे, 'अहिल्याबाईचा (फाटले) करून तुकोजीबावास व नारोपंतास बोलाविले (फाटलें). श्रीमंत नानासाहेबांचींच मसलत नाही आणि राजश्री तात्याही असें करणार नाहींत. परतु आणीक कोणाचे सांगितल्यावर त्यांणी यास बोलावलें ह्मणावे, तर आह्मास ठाऊक आहे की, नानासाहेबांची कायम मिजाज जितकी आहे तितकी आणीक कोणार्ची माझ्या पाहिल्यात नाहीं आली. आधीं एकाद्या कोणत्याही कामास मातबर असो, लहान असो, त्या गोष्टीस नानासाहेबांनीं करून देतों मुखावाटे ह्मणणें हेंच दुरापास्त. अभय दिल्यास मग कोणीं कसे विक्षेप मधें घातले, तर ते ध्यानास न आणितां त्याचें कार्य करून द्यावेंच, इतका खमीर श्रीमंतांचा बळकट आहे. हें मजला पुर्तें ठाऊक आहे. अहिल्याबाईविशीं श्रीमंतांची ममता फार माझ्या पाहिल्यांत आली. राजश्री मोरोबादादाच्या वगैरे मनवंतरांत तुकोजीबावाचें स्वरूपज्ञान सर्व त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें आहे. असें

असतां बाईशीं विरुद्ध करून, तुकोजीबावांस ते बोलावतील असें माझ्या मनांत येत नाहीं. या उभयतांच्या ऐवजाची खोली रुदी सर्व श्रीमंतांच्या व तात्यांच्या ध्यानांत आहे. परंतु आतांची मसलत या उभयतांस बोलावण्याची जे केली आहे, याची पेशआंदेशी पाहतां पुढें वाईट फारच दिसतें. बाई व पाटीलबावा एकत्र जाल्यावर हे उभयतां पंचवीस हजार फौजेनशीं चाकरीस जाऊन उभे राहातील, बाई आपले मुलखाचा बंदोबस्त करील, तेव्हां तुकोजीबावांस इकडील कवडी देणार नाहींत. तें तुकोजीबावांस फौजेच्या देण्याचे संकट पडेल. तेव्हां तुकोजीबावा श्रीमंतांच्या गळां पडतील. तेथें बोलतील कीं, आह्मीं तुमच्या पत्रावरून बाईशीं विरोध केला. तेव्हां तें संकट श्रीमंतांस पडेल. ते तरी काय करतील? तेथें आहे नाहीं हें सर्व विदितच आहे. तेव्हां हे कजिये सांभाळतील, शत्रूचा पराभव करितील, हे दोन्ही संकटें पुढें दिसत आहेत. दुसरें, सरदार बेदिल जाल्यास पुढें कामेंकाजें घडून येणें ह्या गोष्टी दुरापास्त. यास्तव शिंदे व होळकर या उभयतांची फूट कदापि करूं नये. पहिलेही धनी होते, त्यांणींही ह्या गोष्टी समजूनच जोडफळाचा सांधा सांधून टाकला आहे. उभयतांत कोणाचा आब कोणाकडून चालतो. प्रस्तुत श्रीमंतांचे दौलतीत कस राहिला नाही. कोठवर ठिगळें देतील? महा संकट आहे. यास्तव श्रीमंतांनीं तुकोजीबावास टांकोटांक पत्र पाठवावें कीं, तुह्मी मातुश्रीची भेट घेऊन त्यांची कृपा संपादून इकडे चाकरीस येणें. त्यांची भेट न घेतां इकडे येणें उचित नाही. असें पत्र त्यांस तुकोजीबावांस लिहून माघारे बाईचे भेटीस पाठवावें. बाई व तुकोजीबावा ममतापुरस्कर भेटून एकविचारें बंदोबस्त आपले घरचा करून, बाईच सरबराई करून त्यांस चाकरीस पाठवतील यांत अति उत्तम आहे. श्रीमंताची वारंवार तुकोजीबावांस शिक्षा अशी असावी की, बाईचे आज्ञेंत राहात जाणें. ह्याताऱ्याचीं ह्यातारपणें, वडिलांची वडिलपणें राखण्याविशीं व कोठें फूट पडूं नये येविशींच्या शिक्षा पूर्वापर श्रीमंतांचे घरच्याच होत. असें असतां प्रस्तुत तुकोजीबावा बाईची अमर्यादा करून श्रीमंतांकडेस गेले हें आश्चर्य वाटतें. परतु बाईची भेट न घेतां तुकोजीबावा येतात, असें ऐकिल्यावर श्रीमंत येऊं देणार नाहीतसें वाटतें. तत्रापि, श्रीमंतांच्या चित्तांत येईल कीं, उभयतां सरदारांचा काय मजकूर आहे? आमचे भोंसले आहेत; नबाब आमचा आहे; गाईकवाड सरकारचे सरदार आहेत; या उभयतांच्यांनीं काय होयाचें आहे? तर ते दौलतीस कलविकल, तर नबाब मूळ (फाटलें) इच्छा करतील. भोंसले राज्याचा दावा सांगतील. गाइकवाड गुजराथच सांभाळून रहातील. असो. हे उभयतां सरदार, ते दौलतीचें बरेंच इच्छितील. कितीक कळवळा पहिले सुभेदार व राणोजी शिंदे याणींच परिहार केल्या आहेत,

आणि आतांही ममतापुरस्कर जितके हे उभयतां सरदार अर्थप्राण वेंचतील, तितकें अन्यत्रांच्यांनीं होणार नाहीं. यास्तव उभयतां सरदारांत श्रीमंतांनीं फूट होऊं देऊं नये. घरांत फुटी व अमर्यादा होऊं देऊं नयेत. हे दौलत विश्वकुटुंबी होय. श्रीमंत जें करितात हें विश्वाच्या बऱ्यासाठीं करितात. यास्तव प्रस्तुत श्रीमंतांनीं तुकोजीबावांस निषेध करून पत्रें पाठवावीं आणि बाईचे भेटीस पाठवावें, यांत फार उत्तम आहे. आह्मी सर्वही श्रीमंतांच्या कल्याणाचे शुभचिंतक आहों.' याप्रमाणें विसाजी शामराज बोलले. श्रीमंतांस लवकर लिहून उत्तरें आणवा आणि तुकोजीबावांस श्रीमंतांनीं तशीं पत्रें त्याहावीं, आणि येथें बाईसही समाधानयुक्त पत्रें यावीं कीं, तुकोजीबावापासून अंतर पडलें असेल तें ध्यानास न आणितां, त्यास लवकर फौजसुद्धां इकडे चाकरीस पाठवून द्यावें. याप्रमाणें सरकारचीं दोहींकडे पत्रें यावीं. तुकोजीबावांबरोबर सरंजामी लोक व पागा व जुने लोक जितके आहेत, तितक्यांचे कारकून व पत्रें बाईकडे येतात. त्यास बाई त्यांशीं बोलतात कीं, ते चाकरीचा बाहणा करून गेले आहेत; त्यापक्षीं आह्मांस तुह्मांस आतांच बोलावतां नये. श्रीमंतांकडील अर्थ पुर्तेपणें आह्मांस समजल्यावर काय तुह्मांस आज्ञा कर्तव्य ते करूं. याप्रमाणें बाई लोकांशीं बोलली. तुकोजीबावा सरकारचे चाकरीस न येतां, आणीक कोणीकडे जातील असा भास कदाचित् आपल्या चित्तांत आला, तर लोक कोणी त्याजबरोबर जाणार नाहींत, असें येथें पक्केपणें जालें आहे. लोक सर्व बाईचे आज्ञेंत आहेत. प्रस्तुत त्यांचा मुक्काम सेंदव्यावर आहे. सेंडे किल्ल्यांत राहावयास गेले होते. तेथूनही कूच जालें असेल. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. धनी कृपाळू समर्थ. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. मागाहून कासीदजोडी लवकरीच येईल हे विज्ञप्ति. "

पे॥ छ ६ मोहरम इहिदे समानीन **लेखांक ३४.** ता० २७ दिसेंबर १७८०.
दाखल ता० २ जानेवारी १७८१. **श्रीगजानन.** मि० पौष शु॥ २ शके १७०२.

"सेवेशी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ३० जिल्हेजपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं छ १९ जिल्हेजचें आज्ञापत्र सेवकास पाठविलें, तें डाकेबरोबर छ २७ जिल्हेजीं येथें पावलें. तें पत्र वाचून पाहून संध्याकाळीं दरबारास जाऊन मातुश्री अहिल्याबाईस वाचून दाखविलें. पत्र मनन करून बाई बोलली जे, 'श्रीमंतांनीं तुह्मांस लिहिलें आहे. असो. राजश्री तुकोजीबावा व नारो गणेश या उभयतांनीं राजश्री बळवंतराव वांकडे यांजकडे महाल

सांगितले; बंदोबस्त करून उभयतां खानदेशांत गेले. येथें आह्मांजवळही तेच दौलतीचा लवाजमा, हत्ती व पागा, व शागीर्दपेशा इत्यादि येथें आहे. त्याचे खर्चास काय ठेऊन गेले, हें बळवंतरायांसच श्रीमंतांनीं विचारावें. सरकारपरीयंत बोभाट तो आमचे नांवाचा कीं, सारे मामलतीचा पैका बाई खर्च करितात. हेच गाऱ्हाणीं राजश्री पाटीलबावाजवळही असेंच सांगीतलें. पाटीलबावा आह्मांविशीं श्रमी. त्यास पाटीलबावांस आह्मीं लिहून राजश्री बाळारायांस येथें आणविलें. त्यांसही सविस्तर वर्तमान आदिकरून हिशेब समजाविले. त्यांनीं पाटीलबावांस सविस्तर निवेदन केलें. त्यांणीं यांस विचारूं लागल्यास त्यांशीं विटवून निघून खानदेशांत गेले. सर्वा ठिकाणींही रीती आहेत. कोणीही आपले घरसंसार पाहत विचारीत आहेत. येवढी दौलत श्रीमंतांची, परंतु तेही नित्य संध्याकाळीं हिशेब पाहत असेत. असो. यांसही विचारलें जे, दौलतीचा मुलकी वगैरे पैसा आला तो जाऊन खर्चवेंच कसा जाला हें मजला पुसा. तुह्मी सांगा, दौलत आहे तेथें कर्जवाम लागलेंच आहे. ते अर्थ कोणतेही मनास न आणितां, मुलकी बंदोबस्त केले. कोणत्या कमाविसदाराकडे काय तकरीर निघाली? कोणता दुरारोप ठेऊन यांणीं दूर करून नवे ठेवले? सुभेदारांचे हातचे पन्नास साठीवर्षांचे कमाविसदार ज्यांनीं महालांच्या उस्तवाऱ्या केल्या, जमेस अधिक चढविले, ते का (फाटलें) काय? आतां बळवंतरायांनीं आपणास (फाटलें) असेल अगर त्यांणीं श्रीमंतांस लिहिलें असेल. त्यास श्रीमंत धनी. लिहिल्यावरून बरीं लवकर लवकर पत्रें श्रीमंतांनीं पाठविलीं! आह्मी इतके दिवस पत्रें लिहित आहों. यांणीं मनास येईल तशा लबाड्या केल्या. तमाम महालचे बंदोबस्त केले. जागांजागां आपले हुकूमहकम करून गेले. जालें वर्तमान आह्मी तुह्मांस सांगत गेलों. आह्मीही लिहीत गेलों. परंतु धनी पहातच गेले.' मीं उत्तर केलें जे, 'श्रीमंत हमेश लिहीत गेले. आपल्याकडूनच हरएक गोष्टीची सोड मोकळ जाली असेल. श्रीमंतांकडे काय शब्द आहे? बाई बोलली जे, 'श्रीमंतांकडे पुसायाचे अधिकार आहेत. असो. प्रस्तुत श्रीमंतांनीं लिहिलें आहे. आह्मांस आज्ञा मान्यच आहे. परंतु यास चाकरीस जांऊं द्या; सोरेंच होईल. आह्मीही तों हेंच नित्य तुह्मांदेखत ह्मणतों कीं, श्रीमंतांवर गाढ मसलत पडली आहे. या समयास उभयतां सरदारांनींही चाकरीस जावें. ते चाकरी एकीकडेच राहून घरचींच हंडीभांडीं पाहतात, तेही सुखी पाहोत. परंतु मजला पुसावें, मी पुसेन तें सांगावें, तें कांहीं नाहीं. परभारांच मनास येईल ते कारभार करूं लागले! तेव्हां ये दौलतींत आमचें कांहीं नाहीं? हेच वारीसदार! अस्तु. तत्रापि श्रीमंत धनी शिरावर आहेत. त्यांचे मुखें जालें ह्मणजे आह्मीही हुंडीभरपाई (करून), आह्मांसही

चार गोष्टी पुसणें असतील त्या धन्यास पुसून, जें कर्तव्य तें करूं. आपलें घरदार पाहात असतां, चाकर व दिवाण मुत्सद्यांशीं पूसतपास करीत असतां, कोणी सांगणारांनीं युक्त धन्यास सांगून पत्र लिहिवावें. धनी आपले घरीं लहानमोठे हुद्देदारांस पूसतपास चौकशी करीतच आहेत. चाकरीचा विषय ह्मटला तर हे गुजराथेस होते, ते समयीं त्यांस खर्चास पोंहचलें कीं नाहीं? इतके दिवस पोंहचत गेलें कीं नाहीं? आतांच धन्यापावतर बोभाट कां? असो. अझूनही हे श्रीमंतांचे मसलतीस चाकरीस गेलीयावर इकडून जें घडणें तें घडेल. केवळ धनी पै दरपै चाकरीस बोलवीत असतां न जावें, आणि घरांतच रामायण कथीत बसावें, हें कोणास पुरवणार नाहीं. कामगारांनीं चाकरीच करावी. चाकरीचे (फाटलें + + +) धंदा काढून बसावें हे काय गोष्ट आहे? आह्मी त्यास नित्य हेंच ह्मणतों कीं, तुह्मी चाकरीस रुजू असा. धन्यावर मसलत पडली आहे हा समय घरीं बसावयाचा नव्हे. त्यांणीं हे कजिये उपस्थित केले आहेत. त्यास सेवक लोकांनीं वल्गना मनास येईल तशा कराव्या, आणि सर्वांनीं तमाशे पाहात असावें. आपले कजिये लोकांचे येथें गेल्यास मग काय महत्त्व राहिलें? असो. इतकेंही कारस्थान बळवंतराव वांकडे यांणीं श्रीमंतांस बिंबविलें आहे. त्यावरून श्रीमंतांनीं लिहिलें आहे. आह्मांस ही आज्ञा शिरसा वंद्य आहे. त्यांणीं चाकरीस जावें हाच आमचाही मनोदय आहे. बळवंतरावजीस निकड लागली आहे की महालास दुसरे कमाविसदार जालीयावर आपले हातचा ऐवज जाईल. पेशजीं फौजेस व त्यांस खर्चास ऐवज आह्मीं कर्जे काढून दिला, त्या साहुकारांस त्या महालावर वराता दिल्या, ह्या दूर करून अन्यत्रांस कसे त्यांणीं महाल लावून दिले? दुसऱ्यानें कोणी साहुकार पातेजेल की काय? आतांच श्रीमंतांनीं लिहिले आहे की, तुकोजीबाबांस चाकरीस बोलाविलें आहे, त्यास खर्चास पोहचावीत जा. कोठून खर्चास पाठवावें हें धन्यानीच त्यांस विचारावें. सारे पहाणे विचारणें धन्याकडे आहे. ज्यार्चे गृहकृत्यें त्यासच पुसलें पाहिजे. दुसऱ्यास काय कळे? उगाच पाल्हाळ कशास सांगावा? तुकोजीबावांस आधी चाकरीस जाऊं द्या. पूर्ववत्प्रमाणें येथून जें घडणें तें घडेल. महाल जाणें, आह्मी जाणूं.' याप्रमाणें भाषणें जालीं, तुकोजीबावा तिकडे चाकरीस येण्याचा संशय दिसतो. उभयतां सरदारही देशीं येण्याचा रंग दिसत नाहीं. बाईनीं पाटीलबावांस येथें येण्याविषयीं किती पत्रें पाठविलीं. शेवटी, विसाजी शामराज व बाजी विठ्ठल पाठविले. ते पाटीलबावांस घेऊन येतात. उद्यां परवा येथे येणार. सडे दोती हजार फौजेनशीं येतात. दोन चार दिवस येथें राहून फिरून माघारी जाणार. बाईचें मानस की, कोण्याही

प्रकारें पाटीलबावांस हुजूर चाकरीस पाठवावें. कोणत्याही प्रकारें ये समयीं उभयतां सरदार हुजूर चाकरीस येऊन पोंहचत हें बाईचें मानस. आतां पाटीलबावा येथें आलीयावर काय होईल तें मागाहून लिहून पाठवीन. प्रस्तुतचें वर्तमान मल्हारगड ह्मणून महाल आहे. येथें चाळीस हजार रुपये रसद घेऊन पाटीलबावांच्या कर्जात साहुकारास दिले. ते मामलत राजश्री गोविंद कृष्ण यांजकडे सांगितली होती. तेथें तुकोजीबावांनीं तीन चार पागा पाठवून मामलेदारांशीं लढाई केली. त्यांचीं साठ माणसें जखमी केलीं. फडणीस मुजुमदाराचीं घरें लुटलीं. मल्हारगडांत आपले मामलेदार तुकोजीबावांनीं बसविले. हें वर्तमान आज आलें. आतां त्यांचे चाळीस हजार रुपये कोठून द्यावे? हे एक श्रीमंतांकडे चाकरीस जाणार ह्मणून तुह्मी सांगतां, आणि श्रीमंतही लिहितात कीं, ते चाकरीस येतात. असो. हें असें होत आहे, तुह्मी पाहा. साग्र नानाप्रकारें श्रीमंतांस सांगतां तेंच खरें वाटतें. याप्रमाणें ऐकिलें व पाहिलें वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. केवळ त्यांच्या लिहिल्यावर अगर कोणाच्या सांगितल्यावर विश्वास मानावा असें असूं नये. येथें बाईचें लक्ष हेंच की, एकएक दिवस चाकरीचा जातो. उभयतांनींही या समयास श्रीमंतांजवळ चाकरीस असावें. त्याजवर श्रम न पडावे. ते श्रम आपण करून त्यांस तोष करावा. पाटीलबावांस यास्तवच बोलाविलें आहे कीं, त्यांस रीत परोगतीच्या गोष्टी सांगून, उभयतांसही देशीं पाठवावें. त्यास ते सडे येतात, आणि मागें पायबंद पलटणें ग्वालेरप्रांतीं आलीं आहेत, त्याजवर गेलें पाहिजे, ह्या खबरा सांगत येतात. सारांश, या उभयतां सरदारांच्याही चित्तांत देशीं येण्याचा संशय आहे. हे येत नाहींत. स्वामींच्याही प्रत्ययास येईल. श्रीमंतांस सांगणार समर्थ आहेत. येथें बाईचें मानस रात्रंदिवस गादीचें कल्याण असावें, त्यांचें थोर केल्यानें आह्मी थोर, असें अंतःकरणपूर्वक बोलतात. हें खरें आहे. उगाच कालबोल्या गोष्टी तेथें सांगाव्या, येऊन जाऊन खर्चाचीही रड सांगून चाकरीस न यावें, देशाकडे तोंड करूं नये, हें अस्सलपणें मानस त्यांचें असे, खचित ऐकिल्यांत येतें. आतां पाटीलबावा येथें येतात; तेही कोण्या प्रकारें तिकडील संकटें सांगून निघून पुन्हां उज्जनीस जातील, असें येथें बाईनींही आपले जागां निश्चय केलाच आहे. पुढें पहावें, कसें होईल. रामचंद्र गणेशाचें विपरीत वर्तमान ऐकून बाई फार श्रमी जाली. बाईही बोलली जे, 'तिकडील यश श्रीमंतच घेतील. हें उभयतांही रत्नाकर सांगत बसतील. अखेर यांच्यांनीं इकडीलही कांहीं होणार नाहीं.' याप्रमाणें बाई बोलली. फार श्रमी उभयतांवरही आहेत. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्ति आहे. वारंवार कोठवर लिहूं? धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

पै॥ छ १४ मोहरम **लेखांक ३५.** ता० १ जानेवारी इ. स. १७८१.
इहिदे समानीन. बरोबर डांक **श्रीगजानन.** मि० पौष वा॥ ६ शके १७०२.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ५ मोहरमपरियंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमानें पेशजीं विनंतीपत्रीं लिहून डाकेबरोबर सेवेसी पाठविलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान राजश्री महादजी शिंदे छ १ मिनहूस येथें आले. येथून दों कोसांवर आलीयावर येथून बाईनीं यशवंतराव फणसे व माधवराव गंगाधर व बाईचे भाऊ, मुत्सद्दी मंडळी दों तीनशा लोकांनशीं पुढें पाठविले. दों कोसांवर यांच्या त्यांच्या भेटी जाल्या. तेथून बरोबरच सारे, प्रहर सात घटका दिवस राहतां, वृषभलग्नावर भेटी व्हाव्या असा निश्चय होतांच वाड्यांत आले. येथें बिछायत वगैरे आरास केलीच होती. बाई आपले स्थलींच बसली होती. पन्नासा लोकांनशीं पाटीलबावा वाड्यांत आले. बाकी लोकांस गोटांत वाटें लावलें. वाड्यांत येऊन बाई व मावशीबाई उभयतां बसल्या होत्या. पाटीलबावांनीं बाईच्या पायावर डोई ठेवली. मावशीबाईसही मुजरा केला. एक दीड घटका बसले. क्षेमसमाचार उभयपक्षीं विचारले. तदोत्तर विडे अत्तर देऊन निरोप दिला. भोजनाचा सरंजाम पाकनिष्पत वाडयांतच केली होती. बाईनी पाटीलबावास सांगितलें जे, लवकरीच बोलावूं पाठवीन; सारे मंडळी सुद्धा भोजनास यावें. असें सांगून निरोप दिला. तदोत्तर पाटीलबावा गोटास गेले. महेश्वरचे पश्चिमेस आंबराईपलीकडे राहायास स्थळ रेवातीरीं केलें. तेथें बाईनीं दोन डेरे व बिचोबा व राहुट्या शमीने फरासखान्याचा सरंजाम पाठविलाच होता. तेथें जाऊन राहिले. येथून घास लकडी व दाणा व ब्राह्मणमंडळीस दाणा वैरण, शिधे मेजवानी सरंजाम कारकून मंडळीस फराळाचीं आदिकरून सर्व पाठविलें. संध्याकाळीं भोजनास बोलाऊं पाठविलें. चार पांचशा लोकांनशीं भोजनास आले. स्वयंपाकांत दोन तीन पक्वान्नें व त्यांचें भक्ष असे पदार्थ केले होते. सहा घटका रात्रपरीयंत भोजनें झालीं. बाईही जवळीच बसली होती. भोजनसमयीं राजश्री विसाजी शामराज व नारो शिवदेव व बाईकडील मंडळी असे जवळीच बसले होते. त्यास विसाजी शामराज बाईशीं बोलले जे, आज पाटीलबावाही वाटेनें चालून आले आहेत. आपणासही श्रम जाले आहेत. आतां रात्रही फार जाली आहे. भोजनोत्तर पाटीलबावांस आज्ञा द्यावी. उदईक आपणही प्रहर दहा घटकांत स्नान व पूजा उरकावी. पाटीलबावाही लवकरीच भोजन करून वाड्यांत येतील. बोलण्याचा प्रसंग उदईक दोन अडीच प्रहरपरीयंत व्हावा. बाईनीही मान्य केलें. पाटीलबावांनीही मान्य केलें. भोजन होऊन

एक घटका बसले. विडे घेऊन बाईचा निरोप घेऊन, कांहीं कमप्रहर रात्रीं आपले मंडळीसुद्धां गोटास गेले. छ २ रोज भृगुवारीं दीड प्रहर दिवसां पाटीलबावा आपलीं स्नानभोजनें उरकून वाडयांत आले. एक घटका बाईजवळ पुराणांत बसले होते. तदोत्तर बाईनी सांगितलें जे, तुह्मी बंगल्यांत बसा. माझें भोजन जालीयावर बोलावीन. त्यास बाईचें पुराण होऊन भोजन करून आली. तों दिवस प्रहर उरला. पाटीलबावांचा समाचार आणविला. तों ते निजले होते. त्यावर बाईही घडीभर लेटून, कांहीं विसाजी शामराज यांशीं बोलत होती. तदोत्तर मुदपाखांत जाऊन पाटीलबावांचे भोजनाची तरतूद केली. तों घटका दिवस उरला. मग भोजनाची तरतूद जाली. शंभर खासा पाटीलबावांकडील होते. सहा घटका रात्रपरीयंत भोजनविडे देऊन बसले. कांहीं बोलावें तर शुक्रवारची रात्र; यास्तव निरोप घेऊन गोटास गेले. छ ३ रोज स्थिरवारीं दों प्रहरांनंतर बाईनीं पाटीलबावांस बोलावूं पाठविलें. एक घटका दिवस राहतां वाडयांत आले. बाई जपास बसली होती. यावर दों घटका रात्रीं बाईचा जप जाला. तोंवर पाटीलबावा व आबा चिटणीस व राणेखान या त्रिवर्गांचें खलबत जालें. तदोत्तर बाई इकडे आली. मुदपाखांत भोजनाची सरंजामी झाली. चाळीस पन्नास लोकांनशीं भोजनें केलीं. तदोत्तर विडे घेऊन, पाटीलबावांनीं बाईस वस्त्रें शुभ्र पोषाख, पैठणी पातळ व चोळी व शालजोडी तीन सनगें दिलीं. सौभाग्यवती मुक्ताबाईस पैठणी पेल्याचें पातळ तांबडें व चोळी किनखाप व पासोडी पैठणी, तिच्या दोघी लेकींस चोळी लुगडीं अशीं चार सनगें, मुक्ताबाईच्या भ्रतारास व पुत्रास चार चार सनगें पैठणी व किनखाप जामेवार ऐसीं उभयतांस आठ सनगें ऐसीं वस्त्रें दिलीं. मावशीबाईचे येथेंही एक दिवस मेजवानी होणार आहे. रात्रीं वस्त्रें देऊन चार घटका बाई व पाटीलबावा, आबा व राणेखान ऐसे एकांती बसून कांहीं बोलली. त्यावर पाटीलबावांनीं निरोप घेतला. आबाही त्याजबरोबरीच गेले. राणेखान व बाई उभयतांच चार पांच घटका रात्रीं बसून उभयतांचाच एकांत जाला. वरकड सारे मुत्सदी मंडळी आदिकरून बाहेर बसले होते. नव घटका रात्र वाजल्यावर उठली. राणेखान आपल्या गोटास गेले. बाईही आपले निद्रेस गेली. पुण्याकडील वर्तमान वसईचें अस्ताव्यस्त बाईस पाटीलबावांनीं सांगितलें. त्यावरून फार श्रमी जाली. बाई बोलली जे, 'वसईसाठीं कैलासवासी श्रीमंतांनीं फार श्रम केले व पैसाही फार खर्च जाला. तसें स्थळ गेलें! केवळ त्यांजवरच मसलत पडली! आपलें कोणीच तेथें नाहीं. कारभारी काय आपले चित्तांत ह्मणत असतील? आपल्याकडून कांहींच जालें नाहीं.' पाटीलबावा बोलले जे, 'काय करावें? इकडेही

हें पलटणें आलीं आहेत. यांचा बंदोबस्त न जाला, तर ये प्रांतीं ते उपद्रव करायास चुकणार नाहींत. फौजेच्या देण्याच्या ओढी या प्रकारच्या. काय करावें !' बाई बोलली जे, 'तुह्मी शंभर ओढी सांगा. एक वसई कायम असती तर कांहीं चिंता नवती. परंतु आतां हें तुमचीं बोलणीं व्यर्थ ! असो. आपल्यास शब्द लागणार. यास काय उपाय ? नबाबांनीं आपला इमान रक्षिला.' नबाबाच्या थोरपणाच्या व आणीक राजेरजवाड्यांच्या गोष्टी जाल्या. बाईचें यांचें काय ठरेल तें पाहावें. बाईचें मानस आहे की, पाटीलबावा काय सिद्धांत ठरावून जातात पाहावें. तदोत्तर कांहीं फौजेची सरंजामी करून हिंदुस्थानाकडे पाठवावी. कांहीं फौज ठेऊन माधवराव गगाधर पुण्याकडे पाठवावे, असेंही योजनेंत आहेत, पाहावें काय घडेल तें खरें. स्वामींनीं अलीकडे दोन पत्रें सेवकास व एक बाईस पत्र पाठविलें. त्यांत आज्ञा कीं, राजश्री तुकोजीबावा इकडे चाकरीस येतात. यांणीं तिकडे महालोमहाल बंदोबस्त केला आहे. यांचे ठेवलेले कमाविसदार बाई उठवून आपले कमाविसदार पाठवितात. हें न करावें. ते चाकरीस येतात, त्यांचा बंदोबस्त राखून त्यांस खर्चाची मदतगारी करणें. ते पत्रें पाहून बहुत खिन्न जाली. बोलली जे, 'इतके दिवस आपलें तापत्रय श्रीमंतांस लिहिवीत गेलों, तें व्यर्थ गेलें. बरें असो. भगवत्इच्छा. 'मीं सरकारच्या पत्राचें उत्तर मागितलें. ते वेळेस बाई बोलली जे, पाटीलबावा आले आहेत. यांचें आमचें बोलणें काय होतें तें पाहून उत्तर देऊं. असें खिन्न मानसें बोलली. बाईचें व भाईचें एकांत बोलणें जालें. त्या उभयतांत तिसरें कोणीच नवतें. राजश्री माधवराव गंगाधर यांस एकांतीं विचारलें त्यास ते ह्मणाले जे आह्मी बाईस विचारून सविस्तर तुह्मांस सांगूं. यांचेंही लक्ष पाहतां श्रीमंतांच्या पायावितरीक्त दुसरें लक्ष नाहीं. मीं एकांतीं बाईस विचारलें कीं, मी श्रीमंतांस वर्तमान काय लिहूं ? बाई बोलली जे, आज व्यतिपात आहे. उद्ईक बोलूं. जालें वर्तमान देखले ऐकिलें सेवेसीं लिहिलें असे. राजश्री नारो शिवदेव व आपाजीराम दाभोळकर हे उभयतांही पाटीलबावांबरोबर येथेंच आले आहेत. मीही काल लष्करांत त्यांस भेटायास गेलों होतों. त्यांणींही कितीक वर्तमान सांगितलें. सारांश पाटीलबावांचें मानस फार करून उज्जनीसच जाणार असें ऐकिल्यांत आलें. बाईनीं तों तेथें आणिले आहेत, कीं कांहींही उपाय करून पाटीलबावांस दक्षणेस पाठवावें अशा अर्थी बोलाविलें आहे. पुढें पहावें काय मसलत होती. पाटीलबावांची तों ओढ उज्जनीकडे जायाची फार आहे. याप्रमाणें इकडील वर्तमान. सुरतेकडील वर्तमान ऐकल्यांत आलें जे, श्रीमंत राजश्री दादासाहेबांस हवालदिल जाला आहे. अन्योन्य भाषणें करितात. असें साहुकाऱ्यांत आपल्यांत आपण बोलतात.

सत्य मिथ्या देव जाणे. इकडे पलटणें आलीं आहेत. आणीखही पलटणें येणार ह्मणून वदंता आहे. छ ४ रोज रविवारीं संध्याकाळीं पाटीलबावा वाड्यांत येऊन बाईस मुजरा करून बंगल्यांत बसले. बाईचा नित्यनेम दोन घटका रात्रपरीयंत जाला. मुदपाखांत येऊन यांची भोजनाची तरतूद करविली. दो घटका रात्रीनंतर पाटीलबावांस बोलाविलें. तीस चाळीस लोकांनशीं भोजनें केलीं. जेवणाच्या अगोदर पाटीलबावा बसले होते. मीही जवळीच होतों. हरी बावाजीकडील वर्तमान मजला सविस्तर विचारलें. मीं विदित केलें. त्यावर दादासाहेबांच्या गोष्टी निघाल्या. मीं विचारलें जे, अलीकडे दादासाहेबांच्या बुद्धीस कांहीं विपर्यास पडला आहे ह्मणून कितीक बोलतात; आपल्याही कांहीं ऐकल्यांत आलें की काय? बावा बोलले जे, 'श्रीमंतांस कान दुखायाची व्यथा आहेच. इंग्रजांनीं उदंड उपाय केले. कान देखील साच स्थानभ्रष्ट करून उदंड औषधी उपाय केले, परंतु अद्याप वाहतच आहे. ठणक रात्रंदिवस लागलीच आहे. अलीकडे हवालदिलही जाला आहे. बुद्धि स्थिर नाहीं. अन्योन्य भाषणें करितात. बाई दादासाहेबांचा शेवट करील. मग पुढें काय अन्य योजना करणें ते करील.' अशीं भाषणें केलीं. तदोत्तर भोजनें करावयास बसले. बाईही जवळ येऊन बसली. भोजन जालीयावर कोठडींत बिछाने टाकले. तेथें बाई व पाटीलबावा व राणेखान ऐसीं त्रिवर्ग एकांतास बसलीं. चौ घटका रात्रींत भोजनें उरकलीं. तदोत्तर एकांतास बसलीं. सात घटकापरीयंत तिघांचींच बोलणीं जालीं. वरकड मुत्सद्दी मंडळी बाहेरच होते. अकरा घटका रात्र वाजलीयावर खिलबत अखेर जालें. बारावे घटकेस उठली. पाटीलबावा आपले गोटास गेले. बाईही आपले निद्रास्थलास गेली. मजला तों निरोप दिला. परंतु राजश्री माधवराव गंगाधर व गोविंद रघुनाथ हे उभयतां एक घटका बाईजवळ होते. त्यावर हेही उभयतां आपलाल्या घरास आले. आज उद्यां बाईस व माधवरावजीस विचारून काय मथितार्थ कळेल तो मागाहून कासीदजोडीबरोबर विनंतीपत्रें रवाना करीन. आज छ ५ रोजीं इंदुवासरीं मावशीबाईचे येथें पाटीलबावांस मेजवानी आहे. उदईक मंगळवारीं पाटीलबावा कूच करून उज्जनीकडे जाणार, अशी बोलवा आहे. प्रस्तुत पाटीलबावांचे येथें कारभारी आबा व भाई आहेत. बाळाराव कांहीं इतराजीखालीं आहेत ह्मणून ते फौजेंत ठेऊन आले आहेत. राजश्री नारो शिवदेवही बोलत होते जे, पाटीलबावा उज्जनीस चालले ह्मणजे आह्मी निरोप घेऊन पुण्यास जाऊं. उज्जनीस जाणार नाहीं असें बोलत होते. आपाजीरामही निरोप घेऊन पुण्यास जाणार. या उभयतांच्या बोलवा अशा आहेत. पुढें पाहावें कसें होईल. राजश्री तुकोजीबावांकडील वर्तमान येथें ऐकिल्यांत आलें जे, प्रस्तुत खानदेशांतच

आहेत. पुढें कूच होऊन चांदवडास जाणार. तेथें माघमासीं पुत्राचें लग्न करून पुढें पुण्याकडे जाणार. याप्रमाणें देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. लोकांचें देणें व पुढें कालक्षेप चालणें फार होय. संकट जालें आहे. येथें चार दिवस उपासी राहिलें तर कोणी समाचार घेणार नाहीं. धनी कृपाळु समर्थ. चिरंजीव सेवेसी आहेच. कोठें सोय करून देणार स्वामी समर्थ. हे विज्ञप्ति. डांकेचे कासीद उठून नारोपंताजवळ आले होते. खायावांचून हैराण. यांणीं येथून पंधरा रुपये देऊन, थोडें थोडें खावयास देऊन पुन्हा डांकेवर पाठविले. डांकेचाही बंदोबस्त स्वामी करविती हे विनंति."

लेखांक ३६.

पौष शु॥ ९ शके १७०२. **श्री.** ता. ४ जानेवारी इ. स. १७८१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेबांचे सेवेसीं:-

विज्ञापना. स्वामींनीं व राजश्री तात्यांनीं बाईस पत्रें लिहिलीं होतीं. सेवकासही आज्ञापत्र होतें तीं पत्रें दोन्ही सेवकाच्याच लाखोट्यांत होतीं. छ ८ मिनहूस येथें दाखल जालीं. पत्रें वाचून रात्रीं दरबारास जाऊन बाईस एकांतीं सांगितलें. तदोत्तर दों घटकांनीं दरबार बरखास्त केला. बाईचे जवळ बाईचे भाऊ शहाजी पाटील शिंदे व जांवई यशवंतराव फणसे व मी ऐसें बोलत होतों. ते समयींच राजश्री गोविंद रघुनाथ गानू बाईचे खासगी तेही आले. ऐसे पांचजण होतों. गोविंदपंताजवळीच मीं चारी पत्रें दिलीं. त्यांणीं वाचून दाखविलीं. बाईस बहुत संतोष जाला. त्याअन्वयें मीही बाईशीं बोललों. फार खातरजमा केली. माझे पत्रीं धन्याशीं खास दस्तूर लिहिलें होतें जे, घरकलहामुळें सरकारकामांत हरकत होती. तेविशीं बाई बोलली जे, पुण्यांत आमचे तर्फेचे बोलणार श्रीमंतांशीं बोलणें बोलतात. तें ध्यानांत आणून पुर्तेपणें अभिमानयुक्त खातरजमा जालीयास धन्याच्या मनोदयानुरूप पूर्ववत्प्रमाणें चाकरी घडून येईल. हें बोलणें बाई मावशीबाईंच्या विद्यमानें सेवकासीं बोलली आणि कितीक गोष्टी राखूनही बोलली. त्या बोलण्याचे अन्वयें मावशीबाईंनीं एकांतीं सांगितलें जे, बाई व पाटीलबावा हे एकचित्त जाले. माधवराव गंगाधर यांस बोलावूं पाठविलें आहे. ते दों चौं दिवसांनीं येथें आले ह्मणजे हे एकविचारें होऊन फौजेची निगादास्त करणार. पाटीलबावाही येथें येणार. आठ दिवस येथें राहून सारे विचार पक्केपणें करून, फौज ठेऊन डौल दुसरे उभे करणार. हें पक्कें जालीयावर हिंदुस्थान व हा प्रांत व देशीं ऐसे महालो-

महालीं कमाविसदार नवे पाठविणार, व जुने कमाविसदार आहेत त्यांस ताकिदी पाठविणार जे, तुकोजीबावांकडेस कांहीं ऐवज देऊं नये. याप्रमाणें येथील योजना जाली. माधवराव व पाटीलबावा येथें आलीयावर असें होणार. तकारनामकाचे गुण-दोष फार बोलली आहेच. परंतु अतःपर होळकरांचे सरदारीचा जाबसाल फौज ठेवणें, चाकरी करणें व ये दौलतीचा सरंजाम हें सारें बाई आपल्याकडे ओढणार. तुको-जीबावांची चाकरी व त्यांचे फौजेचें देणें सर्व सरकाराकडे. जितके पागे व सरंजामी जुने लोक, तितक्यांचीं आतें बाईकडे कायावाचामनसेंकडून आहेत. बाईचें येथून एक पत्र गेलें ह्मणजे ते निघून बाईकडे येणार, असा प्रकार येथें जाला आहे. परंतु अद्याप मुखेंकडून बोलत नाहींत. दुसरें वर्तमानः—बाईच्या व मावशीबाईच्या बारीक बातम्या तुकोजीबावांचे जवळ निकट आहेत. त्यास तुकोजीबावांचे जाब-साल सुरतेकडेही जात येत आहेत. सुभेदाराजवळ पारसीनवीस पुरुषोत्तमपंत बहुत सुभेदारांच्या मायेममतेंत होते. त्यास प्रस्तुत त्यांचे पुत्र गोविंदराव पुरुषोत्तम आतां तुकोजीबावांजवळ आहेत. त्यांच्या हतें एकांतीं कागदपत्र लिहून सुरतेस जात असतात. या कुटांत मणिरामही —सुमेरसिंगाचा व्याही—तोही आहे. पत्रें यांणीं लिहून द्यावीं आणि मणिरामानें एकांतीं माणसें पाठवून पत्रें पोंहचावून उत्तरें आणवून, तुकोजीबावा व नारोपंत व मणिराम हे तिघे बसून गोविंद पुरुषोत्तम मुनसींनीं वाचून दाखवितात. ते वाचून पाहून तेच समयीं पत्रें सुरतेकडील जाळून टाकितात. याप्रमाणें कुपीया वर्तमान फार एकांतींचें उभयतां बायांजवळ मात्र आहे. दुसरें कोणास ठाऊक नाहीं. हें वर्तमान ऐकूनही बाईस फार संताप जाला आहे. मावशीबाई बाईस बोलली जे, मणिराम दहा लक्ष रुपये माझे घेऊन त्यांच्या कुटांत मिळाला आहे, आणि सुमेरसिंगाबाबद ठेवरेवही मजला ठाऊक आहे. बाई बोलली जे, इतकेंही विठ्ठलपंतांकडून श्रीमंतांस लिहिवा. मावशीबाई बोलली जे, पहिलेंच मीं लिहिविलें आहे; परंतु त्यांजकडून कांहीं जालें नाहीं. तेव्हां बाई बोलली जे, तेथेंही कानच आहेत. तुमच्या गांवाविशीं मीही दोन चार वेळां लिहिविलें होतें. परंतु त्यांणीं सोडले नाहींत. मजकूर थोडका! त्यांणीं इतकी निकड करावी असें कांहींच घडल्यांत आलें नाहीं. परंतु सांगणाराचें ऐकणें येथें फार आहेसें दिसतें. याप्रमाणें उभयतां बाईचीं भाषणें जालीं. मावशी-बाईचें गांव मर्जीस आलें तर सोडणार धनी समर्थ. अखेर कोणी तरी मातबर भीड घालीलच. मावशीबाईशीं मीही बोललों आहें कीं, श्रीमंतांस लिहून गांव सोडवीन. त्या आशेस्तव कितीक बारीक मोठें वर्तमान एकांती त्यांचें, सेवकास कळतें. सेवकाचें वचन निभवणार धनी समर्थ हे विज्ञप्ति.

हें पत्र एकांतीं वाचून जाळून टाकावें."

लेखांक ३७. ता० १० जानेवारी १७८१.

श्रीगजानन. मि० पौष शु॥ १५ शके १७०२.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र १४ मोहरमपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून डांकेबरोबर पाठविलें आहे. सांप्रत स्वामींनीं सेवकास आज्ञापत्र व अहल्याबाईस पत्र चंद्र २३ जिल्हेजचीं पाठविलीं, तीं चंद्र ८ मोहरमीं पावलीं. दोन्हीं पत्रें बाईस वाचून दाखविलीं. बाईनीं आपले पत्राचें उत्तरही दिलें आहे व मी आज्ञेप्रमाणें बोललों. त्यांनीं उत्तरें केलीं जे, देपाळपुर व देवळें या दोही महालचे कमाविसदार आह्मीं जुनेच स्थापिले आहेत. त्यास देवळ्यापैकीं पन्नास हजार रुपये सुलतानजी लांबहत्यास तुकोजीबावांनींच देविले आहेत; व देपाळपुरचे पंधरा वीस हजार रुपये राजश्री बळवंतराव वांकडे यांनीं कमाविसदार ठेवला होता, त्याजकडून वसूल करून घेतले. ते त्यांचे त्यांसच आह्मीं दिले. देपाळपुरचा कमाविसदार बहुत दिवसांचा. त्याजवळून कांहीं अंतरही पडलें नाहीं. दूर करावयास कारण काय? मीं उत्तर केलें जे, तुकोजीबावांनीं आपले फौजेच्या देण्याविषयीं रसदेपैकीं ऐवज त्यांजवळ मागितला. त्यांनीं न दिला. तदोत्तर राजश्री बळवंतराव वांकडे यांजवळून रसदेचा ऐवज घेऊन महाल त्यांजकडेस लावून दिला. देपाळपुर व देवळें दोन्ही महाल बळवंतराव वांकडे यांजकडून ऐवज घेऊन त्यांजकडे सांगितलें. त्याचा ऐवज वसूल न होतां, तुह्मीं कमाविसदार आपले पाठविले. त्याविषयीं श्रीमंतांनीं दोन चार पत्रें लिहिलीं आहेत. त्यास श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें तुकोजीबावांनीं बळवंतराव यांजकडेस महाल सांगितले आहेत. ते त्यांजकडेस बहाल असूं द्यावे. यांत श्रीमंतांची मर्जी बहाल आहे. त्यास बाईनीं उत्तर केलें जे, गुदस्तां शिंद्याच्या वीस लक्षांच्या वराता आल्या, व पुण्याकडील मसलतीस तुकोजीबावा होते, ते वेळेस लाखों रुपये खर्चास तेथें पाठविले आहेत. ज्या सावकारांचे काढून दिले आहेत, त्यांस त्या त्या महालावर वराता दिल्या आहेत. त्यांचा ऐवज न पावतां मामलती काढल्या, तर पुढें सावकार कसें पातेजतील? श्रीमंतांचें येथें काय होतें आहे? मीं उत्तर केलें जे, हीं तुमचीं गृहकृत्यें तुह्मीं नी तुकोजीबावांनी आपल्या घरांत समजावें. जें करणें तें समजून करावें. प्रस्तुत बळवंतराव वांकडे यांनीं ऐवज दिला आहे, त्याची वाट काय? बाई बोलली जे, तुकोजीबावांनीं महालाची घालमेल करणें ती समजून करावी. मीं उत्तर केलें जे यांत बळवंतरायांचा तो आग्रह कांहीं नाहीं. तुमचीं हीं गृहकृत्यें त्यांस काय

ठाऊक? त्यांच्या ऐवजास कोणता उपाय तो सांगावा. बाई बोलली जे, 'घरचा विचार त्यांनीं आह्मीं एकत्र होऊन, आपलें घर देणें घेणें हें पाहून, मामलतीची घालमील करणें ती करावी. तो प्रकार त्यांनीं न करितां आपलीं मनोराज्यें केलीं. परंतु पेशजीं लाखोंच्या वराता ज्या केल्या आहेत, तो ऐवज कोठून द्यावा? मीं उत्तर केलें जें, हा विचार श्रीमंतांकडे अगर बळवंतराव सावकाराकडेस पुसायाचा आहे कीं काय? बाई बोलली जें, सावकाराकडे हा जाबसाल नाहीं. परंतु श्रीमंतांनीं जीं आह्मांस दोन पत्रें लिहिलीं, व तुह्मांस लिहिलीं, तीं कशावरून? त्यांनीं गैरवाका समजाविलें, त्याप्रमाणें धन्यांनीं लिहिलें. परंतु शब्द आह्मांवर स्थापिला कीं, तुकोजीबावा साहेबचाकरीवर आले असतां मागें बाईनीं महालोमहाल घालमील केली. तेव्हां श्रीमंतांच्या चित्तांत विक्षेप पडला कीं, सरकारांत येवढी मसलत पडली असतां ते चाकरीस आले आहेत, आणि बाई सर्वांविषयीं समंजस असतां असें कसें केलें? मीं उत्तर केलें जें, अमें समजलें तेव्हांच पत्रावर पत्रें येत गेलीं. बाई बोलली जें, श्रीमंतांचे येथें करोडीच्या मामलतीच्या रसदा घेतात. मामलेदारांस मामलती देतात. धनी व कारभारी एकमतें कारभार करितात, कीं ज्याच्या चित्तास येईल तें करितात? येविषयींचें त्यांनीं येथें श्रीमंतांस काय समजाविलें असेल तें समजावोत. परंतु कारभार करणें हा एक मताचा आहे. तुकोजीबावा व कारभारी इतके दिवस इंदुरांत होते. त्यांनीं येथें येऊन, आपले घरीं देणें घेणें गृहकृत्य समजून, जें करणें तें करावें कीं नाहीं? श्रीमंतांस हें काय ठाऊक? तत्रापि, तुकोजीबावांनीं गुजराथेंतून येतांच आठ दिवसही घरीं राहूं दिले नाहींत. तसेंच साहेब चाकरीस बोलावून श्रीमंतांनीं नेले. असो. ते चाकरीस गेले, परंतु कारभारी यांनीं येथें येऊन आपले घरांत मागील पुढील देणींघेणीं समजावीं, आह्मांस विचारावें, आह्मी त्यास देणीं घेणीं खर्चवेच कसे जाले, कोणांचीं देणीं घेणीं, पुढें तरतूद कशी काय, कोणी सावकारांस दोन दिवस राहवणें, कोणास तुरुत देणें हें एकमतें घरांत विचार करून मामलतीच्या रसदा घेणें अगर सावकाराच्या आंगीं मामलती लाऊन देणें, हें कारभाऱ्यांनीं आह्मीं एक विचारें करावें कीं मनास येईल तें त्यांणीं करावें, आणि गैरवाका श्रीमंतांस समजावून शब्द नाहकचें आह्मांवर स्थापावें? तरी नीतीचीं चालणीं श्रीमंतांचे येथें चालतात. त्यांचे चाकर आह्मी. आह्मांजवळून अवनीत घडल्यास शब्द लावतीलच. परंतु स्वराज्य अगर परराज्यांत जो कारभार करणें तो धनी कारभारी एकमतें करितात. असो. श्रीमंतांस काय ठाऊक? तुकोजीबावा व कारभारी गाढ मसलतीस टाकोटाक जाऊन सामील जाले आहेत

आणि आह्मीं येथें महालांची घालमील केली ह्मणून श्रीमंतांस समजाविलें, त्या अर्थीं त्यांनीं पत्रें पाठविलीं! बरें, श्रीमंतांची आज्ञा आह्मांस शिरसा वंद्य आहे. दोही महालांची घालमील केली ती केलीच. पुढें दुसऱ्या महालांची घालमील करीत नाहीं. परंतु पुरतेपणें श्रीमंतांनींही समजावें. याप्रमाणें उत्तरें प्रतिउत्तरें जाहलीं. बाईनींही सेवेसीं पत्रें लिहिलीं आहेत. वरकड इकडील राजकीय वर्तमान आलाहिदा विनंतीपत्रीं लिहिलें आहे. सविस्तर श्रवणारूढ होईल. श्रीमंत राजश्री रावसाहेबांस अहिल्याबाईनीं मेवे जात नासपातां फळें सुमार सहा पेटारींत चार व गलेफी दोन एकूण सहा पाठविलीं आहेत. हे सरकारचे कासीदजोडीबरोबर पाठविलीं आहेत. हीं सेवेसीं पावतील. मेवा पावल्याचें उत्तर बाईस पाठविणार स्वामी समर्थ. वोा राजश्री गबाभटजी कसरावदच्या मामलतीकरितां सेवेसीं आले आहेत. पावले असतील. चिरंजीवाची सोय कोठें जाली नाहीं. कृपा करून या महालांत एखादी असामी धन्यांनीं करून दिली तर धन्यांची मर्जी. माझे गरिबाविषयीं विनंती करायास कोण जाहे? घरीं मुलेंमनुष्यें अन्नवस्त्रांवांचून व कर्जदारांच्या वगैरे उपद्रवानें फार हैराण आहेत. चिरंजीवही दीड वरीस सेवेंत आहे. अद्याप कोठें सोय जाली नाहीं. हे श्रम कोणाजवळ सांगावे? स्वामीशिवाय करुणा कोणास येईल? सर्वज्ञाण धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ३८. ता० ११ जानेवारी इ. स. १७८१.

पैा छ २७ मोहरम इहिदे समानीन. **श्रीगजानन.** मि० पौष वा। १ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १५ मोहरमपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुा महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून डांकेबरोबर छ ६ मिनहूस येथून रवाना केलीं आहेत. राजश्री पाटीलबावा येथें आले होते. त्यांस अहिल्याबाईशीं व पाटीलबावा व राणेखान या त्रिवर्गाशीं येथें दोन एकांत जाले. त्यांत बाईनीं पाटीलबावांस बोध करून निश्चितार्थ ठरविला कीं, येथून उज्जनीस जाऊन येथें बंदोबस्त करून, पुढें शिप्री कोल्हारसावर पलटणें आलीं आहेत, त्यांजकडे फौजेची रवानगी करून माघ शुद्ध प्रतिपदेस येथें येतों. येथून वसंतपंचमीचे मुहूर्तें निघून दरमजल श्रीमंतांच्या दर्शनास जाऊं. याप्रमाणें करार ठरवून, बाईनीं फार प्रकारें सांगितलें की, आपण ये मसलतीस तेथें जात नाहीं तर जन्मपरीयंत श्रीमंतांचा व जघन्याचा शब्द आपल्यास लागेल. इकडील पलटणें

आलीं आहेत. या मसलतीची सरबराई मजकडे लागली. तुह्मीं तिकडे आंबाजी इंगळे पाठविलेच आहेत. आह्मींही त्रिंबकजी इंगळे तयार केले आहेत. पांच सात हजार फौज त्यांजबरोबर देऊन तिकडे पाठवितों. परंतु तुह्मीं आह्मीं इकडील संधान राखणें मुख्य गोष्ट होय. पाटीलबावांनींही शपथपूर्वक कबूल करून, पाऊण महिन्यांनीं फिरून येतों असा करार ठरवून, छ ६ मिनहूस आठा घटका आंत पाटीलबावा निरोपास वाड्यांत आले. निरोपसमयीं बाईनीं पाटीलबावांस पैठणी शेलापागोटें व चिकडी (?) जामेवार व किनखाप याप्रमाणें वस्त्रें दिल्हीं, व दोन सोन्याचीं कडीं व जडावाचा शिरपेंच व जिगा एकूण तीन दागिने बहुमान दिल्हा. हत्ती देण्यास आणिला होता, तो पाटीलबावांनीं घेतला नाहीं. घरचे घरीं कशास, हे आहेत माझेच आहेत, असें बोलले. निरोप घेऊन उज्जनीस दरमजल गेले. राजश्री नारो शिवदेव येथूनच पाटीलबावांचा निरोप येऊन येथेंच राहिले, कीं नारो शिवदेव यांणीं पुण्यास दरमजल यावें व सदाशिवपंत दाजी यांणीं बराणपुरीं रहावें. पाटीलबावा इकडून देशास चालतील, त्यांजबरोबर त्यांणीं देशास यावें. याप्रमाणें निश्चय जाला होता. येथेंच मुक्काम करून राहिले होते. परंतु पाटीलबावा जे दिवशीं येथून गेले, तेच दिवशीं रात्रीं डांकेबरोबर सरकारचीं पत्रें नारो शिवदेव यांस आलीं. ते मशारनिल्हेनीं वाचून पाहून, ते पत्रें देऊन रातोरात सदाशिवपंत दाजीस पाटीलबावांकडेस पाठविलें. तेथें त्यांची सरकारपत्रांच्या अन्वयें काय मसलत जाली असेल हें न कळे. सदाशिवपंत दाजी त्रितीय प्रहरीं दुसरे दिवशीं छ ७ रोजीं आले. छ ८ रोजीं येथें मुक्काम केला. त्रितीय प्रहरीं चार घटका बाईचा व नारोपंताचा एकांत जाला. तदोत्तर उभयतांस वस्त्रें देऊन बिदा केलें. छ ९ मिनहूस प्रातःकालीं कूच करून उज्जनीकडे गेले. राणेखान व आबा चिटणीस यांस तीन तीन वस्त्रें दिल्हीं, व शेंपन्नास लोकांस दोन दोन वस्त्रें बाईनीं दिलीं. पाटीलबावा येथून करार करून गेले आहेत. परंतु काल पत्रें सरकारचीं आलीं आहेत, त्यावरून उज्जनीस काय मसलत ठरेल ते पहावी. येथें तों बाईनीं बहुत प्रकारें पाटीलबावांस सांगून पुण्याकडेस जावें अशी मसलत करारांत आणली होती. इतःपर पहावें कशी मसलत उज्जनीस होईल तें. तेथून स्वामींस लिहितील. येथेंही कळल्यावर सेवेसीं लिहीन. स्वामींनीं दोन तीन आज्ञापत्रें सेवकास व अहिल्याबाईसही दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बाईचीं पत्रें व माझीं पत्रें ऐसीं सारींच बाईस एकांतीं वाचून दाविलीं. जाबसालही केला जे, राजश्री तुकोजीबावा साहेबचाकरीवर गेले आहेत. त्यांणीं येथें महालोमहालीं

कमाविसदार ठेऊन बंदोबस्त करून गेले आहेत. त्यांचे कमाविसदार दूर करून आपण आपले कमाविसदार पाठविले. येविशीं महालीं कमाविसदारांची घालमेल न करावी ह्मणून श्रीमंतांनीं मजलाही दोनचार आज्ञापत्रें पाठविलीं जे, बाईस सांगून महालीं घालमेल न होय आणि येथें तुकोजीबावांचे चित्तांत किंतू पडून सरकारमसलतीस विपर्यास पडेल असें करूं नये. आपल्यासही दोन पत्रें सरकारचीं आलीं आहेत. सांप्रत कोंकणांत मसलत भारी आहे. ये समयीं तुह्मीं सर्वांनीं एकदिल होऊन अर्थप्राणें ते मसलतीवर नमूद व्हावें. तत्रापि, तुकोजीबावा आहेत त्यांच्या चित्तास विकल्प होय, असें तुह्मीं येथें न करावें. तत्रापि श्रीमंतांचीं पत्रें वरचेवर येत असतां आपण त्याप्रमाणें न करावें हें उचित नाहीं. बाई बोलली जे, 'श्रीमंतही वरचेवर पत्रें पाठवितात. तुह्मी येथें आह्मांसीं रागें भरून बोलतां. त्यास पहिलें पत्र श्रीमंतांचें आलें, ते वेळेस आह्मीं तुह्मांस सांगितलें आहे आणि आतांही सांगतों जे, श्रीमंतांची आज्ञा आह्मांस लक्षोपलक्ष वेळ शिरसा वंद्य आहे. सरकारचें पत्र आलें त्यापासूनच आह्मीं घालमेल मना केली. एक देपाळपुर व देवळें या दोही महालांचे कमाविसदार पहिले होते तेच आह्मीं बहाल केले. कां कीं देपाळपुरचा कमाविसदार तीस चाळीस वर्षांचा. तो दूर करायास कारण कांहीं नव्हतें. तत्रापि बळवंतराव वांकडे यांजकडील कमाविसदारांनीं पंचवीस तीस हजार वसूल घेतला आहे तो कोणीं त्यांजवळून घेतला नाहीं. त्याजकडेच ऐवज दिल्हा. देवळ्याचे पन्नास हजार रुपये तुकोजीबावांनींच लांबहात्यास देविले आहेत. असें असतां येथून तेथवर बोभाट. श्रीमंतांचीं पत्रें वरचेवर दो महालांसाठीं यावीं. देशीं महाल आहेत त्या महालचा पैका तिकडेच जात आहे. त्यांची देशच्या महालांची अगर खानदेशच्या महालांची वगैरे महालांची आह्मीं घालमेल श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें कांहीं केलीच नाहीं. गुदस्तां विसा लक्षांच्या शिंद्यांच्या वराता आह्मांवर जाल्या. पुण्यांतील मसलतीवर होते, ते समयीं साहुकारापासून कर्जे काढून लाखोंच रुपये खर्चास पाठविले. त्या साहुकारांस व वरातदारांस पैका दिला पाहिजे कीं नको? श्रीमंतांचे येथेंही फौजेचेच कारभार होतात. तेथेंही साहुकारांचीं देणीं घेणीं श्रीमंत करितात. जागां जागां सचोट्या राखितात. तेव्हां दौलतीचे कारभार येवढाले चालले आहेत. श्रीमंत सर्व जाणत आहेत. परंतु इतका निग्रह बळवंतराव वांकडे यांचा आहे. त्यांचा पैका वसूल जाला पाहिजे. या अर्थी त्यांची भीड ह्मणून वरचेवर श्रीमंतांस विनंती करून पत्रे पाठवितात. त्यांस मंत्रोपदेशीही दुसरेच आहेत. असो. श्रीमंत मसलतशीर आहेत. अधिक विस्तार काय बोलावें? इतके दिवस श्रीमंतांस वर्तमान

कळतच गेलें आहे. सविस्तर वर्तमानास माहितगारी श्रीमंतांस आहे. परंतु प्रस्तुत आतांचे पत्रीं आज्ञापिलें आहे कीं, तुकोजीबावा येतांना भेटून आले नाहींत ह्मणून चित्तांत राग कां आणावा, असें श्रीमंतांनीं लिहिलें आहे. त्यास त्यांणीं सुलतानजी लांबहाते पाठविलेच होते कीं भेटीस येतों. परंतु स्वामिचाकरीपेक्षां भेटीचें कार्य अधिकोत्तर नाहीं. यास्तव आह्मींच येऊं दिल्हे नाहींत, कीं तुह्मीं साहेबचाकरीस जाणें. न भेटून गेले येविशींचा अन्य भाव आमच्या चित्तांत नाहीं. मुख्य स्वामिकार्य आह्मांस अगत्य. तुकोजीबावा तर अद्याप खानदेशांत. आतांसे चांदवडास गेले असतील. अद्याप कोणत्या मसलतीस गेले नाहींत. खामखा वसईचें ठाणें कायम करायास गेले होते, आणि तेथें दोही महालांची घालमेल ऐकून, चित्ताची विक्षेपता होऊन, मसलत टाकून पुन्हां चांदवडास आले, असें तरी जालें असतें तर हें असो. श्रीमंतांचे पत्रें बरजाहा होती. असो. प्रस्तुत दोही महालची घालमेल जाली. अतःपर श्रीमंतांची आज्ञा मान्य. दुसरी घालमेल होणार नाहीं. येथीलही देण्याची ओढ सर्व श्रीमंतास विदित आहे.' याप्रमाणें जावसाल जाले."

लेखांक ३९. ता० १२ जानेवारी इ. स. १७८१.

पो. छ. २८ मोहरम. **श्रीगजानन.** मि० पौष व॥ २ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराव चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १६ मोहरमपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून डांकेबरोबर छ ६ मिनहूस येथून रवाना केलीं आहेत. राजश्री पाटीलबावा येथें आले होते. त्यास अहिल्याबाईशीं व पाटीलबावा व राणेखान या त्रिवर्गाशीं येथें दोन एकांत जाले. त्यांत बाईनीं पाटीलबावांस बोध करून निश्चितार्थ ठरविला कीं, येथून उज्जनीस जाऊन तेथें बंदोबस्त करून पुढें सिप्री कोल्हारसावर पलटणें आलीं आहेत त्याजकडे फौजेची रवानगी करून, माघ शु॥ प्रतिपदेस येथें येतों. येथून वसंतपंचमीस मोहतें निघोन दरमजल श्रीमंतांच्या दर्शनास जाऊं. याप्रमाणें करार ठरवून, बाईनीं फार प्रकारें सांगितलें कीं, आपण ये मसलतीस तेथें जात नाहीं, तर जन्मपर्यंत श्रीमंतांचा व जघन्याचा शब्द आपल्यास लागेल. इकडील पलटणें आलीं आहेत, या मसलतीची सरबराई मजकडे लागली. तुह्मी तिकडे आंबाजी इंगळे पाठविलेच आहेत. आह्मींही त्रिंबकजी इंगळे तयार केले आहेत. पांच सात हजार फौज त्यांजबरोबर देऊन तिकडे पाठवितों. परंतु तुह्मीं इकडील संधान राखणें मुख्य

गोष्ट होय. पाटीलबावांनींही शपथपूर्वक कबूल करून, पाऊण महिन्यांत फिरून येतों असा करार ठरावून, छ ६ मिनहूस आठ घटका आंत पाटीलबावा निरोपास वाड्यांत आले. निरोपसमयीं बाईनीं पाटीलबावांस पैठणी शेलापागोटें व चिकडी जामेवर व किनखाफ याप्रमाणें वस्त्रें दिली, व दोन सोन्याचीं कडीं व जडावाचा शिरपेंच व जिगा ऐसे तीन दागिने बहुमान दिल्हा. हत्ती देण्यास आणिला होता, तो पाटीलबावांनीं घेतला नाहीं. 'घरचे घरीं कशास. हे आहेत माझेच आहेत.' असें बोलले. निरोप घेऊन उज्जनीस दरमजल गेले. राजश्री नारो शिवदेव येथूनच पाटीलबावांचा निरोप घेऊन येथेंच राहिले की, नारो शिवदेव यांणीं पुण्यास दरमजल यावें व सदाशिवपंत दाजी यांणीं बराणपुरीं रहावें. पाटीलबावा इकडून देशास चालतील त्यांजबरोबर त्यांणीं देशास यावें. याप्रमाणें निश्चय जाला होता. येथें १ मुक्काम करून राहिले होते. परंतु पाटीलबावा जे दिवशी येथून गेले, तेच दिवशीं रात्रीं डांकेबरोबर सरकारचीं पत्रें नारो शिवदेव यांस आलीं. तें मशारनिल्हेनीं वाचून पाहून ती पत्रें देऊन रातोरात सदाशिवपंत दाजीस पाटीलबावांकडेस पाठविलें. तेथें त्यांची सरकारपत्रांच्या अन्वयें काय मसलत जाली असेल हें नकळे. सदाशिवपंत दाजी तृतीय प्रहरीं दुसरे दिवशीं छ ७ रोजी आले. छ ८ रोजीं येथें मुक्काम केला. तृतीय प्रहरीं चार घटका बाईचा व नारोपतांचा एकांत जाला. तदोत्तर उभयतांस वस्त्रें देऊन बिदा केलें. छ ९ मिनहूस प्रातःकाळीं कूच करून उज्जनीकडे गेले. राणेखान व आबा चिटणीस यांस तीन तीन वस्त्रें दिलीं व शेपन्नास लोकांस दोन दोन वस्त्रें बाईनीं दिल्हीं. पाटीलबावा येथून करार करून गेले आहेत. परतु काल पत्रें सरकारचीं आली आहेत, त्यावरून उज्जनीस काय मसलत ठरेल, ते पाहावी. तेथें तों बाईनीं बहुतां प्रकारें पाटीलबावांस सांगून पुण्याकडेस जावें अशी मसलत करारांत आणिली होती. इतःपर पाहावें कशी मसलत उज्जनीस होईल तें. तेथून स्वामींस लिहितील. येथेंही कळल्यावर सेवेसीं लिहीन. श्रीमंतांनीं दोन तीन आज्ञापत्रें सेवकास व अहल्याबाईसही दोन पत्रे पाठविलीं, ती पावलीं. बाईचीं पत्रें व मार्ग्गीं पत्रें अशीं सारींच बाईस एकांतीं वाचून दाखविलीं. जाबसालही केला जे, राजश्री तुकोजीबावा साहेबचाकरीवर गेले आहेत. त्यांनीं येथें महालोमहालीं कमाविसदार ठेवून बंदोबस्त करून गेले आहेत. त्यांचे कमाविसदार दूर करून आपण आपले कमाविसदार पाठविले, येविसीं महालीं कमाविसदारांची घालमेल न करावी. म्हणून श्रीमंतांनी मजलाही दोनचार आज्ञापत्रे पाठविलीं जे, बाईस सागून महालीं घालमेल न होय आणि येथें तुकोजीबावांचे चित्तात किंतू पडून सरकारमसलतीस विपर्यास पडेल, असें करूं नये. आपल्यासही दोन पत्रें सरकारचीं आलीं आहेत.

सांप्रत कोंकणांत मसलत भारी आहे. ये समयीं तुह्मीं सर्वांनीं एकदिल होऊन अर्थप्राणें ते मसलतीवर नमुद व्हावें. तत्रापि तुकोजीबावा गेले आहेत. त्यांच्या चित्तास विकल्प होय असें तुह्मीं येथें न करावें. तत्रापि श्रीमंतांचीं पत्रें वरचेवर येत असतां आपण त्याप्रमाणें न करावें, हें उचित नाहीं. बाई बोलली जे श्रीमंतही वरचेवर पत्रें पाठवितात. तुह्मीं येथें आह्मांसी रागें भरून बोलतां. त्यास पहिलें पत्र श्रीमंतांचें आलें. ते वेळीं आह्मीं तुह्मांस सांगितलें आहे आणि आतांही सांगतों कीं, श्रीमंतांची आज्ञा आह्मांस लक्षोपलक्ष वेळ शिरसा वंद्य आहे. सरकारचें पत्र आलें त्यापासूनच आह्मीं घालमेल मना केली. एक देपाळपुर व देवळें या दोही महालीं कमाविसदार पहिले होते तेच आह्मीं बहाल केले. कां की देपाळपुरचा कमाविसदार तीस चाळीस वर्षांचा, तो दूर करायास कारण कांहीं नव्हतें. तथापि बळवंत राव वांकडे याजकडील कमाविसदारांनीं पंचवीस तीस हजार रुपये वसूल घेतला आहे. तो कोणीं त्याजवळून घेतला नाहीं. त्याजकडेच ऐवज दिल्हा. देवळ्याचे पन्नास हजार रुपये तुकोजीबावांनींच लांबहत्यास देविले आहेत. असें असतां येथून तेथवर बोभाट. श्रीमंतांची पत्रें वरचेवर दो महालांसाठीं यावीं. देशी महाल आहेत त्या महालांचा पैका तिकडेच जात आहे. त्याची देशच्या महालांची अगर खानदेशच्या महालांची वगैरे महालांची आह्मीं घालमेल श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें आह्मीं कांहींच केली नाहीं. गुदस्तां विसा लक्षांच्या शिंद्यांच्या वराता आह्मांवर जाल्या. पुण्यांतील मसलतीवर होते ते समई साहुकारापासून कर्ज काढून लाखोंच रुपये खर्चास पाठविले. त्या सावकारांस व वरातदारांस पैका दिल्हा पाहिजे कीं नको? श्रीमंतांचे येथेंही फौजेचे कारभार होतात. तेथेंही सावकारांचीं देणीं घेणीं श्रीमंत करितात. जागां जागां सचोटी राखितात. तेव्हां दौलतीचे कारभार येवढाले चालिले आहेत. श्रीमंत सर्व जाणत आहेत. परंतु इतका निग्रह बळवंतराव वांकडे यांचा आहे. त्यांचा पैका वसूल जाला पाहिजे. या अर्थी त्यांची भीड ह्मणून वरचेवर श्रीमंतांस विनंती करून पत्रें पाठवितात. त्यांस मंत्रोपदेशीही दुसरेच आहेत. असो. श्रीमंत मसलतशीर आहेत; अधिक विस्तार काय बोलावें? इतके दिवस श्रीमंतांस वर्तमान कळतच गेलें आहे. सविस्तर माहितगिरी श्रीमंतांस आहे. परंतु प्रस्तुत आतांचे पत्रीं आज्ञापिलें आहे की, तुकोजीबावा येतांना भेटून आले नाहींत ह्मणून चित्तांत राग कां आणावा? असें श्रीमंतांनी लिहिलें आहे. त्यास त्यांणीं सुलतानजी लांबहाते पाठविलेच होते की, भेटीस येतों. परंतु स्वामिचाकरीपेक्षां भेटीचें कार्य अधिकोत्तर नाहीं यास्तव आह्मींच येऊं दिल्हे नाहींत, की तुह्मीं साहेबचाकरीस जाणें. न भेटून गेले येविसींचा अन्यभाव आमच्या चित्तांत नाही. मुख्य स्वामिकार्य

आह्मांस अगत्य. तुकोजीबावा तर अद्याप खानदेशांत. आतांसे चांदवडास गेले असतील. अद्याप कोणत्या मसलतीस गेले नाहीं. खामखा वसईचें ठाणें कायम करावयास गेले होते आणि तेथें दोहों महालची घालमेल ऐकून चित्ताची विक्षेपता होऊन मसलत टाकून पुन्हां चांदवडास आले, असें तरी जालें असतें तर हें असें श्रीमंतांचें पत्रें बरजहा होतीं. असो. प्रस्तुत दोही महालची घालमेल जाली. अतःपर श्रीमंतांची आज्ञा मान्य. दुसरी घालमेल होणार नाहीं. येथीलही देण्याची वोढ सर्व श्रीमंतांस विदित आहे.' याप्रमाणें जाबसाल जाले.* इकडे शिप्री कोलारसावर चार पलटणें इंग्रजांचीं आहेतच. मागाहून आणखी चार पलटणें व कांहीं राजेरजवाड्यांचीही फौज तीन चार हजार ऐसें एकत्र होऊन कोट्यापलिकडे चारमजली शाहाबाजेस आले आहेत. पुढें या पलटणांत सामील होण्यास येतात ह्मणून येथें वदंता आहे. राजश्री बावा येथून बाईसी करार करून गेले आहेत कीं तिकडील बंदोबस्त करून महिन्या पाऊण महिन्यांत लवकरीच येथें येतों. येथून देशास दरमजल श्रीमंतांच्या दर्शनास जाऊ, असा करार करून गेले आहेत. त्यास अलीकडे सरकारचीं पत्रें राजश्री नारो शिवदेव यांजकडे आलीं आहेत; आणि नारोपंतीं निरोप घेऊन देशास जात होते ते माघारी पाटीलबावांनीं बोलावून घेतले. यास्तव संदेह जाला आहे कीं, पाटीलबावांस तिकडीलच मसलतीची श्रीमंतांनीं आज्ञा दिली कीं काय असें भासतें. प्रस्तुत बाईनींही त्रिबकजी इंगळे तयार केले आहेत. चार पांच हजार फौज देऊन हिंदुस्थानाकडे व पलटणाच्या तोंडावर पुढें पाठवणार. तेथेंही ओढ फार जाली आहे. देण्याचे फौजेचे व सावकारांचे गरगसे पडले आहेत. परंतु बाईचें लक्ष हा वेळपर्यंत श्रीमंतांकडेच आहे. दुसरा अर्थ किमपि नाहीं. याप्रमाणें इकडील वर्तमान. बाई आपलें स्मरण हरवक्त करीत असतात. दोन तीन वेळां मजला विचारिलें जे तात्या कोंकणांत गेले आहेत. त्या तात्यांचें पत्र येत नाही. तुह्मांस तरी पत्र येतें कीं नाहीं? मीं उत्तर केलें जे, एक पत्र आलें होतें, त्या तागाईत अद्याप पत्र आलें नाही. तिकडे लढाईचाही मजकूर शंभरा जागांची (फाटलें आहे.) बाई बोलली जे, त्याच ब्राह्मणांचा हक्क होय की हें दौलतीचें ओझें, धनी लहान, पदरीं पैका नाही, असेंही असतांना चारी संधानें राखितात. जो ज्याचा कागदपत्र येईल त्याचें स्मरणपूर्वक उत्तर देणें, चहूंकडील मसलतीचीं संधानें राखणें, हे आवरणशक्त त्यांचीच होय. असा बहुत

* या पत्रातील येथपर्यंतचा मजकूर लेखांक ३८ च्या मजकुराची पुनरुक्ति आहे. लेखांक ३८ व ३९ याच्या तारखा भिन्न असून हा दुबार मजकूर कसा आला ते समजत नाहीं. हे पत्र मूलाप्रमाणें छापले आहे, सबब हा दुबार मजकूरही तसाच कायम ठेविला आहे.

प्रकारें स्तव केला. कोणी येणाराबरोबर बाईसही एखादें पत्र येत असावें. चिरंजिवांनीं लिहिलें होतें की, अद्याप कोठें अन्नाची सोय नाहीं. त्यास ताल्या आपल्याशिवाय आमचा वशिला कोण? लोकांच्या देण्याची व घरसंसाराची अन्नवस्त्राचें फार संकटांत आहे. आपण सर्व जाणतात. आपल्याशिवाय आमची गरिबाची ममता कोणास येईल? गरीब अनाथ स्वामींच्या पदरचे. असो. श्रीगजानन आपल्यावर कृपावंत असो हे विज्ञप्ति."

पैवस्ती छ २८ मोहरम, इहिदे समानीन. **लेखांक ४०.** **श्रीगजानन.** ता. १७ जानेवारी इ. स. १७८१. मि० पौष वय ८ शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २१ मोहरमपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं लिहून काशीदजोडीबरोबर व डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सांप्रत सरकारचे आज्ञापत्र छ १३ मिनहूचें डाकेबरोबर आलें तें छ २० मिनहूस येथें पावलें. पत्रार्थ पाहून वाचून बाईस वर्तमान सविस्तर विदित केलें. बाई बोलली जे, एतद्विषयीं श्रीमंतांनीं ममतापुरस्कर चारपांच पत्रें तुह्मास व दोन पत्र आह्मांसही पाठविलीं. या अन्वयाचीं उत्तरें आह्मीही लिहून तुह्माजवळीच दिलें आहे. तुह्मींही पाहिलें ऐकिलें ते लिहिलेंच असेल. मग हरघडी तोच मजकूर श्रीमंत कशास लिहितात? असें बोलली. मीं उत्तर केलें जे, श्रीमंत मसलतशीर आहेत. तुकोजीबावा चाकरीस गेले आहेत. येथें आपण मामलतीची घालमेल केल्यानें येथें त्यांच्या चित्तास विक्षेप होईल. असें होऊं नये या अर्थी वारंवार आज्ञापत्रे येतात. 'गृहकृत्याचे जाबसाल होऊन येयास पुढें दिवस उदंड आहेत.' बाई बोलली जे, 'साहेबचाकरी घडून यावी हेच आमचेंही लक्ष आहे. इतका जावसाल जाला. येथील देखिलें ऐकिलें वर्तमान स्वामी वारंवार आज्ञापत्रीं आज्ञापितात जे, बाईनीं सांगितल्यावरून तुकोजीबावास चाकरीस बोलविलें आहे. यांतील अर्थ की, बाईच्या बोलण्याअन्वये स्वामींनीं त्यांस बोलाविलें. पहिलें कितीक प्रकारचीं तापत्रयें गृहकृत्यें सेवेसी लिहिली आहेत. तो मतलब साराच गाळल्यांत आला. प्रस्तुत येथील मामलतीविषयींची घालमेल न व्हावी, तुकोजीबावांचें मन दुखवेल, येविषयीं ममता येथें पेशजी त्यांस खर्चास पाठविलें आहे व वरातदार शिंद्यांकडील वगैरे साहुकाराच्या देण्याचे दगे धरणी नित्य बसतात, येविषयींची ममता कोणास यावी? धन्याचे येथेही फौजांचीं ठेवणी व देणींघेणीं सर्व आहेत. त्यांचे निकाल व हिशेबकितेब पाहाणें, दिवाण कारभाऱ्यांसीं विचार करणें, हें कामें हमेश परदरबारांत आहेत. स्वामी सर्व जाणतात.

असा राजमार्गाचा पथ तेथीलच. सर्वोठायीं उपदेश असें असतां तुकोजीबावा साहेबचाकरीस गेले हें उत्तमच आहे. परंतु येथून फौजेचा पुरवठा करणें अगर खर्चावेंचाची त्यांची तरतूद करणें हें दिवाण कारभाऱ्यांनीं आह्मीं बसून आपले घरदार देणें घेणें अदबशाद पाहून तरतूद करावी की नको? येविषयीं नारो गणेश यांनीं येथें यावें, आह्मांस त्यांनीं पुसावें, आह्मीं त्यांस सांगावें, त्यांनीं आह्मांस हिशेब दाखवावा, खर्चजमा आपले घरीं पहावी, पुढें तरतूद करणें ते करावी. हे अन्वय सर्व पेशजीं लिहिल्यावरून स्वामीच्या ध्यानांत आलेच असतील. परंतु राजश्री बळवंतराव वांकडे व रखमाजी दादाजी याच्या सांगितल्यावरून तो सारा मजकूर गाळून हेंच वारंवार धनी लिहितात. येविषयींचें धनी काय उत्तर आज्ञापितात, ते श्रवण होयाचें मानस. दुसरें तुकोजीबावाच धनी. बाईचें या दौलतीत कांहींच नाहीं. जें नारोपंत सांगतील तेंच प्रमाण. असें असल्यास हेही आपली पुढें काय तरतूद करणें ते करितील. येविषयींची जी काय आज्ञा ते आली पाहिजे. नाहींतर तुकोजीबावा चाकरीस आलेच आहेत. नारोपंतांस येथें पाठवावें. ते येथें आल्यास येथून सारेच गोष्टीचा पुरवठा तुकोजीबावांचा होईल. तुकोजीबावा एक चाकरीचेच धनी. कारभाऱ्यांच्या चित्तास येईल तसें यांनीं करावें. शेवटी घन्याजवळ हाका माराव्या की, बाईनेंच सर्व आकर्षण केलें आहे. फौजेस देयास नाहीं. कर्जे जालीं आहेत. हे (फाटलें आहे) गुण. स्वामिसेवा घड होऊं नये. दरवारांत मनास येईल तर दरबारखर्च कारभाऱ्यांनीं करावे. त्या आशेनें सर्वत्रांनीं एकवाक्यताच घन्याजवळ बोलावी. तेंच प्रतिपाद्य व्हावें. दुसऱ्यावर दुरारोप स्थापावे अशी मूळचीच मर्जी असल्यास येथीलही ईश्वर समर्थ आहे. येथील मर्जी कीं, स्वामिकार्य यथास्थितप्रमाणें वडील करीत आले त्याप्रमाणें घडावें. तें कांहींच न घडतां, मनांत येईल, तें खर्च करून, शेवटीं स्वामिकार्यांत विघड पडावे, वडिलाच्या नांवास बट्टा लागावा, दुरारोप दुसऱ्यावर स्थापावे, इतकेही प्रकार स्वामीच्या ध्यानांत आहेत. रतु त्यांचे भिडेस्तव व सर्वांचे एकवाक्यतेमुळें मुलाजा सर्वांचा तोडवत नाहीं, ह्मणून स्वामी वारंवार असें लिहितात. इतक्या राज्यांची आक्रमशक्ति व इंगितें स्वामींच्या ध्यानांत आहेत. हेंही इंगीत न कळे, असे कोण गोष्ट? इतके दिवस पाटीलबावांचा आश्रा जाला. आतां मुख्य स्थळीं आर्जव मांडलें आहे. परंतु धनी सर्वज्ञ आहेत. येविषयींचें मनन काय तें करून, मजकूर न गाळितां उत्तर आज्ञापिणार धनी समर्थ. दुसरा मजकूर लगट चार पांच पत्रें आलीं त्यांवरून येथें यांच्या चित्तांत वैषम्य फार वाढलें आहे. येथील तात्पर्य असें दिसून येतें जे, उज्जनी व महेश्वर एकदिल होऊन पुढें काय कर्तव्यता ते करावी. केवळ बोलण्यांत हें नाहीं. अंतस्थ मानस

असेंच दिसतें. इतके दिवस यांचे एकनिष्ठतेस व ममतेस अंतर देखिल्या ऐकिल्यांत आलें नाहीं. प्रस्तुत सेवकाशींही आतां बोलण्याचालण्यांत पडदासा दिसतो. आपल्या चित्तांत फार श्रमी आहेत कीं, श्रीमंतांस दिवाणाचें अगत्य पडलें. त्याच्या सांगितल्यावर तेंच खरें असें मानून आमचे ठायीं अनास्था. कोणे वेळेस बोलण्यांत आलें आहे कीं, शिंद्यांनीं बायकांच्या मेखा खांदाडीस दिल्या, तसें येथें होणार नाहीं. सुभेदारांच्या पुण्यप्रतापे जें घडणें तें यथायोग्यच घडेल. असें दोन चार वेळां भाषणें जालीं आहेत. प्रस्तुत राजश्री बाजी विठ्ठल व आपाजी गिते काल उज्जनीस गेले आहेत. ऐकिल्यांत तों आले आहे की, पाटीलबावांस येथे बाईनीं बहुत प्रकारें सांगितलें आहे की, श्रीमंतांवर मसलत भारी, यास्तव सर्व कामें टाकून फौजेसुद्धां तिकडे जावें. त्यांनीही कबूल करून गेले आहेत कीं, तिकडे बंदोबस्त करून एक-महिन्या पाऊण महिन्यांत येतों. तें वचन बळकट आहे किंवा नाहीं, यास्तव बाजी विठ्ठल गेले आहेत असें ऐकितों. इकडील वर्तमान इंग्रेज शिप्री कोल्हारसावर चार पलटणें आहेत व कोटें प्रांती चार पलटणें आलीं आहेत ह्मणून वदंता व केसो कृष्ण ईश्वरवाडीस आहे. नंदुरबादेपासून बारा कोसांवर आहे. दोन हजार जमाव आहे व मागाहून तीन पलटणें व चार हजार फौज गायकवाडांची ऐसें सोनगडावर आले. हें खरें वर्तमान आहे. पायगड प्रांतींही दोन तीन पलटणें आलीं ह्मणून वदंता आहे. खानदेशांत नंदुरबार सुलतानपुर वगैरे तमाम लोक पळतात. याप्रमाणें इकडील वर्तमान. मणिराम शेवगांवचाले ह्यांनीं हरकुबाईचे दहा लक्ष रुपये घेऊन गेले आहेत. तेही नारोपंतांची पाठ निघाले आहेत. हरकुबाईनें दोन चार पत्रें त्यांस इंदुरीं व येथें त्यांस पाठविलीं कीं, भेटीस येणें. तेही यांस न भेटतां गेले. प्रस्तुतची रीत अशी जाली आहे. ह्मणून बोलत होती. याविषयीं पेशजीही मीं विनंति लिहिली होती. स्वामींच्या ध्यानांत असेल. याप्रमाणें मीं लिहिली ह्मणून स्वामी रागें भरतील की, काय? परंतु देखिलें ऐकिलें वर्तमान लिहिलें तर स्वामी रागें भरतील. या पत्राचें उत्तर तपशीलवार येण्याविषयीं लेखकास आज्ञा करणार धनी समर्थ. मर्जीस आलें तर बाईस पत्र समाधानयुक्त यावें. केवळ मनोकल्पित वर्तमान लिहिलें असें नाहीं. बाईचे रुबरू मुत्सद्दी मंडळीशीं सेवकासीं जाबसाल जाले. तें तपशीलवार वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. राजश्री त्रिंबकजी इंगळे यांस छ १९ रोजीं बाईनें वस्त्रें दिलीं. तीन हजार फौज तयार करून त्यासमागमें देऊन हिंदुस्थानांत रवाना केले. एका दो दिवसां येथून कूच करून जातील. आणखीही फौज ठेवून त्यांजकडे पाठविणार. प्रस्तुत कामाकाजांत बाईजवळ राजश्री माधवराव गंगाधर आहेत. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञप्ति."

लेखांक ४१. ता० १९ जानेवारी इ. स. १७८१.

पौा छ १ सफर इहिदे समानीन. **श्रीगजानन.** मि० पौष व॥ १० शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २३ मोहरमपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रे रवाना केलीं आहेत व गंगाजलनिर्मल अहिल्याबाई होळकर यांणीं मेवे जात नासपातीं सुमार साहा हे पेशजीं डांकेबरोबर सेवेसीं पाठविली आहेत. पावले असतील. प्रस्तुतही बाईनीं मेवा श्रीमंतांकारणें पाठविला आहे. आंगुरें पेटारी १, व दाळिंबें बेदाणा ५, व नासपाती २, व शेव १, एकूण सुमार ९ नऊ डालींत घालून सफेद गळेफानें मढून, लाखी मोहर करून, बाईनीं सेवकाकडे पाठविली कीं, डाकेबरोबर श्रीमंतांचे सेवेसी लवकर पावते करून उत्तर आणविणें ह्मणून रुबरू सांगितलें. त्याप्रमाणें डांकेबरोबर डाली सेवेसीं पाठविली आहे. सेवेसीं पावलीयावर अहिल्याबाईच्या पत्राचे मेवा पावलीयाचें उत्तर लेखकास आज्ञा करणार धनी समर्थ. इकडील राजकी वर्तमानः—प्रस्तुत राजश्री त्रिंबकजी इंगळ्यांची रवानगी हिंदुस्थानाकडे जाली आहे. प्रस्तुत दोन अडीच हजार फौज तयार केली आहे व पांचशें पागा हरकुबाईची, एकूण तीन हजार फौजेनशी रवानगी जाली. दोन कोस येथून त्यांचें कूच जालें. दरमजल पुढें जाणार. आणिकही फौजेची संचणी करून बाई मागाहून पाठवणार. काल तेरा रोजांचें वर्तमान कासीद सुरतेहून आला, त्याणें वर्तमान सांगितलें जे, श्रीमंत राजश्री दादासाहेब अश्विनीकुमारावर आहेत. अमृतरावही तेथें श्रीमतांजवळीच आहेत. खर्चावेंचाची आह्मांस गिराणी आहे. पूर्ववत्प्रमाणें इंग्रज खर्चास देत नाहींत. असें कासीद सांगत होता. केसो कृष्णही सुरतेस गेले होते. त्यांजबरोबर पुन्हां दोन पलटणें इंग्रजानीं देऊन फिरून खानदेशप्रांतीच रवाना केले. ते ईश्वरवाडीजवळ आले आहेत ह्मणून वर्तमान ऐकिलें. सोनगडावरही तीन पलटणे, चार हजार फौज गाइकवाडांची, ऐसे आले आहेत ह्मणून बाजारी वदंता. खानदेशांत रयत वगैरे पळपट फार जाली आहे. हिंदुस्थानप्रांतींही पलटणाची गडबड फार आहे. याप्रमाणें इकडील वर्तमान. देशाकडील अनेक प्रकारची वर्तमाने इकडे उठतात. बाईही वारवार वर्तमान पुसतात. अलीकडे आज्ञापत्रेंही फारशी येत नाहींत. श्रीमंतांचा विजयप्रताप ऐकावा, हेच येथें सर्वांचीं लक्षें लागलीं आहेत. येथें ज्योतिषी गणक ब्राह्मणांनीं सिद्धांत केला आहे की, पौष वद्य त्रयोदशीपासून माघ वद्य त्रयोदशीपर्यंत तुंबळ युद्ध व्हावें. तदोत्तर इंग्रजांचा अपकर्ष होईल. श्रीमंतांचा

श्रीकृपेंकरून उत्कर्षच आहे. परंतु एक महिनापर्यंत समीप चौकी पाहऱ्याचा वगैरे रक्षकाचा बंदोबस्त चांगला असावा. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून जगत्कुटुंबी श्रीमंतांचें कल्याण आहे. अशीं ब्राह्मण आशीर्वादवचनें बोलतात. बाई आदिकरून सर्वांचीं लक्षें स्वामीकडे लागलीं आहेत. बाईसही पत्रें येत असल्यानें याचाही संतोष फार आहे. मेवा पावलीयाचीं उत्तरें स्वामी पाठवणार समर्थ. सेंदव्याहून संताजी होळकरांचीं दोन पत्रें बाईस आलीं, व थाळनेरच्या कमाविसदारानेंही बाईस पत्र लिहिलें होतें जे, सोनगडावर तीन पलटणें आलीं, हें खरें. राजश्री गणेशपंत बेहेरे भोंडगांवावर आहेत ह्मणून वदंता आहे. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. ”

लेखांक ४२. ता० ३ मार्च इ. स. १७८१.

पैवस्ती चद्र १२ रविलावल. **श्रीगजानन.** मि० फाल्गुन शु॥ ८ शके १७०२.

‘सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन सा० नमस्कर विज्ञापना ता-गाईत चंद्र ७ रविलावलपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः- इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांके-बरोबर कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. प्रस्तुतचें वर्तमानः— श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेअलीकडे जेथें आहेत, तेथेंच आहेत. राजश्री पाटीलबावा सारंगपुरीहून कूच करून दरमजल पुढें गेले. परंतु भेलशास अद्याप गेले नाहींत. अलीकडेच आहेत. अंबोजी इंगळे व भाऊ बक्षी या उभयतां मिळून पांच सात हजार फौजेनिशीं पुढें इंग्रजांच्या तोंडावर आहेत. त्रिंबकजी इंगळेही पुढें त्या फौजेंतच आहेत. इंग्रजांसीं त्या फौजेशीं पांचा साता कोसांचा तफावत आहे. इंग्रज कांहीं नवसरींत आहेत, कांहीं सुरंजेंत आहेत. सुरंजेंत दहा पंधरा हजार रुपयेही घेतले व दाणा हरजिनसी फार भरणा केला. सुरंजेंत ठाणें बळावून आहेत. पाटीलबावाही वरचेवर पुढें फौजा रवाना करितात. राजेरजवाडे यांजकडील फौजा अद्याप जमा जाहल्या नाहींत. वरचेवर पत्रें जातात. येथून कांहीं बाई फौज पाठविणार होती. परंतु फौजेस देण्यास पैसा नाहीं. यास्तव स्तिंबित आहेत. त्रिंबकजी इंगळे यांजबरोबर हजार दोन हजार फौज गेली ति-तकीच मात्र. इंग्रजांस आणीक दोन पलटणें येऊन मिळालीं ह्मणून ऐकिल्यांत आलें. भोपाळवाल्याचें कांहीं सूत्र इंग्रजांकडेही आहे. केवळ एकनिष्ठेनें पाटील-बावांकडेच यावें असें नाहीं. दोहीं डगरींवर हात आहेत. खासा पाटीलबावांजवळ दहा हजार फौज चांगली आहे. याप्रमाणें वर्तमान येथें आलें. तें सेवेसीं लिहिलें

असे. सोनगडावर तीन चार पलटणें आलीं आहेत ह्मणून खानदेशांतून माणसें आलीं त्यांनीं दरबारांत सांगितलें. राजश्री गणेशपंत बेहेरे नंदुरबारेपासून दोन कोसांवर पुढें आहेत. गुलजारखान कांहीं भिल्ल जमा करून बडवानीकडे आले आहेत. बडवानीच्या राज्यांत अस्ताव्यस्त जालें आहे. तेथील राजा मद्यपी आहे. यास्तव भिल्ल वगैरे ज्याच्या चित्तास येतें, ते जागां जागां गांवखेडीं मारून नेतात. लक्ष रुपयांचें राज्य तें आहे, आणी नामी जागा आहे. पहाडी किल्ला आहे. नाक्याची जागा आहे. चहूंकडे दाब पडे असें स्थळ आहे. ते राजे ह्मणतात जे, आमची खायाची सस्ता करून कोणीं द्यावी आणि बडवानीचें राज्य आटोपावें, असें तेथील बोलणें आहे. राजश्री तुकोजीबावांचा कांहीं पैगाम त्यासीं लागला आहे, परंतु आतां तिकडे मसलतीस तिकडे गेले आहेत यास्तव राहिलें. त्यास नर्मदेअलीकडे या प्रांतांत आपलें कोणीच नाहीं. हें स्थळ चांगलें आहे. मर्जी असली तर सरकारांत ठेवावयास योग्य जागा आहे. चारी नाकें आपले हाती येतात. चहूंकडे दाबही आहे. मर्जी असली तर बाईस लिहावें की, सरकारांत तें संस्थान ठेवावयाचें आहे, तेथील बंदोबस्त करणें. ह्मणजे येथील राजाचा खायापियाचा बंदोबस्त कसा करणें तो बाई करतील, आणि ते प्रांताचा बंदोबस्त करतील. जागा चांगली बिकट आहे. चंहू नाक्यांवर दाब आहे. हें स्थळ सरकारांत असावें. इतक्यावर स्वामींची मर्जी. हें स्थळ सरकारांत असावें हें उत्तम आहे. सरकारचे मर्जीस आलें तर येथें बाईस पत्र लिहावें. अलीकडे सरकारचीं पत्रें इकडे कांहीं येत नाहींत. वर्तमानें तों अनेक प्रकारचीं येतात. बाई सेवकास विचारतात जे, डांक बसली असतां तुमची पत्रें येत नाहींत. नाना प्रकारचीं वर्तमानें येतात. श्रीमंत कोठें आहेत ? इंग्रजांची व सरकारच्या फौजांची लढाई जाहली, पुणें अस्ताव्यस्त. अशीं कित्येक प्रकारचीं वर्तमानें येथे येतात. कासीदजोडीबरोबर अगर डाकेबरोबर सरकारचें पत्र येथें बाईस यावें. बाजारी वर्तमानें मात्र इकडे येतात. कागदींपत्रीं वर्तमान कांहींच येत नाहीं असें आहे. सेवकाकडेही कांहीं पत्र येत नाहीं. यास्तव विनंति. मर्जी असली तर बाईस पत्र आल्यानें यांचें समाधान आहे. हे विज्ञापना."

लेखांक ४३. ता. १९ मार्च इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि. फाल्गुन व॥ १० शके १७०२.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र २३ रविलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें

वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमानें पेशजीं विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. राजश्री बाजीराव बर्वे यांस हुजूर पाठवून देणें ह्मणून मातुश्री अहल्याबाईस व राजश्री लक्ष्मण बल्लाळ यांस सरकारचीं आज्ञापत्रें देऊन राजश्री विसाजी काशी व दोघे हुजुरे व एक जासूदजोडी रवाना केली. ती तेथें पावेल. लक्ष्मणपंतांस पत्रें दाखविलीं. ते व राजश्री माधवराव गंगाधर हे मिळून पत्रें घेऊन दरबारास गेले. मीही समागमेंच होतों. मशारनिल्हेची भेट करून पत्रें दिलीं. वर्तमान मुखोद्गत सांगणें तें सांगितलें. तदोत्तर राजकीय, इंग्रज व हैदर नाईक यांजकडील, वर्तमान बाईनीं विचारलें. त्यानंतर मशारनिल्हेस विडे देऊन बिदा केलें. दोन घटका दिवस राहतां बाई एकीकडे बसून, मुकुंदराव हरी व माधवराव गंगाधर व लक्ष्मण बल्लाळ व मी ऐसे समीप होतों. सरकारचें व आपले पत्र व दादाजी गंगाधर यांचें ऐसीं पत्रें माधवराव यांनीं बाईस वाचून दाखविली. पत्रें ऐकून बोलली जे उदईक हुताशनी आहे. प्रतिपदा द्वितीया जाल्यावर बर्व्यास बोलावून आणून त्यांस वर्तमान सांगावें. सरकारआज्ञेप्रमाणें त्यांची बिदागी करावी. इतकें भाषण जाहलें. तदोत्तर त्रितीयेचे दिवशीं चार पांच घटका दिवस राहतां, बर्व्यास बाईनीं बोलावूं पाठविलें. ते व तिघे कारकून ऐसे दरबारास आले. मीही तेथें होतों. एक घटकानंतर मुकुंदराव व माधवराव यांस बाईनीं सांगून पाठविलें जें, बर्वे आले आहेत. यांसीं सरकारच्या पत्रान्वयें बोला. मुकुंदराव व माधवराव व विनायक बाजी व गोविंद रघुनाथ ऐसे एकांतास बसून बर्व्याकडील कारकुनास त्यांनीं बोलाविलें. तेही एकांतास गेले. बाजीराव बाईजवळीच बसले होते. वरकड उठले. मीही उठून आलों. त्यावर ऐकिलें वर्तमान की, संध्याकाळपर्यंत मुत्सद्यांचा व त्या कारकुनाचा एकांत जाला. दोन घटका दिवस राहतां बाईनें बाजीरावांस विडे देऊन संध्याकर्मास उठली. बर्वेही त्या एकांतांतच गेले. संध्याकाळीं आपलाले स्थळास गेले. एकांतांतील वर्तमान शोध करितां ऐकिलें कीं, बर्वे ह्मणतात जें, आह्मांस पुण्यास पाठवूं नका. येथेंच आपल्या सेवेंत राहूं. एक वर्षभर आमची एकनिष्ठा पाहून, तदोत्तर आपल्या विद्यमानें येथील बंदोबस्त पक्केपणें करून आह्मांस बिदा करावें. यांनीं उत्तर केलें जें, येथून जें करणें तें पक्केपणेच केलें आहे. तेथें तुह्मांस कोणताही उपसर्ग लागणार नाहीं. तुह्मीं आपले एकनिष्ठतेनें त्यांसीं वर्तणूक केल्यास तेथूनहि दुसरा विचार होणार नाहीं, असें बोलले. बर्व्याचें बोलणें जें, पहिले आह्मांजवळून अन्योन्य वर्तणुकी घडत आल्या आहेत त्यामुळें कित्येक लहानमोठीं मनुष्यें मागील पुढील वर्तणुकीचे उच्चार करितील. श्रीमत आहेत. न जाणों,

कोणे वेळीं काय त्यांच्या चित्तांत भास भासवितील ते समयीं आपण कोठें समीप आहेत? अगर उगाच एकादा दुरारोप ठेऊन विषमस्थळीं ठेवलें, तर तेथें त्यास निवारण करणार कोण? त्यांनीं उत्तर केलें जे मागील जे तुह्मांकडून समविषम वर्तणुकी घडल्या आहेत, त्यांचा उल्लेख न काढितां, सरळपणें तुह्मांसी राहतील. त्यांनीं लिहिलें आहे कीं, पांच हजार रुपये खर्चास देऊं, ते तुह्मांस देतील. मागील तुह्मांजवळून जें घडलें आहे त्याविषयीं अपाय न व्हावा हा जिमा आमचा. पुढें एकनिष्ठेनें वर्तणूक करून श्रीमंतांची कृपा संपादून घेणें हा जिमा तुमचा. याप्रमाणें भाषणें जालीं. बर्वे बोलले जे, एक वर्षभर आह्मीं येथें राहून आपले खातरजमेप्रमाणें वर्तणूक करावी, ह्मणजे परभारां आपणच त्यांची खातरजमा आह्मांविषयीं करितील. हे आपणही विनंति मातुश्रीस करावी. आह्मीही उदईक येऊन बाईशीं समक्ष विनंति करूं. याप्रमाणें बोलणीं होऊन उठले. त्यानंतर कारभारी यांनीं बाईच्या कानावर रात्रींच वर्तमान घातलें. बाई बोलली जे, त्यांनीं समक्ष काय बोलावयाचें आहे? श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें त्यांनीं आह्मीं वर्तावें यांत उत्तम आहे. श्रीमंतही त्यांचे मागील वर्तणुकीचा उच्चार करणार नाहींत. त्यांनीं क्षेपनिक्षेप पुण्यास जावें. अमें बाई बोलली. हे विनंति.

बर्व्यांनीं दुसरे दिवशीं येऊन बाईशीं समक्ष विनंति करावी, तों बाईस रात्रीं वांती होऊन ज्वरांश आला. त्यामुळें दोन तीन दिवस कांहीं जाबसाल जाहला नाहीं. आतां आतां कांहीं आराम आहे. काय जाबसाल होणें तो एक दों दिवसांत होईल. परंतु येथील निश्चय हाच आहे की, सरकारचे आज्ञेप्रमाणें बर्व्यांस कारकुनाबरोबर रवाना करावा. घडतां असेंच घडेल. राजश्री पाटीलबावा गोहजच्या व ग्वालेरीच्या दरम्यान आहेत. अलीकडे कांहीं वर्तमान आलें नाहीं. हिंदुस्थानाकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलेंच आहे. शिखांच्या पत्रांचीं उत्तरें अद्याप गेलीं नाहींत. मग तो मजकूर कांहीं सरकारांत यांनीं लिहिला असेल; तेथून आज्ञा येईल; त्याप्रमाणें त्यास उत्तरें लिहावीं, असें असलें तर न कळे. काशीचा राजा पाटीलबावांकडेच आहे. जो इंग्रज कलकत्त्याहून काशीस आला होता, तो कलकत्त्यास फिरून गेला ह्मणून ऐकिलें. सत्य मिथ्या देव जाणे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकानें खर्चाविषयीं दहा पांच विनंतिपत्रीं विनंति लिहिली. स्वामींनीं कृपा करून तीनशां रुपयांची वरात परगणे कसरावदावर वरात पाठविली होती. त्या वरातीवर आपण तारीख मात्र करून वरात पाठविली. त्यास येथें कमाविसदारांनीं वरात माघारी टाकली. सबब कीं, वरातीवर एक तारीख मात्र आहे. मुजुमदाराचें निशाण व मोर्तब नाहीं. तें करून आणा, मग ऐवज देऊं. असें ह्मणून

वरात माघारी टाकली. मी व लक्ष्मण बल्लाळ यांनीं कमाविसदारांस फार सांगितलें. परंतु ऐकेनात. वरात माघारी टाकली. ती वरात येथून कासीदजोडीबरोबर पुण्यास सेवेसीं पाठविली. त्यास दीड पावणेदोन महिने जाले, अद्याप वरातही आली नाहीं. विनंतिपत्रांचीं उत्तरेंही कधींही येत नाहींत. असो. धन्याची मर्जी. अगर स्मरणांत नसेल. परंतु सेवकास तों धन्याच्या पायाव्यतिरिक्त अहर्निशीं दुसरें काय आहे? तेथें सेवकाविषयीं विनंति कोण करणार? येथें देणेदारांचा उपद्रव व खर्चाची तसदी कितीक सोसावी. येथें मेलें तर कोणी समाचार घेणार नाहीं. तिकडून धन्यांनींही उपेक्षा केली तर तेथे गत काय? ज्याचा वशिला कोणी नाहीं त्यास धन्यांच्या पायांचाच आश्रय. येथे देण्याच्या व खर्चाच्या उपद्रवामुळें फार श्रमांत आहें. येथील उपेक्षा कशी आहे तें काय लिहूं? पांचशें रुपये लोकांचें देणें जालें आहे. पुढें नित्य खर्च लागलाच आहे. धनी विश्वकुटुबी, कृपाळू, समर्थ. वारंवार लिहितों ह्मणून स्वामी रागें न भरावें. गरीबास धन्याच्या पायांव्यतिरीक्त कोणाचा आश्रय? सर्वापराधान् क्षमस्व, हे विज्ञप्ति.

"बिना असरे चाकरी बैरीमोंका बास।
नदिकिनारे रुखडा जब देखूं तब वसवास॥"

पै॥ चद्र १६ रविलाखर. **लेखांक ४४.** ता० २५ मार्च इ. स. १७८१.
दाखल ता. ११ एप्रिल इ.स.१७८१. **श्रीगजानन.** मि० चैत्र शु॥ १ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २९ रविलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून पत्रें चंद्र २३ मिनहूस डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान राजश्री बाजीराव बर्वे यांस बाईनीं कारकुनाबरोबर सांगून पाठविलें जे, श्रीमंतांचीं पत्रें व कारकून व हुजरे तुह्मांस बोलावूं आले आहेत. त्यास तुह्मीं जावें. कधीं निघतां? तुह्मांसमागमें लोक नेमले आहेत. तयारी करविली आहे. सुदिन पाहून लवकर निघावें. त्यांनीं उत्तर केलें जे, पुण्यास जाणें परिच्छिन्न आह्मांस नाहीं. आपण थोर. आपल्या आश्रयास आह्मी आलों की, वर्ष दोन वर्षें आपल्या जवळच राहून, एकनिष्ठतेनें चाकरी करून आह्मांविषयीं आपली खातरजमा करावी. तदोत्तर आपणच परस्पर श्रीमंतांची खातरजमा करतील. मग आपले विद्यमानें पुण्यास जावें, असें आमचें बोलणें आहे. प्रस्तुतच आपण तिकडे जा ह्मणतील, तर आह्मी जाणार नाहीं. असें उत्तर पाठविलें. त्यावरून बाईनीं त्यांजकडील कारकुनास बोला-

वून, जे गृहस्थ पहिलें येथें बोलावयास येथें आले होते त्यांस सर्वांदेखत विचारिलें जे, तुह्मांस आह्मी काय बोललों? त्यांनीं सांगितलें जे तुह्मीं आह्मांकडेस येतां, सुखरूप या. परंतु तुह्मी येथें आल्यावर पुन्हां गडाखालीं तुह्मांला जाऊं देणार नाहीं. श्रीमंतांकडे लिहून पाठवूं. येथील सफाई आह्मी आपले विद्यमानें करून तुह्मांस पुण्यास पाठवूं. जावें लागेल. तेथें मागील गुणदोष तुह्मीं जे केले आहेत, ते श्रीमंतांस विनंति करून माफ करवूं. पुढें तुह्मीं वर्तणूक तेथें एकनिष्ठेनें करावी. श्रीमंतही कृपा करितील. वर्ष दोन वर्षें तुमची निष्ठा पाहून कामकाजही कृपा करून सांगतील. मागील अन्योन्य वर्तणुकीचा उल्लेख काढून तुह्मांस उपद्रव केला, तर तो जिमा आमचा. त्याविषयीं श्रीमंतांस आह्मी विनंती करूं. प्रांजळपणें तुह्मांसी समाधानें ठेवितील. पुढें त्यांची मर्जी रक्षून आपलें ऊर्जित करून घेणें जिमा तुह्मांकडे असे. आपण बोलली, त्याप्रमाणेंच आपणही बाजीरायांस सांगितलें. मध्यें गोष्ट ठेविली नाहीं, असें त्या कारकुनातें सांगितलें. बाई बोलली जे, असें तुह्मीं सांगितलें असतां फेरपगडी यांनीं केली, हें काय? आह्मीं श्रीमंतांस तुह्मांविषयीं कित्येक प्रकारें ममतापुरस्कर लिहिलें. त्यांनीं मान्य केलें. पांच हजार रुपये खर्चास देऊं ह्मणून त्यांनीं पत्रीं लिहिलें आहे. असें असतां आतां तुह्मी फिरून गोष्ट सांगतां, यांत श्रीमंतांस आमचा बेइतबार भासेल. तुह्मी राज्यांतील राहणार माणसें. मातबरास हे गोष्टी योग्य नाहींत. तुह्मी त्यांस सांगा. आह्मीही आपला कारकून तुह्मांसमागमें देतों. तेही सांगतील. जायाची तरतूद लवकर करा. ह्मणून बाईनींही आपला कारकून समागमें देऊन बर्व्यांकडेस सांगून पाठविलें. त्यांनीं व यांच्या कारकुनांनीं बहुत प्रकारें सांगितलें. परंतु बर्वे आपल्या कारकुनावर रागें भरले. शिव्यागाळी केल्या. यांच्या कारकुनांनींही बहुत प्रकारें सांगितलें; परंतु ऐकेनात. साफ बोलले जे, आपण जिवत जाणार नाहीं. प्रेत रवेपार कराल. असें उत्तर केलें. त्यावर बाईनी हें उत्तर ऐकून, राजश्री विसाजी शामराज लांबहाते यांस बाईनीं बोलाविलें. त्यांस हें वर्तमान सांगितलें. मशारनिल्हेंनीं उत्तर केलें जे, इतके लवकर बदलून त्यांनीं गोष्ट सांगितली, तेव्हा बदमामली. बाई बोलली जें, पुढें काय करावें? विसाजीपंतांनीं सांगितलें जे, असे जे बदफैली आहेत त्यांचा बंदोबस्त करावा. नाहींतर श्रीमंतांचा शब्द तुह्मांकडे लागेल. असे जे एकनिष्ठ इमानी असते तर असे खराब कां फिरते? लवकर यांचा बंदोबस्त करावा. श्रीमंतांचे येथें नीती आहे. असें नीतीनें वागते तर यांस दूर कां करिते? असें बहुत प्रकारें दोन घटका बोलून गेले. ते वेळेस चंद्र २३ रोजीं संध्याकाळीं बाईनीं दोघे कारकून व पन्नास माणूस बारगीर वगैरे चौकीस पाठविलें. कारकुनांनीं

पूर्व पश्चिम द्वारीं चौक्या बसवून, उभयतां कारकून मुख्यांचे जवळ बसले. ते वेळेस वक्तृत्व, सव्य अपसव्य, फार केलें. तितकेंही या कारकुनांनीं ऐकून घेतलें. सौम्य उपचारें बहुत प्रकारें सांगितलें. परंतु कोणतीही गोष्ट पुण्याकडे जायाची अनकूळ पडेना. हें वर्तमान बाईसही रात्रीं कळलें. तेच रात्रीं बाईसही संतापज्वर आला. तों दोन तीन दिवस पाचाट्याचें दुखणें जालें. मध्यें ज्वरानें व्याकुळही फार जाली. अद्याप ज्वर उतरला नाहीं. फार श्रमांत आहेत. ओषधी उपाय करीतच आहेत. औषध फारसें घेत नाहीं. कोणाशीं बोलणें नाहीं. या दुखण्याची रीतही एक प्रकारची आहे. बर्व्यांनीं दुसरे दिवशीं स्नानें न करितां उपोषण केलें. गोविंद रघुनाथ आदिकरून सर्वांनीं सांगितलें, परंतु ऐकेनात. सहा घटका रात्रीं मुकुंदराव हरी व माधवराव गंगाधर यांनीं, बापुजी आनंदराव मामलेदार मातबर मनुष्य आहे, त्यास पाठविलें. त्यांनीं बहुत प्रकारें चार गोष्टी बऱ्यावाईट निक्षून सांगितल्या. मग प्रहर रात्रीं स्नान करून फराळ घातला. त्यावर चार पांच दिवस अन्नफराळ मात्र करितात. त्यांचें बोलणें हेंही आहे की, बाईनीं मजला जातीनें मुदपाखांत जेऊं घालून जातीनें तरी येथें आपल्याजवळ ठेवावें. तें कबूल आहे. परंतु पुण्यास जाणें कबूल नाहीं. अतःपर बाईस सावकाश वाटल्यावर कोणता घाट घडेल तो पहावा. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान ऐकिलें की, गोहज व ग्वालेर या दोहींमध्यें सैन्य सुद्धां आहेत. कबिले उज्जनीकडेस रवाना केले. सबब की, पाटीलबावांस गुरुदर्शनास जाणें फार अगत्य आहे. एक दोन वेळां दृष्टांतही जाहाला, व दोन चार वेळां पूजन करून पुढें मोहिमीस जाण्याविषयीं प्रसादही दिला नाहीं, यास्तव माघारे फिरणार. उज्जनीस येऊन देशास येणार, ह्मणून उज्जनीहून कोणी गृहस्थ आले त्यांनीं सांगितलें. प्रस्तुत येथें बाईच्या दुखण्याचा प्रकार लांबलासा दिसतो. आज दोन तीन दिवस कोणास –मुत्सद्दी, अगर भटभिक्षुक मराठी माणसें खिदमतगार यांस,–कोणास जवळ येऊं देत नाहींत. सबब की, कोणी औषध घ्या ह्मणतात, कोणी पथ्य घ्या ह्मणतात. या कटकटींकरितां कोणास फारसें येऊं देत नाहींत. प्रस्तुतचा असा प्रकार आहे. परंतु ज्वर थोडा थोडा शमला आहे. पाटीलबावा गोहजवाल्याच्या मुलुखांत गढ्या घेतात. चोंहीकडे फौज गुतली आहे. गोहजवाल्याजवळ पलटणें आहेत. एखादे वेळेस रातबिरात करील, यास्तव कबिले उज्जनीकडे रवाना केले. अशीही वदंता आहे. बाजीराव बर्वे यांचा आग्रह बहुतकरून हाच आहे की, पुण्यास न जावें. येथेंच असावें. बाईस आरोग्य जाल्यावर काय इत्यर्थ ठरेल तो पहावा. सेवकानें खर्चाविषयीं दहा पांच वेळां विनंतिपत्रीं विनंति लिहिली आहे.

मोर्तब शिक्का नाहीं. वरातीवर आपले हाताची तारीखच मात्र होती. यास्तव वरात कमाविसदारांनीं माघारी टाकली. तेही माघारीं पुण्यास पाठवून दोन महिने जाले. अद्याप कांहीं उत्तर येत नाहीं. कोठवर वारंवार दरपत्रीं तोच मजकूर लिहूं? स्वामी रागें भरतील. माझेविषयी कोणी विनंति करावयास नाहीं. धनी विश्वकुटुबी. सर्वांचा प्रतिपाळ करितात, सेवकाविषयींही कोणीं स्मरणार्थ विनंति केली तर, अगर येथून विनंतिपत्रें सेवेसीं जातात तीं अवलोकनांत आल्यास, स्वामी कृपा करून खर्चास पाठवितील. दैवयोगेंकरून कोणी स्मरण द्यावें अगर विनतिपत्र अवलोकनांत यावें. येथें देणेदार फार उपद्रव करितात. नित्य खर्चासही पाहिजे. अशा श्रमांत आहें. धनी कृपाळू समर्थ. देखिले ऐकिले वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. संवत्सरप्रतिपदेस बर्वे यांस गोविंद रघुनाथ गानू यांनी भोजनास बोलाविले. ते वेळेस, बाजीराव बर्वे बोलले जे आह्मांसही पुण्यास जाणें जरूर आहे. तेथें कुटुंब मायबाप. तेथें गेल्याखेरीज परिणाम काय? परंतु पक्केपणें बाईनी बंदोबस्त करून आणवावा. त्यावरून सर्व मुत्सद्दी मंडळीनी विचार केला जे, बाईस मागून फिरून श्रीमंतांस पत्र पाठवावें. मागील गुणदोष चित्तांत कुन्हा न राहे (अशी) श्रीमंतांचीं ममतापुरस्कर पत्रें आणवावीं नी मग रवानगी करावी, असें बोलले. बाईच्या कानावर घालून पुन्हां सरकारांत पत्रें लिहावीं असा निश्चय केला आहे. बाई काय ह्मणतील ते पहावें. श्रुत होय हे विनंति."

लेखांक ४५. ता. ११ एप्रिल इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि० चैत्र वा. ३ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १६ रविलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीवराबर व डाकेवरोबर पत्रें सेवेसीं रवाना केलीं आहेत. पावलीं असतील. परंतु उत्तर कोणाही पत्राचें एकही आलें नाहीं. स्वामींची मर्जी. प्रस्तुतचें वर्तमान—सौ. उदाबाई वाघमारी—सुभेदाराची लेक बाईचा निरोप घेऊन देशास गेली. निरोपसमयीं उदाबाईनीं बाईस विचारले जे, आह्मी देशास जातों. तुकोजी होळकरही तिकडेच आहेत. त्यासीं काही विचाराच्या गोष्टी बोलाव्या की काय? त्यास बाईनीं उत्तर केलें जे, 'तुकोजी होळकर व त्यांचे दिवाण आह्मांवर शस्त्र धरून उभे राहिले आहेत, त्यापक्षीं तुह्मी त्यांसीं काय बोलतां? तुकोजी तुह्मांसी कित्येक मायाममतेच्या गोष्टी पहिलें बोलला, त्या काय प्रत्ययास आल्या, की आतां बोलायाचें

काय आहे ? प्रस्तुत त्यांचेंच बोलणें श्रीमंतांस व मुत्सद्यांस पथ्य आहे. आपलें बोलणें व्यर्थ त्यांस भासलें आहे. त्या पक्षीं आपण कांहीं बोलूं नये. तुकोजीमध्यें रेवज काय आहे ? असो. प्रस्तुत त्याचेंच ऐकून श्रीमंत काय घाट घाटितात तो पुरतेपणें पाहूं. आमचाही ईश्वर आहे. शेवटली मसलत–तुकोजी कांहीं तेथेंच राहणार नाहीं; वर्षा दो वर्षांनीं इकडे येईलच. तो इकडे आला ह्मणजे आह्मी येथून कूच करून पुण्यास जाऊं. श्रीमंतांची आज्ञा घेऊन महायात्रेस जाऊं. जसें ईश्वर घडवील तसें करूं, परंतु तुह्मी कांहीं त्याशीं बोलूं नका.' याप्रमाणें बाईनीं उदाबाईस एकांतीं सांगितलें. निरोप घेऊन देशास गेली. एकांतीचे ऐकिलें वर्तमान लिहिलें असे. प्रस्तुत राजश्री बाजीराव बर्वे यांचा जाबसाल पडला आहे. नित्य एकांत खलबतें मुत्सद्दी करितात. बर्व्यानींही उपासतापास फार केले. प्रस्तुत पुण्यास न जावें, पुढें दसरा जाल्यावर जावें, असें बर्व्याचें बोलणें. बाईचें बोलणें कीं तुह्मांविषयीं पहिलेंच आह्मीं श्रीमतांस खातरजमेचें लिहिलें आहे. त्यावरून त्यांनींही मनःपूर्वक लिहिलें आहे. कारकून पाठविले आहेत. त्यांजबरोबर तुह्मीं जाणें उचित आहे. आतां तुह्मीं येथें राहिल्यानें पेशजीं आमच्या लिहिण्यास बट्टा लागतो. असें बहुत प्रकारें बाईनीं सांगितलें. परंतु बर्व्याचें उत्तर हेंच आहे कीं, आह्मी आपले मतलब सांगतों, ते लिहून पाठवून एक उत्तर येऊं द्यावें ह्मणजे दसऱ्यास जाऊं. यांनीं उत्तर केलें जे, तुमचे मतलब काय ? त्यास त्यांनीं मनास येईल ते पंचवीस मतलब लिहून दिले. यांचेही फारच आग्रह पाहून बाईही बोलली जे, सर्वांचीच रदबदली ऐकून चार महिने श्रावण अखेरपर्यंत असूं द्यावें. एक वेळ पुन्हा पत्रें पाठवावीं. यांचेही मतलब काय लिहून देतात तें पहा. त्यांतून छान करून तेथें पसंत पडतील ते लिहून पाठवा. त्याचीं उत्तरें येऊं द्या. तदोत्तर भाद्रपदमासीं शु॥ पंचमीस येथून निघून जावें, असा बर्व्यांशीं करार करा. बाजीरायाचे हातचें लिहून घ्या, की पुन्हां आह्मी रदबदली करणार नाहीं. तुमचे आज्ञेप्रमाणें भाद्रपदमासीं जसें तुह्मी पाठवाल तसें पुण्यास श्रीमंतांकडेस जाऊं असें लिहून घ्या. ह्मणून बाईनीं सांगितलें. त्याप्रमाणें मुत्सद्यांनीं त्यांजजवळून लिहून घेतलें (फाटलें आहे.) उदंडच मतलब लिहिले होते, परंतु त्यांतून गाळून तीन चार मतलब आपले पत्रीं बाईनीं लिहिले आहेत. बाईच्या पत्राचीं उत्तरें येथें आल्यावर, येथून यांस रवाना करावें असा निश्चय जाहला आहे. भाद्रपद शु॥ पंचमी लिहिण्यांत आली आहे. ऐकिलें वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. बाईनींही पत्रें लिहिलीं आहेत, व राजश्री लक्ष्मण बल्लाळ व विसाजी काशी यांनींही पत्रें लिहिलीं आहेत. त्यांनीं खलबताचा सविस्तर मजकूर लिहिला आहे. माझ्या

लिहिल्यास व त्यांच्या लिहिल्यास अंतर पडेल. स्वामी रागें भरतील. येविषयीं विनंति जे, सेवकाचा प्रवेश एकांतांत नाहीं. बारीकमोठे शोध करितां समजल्याप्रमाणें सेवेसीं विनंति लिहिली आहे. दिसून येतें की, सरकारचीं आज्ञापत्रें आणीकही यांच्या लिहिण्यावरून येतील; परंतु पुढेंही पुण्यास येण्याविषयीं बर्वे पड घेतील. सुध्या मतें येतील असें दिसत नाहीं. येथें यांनीं फारच उपास, मरण्याच्या गोष्टी सांगूं लागले. ते वेळेस बाईनीं विचार केला होता जे, जबरदस्तीनेंच पाठवावें. परंतु त्यांचेही येथें सोयरे धायरे आहेत. ते येथें पेश आहेत. त्यांचीही भीड कितीकांनीं समजाविली जे, शिपाई आहे, प्राणत्यागच केला तर नाहक दुर्निमित्य येईल; यास्तव मोमदिलही जाली. ह्मणून, पर्याय ठरविला आहे कीं, एकदां पत्रें जाऊं द्यावीं. बाजीरायांनींही सरकारांत पत्र लिहिलें आहे. तें मोठ्या प्रयत्नेंकरून बाईनीं व मुत्सद्यांनी लिहविलें आहे. हुजूर येण्याविषयी बर्व्यांचें मन प्रसन्न नाहीं. पुढेंही काय खळखळ घडेल ती पाहावी. दुसरें वर्तमान ऐकिल्यांत आलें आहे की, बर्व्यांचा कोणी आप्त राजश्री पाटीलबावांकडे मातबर मनुष्य आहे. त्याजकडेही बर्व्यांनीं एकांती पत्रें पाठविलीं आहेत की, पाटीलबावांनीं बाईस लिहावें की, यांस पुण्यास पाठवूं नये; आपल्या जवळीच असूं द्यावें. असें वर्तमान ऐकिलें केवळ तथ्य असें नाहीं. बर्व्यांनीं आपल्या मतलबांची याद लिहून दिली आहे. त्या यादीची नक्कलही पाठविली आहे. बाईच्या पत्रांबरोबर पावेल. दिल्लीकडील वकिलांचीं पत्रें चंद्र १३ मिनहूस येथें आलीं. त्यांतील ऐकिला मजकूरः—जयसिहाची व पादशाहाची स्पर्धा लागली आहे. दहा हजार फौज नजाबतखानांनीं शिखांवर रवाना केली आहे. दोन चार वेळां फौजा पाठविल्या होत्या. त्या शिकस्त होऊन आल्या. आतांही फौज पाठविली आहे. हरी दामोदराचे पुत्र लक्ष्मण हरी शें दोनशें लोकांनिशी नजिबखानास जाऊन भेटले ह्मणून वर्तमान होतें. खर्चाविषयीं दर विनंतिपत्रीं सेवेसी विनंति लिहितों. वरात तीनशां रुपयांची पाठविली. कसरावदावर पाठविली होती. वरातीवर तारीख आपल्या हातची होती. मुजुमदाराचे निशाण व मोर्तब नाही, ह्मणून कमाविसदारांनी वरात माघारी टाकिली. ती वरात फिरून पुण्यास कासीदजोडीबरोबर पाठविली. त्यास दोन अडीच महिने जाले. कांहीं दाद लागत नाहीं. कोणीं विनति करावयासही नाहीं. धनीही पत्रें वाचतात कीं नाहीं हें न कळे. गरीबाचें स्मरण कोण देतो? मुख्य धनी सर्वांचा प्रतिपाळ करणार. पुढें सेवकाची गत काय? येथें तों मेलें तर, अगर सावकारांनी बसविलें तर, कोणी त्राता नाही. परिच्छिन्न गरिबाविशीं धनी निर्दय जाहले! समर्थांची भीडही खरी. समर्थांविषयीं विनंति करणारही उदंड. पत्रीं लिहितां भागलों.

उठून यावें तर सावकार कसें येऊ देतात? धन्याचीही आज्ञा नाहीं. स्वामीही खर्चास पाठवीनात. येथेंही कोणी कवडी देईना. आतां ईश्वर काय गत करील ती करो. ब्राह्मण प्रभू, धनी कृपाळू समर्थ. राजश्री आबाजी नाईक वानवळे व नारो शिवदेव ऐसे येथें येणार ह्मणून ऐकिल्यांत आलें आहे. सत्य मिथ्या देव जाणे. नारो शिवदेव आशेरीस जाणार. नाईक देशी जाणार. गोविंदराव गायकवाडाचा पुत्र लग्न करावयास देशास गेला. इकडूनच आज बाईची भेट घेऊन दोन वस्त्रें बाईनीं देऊन रवापार करून दिला. बव्र्याकडून सरकारांत बाईनीं पत्र लिहविलें आहे. त्यांत बाईनीं सांगितलें आहे की, आज्ञापत्र आलें ह्मणजे आह्मी सेवेसी येतों असें लिहा. इतकी अक्षरें बर्वे लिहित नाहींत. बाईचें मानस आहे की, यांस दस्ताऐवजीं गोंवावे. ते होईल तेव्हां पत्रें रवाना करितील. सेवकाची खर्चाची फार तसदी आहे. स्वामी कृपाळू समर्थ. हे विज्ञापना."

पै॥ चंद्र २७ रविलाखर. **लेखांक ४६.** ता. १६ एप्रिल इ. स. १७८१.
दाखल ता.२२ एप्रिल इ.स.१७८१. **श्रीगजानन.** मि. चैत्र व॥ ८ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २१ रविलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. इकडील वर्तमान राजश्री बाजीराव बर्वे यांचे वगैरे पेशजीं विनंतिपत्री लिहून डांकेबरोबर चंद्र १६ मिनहूस पत्रें रवाना केलीं आहेत. स्वामींनीं कृपा करून आज्ञापत्रे चंद्र ५ मिनहूचे डांकेबरोबर तेथून रवाना केलीं. तेथें चंद्र ११ मिनहूस संध्याकाळीं येथें पावलीं. पत्रीं आज्ञा जे, राजश्री बाजीराव बर्वे यांस आणावयास कारकून पाठविले आहेत, ते तेथें पोंहचून बर्वे निघाले असतील. त्यास, फिरून बाईनीं व राजश्री लक्ष्मण बल्लाळ व विसाजी काशी व माधवराव गंगाधर यांस सर्वांनीं सरकारांत व बाबूरावजीस व दादाजी गंगाधर यांस पत्रें येथून गेलीं आहेत. त्यांची उत्तरें फिरून येथे येतील तेव्हा काय घाट घडेल तो पहावा. परंतु हुजूर येण्याविषयी बर्वे ते समयीही खळखळ करितीलसें दिसतें. शिखांस उत्तरें बाईनी काय लिहिलीं, तीं लिहिणें ह्मणून आज्ञा. त्यास येथून बाईनीं उत्तरें लिहिलीं जे, तुह्मी मातबर मसलत लिहून पाठविली, त्यास श्रीमंत धनी आहेत. त्यांस हा मजकूर लिहिला पाहिजे. व तुकबास व महादजी शिंदे यास लिहिले पाहिजे. मसलत भारी. सर्वांचे मनसव्यानें एकवाक्यतेचीं उत्तरें येतील, त्या अन्वयें तुह्मांस लिहून पाठवूं. परंतु इतकें घडायास चार महिने पाहिजेत. बादबरसाद काय मसलत ठरून उत्तरें येतील, त्याप्रमाणें तुह्मांस लिहून पाठवूं. याप्रमाणें उत्तरें

गेलीं ह्मणून ऐकलें. वरात सेवकास खर्चाबद्दल पाठविली होती. ती कमाविसदारांनीं माघारी टाकली. तो मजकूर आज्ञापिला. त्यास कमाविसदारांस तों वाटलें असेल कीं, मीं सरकारांत नालीश केली. परंतु राजश्री लक्ष्मण बल्लाळ ये गोष्टीस साक्ष आहेत. त्यांनींही कमाविसदारांस फार सांगितलें. सेवकास खर्चास चारशें रुपये सबनिसाजवळ कृपा करून दिले ह्मणून आज्ञा. स्वामी कृपाळू समर्थ. येथें राजश्री गणपतराव विष्णू गजरे त्यांचें दुकान व गुमास्ते येथें आहेत. त्यांचे तेथें पुण्यांत ऐवज दिला ह्मणजे येथें पावेल. सवा पांचशें त्यांचें देणें आहे. व्याजबट्टाही घेतील. बरें. प्रस्तुत धन्यांनीं जी कृपा केली, ती फार आहे. पुढें परिहार करणार धनी समर्थ. ऐवज चांगला दिल्याने येथें बट्टा पडणार नाहीं. सरकार-आज्ञेनें इतकें होईल. पाटीलबावांकडील वर्तमानः—गोहजप्रांतीं कोणी मातबर गढी आहे, तेथें मोर्चे लाविले आहेत. परंतु छावणीस उज्जनीस येणार अशी वदंता आहे. नारो शिवदेव व आबाजी नाईक वानवळे हे उभयतां येथें दो चौ दिवसां येणार. राजश्री लक्ष्मण बल्लाळ व बाजी विठ्ठल, माधवराव गंगाधर यांचे मामा, हे उभयतां ब्रह्मवर्तास भागीरथीस्नानास जाणार. जातां येतां पाटीलबावांचीही भेट घेऊन येणार. लक्ष्मणपंतांनीं राजश्री बाबुरावजीस पत्र लिहिलें आहे, त्यांची आज्ञा आली ह्मणजे जातील असें बोलतात. प्रस्तुत देखलें ऐकलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. तेथें हुंडावळ व पट्टा न पडतां ऐवज येथें पावे, असें करणार स्वामी समर्थ. येथेंही व्याजबट्टा लागेल. ही विनंति."

लेखांक ४७. ता० १४ मे इ.स. १७८१.

श्रीगजानन. मि० वैशाख वा। ७ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ जमादिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर व कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान आयुद्धेहून पत्रें बाईस आलीं. त्यांत मजकूर जे, बंगाल्यांत भोंसल्यांची फौज होती, त्यांशीं व इंग्रजांशी मातबर लढाई जाली. भोंसल्यांची फौज शिकस्त जाली. भोंसल्यांकडील राजाराम मुकुंद मातबर गृहस्थ फौजेंत सरदार होता, तो गरदीस मिळाला. कोठें ठिकाण लागत नाहीं ह्मणून वर्तमान. सुजाउद्दवलाचा फरजंद ठिकाणींच आहे. त्याचाही वकील इंग्रजांच्या वकिलाबरोबर पाटीलबावांजवळ आहे ह्मणून लिहिलें होतें, व दिल्लीहून पंधरा दिवसांचीं पत्रें आलीं. त्यांत वर्तमान कीं, नजबखानास

राजयक्ष्मा रोग होऊन, चवदावे रविलाखरीं हक जाला व पुरुषोत्तमपंत हिंगणे वारले. उज्जनींत देवराव होते, ते दिल्लीस गेले. ह्मणून राजश्री बापुजी महादेव बाई-जवळ सांगत होते. नजिबखानाचे जागा पादशाहांनीं कोणी एक मातबर मनुष्य चेल्यांत होता, त्यास शाहांनीं सर्फराज करून फौज त्याचे स्वाधीन केली. शीख बारा पंधरा हजार जमा होऊन दिल्लीपासून वीस कोसांवर आले आहेत. आणखीही शीख जमा होऊन येणार. यास्तव कांहीं फौजा शिखांच्या तोंडावर पाठवावयाची तरतूद करितात ह्मणून वर्तमान होतें. राजश्री पाटीलबावा ग्वालेर व गोहजच्या दरम्यान आहेत. बादशहाकडील व इंग्रजांकडील व पठाणाकडील राजेरजवाड्यांकडील जयपु-रवाले आदिकरून सर्वांचे वकील पाटीलबावांजवळ आहेत. पाटीलबावांची छावणी ते प्रांतीं होईलसें दिसतें. पाटीलबावांनीं बाईस पत्रें पेशजीं व हलीं लिहिलीं आहेत जे, देशीं सरकार तुकोजी होळकर आहेत, सरकारावर मसलत आहे. यास्तव माळव्यां-तील महालोमहालाचा पैका वसूल लवकर करून, श्रीमंतांचे विद्यमानें तुकोजी-बावांकडे ऐवज पाठवून देणें. कोठें जोरतलबी महाल असतील, त्याकरितां पाटील-बावांनीं आपले मामलेदारांस पत्रें बाईजवळीच पाठविलीं आहेत की, बाई जेथें आज्ञा करितील तेथें जमियत सुद्धां जाऊन, हरामखोरांस तंबी पोंहचावून, पैका वसूल करून देणें. बाईचे आज्ञेंत राहणें. याप्रमाणें पत्रें आलीं होतीं. तें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें होतें. सांप्रतही या अन्वयेंच आलीं आहेत. प्रस्तुत सरकारचीं पत्रें राजश्री लक्ष्मण बल्लाळ यांस हुजूर येण्याविषयीं व बाईस पत्र जें, लक्ष्मणपंत ज्या कार्यास आपल्याजवळ ठेवले, तो मजकूर कांहींच आपल्या ध्यानास न ये. तेव्हां त्यांचें तेथें राहणें विशेष काय? रवाना करणें. हुजूर येतील तीं पत्रें चंद्र २७ रविलाखरीचीं ती येथें चंद्र १२ मिनहूस पावलीं. मशारनि-लेहेंनीं आपलें पत्र वाचून दाखविलें. मीही तेथेंच होतों. मींही पत्र पाहिलें. तें पत्र व बाईचा लखोटा राजश्री माधवराव गंगाधर यांजकडेस पाठविलें. त्यांनीं पत्रें पाहून बाईकडे पत्रें घेऊन गेले. एकांती बाईस वाचून दाखविलीं. पत्रें ऐकून मर्जी दिक्क जाली. मध्यें एक दोन दिवस बोलावयास फावलें नाहीं. तदोत्तर चंद्र १६ रोजीं लक्ष्मणपंत व माधवराव उभयतां वाड्यांत जाऊन बाईशीं एकांतींच भाषणें केलीं. बाईनींही आपले पूर्वत्र कांही नम्र कांहीं दाबाचीं, भाषणें केलीं. तदोत्तर मशारनिलहेंनीं उत्तर केलें जे, आह्मांस सरकारची आज्ञा जाली, त्यापक्षीं येथें राहणें युक्त नाहीं. बाई बोलली जे, काय करून जातां? त्यांनीं उत्तर केलें जे, वर्षभर राहून तुह्मांशीं हेंच बोलत गेलों कीं, महालचा पैका जमा करून श्रीमंतांचे विद्यमानें तुकोजीबावांकडेस पाठवा अगर श्रीमंतांकडे पाठवा.

याच अन्वयें पाटीलबावाही लिहीत गेले. परंतु आपल्या विचारास कोणतीही गोष्ट न आली. तेव्हां येथें राहून उपयोग काय? एक श्रीमंतांच्या कल्याणांत सर्वांचें कल्याण. तत्रापि श्रीमंतांनीं हा वेळपर्यंत तुमच्या बहुमानांत कांहीं कमी केलें नाहीं. पुढेंही जें होणें तें बाईचें वडीलपण मर्यादा राखूनच करणें तें करूं. असें लिहित असतां आपले मर्जीस न आलें. त्यांचे आज्ञेप्रमाणेंच येथून घडलें असतें तर आज फार सरकारांत उपयोग होता. हे पेशआंदेशी व सरकारआज्ञा मान्य केली हें पाहून, श्रीमंत जे करणें तें तुमच्या मनोदयानुरूपच करते. परंतु आपल्यास धैर्य न पुरे. त्यास आह्मीं काय करावें? या प्रकारें फार बोलणीं जालीं. अतःपर आह्मांस निरोप द्या, आह्मी जाऊं. त्यास बाई बोलली जे, आमचेंही तापत्रय तुह्मी पाहातच आहां. यांणीं उत्तर केलें जे, तुमचें तापत्रय अधिक की पाटीलबावांचें अधिक? पुढें दो दो वर्षांच्या महालांच्या खंडण्या घेऊन मामलेदारांस महाल तीन वर्षें विकले. परंतु मसलत सोडली नाहीं. अशी मसलत तुह्मांवर काय पडली आहे, असें आह्मीं ह्मटल्यावर तुह्मांस राग येईल. सरकार उपयोगी व तुमचें बरें याअन्वयें आह्मीं तुह्मांस जितकें सांगणें तितकें सांगितलें. परंतु आपल्या ध्यानास कोणतीही (गोष्ट) न ये. त्यास आमचा उपाय काय? ज्यापक्षीं आपली खुद्द पसंती पाहिली, तेथें आह्मीं आतां काय सांगावयाचें आहे? ऐशीं स्पष्ट उत्तरें ऐकून बाईनींही करार केला जे, कमाविसदारांजवळून ऐवज घेतों आणि सरकारउपयोग जी मसलत पडे तसेंच घडे, याप्रमाणें आह्मी करितों. तोंवर तुह्मी उज्जनीस जाऊन, श्रीमहाकाळेश्वराचें दर्शन घेऊन, दहा बारा दिवसांत यावें. असा करार करून उठले. बाईनींही असा करार केला. परंतु खचितपणें असेंच अमलांत येईल असा भरंवसा पुरत नाहीं. क्षणभंगुर कारभार दिसतो. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें, तें सेवेसीं श्रुत होय. स्वामींनीं पेशजीं आज्ञापत्रीं आज्ञापिलें आहे जे, तुमचे खर्चास चारशें रुपये सबनिसाजवळ दिले. तुह्मांस पावतील. त्यास येथून सबनिसांसही दोन चार पत्रें व स्वामींसही चार पांच विनंतिपत्रें लिहून पाठविलीं. राजश्री गणपतराव विष्णु गद्रे यांचे येथें ऐवज देऊन, त्यांचें पत्र त्यांच्या गुमास्त्यास येथें पत्र पाठवावें, ह्मणजे येथें आह्मांस ऐवज पावेल ह्मणून सरकारांतही लिहिलें, व सबनिसांसही लिहिलें. परंतु उभय उत्तरेंही कांहीं येत नाहींत. येथें सेवकाची काय विपत्य आहे, नी देणेंदारांची काय सक्ती आहे, हें तापत्रय कोठवर लिहूं? सहाशें रुपये येथें देणें जालें आहे, येथें कोणी त्राता नाहीं. धन्यांनीं उपेक्षा केली तर सेवकास त्राता कोण? मजविषयीं तेथें कोणी स्मरण देण्यास नाहीं. धनी कृपाळू समर्थ. वारंवार पोटाचा मजकूर लिहितों ह्मणून स्वामी रागास येतील.

त्यास, स्वामीव्यतिरिक्त गरिबांचा त्राता कोण? स्वामी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति. आज चंद्र १९ मजकुरीं लक्ष्मणपंत बाईचा निरोप घेऊन उज्जनीस गेले. बाईनीं समागमें पांच स्वार देऊन बिदा केले. हे विज्ञप्ति."

लेखांक ४८. ता. २४ मे इ. स. १७८१.

श्रीगजानन. गि० ज्येष्ठ शु॥ १ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २९ जमादिलावलपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनें-करून वर्तमान यथास्थित असो विशेष. इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. राजश्री नारो शिवदेव उज्जनीस होते. त्यास पुण्याहून बाईशीं बोलावयास राजश्री बाबुराव विश्वनाथ श्रीमंतांनीं पाठविले आहेत. हें वर्तमान राजश्री पाटीलबावांस विदित जालें. त्यावरून पाटीलबावांनीं आपल्या तर्फेनें नारो शिवदेव येथें पाठविले. ते छ २२ मिनहूस दों प्रहरां पावले. येतांच बाईची भेट जाहली. बाबुरावजीसमीपच श्रीराममंदिरीं राहण्यास स्थळ दिलें आहे, तेथें आहेत. सरकारचें व राजश्री तात्यांचें पत्रें दोन रावजींस छ १८ मिनहूचीं डांकेबरोबर आलीं, तें येथें छ २४ मिनहूस दाखल जालीं. ते दिवशीं बाईस एकादशी होती. दुसरे दिवशीं प्रदोष. छ २६ रोजीं पत्रें घेऊन बाबुरावजी व नारो शिवदेव उभयतांही दरबारास गेले. एकांतीच बाईस पत्रें वाचून दाखविलीं. सरकारच्या व तात्यांच्या पत्रांचा अन्वय एकच होता. ते पत्रें ऐकून बाई रोषयुक्त कितीक गोष्टी बोलली. आज्ञापत्रीं होतें जे, बाईच्या खर्चाचा आजमास लिहून पाठवावा. त्या अर्थी बाई बोलली. जे मजला कोणासही जातीस खर्चास मागावयाचे नाहीं. नेमणूक करून घेणें नाहीं, असें अन्वय बोलली. मध्यें नारो शिवदेव यांमी व रावजीशीं बाईचें रूबरू बरींच भाषणें जालीं. चार घटका बसले होते. तदोत्तर बाबुराव यांणीं बाईस विचारलें जे, या पत्रांचीं उत्तरें श्रीमंतांस लिहिलीं पाहिजेत. बाई बोलली जे, विचारून देऊं. रावजी आज्ञा घेऊन आपल्या स्थळास आले. मागें नारो पंतांचे व बाईचे चार घटका एकांत होऊन, तेही निरोप घेऊन आपल्या स्थळास आले. याप्रमाणें रावजींनीं वर्तमान सांगितलें, तें सेवेसीं लिहिलें असे. पाटीलबावांच्य लष्करांतून आज दहा दिवसांचें वर्तमान आलें जे, तीन पलटणें नवीं इंग्रजांचे कुमकेर आलीं आहेत. त्याजवर पाटीलबावांनीं फौज पाठविली होती. जे फौजेसीं व ती पलट णांसीं लढाई बरीच जाली. इंग्रज शिकस्त होऊन माघारी गेले. चाळीस पन्नास माणसें इंग्रजांचीं ठार जखमी जालीं. कालपीकडे इंग्रजांचा एक कंपू आला होता

त्यांणीं कालपीस आपला अंमल जारी करून माघारी फिरून गेले. म्हणून या दहा दिवसांच्या पत्रांतच हेंही वर्तमान होतें. श्रीमंत राजश्री दादासाहेब जेथें आहेत तेथेंच आहेत, व वैद्य राजश्री कुपाभट शास्त्रीबावांनीं आपल्यास आशीर्वाद फार फार सांगितले आहेत. आशीर्वादपत्र द्यावें ह्मणून मीं विनंति केली. त्यांनीं उत्तर केलें जे, एक दोन पत्रें पूर्वी लिहिलीं होतीं, त्यांचें उत्तर कांहीं आलें नाहीं. आमच्या आशीर्वादें त्याचें कल्याण असो. ब्राह्मणराजाच्या कल्याणांत सर्वांचें कल्याण आहे. त्यांस स्मरणार्थ आमचा आशीर्वाद तुह्मीच ल्याहा ह्मणून बोलले. त्यांनीं येथें चाळीस दिवस दोघे ब्राह्मण व आपण अनुष्ठान केलें, आणि बोलले जे, येथून (शत्रूचा ?) पराजय. त्याप्रमाणें निदर्शनासही आलें, शास्त्री-बावांस पत्र येत असावें. ब्रह्मचारीबावा येथें आहेत. त्यांणींही पत्रें लिहिलीं आहेत. ते सेवेसी पाठविलीं आहेत. त्यास काय उत्तर येणें तें यावें. नित्य विचारीत असतात सेवकाची खर्चाची फार तसदी आहे. वारंवार विनंतिपत्रीं लिहितों यास्तव धनी रागें भरतील. परंतु मी गरीब सेवकानें स्वामीवितरिक्त कोणास ल्याहावें ? येथें लोकांचें देणें जालें आहे. स्वामी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

पै॥ चद्र १५ जमादिलाखर. **लेखांक ४९.** ता. २८ मे इ. स. १७८१.
इसन्ने समानीन. **श्रीगजानन.** मि. ज्येष्ठ शु॥ ५ शक १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ४ जमादिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं डाकेबरोबर व कासीदजोडीबरोबर विनंतिपत्रें लिहून रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. प्रस्तुत सरकारचें आज्ञापत्र सेवकास चंद्र २७ रविलाखरचें, तें चंद्र २७ जमादिलावलीं संध्याकाळीं येथें पावलें. राजश्री बाजीराव बर्वे यांचा मजकूर आज्ञा-पिला, तो मनन करून पत्र एकांतीं बाईस वाचून दाखविलें. ऐकून बाई बोलली जे, बर्व्यांचा मजकूर आह्मींही श्रीमंतांस पत्रीं लिहिला आहे. ते पत्रेंही पावलीं असतील. तेथून उत्तर काय येतें तें पाहवें. सरकारच्या पत्रान्वयें मीही थोडें थोडें बोललों. ऐकून उगीच राहिली. सांप्रत येथील प्रकार पाहतां, बुद्धीची स्थिरता थोडी. सबब कीं, श्रवण फार जालें आहे. ईश्वरपर पुराणें सदोदित ऐकतच आहेत, व राजकारणी मसलती सुभेदार कैलासवासी जाल्यापासून हा वेळपर्यंत स्वतःच एक आज्ञेनें कारभार करीत आली. ते सरकार उपयोग वगैरे कामेंकाजें एक-निष्ठ घडत आलीं. प्रस्तुत द्वामोशायन जालें. तें न व्हावें, पूर्ववत्प्रमाणें चालावें,

त्यामध्यें सरकारकामें व आपले घरचा भ्रम राहून, यथास्थित चालत आल्याप्रमाणें पुढेंही वागणूक घडावी, या अर्थीं वारंवार मध्यस्थासीं व कागदपत्रीं शिलशिला चाललाच आहे. परंतु उभयपक्षीं अनुमान दूर होत नाहीं. यास्तव आश्चर्य वाटतें. कीं धन्याची गादी श्रेष्ठ व कारभारी सर्वज्ञ, तेथें खरीखोटीयाचे निवाडे फार होत आले आहेत, आणि येथील सुधे चलनास विपर्यास कां पडतो, हेंच नवल वाटतें. घरांत कोठेंही दोन जाल्यानें त्या घरची काय अवस्था होती, हें इत्यादिक जाणतात. तेथें सर्वज्ञास न कळेसें काय आहे? या अर्थीं येथेंही कायम मिजाजी क्षणक्षणा राहत नाहीं. सबब कीं, जवळील मसलतगार आपलाले ओढीनें मसलत सांगतात. त्यामुळें बुद्धीची कायमता ठीक राहत नाहीं. सांप्रत मसलतशीर सरकार यामुळें येथून बाईनीं सरकारआज्ञेप्रमाणें फौज वगैरे कोणतेही विषयीं सरकार उपयोगी पडावें, श्रीमंतांचीं संकटें निवारण होऊन पुढें मातबर कामें काजें घडून यावीं, याअर्थीं राजश्री माधवराव गंगाधर एकांतीं, सरकार उपयोगी व पुढें उभय-पक्षीं कल्याण या भावीं, मातुश्रीस बराय मसलत सांगून, कोणताही एक निश्चय दृढतर करून येतात. रात्रौ दुसऱ्यांनीं जाऊन एकांतीं बाईस अनेक रीतींचे प्रस्तुत व पुढील मसलतीचे पैं दरपैं समजावून, केलेली मसलत मोडून, दुसराच विपर्यास समजावून बुद्धिभ्रंश करितात. दुसरे दिवशीं यांनीं जाऊन केले मसलतीचे अन्वय पाहतां, ते मर्जी बाईची नाहीं; आणीकच गोष्टी बोलितात. याप्रमाणें घडीघडीचे विचार सांगणार सांगतात. तेंच पसंत पडतें. यास्तव कायमतेची गोष्ट कोणतीही येथील लिहितां येत नाहीं. राजश्री राघो रावजी, पारनेरीं अगर पुण्यांत असतील. त्यांस सरकारची आज्ञा बोलावून व्हावी कीं, तुह्मांकडील कारकून बाळाजी कृष्ण बाईजवळ आहेत, ते बोलावून घेऊन दुसरा गरिबसा कारकून तेथें पाठवावा, अशी ताकीद बरेपणें व्हावी. येथून मीं असें लिहिलें ह्मणून कोणास न समजावें. येथील मुख्याच्या उक्ती व मुत्सद्यांनीं वगैरे देखलें ऐकलें लपेट व वर्त-मान विनंतिपत्रीं लिहिलें आहे. निराळे निराळे पर्याय समजून तपशीलवार आज्ञा-पत्र पाठवणार धनी समर्थ. हरकुबाईचे गांवाविषयीं बहुत दिवस विनंति लिहितों. कृपाकरून सोडणार धनी समर्थ. कासीदजोडीची रवानगी लवकर होय हे विज्ञप्ति. राजश्री पाटीलबावांकडील पत्र चंद्र १६ जमादिलावलचें राजश्री माधवराव गंगाधर यांस आलें. तें चंद्र २७ मिनहूस येथें पावलें. त्यांत मजकूर जे, नजबखान मयत जाला. पातशाहाजवळ कारभारी कोणी मातबर दाबाचा माणूस नाहीं. चेले आहेत. ते आपल्यांत आपण कज्जा करितात. शिखांची दाटी आहे व चहूंकडील मुलकी बंदोबस्तही जाला पाहिजे. यास्तव पातशाहांनीं फार अगत्य धरून बोलाविलें आहे.

यास्तव जरूर जाणें लागतें. तिकडे गेल्यानें सरकार कामें फार आहेत. यास्तव गेलें पाहिजे. राजश्री आबाजी नाईक वानवळे हे निरोप घेऊन देशास जातों ह्मणून गेले, ते महेश्वरीं मातुश्रीची भेट घेऊन पुढें गेले. ते प्रस्तुत बऱ्हाणपुरीं आहेत. येथें लष्करांत सावकार कोणी मातबर नाहीं. यास्तव तुम्हीं कोणी मातबर मनुष्य पाठवून, नाईकमजकुरास महेश्वरीं बोलावून, मातुश्री व तुम्हीं त्यांचें समाधान करून आह्मांकडे जरूर पाठवणें ह्मणून पत्र आलें. यांनीं बाईस दाखविलें. हे विचार करीत होती. तों तिसरे दिवशीं पाटीलबावांचीं दोन पत्रें एक बाईस व एक माधवरावजींस ऐशीं फार जलद पत्रें आलीं. याही दोहीं पत्रांत हाच अन्वय कीं, आबाजी नाईकांकडे कोणीं मातबर मनुष्य पाठवून, त्यांस बोलावून आणून, त्यांची खातरजमा करून, चाळीस पन्नास लाखांचें सरंजामानिशीं येथें येत, असें लवकर करा. तें पत्र पाहून, बाईनीं व माधवरावांनीं विचार करून, राजश्री बाजी विठ्ठल यांची रवानगी नाईकाकडेस केली. येथून चंद्र १ मिनहूस स्वार होऊन बऱ्हाणपुरास गेले. बाईनींही आबाजी नाईकांस येण्याविषयीं पत्रें लिहिलीं आहेत व पाटीलबावांचीही वरचेवर डाकेबरोबर पत्रें नाईकांस जातच आहेत. हिंदुस्थानांत राजेरजवाडे यांचे हर्षामर्ष आपसांत फार लागले आहेत. परस्परें सर्वांचे वकील पाटीलबावांकडेस आले आहेत, म्हणून वर्तमान ऐकिलें. राजश्री लक्ष्मण बल्लाळ उज्जनीस देवदर्शनास गेले आहेत. त्यांस जाऊन अकरा दिवस जाहले. दो चौं दिवसांत येतील. पाटीलबावांची स्त्री संगमनेरकरांची, कांहीं व्यथेमुळें उज्जनींत येऊन कांहीं दिवसां मयत जाली. बाजीराव बर्वे यांनीं पाटीलबावांस खासगत पत्र लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें जे, बाईकडे तुह्मीं आलां, उत्तम आहे, मातुश्री व आह्मीं दुसरा विचार नाहीं. बाई श्रीमंतांकडे तुह्मांस पाठवितील तर पक्केपणें श्रीमंतांचें अभय घेऊन पाठवितील. तुह्मीं तेथें जायास अनमान कदापि करूं नये. असें पत्र आलें म्हणून वर्तमान ऐकलें. सुरतेहून सावकारी वर्तमान आलें जे, ते प्रांतीं वारा व पाऊस व गारा पडल्या. समुद्रानेंही मर्यादा उल्लंघन करून वाढला. त्यामुळें दहा हजार घरहवेल्या पडल्या. सुरतेजवळ पांच जहाजें इंग्रजांचीं बुडालीं. त्यांत पांच हजार माणूस व पंचवीस लक्षांचा माल बुडाला. व सुरतेपलीकडेही कोणी बंदर इंग्रजांचें आहे, तेथेंही पांच जहाजें बुडालीं. याप्रमाणें वर्तमान ऐकिले. गोहजवाल्याकडीलही कोणी भला माणूस बाईकडेस आला आहे ह्मणून वर्तमान ऐकिलें. पुरतेपणें शोध करून लिहीन. इकडे सेंधवें, नागलवाडी व थालनेर या मैदानांत संताजी होळकर व वाघ व बुळे व काशी रंगनाथ असे हजार बाराशें फौज जमली आहे. कांहीं पायदळही आहे. भिल्लांचे पारिपत्य

(करूं) म्हणतात. परंतु यांस कांहीं विपर्यासला भासला आहे. कांहीं येथीलही बंदोबस्ती करावी, असें योजनेंत आलें. न कळेशा आहेत. परंतु यांच्या चित्तांत कीं, ज्या पक्षीं श्रीमंतांशीं बोलणें लागलें आहे, श्रीमंत बोलतात; त्यापक्षीं यांच्यानें काय होणें आहे ? थोडे तरतुदींतही आहेत. श्रुत होय हे विज्ञप्ति. नवीन वर्तमानः—गोहजवाल्याचा वकील वीरेश्वरपंत नामें चंद्र २९ रविलाखरीं येथें आले आहेत. मातुश्रीस एक पत्र व माधवराव गंगाधर यांस एक पत्र ऐशीं दोन पत्रें घेऊन आले आहेत. बाईनीं त्यांस भेटीस बोलावून चंद्र १ मिनहूस भेट होऊन, एकांतीं बाई व माधवराव व तो गृहस्थ ऐसे बसून, पत्रें यांनीं दाखविलीं. जबानीही कित्येक मजकूर बोलले. बाईनीं माधवराव यांस सांगितले जे, तपशीलवार यांचें वर्तमान ऐकून मजला समजावणें. यांनीं आपल्या घरास त्यांस बोलावून तपशीलवार वर्तमान विचारिलें. त्यांनीं सांगितलें जे, शेषईवर इंग्रजांचे मसलतीवर राजश्री पाटीलबावा होते, ते समयीं मसलत कोणेही प्रकारें विल्हे लागेना. तदोत्तर गोहजवाले राणाजीस पाटीलबावांनीं बोलावून, इमानप्रमाण बेल-भंडार होऊन, उभयतां एकदील होऊन, इंग्रजांस राणाजींनीं भय प्रीत दाखवून इंग्रजांस तेथून उखळलें. ते मसलत एकीकडे जाल्यानंतर पाटीलबावांनीं आमचेंच मूळ खणूं लागले. बहुत प्रकारें आह्मीं त्यांस सांगितलें, परंतु न समजेत. यास्तव पाटीलबावांनीं इमान बेलभंडार दिला आहे, तो श्रीमंतांकडे न्यावा तर दूर पंथ. पाटीलबावांनीं निकट केली आहे, यास्तव आपण वडील. वचनाचे साचे. कैलास-वासी सुभेदारांनीं ज्यास वचनें बेलभंडार दिले, ते निभावून हिंदुस्थान हस्तगत केलें. ती वहिवाट पाहून राजांनीं आपल्याकडे पाठविलें आहे. आह्मांस हातीं घेऊन पुढील कामेंकाजें आमचे हातें ध्या. असें बहुत प्रकारें वर्तमान सांगितलें. माधवरावजींनीं सविस्तर बाईस समजाविलें. बाईनीं उत्तर केलें जे पाटीलबावांस पत्र लिहा कीं, सर्वांशींच आपण वाईट जाल्यानें पुढें कोणी आपले बेलभंडारास पातेजून हिंदुस्थान हस्तगत कसें होईल ? यास्तव, यांसीं सलूख प्रस्तुत राखून पुढील कामें करा. पुढें प्रसंगोपात हे आपले टाफेखालींच आहेत. आतांच यांसीं बिघडूं नये. इंग्रजांचेंही पारिपत्य पुरतेपणें जालें नाहीं. यास्तव, प्रस्तुत राणाजीसीं सलूख राखून पुढील कामें करा. राणाजीचा वकील येथें आहे. त्यास आह्मीं आपल्याजवळ ठेवून घेतलें आहे. तुमचें उत्तर आल्यावर वकिलाबरोबर येथून कोणी भला माणूस देऊन तुह्मांकडे पाठवूं. असें पत्र लिहिणें म्हणून सांगितलें, व आबाजी नाई-क वानवळे यांस आणायास बाजी विठ्ठल पाठविले म्हणून पत्रें पाटीलबावांकडेस लिहिलीं पाठविलीं. उत्तरें आल्यावर वकिलाबरोबर भला माणूस देऊन रवाना करितील.

बाजीराव बर्वे यांस आणावयास विसाजी काशी व दोघे हुजरे येथें आले आहेत. त्यास बर्व्यांचे येण्याचा प्रकार लांबला. तेथून आज्ञापत्र येईल त्याअन्वयें त्यांचें येणें. हुजरे येथें फार श्रमांत आहेत. यास्तव आज्ञा आली तर हुजूर येऊं म्हणतात. येविषयीं काय ती आज्ञा आणवा म्हणून त्यांनीं सांगितलें आहे. सेवकाची खर्चाची फार तसदी. स्वामींची तों दर आज्ञापत्रीं आज्ञा येती जे, चारशें रुपये तुम्हांस खर्चास देविले आहेत. सबनिसाजवळ दिले आहेत. या गोष्टीस पांच महिने जाले. एक कवडी इकडे आली नाहीं. सबनीसही पत्र देखील लिहीत नाहींत. येथें आज अठरा महिने जाले, कर्ज खातों. सहाशें रुपये लोकांचें देणें जालें आहे. त्या देणेदारांचा व नित्यकृत्याचा उपद्रव श्रम कोठवर वारंवार पत्रीं विनंति लिहूं? येथें मेलें तर कोणी समाचार घेणार नाहींत. सबनिसांची कांहीं देवघेव मजकडे आहे. त्यास दोन तीनशें रुपये त्यांस व्याजबट्ट्यांत पावलेही आहेत. थोड्या बहुतानें वरचेवर पावतच आहे. असें असतां अशा श्रमांत त्यांनीं ऐवज अटकावून ठेवावा असें नाहीं. येथील देण्यापासून मुक्तता होय असें करणार धनी समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ५०. ता० ३१ मे इ. स. १७८१.
श्रीगजानन. मि० ज्येष्ठ शु॥ ९ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ७ जमादिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून चंद्र २१ मिनहूस डांकेबरोबर पत्रें रवाना केलींच आहेत. सेवेसी पावतील. सांप्रतचें वर्तमान राजश्री नारो शिवदेव व राजश्री आबाजी नाईक वानवळे हे उभयतां उज्जनीहून येथें चंद्र २० रोजीं आले. पांच सहा दिवस येथें होते. बाईचें त्यांचें बोलणें होऊन, चंद्र २६ रोजीं त्रितीय प्रहरीं मातुश्रीचा निरोप घेऊन उभयतां रेवापार जाले. चंद्र २७ रोजीं प्रातःकालींच कूच करून स्वार होऊन गेले. ऐकिल्यांत आलें जे, नारोपंत आसेरचे मध्यस्थींत जातात. आबाजी नाईक तों आपले घरास जातात. इतकें वर्तमान ऐकिलें. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान येथें दरबारांत ऐकिलें. पाटीलबावांनीं आपले कबिले दरोबस्त उज्जनीकडे रवाना केले. सडेच आठ दहा हजार फौज व दहा हजार गोसावी, कांहीं तोफखाना, इतक्या सरंजामानिशीं गोहज व ग्वालेरच्या दरम्यान आहेत. गोहजवाल्याच्या पांच सात गळ्या घेतल्या. आणीकही मातबर गळ्या घेणार. दीड हजार फौज कोणी अविंध

सरदार बावांकडील होता, त्याजबरोबर फौज देऊन कच्छवाघर प्रांतीं पाठविले होते. त्यास, गोहजवाल्यानें दोन पलटणें गुप्तरूपें पाठवून त्या फौजेवर छापा घातला. फौज शिकस्त जाहली. दहा पंधरा स्वारांनिशीं तो अविंध निघून पाटीलबावांकडेस आला ह्मणून ऐकिलें. राजश्री बाजीराव बर्वे यांचा मजकूर तरः–येथें त्यांचे तोडमोडीचे जाबसाल होऊन, येथून बाईनीं व राजश्री लक्ष्मण बल्लाळ व राजश्री माधवराव गंगाधर यांनीं सरकारांत पत्रें लिहिलीं आहेत. सरकारची आज्ञा जशी येईल तशी वर्तणूक करितील. पाटीलबावांकडून चंद्र २७ रोजीं डांकेबरोबर पत्रें नारो शिवदेव यांजकडे आलीं. तीं रेवा दक्षिणतीरीं त्यांजकडेस गेलीं. त्यांनीं वाचून पाहून बाईकडेस पत्रें पाठविलीं, नी नारोपंत पुढें बऱ्हाणपुरास गेले. तीं पत्रें बाई व माधवराव गंगाधर व राजश्री लक्ष्मण बल्लाळ त्रिवर्ग एकांतीं बसून वाचून पाहिलीं. तीं पत्रें पाटीलबावांनीं सरकारांत स्वामींस लिहिलीं आहेत. त्यांत मजकूर जे, बाईच्या व राजेश्री तुकोजी होळकर यांच्या दुष्कृत्यांमुळें चित्तशुद्धता नाहीं. येविषयीं सरकारांतून राजश्री बाबुराव वैद्य येथें आले होते. इकडून नारो शिवदेवही आले होते. उभयतां चार पांच महिने महेश्वरीं राहून, तोडमोडीचीं भाषणें चिकित्सायुक्त होऊन, वरचेवर सरकारांत व आह्मांकडे लिहित गेले. त्या पत्रांचीं उत्तरें सरकारांत व बाबुरावजीस व नारोपंतांस आह्मी लिहीत गेलों. शेवटीं ठरलें जे, कैलासवासी सुभेदार गेल्यापासून बाईकडे मुलकी वगैरे दौलतीचा कारभार चालत आला. तुकोजीबावा चाकरी करीत आले आहेत. त्यास प्रस्तुत तुकोजीबावा व नारो गणेश यांनीं वेगळें (फाटलें....) आहे. दोन वर्षेपर्यंत राडा पडला आहे. शेवटीं, बाबुराव वैद्य यांकडील सर्व मंडळी आदिकरून आह्मी सर्वांचे संमतें ठरावून गेले जे बाईनीं पूर्ववत्प्रमाणें सरदारीचे डौल चालवावे. तुकोजीबावांनीं फक्त चाकरी करून असावें. याप्रमाणें येथें निश्चय होऊन हुजूर विनंती करावयास गेले. त्यासही साठ नऊ महिने जाले. परंतु अद्याप कोणताही ठराव होऊन निश्चयपत्रें आलीं नाहींत. रुबरू माझे संमतेंकरून निश्चय व्हावा अशी सरकारची मर्जी असल्यास, आपणासही देशीं गुरुदर्शनास येणें आहेच. आज्ञापत्र आलें तर याप्रमाणेंही घडेल. नाहीं, या पक्षीं मर्जी उदासच असली, तर बाईस काशीस जावयाचीं पत्रें व दस्तकें आलीं ह्मणजे मातुश्रीस आह्मीच महायात्रेस घेऊन जाऊं. याप्रमाणें पत्रें पाटीलबावांचीं सरकारांत पाठवायास आलीं आहेत. येथें पत्रें वाचून पाहिलीं, त्याअन्वयें लक्ष्मण बल्लाळ यांचें पत्र सरकारांत व रावजीस व माधवराव गंगाधर यांचें पत्र राजश्री दादाजीस व बाईचीं पत्रें सरकारांत अगर रावजीस अगर दादाजीस कोणकोणास लिहितील तीं लिहोत. यांचीं व पाटीलबावांचीं

पत्रें सरकारांत पाठविणार ह्मणून वर्तमान ऐकिलें. पाटीलबावांकडून दुसरीं पत्रें आल्यावर हें पत्र पाठविणार ह्मणून वर्तमान ऐकिलें. चिमाजी बुळे यांनीं कांहीं जमाव जमा केला आहे, व सेंदवेकर संताजी होळकर यांचे दोनशें स्वार व कांहीं पेंढारी ऐसे व कांहीं पायदळ जमा करून, खरगोण वगैरे प्रांतांत धामधूम करावी, महेश्वराभोंवतींही गडबड करावी, असे योजनेंत आहेत. हें वर्तमान बाईस कळलें. त्यास बाईनीं येथून एक पागा नागलवाडीस पाठविली आहे, कीं चिमाजी बुळ्याजवळ उतरा. त्यांचें चेष्टित काय तें ध्यानांत धरून वरचेवर लिहून पाठवीत जाणें. ह्मणून त्या पाग्यास बाईनीं सांगितलें आहे. बुळ्यांनीं आवई टाकिली आहे कीं, भिलाभारवांचें पारिपत्य केलें पाहिजे, यास्तव जमाव करितों. आपणही कांहीं सरंजाम पाठवावा. ह्मणून बाईकडे कारकून पाठविला होता. बाईनीं सांगितलें जे, आह्मींही पागा पाठविली आहे. उभयपक्षींही असे घावडाव चालत आहेत. असें वर्तमान ऐकिलें. दादासाहेबांकडील वर्तमानः— श्रीमंत सुरतेसच आहेत. त्यांजकडील दोन पलटणें खडक्याव्याऱ्यावर आहेत. राजश्री गणेशपंत बेहेरे चार पांच हजार फौजेनिशीं दहीवलीवर आहेत. हें वर्तमान नंदुरबारेहून कोणी भले माणूस आले त्यांनीं सांगितलें. लालजीदास सावकाराचा मूल येथें बाईजवळ आहे. खर्चाच्या ऐवजाकरितां बाईनीं येथें अटकावून ठेविला आहे. त्यास हुजूर पाठवावा ह्मणून पेशजीं जासूदजोडी आली होती. सांप्रत हुजरेजोडी सरकारचीं पत्रें घेऊन आले, ते अक्षतत्रितीयेस दों प्रहरां येथें आले. दरवाज्याची परवानगी देऊन किल्ल्यांत घेतले. बाईनीं रुबरू बोलावून वर्तमान विचारलें. यांनीं पत्रें देऊन जबानीही सांगितलें. सावकाराचा मजकूर ऐकिला. संध्याकाळीं बाईनीं हुजऱ्यास वाड्यांत जेऊं घालून, विसाजी काशी त्यांजवळ उतरावयास पाठविलें. हुजऱ्यांजवळील पत्र पाहून बाईस वैषम्य फार वाटलें जे, सावकारांचा प्रकार कसा, तो तपशीलवार पेशजीं श्रीमंतांस आह्मीं लिहून पाठविला असतां फिरून श्रीमंतांनीं त्याच मजकुराकरितां पत्रें देऊन हुजरे पाठविले. तस्मात् तुकोजीबावा व नारो गणेश व लालजीदास यांनीं जे जे बनावून गोष्टी सांगतात, त्याच गोष्टी श्रीमंतांस सत्य भासल्या. आह्मीं जें तपशीलवार पत्र लिहिलें तें मिथ्या भासलें किंवा, आतांची रीत अशीही जाली असेल कीं, ज्यांनीं जो गैरवांका समजावून सांगितला, तोच मनन होऊन पत्रे व हुजरे व जासूद देवितात. छान करण्याची रीत ज्यांची त्यांजमागें गेलीशी दिसती. असो. आह्मांस तों वाजवीचे रीतीनें सावकाराजवळून पैका घेतला पाहिजे. हुजऱ्यांस उत्तरें देऊन बिदा करा. आजच बिदा करा. एकंदर येथें हुजरे राहूं देऊं नका. फार रागें भरली. तेव्हां मुकुंदराव हरी व लक्ष्मण बल्लाळ यांनीं बहुत प्रकारें बाईस सम-

जावून सांगितलें. पत्रांचीं उत्तरें लिहावयास तों आज्ञा जाहली. तिसरे दिवशीं, लक्ष्मण बल्लाळ व माधवराव व मुकुंदराव यांस बाईनीं सांगितलें जे, हुजऱ्यांशीं व त्या सावकाराच्या मुलांशीं तुह्मी बसून रुबरू करा. आह्मी येथें तसदी त्यास काय करितों व गैरवाजवी आह्मी काय करितों, हेंही त्यास समजूं द्या. उत्तरें देऊन हुजऱ्यांस वाटे लावा. कदाचित् त्यांनीं आड केली तर परिछिन्न हुजऱ्यांस नावेंत घालून पार करून द्या. गैरवाजवीच आह्मी करूं, तेव्हां अपराधही पदरीं घेऊं. ज्यापक्षीं आह्मांसच गैरवाजवी करणें नाहीं, तेव्हां आमचे येथील जाबसाल आह्मी वहिवाटल्यास श्रीमंत कोणावर रागें भरतील? आह्मी आपले येथील कारभार हा वेळपर्यंत हुजूर पाठविला नाहीं, आणि अशा कामास सरकारचे हुजरे येण्याचाही सांप्रदाय नाहीं. हुजऱ्यांनीं पत्राचीं उत्तरें घेऊन जावीं. असें रागें भरून बाई बोलली. यांनीं त्रिवर्गांनीं सावकाराची व हुजऱ्यांची रुबरू केली. पत्राचीं उत्तरें घेऊन जा ह्मणतात. हुजरे ह्मणतात जे, आह्मांस सरकाराची आज्ञा येईल तेव्हां जाऊं. अद्याप बाईच्या कानां घातलें नाहीं. पुढें काय जाबसाल होईल तो पहावा. ह्याप्रमाणें लक्ष्मण बल्लाळ बोलत होते. ते ऐकिलें वर्तमान सेवेसी लिहिले अस. स्वामी ह्मणतील कीं, ऐकिलें वर्तमानच लिहितां; तुह्मांस तेथें कशास ठविलें आहे? तेविषयीं विनंतिः—प्रस्तुत जाबसालचें कामकाज जिकडे आहे, त्यांसींच बोलणें चालणें एकांती दुकांतीचे बोलत आहेत. त्या बोलण्यांत त्यानीं न बोलावितां जाणें युक्त दिसत नाहीं. तत्रापि दोन चार वेळां तसेंही जाऊन पाहिलें. परंतु त्यांस व खलबतच्या मुत्सद्यांस संशय पडू लागला. यास्तव मातुश्रीस नित्य एक वेळां दरबारचे समयीं मुजरा करून, दोन घटका बसून, दरबार बरखास जाहला, ह्मणजे लक्ष्मणपंतांकडे जाऊन त्यांस नमस्कार करितों. ते वर्तमान सांगतात तें व कांहीं कोठें एकिलें वर्तमान सेवेसीं लिहीत आहें. दुसरें वर्तमानः—राजश्री पाटीलबावांचे कबिले वैशाख शु॥ द्वितीयेस उज्जनीस दाखल जाले. राजश्री बाजीराव बर्वे यांचीं घोडीं धर्मपुरीस ठेविलीं होती. त्यास वैशाख शु॥ ४ बुधवारीं, जे पागेंत घोडीं होतीं, ते पागेस अग्नीचा उपद्रव जाहला. तथेंच हजार दोन हजार बाणही गांववाल्यांचे होते, त्या बाणांसही आग लागली. गवताच्या गंजांसही आग लागली. घोडीं सारीं आगीच्या व बाणांच्या उपद्रवानें मेलीं. एकशें त्रेचाळीस घोड्यांत पंचवीस घोडीं वांचलीं आहेत. त्यांतही दहा बारा मरतील. जळालीं आहेत. कांहीं कापडही जळालें. रावजीचें कांहीं जवाहीरही लक्षपरियंत होतें तेंही जळालें. याप्रमाणें पंचमीस प्रातःकाळीं गुरुवारीं येथें वर्तमान आलें. दिल्लीहून पंधरा दिवसांचीं

पत्रें येथें आलीं. त्यांत वर्तमान कीं, नजबखान पादशाही दिवाण चैत्र वद्य ८ हक जाहले. त्याचे आधीं आठ चार दिवस पुरुषोत्तमपंत हिंगणे तेही मार्गस्थ जाले. दिल्लीभवतां शिखांचा गवगवा फार आहे ह्मणून वर्तमान होतें. नवाबाकडेस यांचा वकील आहे, त्याचीं पत्रें येथें आलीं. त्यांत वर्तमान जे, मुधोजी भोंसल्याचे पुत्र चिमणाजी भोंसले त्यांस नवाबांनीं पांच लक्षांची जहागीर दिली. भोंसले व नवाब एकचित्तें आहेत. उभयतांही इंग्रजांच्या पत्त्यावर आहेत. बाजीराव बर्वे यांजवर येथें चौकी बाईनीं बसविली आहे. ती उठवावी ह्मणून बाजीराव उपोषणें करितात. कोणी रदबदलीही करितात. बाई ऐकत नाहीं. पुढें काय होईल तें पहावें. सावकाराचा मूल आणावयास हुजरे आले होते. त्यास बाईनीं साफ सांगितले जे, ऐवज घेतल्याशिवाय सावकारास सोडीत नाहीं. पत्रांचीं उत्तरें देऊन हुजरे काल चंद्र ६ जमादिलावलीं बिदा केले. हरघडीं सावकाराविषयीं स्वामी तरी कशास त्यांस लिहितात? बाई ऐवज घेतल्याशिवाय सावकार सोडीत नाहीं. आपण पत्रें लिहिणें तर विचार करून लिहावीं. पाटीलबावांकडील पत्रें, यांनीं आपले कासीदजोडीबरोबर पुण्यास पाठविलीं. ह्मणून वर्तमान ऐकिलें. सेवकास खर्चास वरात चंद्र १० मोहरमची पाठविली, ती कमाविसदारांनीं फिरून दिली. ती पुण्यास पाठविली. पुण्यांत स्वामींनीं सहाशें रुपये कमाविसदारांजवळून घेतले. मजला आशीर्वादपर आज्ञा आली जे, चारशें रुपये तुह्मांस सबनिसाजवळ दिले आहेत. त्यांतून एक कवडी येथें पावली नाहीं. चार महिने जाले वरातीस, धनी सामर्थ्यवान् असतां सेवकास येथें खर्चास पोंहचत नाहीं! सबनीस श्रीमंत थोर. त्यास माझें गरीबाचें अगत्य काय? धनी सांगून सुटले. आह्मी येथें रडत हाका मारीतच आहों!! स्वामींस तरी गरीबागुरिबाचें स्मरण कशास? कोण सांगतो? पांच सहाशें रुपये व्याजबट्यासुद्धां येथें देणें. नित्य खायास पाहिजे. असे श्रम आहेत. लिहितां भागलों! स्वामीही ऐकतां कंटाळले!! फार दिवस येथें जाले. दर्शन होय तर बरें आहे. हे विज्ञप्ति."

पैवस्ती चंद्र १२ जाखर इसन्ने समानीन. **लेखांक ५१.** ता० ३१ मे इ. स. १७८१. **श्रीगजानन.** मि ज्येष्ठ शुद्ध ९ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून सां॥ नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ७ जमादिलाखरपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमानें पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर व काशीदजोडीबरोबर सेवेसी पाठविलीं आहेत. पेशजीं स्वामींनीं

राजश्री बाबुरावजींस पत्रें पाठविलीं तीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, गंगाजलनिर्मळ मातुश्री अहिल्याबाईस बहुत प्रकारें सांगून, तुकोजीबावांनीं त्यांनीं एकचित्तें चालावें यांत फार उत्तम आहे. घरांत फूट जाहल्यानें बाहेर उपहास होऊन स्वरूप राहत नाहीं. या अन्वयें बहुत प्रकारें पत्रीं आज्ञा. त्याप्रमाणेंच रावजींनीं व राजश्री नारो शिवदेव उभयतांनीं फार प्रकारें बाईस समजावून सांगितलें. परंतु त्यांचें प्रथम पदीं जें बोलणें आहे तेंच आजपर्यंत आहे. प्रस्तुत चंद्र २७ जमादिलावलचीं सरकारचीं पत्रें डाकेबरोबर आज आलीं आहेत. तीं दाखवायाचीं आहेत. याजवर उत्तर काय करितात तें पहावें. राजश्री बाबुरावजींनीं विनंतिपत्रीं सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. श्रुत होय. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमानः– पूर्ववत्प्रमाणें इंग्रजांचे शहावर आहेत, तसे आहेत. काल डाकेबरोबर तिकडीलही पत्रें आलीं आहेत. तींही राजश्री नारो शिवदेव यांनीं सेवेसी पाठविलीं आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेजवळ जेथें आहेत तेथेंच आहेत. सौ. उदाबाई सुभेदाराची कन्या यांचे विद्यमानें तुकोजीबावांकडील जाबसाल फार नम्रतेचे बाईकडे लागले आहेत. यास्तव बाईनीं येथून आपाजी गीते व उदाबाईचा कारकून ऐसे येथून चंद्र ४ मिनहूस रवाना केले. तुकोजीबावांकडेस आले आहेत. सरकारचीं पत्रें आज चंद्र ६ मिनहूस त्रितीय प्रहरी डाकेबरोबर आलीं. तीं वाचून पाहून रात्रीं बाबुरावजी व नारो शिवदेव पत्रें घेऊन बाईकडे वाड्यांत गेले. मीही समागमें होतों. बाईस पत्रें वाचून दाखविलीं. बाईचें पत्र बाईस दिलें. तदोत्तर तिघें एकांतास बसलीं. सहा घटकांपर्यंत एकांत जाहला. तदोत्तर आपलाले बिऱ्हाडास आले. पुर्तेपणें जाबसाल जाहलेवर सेवेसीं विनतिपत्रीं लिहिण्यांत येईल. जाहलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. परंतु तुकोजीबावांचे अंतस्थ जाबसाल बाईकडे येत असतात. हे विज्ञप्ति. सुरतेकडे गणेशपंत बेहेरे फौजेसुद्धां जाऊन मुलखांत धूम केली आहे ह्मणून येथें बाजारी वर्तमान आहे. सेवसी श्रुत होय."

लेखांक ५२. ता० ४ जून इ. स. १७८१.
श्रीगजानन. मि० ज्येष्ठ शुद्ध १३ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ११ जमादिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबराबर पत्रें रवाना केलीं आहेत. प्रस्तुतचें वृत्त सरकारचीं पत्रें राजश्री बाबूराव विश्वनाथ व राजश्री नारो शिवदेव यांस व बाईस चंद्र २७ जमादिलावलचीं पत्रें

तीं येथें चंद्र ६ मिनहूस पावलीं. पत्रें पाहून संध्याकाळीं बाबुरावजी व नारो शिवदेव पत्रें घेऊन दरबारास गेले. मीही समागमेंच होतों. बाईचें पत्र बाईस वाचून दाखविलें. तदोत्तर बाई व रावजी व नारोपंत ऐसे एकांतीं बसून, उभयतांस व पाटीलबावांस सरकारचीं पत्रें होतीं, त्यांतील अन्वय सविस्तर बाईस समजाविलें. बहुत युक्तीच्या वाटेनें बाईस समजाऊन सांगितलें. सरकारच्या आज्ञापत्रीं दोन मजकूर होते जे, तुकोजीबावांनीं चाकरी करावी. फौजेच्या देण्याच्या तोडी बाईनीं संभाळाव्या. प्रस्तुत मसलत लांबली आहे. सांप्रत फौजेसुद्धां तुकोजीबावांनां छावणी करावी लागेल. प्रस्तुतच्या मसलतीचे फौजेचें देणें व छावणीस खर्च लागेल तो व बादबरसात मसलतीवर हमराहा जाले पाहिजे, त्या खर्चाची तरतूदही सारी बाईनीं सरबराई करावी; आणि सारे दौलतीच्या सरंजामाच्या तालुक्यांचाही बंदोबस्त करावा. सारेंच बाईनीं आटोपावें हें कलम एक. व दुसरें कलम, बाईजवळ दौलतीचा लवाजमा काय असेल तो व खासगत खर्च काय असेल त्याचा अजमास करून लिहून पाठवावा. त्याचा बंदोबस्त खर्चाप्रमाणें करून देऊं. वरकड सारा बंदोबस्त तुकोजीबावांनी करावा. कमाविसदार येथे महालोंमहालचे नेमून पाठविले आहेत. त्यासीं दिक्कत न करितां बाईनीं यांचे कमाविसदार महालोमहालीं बसवून द्यावे. तुकोजीबावांनीं सरकारचाकरी करून तुमचें मानमहत्त्व, वडिलपण राखावें. बाईशीं वडिलपणाचे मर्यादेनें यांनीं वर्तावें. हे सरकारची आज्ञा बाईस समजवावी. कोणतें अनकूळ पडतें तें पुसून लिहून पाठवा ह्मणून आज्ञा आली आहे. या दोहींतून कोणते गोष्टीवर आपली मर्जी प्रसन्न ती आज्ञा करावी. त्याप्रमाणें श्रीमंतांस लिहून पाठवूं. त्यास बाईनीं उत्तर केलें जे, खासगत खर्चाची नेमणूक श्रीमंतांजवळून अगर तुकोजीबावांजवळून करून घेणेंच नाहीं. तुकोजीबावांनींच महालचा बंदोबस्त करावा असेंच श्रीमंतांचें मानस आहे, तर त्यानीच आपला बंदोबस्त करावा. मजला जें खर्चास लागेल ते महालांतून घेईन. केवळ तेच दौलतीचे धनी, आमचा वारसा कांहींच नाहीं, अशी श्रीमंतांची मर्जी आहे कीं काय? तेव्हां रावजींनीं उत्तर केलें जें, हे प्रकार कांहीं श्रीमंतांच्या चित्तांत नाहींत. परंतु मसलतीचें काम भारी येऊन पडलें आहे. कामावर मनुष्यांची समजूत कशी करावी लागती हें आपणास विदितच आहे. या सरदारींतही हमेश कामेंकाजें पडतच गेलीं आहेत. लोकांच्या व सरदारांच्या समजुत्या करून कामावर हमवार कोणें रीतीनें करावें, या युक्तिप्रयुक्ती सर्व आपल्या ध्यानांत आहेत. प्रस्तुत उभयपक्षींही ओढीचा कारभार आणि मसलत भारी पडली आहे. यास्तव, इतक्या घालमिलीचे जाबसाल करणें प्राप्त. नाहींतर इतके दिवस या जाबसालाचीं कामें पडलीं नाहींत. कांहींही जाबसाल

निमित्यावर उपस्थित होतात. असें बहुत प्रकारें युक्तीच्या वाटेनें भाषणें जालीं. दुसरा मजकूर बाई बोलली जे, तुकोजीबावांनीं फक्त चाकरी करून असावें आणि महालांचा बंदोबस्त करून खर्चाची सरबराई आह्मीं करावी, ह्मणून श्रीमंतांनीं लिहिलें. त्यास फार उत्तम आहे. तुह्मींच नवा कारभार करणें नी तो कसा होईल ये गोष्टीचें संकट नाहीं. सुभेदारांमागें इतके दिवस हाच कारभार करीत आलों आहों. प्रस्तुत मात्र कारभारी यांनीं उपहास मांडला आहे. श्रीमंतांचे मर्जीचाही कल तसाच दिसून आला. अस्तु. इतकेंही होईल. परंतु जी फौज ठेवणें त्याची हजरगणती व लोकांच्या बोल्याचाल्या करणें त्या, व कोणास काय देणें व तगीरीबहाली लोकांची करणें येविषयीं हुकूम आमचा. माझा कारकून आपल्या हातें कवडीपासून लक्षावर खर्च करणें तो करील. हिशेब आह्मांस दाखवील. जें करणें तें आमचा कारकून करील. तुकोजीबावांनीं चाकरी करावी. पैसा खर्च ठायाठाय लागेल तो आमच्या कारकुनांनीं चौकैशी करून खर्चावा. आपल्या (मर्जी) शिवाय खर्चवेंच भलताच त्यांनीं करूं नये. हेंही आह्मांस कबूल आहे. असें बोलली. मध्येंमध्यें रावजी व नारोपंत उभयतांहीं फार भाषणें केलीं. कित्येक प्रकारचे दृष्टांतावह बोलणीं उदंड जालीं. ते दिवशीं इतकेंच भाषण जालें. रात्रही फार जाली. निरोप घेऊन आपलाल्या स्थळास आले. त्यावर चंद्र ८ रोजीं, पांच घटका रात्र गेल्यावर बाईनीं बाबुरावजींस बोलावूं पाठविलें. बारा घटका रात्रपर्यंत उभयतांचेंच भाषण जालें. त्या भाषणाचा भाव रावजी बोलत होते जेः—बाई ह्मणाली जे, श्रीमंत वारंवार लिहितात, 'धन्याचें न ऐकिल्याम त्यांच्या चित्तांत विपर्यास जाईल या अर्थीं.' नेमणूक तों मी कोणाचीही करून घेणार नाहीं. प्रस्तुत श्रीमंतांची मर्जी अशीच आहे. फार उत्तम आहे. त्यांचे मर्जीप्रमाणेंच सांप्रत करोत. परंतु हे इतकेही तुमचे आमचे जाबसाल श्रीमंतांचे पत्रान्वयें जाले, ते सारे राजश्री पाटीलबावांस आह्मी लिहितों. त्यांचें उत्तर आल्यावर पुरतेपणें तुह्मांशीं बोलूं. जोंवर श्रीमंतांवर हे इंग्रजांची मसलत आहे, तोंवर आह्मीं आपले कर्जवाम करून कालक्षेप करावा. मसलत [जाल्यावर] आमचा जाबसाल श्रीमंतांनीं करून द्यावा असें भाषण जालें. बाईचे कारभारी व बाबुराव व नारोपंत ऐसे बसून पाटीलबावांस कागद लिहितात. तिकडून काय उत्तरें येतील तें पहावें. पाटीलबावांकडील पत्राचे मसुदे आज चंद्र १० रोजीं करितात. ते मसुदे बाईस दाखवून न्यूनाधिक्य काय तें सांगतील त्याप्रमाणें पत्रें तयार करून पाठवितील. पाटीलबावांकडे पत्रें गेल्यावर बाबूरावजीही जालें वर्तमान सेवेसी लिहितील. मीं ऐकिलें तें वर्तमान सेवेसी लिहिलें असे. पाटीलबावांकडील वर्तमान तों जेथें आहे तेथेंच आहेत. इंग्रजांवर दाब ह्मटलें तर असेंच आहे.

छाप्याचा त्यांचा दाब यांजवर रात्रीं सावधतेचा आहे. राजश्री गणेशपंत बेहेरे कोंडाईबारी उतरून सुरत प्रांतीं गेले. यांनीं मुलखांत धुमधाम करतांच दोन तीन पलटणें सुरतेजवळ होतीं तें यांजवर आलीं, ह्मणून वदंता येथें आहे. नबापूर पाय-ट्यापावतर पलटणें आलीं ह्मणून बाजारी वर्तमान आहे. श्रीमंत राजश्री दादा-साहेब सुरतेजवळ फुलबोर आहे तेथेंच आहेत. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. खर्चाची विपत्य फार आहे. धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

पैवस्ती चंद्र २७ जमादिलाखर **लेखांक ५३.** ता० १० जून इ. स. १७८१.
इसन्ने समानीन. **श्रीगजानन.** ज्येष्ठ व॥ ४ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १७ जमादिलाखरपर्यंत स्वामींचे कृपावलोकनें करून मुक्काम महेश्वर वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं. सांप्रतचा मजकूर, सरकारचे पत्रान्वयें मातुश्री अह-ल्याबाईशीं व राजश्री बाबुराव व नारो शिवदेव यांशीं भाषणें जाहलीं. तो मजकूर सविस्तर बाईनीं राजश्री पाटीलबावांस लिहिला आहे, व या उभयतांनींही पत्रें लिहिलीं आहेत. पत्रें गेल्यास चार पांच दिवस जाहले. तेथून पाटीलबावा उत्तरें पाठवितील तीं पाहून, येथें बाईच्या बोलण्याचा उभयतांशीं निश्चय जो होईल तो सेवेसी लिहून विनंतिपत्रें येतील. नारो शिवदेव उज्जनीस जायाची तांतड करीत होते. त्यांस बाईनीं सांगितलें जे, पाटीलबावांस पत्रें लिहिलीं आहेत, त्यांचीं उत्तरें येतील. तीं पाहून निश्चय ठरल्यावर मग जाणें ह्मणून राहविलें. राजश्री आबाजी नाईक वानवळे आले होते. त्यांस पाटीलबावांचीं पत्रें आलीं कीं तुह्मीं लवकर येणें. यास्तव ते उज्जनीस गेले. तेथून पाटीलबावांकडेस जाणार. पाटील-बावांकडील वर्तमान अद्याप जेथें आहेत तेथेंच आहेत. इंग्रजही सिप्री कुलार-सावर आहेत. अद्याप लढाई कांहीं जाहली नाहीं. पाटीलबावांजवळ रांगड्यांच्या फौजा कांहीं जमा जाहल्या होत्या. ते एक एक निघून आपलाल्या स्थळास जाऊं लागले. खेची आहेत, व पाटीलबावांकडे पांच सहा हजार नागे गोसावी नवे आले, तेही ठेविले आहेत. पहिलेही दोनचार हजार आहेत. सारे मिळून एकदां इंग्र-जांशीं मातबर लढाई करणार आहेत. पातशाहाकडील फौज आणावयास होळकरा-कडील गृहस्थ पाठविले होते, ते जयपुरीं आहेत. त्यांनीं पाटीलबावांचीं पत्रें नजीबखानाकडे पाठविलीं होतीं. त्यांनीं उत्तरें पाठविलीं जे, शिखांची मसलत भारी इकडे आहे; त्यांचें पारिपत्य जाहलेवर बादबरसात फौजा पाठवूं. याप्रमाणें

त्याजकडील उत्तर आलें. दिल्लीहून नजीबखानानें आपला चेला आंबरशाह त्याजबरोबर मातबर सरदार चाळीस हजार फौजसुद्धां व तोफखाना ऐशा सरंजामानिशीं शिखांवर पाठविले होते. यांनीं सरदेवर जाऊन शिखांशीं गांठ घातली तेथें लढाई उभयतांची जाहली. शिखांनीं पादशाहाचे फौजेचा मोड केला. तोफा साऱ्या घेऊन गेले. दहा पंधरा हजार लोक यांचे शिखांनीं ठार करून पानपतापावतर यांची फौज पळून आली. आणीख फौजेची तरतूद करून जगी सरंजामसुद्धां शिखांवर पाठवावयाच्या तरतुदींत नजीबखान आहेत. याप्रमाणें तिकडील वर्तमान आलें. ग्वालेरचा किल्ला इंग्रेजांनीं गोहजवाला राणास दिला. सात लक्ष रुपये गोहजवाल्यानें इंग्रजांस दिले. गोहजवाले व नरवरवाले हे इंग्रजांच्या सलुखांत आहेत. रस्त पोहोंचावितात. पलटणें येतात. कुमक त्यांस येऊं देतात. त्यांचा त्यांचा सलुखा आहे. कालपीस इंग्रजांचा एक कपू आला ह्मणून काल बाईस पत्र कालपीवाल्याचें सवा महिन्याचें पत्र आलें. गोहजवाल्याचें ठाणें ग्वालेरीस येऊन बसलें असें अद्याप नाहीं. परंतु करारमदार जाहला आहे ग्वालेरीच्या व गोहजेच्या दरम्यान कोण नदी आहे, तेथें इंग्रजाची छावणी होणार ह्मणून साहुकारी वर्तमान आहे. ग्वालेरीच्या व नरवरीच्या दरम्यान मातबर नद्या आहेत. जागा अडचणीची आहे. तेथें इंग्रज छावणी करणार ह्मणूनही बोलवा आहे. ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति."

लेखांक ५४. ता० ७ जुलई इ. स. १७८१.

श्रीगजानन. भि० आषाढ व॥ २ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १४ रजबपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं सरकारचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस डाकेबरोबर इकडूनच गेलीं होतीं. त्यांचीं उत्तरें पाटीलबावांचीं डाकेबरोबर काल येथें आलीं. तें राजश्री नारो शिवदेव व बाबुरावजींनीं डाकेबरोबर आपल्याकडेस पाठविलीं आहेत. नवीन वर्तमानः-श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून राजश्री व्यंकटरमणशास्त्री निरोप घेऊन येथें आपल्या घरास आले. छ ६ मिनहूस येथें दाखल जाले. तेच दिवशीं आधीं बाईची भेट घेऊन मग आपल्या वाड्यांत गेले. नित्य पुराणसमयीं बाईच्या दर्शनास जात असतात. त्यांचे मुखेंच परस्परें वर्तमान ऐकिल्यांत आलें जे, राजश्री गणेशपंत बेहेरे यांच्या विद्यमानें पुण्याकडील जाबसाल दादासाहेबांकडेस लागले आहेत; परंतु दादासाहेबांची मर्जी नाखूष आहे

सबब कीं, पेशजीं बोलण्याचालण्याचे करारमदार अमलांत कांहींच आले नाहींत. यास्तव हेंही बोलणें तद्वतच. या अर्थी इंग्रजांसीं जाबसाल लागले आहेत. गुदस्तां इंग्रज कोंकणपट्टींतून बोरघाटावर आले. ते समयीं दादासाहेब अगर अमृतराव कोणीही स्वारीस समागमें नवते. यास्तव इंग्रजांनींही जितकी साधणूक जाली तितकी करून माघारा गेले. सांप्रत बादबरसातचे मोहिमेस दादासाहेबांस स्वारीस घेऊन चलावें या अर्थी इंग्रजांचें बोलणें दादासाहेबांशीं लागलें आहे. दादासाहेबांचें मानस कीं, पुरतेपणें पुण्याकडील जाबसाल खचित जाल्यास इंग्रेजांचा पक्ष सोडावा सबब की, साष्टी वसईसारखीं स्थळें मातबर कशा श्रमें करून साधलीं, तें स्थळें सहजांत इंग्रजांनीं घेतलीं. पुन्हां तें स्थळें हस्तगत होणें कठीण. असेंच देशांतही इंग्रजांचा प्रवेश जाला तर पुढें कोणासही ठिकाण राहणार नाहीं. सर्वांचे दुर्निमित्य आपल्याकडे. यास्तव इंग्रेजांशीं पक्केपणें बोलत नाहींत. इंग्रजांचा प्रकार ह्मटलें तर विलायतेत पातशाहाचा खमीर पक्केपणें आहे कीं, दादासाहेबांस अभिमानपुरस्कर राज्यावर नेऊन बसवावें, आणि यांत आपलाही मतलब करावा, कोणता? येवढी स्वारी करणे. तेव्हा पैका मुबलक खर्च होईल. त्याऐवजी मातबर किल्लेजात व आपल्यास अनुकूल तो मुलूख तोडून घ्यावा. पैसा वसूल होय तोंवर मुलूख व किल्लेजात खचित आपल्याकडे स्थळ कायम करावीं. मग त्यांजजवळून निघणें कठीणच असे. इंग्रज याप्रमाणें आपला मतलब योजून आहेत. इतकेंही अर्थ दादासाहेब समजून त्यांचे मसलतीस नाखुष आहेत. पुढील मसलतीचे अर्थी इंग्रजाची सरजामी प्रस्तुत शिप्री कोल्हारसावर चवदा पलटणे सरंजामसुद्धां जमलीं आहेत. कालपी प्रांतीही कंपू आला आहे ह्मणतात. परतु कांहीं पलटणे आलीं आहेत. वगैरे जागां जागा सरंजाम होत आहेत. दादासाहेबांनीं अहिल्याबाईचें वर्तमान ऐकिलें कीं, तुकोजीबावांनी व नारो गणेश यांनी तिकडे श्रीमंताची कृपा संपादून बाईचा उपमर्द करावा, बाईने एकीकडे बसून तुकोजीबावांनीं नारो गणेश या उभयतांनींच दौलत करावी. असें ऐकून फार श्रमी जाले. बोलले जे, अहिल्याबाई ह्मातारी, केलेली मनुष्य. तिजला एकीकडे बसवून उभयतांनीं दौलतीचा बंदोबस्त करणें अगर एखादी मातबर मसलतीस तह देणें इतका ऐवज उभयतांचा नाहीं. ऐकिणार काय समजून ऐकितात हे न कळे. कालमाहात्म्य प्रस्तुत असेंच आहे असें ह्मणाले. पुण्याकडील व आपली कांहींएक घरसमजूत पडावी. यास मध्यस्थ विश्वासूक व मातबर दुतर्फा दबवून सांगे असा दरम्यान असल्याशिवाय ताळा पडणार नाहीं, असें तेथील बोलणें. याप्रमाणें दो चौ जागां ऐकिले तें वर्तमान सेवेसी लिहिलें असे. सत्य मिथ्या देव जाणे. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ५५. ता० ७ जुलई इ. स. १७८१.
श्रीगजानन. मि० आषाढ व॥ २ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १४ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर सेवेसी पाठविलीं आहेत. प्रस्तुतचें वर्तमान अहल्याबाईनीं राजश्री पाटीलबावांकडे पत्रें पाठविलीं आहेत, त्यांचीं उत्तरें अद्याप आलीं नाहींत. तें आलीयावर काय निश्चय ठरेल तो पाहावा. पाटीलबावा बुढापाहाडानजीक छावणी इंग्रजांच्या तोंडावर करणार. दुसरे वर्तमान ऐकिलें कीं, पाटीलबावांचे दिवाण राघो मल्हार व आबा चिटणीस या उभयतांजवळ फौज ठेवून, छावणीस येऊन पाटीलबावा उज्जनीस येणार ह्मणून वदंतेचें वर्तमान आहे. वेदमूर्ति राजश्री व्यंकटरमणशास्त्री श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून येथें आले. ते सांगत होते जे, श्रीमंतांकडून सूत्र राजश्री गणेशपंत बेहेरे यांजकडेस लागलें आहे. राजश्री बाजीपंतआणाही ते प्रांतीं आले आहेत. त्यांजकडेही जाबसाल लागला आहे. ह्मणून बाजारी वर्तमानही असेंच आहे. हिंदुस्थानाकडील वर्तमान तर दिल्लीपलीकडे शीख तीस चाळीस हजार आले आहेत. दिल्लीवाल्याशीं व शिखाशीं हर्षामर्ष लागला आहे. असें वर्तमान आहे. वरकड बाईकडील जाबसाली वर्तमान वरचेवर राजश्री बाबुराव वैद्य सेवेसी लिहीतच आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ५६. ता. ९ जुलई इ. स. १७८१.
श्रीगजानन. मि० आषाढ व॥ ४ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १६ रजबपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींचे कृपाअवलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनतीपत्रीं लिहून डाकेबरोबर व काशीदजोडीबरोबर पत्रें देऊन छ १४ मिनहूस रवाना केलीं आहेत. प्रस्तुतचें वृत्त पेशजीं मातुश्री अहिल्याबाईविसीं निक्षून दो मजकुराविसीं पत्रें आलीं. त्याजवरून राजश्री बाबुरावजी व राजश्री नारो शिवदेव हे उभयतांनीं बाईशीं सरकारपत्रान्वयें भवति न भवति केली. तेव्हां सिद्धांत ठरला जे, या कामांत पूर्वीपासून राजश्री पाटीलबावा आहेत, त्यांस हें सविस्तर लिहून पाठवावें ते जसा निश्चय करून पाठवितील त्याअन्वयें तुह्मांशीं बोलूं. असें बाईनीं या उभयतांसीं उत्तर करून पत्रें पाटीलबावांकडेस बाईनी पाठविलीं. त्यावर या मजकुरा-

विषयींच सरकारचीं पत्रें पाटीलबावांसही आलीं. तेंही पत्रें उभयतांनीं बावांकडेस पाठविलीं. त्यास, सरकारच्या पत्रांचीं उत्तरें पाटीलबावांनीं पाठविलीं. ते छ १३ मिनहूस येथें आलीं. ते दुसरे दिवशीं डाकेबरोबर स्वामींकडे रवाना केलीं. त्याच अन्वयें बाईसही पाटीलबावांचीं पत्रें आज प्रातःकाळीं आलीं. बाईनीं वाचून पाहून दो प्रहरांनंतर उभयतांस दरबारास बोलाविलें. बाई व माधवराव गंगाधर व गोविंद रघुनाथ गानू हे उभयतां ऐसे पांच जण बसून एकांत प्रहर सव्वाप्रहर जाला. त्यांतील मजकूर जाल्याअन्वयें उभय सेवेसी लिहितील. त्याजवरून ध्यानास येईल. ऐकिल्यांत आलें आहे जे, बाईनीं पूर्ववत्प्रमाणें दौलतीचा धनीपणा करितात तसा करावा. सरकारचाकरी राजश्री तुकोजीबावांनीं करावी. याप्रमाणें ऐकिलें तें सेवेसी श्रुत होय. पाटीलबावांकडील वर्तमानः—इंग्रजाभंवताले फौज सुद्धां आहेत. राजेरजवाडे कुमकीस आले होते, ते पाटीलबुवांचा निरोप घेऊन आपलाले स्थळास गेले. इंग्रेजांकडेस गोहजवाला राणा तीन हजार फौज व तीन पलटणें जंगी सरंजामानशीं येऊन सामील जाला. त्याच्या मुलखांतून रस्त इग्रजांकडे येत होती, त्याची बातमी ठेऊन पाटीलबावांनीं फौज रवाना केली. इंग्रजांशीं व या फौजेशीं गांठ पडून लढाई बरीच जाली. पाटीलबावांकडील दाहा पांच खाशे पडले व गोसावी यांचा महंत लढाईत कामास आला. त्यास खेतांतून काहाडतां दाहा वीस माणसें जखमी ठार जालीं. याशिवाय फौजेंतील शेंदीडशें माणूस जखमी ठार जालीं. इंग्रेजांकडीलही गोरे तुरकस्वार दाहा पांच पडले. शें दीडशें माणूस त्यांचेंही जखमी ठार जालें. लढाई बरीच जाली. चाळीस पन्नास बैल रस्तेचे यांनीं पाडाव करून आणिले. पाटीलबावांजवळ देशचीच बारा पंधरा हजार फौज कुल जमाव इतका आहे. त्रिंबकजी इंगळे, होळकरांचें पथक पाटीलबावांजवळ आहे. बाईनीं तिकडे पाठविले आहेत. सबब, देशीं इंगळेमजकुराचा गांव माहाळुंगें आहे, तें तुकोजीबावांनीं खराब केलें. तोफखाना वगैरे कारखाने तेथें छावणीस ठेविला आहे. तेथील खराबी फार केली. पुढें जप्त करणार. हा बोभाट त्रिंबकजी इंगळे यांनीं बाईस लिहिला. त्याजवरून बाई रावजींसीं बोलत होती जे, सरकारचाकरीवर माणसें असतां, त्यांजवर अशी आदावत चालवावी आणि धन्यांनीं कांहींच ध्यानांत न आणावें हें अपूर्व आहे. या अर्थी बाईनीं व रावजींनीं सेवेसी पत्रें लिहिलीं आहेत. राजश्री बाजीपंत आणा फौजसुद्धां पुण्यास गेले व गणेशपंत बेहेरे बहाळ भडगांवाकडे छावणीस आले म्हणून बाई बोलत होती. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.''

लेखांक ५७. ता० ११ जुलई इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि० आषाढ व॥ ६ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १८ रजबपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें सेवेसी रवाना केलीं आहेत. प्रस्तुतचें वर्तमान राजश्री पाटीलबावांकडून काल प्रातःकाळीं पत्रें आलीं. त्यांचें बोलणें बाईशीं कालच तृतीय प्रहरीं राजश्री बाबुरावजी व नारो शिवदेव यांसीं जालें. त्यावर आज छ १७ रोजीं बाईनीं गोविंद रघुनाथ या उभयतांकडे संध्याकाळीं पाठविले. माधवरायाकडील बाजी विठ्ठलही होते. चार पांच घटका एकांत होऊन ठरलें जे, जालें वर्तमान श्रीमंतांस लिहून पाठऊन उत्तरें आणवावीं. तेथील काय मर्जी, कशीं उत्तरें येतात, त्यासारखी पुढें मसलत. या अर्थी जालें बोलणें तें उभयतांनीं सेवेसी लिहिलें आहे. श्रवण होय हे विज्ञप्ति."

लेखांक ५८. ता० १५ जुलई इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि. आषाढ व॥ ९ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २२ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें सेवेसी पाठविलीं आहेत. प्रस्तुत पाटीलबावांकडील वर्तमान, बुढापाहाडानजीक छावणीचा डौल केला आहे. बाईकडील वर्तमान तर, राजश्री बाबुराव विश्वनाथ व नारो शिवदेव यांनीं लिहिलें आहे, त्यावरून श्रवण होईल. सेवकास येथें येऊन अडीच वर्षें जालीं. धन्यांच्या पायाचाही वियोग, व मुलामनुष्यांचेंही वर्तमान फार दिवस कळलें नाहीं. जशी आज्ञा येईल तसी वर्तणूक करीन. खर्चाचीही तारांबळ फार आहे. स्वामी कृपाळू, सर्वज्ञाण आहेत. प्रस्तुत पाटीलबावांकडील वर्तमान पंचावलीवर हे आहेत व इंग्रज शेषईवर आहेत. गोहजबाल्यासुद्धां बारा तेरा पलटणें आहेत. पाटीलबावांची छावणी रणोदावर होणार. मध्यें कालीसिंद महानदी थोर आहे. रणोदावर छावणी जाल्यास इंग्रजांस व यांस बारा कोसांचा तफावत पडतो. पलीकडे गोहजवाल्याच्या मुलखांत धामधूम करायास पांच सहा हजार फौज सडी पाटीलबावांनीं पाठविली आहे. राणा इंग्रजांस सामील

जाला आहे. व नरवरवाल्यांचेंही सूत्र इंग्रजांकडेस आहे. अद्याप सामील जाला नाहीं. पाटीलबावांजवळ दक्षणी फौजेचा भरणा दहा हजार आहे, व राजेरजवाडे कुमकेस आले आहेत, त्यांची फौज दहाबारा हजार आहे. गोसावी बैरागी मिळून सात आठ हजार आहेत. हेही आपले ठायीं मजबुतीनें आहेत. इंग्रजही मजबुतीनें आहेत. नारो शिवदेवही बाईचा निरोप घेऊन उज्जनीस जाणार. बाई ह्मणतात जे, श्रीमंतांकडे पत्रें गेलीं आहेत, त्यांजकडील जाबसाल काय येतो तो पाहून मग तुह्मांस निरोप देऊं. सरकारचीं यांच्या पत्राचीं उत्तरें आलियावर कोणते एके गोष्टीचा ठराव जाला ह्मणजे बाबुरावजी लक्ष्मणपंतास आपणाकडेस येथून पाठविणार. इंग्रजांची व पाटीलबावांची लढाई छ ८ मिनहूस जाली. तें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलेंच आहे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति."

पैा चंद्र ११ सावान **लेखांक ५९.** ता. २७ जुलई इ. स. १७८१.
इसन्ने समानीन. हस्तें डांक. **श्रीगजानन.** मि. श्रावण शु॥ ७ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज साष्टांग नमस्कार तागाईत चंद्र ५ सावान विज्ञापना. हिंदुस्थानाकडील वर्तमान कोणी गृहस्थांनीं लिहिलें होतें, तें राजकीय मजकूर कीं, नजबखान पादशाही फौज घेऊन जयनगर प्रांतीं गुदस्तां आले होते. ते वेळेस जयनगरचा मुलूख तमाम जप्त करून राजास हस्तगत करावें आणि राज्याचा बंदोबस्त करावा अशी मसलत नजबखानानें केली. ती पाहून जयनगरवाल्यांनीं नजबखानाशीं जाबसाल लाविला की, हें राज्य बहुत दिवसांचें, हें राखावें. तेव्हां प्रतिवर्षी सात लक्ष रुपये पातशाहास देत जावें असा करार ठरावून, त्या रुपयांचे वसुलास नजबखानांनीं अनुपगीर गोसावी–त्यांस किताब राजे हिंमतबहादर–त्या गोसाव्याबरोबर पांच हजार फौज ठेवून सात लक्षांचे वसुलास जयनगरीं ठेवून नजबखान दिल्लीस गेले. त्यास, राजश्री पाटीलबावांनीं इंग्रजांचें पारिपत्य पातशाही फौज सामील करून करावें, या अर्थी राजश्री राजाराम रणसोड होळकराकडील येथून बाईनीं फौज देऊन पाटीलबावांबरोबर पाठविले होते. ते त्यांचा व नजबखानाचा दंडक बराच, यास्तव त्याजबरोबर पांचशें फौज देऊन नजबखानास कुमकेस फौजसुद्धां घेऊन यावें ह्मणून पाठविलें. ते जयनगरास गेले. तेथें हिंमतबहादर गोसावी नजबखानाकडील खंडणीच्या वसुलास आहेत. त्यांचा व पाटीलबावांचा स्नेह व मशारनिल्हेचाही दंडक फार. यास्तव त्यांची भेट घेऊन दिल्लीकडे जावें, या अर्थी त्यांची भेट घेतली. तेथें गोसावीबावा बोलले जे,

तुह्मी ज्या कार्यास दिल्लीस जातां, तें कार्य येथूनच करूं. ह्मणून ठेवून घेतलें. तदोत्तर हिंमतबहादर गोसावी यांनीं व राजाराम रणसोड यांनीं नबाब नजबखानास पत्रें लिहिलीं, व पाटीलबावांच्या थैल्या होत्या त्याही नवाबाकडेस पाठविल्या. नवाबास उभयतांनीं पत्रें लिहिलीं जें, दक्षिणीयांचा व तुमचा स्नेह आहे. त्यास जळचरांनीं पाटीलबावांशीं फार आगळीक केली आहे. पाटीलबावा शहास गुंतले आहेत. यास्तव पाटीलबावांनीं अमके मातबर माणूस तुह्मांस पाचारूं पाठविले आहेत. त्यास, स्नेहाचें सार्थक हेंच कीं, या वेळेस फौजसुद्धां तुह्मीं पाटीलबावांशीं मिळून इंग्रजांचें पारिपत्य करावें, हें अतिउत्तम आहे. अशीं पत्रें पाठविलीं. नवाबांनीं पत्राचीं उत्तरें पाठविलीं जें, आह्मी या कार्यास आधीं सामील होऊं. परंतु आमचे चार मुद्दे पाटीलबावांनीं कबूल करावे. तपशीलः–मुख्य जठवाडा आह्मीं दरोबस्त घेतला आहे, यांत वांटा त्यांनीं न मागावा. व जयनगरची खंडणी सात लक्ष रुपये आह्मीं जोर पोंहचावून सालाबाद ठरावली आहे, ती आमची आह्मीं घेत जावी. तिसरें, आजपासून नवा मुलूख सुटेल तो निमेनिम आह्मीं व त्यांनीं वांटून घेत जावा. चवथें, फौज त्यांची मातबर इकडे आल्यास आह्मांस उपद्रव न द्यावा. अगर आमची फौज फार, त्यांची थोडी आली तर आह्मीं त्यास उपद्रव न द्यावा. ऐसे मुद्दे नवाबांनीं लिहून पाठविले. या मुद्यांवर सरदारांच्या मोहरा करून पाठवणें, ह्मणजे आह्मी फौजसुद्धां येतों. त्यास हीं पत्रें पाटीलबावांकडेस पाठविलीं. तशांत पुण्याकडे श्रीमंतांनीं इंग्रजांचें पारिपत्य करून फत्ते जालीयाचें वर्तमान इकडे आलें. त्यास नवाबाच्या पत्राचें उत्तर पाटीलबावांनीं लिहिलें जे, फिरंगी आमच्या मुलखांत आले ह्मणून नवाबांनीं हे मुद्दे नवे लिहिले, हें योग्य नाहीं. ज्या वेळेस पाहशाहास प्रयागाहून आणिलें. ते वेळेस सर्व तहरह जाले आहेत. मागाहून दिल्लीचे मुक्कामीं लढाई जाल्यानंतर नवाबास वजीर केलें. ते वेळेस तह ठरवून, आण शपथा होऊन, लिहिलीं पुसलीं, तहनामे जाले आहेत. तें सर्व एकीकडे राहून व्यर्थ जोंडे कीं काय? नवें होणार नाहीं. फिरंग्याचें पारिपत्य श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून आह्मी करीतच आहोंत. नवाबास उत्तम दिसेल तें करावें. आह्मीं व होळकर व विसाजी कृष्ण मिळून जो तह पूर्वी केला आहे, त्याशिवाय एक बिघा जमीन अगर एक पैसा नवाब मागतील तर मिळणार नाहीं. आणि फिरंगी जबरदस्त पडल्यास नवाबास जागा राहील कीं काय, हें पुरतेपणीं विचार करणें तें करावें. आणिकही कित्येक मजकूर लिहिले. त्याजवरून फिरून नवाबासही हिंमतबाहादर यांनीं पत्रें लिहिलीं कीं, दक्षिण्यांशीं आपला स्नेह

व त्यांचा कृतोपकार आपल्यावर किती आहे हें आपण जाणत असतां, त्यास नवे मुद्दे लिहावे हें उचित कीं काय? फिरंगी दक्षिण्यांनींच जेर केले आहेत. हैदर नाईकांशीं व दक्षिण्यांशीं हमेश बिघाडा होता; परंतु या प्रसंगीं हैदर नाईकाशीं त्यांनीं स्नेह करून, त्याजकडून इंग्रजांचें पारिपत्य करविलें. आणि तुमचा त्यांचा पूर्वस्नेह असतां नवें वैर करावें, हें कामाचें नाहीं. पूर्वी जो तह ठरवला आहे तोच कायम ठेवावा आणि आपण फौजसुद्धां सामील व्हावें, यांत उत्तम आहे. अशीं नवाबास पत्रें लिहिलीं व त्यांचे दिवाण शिवरामपंत काश्मिरी त्यानेंही बहुत प्रकारें लिहिलें. त्यावरून नवाबांचीं पत्रें हिंमतबहादर गोसांवी यांस आलीं कीं, तुह्मीं लिहिलें हें आह्मांस कबूल आहे. दक्षिण्यांशीं आह्मांशीं बिघाड करणें सर्वथैव नाहीं. प्रस्तुत बरसातीचे दिवस आहेत. बादबरसाद आह्मी पादशाहास घेऊन आगऱ्यास येतों. दहा हजार फौज दक्षिण्यांची आगऱ्यास पाठवून द्यावी. अंतरवेदचा बंदोबस्त करून पटण्यापावेतों इंग्रजांचा मुलूख सोडवून घेऊं. इंग्रज सहजच शिकस्त खातील. याप्रमाणें गोसावी यास नवाबांचीं पत्रें आलीं. त्यांनीं राजाराम रणसोड यांस दाखवून त्यांनींही पत्रें लिहून, तें व तीं पत्रें पाटीलबावांकडेस पाठविलीं. याप्रमाणें कोणीं गृहस्थानें हें वर्तमान आषाढ शुद्ध त्रयोदशीचीं पत्रें लिहून इकडे पाठविलीं. होळकराकडीलच गृहस्थ आहे. आपलाही स्नेही ह्मणून पत्र लिहिलें. त्यांतच वर्तमान कीं, राजाराम रणसोड जयनगरींच हिंमतबहादर गोसाव्याजवळ आहेत. जयनगर प्रांतीं होळकरांचीं ठाणीं होतीं, तीं गुदस्तां राजांनीं उठविलीं होतीं. ती प्रस्तुत ठाणीं कायम करवितात. टोंकेत ठाणें यांचें बसलें. रामपुऱ्यांतही ठाणें बसणार. प्रस्तुत जयनगरांत मोठी लढाई होणार आहे. सबब, किलंगधीर, वगैरे रजपूत मातबर सरदार दहा बारा असाम्या राजांनीं धरून कैद केल्या आहेत. खुशालीराम बेहरा दिवाण तोही फितुरांत होता. पळून जात होता. तोही धरून कैद केला आहे. दहा वीस लक्ष रुपये त्या दिवाणाजवळून घेणार. जयनगरचें राज्य तूर्त बहुनायकी फार जाहली आहे. सरकारच्या फौजा हिंदुस्थानप्रांतीं असत्या तर कित्येक कामकाजें बनून येतीं. याप्रमाणें पत्रीं वर्तमान लिहिलें होतें. अलीकडे सागर वगैरे ते प्रातीं दक्षणी ब्राह्मणांचें कविले आहेत, ते तमाम उज्जनीस येतात. इंग्रजांचे भयास्तव प्रांत तो चलबिचल जाला आहे ह्मणून ऐकिलें. उज्जनीवालेही कित्येक महेश्वरास येणार असें बोलतात. बाजारी वर्तमान हें होय. येथील वर्तमान तर अहल्याबाई राजश्री बाबुरावजींस ह्मणतात जे, 'तुह्मांस पुण्यास श्रीमंतापावतर जावें लागेल.

तुह्मीं गेल्याशिवाय आमचा बंदोबस्त यथास्थित होणार नाहीं.' त्यास रावजींनींही पेशजीं सरकारांत पत्रें लिहिलीं आहेत. तेथून आज्ञा आली ह्मणजे येथें राजश्री लक्ष्मणपंतास ठेवून रामजी हुजूर येणार. मीही पेशजीं विनंतिपत्र सेवेसी लिहिलें आहे. जशी आज्ञा येइल तशी वर्तणूक करीन. कांहीं काम बसतां येथें काय ह्मणून असावें? स्वामींचे आज्ञेप्रमाणें इकडील सविस्तर रावजींनीं व राजश्री नारो शिवदेव यांनीं विनंतिपत्रें लिहिलीं आहेत. राजश्री पाटीलबावांकडील बातमीपत्रें डाकेबरोबर आलीं आहेत. तीं बजिन्नस सेवेसी रवाना केलीं आहेत. येथें बाईचे श्रावणमासचा उत्साह होत आहे. तीन चार हजार ब्राह्मण मिळाले आहेत. नित्य संतर्पण होत आहे. श्रावण एक मासपर्यंत [उत्साह] होईल. तदोत्तर ब्राह्मणांच्या संभावना करून बिदा करितील. याप्रमाणें येथील वर्तमान. तिकडे इंग्रजांस गोहजवाला मिळून इंग्रजांजवळ भरणा भारी जाला आहे. ह्मणून वदंता आहे. डाकेच्या पत्रीं काय वर्तमान असेल तें सेवेसी विदित होईल. देखलें ऐकलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. खर्चाची फार विपत्य आहे. हे विज्ञप्ति."

लेखांक ६०. ता. २ आगस्ट इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि० श्रावण शु॥ १३ शके १७०३.

"श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचे सेवेसीः—

आज्ञांकित सेवक विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ साबानपर्यंत स्वामींचे कृपावलोकनें करून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असो विशेषः—इकडील वर्तमान कळल्याप्रमाणें श्रीमंतांस विनंतिपत्रीं लिहिलें आहे; त्यावरून सविस्तर विदित होईल. राजश्री बाबुराव वैद्य सरकारआज्ञेप्रमाणें येथें बाईशीं बोलून निरोप घेऊन हुजूर येतात. छ ११ मिनहूस बाईचा निरोप घेऊन, बारावे रोजीं रेवापार होऊन, पार मुकाम करतील. दुसरे दिवशीं श्रावणी करून, भोजनोत्तर स्वार होऊन दरमजल पुण्यास येणार. मीही यांजबरोबरच येणार होतों; परंतु सरकारची आज्ञा आली नाहीं. यास्तव राहिलों अडीच वर्षे येथें येऊन जालीं. धन्याचे चरण पहावें, घरीं मातुश्रीचें वार्धिक्य त्यांचेंही दर्शन घ्यावें, असें मानस आहे. इतक्यावर श्रीमंतांची आज्ञा जसी येईल तसी वर्तणूक करीन. खर्चावांचून फार श्रम आहेत. येथें चारशें रुपये लोकांचें देणें. तात्या, घरीं मुलें मनुष्यें फार श्रमांत आहेत. चीरंजीव दोन वर्षें पायाजवळ आहे. उदंडांस अन्नास लावितां, परंतु मुलाची सोय अद्याप कोठें न केली! आमचें दैव!! आपण काय करतील? तात्या, इतके दिवस

चाकरी करून एक मुलास आसामी कोठें द्यानांत ! आह्मां गरिबाक्सीं वारंवार विनंति करणार कोण ? स्वामीच श्रीमंतांस विनंति करतील तर कोठें याचना करतील ? वतनाचें देणें व संसाराचें कर्ज देणें यानें फार श्रमांत आहे. काय उपाय करूं ? इकडे कान्हापूर परगणा लहान आहे, तेथें मजमूची आसामी खालीं आहे. श्रीमंतांस विनंति करून तेवढी आसामी चिरंजिवास करून दिली, तर बरें आहे. श्रीमंतांची मर्जी पाहून एकदां विनंति करून पाहावें. राजश्री बाबुरावजींसही विनंति करावयास मीं सांगितली आहे. तीस बत्तीस वर्षें जालीं. सेवा करीत आहें. परंतु मुलास कोठें आसामी एक द्यानांत ! आह्मांविषयीं कोण विनंति करील ? आपणास ईश्वर श्रीगणपति स्मरणदेता आहे. तात्या, कर्जाच्या व गृहकृत्याच्या पेचांत फार आहे. आतां उत्तर वयांत आपण उपेक्षा केली, तर कोण आमचें आहे ? इतका विस्तार लिहिला ह्मणून रागास न यावें. कृपा करून येवढी कान्हापुरची मजमूची आसामी विनंति करून, करून द्यावी. देविणार स्वामी समर्थ. हे विज्ञप्ति. स्वामी ह्मणतील कीं, तुह्मी कामावर आहां; सरकारची आज्ञा नसतां येण्याची तांतड कां करितां ? त्यास, रावजी येथें आलीयावर महिना दीड महिन्यांनीं बाईनीं मुकुंदराव दिवाण यांजकडून मजला सांगितलें जे, 'येथें बाबुराव आहेतच. तुह्मांस बहुत दिक्स जाले. दोघांचें येथें असें काय काम आहे ? तुह्मीं आपल्या धन्यास लिहून पाठवून तुह्मीं जाणें.' याप्रमाणें त्यांनीं सांगितलें. आणखीही एकदोघांजवळ सांगितलें. बोलली जे, यांणीं आपल्या धन्याकडेस जावें. येथें काय कारण आहे ? असेंही बोलली. असें यांणीं बोलली असतां येथें कशास राहावें ? धनी विश्वकुटुंबी आहेत. हा वेळपर्यंत ज्यांनीं प्रतिपाल केला आहे, ते आतांही उपेक्षा करणार नाहींत. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ६१. ता० २ आगस्ट इ. स.१७८१.
श्रीगजानन. मि. श्रावण शु॥ १३ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष इकडील पेशजी विनंतिपत्रें लिहून सेवेसी पाठविलीं आहेत. येथील वर्तमान तर राजश्री बाबुराव वैद्य यांस सरकारचीं आज्ञापत्रें व बाईसही सरकारचें पत्र होतें. तें पत्र बाईस प्रविष्ट करून, यांस पत्र होतें त्याअन्वयें बाबुरावजी व राजश्री नारो शिवदेव उभयतां बाईशीं बोलून, बाबुरावजी बाईचा निरोप घेऊन दरमजल पुण्यास येतात. छ ११ रोजीं निरोप घेऊन, छ १२ रोजीं रेवापार मुक्काम होईल.

तेरावे रोजीं श्रावणी करून स्वार होणार. सेवेसी येऊन सविस्तर विदित करतील. येथें लक्ष्मणपंत रावजींनीं ठेवले आहेत. मीही रावजीबरोबर येत होतों, परंतु पेशजीं विनंति मीं लिहिली आहे. आज्ञापत्र आद्याप आलें नाहीं. सरकारची आज्ञा आली नसतां यावें, तर स्वामी रागें भरतील. या भयास्तव राहिलों. रावजीही ह्मणाले जे, आज्ञेवांचून येऊं नका. ह्मणून राहिलों. अडीच वर्षें येथें जालीं. धन्याचें चरणदर्शन व्हावें व घरीं मातुश्रीचें वार्धक्य, त्यांचेंही दर्शन व्हावें या अर्थीं विनंति. धन्याची मर्जी. जसी आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक करीन. खर्चाचेही श्रम फार आहेत. स्वामी कृपाळू समर्थ. सुरतेकडील वर्तमानः—गाडर इंग्रज सुरतेस आला. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस ह्मणतो कीं, तुह्मी स्वारीस निघा. दादासाहेब ह्मणतात जे, 'तुह्मांबरोबर सारें पायदळ. फौजेशिवाय आह्मी बाहेर निघणार नाहीं. फौजेची तरतूद करा. आह्मी स्वारीस निघतों.' त्यावरून राजश्री फत्तेसिंग गाईकवाडास दादासाहेबांनीं व इंग्रजांनीं बोलावूं पाठविलें आहे, व दाहा बारा हजार फौज तुह्मी ठेवा, पैका देतों, ह्मणून इंग्रज दादासाहेबांस ह्मणतात. यांणींही कबूल केलें. पैका द्या, आह्मी फौज ठेवितों. इंग्रज ऐवजाची तरतूद करितात. फत्तेसिंग गाईकवाडास दाहा लक्ष रुपये इंग्रज मागतात. दादासाहेबांनीं मना केलें जे, फौज ठेवायास त्यास सांगतां, तेव्हां पैका मागूं नये. मना केलें. इंग्रज पांच हजार तुरक स्वार जमा करणार. असी तरतूद फौजेची करितात. इतकी वीस पंचवीस हजार फौज व पंधरा पलटणें इतक्या सरंजामानसीं दादासाहेबांस स्वारीस काढावें असी मसलत करितात. ह्मणून साहुकारांत हें वर्तमान ऐकिलें. सत्य मिथ्या देव जाणे. आणीक कोठें कागदींपत्रीं हें वर्तमान नाहीं. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान तर, बुढा-पाहाडनजीक शाहाबागावर छावणी पाटीलबावांची जाली. इंग्रजही सिप्री कुलारस वगैरे जागांजागां गढी किल्ल्यांचे आश्रयांनीं छावणी करून आहेत. गोहजवाला राणा इंग्रजांसी मिळाला आहे. वरचेवर डाकेबरोबर तिकडील पत्रेंही येतात. तीं नारो-पंतनाना सरकारांत रवाना करीतच आहेत. बाबुराव येथून गेलियावर एका दो दिवसां नारोपंतनाना उज्जनीस जाणार. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ६२. ता. ६ आगष्ट इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि० श्रावण व॥ २ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें

वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें तर, राजश्री बाबुराव वैद्य येथून बाईचा निरोप घेऊन रेवेपार दोन मुक्काम जाले. बाईकडून कोणी गृहस्थ बोलायास गेले होते. त्यामुळें दोन मुकाम जाले. छ १४ रोजीं रेवापासून कूच करून गेले. दरमजल पुण्यास येतील. राजश्री पाटीलबावांची छावणी बुढापाहाडाआसपास जाली. होणार. सुरतेकडील वर्तमानः–इंग्रजांनीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांस उत्तेजन देऊन फौज ठेवावयाचा उपक्रम करितात. राजश्री फत्तेसिंग गायकवाडासही बोलावूं गेलें आहे ह्मणून साहुकाऱ्यांत बोलतात. येथें बाई विचारीत होती जे, बाजारी बोलवा आहे की, फिरून इंग्रेजांनीं कोंकणांत गडबड केली आहे, हें खरें कीं काय? मीं उत्तर केलें जे, हें मिथ्या वर्तमान. आह्मांकडे कांहीं बातमी आली नाहीं. राजश्री नागो शिवदेवही उदईक छ १५ रोजीं निरोप घेऊन उज्जनीकडे जाणार असें बोलतात. हरकुबाईकडील गांव आपण कृपा करून सोडलें ह्मणून येथें वर्तमान आलें होतें. परंतु यांजकडे कांहीं सनदापत्रा आल्या नाहींत. येविषयीं मावशीबाई पुसत होती कीं, गांव सोडून श्रीमंतांनीं कोणाच्या हवाला केले? या बाईचें बोलणें आहे कीं कृपा करून गांव सोडले तर आह्मांकडे सनदा पाठवाव्या. नाहींतर सरकारांतच असावें. ज्यांचे त्यांनीं फिरून घेतल्याम आमचा उपाय काय? दुसरें, हरकुबाईच्या बहिणीस फार बरें वाटत नाहीं. तिजला भेटायास जाणें फार जरूर आहे, व कनाशीस मानभावांचा देव आहे, त्याच्या दर्शनासही जायाचें आहे. सरकारची आज्ञा आली ह्मणजे जातील. येविषयीं आज्ञापत्राची अपेक्षा फार आहे. मर्जी असली तर, आज्ञापत्र जसें येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं, असें बोलली. सेवेसी श्रुत होय. मीं पेशजीं विनंतिपत्रीं विनंति लिहिली होती. इकडे बहुत दिवस जाले, आज्ञा आली तर चरणदर्शनास येईन. धन्याची मर्जी. जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन. हे विज्ञप्ति."

लेखांक ६३. ता० ८ नोव्हेंबर इ.स. १७८१.

श्रीगजानन. मि० कार्तिक व॥ ७ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंति तागाईत छ २१ जिल्कादपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुकाम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबराबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमानः—राजश्री केसो भिकाजी यांचें व बाईचें भाषण होऊन, सरकारच्या पत्रांचीं उत्तरें व हिशेबाच्या यादी महालांसंबंधीं

त्यांनीं दिल्या आहेत. ते व मशारनिल्हेनीं पत्र लिहिलें आहे तें, सेवेसीं जासूद-जोडीबराबर पाठविलीं आहेत. अवलोकनीं अवगत होईल. राजश्री पाटीलबावांच्या लष्करांतून साहुकारी वर्तमान आलें जे, दिल्लींत कोणी मीर आबसी ह्मणून मातबर माणूस दहा पांच हजार फौजेचा सरदार होता. नजीबखानाचे चेले आपसांत भांडूं लागले, यास्तव मीर आबस यानें त्यांचे लोकांत फोडफाड करून, हजार फौज जमा करून, दिल्लींतच मातबर लढाई केली. तें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. प्रस्तुत सावकारी वर्तमान ऐकिलें जे, मीर आबस यानें चेले दोनचार होते ते, धरून कैद केले. वीस पंचवीस हजार फौज जमावून पातशाहास कांहीं खजिना मागू लागला. शाहानें उत्तर केलें जे, आह्मांजवळ खजाना नाहीं. यानें चढाई करून पातशाहाच्या माहालावर आर्क किल्ल्यावर गेला. त्यांनीं दरवाजे मामूर करून तोफा सुरू केल्या दिल्लींत असा गवगवा जाला. पातशाहांनीं पाटीलबावांस पत्रें लिहिलीं. ऐशीं लाख रुपये व आगऱ्याचा किल्ला देऊं केला, नी फार जलद येऊन पोंहचा, ह्मणून दोन चार पत्रे दिल्लीहून आलीं. आगऱ्यास दाखल जाले ह्मणजे किल्ला व वीस लक्ष रुपये द्यावे. बाकी साठ लक्ष दिल्लीस गेल्यावर कांहीं द्यावे. सारा भरणा त्याचें–मीर आबसचें–पारपत्य जाल्यावर द्यावे असा करार. त्यावरून पाटीलबावांनीं जैपूरवाला व जाट वगैरे रजवाडी वीस हजार फौज जमा करून, व नजीबखानाचा चेला आमदानी याजवळ दहा पंधरा हजार फौज होती, तेही सारी मिळून चाळीस हजार फौजेचा जथ करून दरमजल आगऱ्याच्या रोखें चंबल नदीवर गेले. ते मुकामचें साहुकारी वर्तमानः–पाटीलबावांनींही उज्जन वगैरेकडून दहा लक्ष रुपये आणिक आणविले. हुंड्या आगऱ्याच्या करविल्या. याप्रमाणें सावकारी वर्तमान ऐकिलें, तें लिहिले असे. गोहजवाल्याचा मुलूख खराब जाला, व पातशाहांनीं राण्यास लिहिलें जे, ग्वालेरीचा किल्ला पाटीलबावांचे स्वाधीन करणें. आधींही गोहजवाल्याकडे सूत्र होतेंच. त्यावर पातशाही हुकूम जाला. त्यावरून ग्वालेरीवरील जकिरा राणाजी उतरीत आहे ह्मणून हेंही बाजारीच वर्तमान ऐकिलें. दिल्लीस बाईचा वकील आहे. त्याचें पत्र येथें आलें नाहीं. काशीवाले..... वकील पेशजीं पुण्यास आला होता तेथून. .....काशीस गेला होता. इकडूनच गेला.....काशीहून येथें आला. पांच सात रोज येथें होता. .....बाईचा निरोप घेऊन रेवापार दक्षिणतीरास गेला. हुजूर येत आहे. दुसरें वर्तमान सेंदव्यांत संताजी होळकर आहेत. त्यांनीं खरगोणच्या खेड्याकडे कांहीं चोरीचा अपराध ठेवून, चढाई करून, त्यावर दोनहजार पेंढारी व पांचसातशें फौज ऐसे संताजी होळकर व चिमाजी बुळे उभयतां सरंजामानसीं

जाऊन दोन गांव खरगोणचे मारले. तें वर्तमान बाईस कळलें. बाईनीं येथून दोन पागा रामजी आघाड्याची व आणिक एक ऐसे रवाना केले. दोनशें लोक राजश्री कृष्णाजी तानदेव खरगोणीं त्याजवळ आहेत. इकडून दोन पागा दोनशें लोक गेले. खरगोणीं एक जागा होऊन बाहेर निघाले. संताजी होळकर व चिमाजी बुळे हे उभयतां व कृष्णाजीपंत यांसीं त्यांसीं लढाई जाली. पहिले लढाईस कृष्णाजी तानदेवांनीं त्या उभयतांचा व पेंढाऱ्यांचा मोड केला. पांचसात उंट, दहापांच घोडीं घेऊन आले. दुसरे लढाईस त्यांनीं यांचे हत्तीवरील निशाण व दहापांच घोडीं नेलीं. याप्रमाणें दोन लढाया जाल्या. ऐसें वर्तमान ऐकिलें, तें सेवेसीं लिहिलें. पुर्तेपणेंही शोध करून मागाहून लिहीन. राजश्री पाटीलबावांकडे राजश्री माधवराव गंगाधर गेले आहेत. त्या तागाईत आद्याप पत्रें आलीं नाहींत. परंतु अंतस्थ बाईस पत्रें पाटीलबावांचीं येत जात असतात ह्मणून ऐकिलें आहे. तथ्य असें लिहवत नाहीं. परंतु पक्केपणें बाईची खातरजमा पाटीलबावांनीं केली आहे, असेंही ऐकिलें आहे. वर्तमान देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्ति आहे. धनी कृपाळु समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ६४. ता० २९ नोव्हेंबर इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि. मार्गशीर्ष शु॥ १४ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १२ जिल्हेजपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. राजश्री केसो भिकाजी येथें आले. बाईची भेट घेऊन सरकारचीं पत्रें देऊन आज्ञेप्रमाणें बाईस बोलून, उत्तरें घेऊन सेवेसीं पेशजीं पाठविलीं आहेत. तेथून सरकारची आज्ञा जसी येईल, त्याप्रमाणें येथें बाईसीं बोलतील. सांप्रत राजश्री सदाशिवपंत दाजी व रामजी पाटील हे उभयतां छ २८ जिल्कादीं येथें आले. दुसरे दिवशीं बाईची भेट जाली. ते दिवशीं येथें गोवर्धनउत्साह होता. ब्राह्मणसंतर्पण जालें. त्या गडबडीमुळें कांहीं बोलणें जालें नाही. छ १ मिनहून.....रामजी पाटिलांचें व बाईचें आधीं दोन तीन घटका बोलणें जालें. तदोत्तर सदाशिवपंतांस बोलविलें. त्रिवर्गाचें दोन घटका खलबत जालें. अर्धी घटका दिवस राहतां उठलीं. बाईनीं उभयतांस सांगितलें जे, रात्रीं निजावयास या. तदोत्तर तीन घटका रात्रीं बाईची देवपूजा जाली. यावर त्यांणीं यावें, तर फार लांब राहिले होते.

दुसरे दिवशीं भोजनोत्तर उभयतां येऊन, दोन घटका एकांतीं बोलून उभयतांस बाईनीं वस्त्रें देऊन बिदा केलें. दोन प्रहरांनंतर स्वार होऊन गेले. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमानः–कोतवालगढीस लागले होते. ते सर करून, दुसरे कोणी गढी आहे, त्यास मोर्चे लाविले आहेत. दिल्लीकडे जाणार होते, परंतु अद्याप गेले नाहींत. राजश्री माधवराव गंगाधर आश्विन शु॥ ८ मीस लष्करांत पावले. त्यांस पाटीलबावांचीं दिवाणगिरीचीं वस्त्रें होणार ह्मणून घाटत आहे. अद्यापि वस्त्रें जालीं नाहींत ह्मणून ऐकिलें. त्यांजकडीलही पत्रें येथें बाईस आलीं. छ ३ मिनहूस रात्रीं आलीं आहेत ह्मणोन ऐकिलें. तपसील समजल्यांत आला नाहीं. शोध करून मागाहून लिहीन. केसो भिकाजींनींही सेवेसी विनंतिपत्र लिहिलें आहे, त्यावरून विदित होय. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. येथें विकताशिवाय गवताची काडी देखील मिळत नाहीं. कर्ज जालें आहे. पुढें नित्य कृत्य चालायाचे संकट जालें आहे. धनी कृपाळू समर्थ. छ ११ मिनहूस उज्जनीहून येथें पत्र आलें. त्यांत वर्तमान होतें जे, आश्विन वद्य त्रयोदशीस माधवराव गंगाधर यांस पाटीलबावांनीं आपले दिवाणगिरीचीं वस्त्रें दिल्हीं. दुसरें त्या पत्रांतच वर्तमान होतें जे, पायागडीहून वर्तमान आलें जे, कलकत्त्याहून इंग्रजांनीं नवा सुभा मुंबईस पाठविला. त्यानें मुंबईस पहिला सुभा होता त्यास फाशीं देऊन मारला. नव्या सुभ्यानें मुंबई व सुरत वगैरे बंदोबस्त केला; व बडोद्याकडे कांहीं पलटणें पाठविलीं. याप्रमाणें वर्तमान होतें. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाचे खर्चाचें फार विपत्य आहे. कांहीं उपाय नाहीं. धनी कृपा करतील, तर येथील देण्यापासून मुक्तता व पुढें नित्य कृत्य चालेल. नाहीं तर येथें कोणी त्राता नाहीं. धनी सर्वज्ञ समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ६५. ता० २९ नोव्हेंबर इ. स. १७८१.

श्रीगजानन. मि० मार्गशीर्ष शु॥ १४ शके १७०३.

"श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचे सेवेसीः–

सेवक विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १२ जिल्हेजपर्यंत मुकाम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– इकडील वर्तमान श्रीमंतांस पेशजी विनंतिपत्रीं लिहून काशीदजोड्यांबरोबर व डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. त्यांवरून आपल्यासही श्रवण जालेंच असेल. अलीकडे अधिकोत्तर कांहीं नाहीं. येथील अनुसंधान पाटीलबावांच्या पत्रावर आहे.

देखलें ऐकलें वर्तमान सरकारच्या पत्रांवरून विदित होईल. सेवकाचें वर्तमान.... येथें दोन.....चार वर्षें जालीं. सरकारचाकरीच आहे.....आहे. परंतु येथें असल्यानें यांस सुख असावें.....माझेविषयीं बाईस कोणीं काय भासविलें आहे न कळे. राजश्री बाबुराव वैद्य येथें आले, त्यास दोन तीन महिने जाले. तेव्हांपासून मजविषयीं उपेक्षेच्या गोष्टी बोलूं लागली. त्यावर बाबुराव येथून बिदा जाले. ते समयीं त्याजबरोबर मीही येत होतों. परंतु सरकारची आज्ञा नाहीं; श्रीमंत रागें भरतील; यास्तव रावजीसही सांगितलें जे, श्रीमंतांस विनंति करून मजला बोलावून घ्यावें. तदोत्तर बाबुराव येथून गेल्यावर, महिन्या पंधरा दिवसां, राजश्री मुकुंदराव दिवाण यांज हाती मजला सांगविलें जे, "तुमचें आतां येथें काय काम आहे? सरकारचा जाबसाल बाबुरावांकडे लागला. त्यांचे कारकून लक्ष्मण बल्लाळ येथें आहेत. मग तुमचें येथें बसायाचें काम काय? तुह्मीं आपल्या धन्याकडेस जावें." असें त्यांनीं एक दोन वेळां मजला सांगितलें. तो तपशील पेशजीं श्रीमंतांस विनतिपत्री लिहिला. सरकारची आज्ञा आली जे, तुह्मी तेथेंच असां. येथून तुमची खर्चाची नेमणूक करून पाठवूं. श्रीमंतांनीं खासदस्तूर चार ओळी लिहिल्यानें, सरकारचें मनुष्य तेथें कोणी नसावें असें बाईचें मानस असल्यास, तुह्मांस कसरावद अगर मंडलेश्वर अगर उज्जनी येथें आज्ञा करूं तेथें रहा. तें पत्र बाईस दाखवलें. ते वेळेस बोलली जे, "आमचें काय खातात? त्यांचें धनी त्यांस खर्चास पाठवितात. मग राहिनात कां? रहा ह्मणावें. परंतु आह्मांजवळ खर्चास मागाल तर आह्मांजवळ कांहीं नाहीं. आह्मीं कोणाकोणास द्यावें? रावजीकडील कारकून आहेत, त्यांजकडे जाबसालच आहे. यांजकडे काय? हे आमचें बारीक मोठें लिहिणार!" असें कोणां कोणांजवळ बोलली. ते समयीं भासविणारांनीही चार गोष्टी अधिकोत्तर भासविल्यानें, बाबुराव व लक्ष्मण बल्लाळ हे सरकारचे मातबर, आणि विठ्ठल शामराज, हरिपंत तात्यांचे विद्यमानें. बारीक मोठें जें लिहिणें तें यांनीं तात्यांस लिहावें, असें बाईस समजाविलें. सांप्रत येथील समज तुकोजीबावांचे पक्ष .....तात्या. श्रीमंतांची ममता इकडील या समजेच्या पोटांत बारीक बारीक फार आहे. असो. प्रस्तुत बाई येथें कोणाच्याजवळ बोलली की, आमचे येथील गृहकृत्याच्या बारीक मोठ्या गोष्टी तेथें हरिपंत आपले घरीं बोलतात. इत.....मोठ्या गोष्टी कोण त्यांस लिहितें? जवळील बोलले.....त्यांचे खासगत कारकूनच आहेत. चार वर्षें.....आहेत. ते अधिक वेगळे लिहित असतील.....भासलें. ते वेळेसही समविषम बोलली कीं, "आह्मीच काय करितों. उगेच वरचेवर कारकून कां पाठवितात? आमचें येथें कधीं श्रीमंतांचे कारकून बसत नव्हते. नवें नवेंच होऊं लागलें." असें बोलली ह्मणून ऐकिलें.

मी येथून यांची नालीश सरकारांत लिहितों, असें यांस भासविणारांनीं भासविलें आहे. मजविषयीं यांची चित्तशुद्धि नाहीं. त्यापक्षीं धन्याच्या पायांजवळ असणें बरें. आज छत्तीस वर्षेंपर्यंत धन्यांनीं प्रतिपाळ केला, आतां उतारवयांत धनी उपेक्षा करणार नाहींत. आपण कृपा करून श्रीमंतांस विनंति करून आज्ञापत्र पाठविलें तर येईन. येथील प्राप्तीचा प्रकार, रावजी नवते आले त्या दो वर्षांत, चार पांचदा मिळून सहाशें रुपये यांजकडील मजला पावले आहेत. पेशजींही सेवेसी लिहिलेंच आहे. अलीकडे एक कवडी यांजकडील पावली नाहीं. येथें बाहेरील खर्च पैशाव्यतिरिक्त कांहीं चालत नाहीं. येथें सहाशें रुपये देण्याच्या पेंचांत आहें. पुढें नित्य कृत्य चालणें संकट जालें आहे. फार श्रमांत आहें. माझेविषयीं कोण श्रीमंतांस विनंति करितो? स्मरण कोणास? यास्तव, आपण कृपा करून विनंति श्रीमंतांस केली तर, येथील देण्याच्या पेंचांतून निघून धन्याचें दर्शनास येणें होय, अशी कृपा कराल तर बरें आहे. अलीकडे पांच महिने सरकारचें व आपलें कधींही पत्र येत नाहीं. कासीदजोड्या येतात, त्यांजबरोबर देखील उत्तरें येत नाहींत. असो. सरकारची मर्जी. हें पत्र एकांतींच वाचावें. उत्तर यावें. अपराध क्षमा करावा. हे विनंति."

लेखांक ६६. ता० १२ दिसेंबर इ. स.१७८१.
श्रीगजानन. मि० मार्गशीर्ष व॥ १२ शके १७०३.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २५ जिल्हेजपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष:–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान राजश्री माधवराव गंगाधर यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. सबब शिष्टाचाराचीं पत्रें राजश्री पाटीलबावांचीं पत्रें बाईस आलीं होतीं जे, हे दौलत नी ते दौलत दोन नाहींत. पूर्वीपासून कैलासवासी सुभेदार सांभाळ करीतच आले आहेत. त्याप्रमाणें आपणही प्रतिपाळ करीतच आहांत. माधवराव येथें असल्यानें घरीं आहेत. अशीं ममतापुरस्सर पत्रें आलीं. यांनींही त्याप्रमाणेंच यांचीं उत्तरें पाठविलीं. बाजारी वर्तमान ऐकिलें कीं,.....पाटील इकडून गेले. ते पाटीलबावा..... .....भाषणें होऊन मसलत ठरली. माधवरावजी फौजसुद्धां त्या शहरावर ठेवून खांसा आपण सडे कांहीं लोकांनिशीं उज्जनीस यावें; तेथून येथें बाईची भेट घेऊन श्रीमंतांच्या दर्शनास जावें; अशी मसलत जाली आहे. ह्मणून वदंतेचें वर्तमान.

राजश्री तुकोजी होळकर तेथें आहेत. त्यांचे ममतेस्तव इकडील होळकरसंमंधीं महाल जे आहेत, त्याविषयीं सरकारची उत्कंठा फार आहे. हमेश कागदपत्र व कारकून येतात; व त्यांस कांहीं खर्चास पाठवावें ह्मणून वरचेवर ताकीदपत्रें व महसल येतात. आज तीन वर्षांत एक कोंकणप्रांतीं इंग्रजांची मसलत पडली. ते वेळेसही त्यांजवळ फौज किती होती, ती आतां दोन वर्षें फौजेचा खर्च काय आहे? कामकाज तरी कोठें पडलें आहे? तत्रापि देशीं सरंजामी महाल आहेत, ते निरुपद्रव. इकडील जोर तलबी महाल त्या देशच्या महालचा पैका कोठें खर्च होतो? हा विचार श्रीमंतांनीं त्यांसी कांहीं न करितां, इकडील महालांचीच ताकीद वरचेवर येती. तस्मात्, राजश्री नारो गणेश जो पर्याय श्रीमंतांस समजावून सांगितात तें मान्य होतें. कारण कीं, मशारनिल्हे, मुत्सद्यांस दरबारखर्च मनास येईल तसा करून, सर्व एकवाक्यतेनें समजावितात, तेंच मुख्यस्थानीं मान्य होतें. येथून आज दोन वर्षें हमेशा इकडील हिशेबाचे आजमास व महालमहालची जमा व येथील खर्च व शिबंदीखर्च व त्यांनींच रद्दकर्जीं महाल दिले आहेत, हें सविस्तर लिहून पाठवीत असतां, श्रीमंतही दौलत करितात, त्यांसही सर्व खर्च ठाऊक आहेत. अमें असतांही ते जें एकवाक्यतेनें समजावितात, तें मान्य पडतें. आह्मांकडील जाबसालास पर्याय अनेक प्रकारचे लागतात. तस्मात् शिद्यांच्या बायकांप्रमाणें आह्मींही एकिकडे बसावें असें नारो गणेशाच्या सांगितल्याअव्वयें मान्य पडावें. इकडील तापत्रय कांहींच चित्तांत येऊं नये. अतएव विवेकस्थानीं अविवेक याचा प्रवेश जाल्यास सहजच विपर्यास पडतात. असें अनेक प्रकारें बोलणें वेळेस बोलत असतात. परंतु पाहतां टाकून गोष्ट सांगायचा रंग नाहीं असें दिसून येतें. पाटीलबावांची दिवाणगिरी माधवरायांनीं केली आहे. ते विषयींही बाईचे संमत.....
.....बाईही बोलत होती जे, निभणें कठीण आहे. पाटीलबावा.....
पोतनिशी व बक्षीगिरी व (फाटलें आहे.).....व फडणिशी हे चारी दरख पाटीलबावांस संभाळावे लागतात. पाटीलबावा ह्मणतात जे, हे माझीं गरीबें पदरचीं आहेत. त्यांस कोणीकडे जा ह्मणावें? हे चौघेही तुमचे आर्जेत राहातील. त्यांस माधवराव यांचें मानस आहे कीं, पोतनिशी आबाजी नाईकांस द्यावी व बक्षीगिरी राजश्री नारो शिवदेव यांस व फडणिसी आपल्याकडेच ठेवावी अशी रदबदली आहे. याप्रमाणें करून घेतील. येथवर आलें आहे ह्मणून दरबारांत ऐकिलें. अद्याप कागदींपत्रीं कोठें वर्तमान लिहिलें आलें नाहीं. माधवराव यांजवळून कारकून आला आहे. तोही कोठें कोणांजवळ बोलला कीं, पैक्याचें अगत्य पाटीलबावांस आहे. करून देतील. राघो मल्हार यांस पाटीलबावांनीं विसा हजारांचीं

खेडीं देऊन, सांगूं काम तें करावें असे रीतीनें ठेवले आहेत, ह्मणून ऐकिलें. वानवळ्याच्या पैक्यास पाय सुटले ह्मणून असेंही कित्येक बोलतात. तुकोजीबावांकडेस येथून बाईचे खिसमतगार अंतरंगें हमेशा जात येत असतात. तें सूत्र एकच आहेसें दिसतें. आग्रह विप्रांविषयींचा येथें फार आहे. मंडळेश्वरीहून फडणीस मुजुमदारानीं राजश्री तात्यांस पत्र लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. पांच सहाशें रुपये कर्जही जाले आहे. येथें कांहीं उपाय नाहीं. धनी कृपाळ समर्थ. हे विज्ञप्ति."

इ. स. १७८२.

[ह्या सालची अवघीं ११ पत्रे उपलब्ध झालीं आहेत. हे साल अतिशय महत्वाचें असल्यामुळें ह्या वर्षाचीं पत्रे इतिहासदृष्टीनें फार उपयोगी आहेत तीं उपलब्ध झाल्यास मागाहून छापण्यात येतील.]

पो छ २३ सफर. **लेखांक ६७.** ता. २३ जानेवारी इ. स. १७८२.

श्रीगजानन. मि. माघ शुद्ध ९ शके १७०३.

"सेवेसीं विठ्ठल शामराज साष्टांग नमस्कार विज्ञापना: छ ८ रोजी रात्रीं दरबारास गेलों होतों. त्यास खरगोणची मामलत येथें बाईनीं राजश्री कृष्णाजी तानदेव यांस दिली आहे. त्यांजवळून रस्त वगैरे वहिवाट चालत आहे, हे तेथेंही ठाऊक आहे. असें असतां, तेथें राजश्री तुकोजी होळकर यांणीं कासी रंगनाथ यांस खरगोणची मामलत सांगितली. येथें बाईनीं कृष्णाजीपंतास दिली. हें त्यांस विदित असतां, मशारनिलेनीं रस्त देऊन सनदा करून घेतल्या. तुकोजीबावांचें पत्र बाईस घेतलें कीं, खरगोणची मामलत कासी रंगनाथ यांजवळून रस्त घेऊन सांगितली आहे; तर सुरळीतपणें यांजकडेस चालूं द्यावी. असें पत्र घेऊन कासी रंगनाथ सेंदव्यास आले. तेथून त्यांनी आपले भाऊ, विसाजी रंगनाथ, येथे पत्रें देऊन बाईकडे पाठविले. त्यांनीं बाईची भेट घेऊन तुकोजीबावांचें पत्र दिलें. पत्र ऐकून ते समयींच बाईनीं पत्र टाकून दिलें कीं, आह्मी कृष्णाजीपंतास मामलत सांगितली आहे, हें तुह्मांस ठाऊक असतां तुह्मीं मामलत कां केली? इतका जाबसाल ओंकारजीच्या यात्रेंत जाला. त्यावर येथें आली. मधें मधें जाबसाल करीतच होते. बाई झाडून टाकीतच होती. त्यास, काल रात्रीं जाबसाल जाला. विसाजी रंगनाथ यांणीं बाईस विचारलें जे, आमचे घरीं देणेदारांचीं धरणीं बसलीं

आहेत. आह्मांस काय आज्ञा? त्यास बाईनीं साफ उत्तर केलें जे, आह्मी कृष्णाजी तानदेव यांजवळून रस्त घेऊन मामलत त्यांस सांगितली आहे. हें त्यांस व तुह्मांस माहीत असतां, तुह्मी आह्मांस न पुसतां, त्यांस रस्त देऊन मामलत करून आला, हें कां? यांणीं उत्तर केलें जे, ते धनी. बाई बोलली कीं, तुह्मांजवळ रुपया फार आहे, ह्मणून तुह्मीं त्यांस दिले. आह्मांस कोणी देईना? असो. आणीक इतके दिवस बसला तरी आह्मांस मामलत तुह्मांस देणें नाहीं. परिछिन्न येथें राहूं नये. यांणीं उत्तर केलें जे, आह्मी बुडालों! बाईनीं उत्तर केलें जे, तुह्मी आपले गांडखाजीनें बुडाला. मेलें फितुरी पागा घेऊन आले आहेत. सेंदव्यांत जमीयत करून खरगोणावर वगैरे महालावर आवाडाव करावी, या विचारांत आहां. बरें, काय चिंता आहे? विसाजीपंतानें शफत वाहिली कीं, आह्मी उभयपक्षीं चाकर. आमची इतकी ताकद काय कीं, आह्मी धन्याशीं निमकहरामी करणार नाहीं. करून फसलों, तेथेंही अधिकोत्तर बोलवत नाहीं. आह्मीं काय करावें? तेव्हां बाईनीं निक्षून सांगितलें कीं, परिछिन्न मी हे मामलत तुह्मांस देत नाहीं. बसूं नका. ते बोलले जे, आमचे गळे फसले आहेत; ते कसे उगवतील? त्यास बाई बोलली कीं, ते व आह्मी एकत्र होऊं तेव्हां जें होणें तें होईल. जेव्हां बोलाल तेव्हां हाच जाबसाल. तुमचे भाऊ सेंदव्यांत पागा घेऊन बसले आहेत. त्यांस ह्मणावें कीं, काय करणें तें करा. पराक्रमी पुरुष आहेत! विसाजी रंगनाथ बोलला कीं, आह्मी धन्याचे चाकर. आह्मांजवळून असें होणार नाहीं. बाई बोलली कीं, चाकर खरे; परंतु फितुरी चाकर! असो. मामलत तुह्मांस देणें नाहीं, असें साफ उत्तर केलें. याप्रमाणें येथें उत्तरें जालीं. कदाचित् तेथें खरगोणाविशीं साहित्यपत्र सरकारचें तुकोजीबाबा बाईस मागतील. जाबसाल असा निक्षून जाला आहे. धन्यास विदित होय ह्मणून विज्ञापना. सेवकास आज्ञापत्र येऊन दोन महिने जाले, परंतु देण्याच्या आटकावाकरितां राहिलों आहें. वारंवार लिहितों ह्मणून धनी रागें भरतील. सेवकाचें तों तेथें स्मरण देण्यास कोणी नाहीं. नित्य येथें कर्ज खात बसलों आहें. धनी कृपाळू सर्वज्ञाण आहेत. हे विज्ञप्ति."

लेखांक ६८. ता० १३ जुलई इ. स. १७८२.

श्रीगजानन. मि० आषाढ शु॥ ३ शके १७०४.

"विज्ञापना.—लखनौस बाईचे वकील खंडेराव ह्मणून आहेत. त्यांनीं येथें तिकडील वर्तमानचें पत्र लिहिलें आहे. एक महिना ती रोजांचें पत्र येथें छ १ सावानीं आलें. त्यांत मजकूर त्यांनीं लिहिला होता जे, कलकत्त्याहून इंग्रज

सात जण सरदार निघून दिल्लीस पातशाहाचे भेटीस आले. त्या सातांतून दोघे सरदार माष्टीनल व कर्नल किलीच हे उभयतां पुढें लखनौस आले. सुजाउद्दवल्याचा लेक मिरजा आमानीची भेट घेतली. परस्परें आगतस्वागत जालें. त्रिवर्गांची मसलत जाली जे, दिल्लीस जाऊन पातशाहाची भेट घ्यावी. ती करोड रुपये पातशाहास नजर देऊन वजारत करावी. पातशाही फौज व आपली सलतनत घेऊन दक्षिणेस यावें. अशी मसलत उभयतां बोलले. सुजाउद्दवल्याच्या लेकानें आपले मातुश्रीपासून साठ लक्ष रुपये गुदस्तां घेतले आहेत. आतां सुजाउद्दवल्याचे आईजवळून काय जडीपुंजी असेल ते घेऊन, उभयतां बेगमा–आई व आजी–उभयतांस काशीजवळ कोणी किल्ला आहे तेथें नेवून ठेवाव्या, अशी मसलत केली आहे. ते मागाहून इंग्रज आले ह्मणजे हे मसलत करून दिल्लीस येणार. दिल्लीकडील वर्तमान या पत्रांतच होतें जे, पातशाहांनीं साहेबजादा बाहेर काहडला होता जे, आग्र्यास जाऊन बंदोबस्त करा. त्यास नजीबखानास देवाज्ञा जालियावर फौजेस कोणी धनी पाहिजे, ह्मणून नजीबखानाच्या बहिणीनें त्याचा चेला आफराशा देरीणा(?) मनुष्य होता, त्यास वस्त्रें देऊन फौजेस सरदार केला. साहेबजाद्यांनीं त्यांनीं फौज सुद्धां आग्र्यास जाणार होते, परंतु अफराशास पातशाही वस्त्रें जालीं नाहींत. पातशाहाच्या चित्तांत कांहीं कीलाफ आला, यास्तव आग्र्याची मसलत राहिली. शाहाजादा फिरून दिल्लींत गेला. पातशाहाही दक्षिणी फौजेची मार्गप्रतीक्षा फार करितात. या पत्रांतच पाटीलबावांकडीलही वर्तमान होतें जे, गोहदवाल्याकडून गंगाधर गोविंद बोलायास आले होते जे, कांहीं खंडणीचा जाबसाल बोलाल तो ऐकूं; परंतु ग्वाल्हेर खालीं करून देत नाहीं. पाटीलबावाही ह्मणतात जे ग्वाल्हेरच घेऊं. याप्रमाणें वर्तमान होतें. श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईस गेले, व तिकडे पनवेलीकडे दहा पलटणें इंग्रज जमा जाले आहेत. पुण्याकडे जाणार ह्मणून हें बाजारी वर्तमान ऐकिलें, व तैलंग ब्राह्मणाचे मुखांचें वर्तमान ऐकिलें, जे दादासाहेब सुरतेसच आहेत. परंतु मुख्यांनीं अग्निहोत्र घेतलें व अमृतरायासही अग्निहोत्र दिलें. उभयतांही सुरतेजवळ अश्विनीकुमारावर तापीतीरीं आहेत. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें. सत्य मिथ्य देव जाणे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. जाटांनीं जमियत करून डिगेस मोर्चे लाविले आहेत. किल्ल्यांतील शिबंदीचे लोक ह्मणतात जे, तीस हजार रुपये आमची शिबंदी चढली आहे. ते द्या, नी किल्ला घ्या; व आग्र्याच्या किल्ल्यांतही शिबंदीचे लोक आहेत. ते ह्मणतात जे, साठ हजार रुपये शिबंदीचे चढले आहेत, ते कोणीही देऊन किल्ला घेणें. हें कागदीं पत्रीं वर्तमान नव्हे. बाजारी ऐकिलें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ६९. ता. २८ जुलई इ.स. १७८२.

पै॥ छ २५ साबान. **श्रीगजानन.** मि० आषाढ व॥ ४ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १६ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असो. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत, पावलीं असतील. सांप्रत मातुश्री अहिल्याबाई श्रावणमासचे गडबडींत आहेत. राजश्री पाटीलबावांकडील पत्रें बाईस हमेश येत असतात. सांप्रतच्या पत्रांत मजकूर जे, राजश्री शिवाजी विठ्ठल यांचा प्रांत राजेरजवाड्यांनीं व गोहजवाल्यांनीं दाबला होता, तो बहुतेक सोडविला. एक स्थळ राहिलें. तेंही चौ रोजांनीं सुटेल. तें जालें ह्मणजे हिंमतगडास जाणार. ते जागा बांकी आहे. ते सुटली ह्मणजे पंचमहाल सारा सुटला. तदोत्तर वर्षाकाळची छावणी चाऱ्यापाण्याची सोय पाहून करूं. गोहजवाल्याकडून राजश्री गंगाधर गोविंद बोलावयास येणार ह्मणून लिहिलें होतें. तर्कानें दिसतें कीं, कांहीं खंडणीचा मजकूर बोलतील. ग्वाल्हेर खालीं करायाचा मजकूर त्यांच्या चित्तांत नाहीं. यांचा तो निश्चय कीं, ग्वाल्हेर सुटल्याशिवाय त्यांचा प्रांतांतून निघूं नये. राजश्री आबाजी नाईक वानवळे व राजश्री माधवराव गंगाधर यांस लवकर पाठवून द्यावें, असें वर्तमान होतें. हें पत्र वाचून पाहून, बऱ्हाणपुरास राजश्री नारो शिवदेव व बाजी विठ्ठल व आबाजी नाईक यांजकडे रवाना केलीं ह्मणून ऐकिलें. बऱ्हाणपुरीं नाइकाचे मातुश्रीस सावकाश वाटत नाहीं. ज्वराचा उपद्रव जाला आहे. ते स्वस्थ जाली ह्मणजे नारोपंत नाना व बाजीपंत नाइकास घेऊन इकडे येतील. येथें बाईची भेट घेऊन पुढें माधवराव यांसह पाटीलबावांकडेस जातील. असें ऐकिलें. राजश्री लक्ष्मण बल्लाळ यांस सरकारचें पत्र हुजूर येण्याविषयीं आलें होतें. त्यावरून बाईची आज्ञा घेऊन छ १३ मिनहूस ते पार जाले. पर्जन्यामुळें एक दिवस पार मुक्काम करून छ १५ मिनहूस प्रातःकाळींच कूच करून गेले. दरमजल पुण्यास येतील. त्यांचे भेटीनंतर येथील वर्तमान सविस्तर सेवेसी निवेदन करतील. मृगापासून दीड महिना इकडे पर्जन्य नव्हता. आतां पुष्य नक्षत्राचा पाऊस चांगला जाला. पेरण्या लागल्या आहेत. राजश्री बाजीराव बर्वे यांसीं व लक्ष्मण बल्लाळ यांसीं भाषणें पुष्कळ जालीं आहेत. सेवेसी निवेदन करतील. सारांश, त्यांच्या बोलण्यांत वारंवार हेंच आहे कीं, आपल्यास पुण्यास जाणें नाहीं. जिवंत रेवापारीं दक्षिणतीरास जाणार नाहीं. येथेंच बाईजवळ वर्ष दोन वर्ष राहून, पुर्तेपणें बाईची खातरजमा एकनिष्ठतेची जाल्यावर, पुढें

कोठें बाई पाठवितील तेथें जाऊं. अगर श्रीमंतांचीं ममतापुरस्सर पत्रें आलीं तर जाणें होईल. या वेळेस येण्याचें मानस नाहीं. अशीं स्पष्ट भाषणें जालीं. हैदरनाईकाकडील वकील बाळमुकुंददास दिल्लीस आहे. त्यांनीं पातशाहासीं संदर्भ लाविला होता जे, दोन करोड रुपये नजर देतों; सा सुभे दक्षिणची सुभेदारी आपल्यास द्यावी. त्यास, पातशाहांनीं यांचें खानदान विचारलें जे, हे कोठील? पहिले यांचे दादे परदादे काय करीत आले आहेत? त्यांच्या वकिलांनीं तो अरकाटचे सुभे ह्मणून सांगितलें. तेव्हां पातशाहांनीं सा सुभे दक्षिणचे सुभ्यांचा नांवनिनामा काढविला. तेथें यांचा दाखला कोठें न मिळाला. तेव्हां बारीक शोध केला. तेव्हां कर्नाटकांत कोल्हार परगणा आहे, तेथील नाईकवाडी हें समजल्यांत आलें. त्यावरून ती गोष्ट महकूफ राहिली. त्यावर दिल्लीचे तवायफ लोक व कांहीं मातबर यवनांच्या पोरी खरेदी केल्या. पाऊणशेंपर्यंत बायका खरेदी व कांहीं फुसलावून, अशा जमा करून, त्याजबरोबर रथ व गाड्या व दोनशें बरकंदाज वगैरे काफला जमावून, पातशाहाचीं हुकुमी पत्रें राजेरजवाडे व तहद औरंगाबादपर्यंत मातबर संस्थानिकांस, पातशाहाचीं साहित्यपत्रें कीं मार्गीं कोणी मुजाहीम न होतां आपलालीं हद्दपार करून देणें ह्मणून, सार्वभौमाचीं पत्रें देऊन, दिल्लींतून रवाना केलीं. त्यांस सहा महिने जाले. पिंढाऱ्यास दाखल जालीं. तेथवर येई तों सहाजणी की सात इतक्या राहिल्या. बाकी साऱ्या निघून गेल्या. जागां जागांच राजेरजवाड्यांस सांगत कीं आह्मांस जोराबारी न नेतां, ते हिरून घेत. कोणीं काढून दिल्या असें होत. पिंढाऱ्यापर्यंत आले. तेथें मुक्कामं करून बाईसही पातशाहाचा इनाईतनामा होता जे, यांस समागमें लहबार (?) देऊन आपली हद्दपार करून देणें. तें पत्र घेऊन एक भला मनुष्य मुसलमान, समागमें त्याचीं पांच सात माणसें, तो काल छ १५ मिनहूस त्रितीय प्रहरीं आला. वाड्यांत बाईस समाचारास पाठविला. यांनीं बोलविला. पातशाही पत्र उभे राहून पुढें जाऊन घेतलें पाहिजे, तो भला माणूस ह्मणाला. बाई ह्मणाली जे, "ज्या श्रीमंतांच्या लोकांनीं पातशाहाची तगीरी बहाली केली आहे, त्यांच्या पत्रास इतकी आडस पत्रीं नाहीं. यांस कोण पुसतो?" लोक ह्मणाले जे, "पातशाही कैदकानू आहे. आपण मान्य न करीत, तर आणीख कोण करील?" मग मुकुंदराव दिवाणास सांगितलें जे, उभे राहून पत्र घ्या. मग मुकुंदराव उभे राहून, दोन पावलें पुढें होऊन पत्रें घेतलीं. तें मुनशींनीं वाचून दाखविलीं. त्यांत हाच मजकूर होता जे, हैदर अलीखां बहादर यांचा अटक येथून मुकुंददास वकील त्यांचे त्यांनीं रवाना केला आहे. खानबहादराकडे लहबार जात आहे.

त्यास आपली हद्द पार करून देणें. देवराव हिंगणे यांचेंही पत्र याच साहित्याविषयीं होतें. तें पाहून या अविंधास बाईनीं सांगितलें जे, चौमाशाची छावणी कोठें करितां? यानें सांगितलें जे, येथें येऊं. बाईनीं सांगितलें जे, उज्जयनीस अगर पिंढाऱ्यास छावणी करा. बादबरसातींत या. आह्मी आपली हद्द पार करून देऊं. इतकें सांगून त्यास विडे देविले. एक घोडें व आठ माणसें त्यांस समागमें होतीं. त्यांस शिधासामुग्री देविली. पातशाहाच्या पत्राचें उत्तर देणें ह्मणून मुनशीस सांगितलें. त्यांस निरोप दिला. दिल्लीचें वर्तमान हिंगण्यांनीं लिहिलें होतें जे, नजीबखानाचे चेले व त्याचे फर्जंद या उभयतांत कज्जा लागला आहे. पातशाही साहेबजादा आम्ह्यास जाणार ह्मणून डेरादाखल जाला होता. तो यांच्या कलहामुळें फिरून दिल्लींत गेला. शिकांचीही गडबड फार आहे ह्मणून हिंगण्यांनीं लिहिलें होतें. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ७०. ता० ३१ जुलई इ. स. १७८२.
श्रीगजानन. मि. आषाढ व॥ ७ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १९ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. तें सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमान बारीक ऐकिल्यांत आलें जें, कोणी आपले आप्तजवळ बाई बोलत होती जे, "राज्याचा प्रकार एक रीतीचा जाला आहे. धनी प्रबुद्ध नाहीं. दरबारांत कोणी समविषम गोष्ट सांगतो. तेंच प्रभूस सत्य भासतें. खऱ्या लटक्याची छान नाहीं. तेही काय करतील? युगधर्म असाच आला आहे. दोन तीन वर्षें पाहिलीं; परंतु कोणतेही गोष्टीचा ठिकाण लागत नाहीं. आदिपश्चादीचा विचारहि महान स्थळीं राहिला नाहीं. अब्रूच्या मनुष्याची अब्रू राहणें कठीण आहे. असत्य सत्य, नी सत्य असत्य, भासूं लागलें. खऱ्या मनुष्यानें आपलें सुखदुःख कोणाजवळ सांगावें? कांहीं ताळ राहिला नाहीं. याउपर महायात्रेस उठून जावें, हें उत्तम दिसतें. अतःपर येथें राहण्याचें युक्त नाहीं. महायात्रेस जाणें हेंच उचित आहे. दिवसंदिवस शरीरही जेर जेर जालें. काय हयाती बाकी असेल ते, ते स्थळीं अखेर होय तर उत्तम आहे." जवळ कोणी एक दोन भले मनुष्य होते. यांनीं उत्तर केलें जे.–"आपण विचार केला, हा बराच आहे. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब भाऊसाहेबापासन कैलासवासी श्रीमंत रावसाहेब अखेरपर्यंत, दनिया

यथास्थित पर्यंत नांदली. प्रस्तुत पुण्याच्या खबरी ऐकितों. आपल्याही कानावर आल्याच आहेत. कोणाची घरलूट, वाड्यास खाणत्या लाविताहेत. अनेक रीतींच्या जुन्या खपल्या काढून लोकांजवळून दंडद्रोह करितात. जेथें गाऱ्हाणें सांगायास जावें, तेथें अशी रीत जाली, होऊं लागली. तिकडे हैदरनाईकानें ब्राह्मणांचीं (अग्रहारें) लुटलीं. एकूण काळ कठीण आला.'' बाई बोलली जे, काशीस जावे, हें उत्तम आहे. जवळील गृहस्थ बोलले जे, "आपण काशीस जाऊं ह्मणतां, परंतु चौ देशांत तुमचीं जागां जागां छत्रें, कोठें तळीं, बावड्या व देवळें, धर्मशाळा असे जागां जागां धर्मकीर्ति फैलली आहे. सांप्रत तुह्मांजवळ कांहीं नाहीं. परंतु लौकिक लोपणार नाहीं. महायात्रेस जातां, हजार पांचशें मनुष्य तुह्मी समागमें घ्याल. परंतु या कीर्तीमुळें काशीप्रांतीं, राजेरजवाडे, भुके बंगाली हजार पांचशांस तोंडांत टाकीत असे, बहुत ताप आहेत. अशा एखाद्या खंद्याशीं गांठ पडल्यास लाख पन्नास हजार मागेल. ते कोठून द्याल? तुह्मांसारख्यास सुखाचे काशीवास कोणी करूं देणार नाहीं. तुमच्या जाण्याचा प्रकार असा आहे.'' बाई बोलली जे, कसें जाणें होय? त्या गृहस्थांनीं उत्तर केलें जे, तुमच्या जाण्यास मागें फौजेचा पिच्छा भारी असावा, आपण पुढें निघून जावें, तेव्हां यात्रा होईल. फौज ते प्रांतीं आहे, तों यात्रा करून निघून यावें. याप्रमाणें भाषणें जालीं. पाहतां बाईची मर्जी सदा अजुर्दा असती. राजश्री माधवराव गंगाधर यांस पाटीलबावांकडेस पाठवायाची फार निकड आहे. मुहूर्त काढून प्रस्थान ठेविलें. राजश्री बाजी विठ्ठल व आबाजी नाईक वानवळे यांची येण्याची मार्गप्रतीक्षा करितात. बाजीपंतासही तेथें सावकाश वाटत नाहीं. तीन दिवसपर्यंत एक धडसू(?) जालें होतें. आतां कांहींसें बरें आहे. यांनीं येथून औषधेंही पाठविलीं आहेत. तेही तेथून लवकरीच येणार. आले ह्मणजे हे, ते, मिळून पाटीलबावांकडेस जातील. याप्रमाणें येथील वर्तमान. सेवकाचें वर्तमान तर, आज वरीस सव्वा वरीसपर्यंत, –काय यांच्या चित्तांत कोणीं विकल्प घातला आहे हा नकळे,–त्यामुळें बोलण्याविषयीं संकोच करितात. प्रस्तुत कामही मजकडे काय आहे? बाहेर बारीक मोठें वर्तमान कळतें, तें सेवेसीं लिहितों. न जाणूं, येथें एखादें एकांतीं वर्तमान जालें, सेवकास न कळलें, धन्याच्या ऐकिण्यांत आलें, (व) सेवकाच्या लिहिण्यांत न आलें, ह्मणून स्वामी रागें भरतील. यास्तव सूचनार्थ विनंति. हें पत्र एकांतींच पाहून, फिरून तात्या पेंडश्याच्या हवाला करावे हे विनंति. अलीकडे सरकारचे कांहीं कागदपत्र येत नाहींत. धन्याची मर्जी! हे विज्ञप्ति.''

लेखांक ७१. ता० ३१ जुलई इ. स. १७८२.
श्रीगजानन. मि. आषाढ व॥ ७ शके १७०४.

"राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीः–

सेवक विठ्ठल शामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत छ १९ साबानपर्यंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे.

[विशेषः—बहुत दिवस जाले, पत्र येऊन वर्तमान कांहीं कळत नाहीं. हरघडी येणार मनुष्याबरोबर पत्रद्वारें परामर्ष करीत असावें. विशेष इकडील वर्तमान बारीक मोठें कळल्याप्रमाणें श्रीमंतांस लिहिलें आहे. पत्राचा लाखोटा करून तुमच्या लाखोट्यांत घातला आहे. तुह्मीं आपलें पत्र वाचून, श्रीमंतांचा लाखोटा, एकांतीं एकले बसले असतील ते समयीं नेऊन, आपणच द्यावा. पत्र वाचून काय आज्ञा करितात ते ऐकून घेऊन, समयोचित विनंति करावी. मजला येथें वर्तमानास ठेविलें आहे. समयोचित यांनीं कांहीं सांगितलें तें धन्यास लिहावें, धन्याची आज्ञा येईल तशी यांस विनंति करावी, असें चालतही होतें. अलीकडे राजश्री बाबूराव वैद्य आल्यापासून कामकाजाचा जाबसाल त्यांजकडे पडला. यांस काय सरकारचें काम आहे? ते आपल्या घरच्या कामास नाहीं आले. काम मिळून सरकारचें. मजलाही येथें धन्यांनीं पाठविलें आहे तें सरकारकामासच. माझें घरचें काम कांहीं नाहीं. आह्मांस कांहीं वर्तमान कळतें, तें जाबसालांत असल्याशिवाय बारीक मोठें वर्तमान कसें कळते? तथापि, मातबरांनीं गरीब ह्मणून पतच उठवून द्यावी. साऱ्या गोष्टीस आमचा बेइतबार आणि वरकडांचा इतबार! असें आह्मांजवळून कोणतें सरकारकाम खोट जालें होतें? आह्मीं कांहीं यांस मातबर कामांत जाऊन खोट केली नाहीं. अगर कोठें हरएक कामाचेही (फाटलें आहे) आले नाहींत. असो. समर्थास काय ह्मणावें? ते थोरच. असो. मजलाही येथें साडेतीन वर्षें जालीं. पुढें रहावें तर यांणीं येथें केवळच आमचा बेइतबार केला आहे. बारीक मोठें वर्तमान कळलें पाहिजे. दरबारांत, जाबसालांत, कामकाजांत, असल्यास कितीक वर्तमान कळतें. ते विषयीं तों येथें किलाफ घालणारांनीं घातला. ह्यावरून हेही संकोच करितात. तेव्हां आह्मांस वर्तमान कोणीकडून कळावें? येथें एक असेल आणि मीं भलतेंच वर्तमान ऐकून लिहिलें, तिकडूनही फजिती. तेथें श्रीमंतांची नाजूक मर्जी. रागें भरले तर मजविषयीं सांत्वन करायास कोण? यास्तव व जितकें जालें तितकेंच पुरें. धण्याची कृपा आहे तों पायांजवळ यावें. या उतारवयांत एखादी फजिती न व्हावी. मी गरीब. कोणी माझा वशिला नाहीं. यास्तव स्वामींस विनंति जे, बहुत दिवस जाले, धन्याचे पाय पाहावे. आपली ओळख न विसरावी.

फिरून जिकडे पाठवितील तिकडे जावें. येथें कवडीची प्राप्ति नाहीं. साडे चौ वर्षांत साहाशें रुपये पावलों आहें. कोठवर येथें कर्ज खाऊं? आणि धन्यास खर्चाचा रत्नाकर कोठवर लिहूं? चारशें रुपये सरकारचे आले, ते देणेंदारास देऊन, अडीचशें रुपये लोकांचें देणें आतां आहे. फिरून रोजखर्च चालला पाहिजे. अधिक अधिक कर्जच होतें. घरची अवस्था ह्मटलें तर असे सवंगाईत माझीं मुलें मनुष्यें अन्नवस्त्रावांचून हैराण आहेत. पांच सात हजार रुपये लोकांचें देणें. दोन वर्षें चिरंजिवानें कर्ज खाऊन तुह्मां लोकांची उपार्जना केली. धन्याची ओळख केली. पसतीस वर्षें चाकरी मी करून एक असामी मुलास न मिळाली! शेवटीं घरास गेला!! आमचा गरिबाचा प्रतिपाळ धन्याव्यतिरिक्त कोणीं करावा? मातबराविषयीं हरकोणी विनंति करील. आमचे कोण? श्रीसर्वोत्तमास आमचे श्रम विदित आहेत. सारांश, कदाचित् सरकारचें पत्र एकांतीं द्याल, ते समयीं कांहीं श्रीमंतांनीं विचारिलें तर, या पत्रान्वयें ईश्वर जे आपल्यास स्फूर्ति देईल तें बोलावें.]

.....गुजराथ वगैरे प्रांतचे ब्राह्मण येथें श्रावणमासास आले आहेत. त्यांनीं वर्तमान सांगितलें जे, तमाम गुजराथ प्रांत फार खराब आहे. जागा जागा इंग्रजांचीं ठाणीं मातबर स्थळीं आहेत. ते जुंज आहेत. सुरतेंत एक पलटण व दाहा गोरे; भडोचेंत तीनशें लोक व चौघे गोरे; व जंबुसरांत तीनशें लोक व तिघे गोरे; व डभाईंत चारशें लोक व दोघे गोरे; व बडोद्यांत राजश्री फत्तेसिंग गाईकवाडाजवळ शंभर गोरे व एक पलटण; असे आहेत. गाईकवाड त्यांचे काबूंत आहे. अमदाबादेंतही पंचवीस गोरे व एक पलटण भद्रांत आहे, व दोन पलटणें बाहेर आहेत. ते प्रांतीं दक्षिणी फौज चांगली आली, तर बडोदें व अमदाबाद वेगळीं करून, सारीं स्थळें हस्तगत होतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब अश्विनीकुमार राव राहिले आहेत. अग्निहोत्र घेतलें आहे. इंग्रज दहा हजार रुपये दरमहा देतात. स्वस्थ स्नानसंध्या करून आहेत. पुण्याकडूनही कांहीं जाबसाल दादासाहेबांकडे लागला आहे. केवळ इंग्रजांचे अटकेंत नाहींत. याप्रमाणें वर्तमान ब्राह्मण तद्देशी सांगत होते. सत्य मिथ्या देव जाणे. लखनऊस बाईचा वकील खंडोपंत आहे. त्याचें पत्र अठरा दिवसांचें छ ७ मिनहूस येथें आलें. त्यांत वर्तमान होतें जे, सुज्यायतदौलाच्या लेकाजवळ इंग्रजांकडील सात सरदार आले आहेत. त्यास साहा महिने जाले. दोन करोड रुपये त्यास मागतात. त्यासाठीं सुज्यायतदौलाच्या लेकानें, आपली आई व सुज्यायतदौलाची आई–दोघींस कैद करून, दीड करोड रुपये नक्त घेतले, व करोडी रुपयांचें जबाहीर

घेऊन नक्त दीड कोट रुपये इंग्रजांस दिले. बाकी ५० लाख रुपये देणें. त्याबद्दल त्या दोघी बायकांचे कारभारी धरून त्यांस विपत्य करितात. पांचजण सरदार दीड कोट रुपये घेऊन कलकत्त्यास गेले. दोघे सरदार राहिले आहेत. दिल्लीकडेही धामधूम आहे. अद्याप पादशाही फौजेस कोणी सरदार करार जाला नाहीं. आपसांत कजिये करितात. त्यामुळें जाठाचा उत्कर्ष आहे. राजश्री नारो शिवदेव व आबाजी नाईक व बाजी विठ्ठल ऐसे छ १६ रमजानीं त्रितीय प्रहरी रेवा दक्षिणतीरास आले. ते दिवशींच उतरावें व उदईक कुजेपंचमी आहे, यास्तव नावा पाठवून पावसांतच संध्याकाळपर्यंत रेवा उतरून, अलीकडे जेथें माधवराव राहिले आहेत तेथेंच जाऊन उतरले. दो घटका रात्रीं मुहूर्तेंकडून बाईचें दर्शन घेऊन मुक्कामास गेले. दुसरे दिवशीं चार घटका दिवस राहतां, त्रिवर्गास बाईनीं बोलावूं पाठविलें. तेही आले. मीही त्यांस भेटायास गेलों होतों. सांगातेंच वाड्यांत आलों. बाई स्नान करून पूजा करीत होती. अर्धी घटकानंतर बाहेर येऊन एक घटका बसली. आगतस्वागत बोलून बाई भोजनास गेली. भोजन करून आलियावर, दोन घटका एकांतीं, बाई व नारो शिवदेव व आबाजी नाईक हे तिघे, एकांतीं बसून दोन घटका बोलली. बाजी विठ्ठल बाहेरच होते. खिलवत होऊन, दोन घटका रात्री निरोप घेऊन बिऱ्हाडास गेले. तदोत्तर तिसरे दिवशी वद्य ८ स बाई श्रीदेवीदर्शनास गेली होती. जवळीच माधवराव व हे उभयतां राहिले होते. तेथें नागोपंत व आबाजी नाईक व माधवराव व बाजी विठ्ठल व बाई ऐशीं पांचजण एकांतीं बसून दोन घटका बोलून, माधवरायांसही समक्ष निरोप देणें होता तो देऊन बाई किल्ल्यावर गेली. नारो शिवदेव यांचे घरीं श्राद्ध वद्य दशमीचें होतें, तें काल जालें. एकादशीस रात्रीं, नारो शिवदेव व आबाजी नाईक बाईकडे रात्रौ जाऊन, कांहीं बोलणें एकांतीं होऊन, निरोप घेतला. वस्त्रें बाईनीं दिलीं. दीड प्रहर रात्रीं बिऱ्हाडास गेले. बाजी विठ्ठल यांची नेमणूक माधवरायाबरोबर पाटीलबावांकडेस जायाची होती. परंतु बाईची मर्जी नाहीं, ह्मणून घरास चार दिवस जावें, बोलावूं तेव्हां यावें, असा निरोप जाला. त्यावरून बाजी विठ्ठल देशास येतात. पुण्यासही येतील. वरकडांनीं द्वादशी सौम्यवारीं कूच करून कोसभर रामकुंडावर मुक्काम केला. त्रितीय प्रहरीं नारो शिवदेव व आबाजी नाईक बाईस रामराम करायास आले होते. चार घटका एकांत होऊन निरोप घेऊन गेले.

त्रयोदशीपासून दर मजल उज्जयनीस जातील. तेथेंही आठचार दिवस सरंजामी करून पुढें पाटीलबावांकडेस जातील. याप्रमाणें बोलत होते. सांप्रत येथील बाईची मर्जी फारच एककल्ली जाली आहे. कोणीं कांहीं मसलत सांगितली, ती ध्यानास येत नाहीं. माधवराव गंगाधर यांनींही पांच सात वेळां सांगितलें जे, श्रीमंतांचें लक्ष राखावें. इकडील महालसंबंधीं ऐवजांत येथील बेजमी होऊन कांहीं त्यांसही खर्चास पाठवावें. बाईनीं उत्तर केलें जे, त्यांजकडे देशचे महाल आहेत. प्रस्तुत त्यांस मसलतही काय आहे? आह्मांसही येथें खर्च लागला आहे. पहातच आहां. यांनीं उत्तर केलें जे, तुकोजीबावांकडेस देशचे महाल आहेत. असो, आपली मर्जी! परंतु सरकारचें दरबारखर्चसंबंधीं व कर्जवाम देणें आहे, तें तरी थोडें थोडें वारीत जावें. दरबारचें लक्ष राखल्यानें फार उपयोग आहे, असें सागितलें. परंतु बाईच्या ध्यानांत येत नाहीं. कोणास कांहीं द्या ह्मटलें ह्मणजे बाईस तिरस्कार येतो. बाईच्या मर्जीनुरूपच जें घडणें तें घडेल. अशी येथील मर्जी आहे. राजश्री पाटीलबावांकडीलही, आठ चार दिवस जाले, बाईस पत्र आले होतें. त्यांनीं लिहिलें होतें जे, आह्मी आज दोन वर्षें आपणांस लिहीत गेलों की, इकडील महालांपैकीं कांहीं त्यांसही खर्चास पाठवीत जावें; तें कांहीं घडलें नाही. यामुळें सरकारचा व त्यांचा शब्द आह्मांस लागला. अतःपर तरी त्यांस कांहीं खर्चास पाठवावें. तेही हुजूर चाकरीवर आहेत. सरकारचा शब्द लागे असे करूं नये. असें लिहिलें होतें. त्यावरून बाईनीं येथून यादी, हिशेब, व कलमबंद्या लिहून, पाटीलबावांकडेस दाखवायास माधवरायांजवळ लिहून दिल्या आहेत. येथें बाईची मर्जी एक प्रकारची जाली आहे. कोणाचें ऐकत नाहींत. आपण येथें आहों. सरकारचा काय शब्द लागेल? यास्तव माधवराव पाटीलबावांकडे जातां, तिकडेच चार महिने गुजराण करावी. येथें असल्यास बाई ऐकत नाहींत. क्षुद्र मनुष्यांचें प्राधान्य फार जालें आहे. मातबर शब्द लागतां आपल्यास लागेल. एवढ्यास्तव जातात. येथील मसलत अशीही आहे की, इकडील महालांच्या बंदोबस्तास होळकरांची व सरकारची फौज आली. तर आपणही फौज जमा करून पराभव करावा. अशीही येथील मर्जी ऐकिण्यांत आली आहे. बाजीराव बर्वे यांचे ठायींही ममता दिनप्रति विशेषत्वाकारें आहे. येथें बाईस कळलें आहे की, तुकोजीबावांच्या पल्ल्यावर राजश्री तात्या पुर्तेपणें आहेत. श्रीमंतांची मर्जीही तशीच आहे. तेव्हां परिछिन्न उपद्रव एखादा करायास चुकणार नाहींत. तेव्हां कोणाचीही खुशामत केल्यानें काय होतें? या अर्थी सरकारच्या मनुष्याची ही अनास्था! असा प्रकार येथील जाला आहे. राजश्री बाजी विठ्ठलही मागाहून येथून निरोप

घेऊन देशीं येतील. पुण्यासही येणार. नारोपंत व आबाजी नाईक व माधवराव असे सरंजामसुद्धां छ २६ मिनहूस रामकुंडींहून कूच करून पुढें गेले. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेशी श्रुत होय. येथील काशीदजोड्या पत्रें देऊन रवाना करितों. ती चौं महिन्यांत येतात. त्यांजवळ सरकारचें उत्तर कांहीं येत नाहीं. स्वामींची मर्जी! हरकुबाईचा ऐवज मणिरामाकडे रोकड दहा लक्ष आहेत. ते तुकोजीबावाचा आश्रय करून राहिला आहे. हरकुबाई ह्मणाली जे, चौथाई तिजाई सरकारांत घेऊन, त्याजकडून ऐवज उगवून घ्यावा. लटकें असेल तर त्याचा पुतण्या इंद्रमण आहे त्यास पुसावें. सरकारकिफायत आहे. ह्मणून सेवेसी विनंति. हरकुबाईचे गांवही त्यांस सांगून सोडवावे. फार वेळां विनंति लिहिली. धन्याची मर्जी. हे विज्ञप्ति. (फाटलें आहे) न होय. हें पत्रही कोणास दाखवूं नये. श्रीमंतांची मर्जी फार नाजूक. विक्षेप न होय, आणि उपहासयुक्त मीं लिहिलें आहे, तोही कोणाचा न होय. गरिबीस बट्टा न लागे. आपण कृपाळू ह्मणून मीं इतकें लिहिलें. इतकेंही शेष आपल्या ध्यानांत आलें ह्मणजे पुरे. आपण पल्यावर असल्यास काय एक न करतील? हें पत्र कोणास न दाखवावें. सरकारचें पत्र एकांतीं द्यावें. दोहीं पत्रांचीं उत्तरें यावीं हे विज्ञप्ति."

पै॥ छ. ११ सवाल.

लेखांक ७२. ता० ६ सप्टबर इ. स. १७८२.

श्रीगजानन. मि० श्रावण वद्य १४ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ रमजानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असो. विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून, काशीदजोडी व डांकेबरोबर वरचेवर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमानः-येथें श्रावणमासीं येथें तीन चार हजार ब्राह्मण जमा जाले होते. त्यांस पंचमी, षष्टी, सप्तमी, तीन दिवस धर्मदेकार जाला. उत्तम, मध्यम, कनिष्ठ, प्रती रांगडे ब्राह्मण ये देशीं त्यांस पावला. तदोत्तर एकापासून तीन रुपये मध्यमप्रती, चार पांच उत्तमप्रत, ऐसें देशस्थ व तैलंग तीन साडेतीन हजार ब्राह्मणांस दक्षणा सात हजारनऊशें रुपये देकार दिला. रांगड्यांस व बायका व गरीब खळक यांस, सारे मिळून, हजार अकराशेंरुपये वांटले. एकूण कमकसर नऊ हजार रुपये वांटले ह्मणून ऐकिलें. हजार नऊशें ब्राह्मण देकार घेऊन गेले. बाकी तीन हजार कांहीं कम ब्राह्मण छत्रांत नित्य संतर्पण होत आहे. पांचशें ब्राह्मणांस शिधे देत असतात. त्यांतील व कांहीं नवीन देशस्थ व रांगडे व तैलंग असे

अनुष्ठानास लाविले आहेत. अनुष्ठान श्रीलिंगें असें व कांहीं शिवकवच्याचें याप्रमाणें अनुष्ठान चालू प्रतिवर्षाप्रमाणें केलें आहे. राजकीय कारभारसंबंधें वर्तमान तरः–राजश्री तुकोजी होळकर यांजकडील दहा जासूदजोड्या, होळकरांचीं पत्रें ये देशीं मामलेदारास की, गुदस्ताचा हिशेब व सालमजकूरच्या रसदाचा ऐवज व हिशेब घेऊन इकडेस हुजूर येणें. तिकडे मातुश्रींकडेस ऐवज हिशेब विल्हे लावल्यास परिछिन्न कामास येणार नाहीं, असे जरबेचीं पत्रें आलीं आहेत. प्रथम खरगोणास पत्रें घेऊन जासूद आले, तेथें राजश्री कृष्णाजी तानदेव याचा कारकून आबाजी गंगाधर आहेत, त्यांस जासुदांनीं पत्रें दाखविलीं. त्यांनीं उत्तर केलें जे, कृष्णाजी तानदेव महत्पुरीं आहेत. याचा जाबसाल ते काय करणें तो करतील. तेथून इंदुरास जासूद गेले. तेथें खंडो बाबुरायाचे पुतणे आहेत. त्यांनीं उत्तर केलें जे, खंडो बाबुराव देशींच आहेत. तेथेंच ते काय जाबसाल करणें तो खाशांसींच करतील. आह्मांस त्यांची आज्ञा येईल तसें आह्मी करूं. तेथूनही जासूद पुढें गेले. हें वर्तमान येथें बाईस कळलें. उभयतां कमाविसदारांनीं लिहून पाठविलें. पाहून बाई बोलली जे, 'कारकुनांनीं चांगलीं उत्तरें केलीं. बरें, आणीख काय करितात तें करूं द्या. पुढें पाहतच आहों.' इतकें बोलली ह्मणून ऐकिलें. मल्हारगड व निंबहेडा या दोहीं मामलतीची चोकोती करून, नवे जुने मामलेदार त्यांचे हिशेब विल्हे लावून, रसदीची निशा करून घेऊन, मामलतीवर रवाना केले. या वर्तमानांचींही पत्रें राजश्री पाटीलबावांकडे गेलीं. व रा. माधवराव गंगाधर पाटीलबावांकडे जायास, श्रावण शुद्ध दशमी रविवारीं तेरा घटका दिवसां, बाईची आज्ञा घेऊन बाहेर उत्तरेकडे श्रीदेवीसमीप महेश्वरीं नदीतीरीं राहुट्या देऊन राहिले आहेत. बुराणपुरीहून राजश्री आबाजी नाईक वानवळे व नारो शिवदेव, बाजी विठ्ठल हे एका दों दिवसां येथें येणार. ते आले ह्मणजे बाईची भेट घेऊन, हे व माधवराव मिळून पाटीलबावांकडेस जातील. बाईची मर्जीही सदा दिक्क असती. कोणे वेळेस बोलतात कीं, आपलें काय होणें आहे? महायात्रेस जावें. फार उदासीनतेच्या गोष्टी कोणाजवळ बोलतात. कोणे वेळेस जोमाचीही गोष्ट बोलतात. कोणी मसलतगार हेही बोलतात जे, हिंमत धरून फौज ठेवावी. केवळ आपण उगीच बसल्यास आणीख काय उपद्रव करतील. ह्याही गोष्टी ऐकून मात्र घेतात. परंतु कोणतीही मसलत करणें ते पाटीलबावांच्या इतल्याशिवाय करूं नये. जसें त्यांचें पत्र, अगर हे जाणार जातात यांचें व पाटीलबावांचें बोलणें होऊन जसें पत्र येईल तसें करावें, हें अनुसंधान येथील आहे. श्रुत होय. बाजी विठ्ठल यांचा रहायाचा मनसबा जाला होता. परंतु पुन्हां नारोपंतांनीं रदबदली करून समागमें

जावें असा निश्चय जाला आहे. पुढें गेले आहेत. जातात कीं येतात हें मागाहून लिहीन. श्रुत होय हे विज्ञप्ति. ''

लेखांक ७३. ता. ६ सप्तंबर इ. स. १७८२.

श्रीगजानन. मि० श्रावण व॥ १४ शके १७०४.

''राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री ताल्या स्वामींचे सेवेसीः —

सेवक विठ्ठल शामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २७ रमजानपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः बहुत दिवस जाले, आपलें पत्र येऊन वर्तमान कांही कळत नाहीं. यास्तव चित्त सोपक्षित असे. हरघडी येणार मनुष्यावरोबर पत्रद्वारें सांभाळ करीत असावें. विशेष इकडील वर्तमान श्रीमतांस विनतिपत्रीं लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. पेशजीं आपल्यास पत्र काशीदजोडीबरोबर लिहिलें आहे, व त्याच लाग्वोट्यात सरकारचेही पत्र लिहून घातले आहे. तें स्वामींस पावलेंच असेल. परंतु उत्तर नाहीं आलें. कृपा करून पाठवितील. विनंति हेच आहे कीं, येथून मी श्रीमंतांस पत्रें लिहितों. कचें पक्कें वर्तमान कळल्याप्रमाणें शोध करून लिहितों. तेथें श्रीमतांची मर्जी पाहूनच आपण विनंति करितील. श्रीमंतांचे मर्जीस विक्षेप न होय, आह्मां गरिबांवर प्रसन्न, असे रीतीनेंच आपण विनंति करितील. सेवकाविषयी कोणी विनंति करायास तेथ नाही. यास्तव सूचनार्थ विज्ञापना लिहिली असे. आज दोन वर्षे येथें एक कपर्दिकीची प्राप्ति नाहीं. कर्ज खात बसलों आहों. असा प्रकार येथील जाला आहे. पेशजीं आपणांस तपशील पत्रीं लिहिला आहे. तें पत्र आपणच वाचून पाहून ठेवावें. अन्यत्र कोणास नकळे. अक्षर थोर थोर एकच आहेत. मी गरीब. उगाच कोणाच्या चित्तांत विक्षेप न यावा. आपण कृपा करितां, ह्मणून आमचे तापत्रय येथील आपणांस मात्र कळावें, ह्मणून लिहिलें असे. प्रसंगोपात कोणी कांहीं ह्मणतील. येथील अहल्याबाईचे नांव थोर आहे. दातृत्वाचा बोभाट येथील फार आहे. मी वारंवार श्रीमंतांस व आपणांस व सबनिसास खर्चाविषयीं रत्नाकर लिहितों. तेथेंही कोणी ह्मणतील जे, अहल्याबाई एवढी दाता, यांस देतच असेल. परंतु हे उगेच लिहितात. श्रीमंतांसही खरेंच वाटेल. यास्तव येथील तापत्रय असें आहे. भासविणारांनीं विक्षेप घातले आहेत. ते आपणास मात्र कळावे ह्मणून आपल्यासच लिहिलें आहे. प्रसंगोपात श्रीमंतांचे मर्जीत विक्षेप कोणीं घातला तर

आपण परिहार करितील. ह्मणून सेवेसीं पेशजीं पत्रीं तपशील लिहिला. तो आणीक कोणास नकळे. आपले मात्र समजेंत यावा. सुज्ञाप्रती विशेष काय लिहिणें? येथें नित्य कर्जाशीं गांठ आहे. तेथें चिरंजीवाची कोठें सोय जाली नाहीं. घरीं मुलें मनुष्यें फार श्रमांत आहेत. असो. आमच्या दैवास आपण काय करितील? राजश्री गोविंदपंत दादांस दोन तीन वेळां आपल्या जाबसालाविषयीं स्मरण दिलें. ते ह्मणाले जे, पहिले बाईनीं जाबसाल केलाच आहे की, तेथें तुकोजीबावा आहेत, त्यांशीं बोलून घ्यावें. आतां काय बोलायाचें आहे? बाईचें सौभाग्य बाईकडे राहिलें, तर सहजांत होऊन येईल. नाहीं तर, जिकडे कारभार तिकडे जाबसाल, असें बोलले. तिकडेही उद्योग करून पहावा, हे विनंति आहे. बाणाविषयीं आपण लिहिलें, त्यास रेवेस पाणी फार आहे. कार्तिकमासीं बाण निघतात. चांगले बाण शोध करून पाठवून देऊं. कळावें. प्रस्तुत पाणी, करितां बाण निघत नाहींत. कळावें हें विनंति.

पत्र पाठवीत असावें हे विनंति. सरकारचे जाब देऊन जोडी पाठवीत जावी. लवकर पाठवीत जावी हे विनंति."

लेखांक ७४. ता० २३ सप्टेंबर इ. स. १७८२.

पै॥ चंद्र २८ सवाल. **श्रीगजानन.** मि० भाद्रपद वा॥ २ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १५ सवालपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून काशीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रत येथील वर्तमान तर श्रावणमास ब्राह्मणसंतर्पणाचा जाला. आतां भाद्रपद शुद्ध ९ पासून श्रीभागवताचा सप्ता प्रारंभ केला आहे. पौर्णिमेस समाप्त होणार. नित्य प्रातःकाळपासून त्रितीय प्रहरपर्यंत पारायण होत असतें. राजकी वर्तमान तर, राजश्री माधवराव गंगाधर व नारो शिवदेव व आबाजी नाईक वानवळे हे त्रिवर्गाशीं.... बाईशीं पुढील मसलतीचीं भाषणें होऊन....पाटीलबावांकडेस रवाना केले आहेत. ते अद्याप उज्जनीस आहेत. दो चौं दिवसां तेथून सरंजामी करून निघून दरमजल लष्करांत पाटीलबावांकडेस जातील. त्यांचे खासगीचे बोलण्याचे अन्वय ऐकिल्यांत आले, ते पेशजीं विनंतिपत्रीं सेवेसी लिहिलेच आहेत. राजश्री पाटीलबावा ते प्रांतींच कोणी गढीस लागले आहेत. सुजाउद्दवल्याचा फरजंद मिरजा आमानी

यानें, आपले आजी व आईपासून दीड क्रोडो रुपये नक्त व पन्नास लाखांचें जवाहीर पेशजीं घेऊन, नक्ती ऐवज इंग्रजांस दिला; व जवाहीर आपल्याजवळ ठेविलें; व दोघी बायकांचे कारभारी होते त्यांस फार श्रमी करीत होता. त्याजमुळें त्या दोघींजवळ दोघे चेले जंगली व मंगली बहुत दिवसांचे होते. त्यांस त्यांणीं सांगोन, तमाम शागीर्दपेशा व फौज फोडून, मिरजा आमानीस कैद करावें अशी मसलत केली. तें वर्तमान त्यास कळलें. त्यामुळें दोन तीन हजार फौजेनिशीं मिरजा आमानी निघून अंतरवेदींत आला आहे. ह्मणून वर्तमान ऐकिलें. त्याचेही वकील पाटीलबावांकडे गेले आहेत. दिल्लीकडे तों धामधूम शिखांची आहे. तेथेंही फौजेचा बखेडाच आहे. येथून माधवरायाबरोबर राजश्री बाजी विठ्ठल जात होते. ते बाईनीं मना केले. ते देशास गेले. वर्तमान ऐकिल्यांत आले जे, आबाजी नाईक वानवळे यांचीं पत्रें पुण्यास सरकारांत घेतलीं आहेत कीं, बाईच्या मनोदयानुरूप सरकारांतून कार्य घडून आल्यास, खर्चवेच काय पडेल त्याची निशा आपण करूं. अशीं नाइकांचीं पत्रें घेऊन, बाजी विठ्ठल तिकडेस आले आहेत. हें वर्तमान बाजारी ऐकिलें. सत्य मिथ्या देव जाणे. बाजीपंत त्यास बोलवायास गेले होते. ते तिकडून परभारां मर्दान्याच्या घांटे रेवा उतरून देशास गेले. तिकडे जातांना बाईची भेट जाली नाहीं. दिल्लीकडील वर्तमान येथें आलें कीं, शिखांची धामधूम तिकडे आहेच. पादशाही फौजेस सरदार पहिल नजीबखान होता. आतां नजीबखानाचे चेले आफराशा व आमदानी हे दोघे फौजेचे सरदार जाले आहेत. त्यास आफराशा फौजेसुद्धां शिखांच्यावर आहे, व पंधरा वीस हजार फौज घेऊन आमदानी चमेल नदीवर... जाठाच्या पारिपत्यास आला आहे. जाठांची पंचवीस तीस हजार फौज होती. त्याशी व आमदानीशी लढाई जाली. जाठांचा पराभव जाला. आमदानी फौजेसुद्धां.....आहे. राजश्री पाटीलबावाच्या लष्करापासून दहा पंधरा कोसांवर आहेत. गोहजवाले जाठांनें सार्वभौमास लिहून पाठविलें होतें जें, ग्वालेर हा पादशाही किला इंग्रजांचे स्वाधीन जाला होता, तो हरयुक्तीनें त्यांजपासून सोडविला. आपले स्वाधीन आहे. मी जमीदार, पादशाही किला मजला कशास पाहिजे? त्या किल्ल्यामुळें पाटीलबावांनी आमचा मुलूख व गढ्या घेतल्या आहेत. खराबी मुलखाची करितात. यास्तव किला सरकारांत ठेवणें असेल तर ठेवावा. किंवा, मराठ्यांस देणें असला तर त्यांचे स्वाधीन करावा. असें गोहजवाल्यानें पादशाहांस लिहिलें होतें. पादशाहांनीं आमदानीस सांगितलें आहे कीं, पाटीलबावांस सांगा कीं, गोहजवाले जाठांच्या मुलखाची खराबी करूं नका. किल्ल्याचा जाबसाल आह्मांकडे आहे. आह्मी

देऊं. हे जाबसाल आमदानीनें पाटीलबावांकडे कागदपत्र पाठविले आहेत. गढ्यांचे मोर्चे मना केले व पादशाहांनीं स्नेहभावें पाटीलबावांस दिल्लीस बोलाविलें आहे. याप्रमाणें बाईस वर्तमान सांगितलें, तें ऐकिलें सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

हैदरखानाचा वकील रा० नरसिंगराव तमाजी राजश्री पाटीलबावांकडेस पुण्याहून रवाना जाले. ते रेवा उतरावयास परभारें मर्दान्याच्या घांटावर गेले. येथून सात कोस मशारनिल्हेनीं पत्र व सरकारचें पत्र बाईस जासुदाबरोबर येथें पाठवून दिलीं. तीं पत्रें बाईस देऊन, त्यांचे वाटेचा, उज्जनीपावतर पांच राऊत व दहा माणसें हत्यारबंद व वाटेचे दस्तक बाईनीं देऊन, बंदोबस्त करून दिला. ते गृहस्थ पौर्णिमेचें ग्रहण रेवातीरीं करून (फाटलें आहे.) जाणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ७५. ता. २७ आक्टोबर इ. स. १७८२.
श्रीगजानन. मि० आश्विन वा॥ ६ शके १७०४.

विज्ञापना. हरकुबाईचे गांव राजश्री तुकोजी होळकराकडे आहेत. सरकारांतून सोडले, असें असतां या बाईस प्राप्त होत नाहींत. पाहतां इजकडे अपराधही काहीं नाही. फार वेळां विनंति लिहिली. सोडविणार धनी कृपाळू समर्थ. स्वामी आज्ञापितील की, तुह्मांस इतकी अगत्य काय? त्यास, आपले उपयोगी आहे ह्मणूनच लिहितों. कितीक अर्थ यांत आहेत. बाह्य लिहितां येत नाहींत. आणि फार दिवस या बाईस वचन दिलें आहे की, श्रीमंतांस विनंति करून तुमचे गांव सोडवीन. तें चाकराचें वचन निभावणार धनी कृपाळू समर्थ. हरकुबाईचे बारा लक्ष रुपये मणिरामानें घेऊन तिकडे निघून गेला आहे. तो देत नाही. या बाईचें बोलणें आहे की, चौथाई श्रीमंतानीं घ्यावी. बाकीचा ऐवज माझा मजला देवावा. त्यांतूनही लाख रुपये श्रीमंतांच्या लग्नोत्साहास देईन. दुसरे, मणिरामाकडे सरकारचे कज्जेही उदंड आहेत. सुमेरसिंगाची ठेवरेव जवाहीर वगैरे पुष्कळ आहे. आपल्यास ठाऊक आहे. असेंही बाई ह्मणती. पेशजींही विनंति लिहिली होती. आज मणिराम घरचा पुरा आहे. सरकारचे कज्जे त्याजकडे लागू असतां स्वामी उपेक्षा कां करितात, न कळे. येथे हरकूबाईवर लाखोंचें देणें व पोटासही नाहीं, अशा संकटांत आहे. वारंवार ह्मणती जे, तुह्मी श्रीमंतांस लिहितां कीं नाहीं? कांहीं सरकारउपयोगीही आहे, ह्मणून वारंवार विनंति लिहितों. ये विषयींची काय मर्जी, ते आज्ञापिणार धनी समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ७६. ता० २३ डिसेंबर इ.स. १७८२.
श्रीगजानन. मि० मार्गशीर्ष व॥ ४ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १७ मोहरमपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्र लिहून काशीदजोडीबरोबर व डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रत येथें बाईनीं महालोमहालचे हिशेब पाहून मामलती विल्हे लाविल्या. स्नान देवार्चन करून आहेत. भिलांच्या पारपत्यास तीन चार पागा पाठविल्या होत्या. कांहीं भिल्ल धरले; कांहीं चोपले. सेंदव्याचा घांट सुरळीत चालविला आहे. परंतु भिलांनीं जागा जागा डोंगरांत जमाव करून आहेत. पागा तेथून उठल्या ह्मणजे फिरून भिल्ल गडबड करितील. इकडे टोंक रामपुऱ्याकडे चंद्रावतांनीं धामधूम केली आहे. त्यामुळें इकडील पागा बोलावून तिकडे पाठविणार आहेत. राजश्री केसो भिकाजी दातार यांणीं येथून पत्रें पाठविलीं आहेत. त्या पत्रांचे उत्तराची मार्गप्रतीक्षा फार करितात. बाईनींही एक दोन वेळ विचारिलें जे, केसोपंतांनीं सरकारांत पत्रें लिहिलीं; त्यांचीं उत्तरें कांहीं आलीं की नाहीं? अद्याप आलीं नाहींत ह्मणून उत्तर केलें. राजश्री पाटीलबावांकडील पेशजीं कागदपत्र आले होते. त्यावर अद्याप काहीं पत्रे, वर्तमान कांहीं येत नाहीं. वदता ऐकिल्यांत आली जे, गोहज व भिडभदावरच्या मध्यें आहेत. चैत्रमासी तिकडील बंदोबस्त करून इकडेस येणार. असें बाजारी वर्तमान आहे. आपल्या कडील वर्तमान, श्रीमंतांच्या लग्नाची सिद्धता निश्चय जाला आहे. माघफाल्गुनांत विवाह होणार. असें वर्तमान औरंगाबादेहून केसो भिकाजीचीं पत्रें आलीं, त्यांनीं बाईजवळ सांगितलें. हें लग्नाचें वर्तमान ऐकून बाई बहुत संतोषास पावली. अलीकडे पुण्याकडील वर्तमान कांहीं कळत नाही. बाई येथें पुसत असतात. सांप्रत चहूंकडील वर्तमान स्तब्ध जालीं आहेत. देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्ति आहे. कर्ज येथं सहाशें रुपये जालें आहे. तो उपद्रव व नित्यकृत्य चालायाचें संकट जालें आहे. तेथे धन्यास या उत्साहाचे गडबडींत कोण स्मरण देतो? चौ वर्षांचे माझे आंखही राहिले आहेत. आप्तागिरांचें सामान राहिलें आहे. स्मरणार्थ विनंति खर्चाची, व देणेंदारांनीं फार विपत्तींत घातलें आहे. स्वामी कृपाळू समर्थ. सेवकाविषयीं तेथें कोणी विनंति करायास नाहीं. धनीच कृपा करून स्मरण करून खर्चास पाठवितील तर होईल हे विज्ञप्ति. गबा भटजीजवळ कांहीं उसनवारी ऐवज मागितला की, आमची वरात कोणीकडे तरी श्रीमंत पाठवितील; तुमचा ऐवज तुह्मांस देऊं. त्यांनीं साफ

उत्तर केलें जे, आह्मांजवळ कांहीं ऐवज नाहीं, आणि प्रस्तुत सरकारचेंही आह्मी कांहीं लागत नाही. सारा ऐवज आह्मी पुण्यांत भरून चुकलों. याप्रमाणें उत्तर केलें. सेवेसी श्रुत होय. सरकारचे तालुकदार, एखादे समयास उसनें पासनें मागावें लागतें. या परदेशांत सरकारचे तालुकदार हरएक गोष्ट तोडून सांगूं लागले, मग या परदेशांत आमचें कोण आहे? सरकारांतून चार दिवस अधिक उणे लागतच आहेत; नी येथें तालुकेदारास ह्मटलें तर असे ह्मणतात. हे अवस्था आहे! धणी कृपाळू समर्थ हे विज्ञप्ति.''

लेखांक ७७. ता० २८ दिसेंबर इ. स.१७८२.

श्रीगजानन. मि० मार्गशीर्ष व॥ ९ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २२ मोहरमपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रे रवाना केलीं आहेत. राजश्री केसो भिकाजी यांचीं पत्रें औरंगाबादेहून साहुकारी आलीं. त्यांत लिहिले होते जे, श्रीमंतांचें लग्न माघ शुद्धांत अगर वद्यांत होणार. सरंजामी होत आहे, कारखाने चाळीस लागले आहेत, व वधू एक कृष्णाजी भैरव यांची नात पाहून ठेविलीच आहे. आणीकही ब्राह्मण व वाकनीस जागा जागा वधू विचारण्यास गेले आहेत. हें वर्तमान येथे बाईच्या कानावर त्यांनीं घातलें. ऐकून संतोष पावली. बाईनीं केसोपंतांस व मजलाही सांगितलें जे, श्रीमंतांचें लग्न कोणत्या महिन्यांत होणार? वधूचा निश्चय कोठील? कोणाची नेमस्त केली? असे सिद्धांत वर्तमान लवकर आणवा. दोन तीन वेळां सागितलें. त्यावरून सेवेसी विनंति लिहिली आहे. जसें आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें येथें विनंति केली जाईल. लवकर वर्तमान यावें ह्मणून बाईनी सांगितलें आहे. तेथून आज्ञापत्र येणें धन्याची मर्जी. राजकी वर्तमानें तर प्रस्तुत चोहोंकडील वर्तमानें स्तब्ध जालीं आहेत. परंतु काल छ २० मिनहूस राजश्री दादाजी गंगाधर यांचीं पत्रें पुण्याहून बाईकडे आलीं. पत्रें पाहून प्रहर रात्रीपर्यंत एक दोघे मुत्सद्दी व बाई बसून खलबत जालें. तदोत्तर दुसरें दिवशीं राजश्री पाटीलबावांकडेस बाईचीं पत्रें गेलीं, असें वर्तमान ऐकिलें. दुसरें, राजश्री नारो गणेश यांची बहीण येथें आलीं आहेत. त्यांजबरोबर कांहीं एकांतसूत्र बाईकडे नारोपंताचें आलें आहे ह्मणून ऐकिलें. परंतु ती बाई येथें आली आहे. ती मुकुदरायाची आई. त्यांस बरें वाटत नाहीं. अद्याप बाई

बाईचें बोलणें जालें नाहीं. होणार. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें. छ २० रोजीं एक ब्राह्मण द्रविड होता. त्यास काय आवेश आला हा नकळे; मागील प्रहर दिवस राहतां त्याच्या भावाशीं आपसामध्यें कज्या जाला. धाकटा, वीस वर्षांची उमर होता. त्यानें तरवार मेण्यांतून काढून भावास एक वार केला, आणि बाहेर निघून हातीं नागवी तलवार घेऊन, उभ्या बाजागनें उन्मत्त होऊन चालला. वाटेंत चारपांच माणसें घायाळ केलीं. बाजारच्या दरवाज्याजवळ चौकीचीं दहावीस माणसें होतीं, त्यांजवर चालून आला. ते घरावयास धांवले. येथें बाईची कैद आहे की, ब्राह्मणास कोणीं मारूं नये. त्यास जो प्यादा पुढें धरायास गेला, तो प्यादा त्या ब्राह्मणानें दोन वार मारून ठार केला. त्यावर दहापंधरा माणसें धांवलीं. तशांतही एका माणसास वार केला. आटोपेना. मग दोघां चौघांनीं तो ब्राह्मण ठार मारला. वर्तमान बाईस कळलें. रागेंही भरली. कोणीं समजाविलें जे, हे तैलंग कोणे मतें येथें आहेत. कोण वेळेस काय करतील हें नकळे. यास्तव छत्र बंद केलें. तैलग जितके व द्रविड जितके आहेत, ते सारे येथून काढून देणें ह्मणून बाईनीं सांगितलें आहे. शंभर दीडशें तैलंग कुटुंबांसुद्धां आहेत. तीन साडेतीनशें सडे आहेत. कुटुंबांसुद्धां आहेत त्यांस असूं द्यावें. व बाकीच्यांस काढून द्यावे असें सांगितलें. वाड्यांतही पुराणाजवळ शें दीडशें ब्राह्मण येत होते, तेही मना केले. आश्रित देशस्थ व काशीकर व कोकणस्थ तीस चाळीस इतके वाड्यांत घेतले. बाकीच्यांस मना केलें. असें दिनचर्येचें वर्तमान. श्रीमंतांचें लग्नाचें वर्तमान लवकर यावे. यास कारण कीं, तथ्य वर्तमान कळलें ह्मणजे वस्त्रें पाठावयाची तरतूद करून, कोणी कारकून पाठवावा हा भाव. राजश्री विनायक बाजी काल छ २१ रोजी संध्याकाळीं येथे आले. रात्रींच बाईचे भेटीस गेले. बाई व गोविंद रघुनाथ व विनायक बाजी सहा घटकांपर्यंत एकांतीं बसून वर्तमान तेथील सारें विचारिलें. तदोत्तर हे आपल्या घरास आले. दिल्लीकडील वर्तमान येथें आलें की, नजीबखानाचे चेल्यांनी दिल्लींत बैदा केला आहे. आपसांत भांडतात. संब इंग्रजाचा लेक पातशाहाकडून मध्यें बोलायास गेला होता. त्यास त्यांनीं पिस्तुलाचे गोळीनें मारून टाकिला. पातशाहासही मारून टाकावें अशा योजनेंत होते. तें वर्तमान पातशाहास कळून आपल्या महालांत बंदोबस्तानें आहेत. पाटीलबावा गोहजच्या व भिडेच्या मध्यें आहेत. गोहजवाला ग्वाल्हेर देणार असें बाजारी वर्तमान. ऐकिलें देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. धनी कृपाळ समर्थ. वारंवार लिहितों ह्मणून रागें न भरावें हे वि ति. ''

नवीन वर्तमानः–राजश्री पाटीलबावांचें पत्र बाईस आलें आहे. त्यांत मजकूर जे, पेशजीं दोन तीन पत्रें गृहकृत्याच्या हर्शामर्शाचे अन्वयें लिहिलीं होतीं. त्या अर्थीं कितीएक बारीक मोठें बोलणें आहे. यास्तव राजश्री माधवराव गंगाधर यास पाटीलबावांनीं बोलाविलें आहे. बाईस लिहिलें आहे कीं त्यांस येथें पाठवून देणें. कितीक बोलणें आहे तें त्यांसीं बोलूं. यास्तव मशारनिल्हेची रवानगी तिकडे होणार आसेरच्या किल्ल्यावर काल निशाण चढणार होतें. शिंद्याकडील कारकून किल्ल्यावर जाऊन सारी मोजदात केली. किल्लेदारांचे कबिले उतरले. तेही काल रात्रीं उतरणार होते ह्मणून येथें वर्तमान आलें. तें जाल्यावर राजश्री नारो शिवदेव येथें येतील. त्यांजबरोबर माधवरावजींची रवानगी बाई करणार, असें ऐकिण्यांत आलें आहे. सौभाग्यवती उदाबाई वाघमारी–सुभेदाराची कन्या–त्यांस फार बरें वाटत नाहीं, ह्मणून येथें वर्तमान आलें. ती बाई वाफगांवीं राजश्री तुकोजी होळकर घेऊन गेले आहेत. त्यास त्यांच्या समाचारास बाईनीं येथून आपला खासा खिजमतगार खंडू मंडलीक पाठविला आहे येथील लक्ष पाहतां सरकारआज्ञेव्यतिरिक्त अधिक उणें पाऊल टाकायाचें नाहीं. वर्तणूक फार एकनिष्ठतेची आहे. ये प्रांतीं पर्जन्य अद्याप नाहीं. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

इ. स. १७८३.

[ह्या वर्षाचीं बरींच पत्रे उपलब्ध झालीं आहेत. ह्या पत्रांमध्यें सवाई माधवराव पेशव्यांच्या लग्नासबधाची पत्रे फार मनोरजक आहेत. अहल्याबाईची स्वामिनिष्ठा त्यांत उत्कृष्ट रीतीने प्रतिबिंबित झाली आहे. ह्या वर्षाच्या इतर राजकारणांच्या बातम्याही त्यांत आल्या आहेत. त्याही महत्वाच्या आहेत.]

लेखांक ७८. ता० २१ जानेवारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. पौष वद्य ३ शके १७०४.

"श्रियाविराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीः—

सेवक विठ्ठल शामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत छ १७ सफरपर्यंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– आपण कृपा करून श्रीमंतांचें व आपलें पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बहुत संतोष पावलों. इकडील वर्तमानें सांप्रत बंद आहेत. राजश्री पाटीलबावांचे कबिले लष्करांत त्यांनीं बोलाविले आहेत. संक्रांत जालियावर जाणार. येथें तों बाई स्नान देवपूजा करून स्वस्थ आहेत. खर्चावांचून फार हैराण आहे. तात्या येथें सातशें रुपये देणें जालें आहें. तीन वर्षें येथें एक कवडीची प्राप्ति नाहीं. घरीं

मुलें मनुष्यें श्रमांत ! चिरंजिवाची कोठें सोय नाहीं. असे चहूंकडून श्रम आहेत. सांप्रत श्रीमंतांच्या लग्नाची गडबड, तेथें आह्मांसारखे गरिबाचें स्मरण कोण करितो? येथें तो देणेंदाराचे व नित्यकृत्य चालण्याचे फार श्रम आहेत. बरें आपण धर्ममूर्ति आहेत. कृपा करून श्रीमंतांस विनंति करून येथील कर्जापासून मुक्तता होय तें करावें. चिरंजीव पुण्यास येईल. त्याची कोठें सोय जाली तर करून द्यावी. हरघडी कृपापत्रीं संतोषवीत असावें. हे विज्ञप्ति.

श्रीमंतांस आलाहिदा एकांतीचें वर्तमानपत्र लिहून आपल्या लखोट्यांत घातलें आहे. हें एकांतींच श्रीमंतांस निवेदन करून, फिरून पत्र आपल्या जवळ घ्यावें. उत्तरही यावें. हें वर्तमान कोणास कळवूं नये. कळावें. खर्चाची व देणेदाराची तसदी फार आहे. सेवेसी श्रुत होय. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसी पाठविले आहेत. स्वीकार करून उत्तर पाठवावें. हे विनंति. श्रीमंतांचें पत्र आपल्या पत्रांत घातलें आहे. त्यांत विशेष तों कांहीं नाहीं. परंतु तेथें येथील गृहस्थ कोणी आहेत. त्यांस इतकें कळल्यास अनेक प्रकारें येथें लिहितील. त्यांच्याच कृपेंकरून येथें आह्मी बाईचे इतराजींत आहों. देखिले ऐकिलें वर्तमान तों धन्यास लिहिले पाहिजे. या अर्थीं प्रसिद्धता न होय. मजविषयीं येथील प्रकार केवळ कनिष्ठ आहे. तेथें धण्यास काय कळे? परंतु आपल्या सांगितल्यानें श्रीमंतांस समजेल. मुख्य गोष्ट आपले कृपेनें आह्मांसारखे गरिबांचा उद्धार होईल. देण्याची व खायाची निकड येथें फार आहे. येयें एक कवडीची प्राप्ति नाहीं. खर्च तो केला पाहिजे. कृपा करावी हे विज्ञप्ति."

लेखांक ७९. ता. (?) जानेबारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि० (?) पौष शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना राजश्री पाटीलबावांचे कबिले पेडगांवीं होते, ते पाटीलबावांकडेस जातात. काल येथून चौ कोसांवर रेवा उतरून राहिले. बाईनीं भेटायास बोलाविलीं आहेत. येतील कीं परभारी जातील, न कळे. बहुतकरून येतीलसे दिसतें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील वर्तमान बराणपुरचा साहुकार त्याचा आडतिया मनसाराम येथें आहे. त्याचे येथें एक ब्राह्मण गुजराथी सोळा दिवसांचा आला. त्यानें वर्तमान येथें सांगितलें जे, दादासाहेब फुलपाड्यावरच आहेत. पाटीलबावांकडील कारकून तेथें गेला आहे. कांहीं बोलणेचालणें होत आहे. सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाईचें मानस फार आहे कीं, निघून पाटीलबावांकडेस यावें. दादासाहेबांचें बोलणें आहे

कीं, पहिलें पाटीलबावांकडे गेला, तें काय जालें? आतां जाऊन काय होणें? अशी कांहीं रदबदली लागली आहे. ह्मणून तो गुजराथी ब्राह्मण सांगत होता. तेथें कितीक प्रकारें बोलणार बोलतात जे, पाटीलबावांनीं आपले कबिले तिकडे नेले. दूर यमुनेपरियंत मुलूख सर करितात. तेव्हां इकडे त्यांचें येणें कळतच आहे. तत्रापि दादासाहेबही पाटीलबावांकडेस जाणार. त्यापैकी दादासाहेबांस पाटीलबावांनीं अकृत्रिम पुण्यास पाठविलें ह्मणजे कांहीं कृत्रिम नाहीं. न पाठविलें तर, आनंदीबाई पाटीलबावा मिळालीं तर एखादें खूळ होईल. असेंही कितीक प्रकारचें बोलतात. ऐकिलें वर्तमान आहे. आपाजी गित्या छ ४ मिनहूस मेला. बाई फार श्रमी जाली. त्याच्या जांवयास पागा बाई देणार अशी बोलवा आहे. राजश्री केसो भिकाजींनीं पत्राचें उत्तर मागितलें. तें बाईनीं दिलें. तें सेवेसी पाठविले आहे. मशारनिलेनींही सेवेसी विनंतिपत्रें लिहिलीं आहेत. त्यांवरूनही सविस्तर विदित होईल. सेवकासही जें दृष्टीस पडलें व ऐकिलें, व समक्ष जितकें अंतरबाह्य बोलणें जालें, तें सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना."

लेखांक ८०. ता. २१ जानेवारी इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. पौष वद्य ३ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ सफरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमानः-पेशजी ब्राह्मण येथें मेला ह्मणून अन्नछत्र बंद जालें होतें. दहा बारा दिवस ब्राह्मणांची आबळ फार होऊं लागली. तदोत्तर चौघे शिष्टांनीं बाईस सांगून मार्गशीर्ष कृष्ण अमावास्येस छत्र चालू केलें. वरकड नवल विशेष अधिकोत्तर वर्तमान कांहीं नाहीं. स्वस्थ देव देव करून बसलीं आहेत. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान चवदा दिवसांचीं पत्रें आलीं. त्यांत वर्तमान जेः-गोहज व भिंडाच्या मध्यें पाटीलबावा आहेत. तमाम गोहजवाल्याचा मुलूख घेऊन चोहोंकडून रस्त बंद केली. त्यामुळे जेर होऊन गोहजवाला राणा ग्वालेहरचा किला खालीं करून देतों ह्मणून पैगाम आला आहे. त्या राजाचें बोलणें आहे कीं आपला मुलूख तमाम सोडावा नी गोहज द्यावी. पाटीलबावा ह्मणतात जे, खर्च पडला तो द्यावा नी मुलूख घ्यावा. अशी रदबदली पडली आहे. दतियावाल्यांनीं गुदस्ता पाटीलबावांशीं बेइमानी केली आहे. त्यांसही विसर पाडून

अचानक जख द्यावी. यामुळें जैपुराकडेस जावयाची आवाई घातली आहे, व उज्जनीहून कबिलेही पाटीलबावांनीं आपले आणविले आहेत. उज्जनींतून मुहूर्तें-कडून डेरेबाहेर जाले आहेत. रविसंक्रमण जाल्यावर बाया स्वार होऊन पाटीलबावा-कडे जाणार. दिल्लीकडीलही येथें वर्तमान आले जे, नजीबखानाचे चेले आफराशा व आमदानी वगैरे यांनीं फौज जमा करून, पातशाहावर चालून गेले. शाहानींही किल्ल्याचा बंदोबस्त करून, पातशाही फौजा बोलावून तयारी लढाईची केली. बाहेरल्याच्या चित्तांत कीं पातशाहास ठिकाणीं लावून, नवा पातशाहा आपल्या हुकुमात राहे असा बसवावा. त्यास, ह्या चौघांनीं बसून विचार केला जे, पातशाहा हा ईश्वराचे अंश. यास मारल्याने पुढें आपले बरें नाहीं. गाजुदीखान वगैरे यांचे दाखले सांगणारांनी सांगितले जे, त्यांनीं पातशाहास जख देऊन काय सरफराज जाले? आपण असें करू नये. पातशाहानें काय करणें आहे? आपली चौकी शाहाभोवती किल्ल्यांत बसवावी, नी बाहेरील बदोबस्त जी करणे तो आपला आपण करावा. अशी ससलत करून पातशाहास सागून पाठविले. त्याचे कारभारी बोलाविले. चौघेजण मातबर त्यांत संबरू फिरगी याचा लेक आला. वरकडासीं जाबसाली बोलणें बोललें. त्या फिरंग्यास पसतोलानें मारून टाकिलें. वरकड बंदोबस्त किल्ल्यांत केला. आफराशा पातशाहाजवळ ठेवून वरकडानीं बाहेर बदोबस्त केला. पातशाहा व कित्येक राजेरजवाडे दक्षिणी फौजेची मार्गप्रतीक्षा फार करितात. या समयास सरकारची फौज आल्यानें मुलूख पेशजीप्रमाणें सुटेल. साप्रत गिलच्यांचा दगा दिल्लीभोवतीं काही नाहीं. याप्रमाणे वर्तमान आले आहे. पाटीलबावाचे कबिले गेले. राजेश्री केसो भिकाजी यानीं पत्रे सेवेसीं लिहिलीं आहेत. त्यावरून सविस्तर विदित होईल. पाटीलबावांनीं आसेरचा (?) किला घेतला ह्मणून वर्तमान आहे. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. धनी कृपाळू समर्थ हे विज्ञप्ति.

रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसी पाठविले आहेत हे विनति."

लेखांक ८१. ता. २३ जानेवारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. पौष वद्य ५ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ सफरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींनीं श्रीमंतांच्या लग्नाची लग्नचिठ्ठी अहल्याबाईस कासीदजोडीबराबर पाठविली. ती चंद्र १६ सफरीं रात्रौ येथें दाखल जाली. दुसरे दिवशीं दों प्रहरां मीं नेऊन दिल्ही. बहुत संतोष पावली.

वस्त्रें आणवावयास ते समयींच सांडणीस्वार बऱ्हाणपुरास रवाना केले. मी उठून आल्यावर, राजश्री विसाजी शामराज लांबहाते त्यांस बाईनीं बोलाविलें. त्यांसही सांगितलें जें, श्रीमंतांची लग्नचिठ्ठी आली आहे. त्यांस आहेर पाठवणें. तर आपण निराळा पाठवावा, किंवा तुकोजीजवळ पाठवावा? यांनीं उत्तर केलें जे, मुख्यत्वेंकरून राजश्री तुकोजीबावांकडेसच पाठवावा, हें अतिउत्तम आहे. सांप्रत दोन फळ्या जाल्या आहेत. त्या पक्षीं शहाणा कारकून आहेर देऊन पाठवावा. तुकोजीबावा तेथें मूळ वराडी आहेतच. या कारकुनानें जाऊन निराळी श्रीमंतांची भेट घेऊन राहावें. आहेर करतेसमयीं कारकुनानें आहेर नेऊन तुकोजीबावांपुढें ठेवावा. त्यांच्या हातें श्रीमंतांस आहेर करावा. हाही एक पक्ष आहे. बाई बोलली जे, माझेही चित्तांत असेंच आहे. नाहींतर सांडणी स्वारांबरोबर दादाजी गंगाधर यांजकडे पाठवावा. त्यांस लिहावें कीं, तुकोजीबावांच्या हातें आहेर करावा, असें मशारनिल्हे बोलले. बाईनीं ऐकून उगीच राहिली. तदोत्तर बाईनीं विचारलें जे, श्रीमंतांस आहेर काय काय पाठवावा? यांनीं उत्तर केलें जे, बादली वस्त्रें व कंठी, शिरपेंच, मोत्यांचा तुरा हे दागिने आपल्या स्वरूपानुरूप पाठवावे. घोडें एकादें चांगलें, श्रीमंतांस बसायायोग्य, पाठवावें. बाई म्हणाली जे, घोडें चांगलें नामी नाहीं. हरकूबाई व विसाजीपंत बोलले जे, वस्त्रांस व जवाहिरास श्रीमंतांस काय कमी आहे? परंतु घोडें चांगलें पाठविल्यास, जेव्हां बसतील तेव्हां स्मरण श्रीमंतांस आपलें होईल. इतकें बोलणें जालें. तदोत्तर राजश्री केसो भिकाजी यांस व बाईस खासदस्तुर स्वामीनीं ममतापुरस्कर पत्रें लिहिलीं होतीं, तींही डांकेबरोबर चंद्र १७ हिनहूस संध्याकाळीं येथें आलीं. मी लखोटा पंतमशारनिल्हेकडे घेऊन गेलों. तो लखोटा फोडून वाचला. मशारनिल्हेचे नांवाचें एक पत्र व खासदस्तुर बाईच्या नांवाचें अशीं दोन्हीं पाहून, चौ घटका रात्रीं केसोपंत व मी उभयतां बाईकडे गेलों. बाईजवळ गोविंदपंत गानू व मुकुंदराव हरी व बाळाजी फडणीस ऐसे बसले होते. कांहीं हिशोब पाहत होते. केसोपतांनीं दोन्ही पत्रे बाईपुढें ठेविलीं. फडणीसांनीं वाचून दाखविलीं. ऐकून बहुत समाधान पावली. सर्वत्रांनीं आपला स्तव फार केला. "श्रीमंतांच्या पायाशीं एकनिष्ठ कायममिजाज असा दुसरे कोणाचा पाहिल्यांत आला नाहीं. शाबास याच ब्राह्मणांची. गेलें राज्य संभाळलें. त्यांच्या एकनिष्ठप्रमार्जनीं कैलासवासी श्रीमंत नानासाहेबांनीं दानधर्म, ईश्वरआराधना जी केली, ती ये समयीं कामास आली जे, जगताचा स्वामी कुलदीपक ईश्वरें लावला. नानांच्या एकनिष्ठतेस त्रैलोकी उपमा नाहीं. उभयतांही कारभारी चांगले." श्रीमंत दादासाहेबांच्याही गोष्टी काढल्या

होत्या. बाई आपलेंही तापत्रय बोलली जे, "कैलासवासी सुभेदार होते, त्यांनीं एकनिष्ठतेनें श्रीमंतांची चाकरी करून उत्तम परिणाम करून गेले. अलीकडे आमच्या कपाळास हे ढगढग आली. एक झाड वंशीं असतें तर इतकी फजिती कशास होती? आमचें दैव!" श्रमी जाली. तदोत्तर केसो पंतांनीं उभें राहून, बाईस विनंति केली जे, "श्रीमंतांनीं ममतापुरस्कर लिहिलें आहे. हा उत्साह, देवांब्राह्मणांचा आशीर्वाद व श्रीमंतांचे पदरीं तुह्मांसारखीं मनुष्यें दानधर्म तपश्चर्या करितां, या योगेंकडून हा शुभ दिवस प्राप्त जाला आहे. सांप्रत तुह्मी वडील. या प्रसंगीं आपण अगत्यरूप चलावें." बाईही बोलली जे, आह्मांसही या संतोषापेक्षां दुसरें काय आहे? परंतु पूर्वसूचना नाहीं व लग्नतीथ फार समीप आली. इतकें बोलणें जालें. रात्र फार जाली. आह्मीही आपल्या स्थळास आलों. दुसरे दिवशीं पुराणसमयीं उभयतांही गेलों. दों प्रहरां पुराणसमाप्ति जालीयावर एक दोघे मुत्सद्दी होते. ते समयीं फिरून बाईस विनंति केली की, आपण लग्नास चलावे. त्यास बाईनीं उत्तर केलें जे, "लक्ष प्रकारें आह्मीं जावें, परंतु पूर्वसूचना असती तर दहा पांच हजार फौज आह्मीं जमा केली असती. सरजाम केला असता. जाणे विहित होतें. आतां तीथ समीप आली. ये वेळेस फौज कशी कोठून जमा करावी? एकलें पांच सातशें लोकांनिशीं गेल्यानें वडिलांच्या स्वरूपास योग्य की काय, हें तुह्मीच सांगा." यांनीही उत्तर केलें जे, "आपण चाललयास दहा पांच हजार फौज समागमें असावी, तरच आपलें जाणें युक्त. परंतु आपला निश्चय चलावयाचा असल्यास मी श्रीमंतांस पत्र लिहितो. पुढे दो चौ दिवसांच्या अंतरानें तिथिनिश्चय करवितों." बाई बोलली जे, "इतकें कांहीं करूं नये. शुभकार्य होतें तें होऊं द्यावे. तोच आह्मांस उत्साह आहे. तेथे तुकोजीबावाही आहेत, तेथें आह्मीच आहों. नवी फौज जमा करावयास महिना दीड महिना पाहिजे. सांप्रत जें होत आहे तें फार उत्तम आहे." असें बोलून भोजनास उठली. यांनी विनंति केली जे, फिरून मी रात्री येईन. बाई बोलली जे, "वारवार तेंच काय बोलणें बोलावयाचें आहे?" संध्याकाळींही प्रहर रात्रीं गणेशचतुर्थीचीं भोजनें होऊन खबर आणविली. तो बाई निजली. तदोत्तर दुसरे दिवशीं दों प्रहरां गेलों. तेव्हांही बाईस लग्नास चलावयाची विनंति केली. बाई बोलली जे, "मी एकदां बोललें तें बोलले. वारवार काय बोलावे?" केसोपंत बोलले जे, आणीकही दोन चार दिवस रात्रंदिवस विनंति करावयास दिवस आहेत. श्रीमंतांची आज्ञाही आह्मांस अशीच आहे. आतां रात्रीं येऊं. ह्मणून उठून आलों. येथील मर्जी पाहतां, पहिलें एक त्यांनीं उत्तर केलें, तेंच शेवटवर बोलतील. वारंवार तोच जाबसाल केल्यानें आपली मात्र ग्लानता! त्यांचें उत्तर

तेंच. यांचें मानस बोलल्यांत कळतें, तर पूर्वसूचना विनंतिपत्रीं लिहिली असती. असो. शेवटला जाबसाल काय होईल तो पहावा. कासीदजोडीबरोबर मशारनिल्हेचीं व सेवकाचीं विनंतिपत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावतील हे विनंति विज्ञापना. बाईस लग्नपत्र आलें. त्याबरोबर सेवकासही लग्नास येणे ह्मणून आज्ञापत्र आलें. त्यास बाईचें तों राहणे जालें. मीच उठून आलों, तर स्वामी रागें भरतील कीं काय ह्मणून संदेह प्राप्त जाला. राजश्री केसोपंतही ह्मणाले जे, सर्वां लग्नपत्रें गेलीं, तसें तुह्मांसही आलें. एकदां श्रीमंतांस लिहून पाठवावें. जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करावी. मी निघून येतच होतों. परतु स्वामी रागें भरतील की काय ह्मणून सेवेसीं विनंति. जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन. येथें पांच सहाशें रुपये लोकांचें देणेंही जालें आहे. यास काय उपाय करूं? धन्याव्यतिरिक्त येथें कोणी त्राता नाही. स्वामी कृपाळू समर्थ. डाकेबरोबर जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन. अहल्याबाई शिवरात्रीस श्रीओंकारेश्वराच्या यात्रेस जाणार आहेत. तेथें ध्वजोत्सव करणार. तेथून उज्जनीस श्रीमहाकाळाच्या दर्शनास जावें अशी वदंता आहे. परंतु जरूर जातील. पहिले ऐवजाविषयीं सरकारचीं पत्रें केसोपंतांकडेस आलीं. बाईचें पत्र बाईस दिलें. यांनीही जाबसाल करणें ते केले. बाईचीं उत्तरें काय जालीं तीं मशारनिल्हेंनी सेवेसी विनंति लिहिलीं आहेत. त्यावरून सविस्तर विदित होईल. लग्नपत्रिकेचे विषयीं बाईशीं बोलणें जालें. तोही मजकूर सेवकानें लिहिला आहे. त्यांनीही विनतिपत्रें सेवेसी लिहिलीं आहेत. विदित होईल. सेवकास जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन हे विज्ञप्ति. चंद्र १९ मिनहूस रात्रीही बाईकडेस गेलों होतों. बहुत प्रकारें लग्नास येण्याविषयीं बोललों. परंतु बाईनीं फौजेचीं वगैरे उत्तरें केली. शेवटीं केसोपंत बोलले जे, श्रीमतांस आह्मीं काय लिहावें? त्यास बाई बोलली जे, सकाळीं आह्मी उत्तर श्रीमंतांस लिहून देऊं. तें पत्र आलें ह्मणजे मागाहून सेवेसी पाठवूं. बाई सांडणीस्वाराबरोबर वस्त्रें व जवाहीर तुकोजीबाबाकडेस पाठविणार असें बोलली. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना."

लेखांक ८२. ता. २६ जानेवारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. पौष वद्य ८ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २२ सफरपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेकरून यथास्थित असे. विशेषः-लग्नास येण्याविषयीं बाईस बहुत प्रकारें विनंति केली.

त्यास त्यांनींही बाईनीं शपथपूर्वक सांगितलें जे, माझ्या चित्तांत लग्नास येण्याचें होतेंच. परंतु पूर्वसूचना असती तर खामखा येणेंच होतें. तेथें गेल्यानें माझींही कामें फार होतीं. परंतु दिवस थोडे राहिले. असो. मुख्य गोष्ट श्रीमंतांचें लग्न शुभकार्य जालें. यांत आह्मांस समाधान आहे. असें बिनकिलाफ बोलली. बाईनीं पत्र लिहिलें आहे. केसोपंतांनींही बहुत वृत्त सांगितलें. बाईनीं पत्र लिहिलें आहे. सेवेसी डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ८३. ता. ३० जानेवारी इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि पौष वद्य १३ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २६ सफरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमानः—मातुश्री अहल्याबाई यांनीं येथून श्रीमंतांस लग्नाकरितां आहेरवस्त्रें व जवाहिराच्या रकमा पाठविल्या आहेत. त्यांचा तपसील ऐकिला तोः— मुख्यांस दोन पोषाख, एक बादली व एक कच्च्या रंगाचा; जवाहीर, शिरपेंच नवरत्नांच्या व तुरा पाचांचा, व कंठी मोत्यांची व पोंच्या दोन हिऱ्यांच्या, एकूण पांच. वधूस वस्त्रें बादली व जवाहीर सरी हिरे जडावाची व चांपेकळाहार जडावाचा, एकूण दोन रकमांशिवाय पोषाख, थोरले मातुश्रीस शालजोडी व पैठणी पातळ. मातुश्री सगुणाबाईसाहेबांस पातळ व शालजोडी. सौभाग्यवती मातुश्री काकूबाईसाहेबांस पातळ, चोळी व शालजोडी; व सौभाग्यवती मातुश्री दुर्गाबाईस पैठणी लुगडें व चोळी. याशिवाय दोन पोषाख एक आपल्यास व एक तात्यांस, कच्च्या रंगाचा एक व साधा शुभ्र. दोन खिनखाब याप्रमाणें वस्त्रें व जवाहीर सांडणीवर घालून, समागमें कारकून राजश्री बापूजी आनंदराव निसबत उष्टरखाना यांस येथून चंद्र मजकुरीं रवाना केले आहेत. यांस येथील आज्ञा की, परभारें वाफगांवास जाऊन, राजश्री तुकोजी होळकर व नारो गणेश उभयतांस पत्रें लिहिलीं आहेत जे, यांत अधिक उणें पाहून तेथील मर्जीप्रमाणें आहेर करणें, असें लिहिलें आहे. जवाहीर व वस्त्रें काल त्रितीय प्रहरीं बाई व गोविंद रघुनाथ उभयतां बसून काढलीं. तदोत्तर राजश्री विसाजी शामराज व हरकूबाई उभयतांस बोलावून वस्त्रें व जवाहीर त्यांस दाखविलें. त्यांनींही पाहून पसंत केलें. तदोत्तर रवाना केलें. याप्रमाणें एक वर्तमान. जवाहीर काय काय पाठविलें ह्मणून राजश्री केसो भिकाजी दातार यांनीं बाईस विचारिलें.

मीही जवळच होतों. बाईनीं उत्तर केलें जे, मोघम लिहा. अमकें ह्मणून सांगितलें नाहीं. याप्रमाणें ऐकिलें तें वर्तमान. दुसरें बाईनीं शिवरात्रीस श्री-ओंकारेश्वरास जायाचा निश्चय केला आहे. परंतु राजश्री चिमाजी बुळे यांनीं गांगलीकडे फौज व पेंढारी जमाव केला आहे. झाबेवाला पाळेगार बेबदल जाला आहे. त्याच्या पारिपत्यास जातों ह्मणून बाईसही सांगून पाठविलें आहे, कीं एक थोरली तोफ पाठवावी. परंतु हे कांहीं तोफही पाठवीत नाहींत व बुळेमजकुराचा विश्वासही करीत नाहींत. इकडे खरगोणाकडे काशी रंगनाथ दोन चारशें पागा घेऊन आले आहेत. यामुळे येथें बाईस संदेह प्राप्त जाला आहे. ह्मणून शिवरात्रीची यात्रा राहीलसें दिसतें. तेथें ध्वजोत्सव करणार आहेत. त्यास धोंड दीक्षित व सदाशिव भट उभयतांस पाठवावयाचा निश्चय करणार असें ऐकिलें. अद्याप संदिग्धच आहे. काय ठरेल तें पाहावें. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान बावनबुर्जीगढीस लागले आहेत. तीही सर जाली असेल. तेथून ग्वालेर अगर गोहज दोहींतून एका स्थळास मोर्चे लावतील. ग्वालेरींतील जकिरा अखेर जाला आहे. एकदा राघो मल्हार ग्वालेरीस गेले होते. शहरपन्हा घेऊन आंत गेले होते. परंतु बालेकिल्ल्यावर हजार आठशें माणूस चांगलें होतें. त्यांनीं खालीं येऊन मोर्चा उधळून दिला. त्यामुळे पाटीलबावांनीं राघो मल्हार यांजवर इतराजी केली. त्यांजकडील पागा काढली. खांसा स्वारी पाटीलबावाच जाणार. याप्रमाणें वर्तमान येथें आलें. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. हे विनंति."

लेखांक ८४. ता. १८ फेब्रुवारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. माघ वद्य १ शके १७०४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसी विज्ञापना. बाईनीं पत्र द्यावयास आज्ञा केली आहे. दोन चार वेळां लेखकांस विचारलें. परंतु देतों देतोंच ह्मणतात. यास्तव जालें वर्तमान सेवेसी पाठवावें ह्मणून डांकेबरोबर मीं व केसो भिकाजी यांणींही सेवेसी विनंतिपत्रें लिहिलीं आहेत. डांकेबरोबर येथून पत्रें ल्याहावीं, ते सेवेसी पावतात कीं नाहीं हें कांहींच कळत नाहीं. हरएकविशी बाईचीही सावधता आहे. श्रीमंतांच्या लग्नाच्या पत्रिका तों माघ शुद्ध नवमीच्या येथें आल्या होत्या. परंतु तेथें बोलतात जे माघ वद्य किंवा फाल्गुन शुद्धांत होणार असें बोलतात. निश्चयें कांहीं कळत नाहीं. अलीकडे पत्रेही येत नाहींत. बाई श्रीओंकारेश्वरास पौर्णिमेस जाणार होती. परंतु इकडे चिमाजी बुळे झाबेप्रांतीं जमावसुद्धां आले आहेत. काशी रंगनाथ पागा घेऊन खरगोण वगैरे

प्रांतीं फिरतात. यास्तव बाई गेली नाहीं. सदाशिवभट उपाध्ये यांजबरोबरच पांचां हजारांचें कापड, कांहीं सफेत, कांहीं छिटें, व पांच खंबाईत व पंचवीस कद रेशमी, ऐसें ध्वजोत्साहाचा सरंजाम भटजीबरोबर ओंकारेश्वरास पाठविला. पौर्णिमेस ध्वजा लागली असेल. संतर्पणेंही करविलीं आहेत. शिवरात्रीस सडी गेली तर नकळे. परंतु जाणार नाहींत असें दिसतें. महेश्वरच्या किल्ल्याची मावजत करितात. कारखाने लागले आहेत. याप्रमाणें येथील वर्तमान. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. येथें लोकांचें देणेंही फार जालें आहे. देणेंदारांचा उपद्रव व नित्य कृत्य चाललें पाहिजे. फार संकट आहे. धनी कृपाळू समर्थ. येथें एक कवडीचा आश्रय नाहीं. स्वामींनीं उपेक्षा केली तर सेवकाची गत काय होईल? धन्याच्या पायावितरिक्त दुसरा आश्रय नाहीं. मजविशीं तेथें स्मरणही कोण देतो? खर्चावांचून फार श्रम आहेत. धनी कृपाळू समर्थ. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ८५. ता. २० फेब्रुवारी इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. माघ वा॥ ३ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांन नमस्कार विनंति सेवकाचें वर्तमान तागाईत चंद्र १७ रबिलावलपर्यंत मुक्काम महेश्वर येथें स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वृत्त राजश्री केसो भिकाजी यांनीं बाईशीं बोलले जे, श्रीमंतांनीं तुह्मांसही पत्र लिहिलें आहे. आह्मांसही आज्ञापत्र लिहिलें आहे, जे रेवा उत्तर तीरच्या महालचा ऐवज बाईशीं बोलून ऐवज लवकर पाठवून देणें. त्यास तेथें राजश्री तुकोजीबावांस दहा हजार फौज ठेवायास सांगितली आहे. यास्तव ऐवजाची निकड तेथें फार आहे ह्मणून वरचेवर श्रीमंत लिहितात. आह्मीही आपल्यास वारंवार विनंति करीतच आहों. त्यास बाईनीं उत्तर केले जे, आह्मांकडे ऐवज काय आहे? कोठें असेल तो घ्या. यांनीं उत्तर केलें जे, आह्मींच घ्यावा असें असतें, तर आह्मांसच निक्षून लिहिते की आमके जागां ऐवज आहे, तो हुंड्या करून पाठवा. तो प्रकार नाहीं. तुमचा तालुका. वहिवाट सारी आपल्या हातची. आह्मांस काय ठाऊक ह्मणून वारंवार श्रीमंत तुह्मांस लिहितात. त्यास बाईनीं साफ उत्तर केलें जे, इकडील महालचा ऐवज ह्मटलें तर तुकोजीबावांनींच कांहीं महाल सावकारांस दिले आहेत. ते त्यांजकडे

ऐवज जातो. कांहीं आह्मांकडे असेल तो आमचा आह्मांस खर्च लागला आहे. आह्मांपाशीं ऐवज कोठें? द्यावा कोठून? यांनीं उत्तर केलें जे, आह्मीं श्रीमंतांस काय लिहावें? बाई बोलली जे, आह्मी बोलतों असें लिहा. यांनीं उत्तर केलें जे आह्मीं असें लिहूं नये. आपणही असें सांगूं नये. यांत श्रीमंतांची मर्जी ठीक रहाणार नाहीं. बाई बोलली जे, आह्मीच बोलतों त्यापक्षीं तुह्मांस लिहावयास काय चिंता आहे? यांनीं उत्तर केलें जे, असें लिहिल्यानें जाबसाल चढीस पडेल. बाई बोलली जे, आह्मी उखळांतच डोई घातली आहे; तेथें मागें पुढें काय पहावयाचें आहे? अशीं हजारों पत्रें येतच आहेत. आह्मांस पत्र त्यांचें आलें आहे. त्याचें उत्तर आह्मीही देतों. त्याअन्वयें तुह्मीही लिहून पाठवा. याप्रमाणें चंद्र १२ रोजीं संध्याकाळीं जाबसाल जाला. बाईनींही आपल्या पत्राचें उत्तर द्यावयास फडनीसास सांगितलें. याप्रमाणें जाबसाल जाला. वारंवार महालच्या ऐवजाविषयीं स्वामी यांस लिहितात. येथील तों उपेक्षा आहे. धन्यांची मर्जी! राजश्री पाटीलबावांकडील वर्तमानः-गोहजवाला राणा पाटीलबावांशीं सख्यत्वाचे जाबसाल करीत आहे. तुमचा स्थापित असें ह्मणतो. ग्वालेरही देतो. ठाणें बसलें असेल की बसेल. तिकडील फडशा जाहल्यावर तिकडील बंदोबस्त करून पाटिलबावा फिरणार. भिंडभदावरचाही बंदोबस्त करून, आणीक कोणी राजेरजवाडे मवास आदिकरून त्यांचा परामर्ष यथायुक्त करून, चौ मासांचे छावणीस उज्जनीस येणार. असें बाजारी वर्तमान ऐकिलें. कलमी नाहीं. अलीकडे बाईकडेही कांहीं कागदपत्र येत नाही. अंतस्थ कांहीं येत असतील हें न कळे. हैदरनायकाचा वकील नरसिंगराव तमाजी पाटीलबाबाकडेस गेला होता. तो पाटीलबावांची एक भेट जाली नी मयत जाला. तिकडे हैदरनायकही मयत जाला. यास्तव येथें कित्येक बोलतात कीं इंग्रजांचा काच तुटला. आतां काहीं इंग्रज डोई उचलतील असें बोलतात. हेंही बाजारी वर्तमान. देखिलें ऐकिलें सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ८६. ता. २ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. माघ वद्य १४ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रबिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः-इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून चंद्र २३ मिनहूस पत्रें डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वृत्त छ २३ मिनहूस संध्याकाळीं राजश्री संताजी होळकर यांचें पत्र

सेंदव्याहून बाईस आलें जे, इंग्रजांचीं चार पलटणें सोनगडावर आलीं. तेथें दोन पलटणें रातोरात निघून कोंडाईबारीवर फौज सरकारची होती. मालोजी राजे व वाघ असे होते. त्यांजवर इंग्रजांनीं छापा घातला. दोनशें माणूस ठार जालें, व शंभर माणसें धरून नेलीं. कांहीं जखमी जाले, ते तळावरच राहिले. फौज उधळली. इंग्रजांचा आणीक जमाव होतच आहे. खानदेशांत नंदुरबारास पूर्ववत्-प्रमाणें येणार, ह्मणून खानदेश तमाम खलबलाट जाहला आहे. याचा बंदोबस्त काय करणें तो करावा ह्मणून बाईस पत्र आलें. तें वाचून पाहिलें. बाईनींही पत्र वाचून पाहून, दोन काशीदजोड्या कोंढाईबारीकडेस बातमीस पाठविल्या व एक जोडी सेंदव्यास पाठविली कीं, पक्की बातमी राखून वरचेवर बातमी पाठवीत जाणें. याप्रमाणें पहिले वर्तमान. राजश्री पाटीलबावांच्या लष्करांतून एक ब्राह्मण आला. त्यास वीस रोज जालें. त्यानें जबानी वर्तमान सांगितलें जे, पाटीलबावा ग्वालेरीपासून अर्धकोसावर लष्करसुद्धां उतरले आहेत. किल्याभोंवतालीं फौज उतरवली आहे. किल्याचा शहरपन्ना घेतला. बालेकिल्यावर सात आठशें माणूस झुंजते आहे. लढाई सुरू आहे. गोहजवाला पाटीलबावांशीं विनयें सधानेंकडून बोलत आहे कीं, ग्वालेर घ्या आणि माझा मुलूख जो घेतला आहे तो सोडा. हे स्वारीखर्च मागतात. नाहींतर हा किला घेऊन गोहजेस लागावें असें पाटीलबावांचे मानस आहे. त्यावरून गोहजवाला इंग्रजांच्या वकिलाशींही कांहीं अंतस्थ बोलत आहे. याप्रमाणें ऐकिलें वर्तमान. राजश्री चिमाजी बुळे झांब प्रांती गेले आहेत. त्यांचे वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. येथें किल्याचे शहरपन्ह्याचा कारखाना दक्षिणेकडे जारी आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं नर्मदेस घांट पहिलेंच बांधला आहे. त्या घांटावर श्रीचें देऊळ बांधावयास चौथरा बांधून ठेवला होता. तेथे त्या चौथऱ्यावर बाईनीं देऊळ बांधावयास काम लावले आहे. जागां जागां किल्याचे वगैरे मरामतीस कारखाने जारी आहेत. इकडे मिलांचा शिलशिलाट होईल असें दिसतें. दिल्ली-कडील वर्तमानः—नजबखान मेल्यावर त्याचे चेले व खानमजकुराची बहीण त्यां आपसांमध्यें कलह लागला होता. दिल्लीसच होते. पादशाहास आपल्या हुकुमांत ठेऊन होते. तेथेंही आपसांत कलह बहुत जाला, ह्मणून महदबेग व आमदानी हे उभयतां दिल्लीहून रुसून आगऱ्यास गेले. मागाहून आगा सफी व खानाची बहीण अशीं उभयतां फौजसुद्धां आमदानीवर चढून गेलीं. तेथें कोणी मध्यस्थ पडून उभयतांचा सलूखा जाला. फिरून कांहीं वर्तणुकीत व्यत्यय पडला, त्यावरून फिरून बिघाड जाहला. ह्मणून आमदानी आपले फौजेसुद्धां आग-ऱ्याहून कूच करून ग्वालेरीस पाटीलबावांकडेस रवाना जाहला. पाटीलबावांचें व

त्या आमदानीचे पहिल्यापासून एकलास आहे. सूत्रही आहे. हिंदुस्थानांत जागां जागां राजेरजवाडे आदीकरून सर्वांत आपसआपसांत फितूर व लढाई झगडे फार लागले आहेत. अशा समयांत दक्षिणी फौज हिंदुस्थान प्रांती येती, तर सरकारकिफायत फार होती; ह्मणून कोणी गृहस्थ स्नेहित आहे त्यानें जयपुराहून लिहिलें होतें. तें वीस दिवसांचें वर्तमान आहे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची विपत्य फार आहे. देणें लोकांचें फार जालें. त्यांचा उपद्रव निराळा. पोटास नाहीं ती विपत्य वारंवार दर पत्रीं विनति लिहितों. धनी रागें भरतील. मी आणीक कोणास लिहू? कोण माझेविषयीं धन्यास स्मरण देतो? स्वामी सर्वज्ञ. गरिबांचा प्रतिपाळ करणार. धनी कृपाळू समर्थ हे विज्ञप्ति. डांकेबरोबर येथून पत्रे सेवेसी लिहितों. हे तेथें कधीं पावतात किंवा नाहीं पावत, हें कांहीं कळत नाहीं. डांकेचे कासीदही खर्चाचा बोभाट करितात. सेवेसी श्रुत होय हे विनंति."

लेखांक ८७. ता. ७ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. फाल्गुन शु॥ ४ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ रबिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर व जासूदजोडीबरोबर विनतिपत्रें रवाना केलींच आहेत. सांप्रत नवीन अधिकोत्तर वर्तमान कांहीं नाहीं. बाई स्वस्थचित्ते स्नान देवतार्चन करून आहेत. राजश्री पाटीलबावांकडीलही बाजारी अफवेचें वर्तमान आहे कीं, गोहजचा किला लवकरीच हस्तगत होईल. किल्यांत महागाई फार आहे. दोन तीन हजार मनुष्य व हजार पाचशें स्वारही आहेत. अडीच तीन शेरांची धारण किल्यांत आहे. याप्रमाणें बाजारी वर्तमान. सेवकास चार महिने जाले आज्ञापत्र येऊन. येथें सातशें रुपये देणें. त्या पेंचामुळे साहुकार येऊं देईनात. बाईकडून मजला कांहीं पावत नाहीं, हें स्वामींस विदित आहे. तत्रापि, दोन चार वेळां कोणी मातबराकडून बाईस हटकलें. त्यास बाईनीं साफ उत्तर केलें जे, आपल्या धन्यास लिहून पाठवावें. तेथून खर्चास आणऊन येथें देणेदाराचा फडशा करून जावें. अशीं दोन चार वेळां उत्तरें जालीं. वारंवार त्यांस काय हटकावें? धन्याचें नांव पदरीं. कोण कोणास ग्लान सांगावी? सेवकावर इतकी इतराजी व्हावी अशी सेवकापासून वर्तणूक कांहीं जाली नाहीं. बरें. मी चाकर पदोपदीं अपराधी. क्षमा

करणार स्वामी कृपाळू समर्थ. हरी बाबाजीबरोबर लुटला गेलों. एक वस्त्रानशीं येथें आलों. त्यावर धन्याचे आज्ञेप्रमाणें आज साडेपांच वर्षें येथें चाकरीवर आहें. मजवर गरिबावर इतकी इतराजी जाली, तर, सेवक गरिबाचा वाली धन्याव्यतिरिक्त कोण? स्वामींनीं परामर्ष न केला, तर माझा येथें कोणी वाली नाहीं. अबरू धन्याची आहे. बाईस वारंवार हटकायाची सीमा जाली. आतां कोठवर ग्लान सांगावी? या संकटांतून काढणार धनी कृपाळू समर्थ. फार दिवस जाले, धन्याच्या चरणदर्शनाची खंत वाटते. घरीं मातुश्रीचें पंच्याऐंशीं नव्वद वर्षांचें वय. त्यांची भेट नाहीं! मुलेंमनुष्यें अशा सवंगाईत अन्नवस्त्रावांचून हैराण. तेथें ते श्रम आहेत; येथें मी अशा संकटांत आहें! धनी कृपाळू सर्वज्ञ समर्थ. सर्व संकटापासून सोडविणार स्वामी समर्थ. स्वामींनीं उपेक्षा केल्यानें सेवकाची अबरू रहणार नाहीं. स्वामी सर्वज्ञ. हे विज्ञप्ति."

लेखांक ८८. ता. २ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. माघ वद्य १४ शके १७०४.

"श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचे सेवेसीं:—

आज्ञांकित सेवक विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रबिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—बहुत दिवस जाले, स्वामींकडून अगर सरकारचें आज्ञापत्र येत नाहीं. वर्तमानही कांहीं कळत नाहीं. आज तीन महिने अधिकच पत्रें येत नाहींत. श्रीमंतांच्या लग्नाच्या लग्नपत्रिका शुद्ध ९ नवमीचे येथें आल्या होत्या. तेथें लग्न लागलें असें कोणाचेंही येथें पत्र आजपर्यंत आलें नाहीं. आतां वद्य पक्षीं जालें असेल ह्मणून येथें बोलतात. राजश्री केसो भिकाजी दातार यांचें परवां घरचें सतरा अठरा दिवसांचें पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें की, शुद्ध पंचमीस देवदेवक बसवून षष्ठीस थत्त्यांचे मुलीचा निश्चय करून वाग्निश्चय केला, इतकें वर्तमान होतें. अलीकडे लग्न लागल्याचें वर्तमान आजपर्यंत आलें नाहीं. येथें दरबारांत पुसतां, त्यास काय सांगावें? नवाबाचे पुत्र साहेबजादे व साताऱ्याचे राजेश्री व भोंसल्यांचे चिरंजीव चिमणाराजे वगैरे पंचवीस तीस हजार फौज मिळाली आहे. ह्मणून बाजारी आफवा मात्र ऐकिल्यांत येतात. बाईही ह्मणत होती जे, 'फौजा फार मिळाल्या आहेत. सुरक्षित लग्न लागो. श्रीमंतांच्या कल्याणांत आमचें सर्व जगताचें कल्याण आहे.' असें ह्मणत होती. नवीन इंग्रजांचें वर्तमानः—इंग्रजी चार पलटणें

सोनगडास आलीं, त्यांतून दोन पलटणें रातव्यानें कोंडाईबारीस येऊन, तेथें फौज सरकारची व होळकराची होती, त्यांजवर छापा घातला. फार खराबी जाली ह्मणून पेंढाऱ्यांचे राऊत पळून सेंदव्यास आले. तेथून संताजी होळकरानें बाईस पत्र लिहिलें होतें, तें वाचून पाहिलें. त्यावरून वर्तमान सेवेसीं लिहिलें असे. वरकड ऐकिलें वर्तमानः—श्रीमतांच्या पत्रांवरून विदित होईल. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. येथें सातशें रुपये देणें लोकांचें जालें आहे. देणेदारांचा उपद्रव, नित्यकृत्यांची विपत्य अशा श्रमांत आहें. येथें बाईकडून एक कवडीची प्राप्त नाहीं. आह्मांवर रागें आहेत कीं, हे येथें बसून मनास येईल तसें वर्तमान लिहितात. कोणी कर्ज देखील देईना, अशा श्रमांत आहें. बाईस एक दोन वेळां कोणाकडून हटकाविलें. त्यांनीं उत्तर केलें जे, "आपल्या धन्याकडून खर्चास आणवावें नी बसून खावें, खर्चास पाठवीत नाहींत, तर यांस कशास येथें ठेविलें आहे? आह्मांजवळ कांही नाहीं." साफ उत्तर केलें. आतां येथें माझें कोण आहे? धन्यांनीं उपेक्षा केली, तर येथील कर्ज वारून माझें येणें कसें होईल? काय उपाय करूं? श्रीमंतांस विनंति आपण करून, येथील ब्रह्मस्वापासून मुक्तता होऊन श्रीमंतांचे चरण दृष्टीस पडेत असें करणार स्वामी कृपाळू. माझेविषयीं तेथें कोण विनंति करितो? ईश्वर श्रीगणपति आपणास स्मरण देवो. चार वर्षें येथें जालीं. धन्याच्या चरणदर्शनाची खंत वाटती. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ८९. ता. ८ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. फाल्गुन शु॥ ६ शके १७०४.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ४ रबिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं डांकेबरोबर विनंतिपत्रीं लिहून पत्रे रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रत सरकारचीं पत्रें जासूदजोडीबरोबर चंद्र १९ रबिलावलचीं स्वामींनीं पाठविलीं, तीं चंद्र २ मिनहूस संध्याकाळीं येथें पावलीं. सरकारचीं आज्ञापत्रे मातुश्री अहिल्याबाईस व राजश्री केसो भिकाजी यांस व एक सेवकास ऐशीं व राजश्री तुकोजी होळकर यांनींही बाईस पत्र लिहिलें होतें जे, 'श्रीमंतांच्या लग्नपट्टीचा ऐवज सर्वांबरोबर आपल्याबरही दोन लक्ष रुपये देणें ठरले आहेत. त्यास, तुह्मांकडून मागील ऐवज येणें त्यापैकीं देविले असेत. वडिलीं द्यावे.' ह्मणून पत्र त्यांचें होतें. तें पत्र केसो भिकाजी व मी वाचून

पाहून रात्रींच पत्रें बाईकडे घेऊन जावीं, तों राजश्री रंगराव वोढेकर ते दिवशीं बाईचे भेटीस आले होते. त्यांस रात्रौ फराळास वाड्यांत बाईनीं बोलविलें होतें. त्यास, बारा घटका रात्रपर्यंत त्यांस वस्त्रें देऊन विदा केलें. तदोत्तर बाईनीं निद्रा केली. मीही ते वेळस कांहीं बोललों नाहीं. दुसरे दिवशीं त्रितीय प्रहरीं, दरबारच्या समयास, केसो भिकाजी व मी पत्रें घेऊन वाड्यांत गेलों. राजश्री बाजीराव बर्वेही दरबारास आले होते. दोन घटका दिवस राही तोंवर दरबार होता. तदोत्तर बरखास्त होऊन बाई उठली. ते वेळेस विनंति केली की, एकीकडे बसावें. सरकारचीं पत्रें मुजवद जासूदजोडी घेऊन आले, तीं वाचून पहावीं. तेव्हां एकीकडे बसली. केसोपंत व मी व फडणीस मुजुमदार व बाई असे पांच जण होतों. सरकारचें व तुकोजीबावांचें दोन्हीं पत्रें पुढें ठेविलीं. फडणिसांनीं पत्रें वाचून दाखविलीं. ऐकून बाई बोलली जे, 'तुकबांनीं येथें लिहिलें, तें तेथें ऐवज देयास नाहीं की काय? तत्रापि, त्यांनीं आह्मांस लिहिलें आहे की, मागील ऐवज तुह्मांकडून येणें त्यापैकी देणें. त्यास, मागील ऐवज आह्मांकडे कोणता, काय राहिला आहे, तो त्यांजकडून लिहून आणवावा व तुकबास पत्र लिहून पाठवावें. कोणता ऐवज आह्मांकडे पोकळी राहिला आहे, तो त्यांजकडून लिहून आणवा.' इतकें बोलून उठली. आह्मांसही निरोप दिला. केसोपंतही ह्मणाले जें, 'आज आपण पत्रें दिलीं आहेत. तीं आपल्यांत आपण बोलली, त्यांत आपण कशास बोलावें? उद्या परवां विचारूं. कळलें कीं तुकोजीबावांस पत्रें लिहितील. तेथून उत्तरें आल्याखेरीज हे कांहीं जाबसाल निक्षून करीत नाहींत. मग आपण आजच कशास बोलावें? तुकोजीबावांकडे यांचीं पत्रें गेलीं ह्मणजे आपणही श्रीमंतांस लिहून पाठवूं. तोंवर मध्यें बोलूं. काय उत्तरें करितात तें पाहून लिहूं.' जालें वर्तमान स्वामींस विदित व्हावें ह्मणून सेवेसीं विनंति लिहिली असे. धोरणा पुढें दिसतो की तुकोजीबावांस लिहितील. तिकडे पाटीलबावांसही लिहितील. दोहींकडील उत्तरें आल्यावर जो जाबसाल करणें तो करितील. असें दिसतें. वरकड वर्तमान अलीकडे पाटीलबावांकडूनही इकडे कांहीं वर्तमान आलें नाहीं. पेशजीं कोंडाईबारीवर इंग्रजांनीं गडबड केली ह्मणून संताजी होळकराचें पत्र आलें होतें. त्या पत्रावरून सेवेसीं विनंति लिहिली होती; परंतु तें वर्तमान अद्याप दुणावलें नाहीं. राजश्री माधवराव निंबाळकर यांजकडीलही कारकून गोविंद खिजमतरायांचा पुतण्या येथें आला आहे. शोध करितां बोलले जे, रोजगाराच्या उद्देशें आलों आहों.

होळकरांस बाई येथून पत्र पाठवून जाब आणविणार. त्यास दिवसगत लागेल. यास्तव तेथेंच होळकरास विचारून, अमके ऐवज मागील येणें त्यांपैकीं दोन लक्ष रुपये देणें ह्मणून तुकोजीबावांचें पत्र बाईच्या नांवें येतें, तर बरें आहे. मीं हें लिहिलें, असें येथें न कळावें. यांचे कोणी तेथें आहेत, त्यांसही असें पत्र आलें ह्मणून न कळावें. सेवकाविषयीं उगीच रागे आहेत ह्मणून सूचना, हे विज्ञप्ति."

लेखांक ९०. ता. १५ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. फाल्गुन शु॥ १३ शके १७०४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब विज्ञापनाः—

मातुश्री अहिल्याबाई श्रीशिवरात्रीस श्रीओंकारेश्वरास जाणार आहेत. माघ शुद्ध पौर्णिमा होऊन तृतीयेस येथून निघून तेथें जाणार. ओंकारेश्वरीं ध्वजा लावणार आहेत. पांच हजारांचा संकल्प आहे. शिवाय संतर्पण व महापूजा. तदोत्तर ग्रहणास उज्जनीस जावें. श्रीमहांकाळाचे दर्शनास बहुत दिवस जाले, जाणार, अशी बोलवा आहे. तेथें जातील असा निश्चय नाहीं. ओंकारच्या स्वारीची सरंजामी करितात. इंदुरास फार दिवस गेलों नाहीं, असेंही ह्मणतात. जांबेच्या घाटावर तळें बांधलें आहे, व घाटामध्यें उतारचढांत पाणी नव्हतें, तेथेंही लहानसें तळें केलें आहे. तेंही पहावयाची उत्कंठा आहे. इतक्यांत ओंकार व जांब पाहून येतीलसें दिसतें. पलीकडील बोलवा मात्र आहे. घडेल तें खरें. राजश्री केसो भिकाजी याजकडे सरकारचीं पत्रें बाईस व मशारनिल्हेस आलीं. तें यांनीं बाईस पत्र दिलें. त्या पत्राचें उत्तर बाईनीं त्यांशीं केलें. तो तपशील मशारनिल्हेनीं सेवेसीं पत्रीं लिहिला असेल. त्यावरून विदित होईल. परंतु अद्यापि प्रथम दिवसच आहे. येविषयींचा तपशील पेशजीं विनंतिपत्रीं सेवकानें लिहिलाच आहे. सारांश, बाईचा प्रकार खुद्दपसंतीचा आहे. हिताहिताचा विचार, तोडमोड करून समजावी असा मनुष्यही कोणी नाहीं. तत्रापि, पुरातन मनुष्यांपैकीं राजश्री विसाजी शामराज लांबहाते तेथें आहेत. त्यांनीं एखादी गोष्ट दूरआंदेशीची सांगावी, तर त्यांस सल्लामसलतींत घेत नाहींत. असा प्रकार येथील आहे. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय. सेवकाची खर्चाची विपत्य फार आहे. सातशें रुपये येथें लोकांचें देणें जालें आहे. नित्यकृत्याचेंही संकट! धनी कृपाळू समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ९१. ता. ७ एप्रिल इ. स. १७८३.

श्रीगजान. मि. चैत्र शु॥ ५ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ४ जमादिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून चंद्र २६ रविलाखरीं डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचा मजकूर राजश्री पाटीलबावांच्या लष्करांतून राजश्री माधवराव गंगाधर यांनीं येथें बाईस पत्रें लिहिलीं होतीं. तेथील चंद्र १० रविलाखरचीं पत्रें येथें चंद्र २७ रविलाखरीं संध्याकाळीं पावलीं. राजश्री वासुदेव चिमणाजी व विनायक बाजी या उभयतांनीं दरबारास रात्रीं जाऊन एकांती बाईस पत्रें वाचून दाखविलीं. त्यांत मजकूर होता कीं, कलकत्त्यांत इष्टीनसाहेब मुख्यत्वें आहे. त्यानें पाटीलबावांस पत्र लिहिलें होतें कीं, 'आमचा वकील तुह्मांजवळ आहे. त्यांचे तुमचे शपथपूर्वक भाषणें जालीं आहेत, करारमदार जे ठरले आहेत, त्याप्रमाणे आह्मांस मान्य आहेत. केवळ हैदरनाईकाच्या सल्ल्या-बिघाडावर मदार नाहीं. तुमचें वचनयुक्त खचीत बोलणें जालें आहे. त्याच तुमच्या वचनावर आह्मी कायम आहों. मध्यें तुमच्या चित्तांत कोणी विपर्यास घालतील. ते तुह्मीं ध्यानांत न आणावे. आह्मीही आणणार नाहीं. साष्टी वगैरे दोन स्थळें तुह्मीं आह्मांस देविलीं आहेत. तेंच आह्मांस मान्य आहे. वरकड कोंकणपट्टीचीं स्थळें आह्मी सोडितों. अतःपर तुमच्या आमच्या सल्ल्यांत बिघाड होऊं नये.' अशी बहुत गौरसीचीं पत्रें आलीं. यांनीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आपल्याजवळ आणावें. तेथें इंग्रजांनीं सुरतवाल्यांनीं दादासाहेबांस कांहीं अटकाव करूं नये. सुखरूप आह्मांकडेस येऊं द्यावें ह्मणून पाटीलबावांनीं कलकत्तेवाल्यास पत्रें लिहिलीं होती. त्यास त्यांनीं सुरतवाल्यास पत्रें पाठविलीं कीं, दादासाहेब पाटीलबावांकडेस येतील. त्यांस अटकाव न करितां सुखरूप येऊं देणें. अशीं पत्रें पाटीलबावांकडेच पाठविलीं. तीं पत्रें व पाटीलबावांनीं आपला कारकून केसो अनंत, असे दादासाहेबांस आणावयास पाठविले, याखेरीज कलकत्तेवाल्यांनीं कांहीं विलायतप्रांतींचे अपूर्व अपूर्व जिन्नस एक नांव भरून सांगातें पाटीलबावांकडेस पाठविले. इंग्रजांचा व पाटीलबावांचा पक्केपणें स्नेह जाहला ह्मणून फार स्तव लिहिला होता, व राजश्री आबाजी नाईक वानवळे यांनीं पाटीलबावांस एकवीस लक्ष रुपये दिले. आणीकही तीस चाळीस लाख रुपये देणार. नाईकाचा स्तवच फार लिहिला होता. दुसरें,

लक्ष रुपयांचा वसुली सरंजाम अगर नक्त द्यावे, आणि दादासाहेबांनीं स्वस्थ स्नानसंध्या करून कोठें गंगातीरीं बसावें. बाजीरावसाहेबांस पुण्यास श्रीमंत रावसाहेबांजवळ पाठवावें. असे आणीक कित्येक प्रकारचे करारमदार अंतस्थ पाटीलबावांनीं करून घेतले आहेत. ते दादासाहेबांनींही मान्य केले आहेत. त्यावरून पाटीलबावांनीं कलकत्तेवाल्यांचीं पत्रें आणवून, कारकून पाठवून दादासाहेबांस आपल्याकडेस आणविलें आहे. तिसरें वर्तमान, ग्वाल्हेरीसही पाटीलबावांचे मोर्चे शहरपन्हा घेऊन बालेकिल्ह्याच्या दरवाज्यापावतर लोक गेले आहेत. गोहजवालाही फार अर्जू आहे कीं, ग्वाल्हेर घेऊन माझा मुलूख सोडून द्यावा. पाटीलबावांचें बोलणें आहे कीं, आमचे आज्ञेंत राहावें. सांगूं ते चाकरी करावी. त्यांचें बोलणें आहे कीं, ये प्रांतीं जे चाकरी कामकाज सांगाल तें करीन. परमुलूख परराज्यांत घडणार नाहीं. इतका जाबसाल पडला आहे. ग्वाल्हेर घेतल्यांत कांहीं बाकी नाहीं. याप्रमाणें वर्तमान ऐकून बाईनींही पाटीलबावांचा स्तव फार केला. राजश्री तुकोजीबावाही पाटीलबावांस सामील असते, तर या यशकीर्तीस पात्र होते. तिकडे जाऊन काय मिळविलें, असेंही आपसोसयुक्त बोलली. बारीक शोध करितां याप्रमाणें वर्तमान ऐकिलें तें सेवेसीं श्रुत होय. विलायतेंत इंग्रजांचा पादशाहा आहे त्याच्या पादशाहाजादीनें कारभारी यांस विचारिलें जे, 'दक्षिणेंत इतका मुलूख सर केला ह्मणून ऐकतों. त्यास त्या मुलुखचा पैका कोठें आहे व आठ दहा वर्षांचा उदमांचा पैसा काय आकारला, तो दाखवा?' तेव्हां कारभारी यांनीं अर्ज केला जे, 'दक्षिण्यांशीं आद्याप बिघाडच आहे. त्यामुळें मुलकी पैसा वसूल होत नाहीं व सावकारी मालही बंद आहे. मालाचा खप दक्षिणेंत. त्या दक्षिण्यांशीं बिघाड! यास्तव पैसा कोणीकडील येत नाहीं.' 'दक्षिण्यांशीं बिघाड कसा?' त्यांनीं दादासाहेबांचें प्रकर्ण सांगितलें व सावकारही फिर्याद जाहले कीं, दहा बारा वर्षें महाल पडले आहेत. दक्षिणेशिवाय महालचा खप होत नाहीं. त्यावरून पातशाहाजादीची ताकीद कलकत्तेवाल्यास आली कीं, दक्षिणवाल्यांशीं बिघाड न करणें. त्यास सलूख करून कोठ्या चालू होय तें व मुलकी पैसा वसूल होय तें करणें. त्यावरून कलकत्तेवाल्यानें सलुखाचा डौल घातला आहे ह्मणून हें सावकाऱ्यांत वर्तमान ऐकिलें. तें सेवेसीं श्रुत होय. लग्नपट्टीबद्दल दोन लक्ष रुपये होळकरांकडून यावे, सबब सरकारची जोडी पत्रें घेऊन येथें आले. त्यास यांनीं राजश्री तुकोजी होळकर यांस कासीदजोडीबरोबर पत्रें पाठविलीं आहेत. त्याविषयीं जे वेळेस हटकावें ते समयीं ह्मणतात. (अपूर्ण.)"

लेखांक ९२. ता. २० एप्रिल इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. चैत्र वद्य ३ शके १७०५.

"श्रिया विराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीः–सेवक विठ्ठल शामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १७ जमादिलावल-पर्यंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– आपण कृपा करून पत्र व खर्चास पाठविलें तें पावलें. राजश्री गबाजी सदाशिव कमाविसदार यांनींही मान्य केलें. आठ पंधरा दिवसां ऐवजही येईल, येथें देणें निवडतां साडे-सातशें यांचा भरणा जाहला. बरें, हे पाचशे रुपये यानें त्यांस भरंवसा जाला. एकशें शेहेचाळीस रुपये व्याजबट्टा मनोतीत गेला. बाकी साडेतीनशें रुपये त्यांच्या मुदलांत दिले. पुढें त्याजवळूनच कर्ज घेऊन खात आहें. स्वामींस हें तापत्रय कळलें ह्मणजे श्रीमंतांसच श्रवण जालें. घरचें वर्तमान तर चिरजीवानें विदित केलेंच असेल. तात्या, माझा वशिला दरबारांत कोणी नाहीं. एकनिष्ठ चाकरी करितों, परंतु धन्यास सांगणार कोणी नाही. बरें, ईश्वर आपलें कल्याण करो. गरीबांस त्राते आपण आहांत. बाणांचा मजकूर पेशजीचा आपण लिहिला. त्यास, आपले पसंतीस त्यांतून बाण आला नाहीं. येथें तों रेवामाहात्म्यांत आहे कीं, चर्पट त्रिकोण कसाही बाण श्रीओंकारक्षेत्रींचा असल्यास त्याची भावेंकरून पूजा केल्यास श्रेयस्कर आहे. चांगले सलक्षण बाण कोठें निघत नाहींत. तत्रापि, निघाला तर येथील भिल्ल व ब्राह्मण मनास येईल तसा रुपया सांगतात. पाऊणशें, शंभर, चाळीस, पन्नास, असें मोल सांगतात. कित्येक ब्राह्मणांस चटक लागली आहे. ते, कांहीं चांगले, त्यांत कांहीं कृत्रिम, असे पुण्याकडे घेऊन जातात. तिकडे त्यांस रुपया मिळतो. फार चांगला तो कृत्रिम घांसून करितात, असें आहे. असो. प्रस्तुत एक बाण पुजेस बाईजवळून मीं मागून घेतला आहे. पंचायतनांत पुजाया ठेवला होता. आपण दोन चार वेळां लिहिलें. प्रस्तुत तो बाण चांगला कोठें मिळत नाही, ह्मणून तोच बाण पाठविला आहे. बाईजवळ बाणांची परीक्षा फार आहे. त्यांजवळील परीक्षेचा बाण चांगला आहे. पसंतीस ये असाच आहे. पूजेंत ठेवावा. कोणास देऊं नये. कपुरा कासीदाबरोबर पाठविला आहे. बाण फार चांगला आहे. धोतरजोड्याविषयीं लिहिलें. तीन जोडे, बारा, नऊ, सात या पद्धतीचे लिहिले, त्यास मातबर सोबतीशिवाय वाटेनें सणंग निभावत नाहीं. बऱ्हाणपुराजवळ व औरंगाबादेजवळ या दोहीं स्थळीं जकात मनास येईल तशी मागतात. येथील दस्तकास देखील मानीत नाहींत. असा प्रकार आहे. जशी आज्ञा पाठवाल तसें करून, कोणी मातबर सोबती निघेल त्यांजबरोबर

ठवूं. आपल्या पत्रांत सरकारचा लखोटा घालून पाठविला आहे. हा लखोटा कांतीं श्रीमंत नानासाहेबांजवळच द्यावा. वाचून पाहात तोंवर आपण जवळ सावें. पत्रें वाचून काय उत्तर करितात, तेंही श्रवण करावें. फिरून तीं पत्रें ीमंतांस प्रस्तुत पाठविलीं नाहींत. मागाहून पाठवीन. बाण दोन पाठविले ाहेत. हे घ्यावेत. फार चांगले आहेत. आपले पसंतीस पडतील ते ठेवावे. हतील ते याच कासिदाबरोबर आमचे घरीं पाठवावे. कासिदांस रोजमुरा देऊन वकर उत्तरें देऊन पाठवावें. श्रीमंतांसही विनंति करावी हे विज्ञापना."

। चंद्र ३ जमादिलाखर लास समानीन.

लेखांक ९३. श्रीगजानन.

ता. २८ एप्रील इ. स. १७८३. मि. चैत्र वद्य १२ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना गाईत चंद्र १५ जमादिलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर थें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं हून चंद्र १७ मिनहूस कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं ावलीं असतील. साप्रत सरकारचीं आज्ञापत्रे राजश्री केसो भिकाजीस व सेवकास ोन्हीं पत्रें चंद्र ९ मिनहूचीं डांकेबरोबर रवाना जालीं, तीं चंद्र २१ मिनहूस ीं घटका रात्रीं येथें पावलीं. पत्रें वाचून केसोपंत व मी पत्रें घेऊन दरबारास ालों. बाईस एकाती पत्रान्वय बहुत प्रकारें बोललों की, लग्नपट्टीच्या ऐवजाविषयीं ारंवार सरकारचीं पत्रें येतात. जासूद बसलाच आहे. हा लग्नोत्साहाचा ऐवज ापल्याकडून लवकर पोंहचल्यानें अति संतोष होईल. विषयही थोडका, तथापि अन्यथाजवळून या पट्टीचा ऐवज बहुतकरून वसूल जाला. आपण मातबर. ौढता आपल्याकडे. श्रीमंतांच्या लग्नोत्साहाचा ऐवज संतोषेंकरून लवकर पोंहच-ल्यानें श्रीमंतांस बहुत संतोष होईल. या रीतीनें उभयतांही बोललों. बाईनीं उत्तर केलें जे, 'तुकबास पत्र लिहिलें आहे. त्याचें उत्तर आल्यावर काय बोलणें तें बोलूं.' केसोपंतांनीं उत्तर केलें जे, 'तुकोजीबावांचें पत्र आपल्यास आलें ह्मणून श्रीमंतांनीं लिहिलें आहे.' बाई बोलली जे, 'पत्र आल्यावर आह्मी नाहीं कां ह्मणू? आधीं तुह्मांस सांगूं. तुमचीं पत्रें डाकेबरोबर पुढें आलीं. आमचीं पत्रें त्यांनीं रवाना केलीं असलीं, तर कासीदजोडीबरोबर दो चौ दिवसां मागून येतील. त्यांचीं पत्रें आल्यावर काय बोलणे ते बोलू.' इतकेच बाईनीं उत्तर केलें. देण्याचा जाबसाल येथें कठीण. तत्रापि उत्तेरही आव्यतेचीं. असो. हे मातबरच आहेत, राजश्री तुकोजीबावांचीं पत्रें बाईस आलीं ह्मणून आज्ञापत्रीं केसोपंतांस लिहिलें. त्यास

बाइनींही सांगितलें जे, उत्तर अद्याप आलें नाहीं. बारीक शोध पाहतांही अद्याप लीं नाहींत. तर्केंकडून वाटतें जे, राजश्री पाटीलबावांकडील लग्नपट्टीचा ऐवज यावला असेल, ह्मणून यांचाही अनमान असेल की कसें नकळे. काल बाई ोत होती की, 'तुकबांकडील वराता एक तेरा हजारांची व एक पांच हजारांची एक दीड हजारांची अशा आल्या आहेत. त्यांसही ऐवज दिला पाहिजे.' तां तेही इकडील ऐवज ओढीतच आहेत. सरकारच्या ऐवजास त्यांच्या उजुर रेतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ९४. ता. ३० एप्रिल इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. चैत्र वद्य १४ शके १७०५.

ज्ञापनाः—बातमीचें वर्तमान राजश्री पाटीलबावांच्या लष्करांतून एक गृहस्था-जासूदजोडी चंद्र ११ जमादिलावलीं लष्करांतून निघाली, ती चंद्र २२ मिनहूस ें आली. त्या पत्रीं वर्तमान कीं, पाटीलबावांनी बावनबुरजी गढी बेऊन, तेथून च करून ग्वालेरीस येऊन मोर्चे लाविले. किल्ल्यास पूर्वेकडून मोर्चे लाविले हेत. तोफांची चादर लावून पन्नास हात सफील पाडून टाकली. वरते किल्ल्यावर णी नाहीं. एक बावडी मातबर, पूर्वेस किल्ल्याच्या शहरपन्ह्यांत होती. त्या वडीचें पाणी वरले लोक पीत होते. तीच सफेल पाडली आहे. त्यामुळें त्या वडीचें पाणी वरल्या लोकांचे बंद जालें. कोठें कोठें टांक्यास थोडें थोडें आहे, गुजरानी करितात. किल्ल्यावर पांच सात सावकार मातबर व राजाची राणी शीं आहेत. आठा पंधरा दिवसां किला हस्तगत होईल ह्मणून लिहिलें होतें, व टीलबावांकडील मुत्सद्दी व कारभारी यांनी कोणी मामलेदारापासून अंतस्थ ्कळसें घेतलें होतें. तें पर्यायेंकडून मुख्यास कळलें. त्यामुळें मुत्सद्दी व ारभारी यांचे ठायीं अनास्था. रुपया जितका घेतला होता तितका माघारी ऊन, इतराजींत आहेत ह्मणून लिहिले होतें. हें कलमी वर्तमान, व श्रीमंत ाजश्री दादासाहेबांकडे पाटीलबावांकडील कारकून गेला आहे. त्या गृहस्थाचें ांव केसो अनंत. पाटीलबावांनी सांगितल्याअन्वये कांही दादासाहेबांशीं बोलतात. ुरतेजवळ फुलपाड्यावरच दादासाहेब आहेत. कुच करून शिंद्याकडे जाणार. दुसरी ोली परभारें झांशीस जाणार. हें सावकारी वर्तमान. तिसरें वर्तमान कीं, पुण्याहून ाटीलबावांच्या विद्यमानें दादासाहेबांचा तह जाला आहे की, झांशी वगैरे बारा ्क्षांचा सरंजाम द्यावा. दादासाहेबांनीं दंपत्यसहित व अमृतराव व कांहीं त्याजवळ

शागीर्दपेशा आहे त्यासुद्धां झांशीस राहावें. पुण्याहून श्रीमंतांची आज्ञा आली तर शिंदेहोळकरसहित हिंदुस्थानची मोहीमही करावी, नी श्रीमंत बाजीराव साहेबांनीं पुण्यास श्रीमंतांजवळ जावें. बाजीरायांस वधू राजश्री हरिपंततात्यांची कन्या नेमली आहे. श्रीमंतांच्या लग्नाप्रमाणें यांचें लग्न व्हावें. पूर्ववत्प्रमाणें निर्वेध राज्याचा बंदोबस्त व्हावा. असें बाजारी व ब्राह्मणी वर्तमान ऐकिलें. तें सेवेसीं श्रुत होय. सत्य मिथ्या देव जाणे. उज्जनीहून एक ब्राह्मण आला. त्यानें आजच घांटावर वर्तमान सांगितलें जें, ग्वालेरीस पाटीलबावांनीं मोर्चे लाविले आहेत. किल्ल्यावर सातशें माणूस व कोणी सावकारही आहेत. परंतु किल्ला जेर आहे. लवकरच हस्तगत होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे केसो अनंत कारकून पाटीलबावांनीं पाठविले आहेत. आधी दादासाहेब पाटीलबावांकडेस येणार. तदोत्तर पाटीलबावांच्या विद्यमानें कोणीकडे योजना होणें ती होईल. पाटीलबावांच्या विद्यमानें इंग्रजांचा सला पक्का जाहला. इंग्रजांनीं आपल्याकडून भडोच संस्थान पाटीलबावांस दिलें. भडोचेस पाटीलबावांकडील ठाणें उज्जनीहून जाणार. याप्रमाणें त्या भटजीनें वर्तमान सांगितलें. पेडगांवींहून पाटीलबावांची ज्येष्ठ स्त्री उज्जनीस गेली. मर्दान्याच्या घांटावर रेवा उतरली. देवजी गौळी समागमें होते. ते बाईस भेटावयास येथें आले होते. येथून बाईनीं आपला कारकून ते बाईस बोलावूं पाठविला होता. परंतु ती अस्पर्श जाहली ह्मणून आली नाहीं; परभारां गेली. राजश्री बाजीराव बर्वे यांचीं पत्रें पुण्याहून वे॥ राजश्री गोविंद भटजी निजसुरे यांच्या विद्यमानें पेशजीं येथें आलीं होतीं. तीं त्यास पोंहचाऊन उत्तर घेऊन पाठविलीं होतीं. त्यावर आठ दहा दिवस जाले. बाजीरायांनीं आपला कारकून येथून पुण्यास रवाना केला आहे. त्यावर अलीकडे पुण्याहून दुसरीं पत्रें भटजींच्या विद्यमानें चंद्र ११ मिनहूचीं तेथून डांकेबरोबर रवाना जालीं. कीं चंद्र २० मिनहूस चौ घटका रात्रीं येथें दाखल जालीं. राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ सबनीस यांनीं सेवकांस पत्र लिहिलें होतें जे, हा लखोटा बर्व्यांस पावता करून उत्तर घेऊन लवकर डांकेबरोबर पाठवणें. त्याप्रमाणें पत्र लखोटा तें वेळेसच बाजीरायांस पावता केला. त्यांनीं पत्रें वाचून राजश्री गोविंद रघुनाथ गानू यांस दाखविलीं. त्यांचे विद्यमानें बाईस वर्तमान श्रवण केलें. तदोत्तर उत्तरें लिहून लखोटा गोविंद भटजींच्या नांवाचा मजकडे पाठविला. तो लखोटा चंद्र मजकुरीं डांकेवर या पत्रांबरोबरच रवाना चंद्र २६ मिनहूस डांकेवरून चालला. सेवेसीं श्रुत होय. दोन लक्षांचा जाबसाल परवां जाला. बाईनीं उत्तर याप्रमाणें केलें. तो मजकूर केसोपंतांनीं व मीं चंद्र २४ मिनहूस विनंतिपत्रें लिहून कासीदजोडीबरोबर रवाना केलीं आहेत.

आज डांक चालली ह्मणून तेंही वर्तमान सूचनार्थ सेवेसीं लिहिलें असे. डांकेच्या बंदोबस्ताविषयीं सरकारचें पत्र बाईस एखादें यावें. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ९५. ता० १४ मे इ. स. १७८३.
श्री. मि० वैशाख शु॥ १३ शके १७०५.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक अहिल्याबाई होळकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम स्वामींचे कृपाकटाक्षेंकरून यथास्थित असे. विशेष:–छ १५ रबिलावलचें पत्र सादर जालें, तें छ १ रबिलाखरीं प्रविष्ट होऊन बहुत संतोष झाला. सरकारांत लग्नाच्या साहित्याबद्दल राजश्री तुकोजी होळकर यांजकडील सरंजामावर सर्वांप्रमाणें रुपये दोन लक्ष द्यावयाची नेमणूक केली, तो ऐवज मशारनिल्हेनीं तुह्मांकडून घ्यावयाविषयीं पत्र दिलें तें पाठविलें आहे. तर येविषयीं राजश्री केसो कृष्ण व विठ्ठल शामराज तुह्मांसीं बोलतील. त्याप्रमाणें सदरहू ऐवजाची तरतूद करून पाठविणें ह्मणून आज्ञा. ऐसीयासी स्वामीचे लग्नाच्या साहित्याचा ऐवज देणें हे गोष्ट संतोषाचीच आहे. परंतु चिरंजीव राजश्री तुकबांकडील मागील बाकी येणें, त्या ऐवजीं द्यावयाकरितां लिहिलें. त्यास मागील बाकीचा ऐवज माळवे प्रांतींचे महाल-पैकीं वगैरे कोणता राहिला न राहिला, हें सरकारांतही विदितच आहे. येविषयीं चिरंजीवास पत्र लिहून जोडी रवाना केली, त्याचे उत्तर अद्याप आलें नाहीं. सरकारचे जासूदजोडीस येऊन बहुत दिवस जाले. यास्तव त्यांची रवानगी केली आहे. मागाहून चिरंजीवाकडून उत्तर आल्यानंतर उभयतां मशारनिल्हेसीं ऐवजाचा जाबसाल बोलण्यांत येईल. मिति वैशाख शुद्ध त्रयोदशी सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ९६. ता. १८ मे इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि० वैशाख वद्य २ शके १७०५.

"श्रिया विराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीं:–

सेवक विठ्ठल शामराज साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १६ जमादिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष:–बहुत दिवस जाहले, आपलें पत्र येत नाहीं. त्यास आह्मांस सर्वांशीं आधार आपल्या पायांचा आहे. तेथें श्रीमंतांजवळ आह्मांविषयीं कोण वारंवार विनंति करितो?

आपण गरीबनवाज आहेत. येथील वर्तमानः–श्रीमंतांच्या लग्नोत्साहाची पट्टी लक्ष रुपयांची वरात श्रीमंतांनीं तुकोजीबावांच्या ह्मटल्यावर केली, आणि तुको बावांनींही बाईस लिहिलें कीं, तिकडे महालचे बाकीचे ऐवजीं दोन लक्ष र देणें. त्यास पाहतां, ऐवज त्यांनीं साराच महालपैकीं उचलला आहे. बा निमित्य कीं, बाकीचे ऐवजी देणें. बाकी नाहींच तेथें त्यांनीं कोणत्या ऐ द्यावा ? पाहतां सुरळीतपणें त्यांजकडून नाहीं. बाईवर दुरारोप मात्र ठेवित येथून बाईनीं तुकोजीबावांस पत्र लिहिले कीं, बाकी कोणती राहिली आहे लिहून पाठवणें; त्यांपैकीं ऐवज देऊ. त्यास आज अडीच महिने जाले, उत्त पाठवीत नाहींत; कासीदजोडीही अद्याप येत नाहीं. आह्मांकडून बा श्रीमंतांस लिहिविलें कीं, तुकोजीबावा पत्र पाठवीत नाहींत. श्रीमंतांनीं तेथें त आज्ञापिलें की, 'तुह्मी बाईवर वरात लिहविली. त्यांनीं तुह्मांस पत्र लिहिलें अ त्याचें उत्तर कां तुह्मी बाईस पाठवित नाहींत ?' त्यास तेथें ह्मणतात कीं, कडेस पत्रें पाठविलीं आहेत. येथें शोध करितां पत्र आलें नाहीं. जोडीही अ नाहीं. असा प्रकार तिकडील आहे. त्यांजकडून सुरळीत नाहीं हें आप श्रीमंतांस समजाऊन सांगावें. आह्मींही श्रीमंतांस लिहिले आहे. आपणही सांग येथें त्यांनीं ऐवज तयार करवून ठेवला आहे. परतु त्यांचें काय पत्र येतें पहावें, व सरकारच्याही दुसऱ्या पत्राची मार्गप्रतीक्षा येथें आहे. सरकारचें सुरळीतपणें ममतापुरस्कर बाईस यावें कीं, माळव्याच्या महालपैकीं पेस्तर सा ऐवजीं दोन लक्ष रुपये देणें, व तुकोजीबावांचेंही पत्र बाईस या अन्वयेंच स घेऊन पाठवावें, ह्मणजे ऐवज येथें घेऊं. पत्रें दोन्हींही माझ्या लखोट्यांत घा पाठवावीं, ह्मणजे त्या अन्वयें येथें आह्मांस बोलावयास येईल. सेवेसीं श्रुत ह पहिले बाण पाठविले कपुरा व बाळा कासीदाबरोबर, ते पावले असतील. आ सात बाण रामा कासीदाबरोबर पाठविले आहेत. बाण फार चांगले आ त्यांस दहीं साखर लावून धुवावें. धोतरजोडे वाटेनें निभावत नाहींत. बन्ह पुराजवळ व औरंगाबादेजवळ चौकीचा उपद्रव फार देतात. यास्तव ज आणीत नाहींत. तेथून बंदोबस्त करून पाठवावा, ह्मणजे एक दोन जोड पाठ हे विनंति."

---

*

लेखांक ९७. ता० २० मे इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि० वैशाख व॥ ४ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ जमादिलावलपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मु॥ महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान व श्रीमंतांच्या लग्नपट्टीचे दोन लक्षांचा जाबसाल बाईशीं जो जाला तो, पेशजीं विनंतिपत्रीं लिहून छ ११ मिनहूस डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रत श्रीमंतांच्या लग्नाचा मजकूर समारंभ फार चांगला जाला. राजश्री बापोजी आनंदराव बाईकडून आहेर घेऊन आले होते, त्यांनींही सांगितला. मीही ऐकिलें वर्तमान निवेदन केलें. वारंवार तोच मजकूर बोलत असतात. बाई बहुत संतोष पावली. बाई बोलली जे, "कैलासवासी श्रीमंत नानासाहेब होते, ते वेळेस कैलासवासी श्रीमंत रावसाहेबांचें लग्न मातबर जालें होतें. परंतु त्यापेक्षां या लग्नाची तरा तरतूद फार चांगली कारभारी यांणीं केली. अशा समारंभाच्या कल्पना ऐकिल्यांत आल्या नाहींत. लग्न जालीयावर नबाब पोलादजंग आले. त्यांचे मेजवानीची तरतूद फिरून त्या रंगाप्रमाणेंच करणें प्राप्त जाली. तेंही कोठें व्यंग न दिसतां त्यांच्या व सरकारच्या स्वरूपाप्रमाणें केली. खर्च फार लागला. लाखोंचेच जाले. उगेंच शब्दपांडित्य नाहीं." असें फार संतोषानें बोलली. त्यावरून लग्नपट्टीच्या दो लक्षांविशीं प्रसंगोपात्त फिरून विनंति केली जे, "खर्च फार जाला आहे. नवाबांनीं व हैदरनाईक यांणीं साहिलें केलीं. येथीलही ऐवज समयोचित पोंहचे तर फार उपयोगीं पडेल. श्रीमंत कारभारी यांसीही बहुत संतोष होईल." त्यावर बाईच्या बोलण्याचे भाव दृष्टीस आले, "हे दोन लक्ष रुपये देणें आह्मांस अति अवश्यक. निश्चयरूप आह्मीं द्यावेच. कां कीं, हे गोष्ट आह्मांस अलभ्य लाभाची होय. परंतु तेथून कारभारी यांणीं राजश्री तुकोजी होळकर यांचें पत्र घेऊन आह्मांस पाठविलें. त्यांतील कुन्हा त्यांचे समजल्यांत आली नाहीं. कोणती? ज्या पक्षीं संतोषाचें देणें, त्या पक्षीं बाकीच्या ऐवजीं देणें ह्मणून किमपि न लिहिते. तेथेंही हेंच लिहिणें होतें जे, श्रीमंतांचा लग्नोत्साह जाला, हा आपणास अति संतोष होय. त्यास माळव्यांतील महालपैकीं पेस्तर सालचे ऐवजपैकीं दोन लक्ष रुपये द्यावे. इकडे देशचे महालीं ऐवज द्यावा, तर येथील खर्चाच्या ओढीमुळें न बनलें. यास्तव वडिलीं तिकडील महालपैकीं दोन लक्ष रुपये पाठऊन द्यावे. ऐसें निखालसपणें लिहिलें तर आह्मांसही हा संतोष. ऐवजाची तरतूद होऊन येती. तस्मात् त्यांच्या चित्तांत निखालसपणें ऐवज न द्यावा, सरकारचा शब्द आह्मांवर लावावा,

या अर्थी बाकीची कुन्हा त्यांनीं लिहिली. हे कारभारी यांच्या चित्तांत व्यंगोक्तता न समजली. आपली छानदारी दाखऊन दुसऱ्यास बदनाम करावें, हे बालखेळ नारोपंतांचे होयेत. हे समजणारासच समजतील. पेशजीं श्रीमंत राजश्री नानांसी विष्णु महादेव गजरे व तुकबा व नारो गणेश यांणीं वचनप्रमाण दिल्हें कीं, तुमच्या लक्षांत वर्तणूक करूं. त्यावर त्वरितच राजश्री मोरोबादादांच्या मनमंतरांत त्यांजकडून कशी वर्तणूक घडून आली, ते श्रीमंतांच्या ध्यानांत आहेच. त्यांचे वर्तणुकीचे भाव वारंवार दृष्टोत्पत्तींत येत असतां, हरएकविशीं त्यांच्या गोष्टी सालसीच्या पुर्तेपणें चित्तांत आणून वारंवार अनेक प्रकारचीं पत्रें आह्मांस येतात, हें आश्चर्य वाटतें.'' ऐसे बोलण्याचे भाव येथील दिसून आले. दुसरें, बाईच्या चित्तांतील खमीर पाहतां दिसून आला की, तुकोजीबावांस व नारो गणेश यांस सरदारी दिवाणगिरीचीं वस्त्रें आपण दिल्हीं. त्यावरून श्रीमंतही त्यांजवळून चाकरी घेऊं लागले. तें आह्मांसच प्रतिबंधक जालें. त्यांणीं आह्मांवर बाकीच्या ऐवजीं वरात केली. तस्मात् आह्मी जो खर्च करितों तो गैरवाजवी, नी ते खर्च करितात तो वाजवी ! ऐशा प्रौढतेनें आह्मांस लिहितात. ह्मणून येथील चित्ताची विक्षेपता. आपण कमावीसदार अथवा इजारदार नाहींत कीं या रीतीचीं त्यांचीं पत्रें मान्य करावीं. वरकड त्यांनीं सरळपणें लिहिल्यास येथूनही पेस्तर सालच्या ऐवजीं ऐवजाची सरबराई होऊन येईलसी दिसती. उगीच बाकीची कुन्हा लिहून सरकारकामास हिसका देणें हें त्यांसही योग्य नाहीं. येरवीं सरकारकामाविशीं त्यांजकडून स्वच्छता अथवा आपल्या गृहकृत्याशीं अंतःकरणनिर्मलता असलीया इकडेही कोणे गोष्टीचा पेंच दिसत नाही. ऐसे येथील भाषणान्वयें अर्थ ध्यानास आले. श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोद्यास आले ह्मणून बाजारी वर्तमान. ग्वालेर अद्याप खालीं जाली नाहीं. राजश्री पाटीलबावांनीं बावनबुरजी गढी घेऊन दुसरे गढीस लागले आहेत ह्मणून साहुकारी वर्तमान. भडोचचा किल्ला पाटीलबावा इंग्रजाजवळ मागतात, ह्मणून यांतच वर्तमान ऐकिलें. परशरामबावा महापुरुष कोंकणस्थ आहेत. ते काशीस जायास येथें आले आहेत. त्यांचे विद्यमानें नारो गणेश यांचें बोलणें अंतस्थ बाईशीं कांहीं आधिक्य करावें. आपल्यास एकलें बोलावलें तर वचनप्रमाण मातबर. मध्यस्थ या बावांनींच होऊन, त्यांस आंतून बाईच्या पायावर घालावें, असें अनुसंधान बावांनीं लावलें आहे. परंतु बाई ऐकत नाहींत. बाईचें मानस नारोपंत आपल्या कारभारांत किमपि नसावा. तत्रापि, श्रीमंत नानासाहेबांच्या व पाटीलबावांस विद्यमानें आपल्या मनोदयानुरूप जें घडणें तें घडावें, असें मानस आहे. तुकोजीबावांस दूर करून दुसरा प्रकार करावा असें किमपि

नाहीं. ये गोष्टीचा अंतर्बाह्य पुर्तेपणें बारीक शोध करायाचा तो केला. मुख्य नारो गणेश कारभारांत नसावे. पूर्ववत्प्रमाणें आपले आज्ञेंत चालावें. लक्षांपैकीं दोन लक्ष. एक स्वामींचें व एक पाटीलबावांचें. दोन्हीं लक्षें दृढतर पक्कीं राखावीं. कदाचित् पाटीलबावा समयोचित प्राप्तीप्रमाणें कोणीकडेस कल देतील असेंही एकांतीं ह्मणतात. परंतु नाना वचनाचे पक्के आहेत. बोलल्या बोलास त्यांजकडून अंतर होणार नाहीं. असें जाणून पक्केपणें लक्ष राखून आहेत. कदाचित् सरकार आले, अगर आणि कोणी बाईबायको ह्मणून दाबाच्या गोष्टी सांगतील, तर तेंही सहन होणार नाहीं. सुभेदारांपेक्षां अधिक दाब राखून आहेत. जे गोष्ट होणें ते आपला दाब राखूनच व्हावी. इकडील महालच्या ऐवजाविशीं हरघडी पत्रें येतात. ते आपण वाजवीचे रुईनें मान्य करीत नाहीं ह्मणून कांहीं महालांस उपद्रव सरकारअनुमतें कोणीं केला, तर इकडे पाटीलबावांचें लक्ष पक्केपणें आहेच. उभयतां मिळून यावें. धंद्यासही कदाचित् पाटीलबावा कच्चेपक्के जाले तर आपल्या हातापायांतही कुवत आहे. भोपाळवाले पठाण टिकाइतार्शी बेरोख होऊन आले आहेत. त्यांशीं परवां बोलणें चालणें एकांतीं पक्केपणेंच जालें आहे. त्यांचे कबिले बंदोबस्त ठेवायास इंदुरांत जागा करून देविली. तीन हजार पठाण लगीं लाऊन ठेविले आहेत, परंतु मुख्यत्वें कायावाचामनेंकडून नानासाहेबांचें लक्ष पक्केपणें राखावें. त्यांजकडून उपेक्षाच जाली तर एक दोन वेळां सहन करून, सरकारचा शब्द सरकाराकडे लाऊन, पुढें जें कर्तव्य तें करावें. परंतु केवळ नम्र गोष्ट सांगायाचें ध्यान नाहीं. लग्नपट्टीच्या ऐवजाकरितां फार दिवस जाले ह्मणून जासूद रागें भरून बोलला, तितकें सहन जालें नाहीं. मजला एकांतीं बोलावून सांगितलें जे, आमचे येथें दरबारांत अधिकउण्या गोष्टी कोणीं बोलाव्या नी आह्मीं ऐकून घ्याव्या, असा पथ नाहीं. तुमच्या अंगांनीं जरी ताठून बोलले, तें देखील आह्मांस सहन होणार नाहीं. मग तुह्मीं कशास बोलावें? असाच श्रीमंत आमचा लाड बाळगीत आले आहेत आणि आह्मांसही त्याशिवाय दुसरें दैवत नाहीं. अतःपर तुह्मी आपल्या जासुदास सांगा, दरबारांत अधिकउणें बोलूं नको. कारकून जाबसाल करितात; आह्मी त्यांशीं बोलतच आहों." जासुदाचें बोलायाचें कारण काय? आह्मी तुमचे शिलेदार नाहीं. शिपाई आहों. पाहतां असें येथील इंगित आहे. तुकोजीबावांचें सरळपणें बाईस पत्र आलें ह्मणजे पेस्तर सालच्या ऐवजीं साऱ्या महालावर वर्गणी होऊन दोन लक्षांची सरबराई होईल. हें पत्र एकांतीं वाचून ठेवावें. फयश जाल्यानें सेवकाची येथें पत राहाणार नाहीं. हे विज्ञप्ती."

लेखांक ९८. ता. ८ जून इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. ज्येष्ठ शु॥ ८ शके १७०४.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ७रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमानः–ये प्रांतीं मवासांनीं भंवताला उपद्रव फारच दिला आहे. याकरितां दोन तीनशें फौज तयार करून, राजश्री राघो रणसोड सरपागे यांस समागमें देऊन, माळवे प्रांतीं रामपुऱ्याकडेस पाठविले आहेत. बऱ्हाणपुरीं देवजी गौळी आहेत. त्यांसही बाईनी लिहिलें जें, "इकडून आह्मीं फौज पाठविली आहे. तिकडून तुह्मीही दोन तीनशें लोकांनिशीं येऊन, दोहींकडून फौजा घालून रामपुरवाला व काटकूटवाला दोही मवासांचें पारिपत्य करणें." त्यास गौळ्यमजकुरांनीं पन्नास स्वार व दोन तीनशें पेंढारी पाठविले. ते पेंढारी यांचा मुलूख लुटूं लागले. पारिपत्य करणें एकीकडेच राहिलें. तें वर्तमान येथें बाईस कळलें. मग रागें भरून गौळीमजकुरास पत्र लिहिलें. त्यावर त्यांनीं पेंढारी बोलावून घेतले. पुढें फौज पाठवितात कीं नाहीं, न कळे. राजश्री चिमाजी बुळे झाबेवाल्या पाळेगारावर गेले होते. त्यांजवर छापा घातला. शें दोनशें माणूस उभयपक्षीं ठार जखमी जाहलीं. परंतु यांनीं जागा सोडली नाहीं. इंदुरींहून थोरली तोफही नेली होती. तोफेनें जेर जाले. झाबें सोडून गेले. बुळेमजकुरांनीं झाबें हस्तगत केलें ह्मणून वर्तमान आहे. राजश्री पाटीलबावांच्या लष्करांतून खेतसी सावकाराचा कासीद चौदा दिवसांचा आला. त्यानें जबानीं वर्तमान सांगितलें जें, "ग्वालेरीभंवताले पाटीलबावांनीं मोर्चेबंदी केली आहे. किल्ल्याचे पूर्वेस आपण आहेत. किल्ल्याचे शहरपन्ह्याची दिवाळ पन्नास पाऊणशें हात तोफा लावून ढांसळून दिली आहे. मातबर विहिरीचें पाणी बंद केलें आहे. किल्ल्यावर कोठें कोठे तळीं आहेत, तें पाणी किल्लेवाले पितात. किल्ल्यावर गोहजवाल्याची राणी आहे, व किल्लेदार निराळा होता. त्या किल्लेदाराशीं पाटीलबावांनीं सूत्र लाविलें होतें. त्याच्या अनुमतें किला हस्तगत व्हावा तों तें वर्तमान ते राणीस कळलें. तिनें तो किल्लेदार बोलावून तोफेचे तोंडीं देऊन उडविला. किल्ल्याचा बंदोबस्त मुस्तकीम केला. जागां जागां नाकेबंदीचीं माणसें फेरचौक्या ठेवितात. त्यावर दो चौ दिवसांत पाटीलबावा स्वारी करून किल्ल्याकडेस जात होते. तों किल्ल्यावरील गोलंदाजानें तोफेचा गोळा डागला. त्या

गोळ्यानें जरदा घोडा ठार जाला. एक दोघें माणसेंही ठार जालीं. फिरून स्वारी डेऱ्यास आली. खेरखेरात केली. लोकांनीं नजरा केल्या. पाटिलबावांखालील घोडा पडला किंवा कोतवाल घोडा पडला हें न कळे." याप्रमाणें वर्तमान कासीदानें जबानीं सांगितलें. इंग्रजांचा सलाहही पाटीलबावांच्या विद्यमानें होणार ह्मणून सांगत होता. श्रीमंत राजश्री दादासाहेब अद्याप सुरतेजवळीच आहेत. पाटीलबावांकडील कारकून राजश्री केसो अनंत दादासाहेबांकडेस गेले आहेत. त्यांचीं त्यांचीं बोलणीं होऊन कागदपत्रें पाटीलबावांकडेस आलीं आहेत. येथून उत्तरें जातील तेव्हां काय होणें तें होईल. ह्मणून हेंही सावकारी वर्तमान सेवेसीं श्रुत होय. राजश्री बाजीराव बर्वे यांच्या बंदोबस्ताविषयीं सरकारचीं आज्ञापत्रें बाईस व उभयतां सेवकांसही आलीं. तीं पत्रें पाहून बाईचें पत्र बाईस एकांती देऊन बोलणें जाहलें. तें पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलेंच आहे. सरकारचे आज्ञेप्रमाणें त्यांचा बंदोवस्त करावा, येविषयीं दोन चार वेळां बाईशीं बोललों व सरकारच्या पत्राचें उत्तरही मागितलें. ते वेळेस बाई बोलली जे, "मी बाजीरायांस एकांती बोलावून विचारितें. कदाचित् त्यांनीं ह्मटलें कीं, आह्मीं कोठें काय वावगी वर्तणूक केली, ती आमचे आंगीं लावा, तर त्यांचे आंगीं मुद्दा लावावा लागेल." आह्मीं उत्तर केलें जे, सरकारांत लिहून पाठवूं. तेथें काय घडलें असेल तें आज्ञापत्र पाठवितील. पक्केपणें शोध लागल्याशिवाय इतका विस्तार लिहिणार नाहींत. तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें उत्तरही करूं. बाई ह्मणाली जें, "आह्मांस तों कांहीं वावगी वर्तणूक आढळत नाहीं. बरें. त्यास विचारून तुह्मांशींही बोलूं, व श्रीमंतांच्या पत्राचें उत्तरही देऊं" असें बोलली. त्यावर दुसरे दिवशीं बर्व्यांस व त्यांचे कारकुनास एकांतीं बोलावून, काय विचारलें असेल तें विचारोत. तदोत्तर तिसरे दिवशीं बाईस विचारलें. त्यांनीं उत्तर केलें जे, तेथें तों कांहीं अढळत नाहीं. एक पाटीलबावांकडील पत्रें आलीं होतीं, तीं त्यांनीं आह्मांस दाखविलीं होतीं. त्याचीं उत्तरेंही आह्मींच सांगून आपलें रुबरू लिहून पाठविलीं. वावगी वर्तणूक पाहिल्यास आह्मी त्यांचा मुलाजा करणार नाहीं असें बोलली, व सरकारच्या पत्राचें उत्तरही याच अन्वयें लिहिलें आहे. आह्मांस उभयतांसही वाचून दाखविलें. त्याजवर विनंति जाली ह्मणजे मागून कासीदजोडीबरोबर सेवेसी पाठवूं. सरकारच्या लग्नपट्टीच्या दोन लक्षांचा जाबसाल, राजश्री तुकोजी होळकर यांचें पत्र बाईस आलें, त्यांत मजकूर लिहिला आहे की, बाईकडील महालांची बाकी त्यांनीं लिहून पाठविली असें ऐकिलें. परंतु

पहिलें बाईचें बोलणें आहे कीं इकडील सारे महालावर तफरीक करून ऐवज वसूल करून देऊं. तेथें सावकारांनीं वगैरे कांहीं बोभाट त्यांनीं सांगितला, तर तेथें श्रीमंतांनीं ऐकूं नये, असें बोलली होती. त्याप्रमाणेंच पेशजीं विनंतीपत्रीं लिहिलें आहे. त्यास तुकोजीबावांचें पत्र बाईस आल्यावर बाई आह्मां उभयतांशीं बोलली जे, "ज्येष्ठ अखेरीं लक्ष रुपये, व आषाढ अखेरीं लक्ष रुपये एकूण दोन लक्षांचा भरणा दों महिन्यांत करून देऊं" असें बोलली. त्याप्रमाणें पेशजीं विनंतिपत्रीं सेवेसी लिहिलें आहे. त्यास, सांप्रत वर्तमान ऐकिल्यांत आलें आहे जे, इकडे तमाम परगण्यांवर लष्करपट्टीची तफरीक करून कमाविसदारांस पत्रें लिहिलीं आहेत. एक कारकून तयार केला आहे. त्यास महालोमहालीं पाठवून महालकऱ्या कमाविसदारांस दाखवून ऐवज त्यांजकडे लागू करावा. त्यांची निशा पक्केपणें करून घ्यावी. मग येथून गुप्तरूपें दोन लक्षांच्या हुंड्या करून सरकारांत पाठवाव्या. जरकरितां कमाविसदारांनीं तुकोजीबावांच्या अगर सावकारांच्या पत्राचा उजूर केला, तर त्याप्रमाणेंच सरकारांत लिहून पाठवावें, जे उजूर करितील त्यांजकडून ऐवज तेथें घ्या ह्मणावें, असाही मजकूर ऐकिल्यांत आला आहे. कसा परिणाम लागेल तो पहावा. दुसरें वर्तमान डांकेचेंः—कासीदजोड्या ये प्रांतीं यांच्या तालुक्यांत जागां जागां आहेत. त्यास गांवोगांव कासीदजोड्यांस दोघांचें दळण व लाकूडफांटे व रातबिरात माणूस रहादारीस द्यावें, हा दस्तुर कोठेंही आहे. चालतच आहे. येथेंही हे देवितात. परंतु हा देश मवास, जागां जागां भिल्लांची वस्ती, यामुळें दळाई व लांकडाचे रातबिरातच्या माणसांचे नित्य येथें बोभाट येतात; यांसीं कटकट करीतच आहे. सांप्रत पर्जन्यकाळ आला. कासिदांस पाणीपावसाचे आसरा पाहिजे. यास्तव कासीद येथें आले कीं, ज्या गांवीं जोडी आहे त्या गांववाल्यांस ताकीद करवून, छपर अगर आसरा कांहीं करून देववा ह्मणून आले. यास्तव बाईकडेस जाऊन विनंति केली जे, "हा पर्जन्यकाळ आहे. कासिदांस, गांवगांववाल्यास ताकीद करून, एक एक छपर करून देवावें. इतके दिवस उन्हाळा होता. कशीही गुजराणी केली. आतां आसरा पाहिजे. यास्तव एक एक छपर करून देवावें. आणि दुकानांत राहूं देत नाहींत. कोठें चावडी देऊळ येथें उतारकऱ्यांचा उपद्रव. निखालस असलें ह्मणजे बरें." ह्मणून बोललों. ते रागें भरली. "कोठवर उपद्रव सोसावे? वरसोंवरीस यांची डांक बसली तर आह्मीं कोठवर यांस काय द्यावें? साफ आमच्यानें कांहीं देववत नाहीं. तुह्मी आपल्या धन्यास लिहून पाठवा." मीं उत्तर केलें जे, "हा घाकटा बोभाट धन्यास काय लिहावा? आपण धनीच येथें आहेत. उभयपक्षीं आह्मी चाकर.

इकडील काय सुक्त असुक्त वर्तमान काय येईल, तें आपल्यासच विनंति करावी." त्यास रागें भरून साफ बोलली जे, "आमच्यानें होत नाहीं. कासीद रोजमुरे खातात. त्यांनीं आपलें करून घ्यावें." असें बाईनीं उत्तर केलें. त्यास मीं असें लिहिलें म्हणून बोभाट लिहिला, असें यांस कळल्यास रागें भरतील. लहान मोठे जाबसालास झटावें लागतें. आधींच तो सेवक यांचे इतराजींत आहे. यास्तव कासिदांनींच बोभाट लिहिला म्हणून यांस परियायें लिहून डांकेचा बंदोबस्त करावा, म्हणून युक्तीच्या वाटेनें बाईस आज्ञापत्र यावें. म्हणजे बंदोबस्त करितील. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. पाटिलबावांच्या लष्करांतून वाणी आले. त्यांनीं सांगितलें जे, 'ज्यांस उचापती दिल्या त्यांजकडील पैसा येईना. दुसरें महागाई. वैरण नाहीं. रुपया फसला! बैलास वैरण मिळेना. यास्तव खराबा होऊन निघून आलों. लष्करांत पैसा नाहीं. धान्य नाहीं. वैरण नाहीं. असें संकट आहे ! ग्वालेर लवकर येण्याचा रंग दिसत नाहीं म्हणून आलों' म्हणाले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ९९. ता. १० जून इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि० ज्येष्ठ शु॥ १० शके १७०५.

"सेवेसी केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ९ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. श्रीमंतांच्या लग्नाच्या ऐवजाचा मजकूर बाईनीं करार केला आहे कीं, ज्येष्ठ अखेरीस लक्ष रुपये व आषाढ अखेरीस लक्ष रुपये, एकूण दोन लक्षांचा भरणा याप्रमाणें करून द्यावा, असें बोलण्यांत आलें. त्याप्रमाणें यांनीं इकडील महालांवर तफरीक करून कमाविसदारांकडे पत्रें पाठविलीं आहेत. तरतूद करितात. राजश्री पाटीलबावांच्या लष्करचें वर्तमान खेतसी सावकाराचे येथें पंधरा दिवसांचा कासीद लष्करांतून आला. तो जबानीं सांगत होता जे, "पाटीलबावांनीं ग्वालेरीस चहूंकडून मोर्चे लाविले आहेत. किल्ल्याचे वरील शहरपन्ह्याची दिवाळ पाऊणशें ऐशीं हात तोफांनीं ढांसळून दिली आहे. पाण्याची बावडीही उघडी पडली आहे. दोन कीं तीनशें दरवाजेही घेतले आहेत. वरते दोन दरवाजे मुस्तकीम आहेत. किल्लेदारांशीं कांहीं पाटीलबावांनीं सूत्र लाविलें होतें. किल्ला हस्तगत होण्याची गोष्टमात लागली होती. तें वर्तमान, गोहजवाल्याची राणी किल्ल्यावर आहे, तिजला हें

वर्तमान कळलें. ते समयींच किल्लेदारास आणून तोफेचे तोंडीं देऊन उडवून दिला. पक्केपणें किल्ल्याचा बंदोबस्त केला. तिसरे दिवशीं किल्ल्यावरील शिबंदीच्या मिसळी पालट करितात. किल्ल्यावर पाण्याची दुर्मिळता जाहली आहे. पर्जन्य लवकर न पडला तर पाण्यावांचून घाबरतील. दुसरें वर्तमान, पाटीलबावांची स्वारी किल्ल्याकडेस जात होती. त्यास किल्ल्यावर गोलंदाज फिरंगी आहे, त्यानें स्वारीवर गोळा डागला. त्या गोळ्यानें जरदा घोडा ठार जाला. एक दोन मनुष्यही ठार जाले. स्वारी फिरून डेऱ्यास आली. खेरखैरात केली. घोडा कोतवाल होता की त्याच घोड्यावर पाटीलबावा बसले होते, इतकें ठाऊक नाहीं" ह्मणाला. याप्रमाणें सावकारी कासिदानें जबानीं वर्तमान सांगितलें. खेतसीचे दुकानीं शोध केला. त्यांनींही सांगितलें जे, कागदपत्रीं वर्तमान कांहीं नाहीं. कासीद जबानीं सांगतो. याप्रमाणें ऐकिलें वर्तमान. राजश्री चिमाजी बुळे झाब्यास लागले होते. बाईनीं इंदुरीहून मातबर तोफ दिली होती. त्या तोफेचें तोंड एक दोन बारांत निघून पडलें, परंतु तोफ बरीच लागू जाली. पाळेगारानें बाहेर निघून यांजवर छापाही घातला. उभयपक्षीं दोन अडीचशें माणूस कामास आलें, परंतु खेत सोडलें नाहीं. त्यास हटवून किल्ल्यांत घातलें. तोफांच्या आवाजानें पाणी किल्ल्यांतील नाबूद जालें व आंतील महालही त्यांचे तोफेच्या गोळ्यानें पडले. खायासही नाहीं. यामुळें झाबेंची गढी सोडून मवास डोंगरांत निघून गेला. गढी हस्तगत केली ह्मणून वर्तमान ऐकिलें. अद्याप कागदींपत्रीं नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेब जेथें आहेत तेथेंच आहेत ह्मणून वर्तमान ऐकितों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापना. "

लेखांक १००. ता० १८ जून इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. ज्येष्ठ वा॥ ४ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १७ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः- इकडील वर्तमान पेशजी विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. अलीकडे सरकारचे जासूदजोडीबरोबर श्रीमंतांचे लग्नपट्टीच्या ऐवजाकरितां सरकारची पत्रें केसो भिकाजीस व अहल्याबाईस आलीं जे, तिघां सावकारांस एक लक्ष अठ्याण्णव हजार एकशें रुपये तेथून हुंड्या करून पुण्यास सावकारांस ऐवज पावता करणें ह्मणून आज्ञापत्रें व सावकाराच्या वराता छ १२ मिनहूस संध्याकाळीं येथें दाखल जालीं. ते दिवशीं शुक्रवारची रात्र. त्यावर दोन तीन दिवस बाईस दाखवायास समय

सांपडला नाहीं. तदोत्तर काल चंद्र १६ रोजीं तृतीय प्रहरीं, केसोपंत व मी उभयतांही सरकारचीं पत्रें व सावकाराच्या वराता घेऊन दरबारास गेलों. दरबार भरला होता. चौ घटकांनीं कांहीं लोक बरखास्त जाले. दिवाण मुत्सद्दी होतेच. ते समयीं सरकारचीं आज्ञापत्रें बाईस दिलीं. राजश्री मुकुंदराव हरी दिवाण यांनीं वाचून दाखविलीं. सावकारांनींही आलाहिदा आपले जासुदाबरोबर पत्रें बाईस पाठविलीं होतीं. तींही दाखविलीं. ऐकून घेतलीं. कांहीं उत्तरें केलीं नाहीं. त्यावर दोन घटका दिवस राहतां दरबार बरखास्त जाला. बाई उठली. ते समयीं केसोपंत बोलले कीं, सरकारचीं पत्रें आमचे जोडीबरोबर आलीं व सावकाराचाही जासूद आला आहे. त्यास बाईनीं उत्तर केलें जे, सावकाराच्या जासुदास आमचीं व तुमचीं उत्तरें देऊन रवाना करा. ऐवजाचा मजकूर तुह्मांशीं आह्मी बोललोंच आहों. तुह्मी येथें आहांच. मग जासूद कशास पाहिजे? इतका जाबसाल जाला. ऐवजाविषयीं बाई पहिलें बोलली आहेत कीं, ज्येष्ठ अखेरीस निमे व आषाढ अखेरीस निमे असा दोन लक्षांचा झाडा करून देऊं. त्यास बाईनींही येथून साऱ्या महालांवर तफरीक करून वराता व कारकून पाठविला आहे. ज्येष्ठ अखेरीसही दहा बारा दिवस राहिले आहेत. ऐवजाची तोड जशी पडेल त्याप्रमाणें सेवेसीं लिहूं. जालें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १०१. ता० २७ जून इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. ज्येष्ठ व॥ १३ शके १७०५.

"सेवेसी केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रजबपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनें-करून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः— इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावतील. सांप्रत येथें अधिकोत्तर ह्मटलें तर श्रीमंत राजश्री दादासाहेब परिवारासहित पुण्यास जातात. सोनगडापर्यंत आले आहेत. ह्मणून बाजारी वर्तमान ऐकिल्यांत आलें. सावकाऱ्यांत अगर बाईकडे कागदीपत्रीं वर्तमान नाहीं. आणीकही बारीक शोध करीतच आहें. राजश्री पाटीलबावा ग्वालेरीसच आहेत. चहूंकडून मोर्चे लाविले आहेत. तोफा लावल्या आहेत. किल्लाही जेर आहे. परंतु अद्याप हस्तगत जाल्याचें वर्तमान आलें नाहीं. दुसरें, राजश्री बाजीराव बर्वे यांची स्त्री सौभाग्यवती जानकीबाई चंद्र २२ मिनहूस रेवा दक्षिणतीरीं आली. तेच दिवशीं अस्पर्श

जाली. यास्तव चार पांच दिवस तिकडेच होती. चंद्र २६ रोज भृगुवारीं मुहूर्तेकडून रेवा उतरून अलीकडेस आली. बाजीराव बर्वे जेथें उतरले आहेत तेथें गेली.''

पैवस्ती चंद्र १८ साबान. **लेखांक १०२.** ता. १२ जुलई इ. स. १७८३.
अर्बा समानीन बराबर डाक. **श्रीगजानन.** मि. आषाढ शु॥ १३ शके १७०५.

''सेवेसी केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ११ साबानपरियंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर व काशीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रत श्रीमंतांच्या लग्नाचीं वस्त्रें व बहुमान सरकारच्या हुजऱ्याबरोबर स्वामींनीं चंद्र १२ रजबीं रवाना केलीं, ते चंद्र ८ साबानीं दो प्रहरां येथें सेवकाजवळ दाखल जालीं. सेवकासही आज्ञापत्रें होतीं. त्यांत आज्ञा जे, श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लग्नाचीं वस्त्रें व बहुमान गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई होळकर यांस येणेंप्रमाणेंः–

१ माळ मोत्यांची मोती सुमार एकशें अठरा ११८.

४ कापड सणगेंः–

१ पातळ जरी पैठणी
१ व चोळी पैठणी
२ व शाल फर्द सफेत
४

५

एकूण चार वस्त्रें व एक माळ मोत्यांची पाठविली आहे. पावती करून उत्तर घेऊन पाठवणें ह्मणून आज्ञा. त्यास, पुण्यांत लग्नाचा समारंभ जाला, तो ऐकून श्रवणद्वारें फारच तृप्तता जाली. सांप्रत उत्साहाचीं वस्त्रें व बहुमान येथें आलीं, तेंही समारंभेंकरूनच पावावीं या अर्थीं, राजश्री बाजीराव बर्वे मंडळीसुद्धां बोलविले. बाईकडून तबक व परात रुप्याची आणवून, त्यांत वस्त्रें घालून व पानसुपारी तबकांत घालून, वाजंत्री कर्णेकरी ताफे बोलाऊन सिद्धता केली. वाड्यांत बाईकडेस सांगून पाठविलें जे, श्रीमंतांकडून वस्त्रें आपल्यास आलीं आहेत, ते घेऊन येतों. त्यांनींही दरबार करून बसली. 'या' ह्मणून सांगून पाठविलें. पांच घटका दिवस शेष राहातां, समारंभेंकरून वाड्यात गेलों.

बाईनींही समारंभ, गृहस्थमंडळी व वाजंत्री हें पाहून बहुत संतोष पावली. मुत्सद्दी बगैरे दरबार भरलाच होता. तबकें बाईपुढें ठेविलीं. सरकारचीं पत्रें हुजऱ्यांनीं पुढें ठेविलीं. तदोत्तर पातळ व चोळी बाईच्या हातीं दिली, शालजोडी पांघरविली, व मोत्यांची माळही सेवकांनींच बाईच्या गळां घातली. बहुत संतोषानें वस्त्रें बहुमान बाईनीं घेतला. विडे सर्वांस दिले. बाई बोलली जे, "आह्मांस व सर्व जगतास अलभ्य लाभ, सूर्योदय जाला त्या प्रभूच्या प्रकाशेंकडून सर्वी सर्वत्र आह्मांस आनंद जाला. हे दिवस दृष्टीं पडतील असा कोणासही भरंवसा नवता. परंतु कैलासवासी श्रीमंतांच्या पुण्योदयें व जगताच्या भाग्येंकडून जगत्कुटुंबी प्रभु ईश्वरें उत्पन्न केला." पंडित दोन चार समागमें घेऊन गेलों होतों. ते व सर्व सभामंडळींनीं श्रीमंतांचे गुणानुवाद वर्णन केले. पंडितांनीं आशीर्वादपर स्तुति केली. तदोत्तर बाईनीं हुजऱ्यास वर्तमान विचारलें. हुजऱ्यांनीं श्रीमंतांच्या शब्दरत्नाचें व सगुणपणाचें वर्णन व स्वामींच्या कर्तृत्वाचा बयान फार केला. बाईस व मजलसीस आश्चर्य जालें. तदोत्तर राजकी वर्तमान विचारलें. बिदरूर इंग्रजांनीं घेतलें होतें, तें परतून टिपूनें इंग्रजांचें पारपत्य करून संस्थान हस्तगत केलें. त्यावर इंग्रज मुंबईहून फिरून जमाव करून टिपूवर जात होते. ते मधेंच घोलपांनीं समुद्रांत पारपत्य करून जाहजासुद्धां सरदार धरले. इंग्रज शरण आले. असें बहुत वर्तमान सांगितलें. चार घटकांपर्यंत वर्तमान ऐकत बसली होती. फारच संतोष पावली. तदोत्तर संध्येचा समय होत आला ह्मणून विडे देऊन बिदा केलें. याप्रमाणें श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून समारंभ येथें जाला. सेवेसी श्रुत होय. बाईच्या लेंकीस व नातांस दोन पोशाग आणीक असते ह्मणजे बरें होतें. धन्याची मर्जी! राजकी वर्तमानः—श्रीमंत राजश्री दादासाहेब कोंडाईबारीच्या घांटावर दहिवलीस आले ह्मणून बाजारी वर्तमान. दादासाहेबांस घेऊन येयास चौघे सरदार पाठविले ह्मणून स्वामींनीं बाईस व सेवकास पत्रें डांकेबरोबर पाठविलीं होतीं. तें पावती करून बाईचें उत्तर घेऊन सेवेसी पाठविले आहेत. हुजऱ्याचीही आठा चौ दिवसां रवानगी करतील, तेव्हां वस्त्रें बहुमान पावल्याचीं उत्तरें घेऊन सेवेसी पाठऊं. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान कोणी गृहस्थाचे येथें विसां दिवसांचीं पत्रें आलीं. त्यांत मजकूर होता जे, "उरंबवीकडून पायवाट किल्ल्यावर जायाची जाली आहे, व किल्ल्याच्या शहरपन्ह्याच्या मुढोली ढांसळल्या. हल्ला करायाजोगें जालें आहे. किल्लेवालेही गिराणीस आले आहेत. दिल्लीवाला अमदानी नजीबखानाचा चेला तो दिल्लीस आहे. परंतु त्यानें कोणी मातबर माणूस पाटीलबावांकडेस पाठविला आहे, तोही जवळ आला आहे. त्याचेहि भेटीस जाणार. पाटीलबावांची

स्त्री उज्जनीहून गेली, तेही आषाढ शुद्ध ५ पोंहचणार होती. यांची भेट घेतल्यावर त्या भल्या माणसाच्या भेटीस जाणार. किल्ल्यावर हल्ला करायाचीही मसलत आहे. याप्रमाणें वर्तमान होतें. व्यंकटरमण शास्त्री यांस देवाज्ञा जाली. हें वर्तमान पूर्वी डाकेबरोबर सेवेसी लिहिलें होतें. त्यास समाधान नव्हतें. तेव्हां बाईनीं दोनशें रुपये औषधउपायास दिल्हे होते. क्रियेसाठीं तीनशें रुपये दिल्हे. तेरावे दिवशीं त्यांच्या घरास जाऊन मुलास वस्त्रशेला एक दिल्हा. श्रीमंत राजश्री दादासाहेब पिंपळनेरास आले, ह्मणोन आजच सावकारी वर्तमान आलें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक १०३. ता. २४ जुलई इ.स. १७८३.

पो चंद्र ३ रमजान अर्बा. **श्रीगजानन.** मि. आषाढ वा ११ शके १७०५.

सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २३ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मु॥ महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर दोन तीन विनंतिपत्रें सेवेसी पाठविलीं. पावलीं असतील. सरकारचीं वस्त्रें लग्नांचीं हुजरे घेऊन आले होते, तीं आज्ञेप्रमाणें बाईस पावतीं करून वर्तमान पेशजीं लिहिलेंच होतें. मागाहून हुजऱ्यांचीही बाईनीं रवानगी केली. चंद्र १८ मिनहूस हुजरे येथून रवाना केले. इकडे पर्जन्य आर्द्रा पुनर्वसूपासून फार लागला आहे. रेवेस पाणी फार आलें आहे. तीन चार दिवस नावा बंद होत्या. आतां चालतात. श्रीमंतांच्या लग्नपट्टीचा ऐवज दोन लक्ष रुपये येणें त्याविषयीं वरात येतांच बाईस दाखविली. तो पर्याय पेशजीं लिहिलाच आहे. तदोत्तर राजश्री तुकोजीबावांचें पत्र आल्यावर, बाईनीं एकांती मी व केसो भिकाजी उभयतांनीं सरकारचीं पत्रें दाखवून, ऐवज लवकर द्यावा ह्मणून बोललों. त्यास बाईनीं उत्तर केलें जे, निमे ज्येष्ठ अखेरीं, निमे आषाढ अखेरीस देऊं. आह्मीं विनंति केली जें, याप्रमाणेंच आह्मी श्रीमंतांस लिहितों. (लिहा) ह्मणून बोलली. त्यावर मध्येंही एकदोन वेळां बाईशीं खरें केलें जे, आपण आज्ञा केली ज्येष्ठ अखेर व आषाढ अखेर. त्याप्रमाणेंच श्रीमंतांस आह्मीं लिहिलें आहे. (बरें) ह्मणाली. ज्येष्ठ अखेरीस ऐवजाविषयीं हटकलें. ते वेळेस बाई बोलली जें, 'वराता महालोंमहालीं गेल्या आहेत, ऐवज आला ह्मणजे देऊं.' आह्मीं विनंही केली जे, आपण आज्ञा केली होती ज्येष्ठ अखेर व आषाढ अखेर. त्या वेळेस बोलली जें, 'आह्मीं असा करार नाहीं केला. खरें खोटें करावें, तर थोर मनुष्य. त्यांतही मर्जी

नाजूक. यास्तव उगेंच राहिलों. त्यावर एक दोन वेळां हटकलें. विनंति केली जें, 'एक निश्चयपूर्वक बोलावें?' त्यास बोलली जें, 'आह्मी निश्चय करीत नाहीं. ऐवज लवकरच येईल. दोनदां करून देऊं.' त्यावर चंद्र २० रोजीं हटकलें. राजश्री केसो भिकाजी व मी उभयतांही बोललों. ते वेळेस बोलली जें, 'बाळाजी फडणिसांकडेस जाऊन ऐवजाची निशा करून घेणें.' राजश्री गोविंद रघुनाथ जवळ होते. त्यांसही बाईनी सांगितले जें, 'तुह्मी या उभयतांस मुकुंदरायाकडेस घेऊन जाऊन, बाळाजी व मुकुंदरायांस सांगा की, यांच्या ऐवजाची यांची निशा करून देणें. हुडी करून देणें.' असे सांगितलें. त्यांजकडे गेलों. तेव्हां त्यांनी सांगितलें जे, ऐवज पदरीं घेतां की हुंडी करून द्यावी? आह्मीं उत्तर केले जें, 'आह्मीं ऐवज पदरीं घ्यावा अशी आह्मांस आज्ञा नाही. श्रीमंतानींच तुह्मांस लिहिले आहे की, परभारें सावकाराच्या वराता तुह्माकडेस पाठविल्या आहेत; वराताप्रमाणे ऐवज ज्यांचा त्यास येथून हुंड्या करून त्यांस पावता करावा. मुकुंदराव बोलले जें, 'आह्मी एकच हुंडी करून श्रीमंतांकडेस निमे ऐवज आतां पाठवितों. तेथे श्रीमत सावकारांस वांटणी करून देतील.' तेव्हां केसो भिकाजी बोलले जे, 'सावकारांस ऐवज तोडून दिला आहे. त्याच्या वराता व माणसे आली आहेत. वांटणीप्रमाणें ज्याचा त्यास हुंड्या करून पाठवाव्या.' त्यास ते बोलले जें, 'हुंडी एकच करावी. त्यांत तिघाचे नांवें तपशील लिहावा.' त्यास सारा ऐवज देवा ह्मटलें. ते ह्मणाले जें, 'निमे लक्ष रुपये आतां देतों. लाख रुपये श्रावण अखेरीस देऊं.' आह्मी बोललों जे, 'माघात लग्नसमयी सरकारांत सावकारापासून ऐवज अगर वस्तभाव घेतल्या, तेव्हांपासून आजपर्यंत व्याज काय जालें? अझूनही श्रावणअखेर ह्मणतात. तेव्हा दोचे पावणे दोन जाले. यांत सरकारचा नुकसानी आहे. जें करणें तें समजून करा. सरकारचा शब्द तुह्मांस लागेल.' ते बोलले जे, 'ऐवजाचें काम आहे. महालांतून ऐवज गोळा होऊन आला पाहिजे. तोंडच्या गोष्टी नाहीत.' असें कित्येक बोलले. 'बरे. असो. निमेच्याच आज हुंड्या द्या, ह्मणजे दहा बारा दिवसात जाऊन पोंहचतील.' त्यास त्यांनीं उत्तर केलें जे, 'सावकार बोलाविले आहेत. इंदुरींहून हुंडणावळीचा भाव आणविला आहे. तो आला ह्मणजे तोडमोड करावयास चार दिवस लागतील. श्रावण शुद्ध प्रतिपदेस हुंडी तुमच्या हवालां करूं.' असा करार जाला. त्यावर दोन तीन दिवस पावसाची झड लागली होती. आजही केसोपंत व मी बाईकडेस जाऊन बहुत प्रकारें सांगितलें. सावकाराचें व्याजबट्टा मनोतीचेंही समजाऊन सांगितलें. निमे निमेची तरी लवकर हुडी दिली, तर दहा दिवसां पोंहचेल. तितकीच व्याजमनोतीची सवलत पडेल. सरकारकिफायत होईल. तितकी आपण

करावी. बाई बोलली जें, 'लवकरीच करून देवविते.' असें बोलली आहे. परंतु श्रावण शुद्ध प्रतिपदा खरी. अलीकडेही हटकीतच आहों. हुंडी आली ह्मणजे सावकारांचे माणूस केसोपंतांनीं ठेऊन घेतले आहेत, त्यांजबरोबर हुंडी देऊन रवाना करूं. आजपावतर ऐवजाचा जाबसाल इतका जाला. वरकड राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान अलीकडे कांहीं आलें नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या व राजश्री हरिपंततात्या व तुकोजी होळकर वगैरे सरदारांच्या भेटी चांदवडापलीकडे तीन कोसांवर छ १५ मिनहूस जाल्या. दुसरे दिवशीं कुंभारीधरणगावावर गंगातीरीं मुक्काम आहेत ह्मणून नवां दिवसांचीं पत्रें येथें आलीं. ग्वालेर अद्याप सर जाली नाहीं ह्मणून सावकारी वर्तमान. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १०४. ता० २८ जुलई इ० स० १७८३.
श्रीगजानन. मि. आषाढ वा॥ १४ शके १७०५.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीः—

आज्ञांकित सेवक विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ साबानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः— इकडील वर्तमान पेशजी विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान, श्रीमंतांच्या लग्नपट्टीचा ऐवज होळकराकडून दोन लक्ष रुपये येणें. त्यांपैकीं एक लक्ष तीस हजार रुपयांच्या हुंड्या खेतसी पदमसी सावकार यांनीं येथून करून दिल्या. तेथे खेतसी पदमसीचें दुकान आहे. हुंड्या तिघां सावकारांच्या नावें आहेत. बाई ह्मणाली जें, 'एकंदर ऐवज श्रीमंतांकडेस पाठवावा; तेथें सावकारांस वांटून देतील.' असें ह्मणत होती. परंतु सावकारांचे मनुष्य येथें राजश्री केसोपंतांनीं ठेऊन घेतले होते. यास्तव सावकारांचे नांवेंच हुंड्या करून काल चंद्र २६ साबानीं संध्याकाळीं बाईनीं आह्मां उभयतांस बोलावून दिल्या. बाकीचा ऐवजही श्रावण अखेरीस देऊं ह्मणाली. अलीकडेसच ऐवज आला, तर अलीकडेसच देऊं, ह्मणाली. सावकारांच्या माणसांबरोबर हुंड्या रवाना केल्या आहेत. सेवेसीं श्रुत होय. राजश्री बाजीराव बर्वे यांस सरकारचीं आज्ञापत्रें व बाईस सरकारचें व आपलीं पत्रें डांकेबरोबर चंद्र १६स रवाना केलीं. तीं चंद्र २४ मिनहूस येथे पावलीं. दुसरे दिवशीं बाईच्या समक्ष बाजीरायांस बोलावून आणून, बाईनीं सारीं पत्रें श्रवण करून त्यां दिलीं. बर्वे यांची स्त्री माहेरास गेली आहे. त्यास पंधरा दिवस जाले. तेथून निघाली आहे. एक दों रोजांनीं येथें येईल. ती आली ह्मणजे बाजीरायाची रवानगी

येथून लवकरच होईल. मागाहून लिहीन. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमानः– किल्यावरील सुरबावीवरून वाट तोफांनीं केली आहे. हल्ला करून किल्ला घेणार. आमदानीकडील भला माणूस आला होता. त्यास भेटायास पाटीलबावा गेले होते. त्यांचा यांचा करारमदार जाला कीं, आमचे मदतीस तुह्मीं येत जावें. तुमचे मदतीस आह्मी येत जाऊं. याप्रमाणें करारमदार होऊन, त्यास दिल्लीस आमदानीकडे रवाना करून, पाटीलबावा ग्वालेरीस आले. श्रीमंत राजश्री दादासाहेब कोपरगांवास सरकारची हवेली आहे–शुक्लेश्वराजवळ–तेथें रहावयाचा निश्चय जाला, तिकडेस गेले. ह्मणून येथें वर्तमान आलें. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १०५. ता. १३ आगष्ट इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. श्रावण व॥ १ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १४ रमजानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेषः– येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून चंद्र ६ मिनहूस कासीदजोडीबरोबर रवाना केलीं आहेत. सांप्रत छ ६ मिनहूस त्रितीय प्रहरीं, राजश्री केसोपंत व मी दरबारास गेलों. ब्राह्मणसंतर्पणाचा हजूम होता. त्यास घडीभर बसून केसोपंतांनीं बाईशीं बोलले कीं, सरकारची फर्मास धोतरजोड्यांची आली आहे. त्यास मारू पांच सात बोलावून, त्यांस धोतरजोडे तयार करायास सांगितले आहेत. जोड्यांच्या लांबीरुंदीची आज्ञा सरकारची आली होती, त्याप्रमाणें मारूंस प्रमाण सांगून, प्रस्तुत पांच सात करविले आहेत. धोतरजोड्यांचें मोल पंचवीस रुपयेपासून वरते पसतीस चाळीस-पर्यंत करावयास सांगितले आहेत. त्यास मारूंनीं खर्चास मागितलें. यास्तव दोन चारशें रुपये आह्मांकडेस तसलमातीस द्या, जसा खर्च होईल तसें लिहून ठेऊं. सरकारांत लिहून पाठवूं. ऐवजाची जिकडे आज्ञा येईल तिकडून आपला भरणा करूं, अगर आपल्यकाडेच आज्ञा आली तर तसेंच होईल. बाईनीं उत्तर केलें जें, "धोतरजोडे तुह्मीं कोणत्या मारूस सांगितले आहेत, ते कसे करितात. उतरून येऊं द्या. पाहूं. त्याचें मोल करूं. सरकारांत पसंत पडतील तसे घेतले पाहिजेत. मोल चौकशीनें केलें पाहिजे. येथें घेऊन या. पाहून चौकशी करून रुपया जो लागेल तो देऊं. मजकूर काय? असेंही करितां पांचशें रुपये लागतील. त्यास तसलमात कशास पाहिजे? तत्रापि श्रीमंतांस धोतरजोडे पाठवणें त्याचा

मजकूर तेथें लिहिणें कशास? रुपया आह्मीच देऊन माफजतीनें रवानाही करूं." असें उत्तर केलें. त्यावर त्यांनीं उत्तर केलें जें, "श्रीमंतांनीं आह्मांसच लिहिलें आहे. आह्मी चौकशीनें मोल करून खरेदी करूं. आपल्यासही दाखवूं. परंतु आह्मीं पाठविले पाहिजेत. रुपयांविषयीं तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें तुमचा भरणा करूं." त्यास बाई बोलली जें, "तुमच्या चित्तांत आपणच परभारां घेऊन पाठवून द्यावे; आपला मुजरा व्हावा. त्यास फार चांगलें आहे. त्यापक्षीं आह्मांस दाखवितां कशास, आणि रुपयाही कशास आह्मांस मागतां? तुह्मीच आपले खरेदी करून पाठवून द्या. रुपया आह्मी देणार नाहीं." याप्रमाणें उत्तर बाईनीं केलें. बाईची मर्जी कडवी जाली. आपण उठून ब्राह्मणांकडेस गेली. आह्मी आपल्या बिऱ्हाडास आलों. केसोपंतांस मीं सांगितलें जें, "बाईच्या विद्यमानें घेतल्यास चौकशीही करितील. रुपयाहि जो लागेल तो देतील. जो ऐवज खर्च होईल तो आपण श्रीमंतांस लिहून पाठवूं. जसें त्यांचे मर्जीस येईल तसें करितील." मशारनिल्हे बोलले जे, "अशी सरकारची मर्जी असती, तर पहिलेंच त्यांस लिहितें. आपण असें केल्यास रागें भरतील. यास्तव आपले आपणच जोडे करवून, कोठे कर्जवाम करून घेऊन पाठवावे." त्याप्रमाणें तेरा जोडे तयार करविले. मोलही निकशीनें केलें. दोनशें अठ्याहत्तर रुपयांचे तेरा धोतरजोडे व एक शेला सफेत जामेवार, सूत चांगलें, आपले पसंतीस पडेल ह्मणून तेवीस रुपयांचा घेऊन, एकून चवदा ठाणें तीनशें एक रुपयांस खरेदी करून, जासूदजोडीबरोबर चंद्र १३ रोजीं येथून रवाना केलीं. भालेरायाचे स्वारही रवाना केले आहेत. त्यांच्या उंटावर घालून पाठविले आहेत. सेवेसी पावतील. बाकीचेही सात जोडे तयार करविले आहेत. ऐवज कर्जाऊ घेतला. बाईचें मानस होतें जे, धोतरजोड्यांस ऐवज चार पांचशें जो लागेल, तो आपणच द्यावा. श्रीमंतांच्या धोतरजोड्यांचा ऐवज मुजरा घेऊं नये, असें होतें. परंतु आज्ञेप्रमाणें केलें. खर्च किरकोळ खाद्या व मोमजामा यांस व हुंडणावळ अधिक लागली. कर्ज घेणें लागलें. सारा खर्च तपशीलवार धोतरजोड्यांबरोबर विनंतिपत्रीं लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होईल. परंतु बाईची मर्जी आह्मांसीं कडवी जाली. परंतु सरकारची आज्ञा. सरकारचा पैसा न खर्च होतां कार्य होयाचें होतें? असें जाल्यास स्वामी रागें भरतील कीं काय ह्मणून असें केलें. येथें सूत चांगलें, परंतु रेशीम चांगलें नाहीं. या सुतास पैठणचे रेशीम असावें.

राजश्री पाटीलबावांनीं चंद्र १ मिनहूस लष्करांतून बाईस पत्रें लिहून पाठविलीं. तीं चंद्र १२ रोजीं दोंप्रहरीं येथें पावलीं. त्यांत मजकूर होता जें, श्रावण शुद्ध

द्वितीयेस प्रातःकाळीं ग्वालेरच्या किल्ल्यावर हल्ला करून किल्ला घेतला. सातशें माणूस वरतें होतें, तें कापून काढलें. दोन तीनशें माणूस यांचेंही जखमी ठार जालें. गोहजवाल्याची बायको वरती होती, ती दारूनें उडून गेली. याप्रमाणें होऊन किल्ला फत्ते जाला. येथील बदोबस्त होऊन, भंवताल्या चार गढ्या आहेत त्या घेऊन, गोहजही थोडक्या दिवसांतच घेतों. ह्मणून लिहिलें होतें. बाईसही बहुत संतोष जाला. संध्याकाळीं तीन तोफा सोडल्या. याप्रमाणें ग्वालेरचें वर्तमानही आलें. राजश्री शिवबा बाजी पारनेरकर काशीयात्रा करून उज्जनीस आले आहेत. येथेंही बाईचे भेटीस येणार. गुजराथचें वर्तमानः– येथें ब्राह्मण देकारास आले, तेही सांगत होते व सावकाऱ्यांतही ऐकलें की, गुजराथप्रांतचे सरकारचे महाल जितके आहेत अमदाबादसुद्धां, तितक्यांजवळून राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांनीं सात लक्ष रुपये घेतले. रयत ताराण जाली. अमदाबाद निमे बेचिराख जाली. मुलकांत हलत कांहीं राहिली नाहीं. सरकारचे फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. गायकवाडांनीं आपले महाल आबांत ठेविले आहेत. याप्रमाणें तिकडील वर्तमान आलें. हिंदुस्थानचें वर्तमान तर, राजेरजवाडे आपसांत दुंद आहेत. परंतु ग्वालेरच्या दाबानें सर्वांस कळलें जें, दक्षणी फौजा आहेत. पादशाहा दिल्लीत आहेत. परंतु आमदानी वगैरे नजीबखानाचे चेले आहेत, त्यांच्या बसांत आहेत.

येथील वर्तमानः–सांप्रत श्रावणमासचा उत्साह आहे. नित्य अडीच तीन हजार ब्राह्मणभोजन होत आहे. दोन तीनशें ब्राह्मण लिंगाच्या अनुष्ठानास लाविले आहेत. शेंदोनशें ब्राह्मण शिवकवचास लावले आहेत. शेंदीडशें ब्राह्मण शिवनामस्मरणजपास लावले आहेत. शेंपन्नास सूर्यनमस्कारास लावले आहेत. शिवाय पचवीस सारे ब्राह्मणांस दक्षणा दिली. देशस्त व तेलंग दोन हजारपर्यंत होते. त्यांस तीन रुपयेपासून पांच रुपयेपर्यंत दक्षणा जाली, व रांगडे दोन अडीच हजार आले होते, त्यांस पावलीपासून रुपयापर्यंत दक्षणा दिली. पुढें जाणारे ब्राह्मण गेले. आतां तीन साडेतीन हजार ब्राह्मण आहेत. छत्रांत अडीच तीन हजार जेवतात. चारपांचशें ब्राह्मणांस शिधा नित्य देतात. भोजनदक्षणा रोज दोन तीन पैसे देतात. जन्मअष्टमीस एक एक रुपया देतील. आतां अनुष्ठानाचे ब्राह्मणांची दक्षणा मात्र राहिली आहे. लिंगेवाल्यांस आठ रुपये, जपवाल्यास पांच, शिवकवचास आठ नऊ, नमस्काऱ्यांस दहा नऊ देतील, अशी पद्धत आहे. प्रत्येक पदार्थ पक्कान्न करितात. थोडेंथोडें करितात. नित्य दक्षणा दोन पैसे. मध्यें एकदां एक एक

रुपया देतील. याशिवाय शिध्याचे दोन तीनशें ब्राह्मण. नित्य शिधा श्रावणमास-पर्यंत चालतो. संतर्पणही मासभर होईल. ब्राह्मणांचीं भोजनें जाल्यावर चार घटका दिवस राहतां, बाई स्नान करून घटका दोन घटका दिवस राहतां भोजन करितात. तेथेंही पंगतीस पंचवीस तीस ब्राह्मण असतात. याप्रमाणें सांप्रतचें वर्तमान. श्रीमहांकाळेश्वर उज्जनीस पंचवीस ब्राह्मण श्रावणमासचे अनुष्ठानास व श्रीओंकारेश्वरास पंचवीस ब्राह्मण प्रतिवर्षी जातात. आतांही गेले आहेत. सेवेसी श्रुत होय. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति."

लेखांक १०६. ता. १३ आगष्ट इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. श्रावण व॥ १ शके १७०५.

"श्रियाविराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीः—

सेवक विठ्ठल शामराज साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १४ रमजानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेषः– बहुत दिवस जाले, आपलें पत्र येऊन वर्तमान कांहीं कळत नाहीं. तर कृपापत्र पाठवीत जावें. इकडील वर्तमान श्रीमंतांस विनंतिपत्रीं लिहिलें आहे. त्यावरून विदित होईल. नवल विशेष वर्तमानः— राजश्री पाटीलबावांनीं ग्वालेरचा किल्ला श्रावण शुद्ध द्वितीयेस हल्ला करून घेतला. तेथें पत्रें आलीं. बाईनींही ऐकून तीन तोफांचे आवाज केले. वरकडः–सांप्रत येथें श्रावणमासचा उत्साह एक महिनापर्यंत अडीच तीन हजार ब्राह्मणभोजन नित्य होत आहे. आपल्या पत्रांत श्रीमंतांचा लाखोटा घालून पाठविला आहे. हा एकांतीं द्यावा. याचें उत्तरही श्रीमंतांस विनंति करून मागावें. उत्तर देयाची आज्ञा जाली, तर घेऊन पाठवावें. बाईच लक्ष श्रीमंत राजश्री नानासाहेबांच्या पायांशीं फार आहे. त्यास बाईसही एखादें समाधानयुक्त श्रीमंतांचें पत्र यावें. विनंति करावी. मर्जी प्रसन्न होऊन दिलें, तर मजकडे पाठवावें. एकांतीं पावतें करीन. बाईचें मानस कीं, पक्केपणे नानासाहेबांचें अभय असावें. त्यास श्रीमंतांची मर्जी असल्यास कृपा करून पत्र देतील. मर्जी पाहून आपण विनंति करावी. जशी मर्जी असेल तशी आज्ञा करितील. मीं आपला मजकूर पेशजी सेवेसी लिहिलाच आहे. वारंवार काय लिहावें? आपण ह्मणतील कीं, बाई इतकी ममतापुरस्कर तुह्मांशीं बोलतात, तेव्हां कांहीं परामर्ष करीत असतील. त्यास एक कवडी बाईकडून मजला प्राप्त असेल तर आपल्याच पायांची शफथ! कर्ज खात येथें बसलों आहें. बाहेरील खर्च काय काय लिहू? आज पांच वर्षांत एक गवताची काडी अगर घर छावून दिलें असेल तर शफथ! वरकडांचीं

घरें छावून देतात; खर्चासही देतात; परंतु आमचा व बाईचा ऋणानबंध असा आहे! माझी येथील अवस्था अशी आहे व घरचें वर्तमान चिरंजिवानें सर्व आपल्यास विदित केलेंच आहे. कुटुंब थोर, दुसरी उपजीविका कांहीं नाहीं. ब्राह्मणसंसार, लोकांचें देणें ब्रह्मांड, अशा पेंचांत आहे. येथेंही सात आठशें रुपये देणें. असा प्रकार आहे. माझा कोणी वगवशिला नाहीं की, श्रीमंतांस तापत्रय समजावील. दोघे तिघे मुले रोजगारास उमेदवार आहेत. आपणास विदितच आहे. जे सर्वोत्तम आपणास बुद्धि देईल तशी विनंति श्रीमंतांस करावी. उत्तर यावें. हे विज्ञप्ति."

लेखांक १०७. ता. २४ आगष्ट इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. श्रावण व॥ १२ शके १७०५.

"सेवेसी केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत चंद्र २५ रमजानपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून काशीदजोडीबरोबर व डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचा मजकूर, येथें तों श्रावणमासचा उत्साह आहे. लग्नपट्टीच्या ऐवजाविषयीं बाईस स्मरण दिलें जें, श्रावणअखेर होत आला, सावकारास ऐवज पावला पाहिजे. याप्रमाणें सूचना केली. तेही तजविजींत आहेत. लवकरच देतील. दुसरें, राजश्री पाटीलबावांकडील वर्तमानः–ग्वालेर फत्ते जाल्याचा मजकूर पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलाच आहे. सांप्रत ऐकिल्यांत आलें जें, किल्ह्याची डागदोजीचा बंदोबस्त करवितात, व किल्ह्यावरील सिशा बारूद व जंगी सरंजाम यांची वगैरे मोजदाद करवितात. गोहजेवर शह देऊन आहेत. किल्ह्याचा बंदोबस्त केल्यावर गोहजेवर जावयाचा इरादा आहे, ह्मणून वर्तमान ऐकिलें. राजश्री विसाजी काशी सागरचे कामगिरीस सरकारांतून बिदा केले, ते श्रावण शुद्ध नवमीस येथें आले. बाईची भेट घेतली. श्रावणीकर्म येथें केलें. दुसरे दिवशीं बाईनीं भोजनास वाड्यांत बोलाविलें होतें. द्वितीयेस स्वार होऊन गेले. नवीन वर्तमानः–खानदेशांत नेरपरगण्याचें मेहरगांव आहे, तेथें हटकर धनगराची मूल चौ वर्षांची, तिजला गर्भसंभव जाला आहे. सहा सात महिन्यांची गरोदर. त्यास त्या मुलीच्या मायबापांनीं विचार केला कीं, त्या मुलीस मारून टाकावें. त्यास, दों प्रहरां रात्रीं तिच्या बापास स्वप्न जालें कीं, दोन महिने मुलीस मारूं नका, काय होतें तें पहा. याप्रमाणें वर्तमान येथें बाईस

पत्र आलें. राजश्री बाजीराव बर्वे वद्य नवमीच्या मुहूर्तें येथून बिदा होणार होते, त्यास तो मुहूर्त राहिला. अमावास्या जाल्यावर निघणार ह्मणून ऐकिलें आहे. रेवापार जाले ह्मणजे सेवेसीं विनंतिपत्रीं लिहून पाठवूं. श्रीमंतांस धोतरजोडे करून पाठविणे ह्मणून आज्ञा आली होती. आज्ञेप्रमाणें लांब रुंदी व सूत चांगलें, याप्रमाणें कारेगरांस सांगून, तेरा धोतरजोडे तयार जाले. ते व एक शेला ऐशीं चवदा सणगें भालेरायांच्या रावतांबरोबर जासूदजोडीसमागमें देऊन, चंद्र १३ रमजानीं येथून रवाना केले आहेत. सेवेसीं पावले असतील. बाकीचे धोतरजोडेही तयार होतात. राजश्री विसाजी शामराज लांबहाते यांस दोन महिने शरीर स्वस्त नाहीं. औषधीउपाय करीत आहेत. बाईही दोन वेळां त्यांच्या परामर्षास गेली होती. हिंदुस्थानचें वर्तमानः–दिल्लीभंवता शिखांचा उपद्रव फार आहे. मुलकी पैसा नजीबखानाचे चेले धोपटून खातात. पादशाहास पैसा देत नाहींत. राजवाडे यांसही उपद्रव देतात. पादशाहा व राजेरजवाडे सर्व दक्षिणी फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. याप्रमाणें बाजारी वर्तमान ऐकिलें. सत्य मिथ्या देव जाणे. धोतरजोडे पावल्याचें आज्ञापत्र आल्यावर, बाकी सात धोतरजोडे राहिले ते पाठवून देतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक १०८. ता. १३ सप्तंबर इ.स. १७८३.
श्रीगजानन. मि. भाद्रपद व॥ ३ शके १७०५.

" श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेब स्वामींचे सेवेसीः–विनंति सेवक केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना तागाईत चंद्र १५ सवालपावेतों साहेबांचें कृपाकटाक्षे सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– चंद्र १२ रमजानचें आज्ञापत्र सादर जालें, तें चंद्र २८ माहे मिनहूस पावलें. पत्रीं आज्ञा कीं, गंगाजलनिर्मल अहल्याबाई होळकर यांस व राजश्री माधवराव गंगाधर यांस सरकारचीं पत्रें पाठविलीं आहेत. यांच्या नकला तुमचे लाखोट्यांत घालून पाठविल्या आहेत. तर दोन्ही लाखोटे तुह्मी देऊन, त्या अन्वयें जाबसाल करून,आमलांत आणीत तें करणें ह्मणोन आज्ञा जाली. आज्ञेप्रमाणें पत्र लाखोट्यासुद्धां अहल्याबाई यांस नेऊन दिलें. पत्र पाहून राजश्री गोविंद रघुनाथ गानू यांनीं वाचून दाखविलें. तदनंतर उत्तर दिलें कीं, हें पत्र लष्करांतून राजश्री हरी बल्लाळ यांनीं पाठविलें. उत्तर लिहून देईन. इतकाच मजकूर ते दिवशीं जाहाला. आह्मीं जाबसाल केला कीं, या पत्रान्वयें उत्तर लिहून द्यावें. इतकेंच बोलून आलों.

पुढें वर्तमान जालें तें पुरवणीपत्रावरून श्रवणगोचर होईल. सरकारचे पत्रीं बाईस आज्ञा कीं, देशींहून कमाविसदार येतील त्यांस अडथळा असूं नये, व साल गुदस्ताचा ऐवज राहिला, तो पाठवून देणें ह्मणोन. त्या लिहिल्याप्रमाणें आज्ञेचें लक्ष धरून, भलती एखादी गोष्ट घडावी हें घडतां दिसत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक १०९. ता. १७ सप्टेंबर इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. भाद्रपद व॥ ७ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ सवालपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्री लिहून छ १५ मिनहूस पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. लग्नपट्टीच्या ऐवजाविषयीं एक दोन वेळां बाईस हटकलें. त्या तजविजींतच आहों ह्मणून बोलली. सांप्रत आज दोन दिवस जाले, बाईस शैत्यज्वर जाला आहे. त्यामुळें स्नान देखील नाहीं. औषधउपचार होतात. बाईच्या दुखण्याची तऱ्हा,–सावकाश वाटेनासें जालें ह्मणजे कोणी जवळ फारसें माणूस असून आपण कोणाशीं बोलून कोणास बोलूं देऊं नये. बाहेर कोणी माणूस बोललें अगर खोकलें शिंकलें, कामास नये. वैद्यानी औषधें करून न्यावी. तीं मर्जीस आलीं तर घ्यावीं; न आलीं तर राहिलीं. अशी तऱ्हा आहे. राजश्री हरिपंत तात्यांनीं श्रीमंताचीं आज्ञापत्रे देऊन लष्करांतून जोडी पाठविली आहे. त्यांच्या जाबसालाचें बाईनी उत्तर लिहून खुलें आह्माकडेस पाठविलें, तें पाहून पत्र आह्मी माघारी टाकलें. त्यामुळे आह्मावर रागे आहेत. तो मजकूर तपशीलवार पेशजीं विनंतिपत्रीं लेखन केला आहे. श्रुत होईल. सरकारची आज्ञा जशी येईल त्याप्रमाणें बाईशीं बोलून, आज्ञेप्रमाणे बाईनी उत्तर दिल्यास घेऊन, जोडी रवाना करूं नाहींतर जसें उत्तर करितील, तशी विनंति लिहून पत्रें देऊन जोडी रवाना करूं. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान तर पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे तेंच. नवें अद्याप कांही आलें नाहीं. राजश्री बाजीराव बर्वे यांचें वर्तमान बाईनीं वस्त्रें दिलीं, पागा व हत्ती दिला, रवानगीचीं वस्त्रे दिलीं. तें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलेंच आहे. आतां शरीरासही त्यांच्या आरोग्य जालें. परवां वद्य पंचमीस बाईचा निरोप घेतला. निरोपाचे वेळेस कसकशींतच होती. परंतु निरोप घेतला. काल मुत्सद्दी मंडळीचा निरोप घेतला. आज सप्तमी बुधवारीं

सारा आटाळा पार उतरून, संध्याकाळचा घटका दिवस राहतां, मुहूर्तेंकरून रेवापार होऊन, दक्षिणतीरास गेले. दक्षिणतीरीं नवमीचें मातुश्रीचें श्राद्ध करून दशमीस धर्मपुरीच्या बेटास श्रीबिल्वांबरेश्वराच्या दर्शनास जाणार. तेथून खरगोणास जाणार. तेथें कांहीं यांचीं घोडीं वीस पंचवीस आहेत तीं, व बाईनीं पांच घोडीं व एक हत्ती दिला आहे तीं, व हीं मिळून, पागेचा संज करून, कोणी मराठा भला माणूस आहे त्यास तेथें ठेऊन, तेथून दरमजल पुण्यास येणार. दसरा बऱ्हाणपुरीं करूं ह्मणाले. येथून रेवापार जाले. याप्रमाणें बाजीराव बर्वे यांचें वर्तमान. पेशजीं धोतरजोडे येथून आज्ञेप्रमाणें श्रीमंतांस खरीदी करून पाठविले, व लग्नपट्टीच्या ऐवजापैकी एक लक्ष तीस हजार रुपये सावकाराकडे हुंड्या येथून पाठविल्या, त्या पावल्या. त्यांचा ऐवज सावकाराचे पदरीं पडला न पडला, हें कांहीं उत्तर आले नाही; व धोतरजोडे पावून पसंत पडले की कसें? नवे घेऊन पाठवावे किंवा तितकेच पुरेत, हे काही आज्ञा आली नाहीं. जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करूं. सेवकाला फार दिवस येथें जाले. स्वामींची मर्जी. मुलें मनुष्यें फार श्रमांत आहेत. मुलाची कोठें सोय असामीची नाहीं. अन्नवस्त्रावांचून हैराण आहे. श्रमपरिहार करणार धनी कृपाळू समर्थ. सेवकाविषयीं विनति करायास अगर तापत्रय सांगायास कोणी वगवशिला नाहीं. धन्याच्या पायांचा आश्रय सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ११०. ता. २० सप्टबर इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. भाद्रपद व॥ ९ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २२ सवालपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्री लिहून चंद्र २० मिनहूस पत्रें डांकेबरोबर रवाना केलीं आहेत. सांप्रतचा मजकूरः–मातुश्री अहल्याबाई यांस शैत्य-उपद्रव होऊन पांच सात दिवस बेताब होती. आतांसा कांहींसा आराम आहे. अद्याप बाहेर तों निघत नाहींत. परंतु वद्य नवमी व्यतिपातीं स्नान केलें. कांहीं दानधर्म केला. खंडेराव होळकराचा पक्ष होता, तो केला. काल दोन घटका दिवस राहतां, मीही परवानगी आणून बाईकडेस गेलों होतों. त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील वर्तमान विचारलें. "राजश्री हरिपंत तात्या फिरून पुण्यास गेले व तुकोजी होळकर वाफगांवास गेले ह्मणून ऐकतों. तुह्मांकडेस कांहीं पत्रें आलीं की काय? दादासाहेबांचा बंदोबस्त कसा

जाला? कांहीं तुह्मांस लिहिलें आलें असेल." मीं उत्तर केलें जें, "आतांशीं तात्या पुण्यास आले आहेत. दादासाहेब कुंभारीधरणगांवाजवळ गंगाउत्तरतीरीं तामसवाडी ह्मणून लहान गांव आहे तेथें आहेत. नवा वाडा राहण्यास करवितात. तात्यांनीं दोन तीन महिन्यांची खर्चाची श्रीमंतांची बेजमी करून, राजश्री विसाजी आप्पाजी आठवले त्यांजवळ ठेऊन, कांहीं फौजही ठेऊन पुण्यास गेले. तेथें श्रीमंतांचे मर्जीनुरूप काय बंदोबस्त कर्तव्य तो करितील. आह्मांकडेही अद्याप कांहीं पत्रें आलीं नाहींत. परंतु असें वर्तमान ऐकलें आहे." बाई बोलली जे, "ईश्वर करो. त्यांची त्यांची घरांत समजूत पडो, नी दुनियेचा कांच तुटो. यांत सर्वांचें बरें आहे. पेशजीं श्रीमंत राजश्री नानासाहेबांनीं आह्मांस दादासाहेबांचें वर्तमान लिहिलें होतें. पुढें जसा तह होईल तसें लिहून पाठवूं, ह्मणून आह्मांस पत्र लिहिलें होतें. तुह्मांसही पत्रें आलीं होती." ह्मणून बाई बोलली. मीं उत्तर केलें जें, "आतांशीं तात्या गेले आहेत. श्रीमंतांचीं त्यांचीं भाषणें होतील. पक्केपणें काय निश्चय होईल तो आपल्यास लिहितील." बाई बोलली कीं, "नाना कृपा करितात. तेवढे आमचे तिळीं आहेत. तात्यांची ममता आह्मांकडे नाहीं." मीं उत्तर केलें की "आपल्याम असा भास आहे. परंतु उभयतां शरीरें मात्र दोन आहेत. प्राण एकच आहेत. केवढ्या मसलती गाढ पडल्या, तितक्या निवारण करून राज्यभाराचा बदोबस्त करितात. त्यामध्ये सम विषम जाबसाल कित्येक पडत असतील. तेथे कोठे तीव्र, कोठे सौम्य, असे पैं दरपैं जाबसाल करणें प्राप्तच आहेत. त्या अर्थी ज्याचे जसे कामावर बोलणीं स्थूल सूक्ष्म होतात, तसें आपलाले भावी भावितात. परंतु उभयतांत द्वैताचा लेश नाहीं. आपणही लहानमोठा राज्यभार करितां. सांप्रत आपल्यास सावकाश वाटत नाहीं. परंतु अशांतही कारभार करणें, कंपेश कोणाशीं बोलणें प्राप्त आहे कीं नाहीं?" बाई बोलली कीं, "खरी गोष्ट आहे. जेथें न पोंहच, तेथेंच विस्कळित होतें. शाबास. त्यांचीच छाती! त्यांस उपमा देयास दुसरा नाहीं. दादासाहेबांनीं इतकी घाण केली!" कांहीं दादासाहेबांचे कांहीं सौभाग्यवती आनंदीबाईचे गुणदोष बोलली. सेवकास ह्मणाली जें, "प्रस्तुत तुमचीं कांहीं पत्रें आलीं नाहींत?" अद्याप आलीं नाहींत ह्मणून उत्तर केलें. सरकारचीं पत्रें येतील तेव्हां आपल्यासही येतील, असें उत्तर केलें. संध्याकाळही जाला. वैद्य औषध देयास आंत आला. मग मी व बाईचा नातू व मकाजी गिते तिघेही उठून बाहेर आलों. दुसरें वर्तमान, सरकारचीं पत्रें बाईस व आह्मांस सिरोंजच्या जाबसालाविषयीं वगैरे माळव्याच्या महालच्या गुदस्ताच्या ऐवजाविषयीं, व तुकोजीबावा कमाविसदार पाठवितील, त्यास अडथळा न व्हावा असें बाईस सांगून अमलांत आणवावें ह्मणून

आज्ञापत्रें आलीं. त्यांचीं उत्तरें प्रत्युत्तरें जाहलीं; व बाईनीं उत्तर दिलें. त्यांत लग्नपट्टीच्या ऐवजांत सिरोंजपैकीं पंचवीस हजार तेथें त्यांजवळून घ्यावे, बाकीच्या ऐवजाचा भरणा आह्मी करूं, ह्मणून उत्तर बाईनीं दिलें. तें पत्र आह्मीं माघारा टाकलें. ह्मणून बाईचा आमचे ठायीं राग. हा तपशील पेशजीं विनंति एक दोन पत्रीं लिहिली आहे. सांप्रत आह्मांस नकळत बाकीचा ऐवज हुंड्या करून सावकाराकडे पाठवावा असा निश्चय करून पंचेचाळीस हजारांच्या हुंड्या केल्या. उदईक रवाना करतील. आह्मीही या शोधांतच आहों. आज प्रहर रात्रीं ह्या गोष्टीचा बारीकपणें शोध करितां लागला. त्यास ज्या गृहस्थानें एकांती बोलला, त्यास मीं विचारलें की, पंचवीस हजार बाकीचे राहिले त्याचें काय? तो बोलला कीं, "सिरोंजपैकी पंचवीस हजार रुपये वजा केले. तेथे श्रीमंतांस लिहिलें की सिरोंजपैकी पंचवीस हजार रुपये तेथें त्यांजवळून घ्यावे." त्यास सेवकाचें व त्या गृहस्थाचें बोलणे बरें एकपदरीं जालें. "एवढा सरंजाम तुह्मांकडे. इतक्या दिवसांचे खैरख्वा सरकारचे चाकर तुह्मी. मोठ्या मोठ्या आडी भिडी घालितां. श्रीमंतही तुमचें तसेच चालवितात. गादीचे चाकर एकनिष्ठ ह्मणून बरराहा बोलतात. असे बहुतां दिवसांचे, इतका सरंजाम खाऊन चाकरी करितां. श्रीमंतांचा उदय होऊन लग्न जालें. केवढा अलभ्य लाभ जाला! त्यांपैकीं तुह्मांकडे दोन लाख रुपयांची वरात आली. लोकानीं दो दो महिन्यांत फडशे केले. तुह्मी आज आठ महिने श्वेत कृष्ण विचारीतच आहां. त्यामध्यें सिरोंजेविषयीं सरकारचें पत्र आले ह्मणून तुह्मी पंचवीस हजार कमी केलें. यावरून तुमच्या थोरपणाची रीत कळली! श्रीमंत हमेश तुह्मांस लिहित असतात की, बाई थोर आहेत. दूरआंदेसी बाईनीं फार देखलें आहे. बाई असें जें हमेश लिहितात, त्या गौरवास तुह्मी पंचविसासाठीं मन दाखवूं नये. यांत तुमची तेथें किंमतच होईल. तुह्मांस योग्य आहे की, पुरता भरणा दोन लक्षांचा तुह्मीं करावा, आणि आह्मांस तुह्मीं ह्मणावें की, तुह्मांस आह्मीं पहिलेच सांगितलें होतें की, हे दोन लक्षांची वर्गणी आह्मी सारे माळव्याच्या महालावर घालितों. श्रीमंतांस तुह्मी लिहा. कोणीं बोभाट आणिला तर ऐकूं नये. असें रागें भरून आह्मांशीं बोलायाचें होतें. अगर भरणा करून तुह्मीं लिहावयाचें होतें. यांत बरें दिसतें. आमचीही लेखणी श्रीमंतांस लिहावयास चालती. असो. तुमच्या ह्मातारपणास युक्त असेल तें करा." तो गृहस्थ बोलला कीं, "बाईसही हेंच उचित आहे. मीही आज जाऊन एकांतीं बाईस सांगतों." मींही सांगितलें जें, "माझाही निरोप सांगा कीं, सरकारचा दोन लक्षांचा भरणा पुरता करा, आणि सिरोंजवाल्या-

जवळून धोपटून लग्नपट्टीचा ऐवज घ्या. पेशजीं श्रीमंतांस आह्मीं सूचना लिहिली आहे. या ऐवजासाठीं श्रीमंत कांहीं ह्मणणार नाहींत." असें मींही बाईकडे सांगून पाठविलें. स्वामींस कळवावें. कदाचित् बाईचा एकमोड स्वभाव आहे. पंचेचाळीसांच्याच हुंड्या पाठविल्या आणि पंचवीस तिकडे घ्या ह्मणून लिहिलें, तर साफ उत्तर पाठवावें की, तुह्मी जाणां, ते जाणेत. आमची बाकी पाठवून द्या ह्मणजे आपला ऐवजही येईल. हेही महालाजवळून ऐवज वसूल करून घेतील. जर तेथें ऐवज पटत असला तर धन्यांची मर्जी! येथें यानीं पंचेचाळीस हजारांच्या हुंड्या तयार करून पाठवितात. आह्मांस इतला न देता पाठवाव्या, अशी यांची मर्जी आहे. कोणीकडूनही सरकारचें काम व्हावें. ऐकिले वर्तमान सेवेसी श्रुत होय. बाजीराव बर्वे वद्य ७ सौम्यवारीं घटका दिवस राहतां, आपल्या बिराडींहून बाहेर निघून बाईकडेस निरोपास गेले. बाईनीं पैठणी शेला व पागोटें व किनखाप ठान १ व चंदेरी जामेवार चार वस्त्रें दिलीं, व चौघां कारकुनांस दोन दोन सणगें दिलीं. त्यांचे स्त्रीस पैठणी लुगडें चोळी दिली. बिदा केली. दो घटका रात्रीं वाड्यांतून निघाले. मुत्सद्दी मंडळी यांचे घरोघर निरोप घेयास चार पांच घटका आणीकही जाल्या. प्रहर रात्रीं रेवापार जाले. साबाजीपंत—त्यांचे कारकून मागें राहिले. पारून येत जात आहेत. कांहीं कागदपत्र व खर्चासही मागतात. त्यास तीन हजार रुपये खर्चास देविले व पागासंबंधी बहुमान सोन्याचें कडें दिलें ह्मणून ऐकतों. खर्चाच्या ऐवजाचा व कड्याचा पुरतेपणें शोध करून मागाहून लिहीन. बर्वे यांचे मातुश्रीचें नवमीस श्राद्ध जालें. दशमीस बेटास जाणार. एकादशी तेथें करून, द्वादशीस पार येऊन खरगोणास जाणार. तेथून दरमजल दसरा बऱ्हाणपुरीं करून पुण्यास येणार. बाईनीं दहा स्वार समागमें दिले आहेत, व दोन उंट एक राहुटी व चांदणी व कनात ऐशीं दिलीं आहेत. सेवेसी श्रुत होय. राजश्री पाटीलबावांनी ग्वालेरचा बंदोबस्त केला. गोहजेस जाणार. परंतु गोहजवाल्यानें फारच ग्लानीचे जाबसाल लावले आहेत. गोहज आपल्याकडे ठेऊन, काय जीवन पाहून खंडणी सांगा; तुमचा चाकर होऊन आहें, असें ह्मणतो. पाटीलबावा ह्मणतात की, आह्मांस खर्च पडला तो द्या. असे जाबसाल लागले आहेत, ह्मणून येथें वर्तमान आलें. देखिलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १११. ता. २३ सप्टबर इ. स. १७८३.

पैवस्ती चंद्र ११ जिलकाद आर्बा. **श्रीगजानन.** मि. भाद्रपद वा॥ १२ शके १७०५.

"सेवेसी केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन

साष्टांग नमस्कार विज्ञापना, तागाईत चंद्र २५ सवालपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून जासूदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमानः–पेशजीं सरकारचीं पत्रें लष्करांतून आलीं, तीं येथें बाईस दाखवून, त्या जाबसालांचीं उत्तर प्रत्योत्तरें जालीं व त्या पत्राचें उत्तर बाईनीं लिहून दिलें, तें पत्र आह्मीं माघारी टाकलें ह्मणून बाई आह्मांवर रागें भरली आहेत. हें वर्तमान व सरकारच्या पत्राच्या नकला व बाईशीं आह्मांशीं साबसाल जाले ते, सविस्तर एक दोन वेळां सेवेसीं लिहून विनंतिपत्रें डांकेबरोबर व जासूदजोडीबरोबर सेवेसीं पाठविलीं. परंतु अद्याप आज्ञापत्र येत नाहीं. यामुळें चिंता लागली आहे. लग्नपट्टीचा ऐवज एक लक्ष तीस हजारांच्या हुंड्या पेशजीं सावकारांकडेस पाठविल्या, त्यांचेंही उत्तर कांहीं आलें नाहीं. बाकी सत्तर हजार रुपये राहिले. त्याविषयीं दहा पांच वेळां बाईशीं बोललों. दोन तीन वेळां तों ह्मणाली की, तजवीज करितों. तदोत्तर लष्करांतून सरकारचीं पत्रें आलीं त्यात सुरजेचा मजकूर लिहिला होता त्यामुळें बाईचें चित्त विक्षिप्त होऊन, सरकारच्या उत्तरात लिहिलें कीं, बाकीच्या ऐवजापैकीं पंचवीस हजार रुपये तेथे तुकोजीबावा आहेत, सिरोंज महालही त्याजकडेच आहे, त्याजपासून तेथेंच घ्यावेत. बाकीचा ऐवज पंचेचाळीस हजार आह्मी पाठवितों. या पत्रावरून बाईचे आमचे निक्षून जाबसाल जाले कीं, हा ऐवज तुह्मांकडे. बाकी राहिला सत्तर हजार तितका भरून पाठवावा. यामुळें विक्षेपता त्यां होऊन, राजश्री विनायक बाजी व वासुदेव चिमणाजी यांनीं बाईस एकांतीं समजाऊन सांगितलें जे, "आपण सिरोंजचा ऐवज कां द्यावा? वारंवार तेथें अनेक प्रकारचे गैरवाके समजावितात, त्याप्रमाणेंच श्रीमंतांचीं पत्रें येतात. तेथें राजश्री हरिपंत तात्या आहेत, त्यांचे विद्यमानचींही पत्रें होयेत. त्यास पंचेचाळीसां हजारांच्या हुंड्या आपण येथून करून पाठवाव्या. पंचवीस हजार सिरोंजपैकीं तेथें कमाविसदारही आहेत व तुकोजीबावाही तेथेंच आहेत, तेथें निशा करून देतील. श्रीमंतांस खसखशीत आपण लिहावें. तेथें दादाजी आहेतच. श्रीमंतांस समजावून सांगतील. तिकडील तिकडे ऐवज पटेल, ऐसें आह्मीही दादाजीस तपशीलवार लिहितों. आपलेंही पत्र लिहावें. याप्रमाणें उभयतांनीं बाईस समजाऊन, वकिलाशींही कारण काय आहे? परभारें हुंड्या पाठविल्यास तेथें जाबसाल श्रीमंतांशीं दादाजी करून घेतील." याप्रमाणें समजाऊन, पंचेचाळीस हजारांच्या हुंड्या करून, चंद्र २१ मिनहूस येथून हुंड्या रवाना केल्या. पुर्ता शोध करून सेवेसी विनंति लिहिली

असे. सेवेसी श्रुत होय. येथें बहुत दिवस जाले, धन्याचे पाय पहावे. उभयतांसही फार खंत वाटते. धनी कृपाळू समर्थ. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान ऐकिलें तें पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. अलीकडे नवीन कांहीं आलें नाहीं. राजश्री बाजीराव बर्वे यांस वद्य ७ बुधवारीं सायकाळच्या दोन घटका दिवस राहतां, येथून निघावयाचे मुहूर्त होते. ते दिवशीं मुहूर्तेंकडून बाईच्या निरोपास गेले. बाईस सावकाश वाटत नव्हतें. तसेंच मुत्सद्दीही आंत बोलाऊन निरोपसमयीं वस्त्रें पैठणी पागोटें व पैठणी शेला व एक किनखाप व एक जामेवार ऐशीं खाशांस वस्त्रें दिलीं, व त्यांचे स्त्रीस पैठणी लुगडें व चोळी दिली, व चौघे कारकुनांस दोन दोन वस्त्रें दिलीं. मशारनिल्हेस पांच हजार रुपये खर्चास दिले. पुढें पागेच्या खर्चांतून उगऊन घेणार. दोन घटका रात्र वाड्यात निरोपास जाला. तदोत्तर बाहेर येऊन मुत्सद्दी मंडळीच्या घरोघर जाऊन, निरोप घेऊन, त्यांनीही दोन दोन वस्त्रें खाशांस दिलीं. साऱ्याचा निरोप घेऊन प्रहरा रात्री रेवापार जाले. बाईनीं दहा स्वार व एक कारकून समागमें दिला आहे कीं, श्रीमताजवळ बाजीरायांस सोंपून येणें. रेवादक्षिणतीरीं वद्य नवमीस बाजीरायानीं आपले मातोश्रीचें श्राद्ध करून, दशमीस धर्मपुरीच्या बेटास देवदर्शनास गेले. तेथून येऊन येथून त्रयोदशीस स्वार होऊन खरगोणास जाणार. तेथें पागेचा बंदोबस्त करून दरमजल पुण्यास येणार. दसरा बऱ्हाणपुरीं करून पुढें येणार. तिसरें वर्तमान, श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून दोघे शागीर्द येथें आले होते. त्यास पंधरा दिवस जाले. एक शागीर्द पुढें ग्वालेरीस पाटीलबावांकडे गेला. एक येथें यांची एकांती भेट घेऊन, चिठी आणली होती ती देऊन, जाब घेऊन माघारे गेला. येथून दहा रुपये त्यास खर्चास दिले. परस्परें बोलणें काय जालें, हें समजलें नाहीं. बातमीस आला होता हें ऐकिलें. पेशजीं सरकारचे आज्ञेप्रमाणें धोतरजोडे येथून खरेदी करून जासूदजोडीबरोबर पाठविले, त्याचेंही अद्याप उत्तर आलें नाहीं. बाकीचे धोतरजोडे तयार कारागरांनीं केले आहेत. ते घेऊन पाठवावे किंवा कसें? आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ११२. ता. २३ सप्टबर इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. भाद्रपद वा॥ १२ शके १७०५.

"श्रियाविराजित राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीः—

सेवक विठ्ठल शामराज कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २५ सवालपर्यंत मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—बहुत दिवस

जाले. आपल्याकडून पत्र येऊन वर्तमान कांहीं कळत नाहीं. येथून दोन चार पत्रें डांकेबरोबर व कासीदजोडीबरोबर पाठविलीं, तीं आपल्यास पावलीं किंवा नाहीं? आह्मांस तों येथें रात्रंदिवस आपले पत्राची आपेक्षा. आपणास तों तेथें स्मरण देयास कोण? असो. आमचें दैव. येथील वर्तमान सविस्तर श्रीमंतांस विनंतिपत्रीं लिहिलें आहे. त्यावरून सर्व आपल्यास विदित होईल. येथें बाईची मर्जी एक प्रकारची. यांचे मर्जीनुरूप बोललें तर बरें. समविषम जाबसाल जाल्यास कडवी मर्जी होती. सांप्रत लग्नपट्टीच्या ऐवजामुळें सुरंजेच्या पंचवीस हजारांमुळें बाईशीं आह्मांशीं कर्डे जाबसाल जाले. कागद आह्मीं परतून टाकले. त्यामुळें बाई आह्मांशीं बेरोख जाली आहेत. आधींच आमचे ठायीं अनास्था आहेच, आतां अधिकच! फारच रुष्ट आहेत. सरकारचीं पत्रें येतात, त्याप्रमाणें जाबसाल केला पाहिजे. येथें तों यांचे मर्जीप्रमाणें जालें तर संतोष. असें जालें आहे. लग्नपट्टीपैकी सत्तर हजार रुपये सरकारची बाकी, त्यांपैकी पंचेचाळीस हजारांच्या हुंड्या, आह्मांस न कळत, यांनीं सरकारांत छ २१ मिनहूस रवाना केल्या. आह्मांसही कळलें. पंचवीस हजार सुरंजेवर वर्गणी यांनीं घातली होती. सुरंजेचा [हिशेब] तेथें तुकोजीबावांनीं गैरवाका समजाऊन सरकारचीं पत्रें लष्करांतून येथें आलीं की, सुरंजेची रस्त व हिशेब तुह्मीं घेऊं नये. अशीं पत्रे आलीं. लग्नपट्टीचा त्यांत कांही मजकूरही नवता. परंतु त्याजवरून रागें भरून, सरकारांत पत्र बाईनी लिहिलें आहे की, पंचेचाळीस हजारांच्या हुड्या वरकड महालपैकी घ्याव्या आणि पंचवीस हजाराची सुरंजेबाबत तेथें तुकोजीबावांजवळून घ्यावे. असे पत्र व हुंड्या गेल्या. तेथें धनी आहेत. काय त्याचे मर्जीस येईल ते करोत. परंतु ह्या हुड्या घेऊं नयेत, अगर पंचवीसां हजाराची वरात यांजवरच परतून करावी. सिरोंज जाणे, तुह्मी जाणा! ह्मणून येथें विनायक बाजी व वासुदेव चिमणाजी येथें आहेत, प्रस्तुत बाईजवळ बोलले जे नाहक पंचवीस हजार देऊ नयेत. तेथें राजश्री यशवंतराव गंगाधर, दादाजी आहेत, त्यास आह्मी पत्र लिहितों. तेथें श्रीमंताशीं ते जाबसाल करून घेतील. वकिलांचा मजकूर काय, असें ह्मणून हुंड्या व पत्रें पाठविलीं आहेत. दादाजी गंगाधराशीं श्रीमतानी कर्डा जाबसाल केला नी हुंड्या माघारी टाकल्या, ह्मणजे यांची येथें प्रतिष्ठा कळेल! आह्मांस हरएक जाबसालास तेथें दादाजी गंगाधर यांचें बळ दाखवून फारच बाईजवळ श्लाघ्यता मिरवितात. कोणताही सरकारचा जाबसाल आह्मी करूं लागलों, ह्मणजे मध्यें हे ह्मणतात की, 'हे न ऐके तर काय तेथें दाजीस लिहूं? ते श्रीमतांशीं बोलून घेतील.' असें जाबसालाचें मातेरें करितात. श्रीमंतांस समजावावें. उत्तर पाठवावें हे विनंति."

लेखांक ११३. ता. ८ आक्टोबर इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. आश्विन शु॥ १३ शके १७०५.

"सेवेसीं केसो भिकाजी दातार व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥. चंद्र ११ जिल्कादपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनें-करून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असो. विशेषः—स्वामींनीं कृपा करून चंद्र २१ सवालचीं आज्ञापत्रें डाकेबरोबर रवाना केलीं, तीं चंद्र १ जिल्कादीं तृतीय प्रहरीं येथें पावलीं. लग्नपट्टीच्या दो लक्षांपैकीं एक लक्ष तीस हजारांच्या हुंड्या करून पेशजीं सावकाराकडे पाठविल्या, व मागाहून बाईनीं आह्मांस न कळत पंचेचाळीस हजारांच्या हुंड्या पाठविल्या, त्याही पावल्या असतील. बाकी पंचवीस हजार रुपये राहिले, ते त्याचा मजकूर बाईनीं सिरोंजचा मजकूर सरकारांत लिहिला आहे. त्यावरून तेथेंच रुपये त्याजवळून श्रीमंत घेतील, ह्मणून येथें रुपये देत नाहींत. यावर सरकारची आज्ञा जशी येईल, ऐवजाविषयीं तशी वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ११४. ता. २१ आक्टोबर इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. आश्विन व॥ ११ शके १७०५.

"सेवेसीं केसो भिकाजी व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २४ जिल्कादपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनें-करून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबराबर व कासिदांबराबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रत अधिकोत्तर पैकीं, आनंदीबाई निंबाळकरीण—राजश्री पाटीलबावांची बहीण—त्यांस भेटावयास गेली. ती याच मार्गें आली. येथें चंद्र १६ रोज इंदुवारीं सहा घटका दिवस, प्रथम प्रहरीं, रेवा दक्षिणतीरास आली. पुढें रात्रीं बाईस सूचना आलीच होती. यांनींही दोन तीन नावा पार पाठविल्या होत्या. त्यांजवर आटाळा उत-रून तृतीय प्रहरीं आनंदीबाई उतरून उत्तरतीरास आली. अहल्याबाईनींही बाहेर एक डेरा व दोग तीन राहोट्या व चांदणी व कनाता देऊन आंबराईंत महेश्वराच्या पश्चिमेस स्थळ करून ठेविलें होतें; व सरंजामही दाणा, घांस, लकडी व दोनशां मनुष्यांचा शिधा ऐसा तेथें पाठविलाच होता. ते दिवशीं उभयतां बायांच्या भेटी व्हाव्या, परंतु ते दिवशीं एकवीस घटकांनंतर व्यतिपात होता, तो दुसरें दिवशीं एकवीस घटकांपर्यंत होता. यास्तव, दुसरे दिवशीं एकवीस घटकांनंतर भेटी व्हाव्या असा निश्चय ठरला. सोमवारीं पन्नास मनुष्यांचा स्वयंपाक कांहीं पक्कान्नें

दोन तीन प्रकारचे भात व शाकभाजा वैगेरे करून, मनुष्यांजवळ भांडींच देऊन, गमें कारकून देऊन आनंदीबाईकडे रात्रीं पोंहचविलें. त्याजबरोबर सरंजाम ो दोन व स्वार दोनशें, पायदळ शंभर याप्रमाणें होता. दुसरे दिवशीं प्रहर स राहतां, येथून बाईनीं आपली नात सौभाग्यवती रमाबाई व नातसून ाग्यवती बाळाबाई, उभयतांबरोबर स्वार प्यादे व ताशेमरफे गाडदी देऊन, बाईस बोलावूं पाठविलें. तीही तयारच होती. ती बाईही आपल्या ामानिशीं आली. पुढें बाईस बातमी आली कीं, शेंदीडशें स्वार व शेंदीडशें ्यानिशीं येतात. वाड्यांत दाटी होईल ह्मणून बाईनीं पुढें सांगून पाठविलें. रून राऊत वैगेरे दरवाज्याजवळ ठेऊन, थोडक्या सरंजामानिशीं गडावर यांत आली. तोंवर आह्मीही बाईजवळच होतों. ती वाड्यांत आल्यावर ाद्दीमंडळी व शागीर्दपेशास दूर केलें; व मुत्सद्यांस सांगितलें जें, तुह्मी कडे थोरल्या सदरेंत जाऊन बसा. बाईनीं आपल्याकडीलही शेंदीडशें ो खासे मराठे मातबर सदरेंत बोलाविले होते. बाईचे भाऊ महादजी पाटील तांवई यशवंतराव फणशे व धोंडिबा नातु हे सारे इकडे बसले होते. तिकडे कडे हरकूबाई व सौभाग्यवती मुक्ताबाई व लांबहाते वैगेरे मराठ्यांच्या बायका ठीस पन्नास होत्या. आनंदीबाई आली, तेव्हां पुढें मुक्ताबाई व दोघी चौघी ाका पुढें जाऊन भेटून, हातीं धरून आणिली. जवळ आल्यावर आधीं हरकूबाई ली. तदोत्तर बाई भेटली. बिछान्यावर हीं सर्व बसलीं. बाई आपल्या च्या घोंगड्याच्या आसनगादीवर बसली. आगतस्वागत भाषणें जालीं. नंदीबाई नणंद व अहल्याबाई भावजय असें यांचें नातें. त्या अन्वयें हर्ष- ोदांची भाषणें जालीं. इकडे आनंदीबाईबरोबर भले लोक व कारकून मंडळी ली. त्यांच्या व या सदरच्या लोकांच्या भेटी जाल्या. तदोत्तर हे नवे लोक च्या मुजऱ्यास गेले. महादजी पाटील व फणशे व विनायक बाजी हेही . संध्याकाळपर्यंत बसली होती. आनंदीबाईनीं अहल्याबाईस वस्त्रें आणिलीं ीं. ते दिवशीं तों बाईनीं घेतलीं नाहींत. दुसरे दिवशीं जेवावयास राहविली. दिवशीं संध्याकाळीं निरोप घेऊन बिराडास गेली. दुसरे दिवशीं वाड्यांत ार मनुष्यांचा स्वयंपाक करविला. त्यांजकडील पांचशें माणूस व यांजकडील शें माणूस, कांहीं बायका, अशीं तृतीय प्रहरीं भोजनें जालीं. आनंदीबाई स्वयंपाकांत जेवली, व अहल्याबाई नित्यकृत ब्राह्मणांच्या स्वयंपाकांत जेवली. वर चार घटकापर्यंत उभयता बायांचा एकांत जाला. चार घटका दिवस राहतां

बंगल्यांत येऊन बसली. त्यांजकडील व आपल्याकडील लोक बोलाविले. आधीं आनंदीबाईनीं बाईस व हरकूबाईस व मुक्ताबाईस वस्त्रें दिलीं. बाईस पैठणी पातळ पदराचें शुभ्र व चोळी दिली. तसेंच हरकूबाईसही दिलें. मुक्ताबाईस पैठणी लुगडें चोळी दिली; व बाईचा भाऊ व जांवई व नातू यांस शेलेपागोटीं दिलीं. त्यावर आनंदीबाईस वस्त्रें अहल्याबाईनीं दिलीं. शुभ्र सोवळें पदराचें दोन अडीचशें रुपयांचें किंमतीचें व चोळी व पांढरी शालजोडी असें आनंदीबाईस दिलें, व त्यांची मावस बहिणीस पैठणी लुगडेंचोळी, व आनंदीबाईच्या लेकीच्या लेकी दोघी लहानाल्या त्यांस बुराणपुरी पोशाख दिले. कारकूनमंडळी सात आठ असामींस व पंचवीस भले लोकांस शेलेपागोटीं दिलीं. बहुमानें सर्व लोकांशीं बोलली, व अंतःकरणपूर्वक आनंदीबाईशीं बोलून बिदा केली. दुसरे दिवशीं त्यांचें कूच जालें. परंतु आनंदीबाई सडी राजश्री विसाजी शामराज यांचे येथें व देवजी लांबहाते व गंगाभारती गोसावी इतक्यांच्या, हरकूबाईच्या घरांस गेली. इतक्यांनींही वस्त्रें देऊन बिदा केली. बोलवा आहे कीं, आनंदीबाईस नवाबांनीं तीन लक्षांची जहागीर देऊन पाटीलबावांकडे कांहीं अंतस्थ राजकारणास पाठविली आहे. आनंदीबाईचें बोलणें कीं, पाटीलबावांची भेट घेऊन काशीस जावें. परंतु अंतस्थ राजकारण नवाबाकडून पाटीलबावांकडे घेऊन जातात. हें सांगणारांनीं तथ्य सांगितलें आहे. वेगळी पुरवणी सेवेसी लिहिली आहे. त्यावरून श्रुत होईल हे विज्ञापना."

लेखांक ११५. ता० २३ नोव्हेंबर इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. कार्तिक वा॥ १४ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. सरकारचें आज्ञापत्र चंद्र २७ जिल्कादचें सेवका हुजूर येण्याविषयीं आलें. आज्ञेप्रमाणें येतों. परंतु येथें सहाशें रुपये लोकांचें देणें. त्यांची निकड. कर्ज दिल्याशिवाय सावकार कसें येऊं देतील? पेशजीही देण्याविषयीं विनंति लिहिली आहे. येथ तों कांहीं इलाज नाहीं. धनी कृपाळू समर्थ. दहा अकरा महिने जाले, वरात आली होती. ती सावकारास देऊन बाकी दीडशे रुपये सावकाराचे राहिले, व आज अकरा महिने खर्च जाला. गवत देखील विकत! या दरबारचा आसरा असा आहे! असो आपलें दैव! कृपा करून येथील देण्यापासून मुक्त करणार स्वामी कृपाळू समर्थ. लष्मपट्टीचे पंचवीस हजार बाकी राहिले आहेत. त्यांपैकीं एकूणविसांची वरात सरकारी बाईवर आली आहे कीं, केसो भि-

काजीस देणें. त्यांपैकीं सरकारच्या घोतरजोड्यांचे देण्याविषयीं पांचशें रुपये आह्मीं तसलमातीस मागितले. त्यास बाई बोलली कीं "पंचवीस हजार रुपये सुरंजचे घेणें. ते त्यांनीं सुरंजेचा ऐवज त्यांनीं तुकोजीबावांनीं तिकडे नेला. आतां पंचवीस हजार आह्मीं कोठले द्यावे? सरकारांत व तुकोजीबावांस आह्मींही लिहिलें, परंतु ऐवजाविषयीं कांहींच त्यांनीं उत्तर पाठविलें नाहीं. ऐवज तों महालचा ते घेऊन जातात. पुढें तुह्मी लग्नपट्टीपैकीं पंचवीस हजार आह्मांस मागाल. त्यास आह्मी दोन चार वेळां तुह्मांस सांगितलें आहे. तुह्मी आपल्या धन्यास लिहून पाठवा. सुरंजेचा ऐवज लग्नपट्टीपैकीं पंचवीस हजार ते आह्मांकडे देत नाहींत. पंचवीस हजारपैकी श्रीमंतांनीं आह्मांवर एखादी वरात केली, तर आह्मी देणार नाहीं. घोतरजोडेसाठीं पांचशें रुपये मागतां, तेवढे यात्रा करून आल्यावर देऊं. पुढें देणार नाहीं." असें बाईनीं साफ सांगितलें. सेवेसी श्रुत होय. सेवकाचा येथून देण्याचा निकाल होय असें करणार स्वामी कृपाळू समर्थ. तेथें कोणी माझेविषयीं विनंति करील, अगर माझें गरिबाचें तापत्रय सांगेल असें कोण आहे? व ऋणानें दारिद्र्यानें फार श्रमलों! मायबाप धनी कृपाळू समर्थ. कोणी माझी विनंति करायास नाहीं. स्वामी सर्वज्ञ हे विज्ञप्ति. घोतरजोडे चार पाठविले आहेत. हे सेवेसी डांकेबरोबर पावतील. डांकेबरोबर रवाना केले आहेत. श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ११६. ता. ८ दिसेंबर इ. स. १७८३.

पै॥ छ २१ मोहरम सन अर्बा समानीन. **श्रीगजानन.** मि. मार्गशीर्ष शु॥ १५ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ताग़ाईत छ १३ मोहरमपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम उज्जन येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—सरकारचें आज्ञापत्र हुजूर येण्याविषयीं आलें. ते समयीं बाई श्रीओंकारेश्वराच्या यात्रेस निघाली. यात्रा करून येतां एक महिना लागला. रामपूरवाले मवासानें लबाडी केली यास्तव त्याच्या पारपत्यास फौज पाठवावी ह्मणून मर्दान्यास आली. तेथून राजश्री मुकुंदराव हरी दिवाण व राजश्री कृष्णाजी तानदेव या उभयतांबरोबर फौज देऊन रामपुऱ्याबर रवाना केली, आणि तेथें आठ दहा दिवस बाईनीं मुक्काम नेमले. मीं निरोप मागितला. त्यास बोलली कीं, महेश्वरास गेल्यावर निरोप देऊं. त्यास, तेथें उगेंच राहावें, तोंवर उज्जनीहून श्रीमहांकालेश्वराचें दर्शन करून यावें; साडेपांच

वर्षें इकडे आहें परंतु येथें कधीं आलों नाहीं; यास्तव बाईचा व राजश्री केसोपंताचा निरोप घेऊन येथें आलों. देवदर्शन जालें. त्रिरात्र येथें जाली. उदईक छ १४ मिनहूस स्वार होऊन महेश्वरास जातों. येथून बाईचा निरोप घेऊन लवकरीच सेवेसीं येतों. सेवकास खर्चास पेशजीं वरात पाठविली होती, त्यास वरीस जालें. आतांही एक दोन वेळां विनंति लिहिली होती, परंतु कांहीं खर्चास आलें नाहीं. महेश्वरीं लोकांचें देणें सहा सातशें रुपये आहे. कसा निकाल पडेल न कळे. मजला गरिबाला धन्याचे पायावितरिक्त त्राता कोण आहे? स्वामी मायबाप कृपाळू समर्थ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक ११७. ता. २७ दिसेंबर इ. स. १७८३.

पै॥ छ ११ सफर. **श्रीगजानन.** मि. पौष शु॥४ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २ सफरपरियंत स्वामींच्या कृपावलोनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे विशेषः– इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलें. सांप्रतचा मजकूर रामपुऱ्याच्या मवासावर मातुश्री बाईनीं मर्दान्याच्या तळावरून राजश्री मुकुंदराव हरी यांबरोबर फौज देऊन रवाना केले होते. त्यास पेशजी दोन दोन तीन वेळां मवासाशीं व यांच्या लोकांशीं झटपट जाली. तें वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. सांप्रतचे वर्तमानाचीं पत्रें लष्करांतून छ २६ मोहरमीं तृतीय प्रहरीं येथें बाईस आलीं. त्यांत मजकूर लिहिला होता जे, बुराणपुरप्रांतीं पेंढारी होते. त्यांस आणावयास मकाजी गिते पाठविले होते. ते दोन अडीच हजार पेंढारी घेऊन छ २३ मोहरमीं मुकुंदरायाजवळ गेले. छ २४ रोजीं मवासाची खबर आणून ठीक पाडलें कीं, अमक्या दऱ्यांत आहेत. त्यास पेंढारी व त्रिंबक बाबुराव, इंदूरचे कमाविसदार, यांचे जमीयत ती हजारांचा सुमार, दोन कोस दऱ्यापलीकडून पाठविले. इकडून हुजरात व शिलेदार मिळून दोन हजार लोक पाठविले. मवासही शेंदीडशें भले. घोडेवाले बाहेर ठेऊन हुजरातच्या लोकांशीं व मवासांशीं बरीच लढाई जाली. यांच्या लोकांनीं मवास शिकस्त केले. तिकडून पेंढारीही दऱ्यांत उतरले, त्यांनीं लुटले. कांहीं लोक घोडीं घेऊन पेंढारी यांनीं सोडले. त्यांत मुख्य दोघे होते. ते वडील भाऊ होता तो झाडींत निघोन गेला. त्याचा धाकटा भाऊ, त्याचें नांव कोद्रू कुवर, त्यानें रेवेंत उडी टाकून

पोहून जात होता, तो ओळखला. यांनीं करवलास सांगून गोळ्या मारूं लागले. तेव्हां तो फिरला, कीं मजला मारूं नका, मी येतों. परंतु न आला. तो यांणीं धरला आहे. एक भाऊ पळून गेला. त्याच्या शोधासही लोक लाविले आहेत. पाऊणशें घोडीं पेंढाऱ्याकडेस गेलीं आहेत, व पंचवीस तीस घोडीं यांच्या लोकांकडेस आलीं आहेत. दोन हजार गुरें पेंढारी यांनीं लुटलीं. याप्रमाणें छ २४ रोजीं लढाई जाली. छ २५ रोजीं स्थिरवारीं तृतीय प्रहरीं येथें बाईकडे पत्रें आलीं. पत्रें पाहून बहुत संतोष जाला. कासिदांस दहा रुपये इनाम दिल्हा. किरोन मकाजी गिता येथें आला होता, त्यास पाठविलें जे, पळून गेला आहे त्याचा शोध करा. मुकुंदरायास व राघो रणछोड पागे यांस बाईनीं पत्रें लिहिलीं आहेत कीं, पेंढारी यांकडे घोडीं रामपुरवाल्याकडील गेलीं आहेत, ते चांगलीं आहेत. त्यांची किंमत जास्त करूं नये. हलकी किंमत करून ठेवा. मग किंमतीप्रमाणें निमे रुपये त्यांस देऊन घोडीं पेंढाऱ्यांजवळून घेऊं. याप्रमाणें पत्रें गेलीं आहेत, हें रामपुऱ्याकडील वर्तमान. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान कागदोपत्रीं तों नाहीं. येणार जाणार कासिदी खबर कीं, गोहजवाल्याचे वकील आले आहेत. कांहीं दारमदार करावा, गोहज आपल्याकडेस ठेवावी, असें त्यांचें बोलणें आहे. पाटीलबावा ऐकत नाहींत. परंतु कारभारी व सरदार लोक यांच्या चित्तांत कीं, कसाही चार दिवस दारमदार करून या शहांतून निघावें. सबब कीं, महागाई फार. चार शेर अन्न सुकळास मिळत नाहीं. सहा सात शेर भूस घोड्यांस रुपयाचें, तेंही संकटेंकरून मिळतें. या शिकस्तीस्तव लोकही नित्य बावांशीं हेंच बोलतात कीं, प्रस्तुत येथून निघावें. दुसरें वर्तमान, एक कारकून त्यांच्या लष्करांतून आला. तो देशीं आपल्या घरास गेला. त्यानें सांगितलें कीं, पाटीलबावांनीं उरूस केला होता. गुरूची पूजा केली. ते रात्रीस स्वप्न जालें कीं, 'येथील दारमदार करून निघून जा. आपल्या दर्शनास येण्यास फार दिवस जाले. दोन तीन वायदे केले ते गेले. आतां लवकर येणें.' पाटीलबावांनीं चैत्रमासीं दर्शनास जायाचा वायदा केला आहे. गोहजेचा दारमदार करून लवकरीच उज्जनीस येणार, व इंग्रज पांच पलटणें कानपूर काल्पीपलीकडे यमुनेच्या घाटावर आले आहेत. पापड (पाफम) इंग्रज पाटीलबावांपासून कलकत्त्यास गेला होता, तो पांच पलटणें घेऊन आला आहे. तो पाटीलबावांकडेस येणार, ह्मणून कारकुनी वर्तमान. राजश्री नारो शिवदेव उज्जनीस आले. देशास जायास उज्जनीहूनही निघून एका दों दिवसां येथें येणार. बाईची भेट घेऊन पुढें देशीं येणार. याप्रमाणें ऐकिलें वर्तमान. श्रीमंत दादासाहेबांचें वर्तमान

कैलासवासी जाल्यांचें छ २७ मोहरम सोमवारीं येथें आलें. बाईकडेसच पत्रें आलीं. त्यांनीं तों सांगितलें नाहीं. परंतु शोध करतां वर्तमान कळलें. मग उभयतांहीं पुराणसमयीं जाऊन विचारिलें. बाईनींही सांगितलें जे, आमचें तों कांहीं पत्र आलें नाहीं, परंतु साहुकारी वर्तमान आलें. घडीभर स्तव केला. नेत्रास पाणी आलें. आह्मांस विचारलें जे, "नौबत तों येथें नाहीं. परंतु घड्याळें दोन दिवस वर्ज करावें कीं काय?" उचित आहे ह्मणून उत्तर केलें. परंतु बारीक शोध करतां साहुकाऱ्याचें वर्तमान नाहीं. यांचेंच पत्र बाफगांवींहून आलें. याप्रमाणें देखलें ऐकिलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकास आज्ञापत्र येऊन दोन महिने जाले, परंतु येथील साहुकाराच्या देण्यामुळें उलगडा पडत नाहीं. धन्यावितरिक्त येथें सेवकास कोण त्राता आहे? वरीस जालें. वरात आली होती. अलीकडे कांहीं खर्चास आलें नाहीं. देण्यामुळें येथें गुंतून पडलों आहें. सेवकाविशीं तेथें स्मरणपूर्वक कोण अर्ज करितो? तीन चार विनंतिपत्रीं लिहिलें आहे. परंतु अलीकडे कांहीं आज्ञापत्र येत नाहीं. स्वामींनीं उपेक्षा केली तर येथें माझें कोणी नाहीं. फार दिवस जाले, धन्याच्या चरणदर्शनाची फार खंत वाटती. स्वामी कृपाढ्य समर्थ. हे विज्ञप्ति."

लेखांक ११८.* ता. २९ मार्च इ. स. १७८३.

श्रीगजानन. मि. फाल्गुन वा॥ १२ शके १७०४.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २५ रविलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्री लिहून डांकेबरोबर व काशीदजोडीबराबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसीं पावलीं असतील. सांप्रतचें वृत्त सरकारचीं आज्ञापत्रें सेवकास व बाईस लग्नाच्या ऐवजाकरितां आलीं होतीं. त्यांस बाईनीं राजश्री तुकोजी होळकरांस पत्रें लिहिलीं आहेत. तेथून उत्तर आल्यावर काय बोलणें तें बोलूं, असें बोलली आहेत. त्या अन्वयें पेशजीं सेवेसीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे. वरकड महाली जाबसाल राजश्री पाटीलबावांस बाईनीं पत्रें लिहिलीं आहेत. तेथून जाबसाल आल्यावर काय उत्तर करणें तें करितील. लग्नाच्या ऐवजाकरितां वेगळे वाटेनें बाईशीं

---

* लेखांक ११८। ११९। १२०। १२१ हे चार लेखाक इ. स. १७८३ सालचे आहेत. हे ह्या वर्षाची पत्रे छापून निघाल्यानंतर सापडले; ह्मणून ते ह्या सालाच्या पत्रामध्यें नमूद केले आ

राजश्री केसो भिकाजी व मी निक्षून बोललों. समजाऊन सांगितलें. त्यास, बाईनीं उत्तर केलें जे, तेथून तुकोजीबावांनीं कोणत्या ऐवजावर लिहिलें आहे, ते काय ह्मणून उत्तर लिहितात, तें पाहून मग काय बोलणें ते बोलूं, असें बोलली. ऐवजीं काम तितकें संदिग्ध बोलतात. बहुत प्रकारें समजाऊन सांगितलेंही आहे. पेश-आंदेशीची समजही आहे. परंतु देण्याची गोष्ट कोणीं सांगितली, तेथें गौण जाबसाल करितात. असें येथील ध्यान आहे. वरकड राजकी वगैरे वर्तमान चंद्र ११ रोज शुद्ध द्वादशी शनिवारीं दिवसा तृतीय प्रहरांनंतर भूमिकंप जाला. एक क्षणांत समाप्तही जाला. येथील ब्राह्मणांनीं वरतारा केला कीं, केवळ हा भूमिकंप नव्हे, विंध्याद्रिकंप होय. आतां या व पुढील वर्षी दोन ग्रहणें खग्रास आलीं आहेत व संमत १८४० चें साल आहे. या वर्षांत राज्यक्रांति व महर्गता फार होईल. एकेचाळीसाच्या वर्षापासून राज्याचा बंदोबस्त व सुभिक्षता होईल. राजकीय उपद्रव चहूंकडून फार होईल, असें येथें ब्राह्मणांनीं सांगितलें आहे. भोपाळवाले पठाण येथें आले आहेत ह्मणून पेशजीं विनंति लिहिलीं होती. त्यास, त्यांच्या येण्याचा सबब, सांप्रत भोपाळच्या किल्ल्यांत टिकाईत अधिकारी जो आहे, तो घरचा बंदा होय. भाऊबंदाच्या द्वेषेंकरून बायकांनीं त्यास बसविलें आहे. तो बंदोबस्त करून आहे. येथें आले होते ते अस्सल पहिले किल्लेदाराचे भाऊबंद आहेत. त्यांस त्यांनीं परागंदा केलें आहे. यास्तव येथें येऊन त्यांचें बोलणें यांसीं कीं, तुह्मीं सर्व प्रकारें आमचें साहित्य करणें. आह्मांस संस्थानीं बसवून टिक्का द्या, ह्मणजे आह्मी तुह्मांस कांहीं नजर देऊं. त्यास, बाईनीं राजश्री विसाजी शामराज व कृष्णाजी तानदेव व लहान मोठे त्यांनीं आपले मुत्सद्दी बसवून, दोन तीन दिवस ये गोष्टीचें खलबत केलें. सारांश ठरविला जें, यांचें साहित्य आपण केलें आणि प्रस्तुत जो टिकाईत आहे त्याचे स्वाधीन महाल, मुलूख व पैका देणें घेणें आहे. त्यानें तिकडील पाटीलबावांकडे संधान लावून त्यास आपलें सहाय केलें, तर प्रस्तुत पाटीलबावांशीं आपल्याशीं विटेल. असें करूं नये. सांप्रत हें वर्तमान पाटीलबावांस लिहून पाठवावें. त्यांचे आपले संमतें एक जालें, ह्मणजे याजकडे सरकारची व आपली उभयतांची नजर काय ठरवणें तें ठरवून, उभयतांच्या संमतें याचें साहित्य उत्तम प्रकारें करावें. याप्रमाणें ठरवून पठाणास बाईचे रुबरू बोलावून विसाजी शामराज यांनीं सांगितलें. त्यांनींही मान्य केलें. ते दिवशीं पठाणास भेजवानी केली. पांच सात जणांस वस्त्रें देऊन चंद्र १३ रोजीं संध्याकाळीं बिदा केलें. त्यांनीं कबिलेबाबत ठेवावयास जागा मागितली. मागाहून विचारून लिहून पाठवूं,

तेथें ठेवा, ह्मणून सांगितलें. बिदा केलें. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें. दुसरें वर्तमान झांबें प्रांतीं राजश्री चिमाजी बुळे आले आहेत. परंतु झांबेवाले मवास ऐकेना. यास्तव बुळे मजकुरांनीं आपले कारभारी येथें बाईकडे पाठविले कीं, दोन तीन तोफा मातबर पाठवावें, ह्मणजे मवासाचें पारिपत्य होईल. बाईनीं उत्तर केलें जे, बैल आणून इंदुरची थोरली तोफ घेऊन जाणें. त्यास बैल मिळेनात. वरकड साहित्य कांहीं त्यांस मिळेना. मग त्यांचे कारभारी येथें आले होते. त्यांनीं बुळ्यास लिहून पाठविलें जें, "तुह्मी येथें आल्याखेरीज कोणतेंही साहित्य होत नाहीं. आपल्यास हेही धनी, तेही धनी. आपण दुहींत पडूं नये." असें लिहिल्यावर चंद्र १३ रोजीं चिमाजी बुळे येथें आले. तृतीय प्रहरी वाड्यांत दोघां खिजमतगारांनिशीं येऊन, बाईच्या पायावर डोई ठेऊन, हात जोडून फार नम्रतेनें विनंति केली. बाईनींही आधीं उपरोधिक बोलणें फार बोलली. बुळ्यानें फारच नम्रतेनें उत्तरें केलीं. दोन दिवस ठेऊन घेऊन, एक लहान तोफ येथून सरंजाम बैल व दारूगोळासुद्धां दिली, व इंदुराम पत्रें व कारकून देऊन, थोरली तोफ चाळीस शेरांच्या गोळ्याची, चारशे बैल व ते तोफेचा सरंजाम दारूगोळा सर्व देऊन, चंद्र १६ रोजीं वस्त्रें देऊन बुळ्याम बिदा केलें. इंदुरास गेले. तेथून तोफ घेऊन झाब्याकडे जातील. दहा वीस हजार रुपये खर्चास कर्जाऊ मागत होते. परंतु बाईनीं कांहीं दिलें नाहीं. चंद्र १७ रोजीं पाटीलबावांच्या लष्करांतून तेलंग ब्राह्मण सोळा दिवसांनी आला. त्याने वर्तमान सांगितलें जे, पाटीलबावांजवळ इंग्रजांकडील वकील आहे. त्याजवळ दोन पलटणें आहेत. हैदरनाईक मयत जाल्याचें वर्तमान ऐकून, गोहजवाल्याचें व इंग्रजाचे वकिलाचें सूत्र होतेंच; गोहजवाल्याचा पक्ष धरून इग्रजानें पाटीलबावांशीं बिघडला, कांहीं हर्षामर्ष जाला, ह्मणून ब्राह्मण सांगत होता. परंतु असे जाले असते तर येथें बाईकडे अगर विसाजी शामराजाकडे कांही पत्रें येती. बाईसही विचारलें. तेथेंही शोध केला. परंतु या वर्तमानाची पत्रे कोठें आलीं नाहींत. सत्य मिथ्या देव जाणे. हे विनंति."

लेखांक ११९. ता. १४ एप्रिल इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. चैत्र शुद्ध १२ शके १७०५.

"सेवेसीं विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ जमादिलावलपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम

महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. श्रीमंतांच्या लग्नपट्टीचा ऐवज दोन लक्ष होळकरांकडे घ्यावा ह्मणून सरकारचीं व तुकोजीबावांचीं पत्रें बाईस आलीं, व सेवकास व राजश्री केसो भिकाजी यांसही आज्ञापत्रें आलीं कीं, बाईशीं बोलून ऐवजाची निकड करून ऐवज पाठवून देणें. त्यास बाईनीं आक्षेप घेतला कीं, "तुकोजीबावांनीं लिहिलें आहे कीं, बाकीपैकीं ऐवज देणें. ते बाकी त्यांची आह्मांकडे कोणत्या ऐवजीं राहिली आहे तें लिहून पाठवा; ह्मणून आह्मीं त्यांस लिहिलें आहे. त्याचें उत्तर आलीयावर काय तुह्मांसीं बोलणें तें बोलूं." ह्मणून सांगितलें. तो तपशील पेशजीं विनंतिपत्रीं पुष्कळ लिहिला आहे. सांप्रत छ १९ रविलाखरचें सरकारचें आज्ञापत्र सेवकास आलें. तें डाकेबरोबर छ ४ जमादिलावलीं दों प्रहरां येथे पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "दो लक्षांविशीं बाई दिक्कत घेतील असें वाटत नवतें. असो. तुह्मीं एक दोन वेळां बोलून, वगतेप्रमाणें ऐवजाची तरतूद होऊन ऐवज लवकर रवाना होय असें करणे. माळव्यांतील महालकरी यांपासून ऐवज घेऊन लवकर रवाना करावा. श्रीमंतांचे लग्नाचे ऐवजास दिकती घालणे चांगले नाहीं." ह्मणून आज्ञा. त्यास केसो भिकाजी यांसही पत्र दाखविलें. ते समयींच वाड्यांत जाऊन बाईस पत्र वाचून दाखवावें, तों श्रीरामनौमीच्या उत्साहाची गडबड. समय सांपडला नाहीं. दुसरे दिवशीं दों प्रहरांनंतर पत्र घेऊन उभयतांही गेलों. बाईस पत्र वाचून दाखविले. त्यांनीं उत्तर केलें जे, राजश्री तुकोजी होळकरांस पत्र लिहिलें आहे. ते बाकीचा ऐवज कोणता लिहून पाठवितील त्याप्रमाणें तुह्मांसीं बोलूं. त्यांचें पत्र आल्याशिवाय आह्मांस आतांच बोलतां येत नाहीं. इतकाच जाबसाल जाला. तदनतर सरकारची जासूदजोडी आली आहे, त्यांनीं फार निकड केली. यास्तव छ ७ मिनहूस दरबारसमयीं आह्मीं उभयतां जाऊन बाईसी केसोपंतांनीं विनंति केली जे, "लग्नपट्टीच्या ऐवजास फार दिवस जाले. जासूद निकड करितात." त्यास बाईनीं उत्तर केलें जे, "तुकोजीबावांचें पत्र आल्याशिवाय आह्मांस कांहीं बोलतां येत नाहीं." त्यावर केसोपंतांनीं आपल्या जाबसालाचीं उत्तरें मागितलीं. देवितों असें बोलली. तदनंतर मीं विनंति केली जे, "तुकोजीबावांस पत्र गेल्यास दीड महिना जाला. आठा दहा दिवसांनीं तेथील उत्तर आणऊं ह्मटलें, तर आपल्याजवळ सुतरस्वार आहेत. चलाख जासूद कासीद आहेत. हें ऐवजीं काम निकडीचें. त्यास दीड महिना जाला. अद्याप उत्तर येत नाहीं ह्मटलें तर कसें?" बाई बोलली जे, "घेणारही

तेथेंच आहेत. ज्यांनीं बाकी लिहून दिल्ही, तेही तेथेंच आहेत. त्यांनीं तेथेंच चौकशीनें विचारून पत्र त्यांचे घेतलें असतें, तर आह्मी आक्षेप कशास घेतों? आह्मांस त्यांनीं मोघम लिहिलें कीं, बाकीच्या ऐवजीं दोन लाख देणें. ते कोणती बाकी? आह्मीं आपले घरांत पाहिलें पाहिजे कीं नको?" मीं उत्तर केलें जे, "जासूद निकड करितो, त्यास उत्तर देऊन बिदा करावें. मागाहून तेथील वाफगांवचा जाबसाल आल्यावर काय आज्ञा कराल, तसें श्रीमंतांस लिहून पाठऊं." बाई बोलली जे, "त्यांचें उत्तर आलें नाहीं, तोंच आह्मीं उत्तर काय द्यावें? त्यांचा जाब आलीयावर काय बोलणें तें बोलूं." असें कांहीं रागें, कांहीं लोभें, बोलली. ते दिवशीं इतकाच जाबसाल जाला. तदोत्तर द्वादशी सोमवारीं वाड्यांतील पुराण जालीयावर बातमी राखून मीच बाईकडेस गेलों. एकांतींच बसली होती. गोविंद रघुनाथ गानू जवळ होते. मीं विनंति केली जे, "सरकारांत ऐवजाची निकड आहे. काल दुसरें पत्र आलें. जासूदही निकड करितो. तत्रापि, या लग्नपट्टीच्या ऐवजास आपणही इतकी दिकत करूं नये. वरकड दिकतीचीं कामें पुष्कळ आहेत. तदनंतर आह्मी येथें कांहींच निकड ऐवजाची करीत नाहीं, असें जासुदास वाटतें. तेथें धन्यांच्याही चित्तांत असेंच येईल. येथें अधिकोत्तर बोलावें तर आपण राग भरतात. तिकडे धनी समर्थ. इकडे आपण सरदार. मध्यें आह्मी लहान चाकर इतराजीखालीं येऊं. त्यास, या दों लक्षांविशीं आपली मर्जी काय, हें निक्षून आज्ञा करावी. त्याप्रमाणें धन्यास आह्मी लिहूं. मग जासूदजोडीचेही येथें काय काम आहे?" इतकें ऐकून बाई बोलली जे, "श्रीमंतांच्या लग्नाचा ऐवज आह्मांस देणें. परंतु तुकोजीबावानी बाकीचा मजकूर लिहिला, त्यास तेच धनी, आह्मी बाकी देणार! त्यास ते कोणती बाकी लिहितात तें पाहिलें पाहिजे एक. दुसरें, काल तुह्मांस श्रीमंतांनी लिहिलें आहे कीं, माळव्यांतील महालकऱ्यांजवळून ऐवज घेऊन लवकर रवाना करावा. त्यास, फार चांगलें आहे. आह्मींही तें पत्र पाहून, रात्रौ लहानमोठे बसून, माळव्यांतील महालांवर वर्गणीची योजना करून ठेवली आहे. महालांवर वर्गणी घालणें तेव्हां सोरच महालांवर वर्गणी पडेल. ऐवज साऱ्या महालांजवळून हिस्सेप्रमाणें घेतला पाहिजे. तेव्हां तेथें श्रीमंतांजवळ तुकोजीबावा बोभाट सांगतील जे, हे साहुकारांस कर्जांत महाल दिले आहेत, त्यांजवर बाईनीं पट्टी घातली आहे. असा बोभाट करतील. पुन्हां श्रीमंत आह्मांस ताकीद लिहितील. तर तें आह्मांस अनकूल पडणार नाहीं. लग्नपट्टीचा ऐवज साऱ्याच महालांजवळून घेतला पाहिजे. यास्तव श्रीमंतांनीं सावका-

राची अगर कोणाची रदबदली ऐकूं नये. असें जालें ह्मणजे आतां आह्मी साऱ्या महालांवर पेस्तरसालच्या ऐवजापैकीं वर्गणी घालून, ऐवज वसूल करून पेस्तरसालीं देऊं. या गोष्टीची पक्केपणें श्रीमंतांची आज्ञा आणवा. आह्मांस मान्य आहे. बोलल्याप्रमाणें तर्तूद करितों. तुह्मी ह्मणाल कीं, साहुकारांचे महाल एकीकडे टाका, नी खासगी महालांत तर्तूद करून द्या. तर तसें होणार नाहीं. वांटणी करणें तर इकडील साऱ्याच महालांवर होईल. नाहीं तर देशींही महाल आहेत. माळव्यांतील महालांपैकींच घेणें, तर या तर्तुदीनें करून देऊं. मधें कोणाची रदबदली श्रीमंतांनीं ऐकूं नये. असें मान्य होत असलें, तर लवकर श्रीमंतांची आज्ञा आणवा. आह्मीं सांगितल्याप्रमाणें वर्गणी करून ऐवजाची तोड पाडितों. केवळ तुकोजीबावा व नारो गणेश व चौघे साहुकार व चौघे मातबर मुत्सद्दी यांनीं भारलेले. ते सांगतील तेंच खरें. आह्मी सांगतों हें मिथ्या! आजचे कालीं असेंच त्यांचें भासवणें आहे. तर देशींही महाल आहेत. प्रस्तुत खर्चही काय आहे? चाकरी पडेल तेव्हां खर्च लागेल. त्या गोष्टी प्रस्तुत दूर आहेत." याप्रमाणें बाई बोलली. मजला सांगितलें जे, "आज अशीं पत्रें पाठवा नी माळव्याच्या महालची रदबदली साहुकार वगैरे कोणाची रदबदली ऐकून, तुह्मी साऱ्या महालांवर वर्गणी घालून ऐवज वसूल करून पाठवणें, अशी आज्ञा आली ह्मणजे आह्मी तेंच कार्य करितों. लवकर उत्तर आणवा." ह्मणून बाईनीं सांगितलें. येविसींची काय आज्ञा ते लवकर करणार धनी समर्थ. पुण्याहून आज्ञापत्रें डाकेबरोबर येतात, ते येथें पंधरा दिवसांनीं येतात. येथील विनंतिपत्रें डाकेबरोबर रवाना करितों, की लवकर पावावीं. तेथें कधीं पावतात हे कांहीं न कळे. उत्तर लवकर आणवा ह्मणून बाईनीं सांगितलें आहे. स्वामींची मर्जी. सेवकास खर्चास वरातपरगणे कसरावदावर पांचशें रुपयांची छ २८ रविलावलची पाठविली, ते छ ४ मिनहूस पावली. राजश्री गबाजी सदाशिव यांजला नेऊन दिल्ही. तेही बोलले जे, आह्मांस शिरसा वंद्य आहे. परंतु पेस्तरसालचे रसदेचे ऐवजीं आज्ञापिली आहे. तुह्मांस तों लवकर दिली पाहिजे. त्यास तर्तूद करून पंधरा विसां रोजांनीं ऐवज देऊं ह्मणून बोलले. निश्चयें देतों ह्मणून सांगितलें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १२०. ता. २७ एप्रिल इ. स. १७८३.
श्रीगजानन. मि. चैत्र व॥ ११ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २४ जमादिलावलपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– छ ९ जमादिलावलचें आज्ञापत्र डाकेबरोबर आलें, तें छ २१ मिनहूम दो घटकां रात्रीस पावलें. पत्राअन्वयें बाईशीं राजश्री केसो भिकाजी व मी बोललों कीं, हा लग्नाचा ऐवज वरातीप्रमाणें लवकर पाठविल्यानें श्रीमंतांस बहुतच संतोष होईल. त्यास बाईनीं एकच उत्तर केलें जे, वाफगांवचे पत्र आलें ह्मणजे काय तुह्मांसीं बोलणें तें बोलूं. केसोपंतांनीं उत्तर केलें जे, वाफगांवींहून पत्र आपणास आलें ह्मणून आह्मांस बातमी आहे. बाईनीं उत्तर केले जे, वाफगांवींहून पत्र निघालें असलें तर दो चौ दिवसां येईल. तुमचें डाकेबरोबर पत्र लवकर आलें. हे कासीदाबरोबर एका दो दिवसांमागून येईल. पत्र आलें ह्मणजे तुह्मांस दाखऊं. तदोत्तर काय तजवीज होणें ते होईल. याप्रमाणें उत्तर जालें. सेवेसी श्रुत होय. वरकड नवलविशेष कांहीं नाहीं. हे विज्ञप्ति."

लेखांक १२१. ता. १५ मे इ. स. १७८३.
पैवस्ती चद्र २० जमादिलाखर. **श्रीगजानन.** मि वैशाख शुद्ध १४ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १३ जमादिलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–स्वामींनीं आज्ञापत्र छ २२ जमादिलावलचें डांकेबरोबर पाठविलें, तें छ ७ जमादिलाखरीं तृतीय प्रहरीं येथें पावलें. मातुश्रीबाईस पत्र वाचून दाखविलें. पत्रान्वयें विनंतिही केली. त्यांनीं उत्तर केले जे, "सरकारचे वरातीबरोबर राजश्री तुकाजी होळकर यांनींही आह्मांस पत्र लिहिलें. कीं, इकडील महालचे बाकीपैकीं दोन लक्ष रुपये देणें. त्यास, आह्मी येथून त्यांस उत्तर लिहिले कीं, बाकी कोणती तें लिहून पाठवा. मुजरद कासीदजोडीबरोबर पत्र पाठविलें, त्याचें उत्तर अद्याप त्यानीं पाठविलें नाहीं. श्रीमंतांनीं दो पत्रीं तुह्मांस लिहिलें कीं, तुकोजीबावांचें पत्र बाईस गेलेंच आहे. त्यास, तुमच्या लिहिल्यावरून श्रीमंतांनीं त्यांस अगर त्यांचा कारभारी यांस हटकलेंच असेल. तेव्हां त्यांनीं सांगितलेंच असेल कीं, आमचें उत्तर बाईस गेलें ह्मणून श्रीमंतांनीं दोन वेळां तुह्मांस लिहिलें. येथें तों अद्याप त्यांचें पत्र आलें नाहीं. कासीद-

जोडीही परतून अद्याप आली नाहीं. आमच्या सांगितल्याचा तुह्मांस विश्वास नसेल, तर मुत्सद्यांस शपथपूर्वक विचारा." इतकें उत्तर केलें. तदोत्तर वेगळे वाटेनेंही पत्राचा शोध केला. परंतु अद्याप तुकोजीबावांचें पत्र या जाबसालाचें आलें नाहीं. पेशजींही दोन तीन वेळां या ऐवजाविषयीं बाईनीं उत्तरें प्रत्युत्तर केलीं. ते तीन वेळांही तपशीलवार विनंतिपत्रीं सेवकानें छ ११ व छ १७ जमादिलावलीं व मध्यें एक वेळ अशीं वरचेवर सेवेसीं लिहिलीं आहेत. त्यावर बेविसावे भिनहूचें आज्ञापत्र हें आलें. परंतु त्या अन्वयाचा उल्लेख कांहींच आज्ञापत्रीं नाहीं. त्यावरून यांस समजलें की, त्यांनीं तेथें कसाही जाबसाल केला, तो चौघांच्या साहित्येंकडून श्रीमंतांस खराच भासतो. येथून उदंड खरें लिहिलें तें अपथ्यकारक होतें. कां की, तसे साहित्यकार येथें कोणी नाहींत. त्या अर्थी कोणताही जाबसाल प्रमाण अथवा अप्रमाण निदर्शनास यावा. तुकोजीबावांनीं बाईच्या पत्राचें उत्तर पाठविलें ह्मणतात. हाच पुरतेपणे शोध करावा. येथे तों पत्र आलें नाहीं हें खरें. आह्मींही फार बारीकपणे शोध केले. परंतु पत्रही आलें नाहीं; ते कासीदजोडीही अद्याप आली नाहीं. असें असतां, मिथ्या तों सत्यत्वेंकरून धन्याचे रुबरू बोलतात, हें अपूर्व वाटतें. येविषयींचा शब्द सेवकाकडेही आहे की, इतके दिवस येथें राहून, इतकाही शोध एका पत्राचा न लागे, तेव्हां व्यर्थ. किंवा लोभामुळें ते जसें सांगतात तसे हे लिहितात, असेही धन्यास भासेल. परंतु असें घडणार नाहीं. पेशजीं वरातेबरोबर तुकोजीबावांचेंही पत्र आलें होतें. सांप्रत बाईच्या पत्राचें उत्तर, अडीच महिने जाले, आलें नाहीं. तस्मात् प्रांजलपणें मनःपूर्वक हे दोन लक्ष रुपये सरकारांत द्यावे असें मानस नाहीं. ह्मणून त्यास बाकीचा पै लाविला. सुरळीतपणें द्यावी असे असते, तर बाईच्या पत्राचें उत्तर सरकारांत दाखवून पाठविते, अगर सरकारांतच पत्रें देते. डाकेबरोबर उत्तर लवकर येतें. इतक्या दिवसांत ऐवज सरकारदाखल जाला असता. या अर्थी तेथीलच हिसका दिसतो. येथील मर्जी पाहातां लग्नोत्सवाच्या ऐवजास दिक्कत करावी असें कदापि नाहीं. परंतु त्यांच्या दिक्कतीच्या लिहिण्यामुळें येथें मनस्ताप जाला. ह्मणून त्यांच्या उत्तराचा आग्रह. केसोपंतासीं व सेवकासींही बोलणें हेंच कीं, तुकोजीबावांस पत्र लिहिलें आहे, त्याचें उत्तर आलियावर काय बोलणें तें बोलूं. असा थांग लागूं देत नाहींत. परंतु बारीक शोध पाहातां मातुश्रींनीं ऐवज तयार करून ठेविला आहे. येवढे गोष्टीचा शब्द लावून घेतील असें होणार नाहीं. पेशआंदेशी फार आहे. कोणतेंही कर्म करणें तें समंजसपणें करितात. अशी वर्तणूक येथील आहे. या ऐवजास दो गोष्टींची दिक्कत. एक तों तुकोजी. .....

श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं येथें रेवेस घाट बांधला आहे. त्या घाटावर बाईनीं एक देवालय बांधून श्रीपरशरामजीची मूर्तिस्थापना अक्षद तृतियेस केली. पाटीलबावांकडील व श्रीमंत दादासाहेबांकडील वर्तमान येणार आहे. आलें ह्मणजे मागाहून लिहून सेवेसी पाठवीन. हे विज्ञप्ति."

इ. स. १७८४.

(ह्या सालाचीं अवघीं ३ पत्रेंच उपलब्ध झालीं आहेत. इ.स. १७८४च्या मार्चमध्यें विठ्ठल शामराज महेश्वरच्या कामगिरीवरून दूर झाला, व केसो भिकाजी तें काम पाहूं लागला. इ स १७८४ पासून इ १७९४ पर्यंत सुमारें १०।११ वर्षांची केसो भिकाजीचीं बातमीपत्रे बहुतेक शाबूद सांपडलीं आहेत. ती वेगळ्या भागांत प्रसिद्ध होतील).

लेखांक १२२. जानेवारी इ. स. १७८४.
श्रीगजानन. पौष शके १७०५.

"सेवेसी केसो भिकाजी व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ सफरपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः— इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून कासीदजोडीबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रतचें वर्तमान आलाहिदा विनंतिपत्रावरून विदित होईल. राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान, गोहजवाल्याचा वकील आला होता. त्यानें बहुत प्रकारें ग्लान सांगितली. पाटीलबावा पसतीस लक्ष रुपये मागत होते. त्यास वकिलानें रदबदली फार केली. त्यावर पंधरा लक्षांवर ठराव जाला. पंधरा लक्ष रुपये घेऊन गोहज त्याजकडेस ठेवावी; पन्नास सहस्रांची जागीर त्यास द्यावी; आणि गोहजवाल्यानें पाटीलबावांजवळ चाकरी करावी; याप्रमाणें मसलत ठरली. महागाईही फार. यास्तव सर्वांच्या मतें असें ठरलें. माघ अखेरीस उज्जनीस येणार. याप्रमाणें वर्तमान साहुकाऱ्यांत ऐकिलें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

लेखांक १२३. ता. १५ फेब्रुवारी इ. स. १७८४.
श्रीगजानन. मि. माघ व॥ ९ शके १७०५.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीः— आज्ञांकित सेवक विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २३ रविलावलपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथे वर्तमान येथास्थित असे.

विशेषः– येथील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सेवेसी पावलीं असतील. सांप्रतचें वर्तमान, राजश्री केसो भिकाजी दातार यांनीं सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. वर्तमान खचित आहे. राजकीय वर्तमान तर राजश्री चिमाजी बुळे झांबे प्रांतीं आले आहेत. दोन तीन हजार फौज व पेंढारी दोन तीन हजार व बरचाले (?) दोन हजार अशा जमावानिशीं संस्थानिकांशीं जरबा देऊन अम्मल जारी करावा. त्यास, तेथील राजानें भिल्ल दहा पांच हजार जमा करून बुळ्यावर छापा घातला. परंतु बुळ्यांनीं दम धरून तळ सोडला नाहीं. तदोत्तर बाईकडेही दोघे भले माणूस पाठवून तोफ एक मागविली. बाईनींही इंदुरींहून एक तोफ देवविली. संस्थानिकांची उपमाता आहे, ती बुळ्याचे अनुमतांत आहे. तिनें भिल्ल सोरे फोडून आपल्याकडेस आणिले. तोफही नेली आहे. झांबेवाल्याचें पारिपत्य करितील. याप्रमाणे दरबारीं वर्तमान ऐकिलें. बाई श्रीओंकारेश्वरास जाणार होती, ती राहिली. सबब कीं, चिमाजी बुळे इकडे आले आहेत. चांभारीकडे काशी रंगनाथ दो चौशां स्वारांनिशीं आहेत. न जाणों, काय गडबड यास्तव राहिली. वे॥ सदाशिव भटजी उपाध्ये यांजबरोबर ध्वजोत्साहाचीं वस्त्रें पाठवून पौर्णिमेस ध्वजोत्साह जाला. कांहीं वस्त्रें राहिलीं होतीं, तेथेंच ब्राह्मणांस वांटलीं. संकल्पित जालीं ह्मणून. रा. पाटीलबावा जेथें आहेत तेथेंच आहेत. अलीकडे कांहीं वर्तमान आलें नाहीं. आतां पत्रें गेलीं आहेत. काय वर्तमान येईल तें पहावें. वरकड अधिकोत्तर प्रस्तुत कांहीं नाहीं. देखिलें ऐकलें वर्तमान सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चाची फार विपत्य आहे. धनी कृपाळू समर्थ हे विज्ञप्ति."

पै॥ छ १४ रविलाखर सन अर्बा समानीन.

लेखांक १२४.

श्रीगजानन.

ता २८ फेब्रुवारी इ. स. १७८४. मि फाल्गुन शुद्ध ८ शके १७०५.

"सेवेसी विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ६ रविलाखरपरीयंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः– इकडील वर्तमान पेशजीं विनंतिपत्रीं लिहून डाकेबरोबर पत्रें रवाना केलींच आहेत. सेवकाचें वर्तमान हुजूर येण्याविशीं आज्ञापत्र येऊन चार महिने जाले. येथें लोकांचें देणें त्याविशीं वारंवार विनंति लिहीत गेलों. परंतु खर्चास कांहीं न आलें. येथील प्राप्तीचा विषय दर पत्रीं स्वामींस लिहीतच गेलों. धन्याच्या पायासीं अन्यथा वर्तणूक केली नाहीं. धनी

समर्थ शिरावर असतां कोणास ग्लान सांगूं नये. तेही वाट पाहिली. माझ्या गरिबाचा वशिला कोण धन्याजवळ, कीं रदबदली मजविशीं करील. एक सबनीस. त्यांसही लिहीत गेलों. त्यास, त्यांणीं उत्तर लिहिलें कीं, साफ श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, खर्चास पाठवायाचें नाहीं. तुह्मी कसेंही करून या. येथें माझें कोण कीं, माझें कर्ज वारून रवाना करील. असें पत्र आल्यावर ग्लान सांगणें प्राप्त जाली. तेव्हां बाईस पांच सात वेळां विनंति केली. परंतु ज्यांजकडून हटकिविली, त्यांजवळ साफच उत्तर केलें जे, "त्यांणीं आपल्या धन्यास लिहून पाठवावें. तेथून खर्चास आणऊन, येथील फडशा करून आपलें जावें. आह्मीं कोणाकोणाचीं कर्जें वारावीं?" असें साफ उत्तर केलें. दुसरें बोलली कीं, "ज्यांणीं त्यांस येथें बसविलें आहे, त्यांचें त्यांस स्मरण आहे कीं नाहीं? पहिले बाबुराव वैद्याचा कारकून लक्ष्मण बल्हाळ येथें होते, ते वेळेसच आह्मीं यांस मुकुंदराव हरी दिवाण यांजबरोबर सांगून पाठविलें कीं, बाबुराव वैद्य यांचे कारकून येथें आहेत. तुमचें काय प्रयोजन आहे? तुह्मीं आपल्या धन्याकडे जा. असें सांगून पाठविल्यावर त्यांनीं आपल्या धन्यास लिहून पाठविलें. श्रीमंतांनीं त्यांस लिहून पाठविलें कीं, 'बाईच्या चित्तांत असें असेल की, सरकारचें कोणी तेथें नसावें, तर आह्मी तुमची योजना मंडळेश्वर अगर आणीक कोठें योजना करून देऊं. खर्चाची बेजमी करूं.' असें त्यांस लिहिलें होतें. तें वर्तमान त्यांनीं आह्मांस सांगून पाठविलें. आह्मीं त्यांस उत्तर सांगून पाठविलें कीं, सुखरूप असा, दरबारास येत जा. परंतु खर्चास आह्मांजवळ कांहीं नाहीं. तुमच्या धन्यांनीं तुह्मांस लिहिलेंच आहे कीं, खर्चाची बेगमी करूं. त्यापक्षीं आह्मांकडेस काय गुंता आहे? जें बोलणें तें आपल्या धन्याशीं बोलावें. त्याहावें. (अपूर्ण.)"

लेखांक १२५.

श्रीगजानन. ता० ४ मार्च इ. स. १७८४.

सेवेसी केसो भिकाजी व विठ्ठल शामराज चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ११ रविलाखरपर्यंत स्वामींच्या कृपावलोकनेंकरून मुक्काम महेश्वर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान पेशजी विनंतिपत्रीं लिहून डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. सांप्रत चंद्रमजकुरीं दोन घटका रात्रीं, गोहज फत्तेचीं पत्रें राजश्री माधवराव गंगाधर यांचीं साता दिवसांचीं बाईस आलीं. तीं तीन घटका रात्रीं राजश्री वासुदेव चिमणाजी यांनीं

नेऊन बाईस वाचून दाखविलीं. त्यांत मजकूर कीं, "किल्ल्यास फौजेचा वेढा होता. मोरचे लागू जाले व दोन सुरुंगही तयार जाले. एका दो दिवसां दारू भरून उडवावें. तें वर्तमान आंत राण्यांस कळलें व अडीच शेर धान्य वगैरे गिरानी फारच जाली. तेव्हां फाल्गुन शुद्ध चतुर्थीस गोहजवाल्यानें बाहेरील कारभारी यांसी भानगड भेटीची लावली. कारभारी यांनीं पाटीलबावांस श्रुत केलें. पाटील-बावांचा आग्रह कीं सुरुंग उडवून गढी घ्यावी. परंतु गोहजवाल्यानें आग्रह फारच केला. अशी घालमील जाबसालाची लागलीच होती. तों शुद्ध पंचमीस पन्नास स्वार व कांहीं पायदळ इतक्यानिशीं बाहेर येऊन, भेटीस येतों ह्मणून सांगून पाठविलें. यांनींही कारभारी यांनीं पाटीलबावांस सांगून भेटीस आणिला. भेटी जाल्या. डावे बाजूस उतरायास जागा दिली. षष्ठीस कबिले बाहेर काढून ठाणें संध्याकाळीं सरकारचें जाणार. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून किल्ला फत्ते जाला. पाटीलबावांस महत् यश आलें." ह्मणून पत्रीं वर्तमान लिहिलें होतें. वर्तमान ऐकून बाईसही बहुत संतोष जाला. बोलली की "आविलंबिलें कार्य सिद्धीस जाणें ईश्वरी कृपा. ग्वालेर महत् प्रयत्नेंकरून घेतली. तो किल्ला फिरून हस्तगत व्हावा, हे दुरापास्त गोष्ट होती. परंतु श्रीमंतांचा पुण्य प्रताप समर्थ. तसेंच गोहज येणे हेहि संकटच होतें. परंतु श्रीमंतांचें कपाळ थोर, ह्मणून अशीं स्थळें हस्तगत जालीं. पाटीलबावांनीं मोठें यश घेतलें. दोन घटका हीच चर्चा मंडळीसुद्धां चालली होती. याप्रमाणें ऐकिलें वर्तमान. दुसरें, सरकारचीं आज्ञापत्रें चंद्र४ मिन-हूचीं बाईस एक व सेवकास एक डांकेबराबर आलीं. तीं चंद्र १० मिनहूस प्रहर रात्रीं परभारां बाईकडे गेलीं. त्यांनीं आपला लखोटा घेऊन वाचून पाहून आमचा लखोटा आह्मांकडेस पाठविला. आह्मी लखोटा फोडून वाचून पाहिला. तेथें आज्ञा जे, बाईस पत्र लिहिलें आहे तें देऊन ऐवजाची रवानगी लवकर करवणें. दुसरे दिवशीं पुराणाचे समयीं दरबारास गेलों. पुराण जाल्यावर बाई बोलली जे तुमचें पत्र तुह्मांस पावलें? उत्तर केलें की पावलें. परंतु आपले पत्रांतील अन्वय समजला नाहीं. बाई बोलली की तोच ऐवजाचा मजकूर लिहिला आहे. आह्मीं प्रतिउत्तर केलें जे, "सरदार मोहिमसीर आहेत. ऐवज खर्चास पाहिजे. श्रीमंतांचीं वरचेवर आज्ञापत्रें येतात. येथूनही लवकर तरतूद होऊन ऐवजाची रवानगी लवकर जाली पाहिजे. बाईनीं उत्तर केलें जे, दादाजीचें पत्र अद्याप आह्मांस आलें नाहीं. दादाजीस पत्र लिहून आतां पाठवितें. तेथील उत्तर आल्यावर या पत्राचीं उत्तरें लिहून देऊं. आह्मीं उत्तर केलें जे, "पत्र येण्यास पंधरा वीस दिवस पाहिजेत. तेथें ऐवजाची निकड आहे. श्रीमंताचीं पत्रें येत असावीं, आपणाकडून दिरंग

लागून प्रसंगास उपयोग न पडावा, हें उचित कीं काय ? आपण दौलत करितां, त्या अर्थी प्रसंग समय पाहात असावा. परंतु त्यांची एक तार. दुसरें समजूं नये अशी रीत येथील जाली आहे. पुढें यांनीं काय अंदेशा केला असेल, तो ते जाणेत. संतोषेंकडून बोलणें नाहीं. यावर जसें बोलणें होईल तसें सेवेसीं लिहून पाठवूं. बळवंतराव धोंडदेव यांची पागा व कबिला काल येथें आली होती. ती बाई, बाईचे भेटीस त्रितीय प्रहरीं आली होती. त्यांनीं बाईस चोळीपातळ व एक शालजोडी दिली. बाईनीं त्या बाईस एक पातळ चोळी व तिच्या मुलास एक शेला पागोटें दिलें. ती आज चंद्रमजकुरीं रेवापार जाली. माळव्यांत गोसावी व बैरागी दहा बारा हजार आले आहेत. त्यांजबरोबर वीस पंचवीस बाणाच्या कैच्या वगैरे लढवाई सामान आहे. जागां जागां कमावीसदार व गांव गांवड्यापासून खंडण्या घेतात, हें वर्तमान येथें आलें. त्यावरून बाईनीं, येथून व्यंकोजी रामचंद्र पागे, शें दोनशें लोकानिशीं पुढें पाठविले आहेत. ग्वालेर घेतल्याचें वर्तमान येथें आलें. ते वेळेस बाईनीं वर्तमान ऐकून खुशालीच्या तोफा सोडल्या होत्या. गोहजेचें वर्तमान आल्यावर तो समारंभ केला नाही. तस्मात् दिसून येतें की, पाटीलबावांचें पत्र आलें नाहीं. माधवरावांचीं पत्रें आलीं. पाटीलबावांचीं पत्रें आल्यावर सोडतील तर न कळे. बाईनीं हत्तीचा रथ केला आहे. स्वारीस काढीत असतात. सरकारच्या जासूदजोड्या हुजूर पाठवून देणे ह्मणून आज्ञापत्र आलें होतें. त्यास आज्ञेप्रमाणें त्यांचा भरला रोजमुरा देऊन, पत्रें लिहून दिलीं असतां, पुढील रोजमुरा पंधरा दिवसांचा आवकाश असतां, आह्मीं आज्ञा दिली परंतु हा रोजमुरा भरल्यावर घेऊन जावूं, असें ह्मणून राहिल्या आहेत. यांच्या चित्तांत रोजमुऱ्यासाठीं येथें कटकट करावयाची आहे. सरकारचें आज्ञापत्र हुजूर येण्याविषयी आलें, परंतु येथें देण्याच्या पेंचाकरितां गुंतून पडलों. आज्ञेची अवज्ञा घडली. लाचार ! तूर्त येथील देण्याचें लढें राजश्री केसोपंतांच्या गळां घालून सत्वरींच निघून येतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

